ज्ञानदीप लावू जगी

पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव	:	छत्रपति शिवाजी महाराज
लेखक	:	दिनकर विनायक काळे
संपादक	:	अ. वि. नाईक
प्रकाशक	:	पुणें विद्यापीठ, पुणें
प्रकाशन वर्ष	:	१९७१
मूळ ग्रंथ प्रत	:	शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

१३

छत्रपति शिवाजी महाराज

लेखक

दिनकर विनायक काळे

एम्. ए.

बहि:शाल शिक्षण ग्रंथमाला

तृतीयावृत्ति
१९७१

मूल्य : सहा रुपये



छत्रपति शिवाजी महाराज

पुणें विद्यापीठ

बहिःशाल शिक्षण ग्रंथमाला

बहि:शाल शिक्षण मंडळ

१३

छत्रपति शिवाजी महाराज

लेखक

दिनकर विनायक काळे, एम्. ए.

तृतीयावृत्ति

एप्रिल १९७१

मूल्य : सहा रुपये

प्रथमावृत्ति : (३००० प्रती)
सौर फाल्गुन २६ शके १८८१
(१६ मार्च १९६०)

द्वितीयावृत्ति : (३००० प्रती)
सौर श्रावण शके १८८३
(ऑगस्ट १९६१)

तृतीयावृत्ति : (५००० प्रती)
सौर वैशाख शके १८९३
(एप्रिल १९७१)

★ ★

★ ★

संपादक :
डॉ. **अ. वि. नाईक**, एम्. ए., पीएच्. डी.
सचिव, पुणें विद्यापीठ बहि:शाल शिक्षण मंडळ,
गणेशखिंड, पुणें ७.

★ ★

मुद्रक व प्रकाशक :
रं. श्री. सरदेशपांडे,
कार्यवाह, पुणें विद्यापीठ,
गणेशखिंड, पुणें ७.

संपादकीय निवेदन

मुंबई राज्यसरकारच्या सन १९४८ च्या पुणें विद्यापीठ कायद्यांतील २६ व्या कलमान्वयें, पुणें विद्यापीठाने १९५० सालीं बहि:शाल शिक्षण मंडळ स्थापन केलें. सामान्य जनतेला उपयुक्त असणाऱ्या व आकलन होणाऱ्या विषयांवर पुस्तकें लिहून घेण्याची व तीं प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करणें हा या मंडळाच्या विविध उद्देशांपैकी एक उद्देश आहे.

तदनुसार 'छत्रपति शिवाजी महाराज' हें पुस्तक श्री. दिनकर विनायक काळे, एम्. ए. यांजकडून मंडळाने लिहून घेतलें व तें बहि:शाल शिक्षण ग्रंथमालेंतील १३ वें पुष्प म्हणून छत्रपति शिवाजी जयंतीस, दिनांक १६ मार्च १९६० ला प्रथम प्रकाशित केलें. पुणें येथील साक्षरता प्रसारक मंडळानें बहि:शाल शिक्षण कार्याच्या प्रसारासाठी पुणें विद्यापीठास दिलेल्या रु. ३००० च्या देणगीचा विनियोग त्या प्रथमावृत्तीसाठी करण्यांत आला. त्या देणगीबद्दल बहि:शाल शिक्षण मंडळ साक्षरता प्रसारक मंडळाचें सदैव ऋणीच राहील.

छत्रपति शिवाजी महाराज या पुस्तकाची प्रथमावृत्ति, पुस्तक प्रकाशित केल्यानंतर एका वर्षांतच संपुष्टांत आली. त्यानंतर सन १९६१ च्या ऑगस्टमध्ये पुस्तकाची सुधारलेली, तीन हजार प्रतींची द्वितीयावृत्ति प्रकाशित केली होती. तीहि गतवर्षी म्हणजे सन १९७० मध्ये संपुष्टात आली. म्हणून पुस्तकाची तृतीयावृत्ति छापून घेऊन प्रसिद्ध करण्याचा बहि:शाल शिक्षण मंडळाने निर्णय केला आणि त्या निर्णयानुसार प्रस्तुतची तृतीयावृत्ति प्रकाशित करण्यांत येत आहे. या तृतीयावृत्तीच्या निमित्ताने ग्रंथलेखकास ग्रंथांत योग्य ती सुधारणा करण्याची संधी देण्यांत आली होती आणि ग्रंथलेखकानेहि त्या संधीचा उपयोग करून इष्ट वाटली ती सुधारणा केली आहे. असें जरी असलें तरी ग्रंथाचें मूलस्वरूप अबाधित राखण्याचीहि दक्षता घेतली आहे.

या पुस्तकांतील छायाचित्रें अनेकांकडून मिळविलीं आहेत. ‘ स्वतंत्र छायाचित्रां ’ पैकी क्र. २ चें श्री. कामदार यांजकडून, क्र. ५ व ६ हीं श्री. ब. मो. पुरंदरे यांजकडून, क्र. ९ व १९ हीं रायगड-मंडळाकडून व क्र. १० भा. इ. सं. मंडळाकडून, अशीं मिळालीं. प्रस्तुत तृतीयावृत्तींत नार्वे (गोवा) येथील सप्तकोटीश्वर देवालय आणि त्यावरील शिलालेख ही दोन छायाचित्रें (क्र. १३ व १४) संचालक, गोवा पुराभिलेख यांच्याकडून मिळालेलीं समाविष्ट केलीं आहेत. राहिलेलीं दहा उत्कृष्ट छायाचित्रें औरंगाबादच्या पुराणवस्तु खात्याच्या सौजन्याने मिळालेलीं आहेत. ‘ चित्रें व नकाशे ’ या यादीपैकी आठ नाणीं आणि मुद्रा व मर्यादा यांचें चित्र, आणि क्र. २० व २१ च्या ठशांचीं मूळ पत्रें भा. इ. सं. मंडळाने उदारपणाने ठसे करून घेण्यासाठी दिली. क्र. १० चें मूळ छायाचित्र डॉ. म. श्री. माटे या संशोधकांनी स्वतः काढलेल्या चित्रांपैकी दिलें. आणि क्र. १६ चें चित्र ग्रँट डफच्या पहिल्या आवृत्तींतून घेतलें आहे. तसेंच आरंभीचें रंगीत चित्र मुंबई येथील प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझियमच्या ट्रस्टींच्या सौजन्याने व बॅ. वि. वि. ओक यांच्या परिश्रमाने समाविष्ट करतां आलें आहे. या सर्वांचे, त्यांनी केलेल्या साहाय्याबद्दल, बहिःशाल शिक्षण मंडळ ऋणी आहे.

या तृतीयावृत्तीसाठी खुद्द ग्रंथलेखक श्री. दि. वि. काळे यांनी पुष्कळच परिश्रम घेतले. तसेंच ग्रंथाच्या सुबक छपाईस पुणें विद्यापीठ मुद्रणालयाचा कामगारवर्ग आणि अधिकारी यांचें कौशल्य आणि सहकार्य कारणीभूत आहेत. या सर्वांचा अगत्यवादाने साभार निर्देश करणें हें आमचें पहिलें कर्तव्य आहे.

दि. २६ एप्रिल १९७१
बहिःशाल शिक्षण मंडळ,
पुणें विद्यापीठ, पुणें ७.

अ. चि. नाईक
संपादक,
बहिःशाल शिक्षण ग्रंथमाला.

लेखकाची प्रस्तावना

बहि:शाल शिक्षण मंडळाने हें चरित्र माझ्याकडून लिहवून घेऊन प्रसिद्ध केलें. आता त्याची ही तृतीयावृत्ति प्रसिद्ध होत आहे. याबद्दल त्यांचे आभार मानण्याची ही संधी घेतो.

छत्रपति शिवाजी महाराजांचें नांव प्रथम हिंदुस्थानांत आणि हिंदुस्थानांत संचार करणाऱ्या युरोपियांच्या देशांत गाजलें तें अफजल-प्रकरणाने; राजांच्या तिसाव्या वर्षी. नंतरचे पराक्रम हिंदुस्थानांतले सत्ताधीश आणि परदेशी व्यापारी यांच्या नजरेत भरले. ते त्यांनी आपल्या पद्धतीने लोकांना माहीत करून दिले. राजांच्या यापुढच्या वीस वर्षांच्या चरित्राचा पाया पहिल्या तीस वर्षांत घातला. शहाजीराजांच्या जहागिरींत, मावळांत, सह्याद्रींत, महाराष्ट्रांत घातला. अफजल-वधाच्या पूर्वीचें राजांचें चरित्र म्हणजे शिवाजीपणाच्या विकासाची साधना होय. तिचें यथार्थ स्वरूप समजून घेणें हें महाराष्ट्रियांचें कर्तव्य आहे.

त्यासाठी महाराष्ट्राची रचना, समाजस्थिति, धर्मकल्पना, संस्कृति, वाङ्मय आणि स्वभाव या सर्वांची पार्श्वभूमि म्हणून माहिती असणें जरूर आहे. परंतु या सर्वांचा सांगोपांग विचार करावयाचा, तर तें शिवछत्रपतींचें चरित्र होण्याऐवजी तो शिवकालीन महाराष्ट्राचा इतिहास होईल.

प्रतिकूल परिस्थितींत देखील सभोंवताली मिळालीं तीं माणसें आणि साधनें घडवून कामाला लावणें हें आपल्या चरित्र-नायकाचें वैशिष्टय आपण मानतों. त्या सूत्राचा धागा सोडावा लागूं नये यासाठी अनेक गोष्टींमधून निवड करावी लागली, संक्षेप करावा लागला. विश्वसनीय घटनांतून महाराजांचें व्यक्तिमत्त्व आकाराला आलेलें दाखवावें लागलें. त्यामुळे कदाचित् 'बहु'श्रुत वाचकांचा विरस होईल.

शिवाजी महाराजांचें कार्य हें महाराष्ट्राच्या निर्मितीचें बीज आहे. त्यांचें चरित्र महाराष्ट्राच्या अस्मितेचें एक आरंभस्थान आहे. शिवाजी हें महाराष्ट्राचें स्फूर्तिस्थान आहे, आणि शिवाजी हा आजच्या चारित्र्यसंपन्न महाराष्ट्राचा आदर्श आहे. व्यापक अर्थानें गुरुहि आहे.

पण शिवाजी ही केवळ चारित्र्यसंपन्न व्यक्ति किंवा संत नव्हे. तर रामकृष्णांच्या प्रमाणेच राष्ट्रकाव्याचा नायक म्हणून आणि 'कालस्य कारणम्' म्हणून गाजलेला, आणि भारतांत इतर कुठेहि न झालेला 'छत्रपति' आहे. त्याचें विविध पैलूंचें जीवन हें दुसऱ्या कोणत्याहि एकांगी जीवनापेक्षा कितीतरी पटींनी समृद्ध आहे. येथे त्यांतील घटनांचें साधें कथन करून थांबावें लागणार आहे, हें बरेंच अन्यायाचें आहे. तथापि सर्वसाधारण महाराष्ट्रियाला आपलें जीवन उजळून घेण्यासाठी या कथनांतील वास्तव आणि ऐतिहासिक शिवचरित्राचा नंदादीप कारणी लावतां येईल.

दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनानंतर, एक-दोन नवीं साधनें उजेडांत आलीं. त्यांच्यामुळे क्रमप्राप्त झालेले, कांही अधिकारी अभ्यासकांशीं झालेली चर्चा आणि चिंतन यांतून सुचलेले, किंवा कांही सद्भावयुक्त परीक्षणांत प्रकट झालेल्या गैरसमजांच्या निराकरणार्थ अवश्य वाटणारे, भाषेचे, विवेचनाचे व तपशिलाचे छोटे छोटे फरक द्वितीयावृत्तीप्रमाणेच या तिसऱ्या आवृत्तींत केले आहेत. प्रसंगानुरूप दोन छायाचित्रें (क्र. १३ व १४) आणि एक पत्र (क्र. ११) अशीं अधिक घातलीं आहेत. कांहींच्या सूचनेवरून 'शिवाजी महाराजांची जन्मतिथि' आणि 'शिवचरित्राचीं साधनें' अशी दोन नवीन टिपणें शेवटीं जोडलीं आहेत. मूळ चौकट मुळींच बदललेली नाही.

६ सौर वैशाख १८९३
२६ एप्रिल १९७१

दि. वि. काळे

अनुक्रमणिका

* * *

स्वतंत्र छायाचित्रें

★ ★ ★

चित्रें व मानचित्रें

* * *

निवडक आधार

कृष्णाजी अ. सभासद —शिव-'राजियाचें चरित्र-आख्यान'
(सभासदी बखर)

कवीन्द्र परमानन्द —अनुपुराणे सूर्यवंशम् (शिवभारत)

जयरामकवि पिंडये —शिवराजचरित्रे पर्णाल (प्रणाल ?)–
पर्वतग्रहणाख्यानम

रामचंद्रपंत अमात्य —मराठेशाहींतील राजनीति (आज्ञापत्र)

स. म. दिवेकर —शिवचरित्र प्रदीप (जेधे शकावली)

श्रीशिवचरित्रकार्यालय —शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १ व २
—शिवचरित्र निबंधावली
—इंग्लिश् रेकॉर्ड्स ऑन् शिवाजी

भा. इ. सं. मंडळ —शिवचरित्र साहित्य खंड १ ते ११
—शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड ३

वि. का. राजवाडे —मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें
खंड ८ व १५ ते १८

प्रा. ग. ह. खरे —शिवचरित्रसंशोधनवृत्त राजशक २७९ व २८३
—ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ६

सर जदुनाथ सरकार —हाउस ऑफ् शिवाजी

सर जदुनाथ सरकार व
डॉ. रघुबीरसिंग —शिवाजीज् व्हिजिट् टु औरंगझिब् ॲट् आग्रा

डॉ. पां. स. पिसुर्लेकर —पोर्तुगेज-मराठे संबंध

आणि

कै. द. वि. आपटे, श्री. य. ग. फफे, म. म. द. वा. पोतदार, प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर, श्री. शं. ना. जोशी (राज्यकारभाराचा अभ्यास) इत्यादींचे चर्चात्मक लेख.

* * *

छत्रपति शिवाजी महाराजांच्या आयुष्यांतील कांही महत्त्वाचे काल

१५९९ मार्च ३०	शहाजीराजांचा जन्म.
१६३० फेब्रुवारी १९	छत्रपति शिवाजीराजांचा जन्म.
१६४१	शिवाजीराजांची पुण्याकडे रवानगी.
१६४५	हिंदवी स्वराज्याची शपथ.
१६४६ जानेवारी २८	राजांच्या मुद्रेचें पहिलें उपलब्ध पत्र.
१६४७ मार्च ७	दादाजी कोंडदेवाचा मृत्यु.
१६४७ मार्चनंतर	सिंहगडावर स्वराज्याचें तोरण.
१६४७ ऑक्टोबर १९	पुरंधर किल्ला स्वाधीन.
१६४८ जुलै २५	शहाजीची पहिली कैद.
१६५५ डिसेंबर ७	शहाजीचा पुण्याकडील शेवटचा उपलब्ध हुकूम.
१६५६-१६५९	कर्नाटकावर शिवाजीराजांच्या लागोपाठ स्वाऱ्या.
१६५६ जानेवारी १५	जावळी स्वाधीन.
१६५६ एप्रिल-मे	रायगड ताब्यांत.
१६५९ मार्च ५	सावंताशीं तह.
१६५९ जून ५	औरंगजेबाचें सिंहासनारोहण. महाराजांना पोशाख.
१६५९ नोव्हेंबर १०	प्रतापगडावर अफजलखानाशीं भेट. खानाचा मृत्यु.
१६५९ नोव्हेंबर २८	पन्हाळगड काबीज.
१६६० मार्च २	सिद्दी जौहरचा पन्हाळयाला वेढा.
१६६० जुलै १२	राजांचें पन्हाळयाहून प्रयाण.
१६६१ फेब्रुवारी २	उंबरखंडांत कहारतलबखानाची शरणागति.
१६६१ मार्च	राजापूरच्या इंग्रज वखारीची लूट.
१६६१ एप्रिल २९	शृंगारपूरचें राज्य काबीज.

१६६३ एप्रिल ५	शायिस्तेखानावर लालमहालांत छापा.
१६६४ जाने. ६-१०	सुरतेची पहिली लूट.
१६६४ ऑक्टो.-नोव्हें.	बाजी घोरपडे मृत्यु.
१६६४ नोव्हेंबर २५	सिंधुदुर्गाची पायाभरणी.
१६६५ फेब्रुवारी ८	मालवणहून बसनूरकडे आरमारी स्वारी.
१६६५ मार्च ३	जयसिंगाचें पुण्यास आगमन.
१६६५ जून १३	पुरंधरचा तह.
१६६६ मार्च ५	राजांचें आग्र्याकडे प्रस्थान.
१६६६ मे १३	औरंगजेबाशीं मुलाखत (आग्रा).
१६६६ ऑगस्ट १७	आग्र्याहून पेटाऱ्यांतून प्रयाण.
१६६६ नोव्हेंबर २०	‘ शिवाजीराजे राजगडास परत ’.
१६६७ नोव्हेंबर ९	बारदेशांत स्वारी.
१६६७–६८	स्वराज्यांत धाराबंदी.
१६६९ ऑगस्ट-सप्टें.	औरंगजेब काशीचें देऊळ पाडून मशिद करतो.
१६७० फेब्रुवारी ४	सिंहगड काबीज, तानाजी पडतो.
१६७० ऑक्टो. ३-४	सुरतेची दुसरी लूट.
१६७२ जून	जव्हार व रामनगर काबीज.
१६७३ मार्च ६	पन्हाळगड दुसऱ्याने काबीज.
१६७३ एप्रिल	उंब्राणीची लढाई.
१६७४ फेब्रुवारी २४	नेसरीचें युद्ध, प्रतापराव पडतो.
१६७४ जून ६	राज्याभिषेक.
१६७४ जून १७	जिजाबाईचा मृत्यु.
१६७५ एप्रिल १७	फोंडा किल्ला सुरुंग लावून घेतला.
१६७६ ऑक्टोबर ६	दक्षिणेकडील स्वारीवर प्रस्थान.
१६७७ मार्च	कुतुबशाहाशीं बरोबरीने भेट.
१६७७ मे १३	जिंजीचा किल्ला काबीज.

१६७७ जुलै २३-२४	व्यंकोजीशीं भेट.
१६७८ मे-जून	रायगडास महाराज परत.
१६७८ जुलै २२	वेलोरचा किल्ला काबीज.
१६७८ डिसेंबर १३	संभाजी मोगलांकडे जातो.
१६७९ एप्रिल १७	दिलेरखान भूपाळगड घेतो.
१६७९ ऑगस्ट	दिलेरखानाची विजापुरावर चाल, वेढा.
१६७९ ऑगस्ट	खांदेरीची तटबंदी सुरू.
१६७९ ऑक्टो.-नोव्हें.	विजापूरकरांना मोगलांविरुद्ध मदत.
१६७९ डिसें.-जाने.	दिलेरखान विजापूरचा वेढा उठवून जातो.
१६८० जानेवारी १३	महाराजांपाशीं संभाजी परत, पन्हाळ्यावर भेट.
१६८० मार्च १५	राजारामाचें लग्न.
१६८० एप्रिल ३	महाराजांचा मृत्यु.
१६८० जुलै २०	संभाजीचें सिंहासनारोहण.

* * *

महत्त्वाची सुधारणा

पृ. २३९ वर सहाव्या ओळींत 'कोल्हापूर' पडलें आहे. तेथे 'कोल्हार' वाचावे.

छत्रपति शिवाजी महाराज

भूमि आणि भूमिका

इतिहास आणि भूगोल

इतिहास मनुष्याच्या कर्तृत्वाने घडतो. पण मनुष्याचे शरीर, बुद्धि आणि मन यांना वळण लागतें तें भूगोलाने. भूमीच्या, वसतिस्थानाच्या रचनेने; हवामानामुळे. इतिहास आणि भूगोल यांचा असा जिव्हाळ्याचा संबंध असल्यामुळे ज्या भू-प्रदेशावर शिवछत्रपतींनी स्वराज्य स्थापन केलें त्याबद्दल कल्पना आणून दिली पाहिजे. शिवाय आज जें घडतें त्याचे धागेदोरे गतकालांत गुंतलेले असतात. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या पूर्वीचा इतिहासहि स्थूल मानाने नजरेसमोर आणावयास हवा. आणखी असें की, महाराजांच्या महाराष्ट्र-राज्याबद्दल विचार करतांना आजच्या साऱ्या 'महाराष्ट्रा' बद्दल बोलणें बरोबर नाही. कारण त्यांचें राज्य ढोबळ मानाने आजच्या महाराष्ट्राच्या सुमारें पंचमांश भागावरच फक्त चाललें होतें.

राज्याचा विस्तार

व्यवस्थेसाठी शिवाजी महाराजांनी आपल्या महाराष्ट्रांतील राज्याचे तीन जिल्हे किंवा भाग केले होते. (१) पेशव्यांकडे 'कल्याण-भिवंडी-पासून वरचें कोळवण (= जव्हार, रामनगर) धरून कोकण व सालेरीपर्यंत वरघाट (= घाटावरील प्रदेश) आणि लोहगड व जुन्नर देखील बारामावळें, असा कावळ्याच्या घाटापासून वरचा' मुलूख होता. (२) सुरनीस म्हणजे सचिव यांकडे चौलपासून दक्षिणेस दाभोळ, राजापूर, कुडाळ, बांदें, फोंडा, कारवार, अंकोला असा थेट गंगावली नदीपर्यंतचा पश्चिम पट्टीचा भाग होता. आणि (३) वाकनीस म्हणजे मंत्री यांच्याकडे राहिलेला

वरघाट किंवा वाईपासून कोपल-तुंगभद्रापावेतों देश होता. नकाशांत पाहिलें तर हें राज्य सह्याद्रीच्या डाव्या-उजव्या कुशीला पसरलेलें दिसतें. शहाजीची शिरें, बंगरूळ, बाळापूर अशी दक्षिणेंतील जहागीर म्हैसूर-कर्नाटकांत होती. कोपळ-बल्लारी, वेलूर, अरणी, जिंजी हें दक्षिणदिग्विजयानंतर प्राप्त झालेलें राज्य आणखी पलीकडे राहतें.

मूळच्या जहागिरींत थोडी थोडी भर घालीत वाढविलेल्या या चिमुकल्या राज्याला संरक्षणोपयोगी अशी नैसर्गिक सरहद्द नाही. त्या काळच्या जमिनीवरच्या आणि सागरावरच्या बलिष्ठ सत्तांनी वेढलेला हा प्रदेश सर्वच बाजूंनी शत्रूच्या स्वाऱ्यांना मोकळा सापडतो. ह्या प्रदेशाचा डोंगराळपणा आणि त्यांतील जनतेची निधडी छाती आणि कणखर मनगट हेंच त्याच्या संरक्षणाचें साधन. यामुळे सह्याद्रींतील किल्ले आणि त्यांचा सर्वोत्कृष्ट बंदोबस्त या गोष्टींना महाराजांच्या कारभारांत आरंभापासून महत्त्व आलें आणि तें पुढेहि कायम राहिलें.

महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगण

शिवाजी महाराजांच्या राज्याचा विस्तार आणि विभागणी पाहून प्रथम एक गोष्ट लक्षांत येते ती ही की, महाराजांच्या काळांत महाराष्ट्र व कर्नाटक यांमध्ये एकाच राजाचें राज्य नांदलें; त्यांचें आपसांत पुष्कळ दळणवळण होतें. महाराजांच्या आधीचें आदिलशाही राज्यहि असेंच दोहोंकडे होतें; आणि त्याच्याहि पूर्वी विजापूरसारखीं पांच राज्यें ज्या राज्यांतून फुटून निघालीं, तें बहामनी राज्य (१३४७–१५२६ इ.) देखील असेंच महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगण* यांवर एका वेळीं चालत होतें. आजचे भेद त्या वेळीं नव्हते.

हिंदु परंपरेचा धागा

या बहामनी राज्याच्या आधी तुंगभद्रेपलीकडे थेट कन्याकुमारीपर्यंत विजयनगरचें फार मोठें हिंदु साम्राज्य (१३३६–१५६५ इ.) होतें.

---

*ढोबळ मानाने कर्नाटक = आजचें म्हैसूर राज्य; व तेलंगण = आजच्या आंध्र राज्याचा उत्तर भाग. पण प्राचीन भारतांत कर्नाटक आजच्या मद्रास राज्याचा कांही भाग व्यापून असे.

त्याच्याहि पूर्वीं नर्मदा-तापी नद्यांच्या दक्षिणेकडील प्रदेश दिल्लीच्या खिलजी अमलाखालीं गेला होता. पण त्या वेळीं देखील येथे सर्वत्र देशी हिंदु राजे अस्तित्वांत होते; आणि त्याच्याहि पूर्वीं जेव्हा मुसलमानांचा हिंदुस्थानांत प्रवेश झाला नव्हता, अशा प्राचीन व पुढील इतिहासकाळीं या सर्व भागांत आंध्रभृत्य, चालुक्य, राष्ट्रकूट, कल्याणी चालुक्य, यादव अशीं हिंदु साम्राज्यें व कदंब, शिलाहार, अशांसारखीं त्यांचींच हिंदु मांडलिक राज्यें नांदत होतीं.

महाराजांनी आपलें राज्य ज्या मुसलमानी सत्तेकडून हिसकून घेतलें, ती सत्ता उत्पन्न होण्यापूर्वी महाराष्ट्रांत यादवांचें (११८७–१३१८ इ.) आणि कर्नाटकांत नंतर विजयनगरचें (१३३६–१५६५ इ.) साम्राज्य होतें. मुसलमानी राज्यांत हिंदु प्रजेचा सर्वांगीण विकास होत नाही म्हणून हिंदूंचें स्वतंत्र राज्य स्थापन करतांना, या दोन राज्यांचें महाराजांना स्मरण होणें अगदी साहजिक होतें. पैकी यादवांचें राज्य नष्ट होऊन तीनशेच्या वर वर्षें होऊन गेलीं होतीं. पण विजयनगरचें राज्य मोडून शंभराहून कमी वर्षें झालीं होतीं. त्या साम्राज्याचे अवशेष राहिले होते आणि आठवणहि शिल्लक होती. आदिलशाहीचा सेनापति म्हणून शहाजी कर्नाटकांत स्वाऱ्या करीत असतांना, त्याला या अवशेषांशींच मुकाबला करावा लागला होता आणि तो त्यांच्याशीं सहानुभूतीने वागून आपल्या वरिष्ठांचा राग आपल्यावर ओढून घेत होता. आणि जेव्हा प्रथम शिवाजी-राजे बंगरुळाहून पुण्याच्या जहागिरीकडे आले, तेव्हा आपल्या तालमींत कर्नाटकांत तयार झालेले लोकच शहाजीने त्यांच्याबरोबर दिले (इ. १६४२). सर्व दक्षिणेची एकरूपता त्या वेळच्या वातावरणांत सहज होती; आणि हिंदु साम्राज्याच्या परंपरेचा धागा असा अखंडपणें शिवछत्रपतींपर्यंत येऊन पोचलेला होता.

स्वतंत्रवृत्तीची जोपासना

त्या काळांत ग्रामसंस्था व वतनदार देशमुख-देशपांडे वगैरे प्रबळ असल्यामुळे, राजसत्तेचें प्रत्यक्ष नियंत्रण सगळ्या मुलखांत फार बेताचें असे. सह्याद्रीलगतच्या या डोंगराळ मुलखांत तर, लांबच्या कोणा राजसत्तेने अधिकारी किंवा सैन्य पाठविल्यास त्यांची डाळ फारशी शिजत नव्हती.

जागजागीं बलाढ्य झालेले वतनदार आणि सरदार अनियंत्रितपणें मुलूख खाऊन प्रतिराजे होऊन बसले होते. याचें एक गमक असें, की जरी शिवाजीराजांनी जिंकलेला मुलूख नांवापुरता आदिलशाहीचा होता, तरी तो जिंकतांना महाराजांना नेहमी जो निर्वाणीचा लढा द्यावा लागला तो त्या त्या ठिकाणच्या वतनदार-जहागीरदार लोकांशींच. खुद्द पुणें जहागिरीलगतच्या बारामावळांसाठी दादाजी कोंडदेवाला कृष्णाजी बांदलाचें पारिपत्य करावें लागलें. जावळीसाठी चंद्रराव मोरे जिवावर उदार होऊन लढला, तो कांही आदिलशाहीचा हस्तक म्हणून नव्हे. निजामशाही कोकणांत सिद्दी व कोळवणांत जव्हार-रामनगरचे राजे, आपण स्वतंत्र म्हणून वेगळे वेगळे झगडले. विजापुरी तळकोकणांत पालवणचा दळवी, शृंगारपूरचा सुर्वे आणि कुडाळकर सावंत हे आदिलशाहीकरिता नव्हे, तर स्वत:साठी म्हणून इतके पुन:पुन्हा आणि अगदी हिरिरीने लढले. जुन्या हिंदु राज्याची आठवण उराशीं बाळगून सतत झगडणाऱ्या पाळेगारांच्या हातूनच कर्नाटकांतील विजयनगरच्या साम्राज्याचा प्रदेश जिंकून घ्यावा लागला. मुसलमानी सत्तेचा वरवंटा पक्का न फिरलेला असा हा मुलूख होता; आणि त्यांतले लोक जिवंत वृत्तीचे, स्वातंत्र्याचे चहाते आणि त्यासाठी झगडा करायला सरावलेले होते. छत्रपतींच्या उद्योगाला ह्या जिवंत लोकांची साथ मिळाली आणि ती उपकारक ठरली.

नैसर्गिक रचनेचीं वैशिष्ट्यें

शिवाजीराजांनी स्वराज्यासाठी निवडलेल्या या जमिनीच्या पट्टीचीं, इतिहासाला वळण लावण्याच्या दृष्टीने महत्त्वाचीं ठरलेलीं, आणि न विसरण्यासारखीं अशीं आणखीहि वैशिष्ट्यें आहेत. एक, बेतापुरती पैदास किंवा दुष्काळापासून मोकळीक आणि दुसरें, तींतील लोकांचा जगाशीं व सभोवतालच्या प्रदेशांशीं आलेला संबंध. तिला पहिल्याचा लाभ भरपूर पावसामुळे झाला व दुसऱ्याचा लाभ ती पश्चिम किनाऱ्याला लागून आहे म्हणून झाला. डोंगराळ मुलखांत टेकड्यांच्या रांगांमुळे खोऱ्याखोऱ्यांचे विभाग पडून सवतेपणा बोकाळतो आणि एकजूट दुर्मिळ होते; पण शत्रूपासून नैसर्गिक संरक्षणामुळे निर्भयता येते. शिवाय आळस न वाढतां मुलखाच्या रचनेमुळे व हवामानामुळे कांटकपणा येतो आणि जमीन फार

विपुल पिकाची नसल्यामुळे कष्टांची सवय होते. हा मुलूख भरपूर पावसाचा असल्यामुळे त्याला दुष्काळाचें भय वाटत नाही. अनिश्चितता भेडसावीत नाही. हुरूपहि कायम राहतो. अशा या स्वातंत्र्यप्रिय, निर्भय, कांटक, कष्टाळू लोकांचा हा सुपीक प्रदेश जिंकणें दुरापास्त होतें. पण त्याबरोबरच पश्चिमेकडून अरबी व युरोपीय व्यापारी आणि इतर बाजूंनी मुसलमानी राजसत्ता, यांच्या परिचयामुळे या प्रदेशांतील लोकांना जगाची ओळख चांगली झाली. कित्येक शतकें या उपरी सत्तांचीं भांडणें भांडण्यासाठी लागणारे सैनिक आणि शहाजीसारखे सेनापतीहि या डोंगराळ प्रदेशाने पुरविले होते. विशेष सधन नसलेल्या या लोकांत मुलूखगिरी हा बेकारीवरचा नित्याचा तोडगा होता. इतरांच्या लढाया ते लोक लढत होतेच. स्वतःची लढाई मारण्यासाठी त्यांना फक्त शिवाजी महाराजांसारखा नेता हवा होता.

हिंदु राज्याबद्दल आकांक्षा

स्वतंत्र मुलखांत नांदणाऱ्या आणि स्वतंत्रतेच्या आचार-विचारांनी रसरसलेल्या या लोकांच्या पुढाऱ्यांना आपला धर्म संकटांत आहे असें हळूहळू दिसूं लागलें. त्याच्यासाठी झगडा करण्याची इच्छाहि त्यांना एकदोन शतकांच्या धार्मिक जुलमामुळे उत्पन्न झाली. ज्ञानेश्वरांपासून रामदासांपर्यंत संतमंडळीने मातृभाषा मराठींतून बहुजन समाजाला धर्माची शिकवण दिल्यामुळे, ती त्यांच्या मनावर ठसली आणि ते स्वधर्माच्या रक्षणासाठी राज्य स्थापन करण्याला उत्सुक झाले. शुद्ध सात्त्विक तत्त्वज्ञानावर आधारलेला मुसलमानांचा सूफी संप्रदायच घ्या. इसवीसनाच्या सोळाव्या आणि सतराव्या शतकांतील सूफी धर्मप्रसारकांनी देखील हिंदूंच्या धर्मस्थळांचा ताबा घेतल्याचीं उदाहरणें महाराष्ट्रांत नाशिकसारख्या ठिकाणीं डोळयांसमोर घडलीं. मग शस्त्राच्या बळाने धर्मप्रसार करणाऱ्या इतर मुसलमान व ख्रिस्ती पंथांनी काय केलें असेल हें सांगावयास नको. उत्तरेकडे स्थापन झालेल्या मुसलमानी सत्तांनी घातलेला पाशवी धिंगाणा, खुद्द महाराष्ट्रांत स्थिर होऊन बसलेल्या सुलतानशाह्यांच्या अमलांत धर्मस्वातंत्र्यावर आलेला घाला, आणि दक्षिणेलगत गोव्याच्या मुलखांत पोर्तुगीज धर्मवेड्यांनी चालविलेला धर्मच्छल, यांचे चटके जनतेला तीव्रतेने जाणवूं लागले. सार्वजनिक मंदिरांतील उत्सव-समारंभांना व्यत्यय, स्त्रियांची विटंबना,

देवालयांचा विध्वंस आणि भ्रष्टाकार, मूर्तींचा भंग, लूट, जाळपोळ, कत्तल, जबरीचीं धर्मांतरें अशीं उदाहरणें घडूं लागलीं. पुणें जिल्ह्यांतील घोडें येथील इ. १५८६ च्या शिलालेखांत " मीर मुहम्मद झमान याने ' तीस व तीन ' देवळें मोडून मशिदीचा पाया घातला, ' असें बढाईचें वाक्य कोरून ठेवलेलें आहे. वाईचा सुभेदार अफजलखान याने शहराच्या कोटाजवळील धर्माधिकाऱ्यांचीं घरें उठवून तेथे मशीद बांधण्याची तयारी आपल्या मरणापूर्वी करून ठेविली होती, असें एका फर्मानांत प्रौढीने लिहिलेलें आहे. अशा गोष्टींचा प्रतिकार करील असें स्वतःचें एखादें हिंदु राज्य व्हावें असें त्या वेळच्या विचारवंतांना खास वाटत असलें पाहिजे. अशा वेळीं त्यांना रघुकुलांतील रामचंद्राची किंवा विजयनगरच्या रामराजाची आठवण झाली असल्यास नवल नाही.

व्यवहारी तारतम्य

पुष्कळ पिढ्यांचें परसत्तेचें वर्चस्व अनेक कारणांनी असह्य झाल्यामुळे, स्वत्व आणि स्वाभिमान यांचा लाभ व्हावा म्हणून, हिंदु धर्म आणि स्वराज्य यांकडे हा समाज मनाने वळला खरा; पण तो उत्तर दिशेच्या वाराणशीकडील किंवा दक्षिणेंतील प्रचंड देवस्थानांच्या पवित्र क्षेत्रांतील हिंदूंप्रमाणे कर्मठ राहिलेला नव्हता. कारण त्याचा व्यापाराच्या निमित्ताने येणाऱ्या पुष्कळ परधर्मियांशीं व परदेशस्थांशीं अनेक प्रकारांनी संबंध आलेला होता. उत्तरेकडील अत्यंत शूर राजपूत मुसलमानी वाफेच्या रुळाखाली पार चिरडून निःसत्त्व झाले होते. तसे दक्षिणेंतील मुसलमानी शाह्यांना बरोबरीच्या नात्याने मदत करून राजकारण खेळणारे मराठे सैनिक नामोहरम झालेले नव्हते. यामुळे राजपुतांच्याप्रमाणे स्वतःचें बलिदान करण्याऐवजी तारतम्याने शक्य त्या प्रकारें शत्रूवर मात करण्याकडे त्यांचा अधिक कल होता. एकंदरींत व्यवहारी पण समतोल स्वाभिमानाचें बाळकडू त्यांना मिळालें असल्यामुळे शत्रूशीं ते जशास तसें वागत. खुद्द शिवाजी महाराज देखील आपले मुसलमानी शत्रु आणि पोर्तुगीजादि परकी सत्ता यांच्या विरुद्ध प्रसंगीं लूटमार, जाळपोळ, कपटप्रयोग अशा प्रकारच्या, त्या वेळीं रूढ असलेल्या मार्गांचा अवलंब करीत. आणि आपलें अल्पसें लष्करी सामर्थ्य कमी पडूं नये म्हणून व बहुतेक वेळीं जबरदस्त शत्रूशीं प्रसंग

पडल्यामुळे, युद्धाची हुलकावणी देण्याची अस्सल मराठमोळा गनिमी पद्धति मोठ्या चतुराईने वापरीत. या कामीं भीमेच्या कांठीं सर्वत्र आढळणारीं भीमथडी तट्टें त्यांच्या घोडदळांत चांगलींच उपयोगी पडलीं.

असो; ऐतिहासिक व्यक्तींबद्दल कांही मत देणें किंवा अभ्यास करणें असेल तेव्हा निर्भेळ ऐतिहासिक दृष्टि वापरली पाहिजे. शिवाजी महाराजांबद्दल विचार करतांना त्यांच्या वेळची सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकीय परिस्थिति बरोबर ध्यानांत घेतली, म्हणजे नेमकें कोणतें उद्दिष्ट शिवछत्रपतींनी आपल्यासमोर ठेवलें आणि तें कोणत्या मार्गांनी आणि कसें साध्य केलें, हें स्पष्ट कळतें. महाराजांचें चरित्र समजण्यास या थोडक्यांत केलेल्या स्वराज्य-भूमीच्या वर्णनाचें, आणि त्यांच्या भूमिकेचें, एवढें अवधान वाचकांनी अवश्य ठेवावें.

* * *

घोडें येथील जुम्मा मशिदींतील

इ. १५८६ चा शिलालेख (फारसी)


......हे परमेश्वरा, हे मुहम्मदा, हे अली. जनाब मीर मुहम्मद झमान याने जेव्हा ऐश्वर्याचें दार आपल्या हाताने आपल्या बाजूस उघडावें अशी हिम्मत धरली तेव्हा परमेश्वराच्या कृपेसाठी तीस व तीन देवळें मोडलीं व या खराबाबादेंत (घोडें) इमारतीचा पाया घातला.

—ऐतिहासिक फारसी साहित्य, खंड १, लेखांक ८१

१ दोन पिढ्या

भोसल्यांचा वंशवेल

शिवाजी महाराजांचें आडनांव भोसले. दौलताबाद-वेरूळ या बाजूला यांच्या पूर्वजांची वसति होती. त्या प्रदेशांत भोसली या नांवाचें एक गाव आहे. त्यावरून भोसले हें नांव पडलें असण्याचा संभव आहे. त्या काळांत शेती हा मुख्य व्यवसाय होता. पण धामधुमीच्या प्रसंगीं दसऱ्यानंतरच्या मोहिमांतून घोडे व हत्यारें वापरणारे व तशा तऱ्हेने आपलें नशीब काढणारे शूर पुरुष गावोगावीं आढळत. कित्येक वेळां घराणेंच्या घराणें स्वारी-शिलेदारी कायमची पत्करी आणि आपला उदय करून घेई. पराक्रमी पुरुष सरदारी सहज मिळवीत; आणि असामान्य कर्तृत्वाचे वीर पुरुष क्वचित् सिंहासन प्राप्त करून घेत. भोसले कुळाने हा राजसिंहासनाचा मान मिळविला. महाराष्ट्रांत स्वतंत्र राज्य उभें करण्याची किमया करणारे हे लोकोत्तर भोसले म्हणजे आपले चरित्रनायक छत्रपति शिवाजी महाराज आणि त्यांचे वडील शहाजीराजे हे होत. आपल्या घराण्यांतील परंपरेचा उगम आपले आजोबा मालोजी यांच्यापासून आहे याची जाणीव अर्थात् शिवाजी महाराजांना होती.



बाबाजीचा वंशविस्तार (कामापुरता)

भोसल्यांचा मूळ पुरुष बाबाजी हा शिवाजीचा पणजा. त्याला

मुलगे दोन. एक मालोजी, दुसरा विठोजी. त्यांच्यापैकी मालोजीला फलटणकर निंबाळकरांची उमा दिली होती. त्याला शहाजी व शरीफजी असे दोघे मुलगे झाले. शहाजीचीं लग्नें दोन झालीं. लखूजी जाधवरावांची मुलगी जिजाऊ हिच्या पोटीं त्याला सहा पुत्र झाले. त्यांच्यापैकी चरित्र-नायक शिवाजी आणि एक वडील भाऊ संभाजी एवढे वांचले. दुसरी बायको मोहित्यांची मुलगी तुकाई. हिच्या पोटीं एकोजी किंवा व्यंकोजी झाला. मिळून तिघे मुलगे शहाजीचे. यांतला संभाजी कर्नाटकांत कनकगिरीच्या युद्धांत इ. १६५७ पूर्वी तरुणपणीं मारला गेला; आणि एकोजी जनरहाटीचें अनुकरण करून आदिलशाहीच्या ताबेदारींत राहिला. शिवाजीचें मात्र चरित्र निराळें झालें.

बाबाजीची मान्यता

शिवाजीच्या पराक्रमाला जी अनुकूल परिस्थिति मिळाली तिची सुरुवात त्याचा आजा मालोजी याच्याच कर्तबगारीने झाली. पणजा बाबाजी याची देखील इतिहासांत प्रथम ओळख होते ती मालोजीबरोबरच त्याच्या घृष्णेश्वराच्या दोन ओळींच्या शिलालेखाने. हें घराणें दौलताबाद-वेरूळच्या बाजूने नशीब काढण्यासाठी अहमदनगर राजधानीच्या बाजूला दक्षिणेकडे आलें. पांडे-पेडगाव दौंडजवळ म्हणजे साधारणपणें आदिलशाही व निजामशाही यांच्या सरहद्दीवर आहे. तेथील जहागिरी संभाळण्याचें काम थोडें जोखमीचें. तें पेलण्याइतपत मालोजी लढाऊ समजला जात असला पाहिजे. स्वतःचा मुलगा मालोजी याला फलटणच्या निंबाळकरासारख्या वजनदार घराण्यांतून मुलगी आली, यावरून बाबाजीची मान्यता दिसून येते. अर्थात् त्याचा मुलगा मालोजी हा स्वतःचें घोडें देखील नसलेला, आपले भावी व्याही लखूजी जाधवराव यांच्या पदरचा दरिद्री बारगीर होता, हें बखरकारांचें म्हणणें मुळांतच लटकें पडतें.

उत्कर्षाचा पाया

उलट, भोसले घराण्याच्या उत्कर्षाचा पाया मालोजीने घातला असें शिवाजी महाराजांचें मत दिसतें. आणि तें प्रत्यंतर पुराव्याने सिद्ध होतें.

वेरूळच्या घृष्णेश्वराच्या देवळाचा जीर्णोद्धार करून, त्या मंदिराच्या तटामध्ये 'दास माळोजि बाबाजी व विठोजि बाबाजि भोसले' असा आपल्या व आपल्या भावाच्या नांवाचा त्याने बसविलेला शिलालेख पाहावयास मिळतो. घृष्णेश्वरावर अभिषेक करण्यासाठी त्याची बायको उमाबाई हिने नेमणूक करून दिली. सातारा जिल्ह्यांतील श्रीशंभुमहादेवाच्या म्हणजे श्रीशिखरशिंगाणापुराच्या डोंगराच्या पायथ्याशीं भिंत बांधून त्याने तलाव तयार केला व महाराष्ट्रभर कीर्ति आणि यात्रेकरूंचा दुवा मिळविला. निजामशाही औरंगाबादेंत तर 'मालपुरा', 'विठपुरा' असे भोसले घराण्यांतील पुरुषांच्या नांवांचे खास पुरे म्हणजे पेठा वसविलेल्या होत्या. अशीं देवधर्मनिष्ठेचीं, लोकांच्या उपयोगाचीं आणि घराण्याच्या नांवलौकिकाचीं कामें त्याने पार पाडलीं. यासाठी लागलेला पैसा वडिलार्जित होता, की त्याला पुरलेला द्रव्याचा साठा सापडला, हें कळत नाही. तें कांही का असेना, आपल्याजवळच्या धनाचा, त्या वेळच्या कल्पनांप्रमाणे, मालोजीने फार चांगला उपयोग करून नांव मिळविलें. मालोजीचा उल्लेख कांही कागदांत 'श्रीमंत महाराज' मालोजी 'राजे' भोसले असा आढळतो. जयराम पिंड्येकृत 'राधामाधवविलासचंपू'त आणि इतरत्रहि 'मकरंद' असें श्रेष्ठत्वदर्शक उपपद त्याच्या नांवाला जोडलेलें आहे.

मालोजीची राजमान्यता

मालोजीला लोकमान्यतेप्रमाणे राजमान्यताहि मिळाली. पुढे वेरूळच्या भोसल्यांचा संचार वाढून शिखर-शिंगणापूर या अनेक मराठ्यांच्या दैवताबद्दल मालोजीला आपलेपणा वाटला आणि त्याने तेथे तलाव बांधून दिला. जवळच मालोजीची सासुरवाडी फलटण आहे. हीं दोन्हीं ठिकाणें आदिलशाही राज्यांत मोडत. यामुळे तिकडे मालोजीचें नांव माहित झालें. तरी मालोजीचें नेहमीचें वास्तव्य आणि पराक्रम निजामशाहींत घडले. त्याला भीमेच्या कांठीं दौंडजवळ पांडे-पेडगांव व त्याच्या आसपास चांभारगोंदे (हल्लीचें श्रीगोंदें), वैजापूर वगैरे ठिकाणीं वतनवाडी होती. शिवाय सरगुऱ्हो म्हणजे आपलें सैन्य बाळगून सरकारची कामगिरी बजावणारा फौजबंद सेवक म्हणून त्याला फौजखर्चासाठी ठिकठिकाणीं मुकासे किंवा जहागीर निजामशाहाकडून मिळाली होती. तीमध्ये दौलता-

बादेकडील वेरूळ, देन्हाडी व कनरड हे तीन परगणे व जातेगांव, लासूर, आधारसूल, पोरले पिंपळवाडी, गोडगांव अशीं गावें होतीं. कनरड परगण्यांतील किल्ला देखील मालोजीच्या दिमतीस दिलेला होता. ही मालोजीची स्वपराक्रमाची कमाई होय. त्याशिवाय भोसल्यांकडे दौंडनजीक हिंगणी, बेरडी, देऊळगांव, खानवट व जिंती, इंदापूर तालुक्यांत कळस, सिन्नर तालुक्यांत वावी, नगर जिल्ह्यात मुंगी-पैठण व नांदणज आणि वेरूळच्या उत्तरेस बनसेंद्र या गावांच्या पाटिलक्या होत्या असेंहि सांगण्यांत येतें. अस्सल कागदांत दौंड ते पंढरपूरपर्यंतच्या भीमथडींतील तसे कांही उल्लेख आढळतात. यांपैकी कोणत्या पाटिलक्या मालोजीने मिळविल्या, कोणत्या त्याच्या पूर्वजांनी मिळविल्या आणि कोणत्या मागूनच्या वंशजांनी मिळविल्या हें समजत नाही; परंतु कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत या गावांशीं भोसल्यांचा संबंध आला असला पाहिजे. मालोजीच्या मृत्यूनंतर इ. १६११ मध्ये शिखर-शिंगणापूरची पाटिलकी विठोजीकडे आल्याचें आढळतें.

अभ्युदयाला अनुकूल काल

मालोजीच्या कामगिरीचा काल म्हणजे सुमारें इ. १५७७ ते १६०६ पर्यंतचा, तीस वर्षांचा, पिढी-दीडपिढीचा काल होय. या वेळीं देवगिरीच्या यादवांचें राज्य मोडून दोन-अडीचशें वर्षें झालीं होतीं. आणि त्या मुलखावर स्थापन झालेलें बहामनी राज्य विभागून त्याच्या ज्या पांच शाह्या झाल्या होत्या, त्यांपैकी अहमदनगरची निजामशाही (१४९०-१६३६ इ.) आणि विजापूरची आदिलशाही (१४८९-१६८६ इ.) या दोन शाह्या महाराष्ट्रांत अंमल करीत. ह्या दोन शाह्यांमधील सरहद्द साधारणपणें पुणें जिल्ह्याच्या दक्षिणेस नीरा व भीमा या नद्यांच्या प्रवाहाला धरून होती. त्यांच्यामध्ये लहानसान कटकटी नेहमी चालत. या शाह्यांचे सुलतान आणि त्यांचे प्रमुख सल्लागार आणि अधिकारी मुसलमान असत; तथापि त्यांना नेहमी हिंदु देशमुख वगैरे पुरातन वतनदारांची आणि तोलदार फौजबंदांची मदत घ्यावी लागे. अशा रीतीने दक्षिणेकडील शाह्यांचीं आपसांतील भांडणें भांडतां भांडतां आलेल्या अनुभवांचें भांडवल आता मालोजीने व पुढे शहाजीने वापरलें. त्याचा वारसा आणि फायदा शेवटीं शिवाजीराजांना मिळाला. इ. १५६५ त दक्षिणेंतील विजयनगर सम्राटाचा पराजय झाल्यापासून

सिंहासनाधीश हिंदु राजांची परंपरा तुटली. शतकाच्या खंडानंतर इ. १६७४ त आपल्याला राज्याभिषेक करून घेऊन छत्रपति शिवाजी महाराजांनी ती पुन्हा सुरू केली.

मालोजीचा पराक्रम

दक्षिणेंत निर्माण झालेल्या निजामशाही व आदिलशाही ह्या दोन शाह्यांच्या भांडणांत पुढे आणखी भर पडली. इ. १५९६ त उत्तरेकडील मोगल बादशाहा अकबर (१५५६–१६०५ इ.) याने अहमदनगरच्या निजामशाही राज्यावर स्वारी केली. तेव्हापासून दख्खनच्या रणक्षेत्रांत तिरंगी सामना सुरू झाला. महत्त्वाकांक्षी क्षत्रिय वृत्तीच्या पुरुषांना पराक्रम दाखविण्याला आणखी एक नवी संधि प्राप्त झाली. नेमक्या अशा धामधुमीच्या काळांत मालोजीने निजामशाहाच्या नोकरींत प्रवेश करून घेतला आणि चालू झगड्यांत अंगचें पाणी दाखवून मनसब मिळविली.

निजामशाहीचीं इ. १५७७ पासूनचीं पहिलीं सुमारें पांचसहा वर्षे साधारणपणें शांततेंत गेलीं. पण पुढे कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत राहिला नाही. वैयक्तिक कारस्थानांना ऊत आला आणि ज्याचा हात चालेल त्याने राजघराण्यांतील कोणालाहि हाताशीं धरावें, जरूर तेव्हा शेजारच्या आदिलशाही शत्रूशीं संगनमत करावें, पहिल्या सुलतानाचा घातपात करावा आणि आपल्या आवडीच्या बाहुल्याला सुलतान करून सत्ता भोगावी, असें झालें. मोगलांची स्वारी येईपर्यंतच्या पुढच्या बारा-तेरा वर्षांत निजामशाहींत एकूण पांच सुलतान आणि त्याच्या पुढच्या बारा वर्षांत आणखी तीन सुलतान झाले. अशी बजबजपुरी माजली आणि साहजिकच निजामशाही व आदिलशाही यांच्यामधील तंट्यांना ऊत आला. अशा संधिकालांत मालोजीला महत्त्व प्राप्त झालें. त्याने आपला भाऊ विठोजी यालाहि आपल्याबरोबर आणून नोकरी मिळवून दिली आणि परंपरागत वतनवाडीची व्यवस्था दुसऱ्याकडे सोपवून, ते दोघे आपली नोकरी व नव्या जहागिरीची व्यवस्था यांकडे अधिक लक्ष पुरवूं लागले.

आपल्या उपयुक्त कामगिरीने मालोजीने बुऱ्हाण निजामशाहाचा विश्वास संपादन केला. त्यामुळे सरहद्दीवरील इंदापूरच्या बाजूच्या बंदोबस्ताचें काम शाहाने त्याच्यावर सोपविलें. या कामांत उत्पन्न झालेल्या एका लढाईत शत्रू-

विरुद्ध मोठा पराक्रम गाजवून मालोजी रणक्षेत्रावर पडला. स्वराज्यसंपादक भोसल्यांच्या घराण्यांतील वीरवृत्तीचें पहिलें स्मारक मालोजीच्या छत्रीच्या रूपाने महाराष्ट्राच्या भूमीवर प्रथम इंदापूर येथे स्थापन झालें.

* * *

मालोजीने तळें बांधलें

"...राजियांचे आजे राजश्री मालजी राजे व विठोजी राजे भोंसले हे निजामशाही वजीर दौलता करून तोलदारीने होते. त्यांची निष्ठा श्री शंभुमहादेव यांचे भजनीं बहुत होती. त्यास शिखरीं यात्रा चैत्रमासीं भरते. पांचसात लक्ष माणसें मिळतात. पाणियाचें बहुत संकट. उदक नाही. तीन कोशांवरून उदक आणतात. लोक श्रमी बहुत होतात. म्हणून राजश्री मालोजी राजे यांनी तेथे जागा पाहून तळें एक थोर बांधिलें. सर्वत्र लोकांस उदक कार्यास येई असें केलें. अपरिमित द्रव्य खर्च केलें."

—शिवछत्रपतीचें चरित्र (सभासदी बखर)

२ सरदारी आणि वजिरी

पोरक्या शहाजीचें संगोपन

शहाजी अवघा सहासात वर्षांचा असतांना पोरका झाला. तेव्हा तो व धाकटा भाऊ शरीफजी यांना बोलावून घेऊन निजामशाहाने बापाची जहागीर त्यांच्याकडे चालू केली. मालोजीच्या पश्चात् त्याचें संगोपन मातुश्री उमाबाई आणि चुलता विठोजी यांनी आपल्या खानदानीस साजेसें केलें. निजामशाहींत तेव्हा लखूजी जाधवराव हा थोर प्रतिष्ठित सरदार होता. शहाजी थोडा मोठा झाल्यावर लखूजीने आपली सुलक्षणी मुलगी जिजाऊ योग्य हुंडा देऊन शहाजीला अर्पण केली. शहाजीचें दुसरेंहि एक लग्न झालें. कांही दिवसांनी विठोजी वारला. आणि आपल्या वडिलार्जित जहागिरीचा कारभार शहाजी मुखत्यारीने पाहूं लागला (सुमारें इ. १६२०) आणि त्याबरोबरच राज्यांतील स्वारीशिकारीचा भार चांगल्यापैकी संभाळून लौकरच प्रमुख मुत्सद्दी जो मलिकंबर त्याचा विश्वास त्याने संपादन केला.

अकल्पित वैमनस्य

भोसले आणि जाधव यांचा सोयरिकीचा जवळपणा जिजाबाईच्या लग्नानंतर दोनतीन वर्षांच्या आंतबाहेर एका अकल्पित प्रसंगाने थोडासा बिघडला. एकदा निजामशाहाचा दरबार भरला होता. तो संपून सरदार बाहेर पडले. तेव्हा खंडागळे यांच्या माजलेल्या हत्तीने गोंधळ केला. त्या हत्तीला आवरण्यासाठी लोक पुढे झाले. पण त्यांतून मग उगीचच्च माणसांची मारामारी निघाली. तींत विठोजीचा पुत्र संभाजी भोसले ह्याच्या हातून लखूजीचा पुत्र दत्ताजी जाधव दुर्दैवाने मारला गेला. त्यामुळे संतापून आलेला लखूजी जाधवराव व शहाजी भोसले, म्हणजे सासरा आणि जावई, यांचीच समोरासमोर गाठ पडली. पुत्राच्या मृत्यूमुळे बेभान होऊन जाधवरावाने शहाजीच्या दंडावर वार केला. त्यामुळे शहाजी बेशुद्ध पडला.

तरी संभाजी भोसल्याला गाठून त्याला ठार करीपर्यंत जाधवरावाचा राग शांत झाला नाही. अकल्पितपणें घडलेल्या दोन सोयरे घराण्यांतील या दोन अपघाती मृत्यूंमुळे दोहीकडील माणसें आपापल्या मनांत चूर झालीं. सासरे-जावयांमध्ये तात्पुरतें वितुष्ट आलें. दरबारांतील आधीच्या इतर भांडणांमुळे तें लगोलग मिटणें शक्य नव्हतें. या भांडणांत निजामशाहाने भोसल्यांची बाजू घेतल्याच्या संशयावरून जाधवराव तिरीमिरीने निजामशाहाची नोकरी सोडून मोगलांकडे गेला (१६२२–२३ इ.) आणि मग शहाजीचें महत्त्व निजामशाहाच्या दरबारांत वाढलें. अशीं भांडणें त्या काळांत फार घडत. त्यांचा परिणाम पुढे फारसा टिकत नसे. परंतु ही घटना अर्धवट माहीत असलेल्या बखरकारांनी जाधवराव व भोसले यांचें हें अपघाती वितुष्ट कायमचें असें कल्पून त्यावर शिवजन्माची इतिहासावेगळी कहाणी रचली. "माहुलीच्या वेढ्यांतून निसटून जाणाऱ्या शहाजीचा जाधवरावाने पाठलाग केला, त्या वेळीं गरोदर असलेल्या जिजाबाईला तशीच टाकून शहाजी निघून गेला, मग जाधवरावाने तिला शिवनेरीवर नेऊन ठेवलें, आणि अशा परिस्थितींत शिवाजी झाला," ही कथा कल्पित आहे.

निजामशाहींतून निर्गमन

जाधवरावाप्रमाणे शहाजीलाहि पुढे निजामशाहीचा त्याग करावा लागला. त्याचीं उमेदवारीचीं पहिलीं चार वर्षें (१६२०–१६२४ इ.) निजामशाहींत मलिकंबराच्या नेतृत्वाखाली गेलीं. शेवटच्या वर्षी अहमदनगराजवळ भातवडी येथे एक लढाई झाली. या वेळीं मोगल व आदिलशाहा या दोघांच्याहि फौजा मिळून मलिकंबराच्या निजामशाही फौजांवर चालून आल्या. त्यांचा मलिकंबराने पराजय केला. या लढाईंत शहाजीचा भाऊ शरीफजी पडला; तरी शहाजीने मोठा पराक्रम करून एका मोगल सेनापतीला हार खावयास लावली. पण मग भाईबंदीमुळे असो किंवा यशाने चढेल बनलेल्या मलिकंबराशीं त्याचें न पटल्यामुळे असो, तरुण रक्ताच्या शहाजीला निजामशाहींत राहवेना; म्हणून तो आदिलशाहींत गेला.

विजापूरच्या इब्राहीम आदिलशाहाने (१५८०–१६२७ इ.) शहाजीचें चांगलें स्वागत केलें. त्याला 'सरलष्कर' केलें आणि 'पादशाही कारभाराचा मदार त्याचे सिरीं टाकिला.' मराठे लोक साधी सरदारकी करून

केवळ पोटें भरतात; तेव्हा त्यांच्याकडून मोठीं कामें करून घेऊन त्यांना वजिरीची प्रतिष्ठा मिळवून द्यावी, अशा मोठ्या उमेदीने शहाजीने ही आदिलशाहाची सेवा अंगावर घेतली. शेजारच्या ह्या दोन शाह्यांतील युद्धांत त्याने आपला पुणें परगणा व पाटसकडील मुलूख विजापुरी सैन्याच्या मदतीने प्रथम निजामशाहीकडून जिंकून आदिलशाहीकडे घेतला. पुढील पांचसहा महिन्यांत शहाजीने मलिकंबरला युद्धांत गाठून त्याचा पराभव केला. विजापूरकरांचा सोलापूरचा किल्ला घेण्यासाठी चाललेली त्याची खटपटहि शहाजीने चालू दिली नाही. मुधोजी फलटणकर याची स्वारी त्याने परतविली आणि दक्षिणेकडे कर्नाटकांत मोहीम काढून पुष्कळ लूटहि मिळवून आणली. शहाजीच्या या कर्तबगारीमुळे इब्राहीम आदिलशाहा त्याच्यावर फार खूष झाला.

घरसोडीचा वीट

पण तरुण शहाजी महत्त्वाकांक्षी होता. तो स्वस्थ बसणारा नसल्यामुळे आदिलशाहींतहि त्याला तीन वर्षांहून (१६२५–१६२८ इ.) अधिक राहणें जमलें नाही. ज्याच्या आधारावर तो आदिलशाहींत गेला होता तो इब्राहीम आदिलशाहा इ. १६२७ त मरण पावला आणि हिंदु सरदारांना विरोध करणारांचें विजापूर दरबारांत प्राबल्य झालें. तितक्यांत दिल्लीच्या तक्तावर नुकताच बसलेला शहाजहान बादशाहा (१६२७–१६५८ इ.) निजामशाहीवर स्वारी करणार अशी वार्ता आली. निजामशाहींत शहाजीला अप्रिय झाला होता तो मलिकंबर मरून गेला (१६२६ इ.). म्हणून जेव्हा निजामशाहीच्या रक्षणासाठी त्याला बोलावणें आलें तेव्हा शहाजी तिकडे फिरून जायला तयार झाला. अर्थात् फिरून आपल्या पुणें परगण्याचा मोकासा निजामशाहीकडून आपल्या नांवचा करून घेण्यास तो विसरला नाही. आपली जहागीर संभाळण्याची तो सतत काळजी घेई.

इ. १६२८ मार्चपासून इ. १६३० च्या ऑक्टोबरपर्यंत, साधारणतः अडीच वर्षें शहाजी फिरून निजामशाहींत राहिला. तो तिकडे असतांनाच इ. १६३० फेब्रुवारी १९ या दिवशीं शिवनेरी किल्ल्यावर शिवाजीचा जन्म झाला. पण तो काळ शहाजीला इतका धामधुमीचा गेला, की मुलाच्या जन्माच्या दिवशीं तो शिवनेरीला राहूं शकला नव्हता.

शहाजी निजामशाहींत आला खरा; पण निजामशाही बचावण्याचें उद्दिष्ट बाजूला राहून तेथे वैयक्तिक स्वार्थाचा आणि सत्तास्पर्धेचा बुजबुजाटच झालेला त्याला दिसला. या सुमारास शहाजीप्रमाणे त्याचा सासरा लखूजी जाधवराव देखील या संकटकालीं निजामशाहींत परत आला होता; पण विश्वासघाताने त्याचा खून झाला (इ. १६२९ जुलै). या सर्व प्रकाराने शहाजीचें मन विटलें व एखादे वेळेस आपलीहि गत सासऱ्यासारखी व्हावयाची हें ओळखून, त्याने आता दक्षिणेंत आलेले तिसरे सत्ताधीश दिल्लीकर मोगल यांच्याकडे बोलणें सुरू केलें. इ. १६३० ऑक्टोबरच्या सुमारास तो मोगलांचा मनसबदार बनला. मोगल बादशाहाकडून त्याला पांच हजारी मनसब, मानाचा पोशाख, रत्नजडित खंजीर, निशाण, घोडा, हत्ती व दोन लक्ष रुपये खर्चासाठी आले. चुलत भाऊ मंबाजी व मालोजी आणि वडील मुलगा संभाजी यांनाहि मनसबी मिळाल्या. आणि शहाजीच्या परिचयाचा जुन्नर-संगमनेरकडील निजामशाही मुलूख मोगलांसाठी जिंकून घेण्याच्या कामगिरीवर त्याची रवानगी झाली.

निर्वाणीचें उत्तर

पण मोगलांना तरी त्याच्याबद्दल कायमचा जिव्हाळा कां वाटावा? ते बोलूनचालून निजामशाही बुडविण्यासाठी आले होते. इतक्यांत सत्तास्पर्धेमुळे अहमदनगरास उलथापालथ होऊन निजामशाहींतील कर्ते मुत्सद्दी मोगलांच्या आहारीं गेले. तेव्हा शहाजीसारख्या एकांड्याची गरज त्यांना भासेनाशी झाली. त्यांनी शहाजीची मनसब काढून ती त्यांना फितूर झालेल्या फत्तेखानाला (मलिकंबराच्या मुलाला) बहाल केली (इ. १६३२ मार्च-एप्रिल), आणि शहाजीला वाऱ्यावर सोडून दिलें. मोगलांच्या प्रतिष्ठित दरबारांत देखील असें घडेल याची त्याला कल्पना नव्हती.

अशा रीतीने मोगलांनी शहाजीला दगा दिला. फितूर फत्तेखान मोगलांनी त्याला दिलेली मनसब बळकावून बसला. तेव्हा फत्तेखानाच्या घरबुडव्या धोरणाविरुद्ध निजामशाहीच्या अभिमानी सरदारांची एकजूट करावी, आणि निजामशाहीचें आयुष्य शक्य त्या प्रकारें स्वपराक्रमाने लांबवावें, असा प्रयत्न करण्याचें शहाजीने ठरविलें. विजापूरच्या राज्यांतील खवासखान-मुरारराव

अशा मातबर मुत्सद्द्यांना मोगल दोन्ही शाह्यांच्या मुळावर आले आहेत हें समजलें होतें. त्यांना दक्षिणेंत मोगलांचें आक्रमण होऊं नये असें वाटे. या कामांत त्यांचें शहाजीला पाठबळ होतें. विशेषतः मुराररावाचें. कारण मुरारराव हा शहाजीप्रमाणे धर्माभिमानी होता; आणि या सुमारासच शहाजहानाने (१६२७–५८ इ.) काशीच्या पंचक्रोशींतील ७६ देवळें उद्ध्वस्त केलीं व सरकारी जमिनीवर कोणींहि नवीन देऊळ बांधूं नये, असा वटहुकूम काढून हिंदूंचीं मनें दुखविलीं होतीं.

आता शहाजी चांगला फौजबंद सरदार झाला होता, आणि निजामशाहींतील गोदावरी, प्रवरा, नीरा व भीमा या नद्यांच्या परिसरांतील, मुख्यतः सह्याद्रीलगतच्या मुलखावर म्हणजे दक्षिणेस नीरेपासून उत्तरेस बागलाणपर्यंत आणि पश्चिमेस समुद्रापासून पूर्वेस नगरपर्यंत या प्रदेशांत त्याचा अधिकार होता. इकडे फत्तेखानाने मूर्तजा निजामशाहाला (१६०३–३१ इ.) ठार केल्यावर, त्याच्या वंशांतील हुसेन नांवाच्या एका मुलाला गादी देऊन त्याच्या नांवाने कारभार चालविला होता हें खरें. तरी राजधानी दौलताबादच्या आसपास थोडा मुलूख सोडला तर बाकी अन्यत्र त्याचा अंमल नष्ट झाल्यासारखा होता. शहाजीने या वेळीं दुसरा एक मुलगा हाताशीं धरला, आणि इ. १६३२ ऑगस्टच्या सुमारास त्याच्यावर जुन्नरनजीक पेमगिरी (किंवा शहागड) किल्ल्यावर छत्र धरून शहाजी आपण त्याचा वजीर बनला. फत्तेखानाने गादीवर बसविलेला हुसेन निजामशाहा दौलताबादेस आधीच असल्यामुळे, दुसरा एक निजामशाहा उभा करून शहाजीने हें दुहीचें बंड उभारलें असें दिसतें. पण नाकर्ता फत्तेखान स्वार्थासाठी निजामशाही मोगलांच्या हातीं देत होता, तें संकट यामुळे निवारणार होतें. तसेंच आदिलशाहींतील मोगलधार्जिण्या पक्षाशीं संगनमत करून निजामशाहीचा मुलूख मोगल व आदिलशाहा या दोघांत वांटून घेण्याचा जो मनसुबा शहाजहानाचे हस्तक रचीत होते, त्यालाहि पायबंद पडण्यासाठी हें शहाजीचें निर्वाणीचें उत्तर होतें.

अभूतपूर्व प्रयोग आणि असामान्य कर्तृत्व

या वेळीं निजामशाही बुडविण्याच्या इराद्याने मोगली सरदार महाबतखान दौलताबादच्या किल्ल्याला वेढा घालून बसला होता; उलट तो किल्ला

निजामशाहीसाठी वांचवावा म्हणून शहाजीचा कैवार घेणारें आदिलशाही सैन्य झटत होतें. शहाजी देखील एकीकडे आपल्या मुलखाचा बंदोबस्त करतां करतां दुसरीकडे दौल्ताबादच्या या अभूतपूर्व सामन्याला हातभार लावीत होता. पण फत्तेखानाच्या दुटप्पी धोरणामुळे अखेरीस महाबतखानाला यश आलें. दौलताबादचा किल्ला म्हणजे निजामशाहीची राजधानी आणि खुद्द निजामशाहा हुसेन यांच्यासह स्वतः वजीर फत्तेखान मोगलांच्या आधीन झाला. ही गोष्ट इ. १६३३ जून १७ ला घडली. इ. १४९० पासूनची दीडशे वर्षांची निजामशाहीची जुनी परंपरा तुटली. पण आपण पुरस्कारिलेल्या मुलाला राज्यारोहणाचा संस्कार घडवून ती पुन्हा शहाजीने सांधून घेतली आणि आणखी तीन वर्षे हिरिरीने चालविली. जुन्नरनजीक निजामशाहीची नवी राजधानी शहाजीने केली आणि सह्याद्रींतील दुर्गम किल्ल्यांचा व गनिमी युद्धपद्धतीचा आश्रय करून स्वतःच्या हुकमतीखालील नव्या निजामशाहीचा उपक्रम केला. आणि मोगलांच्या सत्तेलाच केवळ नव्हे, तर दक्षिणेंतील दुसरी सत्ता आदिलशाही जर मोगलांशीं संगनमत करील तर तिच्याहि सत्तेला, नवें आव्हान दिलें.

ऐन तिशींतल्या शहाजीने या वेळीं असामान्य कर्तृत्व प्रकट केलें. निजामशाहींत माजलेली बेबंदशाही मोडून टाकण्याची त्याने पराकाष्ठा केली. फौज सहा हजार होती ती वाढवून बारा हजारांवर नेली. तळकोकणांत मुलूख बळकावून बसलेल्या बंडखोराशीं युद्ध करून त्याला जरब बसविली. आणि त्याच वेळीं आपल्या प्रयोगाला पाहिजे असलेली शांतता मिळावी म्हणून, एका बाजूला मोगल सुभेदार व दुसऱ्या बाजूला विजापूरचे वजीर या दोघांशीं सलोख्याचीं बोलणीं चालू ठेवलीं. आपल्या राज्यांत बंदोबस्त करण्यासाठी तो वाऱ्यासारखा संचार करीत राहिला. विजापूरकरांच्या सीना नदीच्या काठच्या परिंडा किल्ल्यावर जेव्हा महाबतखानाने जोरदार मोहीम काढली, तेव्हा आदिलशाही फौजांशीं हातमिळवणी करून शहाजीने ती परतवून लावली; मोगलांच्या पिछाडीची रसद मारून त्यांना परिंड्याचा वेढा उठवायला भाग पाडलें. पण आदिलशाहीशीं केलेली ही एकजूट टिकली नाही.

शहाजी व विजापूरकर यांचें जूग फोडलें

विजापूर दरबाराने या वेळीं शहाजीचा पाठपुरावा अखेरपर्यंत केला असता आणि दक्षिणेंतील शाह्यांच्या हितासाठी उत्तरेकडील मोगलांच्या

विरुद्ध लढावयाचें एकजुटीचें धोरण अखेरपर्यंत संभाळलें असतें, तर मोगलांची डाळ शिजली नसती. पण अंतर्गत स्पर्धा आणि आपसांतील मतभेद यांमुळे तें झालें नाही आणि दक्षिणची निजामशाही नष्ट होऊन तिच्या जागीं मोगलाई येऊन बसली. स्वतः शहाजहान दौलताबादेस येऊन (इ. १६३६ फेब्रुवारी २१) दक्षिणेंतील मोहिमेचें नियंत्रण करूं लागला. शहाजीवरील मोहीम त्याने कडोविकडीने चालविली. एकट्या शहाजीवर शहाजहानाने जुन्नरकडे खानजमान आणि नाशिकच्या बाजूने शायिस्तेखान अशा दोन मोठ्या सेनापतींच्या हाताखाली दोन फौजा रवाना केल्या. शहाजीने त्यांना हुलकावणी दाखवून कोकण आणि देश अशा दोन्ही प्रदेशांत त्यांची तारांबळ उडविली. अखेर शहाजी व विजापूरकर यांचें जूग फोडून विजापूरचें साह्य मिळविल्याशिवाय एकट्या मोगलांना शहाजीला लौकर जिंकणें अशक्य आहे हें शहाजहानाला पटलें. त्या धोरणाने त्याने टाकलेला भेदनीतीचा डाव यशस्वी झाला. इ. १६३६ मे ६ तारखेला विजापूर दरबार आणि शहाजहान यांच्यामध्ये तह झाला. निजामशाहीचा मुलूख आपसांत वांटून घेण्याचा फार दिवसांचा बेत अमलांत आणण्याचा दोघांचा करार पक्का झाला. शहाजीची आतापर्यंत पाठ राखणारा विजापूरकरांकडील सेनापति रणदुल्लाखान देखील नव्या बनावांत सामील झाला; किंबहुना त्याच्याच सल्ल्याने शहाजीवरच्या पुढील मोहिमेची आखणी झाली.

ह्या तहानंतर युद्धाचीं चक्रें झपाट्याने फिरूं लागलीं. अर्थात् शहाजीने उभारलेली निजामशाही मोडावी असें दोघां नव्या दोस्तांचें ठरलें. ही गोष्ट शहाजीने मान्य केली नाही, तर दोन्ही सैन्यांनी त्याच्यावर मोहीम काढून त्याला निजामशाही मोडणें भाग पाडावें, असें तहांत एक खास कलम होतें. निजामशाही मोडण्याला शहाजी मान्यता देणें शक्यच नव्हतें. तेव्हा दोन्ही फौजा एक झाल्या व त्याला मुळीच उसंत मिळूं नये म्हणून भर पावसाळ्यांत त्याच्याशीं लढूं लागल्या. जवळजवळ चारसहा महिने शहाजीने त्यांना दाद दिली नाही. जंजिऱ्याचा सिद्दी आणि चौलचे पोर्तुगीज यांचाहि आसरा मिळविण्याचा त्याने प्रयत्न करून पाहिला. पण या प्रसंगीं त्याच्या मदतीला कोणी उभे राहण्यास धजले नाहीत. अखेरीस माहुलीच्या किल्ल्यांत बायकामुलांसह तो वेढला गेला आणि नाइलाज झाल्याने त्याने माघार घेतली (इ. १६३६ नोव्हेंबर-डिसेंबर). अर्थात्

हातीं धरलेला शेवटचा मूर्तजा निजामशाहा मोगलांच्या स्वाधीन करावा लागला आणि निजामशाहीच्या पुनरुज्जीवनाचा हा अखेरचा धाडसी प्रयोग शहाजीला सोडून द्यावा लागला. सर्व प्रयत्न थकल्याने तो अगतिक झाला आणि मनापासून नाही, तरी परिस्थितीपुढे वाकून, त्याने दोन शाह्यांनी आवर्जून तहांत ठरविल्याप्रमाणे आदिलशाहीची सरदारी फिरून पत्करली.

शिवाजीराजांना स्फूर्ति

शिवाजीराजांचा आजा मालोजी हा उत्कृष्ट मनसबदार होऊन गेला. तसाच त्यांचा पिता शहाजी हा शिगेच्या कर्तृत्वाचा सरदार किंवा पादशाही वजीर म्हणून गाजला. शिवाजीराजांच्या जन्माच्या आधी सुमारें दहा वर्षे आणि जन्मानंतर दहावीस वर्षें, एवढ्या कालांत दक्षिणेंतील तिन्ही शाह्यांमध्ये शहाजीला आलेला अनुभव म्हणजे त्या काळच्या राजकीय परिस्थितीचें हुबेहूब चित्र होय. तसल्याच राजकीय परिस्थितींत आणि खुद्द त्याच प्रदेशांत शिवाजीराजांचें स्वराज्य स्थापन झालें असल्यामुळे, राजांच्या पुढच्या उद्योगाची पार्श्वभूमि म्हणून शहाजीचा हा इतिहास नीट ध्यानांत घेणें उपयोगाचें आहे.

वयांत येतांच इ. १६२० मध्ये शहाजीने सरदारीला सुरवात केली आणि निजामशाही, आदिलशाही आणि मोगलाई अशा तिन्ही शाह्यांत महत्त्वाची कामगिरी करून मान्यता व प्रतिष्ठा मिळविली. ऐन तिशींत निजामशाहीचा सुलतान मांडीवर बसवून तिचा कारभार आटोपण्याचें धाडस त्याने केलें. ती टिकविण्यासाठी राहिलेल्या इतर दोन प्रबळ शाह्यांशीं सतत तीन वर्षें झगडून अटीतटीचा सामना दिला; पण त्यांत त्याचा पराजय झाला. तरी त्या दोन शाह्यांनी आपसांत जो तह केला, त्या तहांत शहाजीचा निर्देश दोन कलमांत करून, त्याच्या बंदोबस्ताची कामगिरी आदिलशाहीवर निक्षून सोपविण्याची खबरदारी शहाजहानाने घेतली. इतकी त्याच्या पराक्रमाची दहशत शहाजहानाला बसली होती. ह्या पराक्रमाचा शिवाजीच्या चरित्रावर निःसंशय फार मोठा परिणाम झाला. त्या काळच्या सुसंस्कृत घराण्यांतील मुलांच्या शिक्षणांत रामायण व महाभारत अशा-सारख्या पुराणांतल्या कथांचा समावेश होई, तसाच ऐतिहासिक बखरी घ

वीरकथा यांचाहि होई. लहानपणीं मातुश्रीच्या व इतरांच्या तोंडून शिवाजी-राजांनी रामायणांतल्या व महाभारतांतल्या वीरकथा ऐकल्या असतील आणि त्या कथांचे त्यांच्या बालमनावर योग्य ते संस्कारहि झाले असतील. तथापि हजारो वर्षांच्या त्या जुन्या कथांपेक्षा डोळयांसमोर घडत असलेल्या आपल्या पराक्रमी बापाच्या शौर्यांच्या आणि पराक्रमाच्या कथा रोज त्यांच्या कानावर येत, त्यांचा परिणाम अधिक झाला असला पाहिजे. बापाच्या पराक्रमाच्या कथा ऐकून त्यांचें बालमन अभिमानाने आणि उल्हासाने भरून येत असेल. आपला कर्तृत्ववान् बाप जेथे थांबला तेथून धागा जोडून घेऊन पुढे पाऊल टाकण्याचा मनसुबा त्या बालमनांत हळूहळू आकार घेऊं लागला असेल. आपला बाप परक्याचें राज्य टिकविण्यासाठी झटला; आपण आपलें स्वतःचें राज्य उभारूं, असें बालशिवाजीने मनांत आणलें असेल. मातुश्री जिजाबाईने, दादाजी कोंडदेवाने आणि इतर हितचिंतकांनी छोट्या राजांना प्रोत्साहन दिलें असेल.

* * *

<u>शहाजी व शहाजहान समान</u>

(पदाचें भाषांतर)

परमेश्वर ब्रह्मदेवाला विचारतात की, "तूं सृष्टि रचिलीस तींत कोणाकोणाची कुठे योजना केली आहे?" तेव्हा ब्रह्मदेव सांगतो—"पूर्वेचा रक्षक रवि व पश्चिमेचा रक्षक चंद्र केला आहे. तसेंच उत्तर दिशेचा लोकपाल शहाजहान पातशाहा केला आहे व दक्षिण देशाचा रक्षक शहाजी महाराज केले आहेत. आपण खुशाल क्षीरसागरांत शयन करायला हरकत नाही."

राधामाधवविलासचंपू, पृ. २५०

३ शिवाजीचें बालपण

जन्मकाळची परिस्थिति

शिवाजीचा जन्म इ. १६३० फेब्रुवारी १९ रोजीं (शक १५५१, फाल्गुन वद्य ३) शुक्रवारीं सूर्यास्तानंतर थोड्या वेळाने सिंह लग्नावर शिवनेरी किल्ल्यांत झाला. शिवनेरी किल्ला पुणें जिल्ह्यांतील जुन्नर शहराला लागून अर्ध्या कोसावर आहे. तेथील देवीचें नांव शिवाई. देवीच्या या नांवावरून शिवाजी हें नांव ठेविलें असावें.

शिवाजीच्या जन्माच्या पूर्वींचीं दहा वर्षें (१६२०–३० इ.) आणि नंतरचीं सहा वर्षें (१६३०–३६ इ.) वडील श्रीशहाजीराजे भोसले यांनी फार धामधुमीचीं घालविलीं हें आपण पाहिलेंच आहे. अर्थात् शिवाजीचें बालपण देखील तसेंच व तितकेंच धावपळीचें झालें.

शिवाजीचा जन्म झाला त्या सुमारास शहाजी आदिलशाहींतून फिरून निजामशाहींत आला होता (पृ. १६–१७). या वेळीं निजामशाहीची वजिरी मलिकंबराचा मुलगा फत्तेखान याच्या हातून हमीदखानाच्या हातांत गेली आणि त्याने दोघाहि सत्तांना दुखविल्यामुळे, उत्तरेकडून मोगल आणि दक्षिणेकडून विजापूरकर अशा दोघांच्या कचाट्यांत निजामशाही सापडली. तेव्हा निजामशाहीचा मोगलांच्या संकटापासून बचाव करण्यासाठी शहाजीला खानदेशांत दर्याखान या मोगल सरदारावर चालून जावे लागलें होतें. या स्वारींत गुंतल्यामुळे शहाजी शिवाजीच्या जन्माच्या वेळीं शिवनेरीवर नव्हता. त्याच्या सुरक्षिततेबद्दल नेहमीप्रमाणेच जिजाबाईच्या मनांत काळजी वाटत होती. पुढे पावसाळ्यांत स्वाभाविक युद्धें थांबतात, तेव्हा तो जन्मानंतर कांही दिवसांनी आला. म्हणजे या मुलाचे सूर्यदर्शन वगैरे कांही संस्कार त्याच्या गैरहजेरींत झाले; आणि जेव्हा शहाजीला प्रथम पुत्रमुख पाहावयास मिळालें तेव्हा त्याच्या विवंचना वाढलेल्याच होत्या.

उत्तरेकडे दर्याखानाच्या युद्धांत त्याचा पराजय झाला होता आणि दक्षिणेच्या बाजूने आदिलशाही फौजांनी त्याच्या पुणें जहागिरीमध्ये जाळपोळ करून पुण्यांतील वाडे उद्ध्वस्त केले होते. असें दोन्हीकडून त्याचें नुकसान झालें होतें. वर्षापूर्वीच निजामशाहाने लखूजी जाधवरावाचा खून केल्यामुळे सासरा गमावल्याने शहाजी कष्टी झाला होता, आणि प्रत्यक्ष पित्याचें छत्र नष्ट झाल्यामुळे जिजाबाई कितीतरी दुःखी झालेली होती. तशांत या वर्षी अवर्षणामुळे जहागिरीच्या बऱ्याच टापूंत भयंकर दुष्काळ पडला होता. नाही म्हणावयास, अशा सर्व बाजूंनी नाडलेल्या परिस्थितींत, वडील मुलगा संभाजी याचें लग्न जुन्नरचा अधिकारी विजयराघव याच्या जयंती नांवाच्या मुलीशीं नुकतेंच होऊन शिवाजीच्या जन्मापूर्वी नवी सोयरीक जमलेली होती. ह्या सोयरिकीमुळे जिजाबाईच्या बाळंतपणांत, जिव्हाळ्याच्या माणसांमध्ये राहावयाला तिला निवाऱ्याची जागा तरी मिळाली.

पहिलीं सहा वर्षें

यानंतर शहाजीच्या परिस्थितींत पुनः बदल झाला आणि शिवाजी एक वर्षाचा होण्याच्या आंत (पृ. १७) शहाजी मोगलांचा मनसबदार बनला. वर्ष दीडवर्ष तरी जुन्नर-संगमनेरच्या मुलखाकडे निजामशाहीचा शत्रु म्हणून तो संचार करीत होता. त्यानंतर इ. १६३२ च्या ऑगस्टमध्ये नवा मूर्तजा गादीवर बसवून त्याने निजामशाहींत उघड बंड उभारलें (पृ. १८). तेव्हा वजीर म्हणून त्याच्या दारांत अधिकारामुळे हत्ती झुलण्याची संधि आली. तरी देखील आपल्या नव्या राज्याच्या बंदोबस्तासाठी त्याला सारखें फिरत राहावें लागलें आणि पुरेसा स्वस्थपणा कधी मिळाला नाही.

पुढे इ. १६३३ त निजामशाहीची राजधानी दौलताबाद मोगल सेनापति महाबतखानाच्या हातांत पडली (पृ. १९). तेव्हा तर मोगलांच्या फौजा शहाजीच्या पाठलागासाठी मोकळ्या झाल्या आणि मग आपलीं बायकामुलें आपल्याबरोबर बाळगण्याची गरज त्याला वाटली. यापुढे तीन वर्षांच्या धामधुमींत, आणि अखेर भर पावसाळ्यांतील कोंकणांतील माहुली किल्ल्याच्या वेढ्यांत, जिजाबाई व छोटा शिवाजी दोघेहि शहाजीबरोबरच होतीं. शेवटीं तह झाल्यावर शहाजी विजापूरकरांच्या

फौजांत दाखल झाला. तेव्हा त्याच्याबरोबरच विजापुरास जाण्यासाठी म्हणून माहुलीच्या किल्ल्यावरून तीं खालीं उतरलीं.

याप्रमाणे शिवाजीच्या वयाचीं पहिलीं सहा वर्षें शिवनेरी-पेमगिरी-माहुलीस म्हणजे सह्याद्रीच्या गडकोटांवर गेलीं. या वातावरणांत सर्वसाधारण मुलांप्रमाणे पोपट, कोकिळा, वाघ इत्यादि पशुपक्ष्यांच्या आवाजाचें अनुकरण करणें, मातीचे हत्ती, घोडे, किल्ले घडविणें, लपंडाव खेळणें, चेंडू-भोवरा फिरविणें अशा स्वैर खेळ-करमणुकींचा साहजिक सुकाळ होता.

शिक्षणाचा आराखडा

यापुढील काळांत शहाजी महाराजांच्या पाठीमागचा धावपळीचा ससेमिरा सुटला; आणि विजापुराच्या राजधानींत राहूं लागल्यावर शिवाजीच्या सातव्या वर्षापासून त्याच्या लिहिण्या-वाचण्याच्या वगैरे शिक्षणाची पद्धतशीर व्यवस्था करण्यास त्यांना फावलें. यापुढील सुमारें पांच वर्षें या कामाला निर्वेध मिळालीं. तेवढ्या वेळांत शिरस्त्याप्रमाणे भारत, भागवत, रामायण अशा कांही इतिहास-पुराणांतल्या कथा, संस्कृत व फार्शी भाषांचा चाल-चलाऊ परिचय आणि अश्वारोहण, कुस्ती, दांडपट्टा वगैरे क्षत्रियांना लागणारी युद्धविद्या, यांचें शिक्षण बालशिवाजीला गुरुजनांनी दिलें. अर्थात् शिवाजी महाराज निरक्षर होते या बाष्कळ आक्षेपांत तथ्य नाही. पूर्वी हल्लीप्रमाणे पत्रावर कोणीच स्वतःचें नांव लिहून सही करीत नसत; आणि राजे वगैरे खासे लोक आपलीं सारीं पत्रें चिटणिसाकडून किंवा कसलेल्या लेखकाकडून लिहवून घेत. शिवाय तीनशे वर्षांपूर्वीचे कागद आता फारच थोडे मिळतात. त्यांमध्ये शिवाजी महाराजांसारख्या सदा कामांत व धावपळींत गुंतलेल्या राजकारणी पुरुषाच्या हातचीं पत्रें किती मिळणार? तसें एखादें मिळालें तरी तें ओळखण्याचें चांगलेंसें साधन अजून आपल्या हातीं आलेलें नाही. तेव्हा तसें एखादें पत्र मिळाल्याचें सिद्ध झालें, तरच शिवाजी महाराजांची साक्षरता सिद्ध होते, असें मानणें रास्त नाही. कारण समकालीन इंग्रज, डच वगैरे अनेकांनी त्यांच्या साक्षरतेबद्दल समाधानकारक वाटतील अशीं विधानें अनेक ठिकाणीं केलीं आहेत.

शहाजी महाराजांनी आपला अनुभव डोळयांसमोर ठेवून, त्याच्या आयुष्याला विशिष्ट वळण लागावें अशा दृष्टीने बालशिवाजीचें शिक्षण

आखलें. अलीकडील कालांतील उदाहरण घेऊन बोलावयाचें तर कृष्णशास्त्री व विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि गंगाधरशास्त्री आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक या प्रसिद्ध पितापुत्रांची शहाजी व शिवाजी या लोकोत्तर पितापुत्रांशीं तुलना करणें शोभेल. लौकिक शिक्षणाशिवाय शिवाजीराजांच्या नजरेसमोर प्रत्यक्ष शहाजी महाराजांकडून व त्यांची सदैव पाठ राखणाऱ्या त्यांच्या कर्तबगार मातुश्रीकडून अगदी स्वतंत्र असा ध्येयवाद आणि महत्त्वाकांक्षेचा आदर्श ठेवण्यांत आला; आणि स्वतः शिवाजीराजांनी स्वतःच्या प्रज्ञेने आणि प्रतिभेने त्याला स्वतंत्र आकार आणला. त्या साऱ्याची कल्पना महाराजांच्या आयुष्यांत पुढे फलद्रूप झालेल्या कित्येक अभिमानास्पद गोष्टींवरूनच बांधली पाहिजे.

शहाजी महाराजांना तहाप्रमाणे आपल्या नोकरींत घेतांना भीमा व नीरा या नद्यांमधील इंदापूर, सुपें, पुणें व चाकण परगणे हा त्यांच्या मूळ जहागिरीचा मुलूख आदिलशाहाने त्यांच्याकडे ठेविला. हा मोगलाई व आदिलशाही यांच्या सरहद्दीवरचा असल्यामुळे तो शहाजीसारख्या प्रबळ सरदाराकडे ठेवणें आदिलशाहाच्या हिताचें होतें; परंतु मोगलांनी आग्रह धरल्यावरून त्यांना दूर कर्नाटकांत कामगिरी द्यावी हेंहि निश्चित ठरलेलें होतें. यामुळे इकडील आपल्या आवडत्या कर्मभूमींतील जहागिरीबद्दल त्यांना साहजिकच काळजी वाटत होती. माहुली गडावरून उतरून आदिलशाही सरदार रणदुल्ला याच्या छावणींत गेल्यावेळीं रणदुल्लाच्या विश्वासांतील कारीच्या जेधे-देशमुखांशीं त्यांनी ती बोलून दाखविली आणि कर्नाटकांत जाण्यास निघण्यापूर्वी इकडील व्यवस्थेसाठी दादाजी कोंडदेव या परिचयांतल्या माणसाची आपला मुतालिक म्हणजे प्रतिनिधि म्हणून नेमणूक केली. तो मालकाकडून कामकाज समजून घेण्यासाठी कर्नाटकांत अधूनमधून जाई. त्याने आपल्या मृत्यूपर्यंत सुमारें दहाअकरा वर्षें मोठ्या धोरणाने तेथील कारभार हाकला. इ. १६३० च्या दुष्काळांत, युद्धाच्या धामधुमींत व मध्यंतरीं मुरार जगदेवाच्या जाळपोळींत उद्ध्वस्त झालेल्या जहागिरीची (पृ. २४) आबादानी करून त्याने प्रांताचा वसूल वाढविला. दादाजी कोंडदेव हा मोठा नेकीचा इसम असून त्याच्यावर शहाजीचा फार विश्वास होता. त्यामुळे आपला लहान मुलगा शिवाजी पुढील व्यावहारिक शिक्षणासाठी शहाजीने दादाजी कोंडदेवाच्या स्वाधीन केला.

कर्नाटककडील कामगिरींतून सवड होईल त्याप्रमाणे शहाजी इकडे येऊन जाई. अशा त्याच्या खेपा इ. १६३९ मध्ये एकदा आणि इ. १६४४ मध्ये दुसऱ्यांदा अशा अंतराअंतराने झाल्या. यांपैकी पहिल्या वेळीं शिवाजी कर्नाटकांतच होता, आणि दुसऱ्या खेपेच्या वेळीं पुण्यांत त्याची रवानगी होऊन तीन वर्षे झालीं होतीं. अशा रीतीने शहाजी व शिवाजी यांच्या गाठीभेटीचे प्रसंग अगदी थोडे येत. परंतु शिवाजीराजे आणि मातुश्री जिजाबाई यांची मात्र कधीच ताटातूट होण्याचा प्रसंग आला नाही.

बंगरुळाहून रवानगी

कर्नाटकांत पांच वर्षे शिक्षण झाल्यावर शिवाजीराजांना बारावें वर्ष लागलें. तेव्हा त्यांच्या कारभारविषयक शिक्षणाला सुरुवात करणें इष्ट होतें. बहुधा दादाजी कोंडदेवाने कोणा खाशाला पाठवावें अशी विनंतीहि केली असेल; तेव्हा इ. १६४१ मध्ये शिवाजीराजांची रवानगी बंगरुळाहून दादाजी कोंडदेवाबरोबरच पुण्यास झाली. जिजाबाई व शिवाजीराजे या वेळीं दादाजीपंतांच्या सोबतीने कधी खेडेबारें (खेडशिवापूर) येथे राहात. नंतर पुण्यांतील कसब्यांत बांधलेल्या खास लालमहाल वाड्यांत त्यांची वसति असे. इ. १६३६ त इकडील कामावर दादाजी कोंडदेव याची योजना करतांनाच, शहाजीने आपल्या जहागिरीपैकी कर्यात मावळ या तर्फेचा पोटमोकासा (३६ गांव) सहा वर्षांच्या शिवाजीराजांच्या नांवाने करून दिला; यावरून या बाजूला संभाजी व शिवाजी या दोन भावांपैकी कोणत्या खाशाची नेमणूक करावयाची याची कल्पना त्याने पांच वर्षांपूर्वीच आपल्या मनाशीं ठरवून ठेवलेली दिसते. हा पोटमोकासा म्हणजे जहागिरींतून पोटजहागीर देण्याचा प्रकार होता.

मुलाच्या बाराव्या वर्षी स्वदेशीं केलेल्या ह्या रवानगीला शहाजी महाराजांच्या दृष्टीने त्या वेळीं फार महत्त्व होतें. जणू स्वतंत्र राजाचा करावा तसा शिवाजीराजांचा थाट त्यांनी करून दिला. "बरोबर शामराव नीळकंठ म्हणून पेशवे नेमून दिले. मुजुमदार, डबीर, सबनीस असेहि स्वतंत्र अधिकारी करून पाठविले." अशी ह्या संबंधाची सभासदी बखरींतील मितभाषी नोंद आहे; आणि त्याचाच "नंतर कांही हत्ती, घोडे, पायदळ, पिढीजाद व विश्वासू अमात्य, विख्यात अध्यापक, बिरुदें,

उंच ध्वज, विपुल द्रव्य व अद्वितीय कर्मे करणारे दुसरे परिजन..." दिले असा थोडा अतिशयोक्तीने विस्तार 'शिवभारतांत' केला आहे. पुढेहि एका प्रसंगाने कान्होजी नाईक जेधे व दादाजी कृष्ण लोहोकरे यांस मुद्दाम बोलावून "मावळ प्रांतीं तुम्ही वतनदार जबरदस्त आहां. राजश्री सिवाजी राजे पुणा आहेत. त्यांकडे जमेतीनिसी तुम्हांस पाठवितों. तेथे इमाने सेवा करावी. काल आला तरी जिवावरी श्रम करावे. तुमचा भरोसा मानून रवाना करतों. इमाने वर्तावे यैसी शफत देणें," अशा अर्थाची आळवणी त्यांची शहाजीराजांनी केली आहे.

शिवाजीराजांची रवानगी इ. १६४१ त झाली आणि त्या आणभाकेचा प्रसंग नंतर सातआठ वर्षांचा आहे. या आठ वर्षांतील शहाजी महाराजांचें धोरण आणि शिवाजीराजांच्या हालचालीहि सूर्यप्रकाशासारख्या स्वच्छ आहेत. त्या समजण्यासाठी तत्कालीन कारभारपद्धति थोडी ध्यानांत घ्यावयास पाहिजे.

जहागिरीचें स्वरूप

शहाजी महाराजांच्या जहागिरींत इंदापूर, सुपें, पुणें व चाकण एवढे चार परगणे होते. हा मुलूख म्हणजे आजचे इंदापूर, भीमथडी, दौंड, पुरंदर, हवेली हे तालुके आणि भीमेच्या दक्षिणेकडील खेड तालुक्याचा पूर्वभाग यांतला मुलूख. जहागीर म्हणजे वसूल उपभोगण्याचा हक्क. तो सुरळीत होण्यासाठी सुव्यवस्था नांदविण्याची जबाबदारी सरकारचे अधिकारी, सुभेदार वगैरे जे सुभ्याच्या ठाण्यावर असत त्यांच्यावर. हें ठाणें एखाद्या मध्यवर्ती किल्ल्यावर राही. तो ठाण्याचा किल्ला व बहुधा राज्यांतील इतर सर्व किल्ले सरकारचे. प्रत्येकावर स्वतंत्र किल्लेदार वगैरे बंदोबस्तास अधिकारीवर्ग निराळा. ज्याचे किल्ले त्याचें राज्य. तेव्हा या जहागिरींतील फक्त वसुलाचा हक्क शहाजीला आणि त्याचा मुतालिक म्हणून दादाजी कोंडदेवाला आणि शहाजीचा वारस म्हणून शिवाजीला होता. परंतु राजसत्ता आदिलशाहीची. ती राजसत्ता आदिलशाहीचा जो सुभेदार असे तो सिंहगडावरून चालवी. पुरंदरचा किल्ला सरकारच्यातर्फे दुसरा एक किल्लेदार संभाळी. जहागिरींत हे किल्ले होते, पण ते जहागिरदाराच्या अमलांत नव्हते. यामुळे किल्ले घेण्याचा प्रयत्न कोणत्याहि प्रकाराने करणें म्हणजे राजसत्तेला शह देणें

असा अर्थ होता. तें धाडस करण्यापर्यंत जर कोणाची मजल गेली, तर मात्र मध्यवर्ती दरबार तिकडे लक्ष देई. अर्थात् सामर्थ्य असेल आणि निकड भासेल तरच.

शहाजीचा मुतालिक दादाजी कोंडदेव याचें स्थानहि विशेष प्रकारचें होतें. त्याची पात्रता ओळखून शहाजीने आपल्या जहागिरीची व्यवस्था आणि आपल्या होतकरू मुलाचें पालकत्व त्याच्या हवालीं केलें. पण लगेच त्याची शिफारस करून त्याला या भागांतील आदिलशाहीचा सुभेदार म्हणूनहि नेमून घेतलें. अशा प्रकारें शिवाजीराजांचा पालक दादाजी कोंडदेव तोच आदिलशाहीचाहि अधिकारी झाला, आणि बारीकसारीक गोष्टींत उत्पन्न झालीं असतीं तीं भांडणें अजिबात टळलीं. एवढेंच नव्हे तर, या जहागिरींत प्रत्यक्ष राजसत्तेला शह देण्याच्या अखेरच्या पायरीला न जातां जें जें करतां येणें शक्य होतें, तें तें सर्व शिवाजीराजांना अगदी बिनबोभाट पार पाडतां आलें.

बारामावळें काबीज केलीं

शिवाजीराजे बंगरुळाहून आल्यावर काय झालें ? दादाजी कोंडदेवाने लगेच कोणती नवी कारवाई सुरू केली ? तर 'येतांच बारामावळें काबीज केलीं.' मावळे देशमुख बांधून घेतले आणि हिरडस मावळचा देशमुख कृष्णाजी नाईक बांदल यांच्यासारखे जे वश होतना, पुंडगिरी करूं लागले, त्यांना शिक्षा केल्या. पुण्याखालचीं हीं बारामावळें म्हणजे अंदर मावळ, नाणें मावळ, पवन मावळ, कोरबारसें मावळ, पौड खोरें, मुठे खोरें, मुसे खोरें, गुंजण मावळ, कानद खोरें, वेळवंड खोरें, हिरडस मावळ व रोहिड खोरें—साधारणपणें शहाजीच्या जहागिरीच्या मावळत्या बाजूचा डोंगराळ प्रदेश.* सह्याद्रीच्या धारेच्या लगतचा. आजचे मुळशी, वेल्हे आणि भोर हे पुणें जिल्ह्यांतील तालुके व वाई हा सातारा जिल्ह्यांतील प्रदेश हे शहाजीच्या मूळच्या जहागिरींत नव्हते. परंतु दादाजीच्या सुभेदारींत होते. तेथे दादाजी कोंडदेव हाच सुव्यवस्था करी. लावणीसंचणी, हिंस्र जनावरांची शिकार, दंगलखोरांचा बंदोबस्त इत्यादि सुव्यवस्था करतां करतां,

* पुढे 'स्वराज्याचा उदय' या प्रकरणांतील नकाशा पाहा.

दादाजीच्या बरोबर शिवाजीराजांचा राबता असल्यामुळे ह्या मुलखांतील प्रजा आणि किल्लेदार हे सारे नव्या राजाकडे ओढले जात होते. या दुर्गम आणि अगदी बाजूच्या प्रदेशाकडे पूर्वीच्या शाह्यांचें दुर्लक्षच असे. यामुळे दादाजी कोंडदेवाच्या सुधारणांमुळे हे लोक सुखावले, कृतज्ञ झाले. शिवाजीराजांच्या मोहक व्यक्तिमत्त्वाने व जिव्हाळ्याने आकर्षित झाले. त्यांच्या पुढारीपणाने 'स्वराज्या'च्या उभारणीसाठी प्राण देण्यास सज्ज झाले.

हा मावळचा मुलूख अनेक प्रकारें शिवाजीराजांच्या स्वराज्याचा पाया बनला. शिवाजीराजांचे नामांकित सवंगडी आणि सहायक, गुंजवण्याचे येसाजी कंक, मोसे खोऱ्यांतील बाजी पासलकर, बापूजी मुद्गल नऱ्हेकर, नारोजी, चिमणाजी व बाळाजी हे नऱ्हेकर देशपांडे बंधु, कावजी कोंढाळकर, जिऊ महाला, वाघोजी तुपे, सूर्याजीराव काकडे, कान्होजी जेधे, हिरडस मावळचे बाजीप्रभु देशपांडे, दादाजी नरसप्रभु देशपांडे आणि असेच इतर या मावळच्या खोऱ्यांतलेच कांटक, चलाख व निष्ठावंत मावळे हेच राजांच्या पायदळाचे व घोडदळाचे आधारस्तंभ. या भरपूर पावसाच्या मुलखांत राजांच्या मावळ्यांना दुष्काळाची भीति कधीच वाटली नाही आणि अडचणीच्या वेळीं आसऱ्याचीहि वाण पडली नाही. अनेक वेळीं मोगलांचे अनेक सरदार शिवाजीराजांच्या मुलखांत आंतपर्यंत घुसले; परंतु अशा आणीबाणीच्या संकटांत ह्या मावळभागानेच राजांना प्रेमाने सतत हात दिला.

मावळामध्ये हे जे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण होत होते, त्यांतूनच शिवाजीराजांच्या सत्तेचीं मुळें न कळत जमिनींत रुजत होतीं. राजगड, रोहिडा, तोरणा, कुवारगड या गडांवर आणि आसपास राजांबद्दल आदराचें वातावरण फैलावत होतें. स्नेहाचें कडें वाढत होतें. किल्लेदार शिवाजी-राजांना चाहूं लागले आणि राजांची तशी इच्छा दिसतांच ते किल्लेदार स्वतःच आपल्या किल्ल्यांसह राजांचे झाले.

या घडामोडींतील सुव्यवस्थेचा भाग आदिलशाहीला अमान्य नव्हता. परंतु तेथे बंडखोरीचें वारें संचारत आहे, अशा बातम्या अधिकारी आणि चुगलखोर यांच्याकडून दरबारांत वारंवार जाऊं लागल्या. तेव्हा मग पुण्याकडे दादाजी कोंडदेव आणि कर्नाटकांत शहाजी ह्या दोघांना पायबंद घालण्याचे प्रयत्न आदिलशाहीकडून झाले.

एकरूप हालचाली

इ. १६४५ मार्च-एप्रिलच्या सुमाराची एका घडामोडीची थोडी माहिती देण्यासारखी आहे. रोहिडखोरें व वेळवंडखोरें यांमध्ये हजार-बाराशे मावळे जमवून शिवाजीराजांनी रोहिडा किल्ला घेतला व राजगड नवा बांधून बळकावला. याबद्दल रोहिडखोऱ्याचा देशपांडे दादाजी नरसप्रभु यास दरबारकडून ठपका आला. 'सिरवळ ठाण्यावर रुजू हो, नाही तर विजापुरीं नेऊन गर्दन मारतील' अशी जरबहि दाखविण्यांत आली. दादाजी प्रभूने आपलें आश्रयस्थान जो शिवाजी त्याच्याकडे हें कळविलें. दादाजीचे वडील नरसीबावा फार घाबरले होते. त्यांना पत्र लिहून शिवाजी महाराजांनी धीर दिला. तें पत्र चातुर्याचें व आत्म-विश्वासाचें उत्कृष्ट उदाहरण आहे. "शहासी बेमानगिरी तुम्ही व आम्ही करीत नाही. श्री रोहिरेश्वर तुमचे खोरियांतील आदिकुलदेव तुमचा डोंगरमाथा पाठारावर स्वयंभू आहे. त्याणी आम्हास यश दिलें व पुढे तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे. (नरसीबावांनी हवालदिल होऊं नये. दरबारचा हुकूम आला आहे तो घेऊन आमच्याकडे खुशाल आश्रयाला यावें.) राजश्री दादापंताचे (दादाजी कोंडदेवाचे) विद्यमाने बावाचे व तुमचे व आमचे श्रीपासी इमान झाले (= शपथा झाल्या), ते कायम वज्रप्राय आहे. त्यांत अंतर आम्ही व आमचे वंशज... वतन वगैरे चालविण्याविषयी कमतर करणार नाही. हें राज्य व्हावें हें श्रीचे मनांत फार आहे. याप्रमाणे बावाचे मनाची खातरी करून तुम्ही येणे." सिरवळच्या आदिलशाही ठाण्याकडे जाण्याचें कारण नाही, आमच्याकडे या, आश्रय तयार आहे, असें निर्भय आश्वासन शिवाजी-राजांनी देशपांड्यांना दिलें आणि हें राज्य व्हावें असें श्रीच्या मनांत फार आहे असें आत्मविश्वासाने सांगितलें.

देशमुख-देशपांड्यांवर डूग धरून जसें ठाणेदारामार्फत त्यांना जरब दाखविण्याचें काम चालू झालें, तसेंच इ. १६४५ च्या ऑगस्टांत कोंडाण्याच्या बाजूची 'विलायत (= प्रदेश, मुलूख) ताब्यांत आणण्यासाठी' खंडोजी व बाजी घोरपडे हे सरदार कारभारी दादाजी कोंडदेव यावर रवाना झाले. त्यांना गेलेल्या हुकमांत दादाजी कोंडदेव शहाजीचा मुतालिक

आहे म्हणून त्याला शिक्षा देऊन नेस्तनाबूद करावा असा स्पष्ट निर्देश आहे. आणि त्याचा मालक शहाजी भोसले हा दरबारांतून निर्वासित आहे व अपमानित झालेला आहे असें म्हटलें आहे. या वेळीं शिवाजी-राजांनी या घोरपड्यांच्या दुकलीला आपल्या सैन्याच्या तयारीची चुणूक दाखवून परत घालवून दिलें.

शहाजीवर हा जो अपमानित होण्याचा प्रसंग आला, तो कोणता ! कर्नाटकाच्या स्वारींत असतांना राचेवार मराठे विजापूरकरांशीं लढत होते. त्यांना शहाजीने सामान पुरविलें, असा आरोप भोसले घराण्याला पुढे पंधरा वर्षें भोवलेला शत्रु अफजलखान याने आणला. त्याची चौकशी करण्यासाठी शहाजीला विजापुरास बोलावून नेण्यांत आलें. त्या प्रसंगाशीं ही शहाजीवरील पहिली मोहीम जोडून घेतली पाहिजे. या भानगडींत शहाजीच्या अंगाला कांही चिकटलें नाही ही गोष्ट निराळी.

याच्या आदल्या वर्षी म्हणजे इ. १६४४ च्या फेब्रुवारीमध्ये शहाजी आपल्या जहागिरीकडे येऊन गेला होता; आणि असें वारंवार येतां येणें अशक्य असल्यामुळे, शिवाजीराजांचीं एक-दोन लग्नेंहि त्याने त्या वेळीं उरकून घेतलीं. आता शिवाजीराजे वयांत आले. आणि कर्नाटकांत महाराज शहाजी, पुण्याकडे मुतालिक दादाजी आणि मावळांत शिवाजीराजे व त्यांनी लगामीं लावलेला तरुण देशमुख-देशपांड्यांचा संच, या तिघांच्या तीन ठिकाणच्या हालचाली एका विशिष्ट सूत्राने चाललेल्या असल्या पाहिजेत, असें आदिलशाही विरोधकांना अगदी स्पष्ट दिसूं लागलें.

स्वराज्याची शपथ

हें विशिष्ट सूत्र आणि सर्वांना भारून टाकणारें ध्येय कोणतें होतें ! दादाजी नरसप्रभूच्या वडिलांना आश्वासन देण्यासाठी लिहिलेल्या (पृ. ३१) पत्रांत त्याचा उल्लेख आहे. दादाजी प्रभु, त्याचे वडील नरसीबावा, खुद्द शिवाजीराजे आणि दादाजी कोंडदेव यांच्यांत एकमेकांना वंशपरंपरा अंतर न देण्याच्या शपथा झाल्या होत्या. वतन चालविण्याची हमी शिवाजी-राजांनी दिली होती व इमानाच्या आणाशपथा परस्परांत झाल्या होत्या. हें सारें खुद्द शिवाजीराजांनी त्या पत्रांत म्हटलें आहे. या शपथा स्वयंभू रोहिरेश्वराच्या समोर घेण्यांत आल्या. तें देवस्थान तिकडच्या खोऱ्यांतील

लोकांचें अशा प्रकारें आणाभाका करण्याचें परंपरेने सर्वमान्य असें स्थान होतें. हें राज्य, हें हिंदवी राज्य म्हणजे स्वकीयांचें स्वराज्य होण्यासाठी वंशपरंपरेने बांधून घेण्याच्या ह्या स्वराज्याच्या शपथा अर्थात् प्रसंगाप्रसंगांनी निरनिराळया देशमुख-देशपांड्यांशीं झाल्या. त्या शपथा देणाऱ्या-घेणाऱ्या शिवाजीराजांनी आपल्यावरची जबाबदारी आणि जोखीम ओळखली. म्हणजे शिवाजीराजांचें बालपण वयाच्या वाढीमुळेच नव्हे तर मनांत भव्य आकांक्षा खेळूं लागल्यामुळे देखील संपलें. यापुढे वडिलांच्या जहागिरीच्या गाड्या-बरोबरची त्यांची नळयासारखी यात्रा पुरी झाली, असें समजून आता शिवाजीराजांना स्वतंत्र मुद्रा आणि स्वतंत्र कारभार यांची जोड मिळाली.

* * *

शिवाजीच्या बाललीला


(संस्कृतचें भाषांतर)

इच्छिलेलें पुरविणारा तो खुषींत आला असतां आपल्या अंगावरील दागिने भराभर उतरून दायांना देत असे. —श्लो. ११.

तो जवळ उभा राहून एकदम वाघासारखी गर्जना करून आपल्या प्रेमळ दाईससुद्धा भेडसावीत असे. —श्लो. १३.

कधीं मुलांकडून मातीचीं उंच टेकडें रचून घेऊन 'हे पाहा माझे दुर्ग (किल्ले)!' असें म्हणे. —श्लो. १७.

शिवभारत, अध्याय ७ वा



शहाजीराजे यांची जहागीर आणि स्वराज्याचा उगम
(१६३६–१६५६ इ.)
(तिरक्या रेघांचा भाग पोटमोकाशाचा. पाहा पृ. २७)

४ स्वराज्याचा उदय

स्वराज्याचें मूलस्थान

शहाजीवरील मोहिमेला (पृ. ३१-३२) वर्ष झालें असेल नसेल इतक्यामधलें इ. १६४६ जाने. २८ तारखेचें शिवाजीराजांचें एक पत्र अनेक दृष्टींनी अपूर्व वाटतें. तेथे त्यांची मुद्रा (= शिक्का) आपणास दिसते. आणि मजकुरावरून शिवाजीराजांच्या कारभारांत सोळाव्या वर्षीच दिसणारा न्यायाचा कडकपणा आणि प्रजेबद्दलचा कनवाळूपणा या गोष्टींचा प्रत्यय येतो. या मुद्रेचें उपलब्ध झालेलें हें पहिलें पत्र आहे. ही मुद्रा राज्याभिषेकानंतरहि तशीच चालू राहिली. आरंभापासून अखेरपर्यंतच्या शिवछत्रपतींच्या सर्व उद्योगांची साक्ष आणि सार तिच्यांत आहे.



महाराजांची 'मुद्रा' आणि 'मर्यादा'

प्रतिपच्चंद्र

मुद्रा : लेखेव वर्धिष्णुर्वि
श्ववंदिता ।। शाहसू
नोः शिवस्यैषा मु ।
भद्राय राजते ।।†

मर्यादा : मर्या । देयं विरा । जते


'प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुः' (= प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे हळूहळू क्रमाने वाढणारी) व 'विश्ववंदिता' (= विश्वाने वंदिलेली) या

† नव्या महाराष्ट्र राज्याच्या (इ. १९६० मे १) मुद्रेचें छत्रपतींच्या या मुद्रेशीं असलेलें साम्य सहज ध्यानांत येतें.

शब्दांतील काव्य आणि सूचकता पाहून विचारी माणूस चकित होतो. शिवाजीराजांच्या आणि त्यांच्या सवंगड्यांच्या मनापुढे केवढें नैतिक लक्ष्य आणि राजकीय आदर्श उभा होता! त्या काळांत अशा मुद्रा फार्सी लिपींत कोरलेल्या असत. खुद्द शहाजीराजे आणि मातुश्री जिजाबाई यांच्याहि मुद्रा फार्सीच होत्या. पण शिवाजीराजांची ही अष्टकोणी मुद्रा मात्र देववाणी संस्कृत आहे! ही मुद्रा प्रथम ज्या मुलखांत सुरू झाली तो प्रदेश स्वराज्याचें मूलस्थान म्हणून गौरविला पाहिजे.

शिवाजीराजांकडे शहाजीने दिलेल्या खेडेबारें तर्फेतील रांझें या गावाच्या बाबाजी गुजर पाटलाने अनीतीचें वर्तन केलें. म्हणून त्याची वतनी पाटिलकी जप्त करून शिवाजीने त्याचे हातपाय तोडण्याची शिक्षा दिली. त्याबद्दलचें हें पत्र आहे. शिक्षेमुळे बाबाजी अपंग झाला. पण त्याचे कुळांतला सोनजी गुजर हा त्याचें पालन करायला उभा राहिल्याबरोबर शिवाजीराजांनी मेहेरबान होऊन सोनजी गुजरास बाबाजी गुजराची पाटिलकी दिली. अशा रीतीने निग्रह म्हणजे दंड आणि अनुग्रह म्हणजे कृपा ह्या राजसत्तेच्या दोन्ही शक्ति शिवाजीने जनतेच्या प्रत्ययाला आणून दिल्या आणि तिचा आदर व विश्वास संपादन केला.

अशा प्रकारें दादाजी कोंडदेव शिवाजीराजांना संधी देत होता. प्रथम इ. १६३६ सालीं पुण्याच्या आसपासच्या कर्यात मावळचा पोटमोकासा राजांच्या नांवें झाला. पुढे इ. १६३९ सालीं चाकण परगणा त्यांच्या नांवाने केला. इ. १६४५ सालीं इंदापूरचा अंमलहि कांही सोयीने त्यांना दिला गेला. आणि आता सांगितलें तें अभिनव मुद्रेचें पहिलें पत्र कर्यात मावळला लागून कात्रज घाटाच्या पलीकडील खेडेबारें या छोट्याशा प्रदेशांत इ. १६४६ च्या जानेवारींत प्रगट झालेलें आहे. ह्या भाग्याच्या



स्वराज्याच्या आरंभभूचें स्मारक
(चेलाडी बनेश्वर)

गौरवाकरिता वनेश्वरनजीक चेलाडी येथे पुणें-सातारा रस्त्यावर शिवाजी महाराजांनी घेतलेल्या स्वराज्याच्या शपथेच्या तीनशे वर्षांच्या स्मृति-दिनानिमित्त म्हणून एक स्मारक-स्तंभ उभारलेला आहे (इ. १९४६). त्याचें दर्शन स्फूर्तिदायक झाल्याशिवाय राहणार नाही.

या व नजीकच्या मुलखांत बंदोबस्ताचें काम चाललें होतें. शिवाजीच्या वतीने अनेक डोंगर आणि पडीत असलेले किल्ले दुरुस्त करून ताब्यांत घेण्यांत आले. पण आठदहा वर्षांपूर्वी शहाजीवर सोपवून दिलेल्या भागांत आवश्यक ती सुव्यवस्थाच चाललेली आहे, असा त्याचा अर्थ करून घेतां येत होता. पण जेव्हा आदिलशाहीच्या अधिकाराच्या कक्षेंतील सिंहगडालाच शिवाजीराजांनी हात घातला तेव्हा विजापूर दरबाराचें मनःस्वास्थ्य बिघडलें, आणि फिरून एकवार शहाजीवर दरबाराच्या इतराजीची व कैदेचीहि पाळी आली.

अधिकारीपण हातीं घेतलें

दादाजी कोंडदेव शहाजीचा वहिवाटदार होता. त्याप्रमाणेच तो विजापूर दरबारचा किले कोंडाणा (= सिंहगड) व महालानिहाय (= इतर सर्व महाल) यांवरील सुभेदार नामजाद (= नेमलेला) होता, हें पूर्वी सांगितलेंच आहे. हीं दुहेरीं कामें दादाजीच्या मरणापर्यंत सुखाने चाललीं. पण तो इ. १६४७ मार्च ७ ला मरण पावला. तेव्हा विजापूर दरबारने त्याच्या जागीं नवा अधिकारी नेमला पाहिजे आणि शहाजीनेहि नवा वहिवाटदार पाठविला पाहिजे अशी वेळ आली. तेव्हा शहाजीचा वहिवाटदार म्हणून शिवाजीराजे आपोआप पुढे झाले. इतकेंच नव्हे तर, यापुढे दादाजीसारखा सहानुभूतीचा दरबारचा अधिकारी येणें शक्य नव्हतें, यामुळे दादाजीचें उरलेलें आदिलशाही दरबाराच्या अधिकारीपणाचें दुसरें कामहि त्यांनी आपल्या हातांत घेतलें. आणि मुख्य म्हणजे खेडेबाऱ्याच्या देशपांडे घराण्यांतील पुण्याचा हवालदार बापूजी मुद्गल नऱ्हेकर आणि सिंहगड किल्ल्याचा हवालदार सिद्दीअंबर या स्नेहाच्या माणसांच्याकडून तो किल्ला त्यांनी मिळविला आणि एका अर्थाने स्वराज्याचें तोरण सिंहगडावर बांधलें.

याच सुमारास शक १५६९ च्या दिवाळींत त्यांनी पुरंधर किल्लाहि घेतला (इ. १६४७ ऑक्टो. १९), तो प्रकार असा—पुरंधरचा किल्लेदार

निळो 'नीळकंठराव' ('नीळकंठराव' ही पदवी आहे) शहाजीचा स्नेही होता. मध्यंतरींच्या अस्थिरतेच्या कालांत तो पुरंधर किल्ला बळकावून बसला व कोणाला मोजीनासा झाला. एका म्यानांत दोन तरवारी नकोत. आपल्या भागांत दुसरा कोणी जबरदस्त राहूं देणें बरें नाही, हें ओळखून शिवाजीराजांनी त्या कुटुंबांतील तिघा भावांच्या गृहकलहाचा फायदा घेण्याचें ठरविलें. दिवाळीच्या सणाच्या निमित्ताने त्यांनी सैन्यासह किल्ल्यांत प्रवेश मिळविला आणि तिघाहि भावांना कैद करून किल्ल्यावर आपला ताबा बसविला. चौथे दिवशीं राजांनी त्यांना मोकळें केलें. चांबळी गाव इनाम दिला; व वस्त्रें देऊन त्यांचें समाधान केलें आणि पूर्वींच्या स्नेहसंबंधांत कोणत्याहि प्रकारें कमीपणा येऊं दिला नाही. हे सलोख्याचे संबंध पुढेहि कायम टिकले. या पुरंधर किल्ल्यावरून लढूनच वर्षाच्या आंत आलेली फत्तेखानाची स्वारी राजांनी परतवून लावली.

एकापाठोपाठ दुसरा अशा रीतीने सिंहगड आणि पुरंधर असे दोन बुलंद किल्ले थोडक्या वेळांत घेणें हें आदिलशाही अधिसत्तेला सरळ सरळ आव्हान होतें. आणि यामध्ये असलेल्या धोक्याची कल्पना शिवाजीराजांना चांगली होती. ते आपल्या तरुणांच्या विश्वासावर विजापूरकरांविरुद्ध सैन्याच्या हालचाली करण्यास तयार राहिले होते. किंबहुना तशा हालचाली लहान प्रमाणावर त्यांनी आधीच करून पाहिल्या होत्या.

पराक्रमाची कसोटी

किल्ल्यांच्या अधिकाऱ्यांनी आदिलशाहीची इतराजी होण्याचा धोका असूनहि शिवाजीराजांना अनुकूल होण्याचें पत्करलें, याचें कारण त्या दोन तीन वर्षांच्या हालचालींत दिसून आलेला राजांचा पराक्रमच होय. अशा प्रकारच्या इ. १६४५ ऑगस्टच्या पहिल्या मोहिमेचा उल्लेख मागे (पृ. ३१) केलाच आहे. मध्यंतरीं केव्हा तरी आणखी एकदा शिवाजी-राजांना पराक्रम दाखविण्याचा प्रसंग आला होता. आदिलशाहीचा हस्तक म्हणून फलटणचा राजा निंबाळकर राजांना त्रास देऊं लागला. तेव्हा त्याच्यावर एकदम चाल करून जाऊन राजांनी त्याचा पराजय केला व तो पळून जाऊं लागला असतां त्याचा पाठलाग करून त्याला पकडून आणलें. शिवाजी महाराजांची आजी उमाबाई व त्यांची थोरली बायको

सईबाई या निंबाळकरांच्या घराण्यापैकी. पुढे सईबाईंची मुलगी सखूबाई ही देखील परत निंबाळकरांकडेच दिली गेली. असें फलटणकरांचें व राजांचें नातें असल्यामुळे त्यांनी त्याला लगेच सोडून दिलें. यानंतर तिसराहि तसाच प्रसंग लोकांनी पाहिला. शिवाजीराजांना जावळीच्या अत्यंत दुर्गम भागांत हातपाय पसरण्याची संधी मिळाली तेव्हा ती त्यांनी घेतली. कारण हा भाग शहाजीच्या जहागिरीला अगदी लागून होता. आणि ह्या जवळच्या भागांत दुसरा कोणी जबरदस्त होऊन त्याने आपल्याला शह द्यावा हें शिवाजीराजांना सोयीचें नव्हतें. या प्रदेशावर दौलतराव मोरे याचा अंमल होता. (या मोरे घराण्यास 'चंद्रराव' ही पिढीजाद पदवी होती.) दौलतराव मयत झाला तेव्हा शिवाजीराजांनी यशवंतराव मोरे नांवाच्या दत्तकाला हातीं धरून त्याला तेथील अधिकार मिळवून दिला. आणि अशा रीतीने लगतच्या जावळीवर आपल्या वगीचा मनुष्य स्थापन केला.

यांपैकी पहिल्या प्रसंगांत घोरपडे सरदारांना साह्य करण्याचें काम कान्होजी जेधे या शेजारच्या देशमुखावरच विजापूरकरांनी सोपविलें होतें. कान्होजी मनांतून भोसल्यांचा पक्षपाती होता. त्यामुळे घोरपड्यांच्या स्वारींत राजांना अपेक्षेबाहेर यश आलें. अंगावर सळसळत येणाऱ्या चवताळलेल्या 'नागाप्रमाणे भयंकर घोरपड्यांना, शिवाजी गारुड्याला पाहून' माघार खावी लागली असें त्या प्रसंगाचें बहारदार वर्णन परमानंद कवीने केलें आहे. दुसऱ्या प्रसंगांतील फलटणकर हे मातबर सरदार असल्यामुळे तेंहि यश दुर्लक्ष करण्यासारखें नव्हतें. परंतु या दोन्ही प्रसंगांपेक्षा आदिलशाहीला विशेष बोंचला तो तिसरा प्रसंग. आपल्या जहागिरीबाहेर पाऊल टाकून बंडखोर शिवाजीराजांनी तेथे आपल्या वगीचा मनुष्य स्थापन करणें, ही आदिलशाहीला नामुष्कीची गोष्ट होती. तेव्हा राजांनी बसविलेला चंद्रराव काढून टाकून तेथे आपल्या तर्फेचा अधिकारी पुन्हा आणून बसविणें आदिलशाहीला भाग होतें. आणि ही कामगिरी साहजिक ज्याच्या अधिकारांत जावळीचें खोरें होतें त्याच्याकडे,

म्हणजे वाईचा सुभेदार अफजलखान याच्याकडे येणें क्रमप्राप्त होतें. इ. १६४९ च्या दसऱ्यानंतर राजांवर स्वारी काढण्याची जुळवाजुळव तो जुलै ते सप्टेंबर या आधीच्या तीन महिन्यांत करीत होता. परंतु याच्या मागच्याहि दसऱ्याला अशीच एक आदिलशाही स्वारी महाराजांवर आली होती आणि तींतहि ते स्वपराक्रमाने शत्रूला भारी झाले होते, ती हकीकत आता सांगितली पाहिजे.

भोसले घराण्यावर दुसरी मोहीम

खुद्द शहाजीबद्दल आणि शिवाजीराजांबद्दल विजापूर दरबाराला अविश्वास वाटूं लागला. त्यामुळे शहाजीच्या एकंदर घराण्याविरुद्धच त्याने मोहीम सुरू केली. तींतील ही दुसरी स्वारी (पहिली इ. १६४५, पृ. ३१) एकंदरींत अधिक स्फोटक आणि शिवाजीराजांची नाना प्रकारांनी कसोटी पाहणारी ठरली. शहाजीला 'फर्जंद' म्हणजे पुत्र असें गौरवाचें पद बहाल करून त्याला खूष करण्याचा प्रयत्न यशस्वी होत नाही; तो कर्नाटकाकडील हिंदु राजांना दरबाराविरुद्ध मदत करतो; स्वतः स्वतंत्र व्हायला पाहतो आणि त्याच उद्देशाने पुण्याकडील जहागिरींत आपल्या मुलाकडून बंडखोरी करवितो. अशा अनेक प्रकारें आदिलशाही सरदार शहाजीविरुद्ध चुगल्या करीत. खरी गोष्ट अशी होती की, आदिलशाहीच्या नोकरींत शहाजीला समाधान वाटत नव्हतें. इ. १६४७ डिसेंबर २३ रोजीं आपण आदिलशाही सोडून कुतुबशाहींत येतों असें आपल्याला शहाजीने पत्र पाठविल्याचें गोवळकोंड्याच्या खुद्द अबदुल्ला कुतुबशहाने (१६२६–१६७२ इ.) विजापुरांतल्या आपल्या वकिलामार्फत आदिलशहाला कळविलें. त्यामुळे त्याच्याविरुद्ध तक्रारीला पुष्टिच मिळाली. आदिलशाहींतील प्रमुख विरोधी मुस्ताफाखान याने जिंजीनजीक शहाजीला विश्वासघाताने कैद केलें. पराक्रमी शहाजीचा सरळ युद्धांत पराजय करणें शक्य नव्हतें. म्हणून त्याच्यावर मुस्ताफाखानाने कपटाचा प्रयोग केला. पूर्वीप्रमाणेच किंबहुना अधिकच आस्थेवाईकपणें त्याचा सल्ला वगैरे घेण्यांत अगत्य दाखवून मुस्ताफाखानाने त्याला संशय येऊं दिला नाही व एके दिवशीं पहाटे तो व त्याचें सर्व सैन्य झोपेंत असतांना त्याच्या छावणीला वेढा घातला. बेसावध असल्यामुळे शहाजीकडून प्रतिकार होऊं शकला नाही. खुद्द शहाजी व मुधोळकर बाजी

घोरपडे यांची चकमक झाली. शहाजी थकून पडल्यामुळे पकडला गेला (इ. १६४८ जुलै २५). शहाजीला कर्नाटकांत कांही महिने कैदेंत ठेवल्यावर पुढे त्याला पायांत बेड्या घालून अफजलखानाने विजापुरास नेऊन पोंचविलें. तोंपर्यंत इ. १६४९ चा मार्च उजाडला.

शहाजीची अशी अप्रतिष्ठा करून विजापूरकर थांबले नाहीत. तर इ. १६४८ च्या दसऱ्याच्या मुमारास शहाजीची बंगरूळकडील जहागिरी संभाळणारा मुलगा संभाजी आणि पुण्याकडील जहागिरी संभाळणारा मुलगा शिवाजी या दोघांवरहि आदिलशाहाने स्वाऱ्या पाठविल्या. परंतु दोघांनीहि त्यांना चांगल्या तयारीने तोंड देऊन त्या मोडून काढल्या.

या प्रकरणांत बाजी घोरपडे आणि अफजलखान या दोघांच्याहि दुष्टपणाचा स्वतः शहाजीला व त्याच्या जिव्हाळ्याच्या माणसांना जो अनुभव आला तो विसर पडण्यासारखा नव्हता. आणि या दोघांनाहि या पापाचें प्रायश्चित्त शिवाजी महाराजांनी आठवण ठेवून पुढे आपल्या स्वतःच्या हाताने दिलें, हा योगायोग ध्यानांत ठेवण्यासारखा आहे (अफजलखान–इ. १६५९ नोव्हेंबर १०; बाजी घोरपडे–इ. १६६४ ऑक्टोबर-नोव्हेंबर).

विजापूर दरबाराशीं पहिली दांडगाई

स्वारी आली तेव्हा शिवाजी महाराज पुरंधर किल्ल्याच्या आश्रयाने मोठ्या बंदोबस्ताने राहात होते. म्हणजे पुरंधर किल्ला हाच त्यांना या वेळीं राजधानीसारखा उपयोगी पडला. शिवाजीवर चालून आलेल्या आदिलशाही सरदाराचें नांव होतें फत्तेखान; पण त्याची फत्ते न होतां तो अपयशच घेऊन गेला. त्याने प्रथम खळदबेलसर हस्तगत करून तेथे छावणी केली व तेथून बाळाजी हैबतराव या सरदारास पुढे रवाना केलें. शिरवळला आदिलशाही सरकारच्या अमीनाचें ठाणें होतें. तेथपर्यंत हैबतराव सहज आला. पण त्यानंतर महाराजांनी जोराचा प्रतिकार केला. गोदाजी जगताप, भिमाजी वाघ, संभाजी काटे, शिवाजी इंगळे, भिकाजी चोर, पोळ, घाटगे असे मराठे सरदार व सैनिक कावजी मल्हार याच्या आधिपत्याखाली आवशीस पुरंधर गडावरून उतरले. रात्रीं ते पायथ्याशीं राहिले. तेथून ते पहाटे पुढे निघाले आणि उजाडण्यापूर्वी ८ मैलांवरील शिरवळला पोंचले. ते आलेले पाहून आदिलशाही सेनापति बाळाजी हैबतराव याने आपलें सैन्य

गढींतच बसविलें. शिवाजीराजांचा सेनापति कावजी पुढे आला व त्याचे लोक तटापर्यंत भिडून त्यांनी बाणांनी तटावरून डोकावणाऱ्या लोकांचीं डोकीं उडविलीं. चाकें, नांगर, मुसळें, कोलितें, खैराचे निखारे यांचा मारा किल्ल्यांतून होत होता. त्याची परवा न करतां कावजीच्या सैनिकांनी मातीचा तट खणून काढला, खिंडारें पाडलीं, शिड्या लावल्या आणि किल्ल्यांत प्रवेश केला. त्या हातघाईच्या लढाईत बाळाजी हैबतराव ठार झाला व शिरवळचा किल्ला महाराजांना मिळाला. लुटींत मिळविलेली मालमत्ता कावजीने पुरंधरावर नेऊन महाराजांच्या पुढे ठेविली. सूर्योदया-पासून रात्र पडेपर्यंत ही खणाखणीची लढाई चालू होती.

शिरवळच्या पराजयाचें उट्टें काढण्याकरिता मुख्य सेनापति फत्तेखान दुसऱ्याच दिवशीं पुरंधरच्या पायथ्याशीं आपलें सैन्य घेऊन दाखल झाला. शिवाजीराजांना त्याचा अंदाज होताच. त्याला तोंड देण्यासाठी त्यांचें सैन्य सज्ज होऊन राहिलें होतें. रणशिंग फुंकून मराठ्यांचें सैन्य गडावरून बाहेर पडलें. फत्तेखानाचें सैन्य गड चढूं लागलें. त्याच्या पिछाडीस स्वतः फत्तेखान, आघाडीस मुसेखान, डाव्या बगलेस फल्टणचा राजा निंबाळकर आणि उजव्या बगलेस घाटगे होता. मराठे सैनिकांनी बंदुकीच्या गोळ्या, गोफणगुंडे आणि मोठ्या शिळा यांचा मारा करून चढणाऱ्या सैन्याला बेजार केलें. त्यांतून जे वर आले त्यांचा समाचार पायदळाने घेतला. आदिलशाही सैनिकांची दैना उडाली व ते पळत सुटले. त्यांना थोपवून धरून गडावर प्रतिहल्ला करण्याचा फत्तेखानाने प्रयत्न केला; पण तो यशस्वी झाला नाही. या हातघाईत मुसेखान मारला गेल्यामुळे घाटगे, शेख व शेवटीं फत्तेखान यांसहि पळ काढावा लागला. उत्साहाच्या भरांत शिवाजीराजांच्या तरुण अनुयायांनी शत्रूचा बेलसरच्या छावणीपर्यंत पाठलाग केला. या पाठलागांत एका वेळीं मराठ्यांचें निशाण धोक्यांत सांपडावें असा एक बांका प्रसंग आला होता; पण सुदैवाने तो टळला आणि झालेला युद्धप्रसंग सर्व तऱ्हांनी महाराजांना अभिमानास्पद ठरला. बलाढ्य दरबाराशीं झालेली समोरासमोरची अशी ही पहिली लढाई होती. आपण चाल करून, वेढा घालून किल्ला हस्तगत करणें आणि स्वतःच्या किल्ल्यावर मोठें सैन्य चालून आलें तरी देखील दाद न देणें, असा उभय प्रकारचा पराक्रम शिवाजी महाराजांच्या अनुयायांनी गाजविला.

महाराजांच्या लोकांच्या पराक्रमाचें येथे किंवा अन्य कोठेहि वर्णन वाचतांना एक गोष्ट वाचकांच्या सहज ध्यानांत येते ती ही की, महाराजांच्या सैनिकांना शत्रु म्हणून ज्यांच्याशीं लढावें लागलें त्यांमध्ये बरेचसे सेनापति आणि सैनिकहि मराठे व हिंदूच आहेत असें आढळतें.

आतापर्यंत आपण पाहिलें त्यांमध्ये राजांच्या आजीच्या माहेरघराण्यांतील निंबाळकर, घोरपडे, मोरे, खळदबेलसरच्या लढाईतील बाळाजी हैबतराव, पुरंधरच्या चढाईतील घाटगे आणि यानंतरच्याहि अनेक स्वाऱ्यांतील दळवी, सुर्वे, सामंत, भोसले, हे परकी शाह्यांच्या बाजूने लढणारे राजांचे सारे शत्रु खानदानीचे मराठेच होते. या सर्वांचे हितसंबंध चालू मुसलमानी राजसत्तेमध्ये गुंतलेले असल्यामुळे ते शक्य त्या प्रकारें शिवाजीराजांच्या स्वतंत्र राज्यस्थापनेच्या प्रयत्नाला विरोधच करीत राहिले; हें मानवी स्वभावाला धरून नाही असें मुळींच म्हणतां येणार नाही. या बाबतींत इतिहासाची पुनरावृत्ति नेहमी होत आलेली आहे.

एकट्याचें नियोजन

शहाजी कैदी म्हणून विजापूरला जाऊन पोंचेपर्यंत त्याच्या दोन्ही मुलांविरुद्ध केलेल्या युद्धाचा निर्णय सर्व प्रकारें आदिलशाहीला प्रतिकूल लागला. आणि बंदिवास भोगत असतांनाहि शहाजी महाराजांना आपल्या मुलांच्या पराक्रमाची वार्ता ऐकून कारावासाचे कष्ट कमी वाटले. भोसले बंधूंच्या या पराक्रमामुळे आणि मोगलांचा सुभेदार शहाजादा मुरादबक्ष याजकडे शिवाजीराजांनी लावलेल्या राजकारणाचा परिणाम म्हणून देखील असेल, विजापूरच्या सुल्तानालाहि आपल्या धोरणाचा फेरविचार करून शहाजीला सामोपचाराने वागविणें भाग पडलें; व अशा तेजस्वी घराण्याला न दुखविणें इष्ट वाटलें. त्यामुळे शहाजीस साध्या अटकेंत ठेवण्यांत येऊन थोडक्या दिवसांत वजिरीचीं वस्त्रें, पूर्वीचीच जहागीर आणि ' महाराज ' हा बहुमानसूचक किताब देऊन इ. १६४९ मे १६ ला त्याची सुटका झाली. मात्र त्याने सिंहगड, बंगरूळ आणि त्याच बाजूचा कंदर्पी हे तीन किल्ले आपल्याला द्यावे अशी आदिलशाहाने अट घातली. आदिलशाहीच्या मनाला टोचणारें खरें शल्य कोणतें होतें तें यावरून कळलें आणि हे किल्ले मिळविण्यासाठीच इ. १६४५ पासून बहुतेक प्रत्येक दसऱ्यानंतर विजापुराहून

स्वारी येई. आदिलशाहीशीं हळूहळू बिघडत चाललेले संबंध आताच या वेळीं हे किल्ले देण्याचें नाकारून कडोविकडीला येऊं द्यावयाचे किंवा कसें हें ठरविण्याचा हा प्रसंग होता. आणि ते संबंध आताच आणखी बिघडविणें इष्ट नाही असें दूरदर्शीपणाने ठरवून शहाजीच्या दोन्ही मुलांनी वडिलांची आज्ञा पाळली व ते किल्ले आदिलशाहाला देऊन टाकले.

बंगरूळ व कंदर्पी यांची गोष्ट थोडी निराळी होती. ते दोन किल्ले म्हणजे शहाजीची आदिलशाहींतील बक्षिसी होती. परंतु सिंहगड ही शिवाजीराजांची कमाई होती. त्याबद्दल त्यांच्या भावना आणि मनोराज्य वेगळें होतें. राजांच्या मनाला तो किल्ला देऊन टाकतांना फारच कष्ट पडले. आदिलशाहीविरुद्ध आपण सिंहगड लढवूं असा आत्मविश्वास त्यांना आलेला होता. परंतु सभोंवतालच्या शत्रूपुढे कधी माघार घ्यावी लागूं नये म्हणून आपलें सामर्थ्य अजून वाढविलें पाहिजे, ही जाणीव त्यांना ह्या प्रसंगाने झाली.

हा प्रसंग घडला तेव्हा दादाजी कोंडदेव मार्ग दाखविण्याला हयात नव्हता. शहाजी दूर कर्नाटकांत स्वतः कैदेंत होता. वडील भाऊ संभाजीहि परमुलखांत म्हटला पाहिजे. एकमेकांच्या सल्लामसलतीचा लाभ घेतां येणें शक्य नसतां भोसले कुळांतील या तिन्ही कर्त्या पुरुषांचें वागणें एकरूप दिसतें. या गोष्टीचें महत्त्व विसरतां कामा नये. या वेळीं शिवाजीराजांनी केवळ एकट्याने ठरविलेले निर्णय, केलेल्या योजना आणि पार पाडलेले बेत खास कौतुकास्पद आहेत.

शिवाजीराजांनी या वेळीं लढविलेल्या राजकारणांत दक्षिण जिंकण्याच्या महत्त्वाकांक्षेने भारलेल्या मोगल सत्तेचाहि उपयोग करून घेण्याची अगदी आगळी चतुराई दिसून येते. राजांना नुकतींच वीस वर्षें होणार होतीं. अशा वेळीं त्यांच्या राजकारणाच्या पटावर जिच्याशीं त्यांना पुढे आमरण झगडावें लागलें, त्या मोगल सत्तेचा प्रवेश झाला.

मोगल सत्तेचेंहि लक्ष शहाजी महाराजांच्या इ. १६३६ नंतरच्या हालचालींकडे, त्यांच्या आताच्या कैदेकडे आणि एकंदरींत भोसले घराण्याच्या आदिलशाहीसंबंधीच्या बंडखोर वागणुकीकडे वेधलें होतें. त्या गोष्टींचा उपयोग करून घेण्याचें मोगलांच्या मनांत नसेल असें नाही. परंतु तेवढें स्वास्थ्य तरी त्यांना मिळालें नसावें किंवा दक्षिणेंत इतक्यांत ढवळाढवळ करावयाची नाही याबद्दल तहामुळे आलेलें बंधन पाळावयाचें

तरी शहाजहानाने (१६२७–१६५८ इ.) ठरविलें असावें. त्या वेळीं दक्षिणेचा सुभेदार राजपुत्र मुराद हा होता. बापाची कैदेंतून मुक्तता होण्याच्या कामीं आणि शहाजी महाराजांचे पूर्वींचे मोगलांशीं आलेले व नंतर दुरावलेले संबंध सुधारण्यासाठी, मुरादच्या वजनाचा उपयोग करून घ्यावा अशी कल्पना सहज शिवाजीराजांच्या मनांत येऊन गेली. त्यांनी मुरादच्या भेटीची उत्सुकता दर्शविली. मुरादनेहि त्यांना भेटीला बोलाविलें आणि सुरक्षित भेटीच्या खातरजमेचें पत्र घेऊन जाण्यासाठी वकील पाठवून देण्यास लिहिलें.

यासंबंधांत शिवाजीराजांनी जलदीने असें कांहीच केलें नाही. इकडे एकदोन महिन्यांतच (मे १६) शहाजीच्या बेड्या काढण्यांत आल्या आणि त्याच्या कैदेपुरता प्रश्न मिटला. शहाजीवरील संकट टळण्याला मुरादबक्षाचा या वेळीं उपयोग झाला नाही. कारण शिवाजीराजांचें पहिलें पत्र तेवढें त्याला मिळून पुढील गाठीभेटीचा विचार वकिलामार्फत होत होता. राजांशीं त्याचीं भेटीचीं बोलणीं होत आहेत एवढ्या बातमीनेच कांही परिणाम झाला असल्यास ती गोष्ट वेगळी. शहाजीच्या सुटकेनंतर तीन महिन्यांनी, ऑगस्ट १४ तारखेला, शिवाजीराजांनी मागितलेलें त्यांच्या मुरादशीं सुरक्षित भेटीचें खातरजमेचें मुरादबक्षाचा पंजा उठविलेलें निशाण (= पत्र) तयार झालें. आणि त्यानंतर आणखी अडीच महिन्यांनी मुरादने शहाजीला पत्र पाठवून त्याच्याहि वकिलाला बोलाविलें (ऑक्टोबर ३१). त्या पत्रांत 'आपण तुमची मोकळीक करण्याविषयीं लिहिलें आहे' असें प्रथम म्हटलें आहे. पण याच वेळीं आपण सुभा सोडून दिल्लीकडे जात असल्याचेंहि वर्तमान दिलें आहे. या सर्वांची गोळाबेरीज अशी की, शहाजीवरील संकटाच्या निमित्ताने राजांनी मोगलांशीं पत्रव्यवहार सुरू केला आणि सुभेदार मुरादबक्षाने त्यांना उत्तेजनहि दिलें. त्याचा फायदा घेण्याचें शिवाजी-राजांनी ठरविलें आणि त्यानंतर पांचसहा महिन्यांनी जुन्नर व अहमदनगर येथील देशमुखीची मागणी केली.

जुन्नर हें शिवाजीराजांचें जन्मस्थान होतें आणि पूर्वजांच्या पाटिलकीचीं गावें अहमदनगरच्या जवळपास होतीं. हे दोन्ही परगणे मोगलांच्या मुलखांत होते. तिकडे देशमुखीच्या रूपाने चंचुप्रवेश करण्याचा शिवाजीराजांचा

बेत अनेक दृष्टींनी महत्त्वाचा होता. मुरादबक्ष उत्तरेकडे निघून गेल्यामुळे या वेळीं तो साधला नाही. तरी देखील या संबंधांतील पत्रव्यवहार पाहतां मोगल सत्तेलाहि शिवाजीराजांशीं सामोपचाराने बोलणें इष्ट वाटूं लागलें होतें हें स्पष्ट होतें. शिवाजीराजांची योग्यता आणि त्यांचें वाढतें सामर्थ्य मोगलांनी जाणलें, हें त्यांच्या राजकीय दूरदृष्टीचें उत्तम उदाहरण म्हणतां येईल.

शहाजीच्या या बंदीवासाच्या प्रकरणांतून यापुढे फारसे बिकट प्रश्न उत्पन्न झाले नाहीत. कारण शहाजीला अनुकूल असा पक्ष त्यानंतर विजापूर दरबारांत अधिकारावर आला आणि त्यामुळे शिवाजीराजांना यापुढील पांचसहा वर्षे, आपल्या मनांत आकार घेणाऱ्या स्वराज्याचा आंतून विकास करण्याच्या उद्योगांत घालवितां आलीं.

* * *

देशमुखीची मागणी

(फारसीचें भाषांतर)

" जुन्नर व अहमदनगर येथील देशमुखीविषयीं लिहिलें. त्यास, आम्हीं हुजूर गेल्यानंतर हा मजकोर घडोन येईल. खातरजमा ठेवावी. आपणाकडील एक वकील पाठवून द्यावा. मजकूर समजून घेऊन अमलांत येईल. वकिलास जो मजकूर विचारूं त्याचें उत्तर द्यावें. म्हणजे काम होण्यास दिरंग लागणार नाही. "

मुरादबक्षाचें शिवाजीराजांस पत्र, इ. १६४९ नोव्हें. ३०.

५ विकासाचा संधिकाल

वैयक्तिक जिव्हाळा

शिवाजीराजांनी लोकांमध्ये मिळून मिसळून सर्वत्र स्नेहाचें वातावरण उत्पन्न केलें होतें. यामुळे शिवाजीने मागावें आणि आपण द्यावें अशीच भावना वाढत होती. प्रसंगीं मारामारीचीहि जरूरी पडे. अशाच एका प्रसंगीं बापूजी हैबतराव, आबाजी हैबतराव व बाळाजी नाईक सिलिंबकर या देशमुखांच्या सर्व कुटुंबाने इ. १६५० मध्ये आपल्या जमेतीनिसी साहेबाचे मसलतेस (= युद्धासाठी) येऊन एकतारी (= पराक्रम) केली. असें अनेक वेळ अनेकांकडून घडे. आणि सिलिंबकरांना चिंचली गाव इनाम देऊन त्यांच्या निष्ठेचें कौतुक शिवाजीराजांनी केलें, तसें त्या इतरांचेंहि होई. राज्य लहान असल्यामुळे वैयक्तिक जिव्हाळयाचे संबंध सर्वांशीं संभाळण्यांत येत. भोसले यांच्याशीं सलोख्याने नांदणारे व पुरंधर ताब्यांत घेतांना चांबळी गाव इनाम देऊन सुस्थिर केलेले नीळकंठराव वारले. त्याबरोबर शिवाजीने त्याची बातमी शहाजीकडे पाठविली व तिकडून दुखवट्याचीं वस्त्रें व पत्र पाठवविलें (इ. १६५४ मे २३). त्यांच्या मुलांमाणसांना तुमचें पूर्वीप्रमाणे चालविण्यांत येईल असें आपणहि इमान दिलें (इ. १६५४ ऑगस्ट); पण त्याच वेळीं 'तुम्हांपासोन इमानांत अंतर पडलिया आमचाहि इमान नाही' असा रोखठोक इशारा दिला. म्हणजे घरोब्याच्या जिव्हाळयाला राज्याधिकाराच्या शिस्तीची साथ दिली. हें न पाहवून विकृत अपप्रचाराने लोकांना बिथरविण्याचा उद्योग हितशत्रू करायचेच. 'तुमची देशमुखी शिवाजी घेईल' ही त्यांतली सर्वांत मोठी आणि सहज मनें बिथरविणारी भीति. ज्यांना चिंचली गाव इनाम दिलें होतें ते हैबतरावच अशा बदसल्ल्यामुळे भयभीत झाले. त्यांना खुद्द महादेवाची व आईसाहेबांची आण घेऊन शिवाजीराजांनी 'तुम्हांस साहेब (= शिवाजी) घरिच्या लेकरासारिखे जाणिती' असें आपलेपणाने

आळविलें. पण त्याच पत्रांत 'अवांतरहि लोक अशा प्रकारें लोकांनी भेडसावले असतील ते आम्हांस भेटवणें' असे शब्द लिहून (इ. १६५५), आता आपण बहुतांची चिंता वाहण्याचें व्रत स्वीकारलें आहे, आपल्या राज्यसाधनेचा विकास तेथपर्यंत झाला आहे, याची लोकांना ग्वाही दिली.


माउलीचें मार्गदर्शन

दादाजी कोंडदेवाच्या मृत्यूमुळे रिकामें झालेलें स्थान मातुश्री जिजाऊ-साहेबांनी भरून काढलें. कांही पत्रें त्याची खात्री पटवितात. 'चिरंजीव राजश्री राजे यांचें पत्र आलें तरीहि इनाम अमानत (= तहकूब) न करिता पूर्वीप्रमाणे चालू ठेवणें' अशी जिजाबाई इ. १६५१–५२ मध्ये आज्ञा करिते आणि खुद्द शिवाजीराजे 'मातुश्रीने इ. १६५३ सालीं जेजुरी येथील गुरवांच्या मिराशीच्या तंट्यांत दिलेला निवाडा अमलांत आणावा' म्हणून कौलनामा देतात. मायलेकरांची ही जोडी परस्परांना साजेशी होती. दोघांनाहि याची जाणीव होती, हें ह्या तऱ्हेच्या कारभारांतील सहकार्यावरून दिसून येतें.


या सालीं उभयतांनी महाबळेश्वरचे गोपाळ भट बिन श्रीधर भट या अधिकारी पुरुषाकडून मंत्रोपदेश घेतला व त्याला सूर्याचें अनुष्ठान सांगितलें. तसेंच चाकणचे सिद्धेश्वर भट ब्रह्मे यांस त्या सुमारास वर्षासन करून दिलें. जिजाबाईच्या मार्गदर्शनावरून धर्माचें अधिष्ठान प्राप्त करून घेण्याची ही इच्छा सूचक आहे. ब्रम्ह्यांना लिहिलेल्या इ. १६५३ जुलै १७ तारखेच्या पत्रांतील 'स्वामीच्या अनुष्ठानबळे राज्यास अधिकारी झालों' हे शब्द महत्त्वाचे आणि सूचक आहेत. त्या काळांत जनतेच्या मनावर साधुसंत वगैरे धार्मिक पुरुषांचें विशेष वजन असे. ही वस्तुस्थिति लक्षांत घेतां, राजांनी ठिकठिकाणच्या सत्पुरुषांचा उपदेश ग्रहण केला किंवा त्यांचा यथायोग्य गौरव केला, यांतील लोकसंग्रहाचें उद्दिष्ट सहज समजण्यासारखें आहे.

शहाजीचें शेवटचें पत्र

दादाजी कोंडदेव हयात असतांना तो शहाजीचा नोकर म्हणून वागत असे. तो संबंध दादाजीच्या मरणाने संपला. त्यानंतर शिवाजीराजांनी पुण्याकडील कारभार मुखत्यारीने केला. तरी देखील कित्येक प्रसंगीं




शिवनेरी किल्ला : शिवाजी महाराजांचें जन्मस्थान



सिंहगड

सरदार तानाजी मालुसरे यांनी प्राणाचें मोल देऊन
जिंकून घेतलेला किल्ला – झुंजार बुरुजाकडील बाजू



राजगड : स्वराज्याची पहिली राजधानी
बालेकिल्ला – दर्शनीं सदर किंवा राजगादीचें ठिकाण

निर्णय मिळविण्यासाठी जहागिरींतील लोक शहाजीकडे धांव घेत. पण हेंहि पुढे बंद झालें. शहाजीचा शेवटचा हुकूम इ. १६५५ डिसेंबर ७ तारखेचा आढळतो. त्याच्यानंतरचा आढळत नाही. इ. १६३६ पासून सतत १९ वर्षें पिता व पुत्र दोघांनी मिळून पुण्याकडील जहागिरीचा कारभार केला, असें यावरून लौकिक दृष्टीने म्हणतां येतें. यापुढे शहाजीने लक्ष घालावयाचें सोडून दिलें. हाहि एक शिवाजीच्या विकासाचा महत्त्वाचा टप्पा म्हटला पाहिजे.

रोहिडा किल्ल्याचा देसाई केदारजी खोपडे आणि त्याचा भाईबंद खंडोजी खोपडे यांचा वाद होता. खंडोजीचा बंदोबस्त व्हावा अशासाठी आदिलशाहाने इ. १६५० त रोहिडा किल्ल्याच्या हवालदाराला एक फर्मान काढलें. त्यांत या संबंधांत 'शहाजी राजाने स्वतःचा मुलगा शिवाजी यास लिहिलें आहे,' असें आदिलशाहा सांगतो. तें फर्मान (भाषांतर) असें :— "या वेळीं माहीत झालें की, रोहिडा किल्ल्याचा देसाई केदारजी याचा भाऊबंद खंडोजी याने केदारजीवर चढाई करून त्याच्या आईस ठार मारलें. खंडोजी चिरंजीव शहाजीराजा याचे हिरडस मावळांत राहिला आहे. केदारजी निष्ठेने चाकरी करतो. त्यावर असा जुलूम होणें रास्त नाही. तरी हा कागद पोंचतांच खंडोजी जेथे असेल तेथे त्याला शिक्षा करावी. केदारजीस त्रास पोंचूं देऊं नये. त्याच्याकडून सरकारी काम करून घ्यावें व त्याचे हक्क त्याला भोगूं द्यावे. केदारजीस सर्व प्रकारची मदत करावी, त्यास कोणताहि त्रास देऊं नये अशा अर्थाची आज्ञा शहाजीराजाने स्वतःचा मुलगा शिवाजी यास लिहिली आहे. त्याने या बाबतींत कसूर न करतां लिहिल्याप्रमाणे अंमल करावा." या फर्मानावरून शिवाजीवर बापाचा अधिकार व वजन आहे असें आदिलशाहा मानतो, आणि त्यामुळे आपलाहि अधिकार चालवितो, हें उघड होतें.

पण इ. १६५५ च्या पुढे हें पितापुत्रांचें सहकार्य आदिलशाहाच्या दृष्टीने नष्ट झालेलें दिसतें. इ. १६५८ मे २७ ला अली आदिलशाहा शहाजीला लिहितो, "शिवाजीचा राजद्रोह आणि त्याचा उद्धटपणा हे तुमच्या माथीं मारले जातील म्हणून तुम्ही भयभीत झालां आहां, असें

बादशाहाला कळलें आहे. पण तुम्ही राजनिष्ठ आहां आणि शिवाजीचेंच वर्तन अयोग्य आहे हें बादशाहाला कळून आलें आहे. त्याच्या दोषांबद्दल तुम्हांला जबाबदार धरलें जाणार नाही. तुम्हांस मिळणारे सर्व मानमरातब व लाभ आम्ही चालवूं." शिवाजीच्या स्वतंत्र विकासाच्या दिशेची सुस्पष्ट जाणीव त्याच्या शत्रूला झाल्याचा हा निःसंदिग्ध पुरावा म्हणावा लागेल.

पुण्याकडील जहागिरीबद्दलचा म्हणजे घरगुती कारभाराचा हा विचार झाला. आता जहागिरीबाहेर शिवाजीचें बदलतें व वाढतें स्वरूप केव्हा आणि कसें दिसलें याचा उलगडा करावयाचा.

चंद्ररावाचें पारिपत्य

आदिलशाहाने शहाजीकडून फक्त सिंहगड हा ठाण्याचा किल्ला काढून घेतला, पण पुरंधर गड शिवाजीराजांकडे राहूं दिला (पृ. ४३). अशा रीतीने एक अधिसत्तेचा नाद सोडून देऊन जहागिरींत वाटेल तें करण्याचें स्वातंत्र्य शिवाजीराजांना राहिलें. राजांबद्दलचें हें आदिलशाहीचें धोरण इतर मातबर मराठा सरदारांशीं असलेल्या तिच्या नेहमीच्या धोरणाहून निराळें होतें असें नाही. महाराज त्यांत समाधान मानून राहिले असते, तर त्यांची प्रगति कर्नाटकांतील शहाजीच्या किंवा इतरांच्या वळणावर गेली असती. म्हणजे सरदारींत व वजिरींत ते रमले असते, आणि आदिलशाहीला तें मनापासून आवडलें असतें. पण राजांना तें मानवलें नाही.

शिवाजीराजांनी जहागिरीच्या बाहेर पाऊल टाकूं नये असा बंदोबस्त आदिलशाहाने लगेच केला आणि त्यासाठी नजीकच्या वाई प्रांताची सुभेदारी अफजलखान या अनुभवलेल्या सरदाराला दिली. शिवाजीराजांनी जावळीच्या गादीवर जो यशवंतराव मोरे बसविला होता (पृ. ३९) तो उखडून काढण्यासाठी अफजलखानाने इ. १६४९ च्या पावसाळ्यांत सैन्याची जमवाजमव चालू केली, हें मागे सांगितलेंच आहे. अफजलखानाने भोर तर्फेचे देशमुख कान्होजी जेधे यांना जावळींतल्या १८ दुर्गम खोऱ्यांपैकी जोहर नांवाचें एक खोरें मोकासा म्हणून दिलें. आणि त्यांच्याकडून महाराजांचा बंदोबस्त करविण्याचा घाट घातला. अफजलखानाच्या ह्या हालचालीचा हेतु प्रत्यक्ष नाही तरी अप्रत्यक्ष रीतीने साधला. ही

मोहीम पुढे झाली नाही. कारण आदिलशाहाचें वैर ओढवून घेण्यापेक्षा यशवंतराव शिवाजीराजांशींच शत्रुत्वाने वागूं लागला. राजांच्या प्रजेला त्रास देऊं लागला. राजांच्या मागे हा ससेमिरा लागल्याने अफजलखानाला या बाजूला तातडीचें काम राहिलें नाही. इ. १६५५-५६ मध्ये त्याला मध्यंतरीं विजापूर दरबाराने कर्नाटकांत कनकगिरीकडे नायब म्हणून नेमून पाठविलें. कारण महंमद आदिलशाहाच्या आजारामुळे तिकडेहि अंदाधुंदी माजली होती. तेव्हा स्वतःशीं शत्रुत्व करणाऱ्या चंद्ररावाचें पारिपत्य राजांना करणें भाग होतें, तें त्यांनी याच वेळीं केलें. आदिलशाहींतील बजबजपुरीचा चांगला लाभ करून घेतला.

प्रथम प्रथम यशवंतराव मोरे राजांशीं बरा वागला. पण त्यांचें अनुकरण करून स्वतःच स्वतंत्र व्हावें अशा आकांक्षेने त्यांच्याशीं स्पर्धा करण्याची दुर्बुद्धि त्याला झाली. कोठे राजांनी हाताशीं धरलेल्या सिलिंबकर देशमुखांशीं (स्वतःचे भाचेच!) गुंजण मावळच्या देशमुखीचा वाद उकरून काढ, कोठे राजांच्या मुलखांतील गुन्हेगारांना आश्रय दे, कित्येकांचे अधिकारीपणासारखे हक्क गिळंकृत कर, गुन्हेगारांचें पारिपत्य करण्याचें निमित्त करून राजांच्या मुलखावरच स्वारी कर, असा दांडगाईचा प्रकार त्याने सुरु केला. तेव्हा अगदीच शेजारीं शिरजोर होऊं पाहणाऱ्या चंद्ररावाचा बंदोबस्त केला नाही तर मग राज्य साधत नाही, याचा विचार शिवाजीराजांना करणें भाग पडलें.

जावळीचें राज्य देशावर जावळीच्या खोऱ्यांत आणि कोकणांत रायगड-पर्यंत पसरलें होतें. खुद्द जावळींत तशी मोऱ्यांची मंडळी पुष्कळ होती. त्या सर्वांवर जेधे, बांदल, सिलिंबकर वगैरे देशमुखांचा जमाव आणि संभाजी कावजी, रघुनाथ बल्लाळ सबनीस वगैरे स्वतःचे सेनापति यांची योजना करून राजांनी जावळी सर्व बाजूंनी वेढली. तेथे सहज महिना-पंधरा दिवस झुंज चालली. त्यांत आपलें बरेंच सैन्य व गोतांतील लोक मारले गेले असें पाहून यशवंतराव मोरे आपल्या बाजी व कृष्णाजी या दोन मुलांसह जावळी सोडून रायगड किल्ल्यावर आश्रयार्थ गेला आणि इ. १६५६ जानेवारी १५ ला जावळी खोरें राजांच्या हातीं आलें. जावळीमध्ये मार्च ३० पर्यंत अडीच महिने राजे राहिले; व तेथील व्यवस्था

लावून ते लगेच रायगड घेण्यासाठी त्या किल्ल्याकडे रवाना झाले. रायगड फार मजबूत आहे. 'रायगड तीन महिने चंद्ररायांही भांडविला.' परंतु राजांनी वेढा करून चालविल्यामुळे शेवटी चंद्रराव जेरीस आला. त्याचा भाचा सिलिंबकर देशमुख राजांच्या पक्षांत होता. त्याच्या मध्यस्थीने भेटी होऊन मोरे राजांच्या स्वाधीन झाला. आणि तीन महिन्यांपूर्वी जावळींत शिवाजीराजांनी ठाणें बसविलें त्याप्रमाणेच आता रायगड देखील सर केला (इ. १६५६ एप्रिल-मे).

शिवाजीराजांच्या मनांत चंद्ररावांचें उच्चाटण करावें असें नव्हतें. सात-आठ वर्षांपूर्वी स्थापित केला होता त्याप्रमाणे हस्तक म्हणून तो राहण्यास तयार झाला असता, तर जावळी त्याच्याकडेच ठेवावी अशा विचाराने मोरे यास त्यांनी मानाने वागविलें आणि त्याला बरोबर घेऊन ते पुण्याकडे आले. पण मुधोळकर घोरपड्यांशीं गुप्तपणें शिवाजीराजांविरुद्ध त्याने कारस्थान चालविल्याचें उघडकीस आलें. फितुरी करून कैदेंतून पळून जाण्याचा त्याचा प्रयत्न चालू झाला (इ. १६५६ ऑगस्ट २७). मग मात्र त्याला उघड दोष देऊन महाराजांनी त्याची गर्दन मारविली. आणि 'जावळीवरून मोऱ्यांचें स्थान भ्रष्ट झालें.'

जावळी घेतल्यावर तिचा स्वतंत्र सुभा राजांनी केला आणि त्यावर कृष्णाजी बाबाजी हा सुभेदार नेमला आणि विरो राम याला मुजुमदार केलें. त्यांनी लौकरच नव्या सुभ्यांत शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केली. राजांनी जावळी घेतली या गोष्टीचा बोलबाला फार झाला. कारण, जावळीचा चंद्रराव हें त्या वेळचें फार मोठें प्रस्थ होतें. महाराजांच्या स्वराज्याच्या विकासमार्गावरील एक टप्पा एवढें या पराक्रमाचें महत्त्व होय.

सरहद्द समुद्राला भिडली

शिवाजी महाराजांवर पुढच्या काळांत बरेवाईट अनेक प्रसंग आले. परंतु जावळी हातची गेली नाही. तिचें दुर्गम अरण्य व बिकट रचना लक्षांत घेऊन राजांनी मोरोपंत पिंगळ्यांकडून त्या भागांत सुप्रसिद्ध प्रतापगड किल्ला बांधविला आणि जेव्हा अफजलखान तीन वर्षांनी स्वारी घेऊन आला तेव्हा त्या माहितगार शत्रूला त्याच गडावर बोलावून त्यांनी साफ

बुडविलें. जावळीच्या यशामुळे मावळांच्या इतकाच अभेद्य असा हा आणखी मुलूख राजांच्या ऐन राज्यांत दाखल झाला. स्वराज्याचें संरक्षण दृढ झालें आणि घाटमाथ्याच्या बरोबरीने कोकणपट्टी देखील राजांच्या उद्योगांना साथ देण्यास सज्ज झाली. राजांचा मुलूख दुपटीने वाढला आणि त्याची सरहद्द समुद्राला भिडली. याचा परिणाम असा झाला, की दण्डाराजपुरीकर सिद्दी आणि पोर्तुगीज व इंग्रज या देशी-परदेशी आरमारी सत्तांशीं संबंध येणें अपरिहार्य होऊन, त्यांच्याशीं दोन हात करण्यासाठी शिवाजी महाराजांना स्वतःचें आरमार उभारण्याचा विचार करावा लागला. भूसैन्याप्रमाणेच महाराजांना सागरसैन्यहि सज्ज करावें लागलें. भूदल व नाविक दल अशा दोन्ही दलांचे ते सव्यसाची अधिपति झाले. जावळी हा जिंकून घेतलेला मुलूख होता. आता वडिलांच्या जहागिरीवर जगण्याचा प्रसंग संपला, आणि स्वपराक्रमावर राज्यविस्तार करण्याचा मुहूर्त झाला. जहागिरीच्या बाहेर पाऊल टाकावें तें आदिलशाहीच्या किंवा मोगलांच्या मुलखांत पडावें, अशी चारी बाजूंनीं त्यांची कोंडी झालेली होती. ती कोंडी आता जावळीचें हें विस्तृत अंगण दक्षिण व पश्चिम अशा दोन्ही अंगांकडून लाभल्यामुळे ढिली झाली आणि नवे खेळ खेळण्यास महाराजांना अवसर मिळाला.

साफसुफी आणि सुव्यवस्था

अशा प्रकारें एकीकडे राज्यविस्तार करीत असतांना, दुसरीकडे मूळच्या जहागिरींत आपली सत्ता निर्वेध करण्याचा राजांचा उद्योग सतत चालू होता. त्याचे तपशील तसे बारीक असले तथापि त्यांचें एकंदर महत्त्व कमी नाही. सुपें परगण्याचा हवालदार संभाजी मोहिते हा शहाजीचा खुद्द मेहुणा आणि शिवाजीचा सावत्र मामा. शिवाजीला तो जुमानीत नसे. तो आपल्या अंगच्या दुर्गुणांनी जनतेला आणि गैरकारभाराने शहाजीलाहि अप्रिय झालेला होता. सावकारींत दुबार वसूल करणें, लांच खाऊन खऱ्या हक्कदारांचें वतन बुडविणें आणि शेजारच्या शिवाजीराजांच्या मुलखांतील अधिकाऱ्यांवर आकस धरून त्यांना त्रास देणें, इत्यादि त्याच्या दुष्कृत्यांबद्दल तक्रारी इ. १६५४–५५ मध्ये शहाजीकडे व शिवाजीकडे गेल्या. त्यांबद्दल शहाजीकडून ठपक्याचीं व निवाडे फिरविल्याचीं पत्रें येत होतीं· परंतु त्यांचा उपयोग न होतां अखेरीला शिवाजीराजांना त्याचा स्वतःच बंदोबस्त

करावा लागला. त्यांनी इ. १६५६ सप्टेंबर २४ ला संभाजीला कैद करून सुप्याचा कारभार त्याच्याकडून काढून घेतला आणि राज्यकारभारांतील नात्याचा गोंधळ नाहीसा केला. राज्याच्या अंतर्गत व सलग विकासाला ही गोष्ट अत्यंत आवश्यक होती. अशाच सलगतेकरिता, नजीकचा चाकण किल्ला, आदिलशाही अधिकाऱ्याकडून मध्यंतरीं शिवाजीराजे यांनी घेतला आणि राज्याची सलग फळी बनविली.

आपलें राज्य आंतून व बाहेरून सुरक्षित करण्यासाठी कारभाराच्या संघटनेची किंवा आजच्या भाषेंत बोलावयाचें तर नोकरशाहीच्या चौकटीची देखील राजे मजबुती करीत होते. मुलूख वाढला तशी सुव्यवस्थेची गरज वाढली. आणि सुव्यवस्थेची गरज वाढली तसतसा एकेक नवा अधिकारी, आसपासच्या राजसत्तांच्या अनुभवावरून, ते नेमून घेऊं लागले. बंगरुळाहून येतांना बरोबर आणलेल्या तीनचार दरखदारांपैकी प्रत्येकाला स्वतःचा असा विशिष्ट शिक्का करून देऊन शिवाजीराजांनी आपल्या राज्याला प्रतिष्ठित स्वरूप आणलें. त्यांच्या स्वतःच्या 'प्रतिपच्चंद्रलेखेव' ह्या मुद्रेच्या बरोबरीने त्यांचा पेशवा सामराज याची 'शिवनरपति हर्षनिधान, सामराज मतिमत्प्रधान' अशी स्वतंत्र मुद्रा इ. १६५३ च्या आंतबाहेर झळकूं लागली. तींतील शिवाजीराजा हा 'नरपति' झाल्याची ग्वाही सहज लक्षांत भरण्यासारखी आहे. चार वर्षोनंतरचा (इ. १६५७ मार्च २१) पुण्याच्या देशमुखीच्या तंट्याबाबतचा एक महजर उपलब्ध आहे. अशा महजरावर राज्यांतील दरखदारांच्या सहीशिक्क्यांची गरज लागे. खुद्द शिवाजीराजे त्या निवाड्याच्या वेळीं उपस्थित होते असें त्या महजरावरून ठरतेंच; पण त्याशिवाय त्यांचे पेशवे, मुजुमदार, डबीर, सुरनीस, सरनोबत (सेनापति), असे अष्टप्रधानांपैकी निदान पांच जण व पायदळाचे सरनोबत, पायदळाचे सबनीस, हेरदळाचे प्रमुख आणि इतर महत्त्वाचे निदान दोन तरी मजालसी किंवा सभासद, असा फार कार्यक्षम संच त्यांच्या पदरीं जमा झालेला आढळतो. यावरून त्यांच्या राज्यव्यवस्थेची बैठक अधिकाधिक व्यापक बनत होती याचें प्रत्यंतर येतें. शिवाजीराजे केवळ इतरांप्रमाणे नांवाचे राजे राहिले नव्हते. खरेखुरे नरपति बनले होते आणि त्या नांवाला साजेसें वैभव, सत्ता आणि आंतरिक सामर्थ्य त्यांनी कमावलें होतें.

विकासाची व्यापक दृष्टि

महाराष्ट्राच्या डोंगरभूमींत रुजलेल्या या रोपट्याचा विकास अशा रीतीने आठ वर्षें एकसारखा भरघोस होत होता. इ. १६३६ पासून जवळ जवळ बारा वर्षें स्वराज्याच्या बीजाची नुसती पेरणी चालली होती. पेरणीला भूमि मावळाची मिळाली—अगदी दुर्गम, आणि परकी सत्तेच्या वरवंट्याखाली न भरडलेली. पेरणीला उभा राहिला तो मुलगा जहागीरदाराचा. शिवाजी हा केवळ पाटील किंवा देशमुख-देशपांडे अशा प्रकारचा स्थानिक वतनदार असता, तर त्याचें कर्तृत्व प्रदेशापुरतें संकुचित झालें असतें. विशिष्ट मर्यादेंतला वांटा स्वतःकडे ओढण्यासाठी हेवेदावे, मारामाऱ्या, भाईबंदी, असल्या हीन दांडगाईने मलिन झालें असतें. त्याची मजल फार तर एखादा 'नीळकंठराव' किंवा 'चंद्रराव' होण्यापर्यंत पोंचली असती. पण तो शाह्या खेळविणाऱ्या शहाजीचा, स्वपराक्रमाने तहांत मान्य झालेल्या जहागीरदाराचा, वरच्या वातावरणांत वावरणाऱ्या राजपुरुषाचा, मुलगा होता. शहाजीच्या आदर्शाचें वारें, मातुश्री जिजाबाईच्या शिकवणीचें पाणी आणि दादाजीच्या मार्गदर्शनाचें खत, हे आणखी दुर्मिळ योग शिवाजीला प्राप्त झाले. खरें म्हणजे नष्ट झालेल्या निजामशाहीचा हा मुलूख मोगलांच्या वांट्याला जावयाचा. पण केवळ शहाजी भोसल्याच्या पराक्रमाच्या गौरवासाठी तो त्याला बहाल करण्यांत आला, आणि शहाजी त्यानंतर आदिलशाहीकडेच जावा असें शहाजहानाने आग्रहाने ठरविल्यामुळेच आदिलशाहाला त्या मुलखाचें अधिराज्य मिळालें. हें अधिराज्य औपचारिक आहे, याची जाणीव आदिलशाहीला होती. ती मोगलांच्या धाकामुळे शहाजीच्या बाबतींत सामोपचाराने वागे. शिवाजीराजांना हें माहीत होतें. त्यामुळे ते दोन्हीहि सत्तांशीं निर्भयपणें वागत. आपले वडील शहाजी महाराज, मातुश्री जिजाबाई आणि गुरु दादाजी कोंडदेव यांचें निरीक्षण करून शिवाजीला आपलें कर्तृत्व आणि कर्तव्य यांची दिशा स्पष्ट कळलेली होती. मोगलाई आणि मुख्यत्वें आदिलशाही ह्या दोन सत्ता मात्र शिवाजीचा दुसरा शहाजी होईल तर बरें, अशा आशेवर थोडी वाट पाहण्यास तयार होत्या.

पण ही त्यांची अपेक्षा सफल झाली नाही. सातआठ वर्षांच्या अवलोकनामुळे शिवाजीराजांची दृष्टि विस्तारली. इ. १६५६ च्या जानेवारींत त्यांनी जावळी घेतली. रायगड गांठला. समुद्रकिनाऱ्यालगतचा मुलूख जिंकून घेतला. त्यामुळे समुद्रावर वावरणाऱ्या हजारों मैलांवरून आलेल्या पोर्तुगीजांची वगैरे त्यांची जानपछान झाली. त्यांच्या धाडसाचें त्यांना आकलन झालें. मग त्या नव्या धाडसाच्या दृष्टीने त्यांनी दख्खनमधील राजसत्तांकडे वळून पाहिलें. आणि मनाचा धडा करून इ. १६५६ च्या उत्तरार्धांत पहिल्यांदा, इ. १६५८ त दुसऱ्यांदा व इ. १६५९ त तिसऱ्यांदा, अशा एकामागून एक दूर कर्नाटकावर स्वाऱ्या काढल्या; आपली भरारी पढविलेले बोल बोलणाऱ्या पोपटाची नसून स्वैरपणें गगनांत उंच उडणाऱ्या गरुडाची आहे, याचें प्रत्यंतर जनतेला आणून दिलें.

यांपैकी कोणत्याहि स्वारीबद्दल आपल्याला पुरेसा तपशील माहीत नाही. तथापि त्या साधारणपणें मराठ्यांच्या प्रथेला अनुसरून दसऱ्याला (आश्विन शुद्ध १०) प्रस्थान ठेवून काढल्या असाव्या. यांपैकी पहिली कार्तिक वद्यांत महमद आदिलशाहा मृत्यु पावला (इ. १६५६ नोव्हेंबर) त्या सुमारास चालू होती. कर्नाटकचा सुभेदार इखलासखान याची त्या स्वारीवर नुकत्याच गादीवर बसलेल्या अली आदिलशाहाने नेमणूक केल्याचें फर्मान आपल्याला उपलब्ध आहे. त्यानंतर दीड दोन महिन्यांनंतरच्या फर्मानाने, मासूर तर्फेंत शिवाजीचा मोड केल्याबद्दल गुत्तलच्या हनुमंत गौडास इनाम दिलेलें आढळतें. या पत्रांत शिवाजीच्या या स्वारीचें 'हरामखोर सीवा याने निघूंन पाय बाहेर टाकून पादशाही विलायतींत (प्रदेशांत) अडथळा करून पाय पसरले होते' या शब्दांत वर्णन केलें आहे. तें आदिलशाहीच्या दृष्टीने किती यथार्थ आहे, हें सांगावयास नको. मासूर हें गाव म्हैसूर संस्थान व धारवाड जिल्हा यांच्या सरहद्दीवर आहे. तेव्हा शिवाजीचे लोक या वेळीं धारवाड जिल्ह्याच्या अगदी दक्षिण टोकापर्यंत गेले होते असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

शिवाजीराजांच्या विकासाच्या टप्प्यांतील हा खरोखर कलाटणीचा, क्रान्तीचा निर्णायक प्रसंग आहे. विजयनगरच्या प्राचीन साम्राज्याच्या भूमीच्या ओढीने असो, किंवा खिळखिळया झालेल्या आदिलशाहीच्या सामर्थ्याबद्दल भय वाटेनासें झाल्यामुळे असो, राजांची ही कर्नाटकाकडील भरारी त्यांच्या जीवनांत आणि राजकीय धोरणांत फार महत्त्वाची ठरली. अफजलखानाचें संकट हें बहुतांशीं त्यामुळे राजांवर ओढवलें. आणि त्यांतून ते शीरसलामत बाहेर पडल्यामुळे राजांचा जगांत न भूतो न भविष्यति असा बोलबाला झाला.

* * *

पादशाही विलायतींत अडथळा

दुसऱ्या अली आदिलशाहाचें फर्मान (सारांश) :

“ सध्या दरबारच्या ध्यानास आलें की, हरामखोर सीवा याने निष्ठेतून पाय बाहेर टाकून पादशाही विलायतींत अडथळा उत्पन्न करून पाय पसरले आहेत. त्या हरामखोरास दफे (= प्रतिकार, फडशा) करण्यासाठी मुहम्मद इखलासखान...यास कर्नाटकची सुभेदारी देऊन व उत्तम वजीरांसह पाठविलें होतें त्याने मासूर तर्फेत सीवाच्या लोकांशीं खूप लढाई केली. म्हणून त्यास दोन गांव इनाम दिले आहेत... ” इ. १६५७ जाने. ५.

ऐ. फारसी साहित्य, खंड ३, ले. १८.

६ खाशी संधी घेतली

किल्ल्यांचीं नवीं नांवें

शून्यांतून सुव्यवस्था आणि परकी सत्तांच्या जंजाळांतून स्वातंत्र्य उभें करण्याचें शिवाजीराजांचें काम नेहमी चौफेर चालू होतें. पण पंचविशी गांठल्यावर त्यांनी कांही योजना आखलेली दिसते. जावळी प्रकरणांतील रायगडची मोहीम चालू होती त्या काळाच्या आंतबाहेरची गोष्ट आहे. त्या वेळीं आबाजी महादेव हा कल्याण-भिवंडी-चेऊलपासून मामले रायरी-(रायगड) पर्यंतच्या मुलखाचा सरसुभेदार होता. पनवेलजवळ प्रबळगडावर देशमुख वगैरे अधिकाऱ्यांना जमवून त्यांच्याकडून निजामशाहींतील व आदिलशाहींतील मुलखाचा वसूल कसा होता, याबद्दल शिरस्ता समजावून घेण्याची खटपट त्याने चालविली होती (इ. १६५६ मे). मुलखाची जमाबंदी न्यायाची ठरवावी, यासाठी हा पद्धतशीर माहिती जमविण्याचा प्रयत्न चालला होता. नवे गड वसवून नवीं नांवें देणें हा महाराजांचा नेहमीचा छंद होता; पण इ. १६५६ च्या सप्टेंबरांत त्यांनी तिकडे विशेष लक्ष दिलें. मिळकतींतील एकंदर किल्ल्यांचीं नांवें तपासून हौशीने त्यांनी तीं बदललीं. आणि दसऱ्यानंतर कर्नाटकावरच्या स्वारीचा उपक्रम केला. या स्वारीमध्ये मनासारखें यश मिळालें की नाही हें सांगतां येत नाही; पण तो विचार महत्त्वाचा नाही. कारण आता गरुडाला पंख फुटले होते. शिवाजीराजांचा स्वतःचा हुरूप वाढला होता आणि समाजहि त्यांच्याकडे आदराने पाहूं लागला होता. याचें प्रत्यंतर म्हणून इ. १६५७ या एका वर्षांत तीनचार महिन्यांच्या अवधींत गायकवाड, जाधव, इंगळे अशा तीन घराण्यांशीं राजांच्या सोयरिकी झाल्या, याचें सांगतां येईल. शिवाय स्वतःच्या मुलखांत खबरदार राहून ठाणबंद बसण्याचें धोरण त्यांनी टाकून दिलें, हेंहि त्यांच्या हुरूपाचें उदाहरण समजलें पाहिजे. त्यांनी संधी साधून जुन्नर व अहमदनगर या मोगली मुलखावर छापा घातला, आदिलशाही

कर्नाटकावर एकामागून एक स्वाऱ्या काढल्या, आणि कुडाळकर सावंत आदिलशाही स्वारीच्या दडपणाने जेरीस आला असतां, त्याच्या विनंतीवरून त्याला शत्रूच्या पकडींतून सोडविलें. ह्या सर्व हालचालींत त्यांचें नवें चढाईचें धोरण स्पष्ट होतें.

औरंगजेबाची द्विधा वृत्ति

शिवाजीराजांच्या मुलखाला भिडलेले विजापूरकर व मोगल हे दोन्ही बलाढ्य शत्रू या वेळीं राजांच्या सुदैवाने आपसांत लढण्यांत गुंतलेले होते. त्याचा फायदा त्यांनी भरपूर घेतला. दख्खनमधील शाह्यांचा कट्टर शत्रु औरंगजेब इ. १६५३ पासून दक्षिणचा सुभेदार झाला होता. तो शिवाजीचा वाढता पराक्रम पाहात होता. त्याचा उपयोग करून घेण्याच्या विचारांतहि होता. इतक्यांत दहा वर्षें बिछान्यावर खितपत पडलेला महंमद आदिलशाहा इ. १६५६ नोव्हेंबर ४ ला मृत्यु पावल्याचें ऐकून औरंगजेबाने तें राज्य घेण्याची तयारी चालविली. हें ध्यानांत घेऊन, शिवाजीराजांनी शाहजादा मुरादबक्षाशीं सातआठ वर्षांपूर्वी जोडलेला संबंध या वेळीं औरंगजेबाशींहि जोडून घेण्याचें ठरविलें व होईल तो लाभ पदरांत पाडावा म्हणून वकिलामार्फत बोलणें सुरू केलें. त्याची पार्श्वभूमि अशी :

महंमद आदिलशाहाच्या आजारामुळे बजबजपुरी माजली आणि स्वार्थी कारस्थानांमुळे दूरच्या मुलखाकडे आदिलशाहीचें दुर्लक्ष झालें. त्या दुर्लक्षाचा फायदा घेऊन इ. १६५५-५६ मध्ये शिवाजीने घाटमाथ्यावरील जावळी घेतली व आपला मुलूख वाढविला. त्याप्रमाणे त्याच सुमारास त्याने विजापुरी कोकणांतील किल्ले व मुलूख आणि विशेषतः बंदर दाभोळ व त्याखालील मुलूखहि हाताखाली घातला. औरंगजेब हें तटस्थपणें पाहात होता. तो विजापुरी दरबारांत दुहीं माजवून तेथील अंदाधुंदीचा स्वतःच फायदा घेण्याचें योजीत होता. एकदा आदिलशाही व कुतुबशाही नष्ट केली म्हणजे त्यांची मदत मिळेनाशी झाल्यामुळे मराठ्यांच्या राज्याचें हें रोपटें केव्हाच करपून जाईल, असा त्याचा साधासीधा हिशेब होता. त्याप्रमाणे चारपांच महिने वेढा घालून प्रथम बेदरचा मजबूत किल्ला (इ. १६५७ मार्च २९) आणि तीनएक महिन्यांच्या वेढ्यानंतर कल्याणीचा किल्ला (इ. १६५७ ऑगस्ट २) हे दोन विजापुरी किल्ले औरंगजेबाने घेतले. तेव्हा विजापूर-

करांनी तह करून मोगलांना खंडणी, किल्ले व मुलूख देण्याचें कबूल केलें. पण इतक्यांत शहाजहान बादशाहाच्या आजाराचें वर्तमान आलें, व बापाच्या आजारामुळे राजधानींत वारशासाठी होणारीं आपल्या भावांचीं कारस्थानें हाणून पाडण्याकडे त्याचें लक्ष लागलें. त्यामुळे दोनएक महिन्यांनी तो कल्याणीहून औरंगाबादेस व तेथून इ. १६५८ च्या जानेवारीअखेर आग्र्याकडे जाण्याला निघाला. या वेळीं हातीं घेतलेलें आदिलशाही मोडण्याचें काम तडीला लावण्याला वेळ नसल्यामुळे कांही थातुरमातुर करण्याशिवाय त्याला गत्यंतर नव्हतें. दिल्लीकरांना १ कोट रुपये खंडणी, बेदर, कल्याणी व परिंडा हे किल्ले, निजामशाही कोकणांतील किल्ले व वांगी परगणा द्यावा, असा जो तह जेरीला आलेल्या आदिलशाहानें इ. १६५७ ऑगस्टमध्ये केला होता, तो औरंगजेबाने रद्द केला. 'हा सर्व मुलूख तुमच्याकडेच राहूं दे, खंडणींत ३० लाख रुपये सूटसुद्धा देतों' असें विजापूरकरांना त्याने कबूल केलें आणि तो घाईने निघून गेला. पण त्याबरोबर 'शिवाजीवर लक्ष ठेवा, तुमच्या मुलखांतले किल्ले त्याने बळकावले आहेत तेथून त्याला घालवून द्या. वाटेल तर त्याच्या बापाप्रमाणे त्याला तिकडे कर्नाटकांत जहागीर देऊन आमच्या मुलखापासून दूर राखा!' असें बजावण्यास मात्र तो विसरला नाही.

औरंगजेबाशीं पहिली सलामी

शिवाजीला आपण खेळवूं पाहतों, पण तें प्रकरण सामान्य नाही याचें प्रत्यंतर औरंगजेबाला नुकतेंच आल्यामुळे, शिवाजीराजांवर याप्रमाणे तो दांतओठ खात होता. तो शिवाजीराजांवर चिडण्याचें कारण घडलें तें असें : औरंगजेब विजापूरकरांच्या देशपट्टीच्या मोहिमेंत विजयी होत असल्यामुळे तो कोकणपट्टीकडे फारसें लक्ष देणार नाही; पण आपल्याला मात्र त्या पट्टीचें फार महत्त्व आहे. तेव्हा त्या मुलखाबद्दल औरंगजेबाचा याच वेळीं कौल घेऊन ठेवावा, असें योजून वरचा निजामशाही कोकणचा भाग आणि खालचा बंदर दाभोळ वगैरे आदिलशाही कोकणचा भाग, या दोहोंच्याबद्दल बोलणें करण्यासाठी शिवाजीने सोनाजी विश्वनाथ (डबीर) या आपल्या वकिलाला बेदरला पाठविलें. पण त्याबद्दल निश्चित फर्मान न देतां फक्त गोड भाषेंत पत्र लिहून औरंगजेबाने शिवाजीला आपल्या गाड्याला

जुंपण्याच्या इराद्याने भेटीलाच बोलाविलें (इ. १६५७ एप्रिल २३). या टाळाटाळीचा शिवाजीराजांना राग आला. त्यांनी मुरादबक्षाकडून सातआठ वर्षांपूर्वी मागितलेली जुन्नर-अहमदनगरची देशमुखी आता स्वपराक्रमाने पदरांत पाडून घेण्याचें ठरविलें; आणि औरंगजेबाला आपली ओळख पटवून देण्याचा एक धाडसी डाव टाकला. औरंगजेबाच्या टाळाटाळीला प्रत्युत्तर म्हणून त्यांनी 'जुन्नर शहर मारिलें (एप्रिल ३०). दोनशें घोडे पाडाव केले. तीन लक्ष होनांची मत्ता, खेरीज कापड जिन्नस, जडजवाहीर हस्तगत करून महाराज पुण्यास आले.' मुलूख मोकळाच सापडल्यामुळे महिना दोन महिन्यांनी फिरून अहमदनगर मारून त्यांनी तेथील सरदार नौसीरखान याचाहि पराजय केला (जून ४). ह्या अपमानाने औरंगजेब संतप्त झाला. त्याने शिवाजीचा बंदोबस्त करण्याबद्दल मुल्तफतखान, नासिरीखान (नौसीर), मीरजुमला वगैरे सर्वांना चिडून पत्रें लिहिलीं. आणि त्यांतलाच एक प्रकार म्हणून विजापूरकरांना वर सांगितल्याप्रमाणे निर्वाणीचा इशारा दिला.

पण या वेळीं फार ताणण्याच्या मन:स्थितींत औरंगजेब नव्हता. यामुळे बऱ्हाणपुरास राजांनी पाठविलेल्या वकिलाचें नीट स्वागत झालें; आणि जरी 'तुमच्या पेशजीच्या (=पूर्वीच्या, अहमदनगर-जुन्नर स्वारीच्या) गोष्टी विसरावयाजोग्या नाहीत' तरी तुम्हीं आपलें मागणें वकिलाबरोबर लिहून कळवावें म्हणजे त्याप्रमाणे केलें जाईल, असें आश्वासनाचें फर्मान (इ. १६५८ फेब्रुवारी १४) पाठवून औरंगजेबाने कटुता राहूं दिली नाही. जुलै २१ ला औरंगजेब सिंहासनावर बसला आणि जोडलेले संबंध टिकविण्यासाठी राजांनी नव्या बादशाहाच्या अभिनंदनार्थ आपले वकील सोनाजीपंत यांस रवानगीचीं वस्त्रें दिलीं म्हणजे त्यांस दिल्लीस पाठविलें. इ. १६५९ जून ५ ला औरंगजेबाच्या सिंहासनारोहणाचा खास समारंभ झाला. आणि त्या निमित्ताने खुषीचें पत्र आणि शिवाजीराजांसाठी खास पोशाख बादशाहाने १४ जुलैला पाठवून दिला.

कल्याण-भिवंडी घेतली

जुन्नर-अहमदनगरावरील स्वारी हा निवळ मोगलांची कुरापत काढण्याचा प्रकार होता. तसें जरी पुढच्या कल्याण-भिवंडीवरील स्वारीबद्दल म्हणतां आलें नाही, तरी एका अर्थाने ती स्वारी मोगलांविरुद्धच होती. त्याचा

प्रकार असा : इ. १६३६ च्या तहाने वसई ते जंजिरा ही निजामशाही कोकणपट्टी आदिलशाहाकडे दिलेली होती. ह्या आदिलशाहाकडे दिलेल्या निजामशाही कोकणांत घाटमाथ्याप्रमाणेच शिवाजीने आपले हातपाय आधी पसरले होते. कारण अंतर्गत अडचणींमुळे तिकडे आपला अंमल सक्तीने चालवायला विजापूर दरबार असमर्थ होता. पण आता औरंगजेबाच्या मोहिमेमुळे जेरीस येऊन विजापूर दरबाराने इ. १६५७ ऑगस्टांत दिल्ली-करांशीं जो तह केला, त्यांत त्या निजामशाही कोकणांतील किल्ले मोगलांना देऊन टाकून, त्यांच्या जबाबदारींतून मुक्त होण्याचें ठरविलें. हे किल्ले मोगलांकडे जाणें म्हणजे तेथील आदिलशाहीचा ढिला कारभार संपून त्याच्या जागीं मोगलांचा करडा कारभार येणें. असें असल्यामुळे ह्या तहाप्रमाणे बदल होण्यापूर्वीच ते किल्ले आपणच घेऊन बसावें; मग त्यांसाठी पुढे मोगलांशीं युद्ध करावें लागलें तरी बेहेत्तर; अशा विचाराने दसऱ्यानंतर सुमारें आठपंधरा दिवसांत राजांनी कल्याण-भिवंडी घेतली (ऑक्टो. २४), तेथे आपला सुभेदार नेमला, आणि इतर किल्ले घेऊन त्यांवरील सुव्यवस्था करीत करीत त्याच भागांतील माहुलीचा किल्लाहि डिसेंबरच्या सुमारास हस्तगत केला. हा माहुलीगड म्हणजे शहाजीने निजामशाहीच्या रक्षणासाठी चालविलेल्या झगड्यांत अगदी अखेरीपर्यंत लढविलेला किल्ला होय.

जुन्नर-अहमदनगरचा छापा काय किंवा किल्ल्यांवरील हें आक्रमण काय, मोगलांच्या प्रबल सत्तेला तें आव्हान होतें. आणि औरंगजेब सिंहासन मिळविण्याच्या कारस्थानांत गुंतलेला नसता, तर हा उद्योग राजांच्या अंगाशींच आला असता. परंतु 'धाडसाशिवाय वैभव नाही' या धोरणानुसार शिवाजीराजे अनेक वेळा वागतांना दिसतात आणि यशस्वी होतात. तसें या वेळींहि घडलें. औरंगजेब उत्तर हिंदुस्थानाकडे निघून गेला तेव्हा त्याने हा मुलूख फिरून आदिलशाहीच्या हवालीं ठेवला (इ. १६५८ फेब्रु.-मार्च). आणि शिवाजीराजांचें हें धाडस त्या वेळीं तरी पचलें.

आदिलशाहीवर थेट आक्रमण

औरंगजेब स्वारी अर्धी टाकून दिल्लीकडे निघून गेल्यामुळे आदिल-शाहीवरील प्राणांतिक संकट टळलें; पण ह्या संधीचा फायदा विजापूर दरबाराला घेतां आला नाही. महमद आदिलशाहाची बेगम बडेसाहेबीण

हिने एकामागून एक मुत्सद्द्यांचे बळी घेतले. तिने खानमहंमदास (इ. १६५७ नोव्हें. १०) मारविलें; नंतर बहलोलखान मारला (इ. १६५८ जुलै ८) व पुढे डिसेंबरांत फत्तेखानास विजापुरांत विष देण्यांत आलें. यामुळे कदाचित् दरबारांतील विरोधी पक्ष नामोहरम झाला असला, तरी दरबाराचें सामर्थ्यहि कमी झालें आणि आधीच डबघाईला आलेल्या विजापूरच्या राज्याची शिवाजीराजांना भीति वाटेनाशी झाली. आणि त्यांनी कर्नाटकांत म्हणजे आदिलशाहीवर थेट आक्रमण केलें. त्या राज्यांत सर्वत्रच गोंधळ होता. पण त्यांतल्या त्यांत कर्नाटकांतील परिस्थिति विशेष खराब झाली आहे, तिकडे कोणी चांगला सुभेदार नेमला पाहिजे, असें शहाजीने सुचविलें. त्यावरून अफजलखानाला तिकडे नेमण्यांत आलें. आदिलशाहींतला हा एकुलता एक अनुभवलेला सरदार अशा रीतीने साधारणपणें इ. १६५८ फेब्रुवारीपासून तिकडे गुंतून गेला. हा मोका साधून राजांनी मागे सांगितल्याप्रमाणे (पृ. ५६) बहुधा दसऱ्याला आदिलशाही मुलखांत दुसऱ्या खेपेस सीमोल्लंघन केलें (इ. १६५८ सप्टें. २६). मावळांतल्या कलबोली आणि रावळ या दोन गावांच्या शिवेचा कथला (= तंटा) सर्व देशकांसमोर दिव्य करून निकालांत काढावयाचा होता. परंतु त्याच सुमारास 'साहेब (= शिवाजी) करणाटक प्रांतीं मसलतीस (= युद्धावर) गेले' आणि तो निवाडा लांबणीवर पडला. ही शिवाजीराजांची थेट कर्नाटकावरील दुसरी स्वारी होय.

स्वतःच्या जहागिरीकडील बंदोबस्त बऱ्यापैकी असल्याने आणि विजापुरांतील बेबंदशाही तशीच चालू राहिल्याने, राजांनी फिरून पुढच्याहि पावसाळ्यानंतर दसऱ्याच्या सुमारास (आश्विन शु. १ = इ. १६५९ सप्टेंबर ७) आदिलशाही कर्नाटकावर आणखी एकदा म्हणजे तिसरी स्वारी काढली. ही स्वारी तेरदळ, रायबाग, अडगल या बाजूकडे झाली. जाधवराव नांवाच्या शिवाजीच्या सरदाराने हरौगडापर्यंत घोडदळ नेलें. मराठ्यांना लूट मिळाली. लष्करच्या हालचालीमुळे मुलखाची खराबी झाली, तेव्हा तिकडील लोकांनी थोडाबहुत प्रतिकार केला. अशा स्वाऱ्यांमुळे मुलूख कबजांत येतो असें नाही; किंबहुना स्वारीचा तो हेतुहि नसतो. परंतु परचक्राचें आपल्या मुलखावर आक्रमण होईपर्यंत स्वस्थ बसावें आणि आपल्या प्रदेशांत लढाई देऊन आपल्याच राज्याची पायमल्ली करून घ्यावी,

यापेक्षा आपणच परमुलखांत घुसून दोन हात करावे, हें युद्धशास्त्रांतील सर्वोत्कृष्ट धोरण गणलें जातें. परमुलखांत युद्ध नेल्याने आपल्या मुलखाची खराबी वांचते आणि अर्थात् संरक्षणहि होतें. शिवाजी महाराज बहुधा हेंच धोरण अवलंबीत.

शिवाजीचा पहिला मांडलिक

शिवाजीराजांच्या यशस्वीपणें चाललेल्या या हालचाली अनेक गरजूंच्या लक्षांत केव्हाच आल्या होत्या आणि ते त्यांच्याकडे आश्रयस्थान म्हणून आशेने पाहूं लागले होते. अशा कोणाचीहि राजांनी निराशा केली नाही.

इ. १६५८ च्या आरंभीं विजापूर दरबार आपल्या राज्यांत कांही सुव्यवस्था करावयास लागला होता. त्यासाठी फेब्रुवारीच्या सुमारास जशी दरबाराने कर्नाटकच्या सुभेदारीवर अफजलखानाची नेमणूक केली तशीच रणदुल्लाखानाचा मुलगा रुस्तुमजमा याची मे महिन्याच्या सुमारास कोकण प्रांतांत नेमणूक केली. कुडाळकर लखम सावंत हा आदिलशाहींतील वतनदार देसाई. कांहीसा बंडखोर. त्या मानाने शिवाजीचे उपद्व्याप जरा दूरचे. पण कुडाळचा लखम सावंत राजधानीला अधिक जवळचा. म्हणून त्याचा स्वतंत्र होण्याचा उद्योग हाणून पाडण्यासाठी रुस्तुमजमाने लगेच मोहीम सुरू केली. आणि त्याच्याकडून रांगणा किल्ला परत देखील घेतला. तेव्हा साहजिकच कुडाळचे खेम सावंत व लखम सावत यांनी लढाई चालू ठेवून आपला वकील पीतांबर शेणवी यास राजांकडे पाठवून त्यांचें साह्य मागितलें आणि तें त्यांनी दिलें. कर्नाटकच्या दुसऱ्या स्वारीबरोबर (इ. १६५८ ऑक्टो. नोव्हें.) हाहि कार्यभाग त्यांनी आटोपला. सावंतांचें व शिवाजीराजांचें अशीं दोन्हीं सैन्यें एक होऊन त्यांनी रुस्तुमजमाचें आलेलें संकट परतविलें. शिवाजीराजांनी या लढाईत सावंतांचा सर्व मुलूख परत मिळविला. पण त्यापैकी फोंडा किल्ला व सभोंवतालचा तालुका आपल्याकडेच ठेवून बाकीचें त्याचें राज्य फिरून त्याच्याच हवालीं केलें. पूर्वी चंद्ररावाला जावळींत स्थापन केलें होतें, त्याप्रमाणे या वेळीं सावंतांना कुडाळांत स्थापित केलें. चंद्ररावाला भाऊबंदींतून मोकळें केलें होतें; तर सावंतांना त्यांचा अधिराजा आदिलशाहा याच्या पारतंत्र्यांतून वांचविलें.

सावंत आणि शिवाजीराजे या उभयतांत झालेल्या तहाचीं (इ. १६५९ मार्च ५) तीन राजकारणी कलमें अशीं : (१) सावंतांच्या महालांचा जो आकार होईल त्याच्या निम्मे ऐवज दरसाल शिवाजीराजांकडे पावता करावा. आणि राहिलेला निम्मे तीनचार हजार पायदळ हेटकरी सज्ज ठेवण्यावर खर्च करावा. मागणी करतांच हे लोक राजांच्या दिमतीस द्यावे आणि तसें बोलावणें आलें, तर सावंतांनी स्वतः जातीने राजांच्या स्वाऱ्यांबरोबर जावें.* (२) फोंडा मुलूख राजांकडे ठेवण्यांत आला; त्याच्या व्यवस्थेच्या कामीं सर्व प्रकारें मदत करावी. राजांनी बिदनूर-सोंधें या पलीकडच्या संस्थानांवर खंडण्या वसूल करण्यासाठी स्वाऱ्या केल्या तर सावंतांनी त्यांतहि साह्य द्यावें. आणि सर्वांत महत्त्वाचें कलम म्हणजे (३) स्वराज्यसाधनाच्या ठायीं वकिलापाशीं मध्ये राहून (=स्वराज्य साधण्याचें शिवाजीराजांचें ध्येय मान्य करून वकिलामार्फत एकविचार संभाळून) 'तुरुक लोकांचें साधन (=साह्य न करावें.' या कलमांवरून शिवाजीराजे व सावंत यांच्यामधील ह्या दोस्तीच्या तहाचें स्वरूप स्वराज्यसाधनांतील भागीदारीचें कसें होतें हें ध्यानांत येतें.

यापुढील कलमें राज्यवसुलाच्या व्यवस्थेबद्दलचीं आहेत :—(४) प्रांतांतील जमाबंदीचें काम सर्व ठिकाणीं एका सूत्राने चालावें, यासाठी जमाबंदी खात्याच्या चौकशीसाठी हुजरून (म्हणजे शिवाजीकडून) लोक नेमण्यांत येतील ते ठेवून घ्यावे व त्यांना हुजुरच्या शिरस्त्याप्रमाणे वेतन द्यावें. आणि (५) हा दोस्तीचा तह सावंत पाळतील तोंपर्यंत त्यांच्याकडे


---

* हें कलम प्राचीन विजयनगर साम्राज्याच्या प्रथेला धरून होतें. पाहा मोरलंड—'इंडिया अॅट् दि डेथ ऑफ अकबर,' पृ. ३२, ६४, ९८. ह्या तहाची ही मिति आणि अर्थात् तहाला कारणीभूत झालेली परिस्थिति नक्की केव्हाची याबद्दल संशय घेण्यास जागा आहे; परंतु त्याचा परिहार होण्याचें साधन खात्रीचें असें उपलब्ध नाही.

चालणारीं देसकतीचीं वतनें आणि किताब चालविण्यांत येतील. हीं दोन नित्याचीं कलमें दिसतात.

ह्या कलमांतील दूरदृष्टि, सुव्यवस्थेची कदर आणि ध्येयसाधनामध्ये दोस्तांना सहभागी करून घेण्याची खबरदारी स्पष्ट दिसून येते. चंद्रराव मोऱ्यांनी शिवाजीराजांचें नियंत्रण पत्करलें असतें, तर कोणत्या तऱ्हेचा करार शिवाजीराजांनी त्यांच्याशीं केला असता, याचीहि यावरून कल्पना येते. राजांची ही स्वारी निश्चित यशस्वी झाली. त्यांचा एकोणतिसावा वाढदिवस मोठ्या समाधानांत गेला असला पाहिजे. जावळीइतकाच दुर्गम आणि शिवाय आदिलशाही कर्नाटकाच्या बराच जवळचा असा महत्त्वाचा कुडाळ प्रांत शिवाजीराजांच्या लगामीं आला आणि मधलें कोकण पक्कें जोडून घेण्याचा मार्ग मोकळा झाला. ह्या स्वारीच्या निमित्ताने त्यांचा रुस्तुमजमा ह्या बलाढ्य सेनापतीशीं प्रथम संबंध आला. रुस्तुमजमाचा बाप रणदुल्लाखान हा शहाजी महाराजांचा स्नेही होता. तो स्नेहाचा संबंध उभयतांच्या पुत्रांनी देखील तसाच पुढे चालू ठेविला.

* * *



राज्याभिषेकापूर्वीचा 'शिवराई'

७ अफजलखानाला प्रायश्चित्त

निःसंदिग्ध फर्मान

" शिवाजीने निजामशाही कोकणांतील मुसलमानांना त्रास देऊन लूट करून पातशाही मुलखांतील कित्येक किल्ले हस्तगत केले आहेत. त्याचा नाश (दफा) व उचलबांगडी (रफा) करण्यासाठी अफजलखान यास तिकडे सुभेदार नेमून पाठविले आहेत. त्याच्या ताबेदारींत राहून शिवाजीला नष्ट (मुन्दफा) आणि उचाटित (मुस्तासल) करावें. त्याचे लोक आणि जनावरें (घोडे) वगैरेस आश्रय देऊं नये. जेथे सापडतील तेथे त्यांची कत्तल करावी..." हे अली आदिलशाहाच्या (१६५६–१६७२ इ.) फर्मानांतले शब्द आहेत. हें फर्मान त्याने मावळांतल्या शिवाजीराजांच्या स्नेहांतल्या एका देशमुखाला इ. १६५९ जून १६ ला लिहिलें. अशीं फर्मानें एप्रिल-मेपासूनच मावळांतल्या देशमुखांना जात होती. वरील अवतरण कान्होजी जेध्याला गेलेल्या फर्मानांतील आहे. पण तो राजांना सोडून आपल्याला मिळत नाही असें पाहून, साडेतीन महिन्यांनी त्याचा एक मुलगा शिवाजी जेधे याला बापापासून फोडण्यासाठी ३० सप्टेंबरला त्याच्या नांवाने आणखी निराळेंच पत्र स्वतः अफजलखानाने लिहिलें. त्यांत तो म्हणतो, " ' तुमचा बाप (कान्होजी) व बिरादर (भाऊ = बाजी जेधे) दहावीस वरिसे शिवाजी भोसलेचे चाकरी करिताती ' हें आम्हांला माहीत आहे. पण त्याची मनांत शंका धरूं नये. आमचेकडे यावें. आलेवरी सरफराजी (= बढती) होईल. " एकाच कुटुंबांत असा भेद पेरायला देखील खानाने मागेपुढे पाहिलें नाही. हीं दोन फर्मानें पाहिल्यावर खानाच्या स्वारीच्या उद्देशाबद्दल कोणाला शंका राहूं नये. ' वाटेल ती युक्ति किंवा बहाणा करून शिवाजीला नष्ट करावें ' अशी आज्ञा अफजलखानाला दिलेली होती, असें त्याच वेळीं इंग्रज व डच व्यापाऱ्यांना खात्रीलायक कळलें होतें. तसें त्यांनी समकालीन पत्रांत लिहून ठेवलेलें आहे.

अफजलखान म्हणजे कपट

कुडाळ प्रकरण (पृ. ६४–६५) आटोपून शिवाजीराजे शिवापट्टणास इ. १६५९ मार्च १० ला आले. आणि येऊन महिना होतो न होतो तोंच त्यांच्या कानांवर ही फर्मानांची वार्ता अनेकांकडून आली. आपल्याविरुद्ध अफजलखानाची नेमणूक होणार आहे, म्हणजे विजापूर दरबाराने आता सोक्षमोक्ष लावण्याचें मनावर घेतलें आहे हें त्यांनी हेरलें. अफजलखान हा वीसबावीस वर्षें कर्नाटक-महाराष्ट्रांतल्या मोहिमांत अनुभवलेला कसलेला सेनापति आणि इ. १६४९ पासूनचा वाईकडील सुभेदार. त्याला इकडील प्रदेश व माणसें यांची खडान् खडा माहिती. तो आपली पराकाष्ठा करणार. तेव्हा तो कोणते डावपेच लढवितो तें पाहावें व त्याप्रमाणे आपल्या प्रतिकाराच्या योजना आखाव्या असें राजांनी ठरविलें.

शिवाजीराजांच्या मावळ भागांतील देशमुखांना आपल्या सैन्यांत दाखल करून घ्यावें म्हणजे राजे एकटे पडतील या विचाराने विजापुराहून सुलतान अली आदिलशाहा आणि सुभेदार अफजलखान फर्मानें व पत्रें यांचा पाऊस पाडीत होते. जावळीजवळ आल्यावर देखील खान गुंजणमावळच्या देशमुखांना वगैरे, 'येऊन मिळा' म्हणून पत्रें लिहितो. या उद्योगामुळे उतरोलीच्या खोपडे देशमुखासारखे कोणी अफजलखानाला मिळाले. तरी इतरांनी आदिलशाहीकडून होणाऱ्या बढतीच्या आमिषाला बळी न पडतां शिवाजीराजाचें हें 'मऱ्हाष्ट राज्य' आहे, तें अवघ्यांनी हिंमत धरून राखावें, असें ठरविलें. यामुळे राजांना पुष्कळ आधार वाटला. पण हा लढा केवळ युद्धाने निकालांत निघणार की कपटाचे मार्ग खान वापरणार याबद्दल शंका उत्पन्न व्हावी, असाच खानाचा पूर्वेतिहास होता. कर्नाटकांत शिऱ्याचा किल्ला हस्तगत करण्यासाठी त्याने शिऱ्याचा राजा कस्तुरी रंगा याला भेटीला म्हणून बोलावून त्याला दग्याने ठार मारलें (इ. १६३८). शहाजीला मुस्तफाखानाने याच्याच चुगल्यांमुळे कैद केलें (इ. १६४८). तेव्हा हा अफजलखानच त्याला विजापूरला घेऊन गेला व त्याच्याशीं त्याचा अपमान होईल असें वागला. चार वर्षांपूर्वी कनकगिरीच्या वेढ्यांत (इ. १६५५) शिवाजीराजांचा वडील भाऊ संभाजी मरण पावला तो त्याच्यामुळेच, असा साऱ्यांचा संशय होता. आणि 'संभाजीचें उसनें घ्यावें' असें अफजलाच्या भेटीस

निघतांना जिजाबाईने शिवाजीला बजावलें, असें जें अफजलवधावरील पोवाड्यांत अज्ञानदास शाहिराने म्हटलें आहे तें त्याच भावनेने होय.* प्रमुख मुत्सद्द्यांना दगाबाजीने वाटेंतून दूर करणाऱ्या बडेसाहेबिणीच्या आदेशावरून ही मोहीम काढली असल्यामुळे तर या वेळीं शिवाजीराजांनी सावधगिरी घेण्याची अत्यंत आवश्यकता होती. शिवाय या सुमारास पोर्तुगीजांशीं झालेल्या लढाईंत पराजय पदरांत पडल्यामुळे विजापूर दरबाराची स्थिति पिसाळल्यागत झाली होती. आणि त्याच्या चाव्यांत किती विष भरलेले असेल याचा अंदाज करणें कठीण होतें.

शिवाजीराजांची तयारी

मावळांतील मोहीम पावसाळा संपल्याशिवाय शक्य नव्हती. यामुळे पावसाच्या पूर्वी जरी विजापूर दरबाराची सैन्य जमविण्याची कारवाई सुरू झाली तरी खानाच्या स्वारीचा मार्ग किंवा योजना लगेच तयार होती असें नाही. अर्थात् शिवाजीराजांच्या पहिल्या तीनचार महिन्यांतल्या योजना ह्या अफजलखानाने ठरविलेल्या योजनांच्या प्रतिक्रियारूप होत्या असें समजण्याचें कारण नाही. उलट राजांनी आपलें धोरण आधी पक्कें ठरविलें आणि त्याप्रमाणे खानाला वागणें भाग पडलें, असेंच समजणें अधिक सयुक्तिक वाटतें. कारण, आपण इतरांप्रमाणे शरणागति पत्करून कायमचे ताबेदार राहणार का नव्याने स्थापन झालेल्या आपल्या हिंदवी स्वराज्याच्या उपक्रमाची परिपूर्ति करून एकदाचे सर्व शृंखलांतून मुक्त होणार, याचा निकाल त्या मोहिमेंत लावण्याचा निश्चय राजांनी केला. आणि अफजलखान हा इकडल्या माहितगारीच्या विश्वासाने आणि आपल्या सामर्थ्याच्या घमेंडीवर, आपण जाऊं तिकडे आपल्या पाठीवर आल्याशिवाय राहणार नाही, या खात्रीने त्याच्या उत्सुकतेचा फायदा घेण्याचें त्यांनी ठरविलें. पुण्याच्या उघड्या मुलखांत लढाई देण्यापेक्षा त्यांनी जावळीच्या अवघड मुलखांत लढाई देण्याचा निश्चय ठरविला. ह्या हुतूतूच्या डावांत अफजलला खोल पाण्यांत

* मात्र या पोवाडयांत गृहीत धरलें आहे त्याप्रमाणे (चौक २६, २७) जिजाबाई या प्रसंगीं प्रतापगडावर नव्हत्या. शिवाजीराजे राजगडाहून मातुश्रींचा आशीर्वाद घेऊनच प्रतापगडास आले होते.

ओढून घेतलें. भौगोलिक परिस्थितीचा समर्पक उपयोग हा राजांच्या युद्धकौशल्याचा आणि मुत्सद्देगिरीचा विशेष अशा अनेक प्रसंगीं उघड झालेला आढळतो.

या दृष्टीने शोध करूं लागलें, तर इ. १६५९ मे १३ ला बाजी प्रभूला हिरडस मावळांतल्या ओस पडलेल्या एका गडाला मोहनगड असें नांव देऊन त्याची डागडुजी व बंदोबस्त करण्याचा हुकूम राजांनी दिलेला आढळतो. हा सूचक हुकूम त्यांनी स्वतः ठरविलेल्या मोहिमेच्या योजनेचा अगदी पहिला सुगावा होय. अफजलखानाने समोरासमोर युद्ध दिलें किंवा तसें देण्याचें टाळलें, तरी त्याच्या फौजा आपल्या छोट्याशा मुलखाला केव्हा तरी घेरल्याशिवाय राहणार नाहीत, याची त्यांना खात्री होती. त्याच्याशीं टक्कर देण्यासाठी असा बंदोबस्त सगळ्या राज्यभर राजांनी केला आणि ११ जुलैलाच म्हणजे भर पावसाळयांत ते स्वतः जावळीच्या मुक्कामाला जाऊन बसले. बहुतेक वेळ तेथे काढून, त्यांनी अफजलाच्या राजकारणाला प्रसंग पडेल त्याप्रमाणे तोंड दिलें आणि शेवटीं १० नोव्हेंबरला त्याचा डाव त्याच्यावरच उलटवून त्याला पक्का बाद केला. मग तेथून पाय बाहेर टाकला तो सपाट्याने थेट विजापूरच्या मुलखांत. आदिलशाही व शिवशाही यांमधील हुतूतूची ही अटीतटीची खेळी ४ महिने चालली. हे चार महिने शिवाजीराजांना आणि त्यांच्या कोवळ्या राज्याला फार काळजीचे, आतुरतेचे आणि आणीबाणीचे गेले.

खानाबरोबरच्या सैन्याचे आकडे दहाबारा हजार घोडदळ व पायदळ असे दिले जातात. परंतु युद्ध संपतांना राजांच्या लोकांनी 'मारामारी करून हत्ती, घोडे, उंट वगैरे पाडाव करून आणले' त्यांची यादी सभासदाने दिली आहे, त्यावरून पाहतां खानाबरोबरच्या सरंजामांत घोडदळ व पायदळ यांच्याशिवाय '७० ते ७५ मोठ्या तोफा व ३०० ते ४०० लहान पहाडी तोफा देखील असाव्यात' असा कॅ. मोडक यांनी तर्क केला आहे.* शिवाजी-राजांजवळहि 'सात हजार पागा व तीन हजार शिलेदार अशी दहा हजार फौज झाली. मावळे लोकांची संचणी दहा हजारपावेतों झाली;' पण या चपळ फौजेचें बळ जावळीसारख्या कुबल जागेच्या आश्रयामुळे दसपट

* 'प्रतापगडचें युद्ध', पृ. ३९.

वाढलें. अफजलखानाचें घोडदळ डोंगरकपारींत निकामीं ठरलें. आणि अवजड तोफखाना तर वाईजवळच पडून राहिला.

स्वातंत्र्ययुद्धाला धर्मकैवाराची धार

शिवाजीराजांनी आपल्या सोयीचें युद्धक्षेत्र पसंत करून जें परिणामकारक वर्चस्व मिळविलें त्यांत खानाने विजापुराहून वाईकडे येतांना धार्मिक अत्याचार करून हिंदूंचीं मनें दुखवून भरच घातली. अज्ञानदासाच्या पोवाड्यांत तुळजापूर, माणकेश्वर, करकंभ, भोसें, पंढरपूर, शंभुमहादेव असा दूरचा मार्ग स्वीकारून खानाने या हिंदूंच्या धर्मक्षेत्रांवर अत्याचार केले असें वर्णन आहे. या सर्व ठिकाणांबद्दल निश्चित विधान करतां येत नाही. तरी तुळजापूर व पंढरपूर यांना खानाने तसवीस लावली (= त्रास दिला) यांत शंका नाही. विजापूरचें धोरण तसें असहिष्णुतेचें नसतांना या वेळीं खानाने असें अविचाराचें वर्तन कां करावें, याचें नवल वाटतें. कदाचित् या क्षेत्रांतून द्रव्य वसूल करून शिवाजीराजांवरील स्वारीचा खर्च भरून काढावा, आणि त्यांच्या बंडखोरीमुळे असा छळ भोगावा लागतो अशी त्यांच्याबद्दलची अप्रियतेची भावना फैलावावी, असा दुहेरी विचार खानाचा नसेल असें नाही. या मसलतीवर येतांना खानाने फलटण-वाईच्या दरम्यान मलवडी येथील बजाजी नाईक-निंबाळकर याला (शिवाजीशीं संगनमत केल्याबद्दल) 'दस्त करून...सुनता करून (= मुसलमान बनवून) हत्तीच्या पायातले (पायाखाली) घालून मारण्याची ' जी धमकी दिली ती देखील नाईकजी राजे पांढरे यांच्या मध्यस्थीने निंबाळकराला सोडून देण्यासाठी मिळणाऱ्या साठ हजार होनांच्या लोभानेच. पण असल्या किरकोळ गोष्टींनी दहशत खाण्याइतके राजांच्या बाजूचे लोक आता लेचेपेचे राहिले नव्हते. लोकांना राजांच्या शिकवणीमुळे स्वातंत्र्याची लज्जत समजली होती. आणि शिवाजीराजांच्या लोभासाठी ते जें स्वातंत्र्ययुद्ध त्यांच्या झेंड्याखाली खुषीने लढणार होते त्याला या अफजलाच्या नव्या अत्याचारामुळे, उलट, धर्मद्वेष्ट्याच्या पारिपत्यासाटी करावयाच्या धर्मयुद्धाची आणखी धार चढली. खानाच्या अपेक्षेप्रमाणे त्याच्या या अत्याचारांमुळे दहशत खाऊन शिवाजीराजांना लोक सोडून तर गेले नाहीतच, पण उलट खानच कांहीसा पेंचांत सापडला.

वकिलांमार्फत बोलणीं

वाईला येऊन पोंचल्याबरोबर खानाने राजांच्या प्रदेशावर सर्व बाजूंनी आक्रमण करण्यास सुरुवात केली. जाधवाने सुरें प्रांत, पांढऱ्याने शिरवळ, खराट्याने सासवड, हिलालाने पुणें आणि हबशी सैफखानाने तळकोकण व्यापलें. घाटमाथा व कोकण या दोन्ही भागांत असा धुमाकूळ घालून राजांना वठणीला आणावयाचा प्रयत्न केला. राजांनी या वेळीं या साऱ्या मुलखांत केवळ बंदोबस्तापुरतें सैन्य ठेवून बाकीच्या फौजा जावळींत सज्ज ठेवलेल्या होत्या. त्यामुळे राहिलेला बाकीचा प्रदेश घेण्याला अफजल-खानाच्या सरदारांना फारसा प्रयास पडला नाही. आपल्या मुलखांत लूट व विध्वंस चालू आहे असें पाहून देखील, जावळींतील कोणाहि सेनापतीस तिकडे पाठविण्याची राजांनी उतावीळ केली नाही. शत्रूशीं उघड्यावर लढाई देण्याचें कटाक्षाने टाळलें. एकंदर परिस्थितीचा विचार केल्यानंतर खानाच्या ध्यानांत आलें, की आपण कांहीहि केलें तरी शिवाजीला उघड्यावर खेंचून युद्धांत त्याचा पराजय करूं शकणार नाही किंवा बडेसाहेबिणीच्या आदेशाप्रमाणे त्याला जिवंत किंवा मृत पकडूं शकणार नाही. कारण तशी संधी शिवाजी आपणाला कधीहि बेसावधपणें घेऊं देणें शक्य नाही. बरें, जबरदस्तीने जाऊन आपणच त्याच्यावर चढाई करावी, तर अवघड मुलखांत पाय रोवून बसलेल्या शिवाजीच्या वाढलेल्या सामर्थ्याला विजापूरच्या कचदिल फौजा पुऱ्या पडतील, असा खानाला विश्वास वाटत नव्हता. म्हणून सामोपचाराचें बोलणें लावून विश्वास दाखवून राजांचा घात करावा, एवढा एकच मार्ग त्याला राहिला. विजापूरला विडा उचलून 'शिवाजी काय ! चढे घोडियानिशीं जिवंत धरून घेऊन येतो' म्हणून आपण केलेली प्रतिज्ञा खरी करून दाखवावयाची असेल तर त्यासाठी कांहीहि करून राजांशीं समक्ष मुलाखत घडवून आणणें अफजलखानाला अवश्य होतें. आणि या दृष्टीने मग खानाचीं शिवाजीराजांशीं वकिलांमार्फत बोलणीं सुरू झालीं.

ह्या बोलण्यांचा मथितार्थ असा : अफजलखान शिवाजीराजांना शहाजीपासूनच्या त्यांच्या आदिलशाहीशीं जुन्या संबंधांची आठवण देऊन व स्वतःचें व शहाजीराजे भोसल्यांचें घरोब्याचें नातें दाखवून, राजांनी आपल्याला वाईला येऊन भेटावें म्हणून त्यांचें मन वळवीत होता.

शिवाजीने आपला उद्दामपणा व स्वातंत्र्याचे चाळे बंद करून शरणागति पत्करावी, म्हणजे आहे त्याहूनहि त्याचें वैभव वाढवून देण्याची हमी आपण घेतों असें तो आमिष दाखवीत होता. आणि शिवाजीराजे आपल्या बाजूने 'आपणाला हें सारें कबूल आहे; माझें आहे तें सारें आदिलशाहाचेंच आहे,' अशा नरम भाषेंत, आपण खानाला भीत आहों असें भासवून खानानेच आपणाला प्रतापगडाच्या पायथ्याशीं येऊन भेटून हाताशीं धरून आश्वासन द्यावें, असें विनवीत होते. अफजलखानाचें बोलणें त्याचा वकील कृष्णाजी भास्कर करीत होता. शिवाजीराजांची वकिली पंताजी गोपीनाथ संपादित होता. एकदा खानाच्या वकिलाबरोबर राजांचा वकील खानाच्या छावणींत जाऊन तेथील कानोसा घेऊन आला. खानाच्या मनांत दगा करण्याचें खास आहे असा तेथील भेद त्याने आणला. त्यामुळे तर राजांनी पक्कीच खूणगाठ बांधली; आणि राजांची भेट घेतल्याशिवाय खानाचें उद्दिष्ट साध्य होण्यासारखें नसल्यामुळे, तो हळूहळू आपला आग्रह सोडून राजांच्या अटींवर प्रतापगडाच्या माचीवरच्या खास उभारलेल्या सदरेंत येऊन त्यांना भेटण्यास तयार झाला. आणि जावळीस रडतोंडीचा घाट उतरून प्रतापगडानजीक पार येथे डेरे देऊन राहिला. त्यानंतर मध्ये एक दिवस आड करून भेटीचा दिवस ठरला.

भेटीसंबंधी करार

भेटीसंबंधी असा करार ठरला होता : भेटीसाठी दोघांनी सशस्त्र यावें. सदरेंत कोणीहि दोनपेक्षा अधिक सेवक आणूं नयेत. खानाने एकट्याने आधी पालखींतून यावें व मंडपांत बसून वाट पाहावी. नंतर ठरल्याप्रमाणे शिवाजीराजांनी तेथे येऊन खानाला भेटावें. दोघांच्याहि रक्षणासाठी वरील दोहोंशिवाय आणखी दहा दहा सैनिक बाणाच्या टप्प्यावर उभे करावे. आणि दोघांचें काय बोलणें व्हावयाचें तें एकांतांत व्हावें. हीं कलमें ठरवितांना राजांना खानाकडून शक्य तों कमी दगा व्हावा अशा तऱ्हेची खबरदारी घेतलेली आहे. परंतु उलट खानालाहि तशाच प्रकारचें समान संरक्षण मिळणार होतें. मात्र खानाने आपल्या स्वभावाप्रमाणे आणि संकल्पानुसार दगा केलाच तर मात्र त्याला प्रायश्चित्त देतां यावें, खानाला व त्याच्या सैन्याला शीरसलामत परत जातां येऊं नये, अशी सावधगिरी राजांनी घेतली.

आपलें सैन्य कामगिरी सोपवून मोक्याच्या जागीं विखरून ठेवलें. नेताजी पालकराकडे जावळी-वाईचें सैन्य रोखण्याचें नेमून दिलें. पारघाट व कोकणबाजू मोरोपंत पेशव्यांकडे सोपविली. सदरेच्या जागेच्या जवळपास रानांत बांदलाचे लोक आणि सिलिंबकरांचा जमाव दबा धरून बसविला. भेट सुखाने पार पडली तर प्रश्नच नव्हता. पण खानाने आसपास आणून ठेवलेल्या सैन्याला आणखी काय काय गुप्त हुकूम दिलेले असतील याची कोणालाच कल्पना नव्हती. यामुळे खानाने दगा केलाच तर खानाच्या प्रत्येक तुकडीचा ताबडतोब बंदोबस्त करणें अवश्य होतें. तेव्हा अशा दग्याचा संदेश प्रतापगडावर तोफेचा आवाज करून द्यावयाचा आणि नंतर प्रत्येक सैन्याने आपला नेमून दिलेला कार्यभाग उरकावयाचा असा राजांचा संकेत सांगण्यांत आला होता.

मध्याह्नाची भेट

शिवाजीराजांची सैन्यव्यवस्था सावधपणें, शांतपणें, गुप्तपणें चालली होती. पण खान दमदाटीने आपलें म्हणणें लादूं पाहात होता. त्याची उतावीळ आणि असहिष्णुता त्याच्या हालचालींत आणि मुद्रेवर उमटत होती. गुरुवार, १० नोव्हेंबर १६५९ इ. हा भेटीचा दिवस ठरलेला होता. त्या दिवशीं ठरल्याप्रमाणें खान छावणींतून निघाला तेव्हा त्याने करारापेक्षा बरेच अधिक सैनिक बरोबर घेतले. मग राजांच्या वकिलाने फिरून एकवार आक्षेप घेतल्यावर, त्याने ते बाणाच्या टप्प्यापलीकडे ठेवण्यास संमति दिली. शिवाजीराजांच्या शानदार मंडपांत येऊन बसल्यावरहि खानाला शिवाजीच्या वैभवाबद्दल वाटणारी असूया दाबून ठेवतां आली नाही. तेव्हा पंताजी गोपीनाथाला पुन्हा एकदा त्याचें समाधान करावें लागलें.

शिवाजीराजांना एकंदर खानाच्या मनःस्थितीचा अंदाज लागलेला होता. म्हणून वाटेल त्या प्रसंगाला तयार राहावयाचें, मात्र आपण होऊन पहिल्याने बिघडवावयाचें नाही, या धोरणाने ते वागले. त्यांनी स्वतः पोशाख करतांना झग्याच्या व फेट्याच्या आंत आत्मरक्षणार्थ चिलखत व शिरस्त्राण घातलें. आपलें कांही बरें वाईट झालें तर संभाजीला राजा करून राज्य राखावें अशी निरवानिरव केली. आणि अनेक हितचिंतक खानाच्या

भेटीला जाण्यांत धोका आहे असें सांगत असतांना देखील, नेहमीच्या उत्साहाने, आपला स्वतःचा जीव धोक्यांत घालून, आपल्या सोळा वर्षांच्या उद्योगाचें भवितव्य उजळण्यासाठी शिवाजीराजे प्रतापगडावरून निर्भय सिंहाप्रमाणे खाली उतरले. नित्याप्रमाणे त्यांनी पूजाअर्चा, दानविधि आणि जेवण उरकून घेतलें होतें. त्यांचे दोघे हुद्देकरी खासबारदार म्हणजे शस्त्रधारी रक्षक त्यांच्याबरोबर होते. पण त्यांनी स्वतः फक्त एका हाताशीं तरवार (कृपाणि) आणि दुसऱ्या हातांत पट्टा धारण केला होता.

राजे सदरेवर येऊन पोंचले तो मध्याह्नाचा समय होता. त्यांनी खानाबरोबर सय्यद बंडा हा फार जबरदस्त सैनिक आहे असें पाहून त्याला दूर पाठविण्यास सुचविलें. तें खानाने मान्य केलें. आणि राजांना आणखी विश्वास वाटावा यासाठी, आपल्या हातांतील तरवार देखील त्याने एका ब्राह्मण सेवकाच्या हातांत देऊन, राजांना आलिंगन देण्यासाठी तो उतावळीनेच पुढे झाला.

यापुढील सारा प्रकार क्षणार्धांत घडला. खानाने राजांना जवळजवळ ओढून वेंघेंत पकडलें आणि त्यांची मान डाव्या हाताने दाबून धरून उजव्या हाताने त्यांच्या डाव्या कुशींत खंजीर खुपसला. बाहुयुद्धांत निपुण असलेल्या राजांनी चलाखीने आपली मान सोडवून घेतली. अंग चोरून घेऊन खंजीरहि चुकविला. पण खानाच्या दग्याचा आता भरपूर पुरावा त्यांना मिळाला होता. म्हणून राजांनी त्वेषाने आपल्या तरवारीचें टोक त्याच्या पोटांत खुपसलें ते अगदी पाठीपर्यंत घुसलें. राजांची तरवार खानाचीं आंतडीं खेचूनच बाहेर पडली. सशक्त खानाने आंतडीं आपल्या हाताने दाबून धरलीं. तो आपल्या सेवकांना हाका मारूं लागला. 'मला मारलें; याला ठार करा!' असें ओरडूं लागला. त्याचा तो ब्राह्मण सेवक तरवार घेऊन राजांच्या अंगावर धावला. पण त्याचा वार सव्यसाची राजांनी आपल्या तरवारीवर अडवला आणि त्याच क्षणीं दुसऱ्या हाताने पट्टा चालवून खानाचें मुंडकें धडापासून वेगळें केलें. सबंध पिढीच्या वैराचें त्या कपट्याला प्रायश्चित


दिलें. दोन्ही बाजूंच्या लोकांची सदरेवर लगेच झटापट सुरू झाली. खानाचे सारे लोक एकट्या राजांवर घसरले. पण त्यांनी एका हाताने तरवार व दुसऱ्या हाताने पट्टा चालवून आपलें रक्षण केलें. अफजलखानाचा रक्षक सय्यद बंडा त्यांच्यावर चवताळून धावला. तेव्हा जिवू महाल्याने मध्ये पडून त्याचे दोन तुकडे केले. सदरेवर हा प्रकार चालला तों तिकडे खानाचे भोई त्याचा मुडदा पालखींत घालून पळवूं लागले. तेव्हा त्यांचे पाय तोडून पालखी पाडण्यांत आली.

सदरेवरचा झगडा संपल्यावर खानाचें शीर घेऊन राजे प्रतापगडावर गेले आणि तेथून त्यांनी इशारतीचा आवाज करविला. त्यावरुन वाटाघाटी फिसकटल्याची सूचना मिळून मराठ्यांनी युद्धाची धुमश्चक्री चालू केली. तें युद्ध अस्तमानानंतरहि चाललें.

निकाली युद्ध

खानाचे लोक राजांनी केलेल्या पाहुणचाराचा आणि पुरविलेल्या भोजनादि सुखसोयींचा आस्वाद घेत होते. खानाने योजलेल्या दग्याच्या विचारामुळे युद्धाची गरज पडणार नाही म्हणून जरा बेसावध होते. युद्धाच्या तयारीने नव्हते. यामुळे अल्पावधींत खानाची फौज सर्व बाजूंनी घेरली गेली. वाईच्या मुख्य तळाशीं त्यांचें दळणवळण राहिलें नाही. अपरिचित मुलखांत, सायंकाळच्या आणि घोर झाडीच्या अर्धवट अंधारांत, आणि पूर्ण माहितगार शत्रूच्या कचाट्यांत सापडल्यामुळे त्यांचा पार धुव्वा उडाला. हत्ती, घोडे, उंट, तोफा, जडजवाहीर एकूण लूट दहा लाखांची मिळाली. अफजलखानाचा मोठा मुलगा फाजल व मुसेखान प्रभृति सरदार प्रतापराव मोऱ्याने दाखविलेल्या मार्गाने जावळींतून बाहेर पडले, आणि नेताजी पालकराला वाईला यायला थोडा उशीर लागल्यामुळे तो येण्यापूर्वीच तेथून निसटून गेले. हा प्रतापराव मोरे जावळी खोऱ्यांतील राजांच्या शत्रूंपैकी होता. त्याने या वेळीं अशा प्रकारें राजांच्या शत्रूंना मदत

केली तरीपण अफजलखानाचे धाकटे दोन मुलगे व इतर कित्येक सरदार राजांच्या कैदेंत सापडले. लढाई संपल्यावर स्वतः राजांनी शत्रु-मित्र असा फरक न करतां, सर्वांचा योग्यतेप्रमाणे परामर्श घेतला. जखमी झाले त्यांना भरपाई दिली. ज्यांनी कामगिरी केली त्यांना बक्षिसें दिलीं. खंडोजी खोपडे उतरोलकर देशमुख अफजलखानाला मिळाला होता (पृ. ६८) त्याची मात्र गय केली नाही. त्याचा एक हात व एक पाय तोडून बेइमानीबद्दल त्याला राजांनी शासन केलें, पण सुहृदांच्या रदबदलीवरून त्याचें देखील इनाम पुढे कायम ठेवलें. एकंदरींत कडवटपणा कोठेच राहू नये अशी खबरदारी घेऊन लोकांचीं मनें आपल्याकडे ओढलीं जातील अशा प्रकारें राजांनी या कसोटीच्या वेळीं खऱ्या नेत्याचा दिलदारपणा दाखविला. युद्धाच्या प्रसंगांत कोणत्याहि प्रकारें अफजलाच्या अविचारामुळे उत्पन्न झालेल्या धार्मिक विकल्पाची बाधा स्वतःला त्यांनी होऊं दिली नाही. आणि जरा स्थिरस्थावर



अफजलखानाचा पराभव आणि नंतर
(१६५९–१६६० इ.)

झाल्यावर बरोबर एक वर्षाने असा जाहीरनामा काढला की, अफजल-

प्रसंगाच्या आधी आपल्या पुणें, इंदापूर, चाकण, सुपें, बारामती या मोकाशाच्या प्रदेशांत, जीं इनामें मुसलमानांना चालू असतील (आणि अर्थात् हिंदूंनाहि असतील), त्यांच्यांत काडीचाहि बदल केला जाणार नाही.

खान दगा करण्याकरतांच येत आहे हें माहीत असूनहि मध्यंतरीं त्याच्या जिवाला कोणताच अपाय राजांनी केला नाही, किंवा करण्याचा प्रयत्नहि केला नाही. उलट भेट देण्याचें कबूल करून आपलाच जीव धोक्यांत घातला. यावरून शेवटपर्यंत खरेपणाने वागण्याची संधी देऊन, मगच काय तो सोक्षमोक्ष करावा असा शिवाजीराजांचा सरळ उद्देश दिसतो. आवाजाच्या संकेतावरच ज्या अर्थी त्यांनी पुढील चढाई अवलंबून ठेविली होती, त्या अर्थी आधी बोलण्यांत सलोख्याची वाटाघाट झाल्यास करावी असाच त्यांचा मानस दिसून येतो. पण खानानेच त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केला, आणि त्यामुळेच राजांनाहि तत्क्षणीं धोरण ठरवून निकाल करणें प्राप्त झालें.

वास्तविक, हा ऐतिहासिक प्रसंग दोन माणसांची गांठ पडली आणि एकाने दुसऱ्याला मारलें अशा स्वरूपाचा मुळीच नाही. विजापूरची आदिलशाही आणि तिच्या मताने बंडखोर ठरलेला शिवाजी यांच्यामध्ये झालेलें हें निकाली युद्ध होतें. त्या युद्धांत एका पक्षाचा सेनापति आपण दुसऱ्याकरिता तयार केलेल्या खड्ड्यांत स्वतः शिरला आणि युद्धापूर्वीच पडला! यामुळे युद्धाचा महत्त्वाचा तपशील मागे पडतो आणि ऐकणाराचें लक्ष भलतीकडे जातें. वास्तविक खान मोठ्या तयारीनिशीं मोहीम घेऊन आला होता, पण हरला. ही वस्तुस्थिति नजरेआड करतां कामा नये. भेटीच्या दिवशीं सुमारें दोन वाजल्यापासून सायंकाळपर्यंतच्या (१) प्रतापगडानजीकच्या एक किंवा दोन लढाया, (२) नेताजी पालकराच्या घोडदळाने वाईवर हल्ला करून तेथील सैन्य उधळून लावलें ती नंतरची लढाई आणि (३) त्याला जोडून लगेच पुढे पराभूत सैन्याला रेटीत नेऊन राजांच्या फौजांची विजापूरच्या मुलखांत घुसण्याची मुसंडी, असे या युद्धाचे खरे म्हटले म्हणजे तीन भाग पडतात. या लढायांमधून मराठ्यांच्या तयारीचें योग्य प्रमाण, योजकतेचा अचूकपणा आणि सरदारांचें प्रसंगानुरूप कार्य नांव घेण्यासारखे दिसलें. या सर्वांमधून राजांचें सेनापति म्हणून कौशल्य

चांगलेंच प्रत्ययाला येतें. यापुढील पन्हाळयाचा वेढा व अनुषंगानें घडलेले हर्षामर्ष हा या युद्धाचा उत्तरार्ध होय. या युद्धाचा आरंभच मुळीं शत्रुपक्षाच्या सेनापतीच्या वधानें झाला. अफजलखान तरी शिवाजीराजांचा घात करण्याच्याच तयारीनें आलेला होता. अशा प्रकारें युद्धाचे निर्णय रणांगणावर ठरविण्याऐवजी घातपाती घटनांवरून ठरविण्याला सेनापतीनें उद्युक्त व्हावें, याची जबाबदारी त्या वेळच्या (म्हणजे विशेषत: विजापूर दरबाराच्या आणि खुद्द अफजलखानाच्या) नीतिकल्पनांवरच टाकली पाहिजे.

* * *

हिंदु व मुसलमान यांचीं इनामें चालवावीं

सरंजामी. *छ १४ रबिलाखर, सन इहिदे सितैन अलफ*
(= इ. १६६० डिसेंबर १८)

पुणें व इंदापूर व चाकण सुपें बारामती ऐसे इनाम हिंदू व मुसलमान यांसी इनाम आहेत. त्यास, पेसजी आपणास (= शिवाजी महाराजांस) मुकासा असतां अफजलखानाआधी जेणेप्रमाणे तसलमती ज्यास जें पावत असेल त्यास तेणेप्रमाणे देणें ऐसा तह (= ठराव) केला असे मोर्तब सूद (मर्या । देयं विरा । जते)

‘ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें ’, खं. ८, ले. ११.

८ विजापूरकरांचा दुसरा पराजय

विजापूरकरांशीं चालू झालेल्या निकाली युद्धाच्या तीन भागांपैकी पहिल्या प्रतापगड-जावळीच्या मोहिमेंत शिवाजीराजे विजयी झाले, हें मागच्या प्रकरणांत सांगितलें. आता पुढील दोन भागांतील त्यांच्या विजयाचें वर्णन करावयाचें. मुलखाचा विस्तार, सत्तेची दृढता आणि परंपरेची प्रतिष्ठा या सर्व बाजूंनी शिवाजीराजांशीं तुलना करतां विजापूरकर किती तरी मोठे आणि बलवान. त्यांनी आपल्या मनांत धरिलेलें शिवाजीराजांच्या निर्मूलनाचें उद्दिष्ट ते साध्य करूं शकले नाहीत, हा त्यांचा पराजयच म्हटला पाहिजे — मग एखादी लढाई विजापूरकर जिंकोत किंवा एखाद्या प्रसंगांत शिवाजीराजे हरोत.

स्वराज्यांत वाढ

खानावर डाव उलटवतां आला तर त्यानंतर स्वतःच्या मुलखांत बसून शत्रूची दुसरी स्वारी येण्याची वाट पाहावयाची नाही, खानाच्या पराजयामुळे माजलेल्या घोटाळ्याचा शक्य तितका फायदा घ्यावयाचा, असा राजांनी बेत केला. अफजलखानाबरोबर जावळींत आलेल्या सैन्याचा मोड केला, तसा वाईला तळ देऊन राहिलेल्या खानाच्या मुख्य सैन्याचाहि मोड करणे अवश्य होतें. घोडदळाचा सेनापति नेताजी पालकर याने भेटीच्या दिवशींच वाईला जाऊन तेथील फौजेचा समाचार घ्यावा अशी त्याला निक्षून आज्ञा होती. तसें झालें असतें तर फाजलखान, मुसेखान वगैरे जावळींतून निसटलेले सरदार नेमके नेताजीच्या तावडींत सापडले असते आणि पहिल्या जावळी मोहिमेपुरता शंभर टक्के विजय राजांच्या पदरांत पडला असता. परंतु नेताजी मध्ये कोठेतरी एखाद्या बारक्या चकमकींत गुंतून राहिला आणि वाईला एक दिवस उशीरा पोंचला. त्यामुळे ते पळपुटे तावडींतून निसटू शकले !

शिवाजीराजे आपल्या मुख्य सैन्यासह दुसऱ्या दिवशीं वाईला येऊन दाखल झाले. तेव्हा त्यांना फाजलखान, मुसेखान वगैरे निसटून गेले ही बातमी कळली. अर्थात् त्यांना खेद झाला. पण त्यामुळे ते कचरले नाहीत. अफजलखानाच्या विनाशाची बातमी ऐकून गोंधळात पडलेल्या आदिलशाहीच्या मुलखाकडे आणि राजधानी विजापूरच्या रोखाने त्यांनी लगेच आपल्या फौजेच्या हालचाली चालू केल्या. अफजलखानाने सुपें, शिरवळ, सासवड, पुणें वगैरे राजांचा मुलूख जिंकण्यासाठी पाठविलेले जाधव, पांढरे, खराटे व सिद्दी हिलाल प्रभृति विजापुरी सेनानायक आपल्या सेनापतीचा अनपेक्षितपणें झालेला नाश पाहून भीतीने गर्भगळित झाले, आणि राजांना शरण येऊन त्यांच्या सैन्यांत सामील झाले. यामुळे राजे पुण्याकडील विवंचनेंतून अगदी मुक्त झाले. शिवाय या शरणागतीमुळे राजांच्या सैन्यांत भरहि पडली. राजांचें नवेंजुनें सर्व सैन्य वाई येथे एकत्र झालें आणि तेथून निघून विजयोत्साहाच्या भरांत विजापूरकरांच्या मुलखांत धुमाकूळ घालीत चाललें. थोड्या वेळांत त्याने चंदन व वंदन किल्ल्यांची नाकेबंदी करून सर्व वाई प्रांत व्यापला; व दक्षिणेकडे खटाव, मायणी, वाळवें, कऱ्हाड वगैरे कोल्हापूरपर्यंतच्या प्रदेशांत खंडणी वसूल केली. हा प्रदेश म्हणजे विशाळगड किल्ला वगैरे धरून त्याचा बराच भाग, या वेळीं प्रथमच स्वराज्याच्या सत्तेखाली आला. कोल्हापूरच्या वायव्येस सुमारें बारा मैलांवरचा पन्हाळगड हा आदिलशाहीचा मोक्यावरील विस्तीर्ण राजशाही किल्ला याच मोहिमेंत राजांनी वेढा घालून घेतला (इ. १६५९ नोव्हें. २८). अफजलखानाच्या वधानंतर फक्त अठरा दिवसांनी शंभर मैलांच्या मजलेवरील हा महत्त्वाचा किल्ला मराठी फौजांनी काबीज केला. हा त्यांचा मोठा विजय होय. चार दिवसांनी राजे स्वतः गडावर गेले, त्यांनी त्याची पाहणी केली, व तेथे सैन्याचा चांगला बंदोबस्त केला.

अफजलखानाच्या नाशाची बातमी येऊन पोंचते न पोंचते तोंच पन्हाळ्यासारखा मोक्याचा मजबूत किल्ला हातचा गेल्याची बातमीहि विजापुरास जाऊन धडकली. अर्थातच राजांच्या आक्रमणाला तत्काल पायबंद घालण्याची जरुरी येऊन पडली. प्रतापगडच्या मोडलेल्या स्वारींतून पळ काढून परतलेल्या सैन्याची जमवाजमव करून हुकेरीचा जहागीरदार व

राजापूर-कारवारकडील सुभेदार रुस्तुमजमा (रणदुल्लाखानाचा मुलगा) याच्या आधिपत्याखाली शिवाजीराजांवर लगोलग दुसरी स्वारी काढण्यांत आली. अफजलाचा मुलगा फाजलखान बापाचा सूड घेण्यासाठी तळमळत होता. तो, सादतखान, फत्तेखान, संताजी घोरपडे व सर्जेराव घाटगे असे अनेक सरदार रुस्तुमजमाबरोबर देण्यांत आले. पण मराठ्यांच्या फौजांची हिंमत एकसारख्या मिळत गेलेल्या जयामुळे वाढली होती. शिवाजीराजे जातीने मोहिमेचें नेतृत्व करीत होते. यामुळे नेताजी पालकर, वाघ, सिधोजी पवार, गोदाजी खराटे, पांढरे वगैरे राजांचे सरदार शौर्याने लढले. आणि कोल्हापुरानजीक इ. १६५९ डिसेंबर २८ रोजीं त्याहि सैन्याचा त्यांनी मोड केला. रुस्तुमजमा व फाजलखान ह्या दोघां प्रमुख सेनापतींनीच पळ काढला. आणि पन्हाळा किल्ला आदिकरून जो मुलूख राजांनी घेतला होता तो कांही आदिलशाहीला परत मिळवितां आला नाही.

शिवाजीराजांचा बोलबाला

पन्हाळ्यावर राजांचा जम बसण्यापूर्वी त्यांना तेथून हुसकून लावावें अशा उद्देशाने विजापूरकरांनी ही दुसरी स्वारी धांदलीने काढली होती. पण ती फुकट गेली. पन्हाळा हातीं आल्यापासून ह्या स्वारीपर्यंतचा एक महिना व स्वारीनंतरचे कांही दिवस राजांनी तेथील बंदोबस्त पक्का करण्यांत घालविले. ह्याकरिता आसपासचे लहानमोठे किल्ले त्यांनी जिंकले व नजीकच्या रायबागसारख्या व्यापारी पेठा लोकांशीं अनुसंधान लावून घेतल्या. पन्हाळा किल्ला व त्याच्याखालील मुलूख कायमचा स्वराज्यांत सामील करण्याच्या दृष्टीने राजांनी चालविलेल्या या तयारींत विजापूरकरांना व्यत्यय आणतां आला नाही.

राजांचें या कालांतील यश फार मोठें व कांहीसें भडक दिसलें, तथापि त्या वेळच्या पोर्तुगीज व इंग्रज निरीक्षकांना तें मुळीच अनपेक्षित वाटलें नाही. रुस्तुमजमा शिवाजीराजांचा आंतून दोस्त होता हें सर्वांना माहीत होतें. अफजलखानाने शिवाजीराजांवर स्वारी केली तेव्हा त्यांना मदत करण्यासाठी शहाजी मोठें सैन्य घेऊन विजापुरावर स्वारी करणार आहे, अशी त्या वेळीं दाट वदंता होती. या घालमेलींत शिवाजीराजे अली आदिलशाहाला विजापूरच्या गादीवरून काढून त्याच्या जागीं

दुसराच सुल्तान बसविणार आहेत असेंहि परकी व्यापाऱ्यांनी लिहून ठेविलें आहे. राजांना औरंगजेबाचा पाठिंबा असावा असाहि कित्येकांचा कयास होता. कारण इ. १६५९ जून ५ ला समारंभाने सिंहासनारोहण केल्याबद्दलचा राजांना त्याने जुलै १४ ला पाठविलेला पोशाख राजे जावळींत असतांनाच त्यांना मिळाला हें जाहीर झालेलें होतें. तात्पर्य, शिवाजीराजांचें वाढतें सामर्थ्य आणि दुबळ्या आदिलशाहीवर त्यामुळे येणारें संकट या बाबतींतील त्या वेळच्या कल्पना ह्या अशा प्रकारच्या होत्या.

मिरजेला अयशस्वी वेढा

आदिलशाहीची कचदिल मनःस्थिति व अंतस्थ दुबळेपणा यांची राजांना चांगली कल्पना आल्यामुळे त्यांनी पन्हाळ्यावरचा बंदोबस्त झाल्याबरोबर देशावर दोन व कोकणांत एक अशा तीन स्वाऱ्या न थांबतां लगेच पुढे नेल्या. देशावरच्या एका स्वारीचें आधिपत्य त्यांनी नेताजी पालकरकडे दिलें. त्याने इ. १६६० जानेवारीच्या मध्यापासून दोन अडीच महिने बाहेर राहून लांबवर दौड मारली व विजापूरजवळ तिकोटें, दक्षिणेकडे हुकेरी, गोकाक व पलीकडे गदग-लक्ष्मीश्वर येथपर्यंत जाऊन खंडण्या वसूल केल्या. देशावरची दुसरी स्वारी स्वतः राजे घेऊन गेले. कोल्हापूर-विजापूर रस्त्यावरील मिरजेचा मोक्याचा किल्ला घ्यावा या हेतूने राजांनी त्याला वेढा दिला. हा किल्ला पडला म्हणजे मधला मुलूख राजांच्या स्वराज्यांत सामील झाला असता. हें संकट टाळण्याकरिता, कर्नूलचा पराक्रमी परंतु कांहीसा बंडखोर बाण्याचा सरदार सिद्दी जौहर याला राजांवर पाठविण्यांत आलें. त्याला खूष राखण्यासाठी उंची पोशाख व सलाबतखान हा किताब आदिलशाहाने दिला. सलाबतखानाबरोबर १६ ते २० हजार घोडदळ व ३५ ते ४० हजार पायदळ होतें. एवढ्या मोठ्या सैन्याला आपल्याला तोंड देतां येणार नाही असें पाहून राजांनी मिरजेचा नाद सोडला. आपलीं पांगलेलीं सैन्यें गोळा करून ते परत पन्हाळ्यावर येऊन बंदोबस्ताने राहिले. आणि तो किल्ला दीर्घकाळ लढवितां यावा म्हणून बेगमीची वगैरे व्यवस्था करूं लागले. ही व्यवस्था पुरी होते न होते तोंच सिद्दी जौहरने येऊन पन्हाळ्याला वेढा दिला (इ. १६६० मार्च २). त्यायोगें शिवाजी-राजांवर दुसरें प्राणसंकट कोसळलें. आणि त्यांच्या आदिलशाहीवरील

आक्रमणाच्या मार्गांत मोठें विघ्न आलें. या वेळीं सिद्दी जौहराबरोबर मागच्या (२८ डिसेंबर) स्वारींतील रुस्तुमजमाचें सैन्य व फाजलखान प्रभृति सरदार पुन्हा आले होते.

कोकणांतील स्वारी

देशावरील या दोन स्वाऱ्यांशिवाय राजांनी तिसरी एक स्वारी राजापूर-कुडाळ या कोकण बाजूला काढली. राजापूर बंदर रुस्तुमजमाचें व रुस्तुमजमा राजांचा अंतस्थ स्नेही. तेव्हा त्या बंदराला उपद्रव न देतां राजांच्या सेनापतीने फक्त त्या बंदरांत नांगरलेलीं अफजलखानाचीं तीन गलबतें तेवढीं ताब्यांत घेण्याचें ठरविलें. राजापुरास इंग्रजांची वखार होती. तेथील इंग्रजांचें राजापूरच्या सुभेदाराकडे कांही येणें होतें. त्या येण्याच्या मोबदल्यांत या तीन गलबतांपैकी एक गलबत मधच्या मध्ये लाटावें अशी इंग्रजांची खटपट होती. इंग्रज तें बळकावून बसले. त्यामुळे मराठ्यांचा अधिकारी दोरोजी याला राग येऊन त्याने गिफर्ड हा एक इंग्रज व एक दलाल असे दोघे पकडून नेले (इ. १६६० जाने.). शिवाजीराजे व इंग्रज यांचा पहिला संबंध असा आला. पण रुस्तुमजमाचें व इंग्रजांचें सूत असल्याचें जेव्हा राजांच्या लक्षांत आलें तेव्हा त्यांनी ते कैदी सोडून दिले (फेब्रुवारी). रुस्तुमजमाहि स्वाभाविकपणें राजांना अडचण न होईल असेंच वागे. शिवाजीराजांना पन्हाळ्याच्या संरक्षणासाठी सैन्य माघारी घेण्याच्या ज्या हालचाली कराव्या लागल्या, त्यांत त्यांना कित्येक ठाणीं सोडून द्यावीं लागलीं. तीं सिद्दी जौहराच्या हातास लागूं नयेत म्हणून रुस्तुमजमा आपणच घेऊन बसे, हें त्याचें एक उदाहरण म्हणून सांगतां येईल. रुस्तुमजमाचें थोडेसें सैन्य या वेळीं सिद्दी जौहराबरोबर होतें हें वर सांगितलें आहे. तथापि सारें मुख्य सैन्य घेऊन तो स्वतः हुकेरीला आपल्या जहागिरींतच राहिला होता, हें ह्या संबंधांत ध्यानांत घेण्यासारखें आहे.

शिवाजीराजांचें सैन्य राजापुराहून निघालें तें रुस्तुमजमाच्या या स्नेहसंबंधामुळे मधला त्याचा मुलूख सोडून देऊन, आचरें, वेंगुर्लें,

कुडाळ या प्रदेशाकडे गेलें. तो भाग वाडीकर सावंताचा होता. एक वर्षापूर्वीच राजांनी आदिलशाहाच्या स्वारीपासून आपला केलेला बचाव व त्या वेळीं आपण केलेला मित्रत्वाचा करार (इ. १६५९ मार्च ५) वाडीकर लखम सावंत विसरले. आणि त्यांनी राजांना प्रतिकार करण्याची तयारी केली! पण ती फलद्रूप झाली नाही आणि कुडाळचा किल्ला मराठ्यांनी घेतला (इ. १६६० फेब्रु.). या वेळीं आणि नंतर तीनचार महिने शिवाजीराजे पन्हाळयांत गुंतून पडल्यामुळे इकडील मोहिमेचा व्हावा तसा पाठपुरावा झाला नाही व दारूगोळा संपल्यामुळे कुडाळ किल्ला त्यांना सोडून द्यावा लागला (मार्च १९–२०). आचऱ्याच्या 'राजा'नेहि शिवाजी-राजांच्या लोकांना प्रतिकार करून पाहिलें. पण वर सांगितल्याप्रमाणे शिवाजीराजांच्या सैन्याला रुस्तुमजमाचें अप्रत्यक्ष साह्य झालें. त्याने राजांची अडचण जाणून कुडाळ व फोंडा हे किल्ले आपल्या ताब्यांत घेतले व लखम सावंतांशीं लढण्याचें काम आपल्या अधिकाऱ्यावर सोपविलें.

नेताजीची फौज, खुद्द राजांची फौज व त्यांची कोकणांतील फौज या तिन्ही फौजा मुख्यत्वें लूटमार करून द्रव्य संपादण्यासाठी व साधेल तो मुलूख संपादण्यासाठी स्वारीवर निघाल्या होत्या. पण महाराजांच्या फौजेला मिरजेचा वेढा सोडून परत फिरावें लागलें आणि स्वतः तेच पन्हाळगडावर वेढ्यांत सापडले. तेव्हा इतर फौजाहि मागे फिरल्या. त्यांनी पन्हाळ्याला वेढा घालणाऱ्या सिद्दी जौहराच्या लोकांना सतावण्याचा उद्योग केला. तो यशस्वी झाला नाही. पण नेताजीने विजापूरनजीकचें शहापूर हें सधन उपनगर मनसोक्त लुटलें. मुल्ला महंमद व आणखी एकदोन प्रतिकार करण्यासाठी आलेल्या सेनापतींचा त्याने सहज पराजय केला; व त्यांचे २००० घोडेस्वार कैद केले. त्यामुळे राजधानींत दहशत पडून सिद्दी जौहराला वेढा उठवून परत बोलवण्यांत येईल असा नेताजीचा अंदाज होता. पण एवढा मोठा पराक्रम करणाऱ्या नेताजीबरोबर फार थोडें सैन्य होतें, ही गोष्ट लौकरच उघडकीस आली. त्यामुळे विजापुरांत थोडा धीर आला,

आणि वेंगुर्ल्यांचा जहागीरदार खवासखान याने गोवळकोंड्याचें सैन्य मदतीला घेऊन नेताजीला मागे हटविलें.

पन्हाळयाचा वेढा

शिवाजीराजे इ. १६६० मार्च ते जुलै असे चार साडेचार महिने पन्हाळगडावर अडकून पडले होते. सिद्दी जौहराने पहिल्या महिना दीड महिन्यांत वेढा पक्का आवळून शिवाजीराजांच्या सर्व वाटा बंद केल्या. पावसाळ्याची फिकीर न करतां तात्पुरतीं छपरें बांधून पावसांतहि वेढ्याचें काम चालू ठेविलें. राजापूरच्या इंग्रज वखारवाल्यांकडून एक तोफ व दारूगोळा आणवून किल्ल्यावर जोराची सरबत्ती केली. पन्हाळा सर्व बाजूंनी वेढून शिवाय त्याने खारेपाटण, सौंदळ इकडेहि शिवाजीराजांच्या मुलखावर स्वाऱ्या केल्या. सिद्दी जौहर आदिलशाहीविरुद्ध बंडखोरीने वागत होता हें मागे सांगितलेंच आहे. समान विचारांच्या आपणाशीं तो कडकपणें वागणार नाही अशी राजांची अपेक्षा होती. परंतु सिद्दी जौहराने वेढ्याच्या कामीं अपेक्षेबाहेर नेट धरल्यामुळे नाइलाज होऊन शिवाजीराजांनी त्याच्याकडे सलोख्याचें बोलणें लावलें. प्रथम त्याचा कांही उपयोग झाला नाही. तसा उपयोग होत नाही असें पाहून त्याच्यामार्फत अली आदिलशाहाकडे क्षमेची याचना करून खंडणी देण्याचेंहि त्यांनी कबूल करून पाहिलें. पण हातांत सापडलेल्या राजांना आता सहजासहजी कोण सोडणार ! या प्रकारें सामदाम निरुपयोगी ठरला. दंड करणें तर अशक्य. व भेदाचेहि मार्ग नाहीत. अशी महाराजांची अवस्था झाली. तरीहि त्यांनी प्रयत्न सोडला नाही. आणि शेवटीं कांही चालेना तेव्हा त्यांनी अत्यंत धाडसाचा प्रयोग करण्याचें ठरविलें. त्याला कारणहि तसेंच घडलें. शिवाजीराजांनी पन्हाळा किल्ला बराच वेळ लढविण्याची चांगली तयारी करून ठेविली होती. परंतु ते वेढ्यांत सापडल्यावर, त्याच वेळीं मोगलांचा सरदार शायिस्तेखान याने पुण्याकडे स्वारी आणली आणि झपाट्याने बराच मुलूख काबीज केला. यामुळे आता पन्हाळा लढविण्यापेक्षा त्यांतून बाहेर

कसें पडतां येईल याचा राजांना विचार करावा लागला. मालक वेढ्यांत अडकून पडल्यामुळे शिवाजीराजांच्या लोकांचा धीर खचत चालला, खुद्द जिजाबाई राजगडावर काळजींत पडल्या, आणि या आणीबाणीच्या वेळीं राजांना पन्हाळ्यांतून कसें मुक्त करावें याविषयीं सर्व जण फिकिरींत पडले.

शायिस्तेखानाची स्वारी

औरंगजेबाने राज्यारोहणाच्या वेळीं (इ. १६५९ जून ५) जे फेरबदल केले, त्यांत औरंगाबादच्या सुभ्यावर शहाजादा मुअज्जम याच्याऐवजी शायिस्तेखानाची नेमणूक हा एक होता. त्या वेळीं औरंगजेबाचा शिवाजीराजांशीं सलोखा होता. मग सात महिन्यांच्या आत (इ. १६६० जानेवारीअखेर) शायिस्तेखानाची ही स्वारी कां निघाली? महाराजांनी पन्हाळ्यावर ठाण मांडून आदिलशाहीच्या छातीवर पिस्तुल रोखलें. त्यामुळे भयभीत होऊन विजापूर दरबाराने मदतीची याचना केली; व त्यामुळे औरंगजेबाने शायिस्तेखानाला स्वारीचा हुकूम दिला, असें कारण शिवभारतकार सांगतो. किंवा कदाचित् शिवाजीराजे तिकडे पेंचांत सापडले आहेत असें पाहून, औरंगाबादच्या सुभ्यावर नव्याने आलेल्या शायिस्ते-खानाने आपण होऊन इकडे स्वारी करण्यास ही वेळ निवडली असेल! त्या स्वारीने शिवाजीराजांवर एकदम दोन प्रबल सत्तांशीं टक्कर देण्याचा भयंकर प्रसंग ओढवला एवढें मात्र खरें.

इ. १६६० फेब्रुवारीअखेर अहमदनगराहून निघून शायिस्तेखान पुणें प्रांतांत शिरला. सोनवडी, सुपें, बारामती व होळ या मार्गाने एप्रिल अखेरच्या आठवड्यांत तो शिरवळास आला. तेथून आसपासच्या मुलखांत लहान लहान तुकड्या पाठवून त्याने राजांचा मुलूख उद्ध्वस्त केला. आणि मुख्य सैन्य राजांच्या बाळपणच्या गावीं म्हणजे खेडशिवापुरास पाठविलें. तेथून सिंहगडाच्या पिछाडीवर हल्ला करण्याचा त्याचा प्रयत्न होता; पण तो फसला. मग सासवडास जाऊन त्याने तें ठाणें घेतलें. पण पुरंधर किल्ला त्याच्या हातीं लागला नाही. उघडा मुलूख पादाक्रांत झाला तरी किल्ले बेलागच राहिले. तेव्हा मे महिन्यांत पुण्याकडे वळून शायिस्तेखान तेथे चाळीस दिवस मुक्काम करून राहिला. मध्यंतरीं मराठ्यांनी प्रतिकार करून पाहिला; पण एवढ्या मोठ्या सैन्यापुढे त्यांचें कांही चाललें नाही. तेव्हा

त्यांनी आसपासचा मुलूख उद्ध्वस्त करून त्याला पुण्याला छावणीला राहणें अशक्य करून टाकलें. त्यामुळे शायिस्तेखान मोगली सरहद्दीकडे सरकत जाऊन अखेरीस चाकणला तळ देऊन राहिला. तेथे त्याला रसद मिळाली. तेव्हा सिंहगड-पुरंधर घेतां आले नाहीत, त्याचा राग चाकणच्या संग्रामदुर्ग ह्या प्रबळ भुईकोटावर त्याने काढला. सतत दोन महिने वेढा घालून आंतील छोट्याशा शिबंदीबरोबर त्याला झगडावें लागलें. तेव्हा कोठे १५ ऑगस्टला तो किल्ला मोगलांना मिळाला. या झगड्यांतील फिरंगोजी नरसाळा या निष्ठावंत किल्लेदाराचा पराक्रम पाहून शायिस्तेखान खूष झाला. त्याने मोगलांची नोकरी करावी म्हणून त्याला खानाने आमिषें दाखविलीं. पण त्या आमिषांना नरसाळा मुळीच भुलला नाही.

पुण्याकडे आक्रमण करणाऱ्या शायिस्तेखानाला शक्य त्या प्रकारें मराठ्यांनी विरोध करून पाहिला. परंतु मोगलांच्या अवाढव्य सैन्यापुढे त्यांचा टिकाव लागला नाही. तशीच गोष्ट नेताजीची पन्हाळ्याच्या वेढ्यासंबंधी झाली. मराठ्यांच्या पहिल्या मुसंडीच्या वेळीं आगेमागे राहिलेले कोनकोपरे जिंकून घेतांना साताऱ्याच्या पश्चिमेकडील उत्तरतिवरा घाटाजवळचा विजापूरकरांचा वासोटा हा जुना व दुर्गम किल्ला नेताजीने स्वराज्याला जोडला (इ. १६६० जून ६). पण जिचा प्रत्यक्ष पन्हाळ्याच्या वेढ्यावर परिणाम होईल अशी एकहि हालचाल त्याला साधली नाही. वेढा फोडण्याच्या एका प्रयत्नांत तर नेताजीने पाठविलेल्या सिद्दी हिलाल या सेनापतीचा सिद्दी जौहराच्या एका तुकडीने पार मोड केला. वेढा ढिला करण्याचे मराठ्यांचे सर्वच प्रयत्न फसले. पुण्याकडे आणि पन्हाळ्याकडे दोन्ही बाजूंना असा नाइलाज झाला. तें पाहून, राजरोस वेढा उठत नाही तर थोडेसे लोक घेऊन पन्हाळ्यावरून आता पलायन करून निसटावें, असा राजांनी धाडसी बेत योजिला.

पन्हाळगडावरून धाडसी पलायन

एकंदर विचार करून राजांनी इ. १६६० जूनअखेर सलोख्याचें बोलणें लावलें. अजीजीने निकड लावली. आणि क्रमाक्रमाने नरमाई अधिक वाढविली. शेवटीं सिद्दी जौहरानेच आपणासाठी आदिलशाहाकडे रदबदली

करावी, आपण आपली सर्व मालमत्ता व राज्य अलीशाहाला अर्पण करण्यास तयार आहों, येथपर्यंत ते आले. राजांनी गंगाधर नांवाच्या वकिलामार्फत असें बोलणें वारंवार केलें. शेवटीं सिद्दी जौहराने तें मान्य करून शिवाजी-राजांची भेट घेण्याचें ठरविलें. दिवस ठरला असेल किंवा नसेल. पण ह्या बोलण्यामुळे सिद्दी जौहर बेसावध राहिला; व दुसऱ्या दिवशीं (जुलै १२, गुरुवार) मुसळधार पाऊस व वादळी हवा पडली याचा फायदा घेऊन राजे पन्हाळगडावरून रात्रीं पहिल्याच प्रहरांत बाहेर पडले. आपल्या मागे पन्हाळा किल्ल्याच्या संरक्षणाचें काम त्यांनी त्र्यंबक भास्कर या अधिकाऱ्यावर सोपविलें. निघतेवेळीं २ पालख्या, कांही खजिना, ६०० ते १००० पायदळ आणि आणीबाणीच्या वेळीं उपयोगी पडावे म्हणून १५ उमदे घोडे राजांनी आपल्या मुक्तियात्रेंत घेतले व ते हेरांनी पूर्वी पाहून ठेवलेल्या रस्त्याने अधूनमधून चमकणाऱ्या विजेच्या प्रकाशांत विशाळगडाच्या मार्गाला लागले.

अफजलखानाच्या स्वारीच्या नंतर राजांनी पन्हाळगड घेतला (इ. १६५९ नोव्हें. २८). त्याच्या आधी दोनचार दिवस राजांच्या फौजांनी विशाळगड जिंकून घेतला होता. या दोन्ही किल्ल्यांवर त्यांचा ताबा पक्का बसण्यापूर्वी ते किल्ले परत जिंकून घेण्याचा प्रयत्न सिद्दी जौहर करणार हें ठरल्यासारखें होतें. या स्वारींत राजांनी नुकत्याच जिंकून घेतलेल्या इतर मुलखाप्रमाणे तेहि दोन किल्ले परत घेणें हें सिद्दी जौहराचें उद्दिष्ट असून, पन्हाळ्याप्रमाणे विशाळगडाला देखील वेढा घालण्याची योजना त्याने केली. पन्हाळगडाला स्वतः आपण तो वेढा घालून बसला आणि विशाळगडाला वेढा घालण्याचें काम त्याने कोकणांतील पालवणचा राजा जसवंतराव दळवी आणि शृंगारपूरचा राजा सूर्यराव सुर्वे या दोघांवर सोपविलें. यामुळे विशाळगड गांठावयाचा, तर राजांना पहिल्याने पन्हाळगडाला असलेला सिद्दी जौहराचा वेढा फोडून किंवा चुकवून बाहेर पडायला हवें होतें. आणि त्यानंतर विशाळगडाला पडलेला दळवी व सुर्वे या दोघांचा वेढा मोडून काढणें किंवा तो चुकवून त्या गडावर जाणें अवश्य होतें. आणि त्यासाठी प्रसंग पडेल तसा उपयोग करतां यावा एवढी छोटीशी पण स्वयंपूर्ण सैन्याची तुकडी राजांनी बरोबर घेतली होती.

राजांनी प्रस्थानासाठी निवडलेला दिवस आषाढ शुद्ध पौर्णिमेचा (इ. १६६० जुलै १२) होता. झाला तर चांदण्याचाहि उपयोग व्हावा अशा

बेताने, वेढा घालणाऱ्या सिद्दी जौहराच्या ध्यानींमनींहि येणार नाही अशा वेळीं रात्र पडतांच ते निघाले. भर पावसाळा, वाट डोंगरी, रस्ते दगडधोंड्यांनी, चिखलपाण्यामुळे व वाहत्या नाल्याओढ्यांमुळे खराब झालेले. यामुळे राजांच्या सराईत अनुयायांना देखील मधलें ४० मैलांचें अंतर तोडण्यास सुमारें सात प्रहर म्हणजे २१ तास लागले. राजे विशाळगडाजवळ दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं सुमारें ५–६ वाजण्याच्या सुमारास पोंचले. राजांचें हें धाडसी पलायन अगदी अनपेक्षित होतें. यामुळे त्याची बातमी सिद्दी जौहराला ताबडतोब लागली नाही. बऱ्याच वेळाने बातमी लागल्या-



पन्हाळगडचा वेढा (इ. १६६०)

नंतर सिद्दी जौहराने आपला जावई सिद्दी मसऊद याच्या हाताखाली राजांच्या पाठीवर सैन्य पाठविलें. पाठलागाच्या सैन्याला पावसाळ्यांतील रस्त्यांच्या त्याच अडचणींना तोंड द्यावें लागलें आणि त्यामुळे त्या सैन्याला मधलें अंतर कमी करतां आलें नाही. बहुधा त्या सैन्याशीं राजांची प्रत्यक्ष गाठ केव्हाच पडली नाही. विशाळगडाला वेढा घालून बसलेल्या जसवंतराव व सूर्यराव यांच्याच फौजांमधून त्यांना त्या गडाचा मार्ग काढावा लागला. गजापूरच्या ‘ पावन ’ खिंडींतील बाजी प्रभूच्या आत्माहुतीचा रोमहर्षक प्रसंग ह्याच प्रसंगांत अस्तमानीं घडला.

बाजी प्रभूची आत्माहुति

एकसारखे सात प्रहर बिकट वाटांनी पांच योजनें चालून दमलेली राजांची तुकडी. आणि वेढा घालून बसलेल्या ताज्या दमाच्या फौजांची फळी फोडण्याचा प्रसंग. आणि त्यांतून त्यांचा पाठलाग करीत येणारें, जरा उशीर झालाच तर येऊन भिडेल असें, त्वेषाने अंतर कापीत येणारें सिद्दी मसऊदचें कडवें घोडदळ. ही अत्यंत आणीबाणीची वेळ होती.

विशाळगडाच्या वेढ्याचें कडें गजापूरच्या घाटीच्या घोडखिंडीपर्यंत पसरलेलें होतें. तें फोडून तटापर्यंतचें चारसहा मैलांचें अंतर महाराजांना तोडावयाचें होतें. आणि अस्तमानाच्या अर्धवट उजेडांत ही गोष्ट शत्रूचें लक्ष गेल्याशिवाय पार पाडणें अशक्य होतें. घोड्यावर बसून महाराजांनी कितीहि चपळाई केली तरी वेढ्यांतील ताज्या दमाची फौज त्यांच्या मागे तास दीड तास तरी गुंतवून ठेवण्याची खबरदारी घेणें जरूर होतें. सर्व मदार महाराजांबरोबरच्या मोजक्या सहाशे पायदळावरच पडली. महाराजांनी बरोबर आणलेले हे लोक हिरडस मावळच्या बांदल देशमुखांच्या कडव्या जमातींतील होते. त्यांचें नेतृत्व त्या मावळचे देशकुळकर्णी बाजी प्रभु देशपांडे या पराक्रमी पुरुषाकडे आलें होतें. बाजी प्रभु हे महाराजांच्या विश्वासांतले होते. आपल्या मावळांतील गडावरील सुव्यवस्थेचें काम महाराज त्यांच्यावर सोपवीत असत.

बाजी प्रभूंनी प्रसंग ओळखला; पाठलागाला येणाऱ्या वेढ्यांतल्या फौजेचा लोंढा थोपवून धरण्याचें काम जिवावर उदार होऊन पत्करलें. महाराज आपल्या समोरून निसटून गेले हें ध्यानांत येतांच शत्रूचा प्रतिकार तीव्र झाला. पण बांदलांचें सैन्य दमलेलें असतांना देखील जिवाच्या कराराने लढलें. बाजी प्रभु आघाडीवर राहून आपल्या लोकांची हिंमत वाढवीत होते. शत्रूचे वार झेलीत होते. बांदलांच्या लोकांनी पराक्रमाची शर्थ केली. महाराज गडावर पोंचल्याच्या इशारतीचा आवाज कानीं पडला आणि मगच बाजी प्रभूंनी आपले प्राण सोडले. कुमकेच्या अभावीं नंतर बांदलांच्या राहिलेल्या मूठभर लोकांची कशी कत्तल झाली असेल हें सांगावयास नको. महाराजांना ही गोष्ट फार लागली. अफजलप्रसंगांतील उत्कृष्ट कामगिरीसाठी जेधे देशमुखांना दरबारांत ‘तरवारेच्या पहिल्या

पाना'चा मान होता. तो आता बांदल देशमुखांना द्यावा असें महाराजांनी ठरविलें व त्यासाठी जेध्यांची संमति मिळविली. स्वराज्यांतील पहिल्या दर्जाच्या वीरत्वाचा मान बाजी प्रभूंनी आपल्या बलिदानाने मिळविला. स्वामिभक्त बाजी प्रभूंचें नांव इतिहासांत अजरामर झालें.

राजे विशाळगडावर सुखरूप पोंचल्यावर पन्हाळगडापासून त्यांचा पाठलाग करीत आलेला सिद्दी मसऊद येऊन पोंचला. आणि विशाळगडाला वेढा घालणाऱ्या सैन्यांतच दाखल होऊन शिवाजीराजांना पन्हाळगडाप्रमाणेच तेथे कोंडून ठेवण्याच्या इरेस पेटला. पण राजांच्या आगमनामुळे हिंमत वाढलेल्या आंतील मराठ्यांच्या फौजांनी अनेक प्रतिहल्ले करून वेढा कापून काढल्यामुळे सिद्दी मसऊद निघून गेला. शिवाजीराजेहि विशाळगड सोडून जुलैअखेर राजगडावर गेले आणि मातुश्री जिजाबाईचें दर्शन घेऊन त्यांनी त्या माउलीची काळजी दूर केली. आता थोड्या दिवसांत शायिस्तेखानापासून चाकणचा संग्रामदुर्ग बचावण्याची कांही योजना ते करणार, इतक्यांत तो किल्ला शायिस्तेखानाच्या स्वाधीन झाला (ऑगस्ट १५), ही वाईट बातमी त्यांच्या कानीं आली. पण त्याशिवाय त्याहूनहि वाईट अशी एक गोष्ट त्यांना समजली. चाकणचा हा संग्रामदुर्ग किल्ला घेतांना शायिस्तेखानाला आलेला अनुभव उत्तेजक नसल्यामुळे जरी त्याच्या इकडील हालचाली थोडे दिवस थांबल्या, आणि त्याने छावणी करून कांही दिवस स्वस्थ राहण्याचें ठरविलें, तरी देखील ती छावणी त्याने खुद्द पुण्यांत केली (इ. १६६० सप्टें.-ऑक्टो.), आणि स्वतःचा मुक्काम खुद्द राजांच्या लालमहालांतच ठेवला. राजांना ही गोष्ट अपमानास्पद वाटली. परंतु स्वराज्याची उत्तरेकडील सरहद्द कमकुवत असल्यामुळे पुणें जहागीर अशा रीतीने नेहमीच मोगलांच्या तावडींत सापडे व कांही इलाज चालत नसे.

पन्हाळा देऊन विजापूरकरांशीं सल्ला

राजांच्या सुटकेमुळे मराठ्यांना आता धीर आला. पण त्यामुळेच अली आदिलशाहाची सर्व आशा आणि स्वस्थता नष्ट झाली. शिवाजीराजे पन्हाळ्यांत अडकले होते, तोंपर्यंत अली निष्काळजी होता. पण आता शिवाजीराजे निसटून गेल्यावर ते काय करतात या विवंचनेंत तो पडला. आणि त्यांनी पन्हाळ्यावर असतांना सलोख्याचें बोलणें लावले होतें, तें मान्य

करण्यांत आपला सुरक्षितपणा आहे असें त्याला वाटूं लागलें. राजांचा पक्षपाती रुस्तुमजमा अशा सलोख्याच्या खटपटींत होताच. त्याच्या खटपटीला महत्त्व येऊन रुस्तुमजमावर सुलतान अल्लीची आता मेहेरबानी झाली. त्याला त्याने सेनापतिपद व नवी जहागीर दिली. आणि पन्हाळ्याचें प्रकरण निकालांत काढण्यासाठी सुलतान स्वतः मिरजेपर्यंत आला. राजांनी देखील स्वतःच्या जहागिरींत शिरलेल्या शायिस्तेखानाकडे चांगलें लक्ष पुरवावयास मिळावें म्हणून पन्हाळा किल्ला सिद्दी जौहराला परत देऊन तेथील आपलें सैन्य काढून घेतलें (इ. १६६० सप्टेंबर २२).

या मोहिमेचा एकंदर निष्कर्ष पाहतां, शिवाजीराजे यांनी अफजल-प्रसंगानंतर जिंकून घेतलेला वाई ते कोल्हापूरचा मुलूख आणि कोकणांतील दाभोळ ते कुडाळ हा प्रदेश स्वराज्यांत दाखल झाला. आणि जरी पन्हाळा व कुडाळ हे दोन किल्ले राजांना सोडावे लागले, तरी विशाळगड, वासोटा, असे कांही चांगले किल्ले त्यांच्या हातांत राहिले. आणि मुख्य म्हणजे शायिस्तेखानाची मोलाची मदत मिळून देखील राजांना नेस्तनाबूद करण्याचें आदिलशाहीचें उद्दिष्ट दूरच राहिलें, राजे पुन्हा अप्रतिहत संचार करण्यास मोकळे झाले. आदिलशाहीला दुसऱ्याने राजांच्या पुढे नामोहरम व्हावें लागलें. तोच प्रसंग पुढे मोगलांचा सुभेदार शायिस्तेखान याच्यावरहि तीन वर्षांत आला.

* * *

इंग्रजांचा उपद्व्याप

(प्रेसिडेंट् अॅण्ड्रूजचें पत्र)

"पन्हाळ्याच्या वेढ्यांत जाऊन इंग्रजांचा बावटा फडकावून गोळे उडविलेत, त्याचें हें (कैद) प्रायश्चित्त आहे...परदेशांत असे उपद्व्याप केले तर त्याचें फळ असेंच भोगावें लागतें. शिवाजीची दारूगोळा न विकण्याबद्दलची आज्ञा खुद्द रेव्हिंग्टनला माहीत होतीच!"

इंग्लिश फॅक्टरीज् इन् इंडिया, खंड ११, पृ. ८७.

९ शायिस्तेखानाचें शासन

एकेकाशीं सामना

शिवाजीराजांच्या दोन सामर्थ्यवान् शत्रूंपैकी एक आदिलशाही आता खिळखिळी झाली. तथापि दुसरी मोगलाई फार प्रबळ असून ती शायिस्तेखानाच्या रूपाने शिवशाहीच्या राशीला येऊन बसली होती. मागच्या प्रकरणांत वर्णिल्याप्रमाणे या दोन्ही सत्तांनी एकाच वेळीं राजांना पेंचांत पकडलें. परंतु हें सहकार्याचें धोरण अखेरपर्यंत टिकलें नाही आणि जरी आरंभीच्या दोघांच्या हालचाली एकमेकांना पूरक झाल्या, तथापि पुढे त्यांमधील सहकार्य नष्ट झालें आणि त्यांपैकी एकेकाला तोंड देणें राजांना शक्य झालें. आदिलशाही आणि मोगलाई या दोहोंचेहि दळणवळणाचे मार्ग त्यांच्या विजापूर व औरंगाबाद या शक्तिकेंद्रांपासून खूपच लांबलेले आणि त्यांच्या फौजाहि भाडोत्री. याच्या उलट शिवाजीराजे अगदी स्वगृहीं आणि मायभूमीसाठी पोटतिडीक बाळगणाऱ्या व स्वत्वाची जाणीव झालेल्या फौजांनिशीं लढत होते. आणि यामुळे जरी मोगली फौजा बरेच दिवस राजांच्या जहागिरींत, नव्हे खुद्द लालमहाल वाड्यांत, जेठा मारून बसल्या होत्या, तरी देखील त्यांना राजांनी यश येऊं दिलें नाही. सिद्दी जौहराच्या वेढ्यांतून निसटून जसा त्यांनी मोगलांच्या आक्रमणाला प्रथम शह दिला, तसेंच आता हिरिरीने ठाण मांडून बसलेल्या शायिस्तेखानाला जबर शासन पोंचविलें. आपण कोणत्याहि संकटाला मोजीत नाही असें त्यांनी स्वपरजनांना पुन: एकवार पटवून दिलें. तोच अद्भुत पराक्रम आता कथन करावयाचा.

उंबरखंडांत मोगल सापडले

एकाच वेळीं दोन शत्रूंशीं लढून राजांचा निभाव लागण्यासारखा नव्हता. तथापि एकेकट्याला युक्तीप्रयुक्तीने जाग्यावर बसविण्यास राजे

समर्थ होते ह्याची कल्पना शायिस्तेखानाला नव्हती. तो मोगली सत्तेची सरहद्द वाढविण्याचा एकच ध्यास घेऊन बसला होता. शिवाजी काय किंवा आदिलशाही काय, दोन्ही मोगलांचीं न्याय्य भक्ष्यें होतीं असें त्याला वाटे. दोघेहि त्याच्या मतें क्षुद्र असल्यामुळे कोणाचीहि कदर करण्याची आवश्यकता त्याला वाटली नाही. आणि शिवाजीराजांवर आक्रमण सुरू असतांनाच तिकडे विजापूरकरांच्या मुलखांतहि त्याने गडबड चालू ठेवली. यामुळे मोगल व विजापूरकर यांचें संगनमत बिघडून शिवाजीराजांना एकट्या मोगलांचा समाचार घेतां आला.

या वेळीं सुलतान अली आदिलशाहा कर्नाटकाकडे मुलूख जिंकण्याचें काम नेटाने करीत होता. ही संधी साधून शायिस्तेखानाने कहारतलबखानास परिंडा या विजापुरी किल्ल्यावर (उस्मानाबाद जिल्हा) पाठविलें. त्याने लाच देऊन व कांही धाकदपटशा दाखवून तेथील किल्लेदार गालीब याच्याकडून तो मजबूत किल्ला मोगलांकडे घेतला (इ. १६६० नोव्हें. २०). स्वतः गालीबहि मोगलांच्या नोकरींत शिरला.

परिंडा किल्ला तसा फार दूर नाही. विजापूरकरांच्या मुलखांत हें मोगलांचें ठाणें बसल्याने विजापूरकरांच्या इतकेंच शिवाजीराजांनाहि तें जाचक होणार होतें. शिवाय कोकणांतहि शिवाजीराजांचा आश्रय साफ तोडून काढण्याचा उद्योग शायिस्तेखान आधीपासूनच करीत होता. तो पुरा करण्याची कामगिरी परिंड्यास यशस्वी झालेल्या कहारतलबखानावर त्याने सोपविली. चौल, कल्याण, भिवंडी, पनवेल व नागोठणें इकडील राजांच्या मुलखावर त्याला पाठविण्याचें योजिलें. त्याचेबरोबर चव्हाण, गाढे, कोकाटे, जाधव असे मराठे सरदार व विदर्भातील महिला सेनापति रायबागीण होती. शायिस्तेखानाची या वेळीं दुसऱ्या कोठेच स्वारी निघालेली नव्हती. यामुळे कहारतलबखानाबरोबर निवडक व नामांकित सैन्य शिवाजीचा पार नाश करण्याकरिता दिलेलें होतें. पाली-नागोठणें व कल्याण-भिवंडी अशा दोन्ही बाजूंकडील रस्ते उंबरखंड (आता उंबरखिंड) या अरण्य-भागांतूनच जात असल्यामुळे मोगलांचें हें मोठें सैन्य पुण्याहून लोहगड मार्गाने कोकणांत तेथेच उतरलें. उंबरखंडांत उतरतांना तें नलिकायंत्रासारख्या वाटेने म्हणजे

बहुधा आंबेनळीच्या रस्त्याने उतरलें.* त्याची बित्तंबातमी राजांनी बरोबर ठेविली होती. त्या वेळच्या शिरस्त्याप्रमाणे हें सैन्य सकाळीं घाट उतरलें. राजांनी प्रथम त्याला कोठेहि न अडवितां अडचणीच्या निबिड अरण्यांत पूर्णपणें शिरूं दिलें; व एकदा तें घनदाट अरण्यांत अडकलें असें पाहून चारी बाजूंनी लपवून ठेवलेल्या सैन्याकडून त्याजवर असा जोराचा हल्ला केला, की आता आपण सर्व येथेच गारद होतों की काय अशी खानाला भीति पडली. तोफांचे गोळे, बाण व मध्येच विजेप्रमाणे चमकून लगेच अरण्यांत दिसेनासे होणारे शस्त्रधारी मावळे, यांच्या माऱ्यापुढे एवढा मोठा सेनापति आणि एवढें समर्थ सैन्य टेकीस आलें. आणि मध्याह्नाच्या सुमारास रायबागिणीच्या सल्ल्यामुळे खानाने शरणागतीचें बोलणें लावलें (इ. १६६१ फेब्रु. २). राजांनी उदारपणाने सर्वांस जीवदान दिलें. प्रत्येक सरदाराकडून मोठी खंडणी घेतली व खानाला आल्या वाटेने परत जाण्याची आज्ञा केली. एवढा मोठा पराजय झाल्यावर आता कोठे शायिस्तेखानाचे डोळे उघडले!

इंग्रजांना प्रायश्चित्त


मोगलांचा काय किंवा आदिलशाहाचा काय असा एखादा पराजय करून त्यांना कायमचें थोपविणें शक्य नाही, हें शिवाजीराजांना चांगलें माहीत होतें. कोणत्या ना कोणत्या स्वारींत गुंतवून ठेवून त्या दोघांनाहि मुळीच उसंत मिळूं नये, म्हणून त्यांच्याविरुद्ध एकसारखी हालचाल करीत राहणें महाराजांना अवश्य होतें. शिवाय पुण्याच्या आसपासचा मुलूख शायिस्तेखानाने ताब्यांत घेतला तसें कोकणांत होऊं देतां कामा नये यासाठीहि जपणें अवश्य होतें. पन्हाळ्याच्या वेढ्यांत इंग्रजांनी सिद्दी जौहराला तोफ व दारूगोळा पुरविला, त्याबद्दलहि त्यांना योग्य शासन करून आपली इभ्रत वाढविणें जरूर होतें. तसेंच विशाळगडाला वेढा घालून सिद्दी जौहराला दुसऱ्या तऱ्हेने मदत करणारे पालवणचे दळवी राजे व शृंगारपूरचे सुर्वे राजे यांचें पारिपत्य केल्याशिवाय महाराजांचा दाब बसणें शक्य नव्हतें. ह्या सर्व गोष्टी साधण्यासाठी व उंबरखंडांत मिळविलेल्या विजयांत भर घालण्यासाठी

---

* पृ. ३४ वरील नकाशा पाहा.

लगोलग कोकणांतहि स्वारी काढून आपली छाप बसविणें राजांना महत्त्वाचें वाटत होतें. आणि अडचणीच्या काळांत नवी स्वारी योजून तींत यश मिळविण्याइतका, सैन्याची हिंमत टिकविण्याचा, दुसरा प्रभावी मार्गच नसतो, हेंहि महाराजांना माहीत होतें.

म्हणून उंबरखंडाच्या युद्धानंतर राजांनी आपल्या सैन्याचे दोन भाग केले. एक नेताजीच्या हाताखाली मोगलांचे बंदोबस्ताकरिता बोरघाटांत ठेवला आणि दुसरा आपण स्वतः बरोबर घेऊन ते दक्षिणेकडे निघाले. आधीच्या मोगलांच्या कारस्थानांनी रायगड-महाड भागांत कदाचित् कांही चलबिचल झाली असती, तिचा उंबरखंडाच्या विजयामुळे आपोआप बंदोबस्त झाला आणि वाटेंतील मुलूख केवळ दहशतीनेच त्यांच्या हाती आला. पालवणचा राजा जसवंतराव आपला निभाव लागणार



कोकणची स्वारी (इ. १६६१)

नाही हें ओळखून शृंगारपूरच्या सूर्याजीरावाच्या आश्रयाला गेला. दाभोळच्या बंदोबस्ताकरिता २००० सैन्य ठेवून राजांनी परशुरामाचें दर्शन घेतलें आणि पुढे ते संगमेश्वरला गेले. तेथील अधिकारी आधीच पळून गेले होते; तेव्हा पिलाजी नीळकंठराव व तानाजी मालुसरे अशा दोघांना संगमेश्वरच्या ठाण्यावर ठेवून त्यांच्याशीं स्नेहाने वागण्याबद्दल तेथून जवळच्याच शृंगारपूरच्या राजाला त्यांनी सांगून पाठविलें. शृंगारपूरचा राजा सूर्यराव याने इ. १६५६ च्या मोरे प्रकरणाच्या वेळींच भयभीत होऊन शिवाजीराजांचा आश्रय मागितला होता व तेथपासून शिवाजीराजांनी शत्रूवर स्वारी काढल्यास तींत तो त्यांना बहुधा मदत करी. म्हणून त्याच्यावर ही कामगिरी सोपवून महाराज पुढे गेले; व आगेकूच करून मुलूख व्यापीत राजांची फौज राजापुरावर येऊन थडकली (इ. १६६१ मार्च पूर्वार्ध).

राजांच्या शिरस्त्याप्रमाणे त्यांनी राजापुरांतील पुढाऱ्यांना बोलावून घेऊन कोणीं किती खंडणी द्यावी याचा ठराव करून घेतला व ती वसूल करून घेतली. राजापूर हें मुसलमानांचें ठाणें आणि त्या वेळचें त्या भागांतील सधन बंदर होतें. तेथे इंग्रजांप्रमाणेच पोर्तुगीज, मलबारी, अरबी इत्यादि परदेशी व अनेक स्वदेशी व्यापाऱ्यांचा मोठा उदीम चालत असे. तेव्हा या सर्वांनीच राजांच्या मागणीप्रमाणे आपल्या खंडण्या भरल्या. खंडणी भरण्याची ज्यांनी टंगळमंगळ केली त्यांना त्यांच्या गुन्ह्याप्रमाणे कैद वगैरे शासन अर्थात् भोगावें लागलें. इंग्रजांनी राजकारण लढवून खंडणीची टाळाटाळ चालविली. त्यामुळे राजे त्यांच्यावर नाराज झाले. शिवाय पन्हाळ्याच्या वेढ्यांत (इ. १६६० एप्रिल) सिद्दी जौहराला तोफ व तोफगोळे पुरविण्याचा मोठा गुन्हा त्यांनी केला असल्यामुळे राजांचा साहजिक त्यांच्यावर राग होता. त्यामुळे राजांनी हेन्री रेव्हिंग्टन प्रभृति इंग्रजांना कैद केलें आणि पुरून ठेवलेलें द्रव्य शोधण्याकरिता इंग्रजांची वखार खणून काढविली (इ. १६६१ मार्च). इंग्रजांनी याबद्दल बाहेर कितीहि कांगावा केला असला तरी राजापूरवर या वेळीं राजांची वक्रदृष्टि फिरण्याचें कारण आपणच आहों आणि ‘पन्हाळ्याच्या वेढ्यांत जाऊन इंग्रजांचा बावटा फडकावून आपण जे गोळे उडविले (पाहा पृ. ८६) त्याचें हें प्रायश्चित्त आहे’ हें इंग्रज जाणून होते. या साऱ्या प्रकरणांत इंग्रजांच्या या अव्यापारेषु व्यापारामुळे त्यांच्या कंपनीला फार

नुकसान सहन करावें लागलें. महाराजांनी रागाने या वेळीं वीस पंचवीस हजारांची लूट नेली. कांही इंग्रजांना पकडून नेऊन त्यांना सात महिन्यांपासून दोन वर्षांपर्यंत कैदेंत ठेवलें. त्यांतले दोघे कैदेंतच मेले. यांतलें निदान लुटीचें नुकसान महाराजांनी भरून द्यावें म्हणून इंग्रजांनी कैक वर्षें चिकाटीने मागणी केली. परंतु अखेरपर्यंत त्यांतून कांही निष्पन्न झालें नाही.

शृंगारपूरकरांचें पारिपत्य

राजापूरच्या इंग्रजांना शासन केल्याने स्वारीचें एक उद्दिष्ट सफल झालें. परंतु राजापूरच्या उत्तरेकडील पालवणच्या व शृंगारपूरच्या राजांचें काय करावयाचें हें राजांना अजून ठरवावयाचें होतें. शक्यतोंपर्यंत स्वकीयांना सामोपचाराने संधी देण्याचें त्यांचें धोरण असे. संगमेश्वरास आपल्या फौजा ठेवून त्यांच्याशीं स्नेहाने वागण्याबद्दल त्यांनी शृंगारपूरचा राजा सूर्यराव याला सांगून पाठविलें होतें, हें मागें सांगितलेंच आहे (पृ. ९८). जावळीच्या मोऱ्यांबरोबरच याचाहि काटा काढणें शक्य असतां, केवळ शरण आल्यामुळे याचें राजांनी आतापर्यंत रक्षण केलें होतें. पण तो उपकार विसरून अलीकडे विजापूरकरांच्या नादाने सूर्यराव राजांच्या विरुद्ध वागूं लागला होता. प्रत्यक्ष विशाळगडाच्या वेढ्यांत त्यांच्या विरुद्ध लढला होता. याहि वेळीं विजापूरकरांच्या चिथावणीमुळेच तो व त्याच्याकडे आश्रयाला आलेला पालवणचा (उत्तर दापोली तालुका) जसवंतराव यांनी संगनमत करून संगमेश्वरास ठेवलेल्या राजांच्या फौजांना घेरलें व त्या बेसावध असतांनाच मध्यरात्रीं कत्तलीला सुरुवात केली. परंतु तानाजी मालुसरे याच्या निधड्या छातीमुळे व प्रसंगावधानामुळे वेळ बचावली. पिलाजी नीळकंठ घाबरून पळून जाऊं लागला. त्याला त्याने दोरखंडाने एका दगडापाशीं बांधून ठेवलें! व आपल्या सैन्याला धीर देऊन चारपांच तास घनघोर युद्ध केलें. उजाडण्यापूर्वींच सूर्याजीरावाने पळ काढला (इ. १६६१ मार्चअखेर). सूर्याजीरावाच्या बेइमानीबद्दल आता शंका राहिली नाही आणि त्याचें पारिपत्य करणें अवश्य झालें. राजे राजापूरला गेले होते ते तातडीने परत फिरले. संगमेश्वराहून पुन्हा एकदा त्यांनी सूर्याजीरावाला सामोपचाराचा निरोप पाठविला. त्याला आपलें मांडलिकत्व पत्करण्यास सांगितलें आणि पालवणचा जसवंतराव त्याच्या आश्रयाला गेला होता त्याचें राज्य घेण्याच्या

कामीं साह्य करावें अशी त्याला त्यांनी आज्ञा केली. पुढे राजे पालवणवर चालून गेले. राजांनी पालवणचें राज्य घेतलें व त्याच्या बंदोबस्ताकरिता म्हणून चिरदुर्ग किल्ल्याची दुरुस्ती करून त्याला मंडणगड असें नांव दिलें. आज्ञा केल्याप्रमाणे सूर्याजीराव मदतीला आला नाही, असें पाहून त्यानंतर राजे मागे फिरले व पंधरा हजार पायदळ घेऊन शृंगारपुरावर चाल करून गेले. सूर्याजीराव शिवाजीराजांपुढे आपला टिकाव लागणार नाही असें पाहून भयभीत झाला व राज्य सोडून कुडाळच्या सावंताकडे गेला आणि त्याचा आश्रय करून राहिला. याला दोन कारणें झालीं. एक असें की, ज्यांच्या आधारावर विसंबून तो प्रथम राजांशीं उद्दामपणाने वागला ते त्याचे इष्टमित्र राजांचा दृष्टीपुढे घडत असलेला पराक्रम पाहून धास्तावले आणि मदत करण्यास न थांबतां त्याला सोडून गेले. आणि दुसरें असें की, राजांनी यापूर्वी स्नेहभावाने दोनदा संधी दिली त्या दोन्ही वेळीं आपण त्यांच्याशीं बेइमान झालों, तेव्हा आता त्यांस तोंड कसें दाखवावें, असें त्याला होऊन गेलें. म्हणून त्याने पलायनाचा मार्ग पत्करला. यामुळे अनायासाने हें प्रभावलीचें राज्य राजांच्या हातीं आलें (इ. १६६१ एप्रिल २९). तेव्हा त्यांनी शृंगारपूरच्या शेजारच्या किल्ल्याचें नांव बदलून तें 'प्रतीतगड' ठेवलें व कारभार त्र्यंबक भास्करास सांगितला.

विजापूरकरांशीं सलोखा

शृंगारपूरवरील विजयानंतर राजांचीं संकल्पित उद्दिष्टें साध्य झालीं. यामुळे त्यानंतर कांही वर्षें राजांनी विजापूरकरांची मोठी आगळीक केली नाही. यापुढे विजापूरकरांनीहि आपण होऊन राजांच्या वाटेला जाण्याचें टाळलें. याचा अर्थ आपसांतील किरकोळ कटकटी थांबल्या होत्या असा नाही. पण सुमारें तीनचार वर्षें उभयतांमध्ये सलोखा नांदला. या वेळच्या पाश्चात्त्य व्यापाऱ्यांच्या व विशेषतः इंग्रजांच्या पत्रांत याचा पडताळा मिळतो. विजापुरांत माजलेली पक्षोपपक्षांची बजबजपुरी आणि एकंदर आदिलशाहीचा दुबळेपणा हेंहि याचें कारण होतें. मोगलांचा ससेमिरा शिवाजीराजांप्रमाणे विजापूर व गोवळकोंडें या दोन्ही राज्यांच्या पाठीमागे लागलेला होता. तेव्हा अशा परिस्थितींत दक्षिणेंतील शाह्यांनी एकजुटीने राहावें हें शहाजीच्या वेळेपासून व्यावहारिक दृष्ट्या उत्तम म्हणून नांवाजलेलें

तत्त्व विजापूरकरांना आठवलें. त्यांनी तें आता मनापासून अमलांत आणलें असल्यास नवल नाही. इ. १६६१ मेच्या मध्यानंतर शिवाजीराजांशीं हा सलोखा झाला. राजांचे वृद्ध वडील शहाजीराजे ह्यांच्या मध्यस्थीचा या कामीं विजापूरकरांनी उपयोग करून घेतला, अशीहि मांडणी कित्येक लेखकांनी केली आहे.

शिवकालांतील राज्यांच्या सरहद्दी मनगटाच्या जोरावर मागेपुढे होत. तह आणि सलोखे जो तो केवळ आपल्या सोईप्रमाणे पाळी. एखादा तह झाला याचा अर्थ तेवढ्या वेळचें युद्ध थांबलें. नव्या कारणाने नवें युद्ध तेव्हाच सुरू होई. पन्हाळा देऊन विजापूरकरांशीं तह झाला होता. याचा अर्थ तेवढ्यापुरता वाद मिटला. आणि त्यानंतर आता राजापुराअलीकडील मुलूख शिवाजीराजांनी हस्तगत केल्यावर त्याला विजापूरकरांची संमति मिळाल्यामुळे दोघांचें युद्ध तात्पुरतें थांबलें. लौकरच पुढे ही युद्धबंदी मोडल्याची हकीकत येणार आहे. मोगलांनी एकदा इ. १६३६ त निजामशाहीच्या विभागणीचा तह करून घेतला. पण पुनः दक्षिणेंतील सर्वच राज्यें गिळंकृत करण्याचा उपक्रम करावा यांत त्यांना कांही गैर वाटलें नाही. शिवाजीराजांवर मोगलांचें वरून दडपण आलें म्हणजे तेहि आदिलशाही कोकणांत मुसंडी मारीत. आदिलशाहीच्या मनगटांत थोडासा जरी जोर आल्यासारखें वाटलें की, तेथील मुत्सद्दी शिवाजीराजांवर झडप घालीत. अशा रीतीने हा युद्ध आणि तह यांचा पाठशिवणीचा खेळ अप्रतिहत चाले.

शायिस्तेखानाची मगरमिठी

शायिस्तेखानाने पाठविलेल्या कहारतलबखानाचा उंबरखंडांत शिवाजीराजांनी पराजय केला (इ. १६६१ फेब्रु.) आणि इकडे कोकण जिंकलें तरी इ. १६६० च्या सप्टेंबरांत शायिस्तेखान जो एकदा पुण्यांत महाराजांच्या लालमहालांत येऊन बसला होता, तेथून तो हालला नाही; की कांही सलोख्याचा मार्ग निघतो का तें पाहावें म्हणून आपला वकील सोनोपंत यास महाराजांनी त्याच्या भेटीला पाठविलें, त्याच्याकडे त्याने लक्ष दिलें नाही. उलट, शिवाजीराजांची पुण्याची जहागीर ताब्यांत आलीच आहे, तेव्हा त्यांचा कोकणांतला मुलूख काबीज करून त्यांना तिकडूनहि निराधार करावें

म्हणून उद्योग केला. महाराज शृंगारपूरच्या स्वारीवर गुंतले होते त्या संधींत तिकडे त्यांचा कल्याण-भिवंडीकडील मुलूख त्याने जिंकून घेतला.

यामुळे शृंगारपूरची मोहीम आटोपून महाराज एप्रिल (इ. १६६१) अखेर रायगडाकडे आले, आणि नंतर जवळच महाड येथे थांबून परिस्थितीचा कानोसा घेऊं लागले, तों त्यांच्यापुढे दोन कामें उभीं राहिलीं. एक, शृंगारपूरचा राजा सूर्यराव पळून कुडाळच्या लखम सावंतांच्या आश्रयास गेल्यामुळे त्याचा आणि त्याच्या बरोबर लखम सावंताचा समाचार घेणें, आणि दुसरें, शायिस्तेखानाला म्हणजे मोगली शत्रूला कसेंहि करून आपल्या मुलखांतून हुसकावून लावणें. यांपैकी शायिस्तेखानाच्या बंदोबस्ताचीच निकड त्यांना या वेळीं अधिक वाटली आणि त्यांनी आपला मोर्चा प्रथम त्याच्याकडे वळविला.

प्रथम बुलाखी ह्या मोगल सरदाराशीं त्यांना दोन हात करावे लागले. उत्तरेकडे पेण हें नवेंच विरोधाचें केंद्र बनत होतें. बुलाखीने पेणजवळ देइरीगडास वेढा दिला होता म्हणजे अगदी जवळच घाला घातला. पण कावजी कोंढाळकर या शिवाजीराजांच्या सेनापतीने तो मोडून काढला. मोगलांचे ४०० लोक कामास आले. त्यांचें सैन्य मागे हटलें आणि आपल्याकडे राजांचें अगदीच दुर्लक्ष नाही हें त्यांना पटलें. पण त्यांना कोणताहि मुलूख सोडावा लागला नाही. पावसानंतरहि स्वारीला तोंड लागलें नाही. कार्तिकाच्या (इ. १६६१ ऑक्टो.-नोव्हें.) उकाड्यांत महाराज कोरेगांवाजवळ वर्धनगडावर कांही काळ विसाव्याकरिता राहिले. परंतु छातीवर शत्रु असतांना चैन पडणें शक्य नसल्यामुळे कांही योजना, संकल्प व किरकोळ बंदोबस्त करण्यांत हा आणि पुढील कांही महिन्यांचा काळ तसाच गेला. पुढे इ. १६६२ च्या मे-जूनमध्ये मोगलांकडून फिरून एक सरदार आला. त्याच्यावर म्हणजे 'नामदारखानावरी खासा राजियांनी मिरे डोंगरास जाऊन पेणेस छापा घातला.' पण या झुंजांत वाघोजी तुपे जखमी झाला व पायदळाचा सेनापति सुभेदार कृष्णाजी बाबाजी पडला. अर्थात् नामदारखान या स्वारींत पुरता मोडला नाही. पुढच्या इ. १६६३ च्या एप्रिलांत मोरोपंत पेशवे व निळो सोनदेव मुजुमदार हे मोठें सैन्य घेऊन त्याच्यावर चालून जाणार होते. पण सिंहगड किल्ल्यावर

मोगलांकडून कांही फितुरीची भानगड उपस्थित झाल्यामुळे राजांनी ती स्वारी रद्द करून त्या दोघांना सिंहगडाकडेच बंदोबस्तासाठी पाठविलें.

शायिस्तेखान लालमहालांत राहून राजांच्या गडावर फितुरी माजवी आणि त्याच्या फौजा आसपासच्या प्रजेला त्रास देत लूटमार करीत. माणसांना धरून नेत. राजेहि प्रतिकार करीत. 'मोगलांचा गलबला झाला. त्याने कुलाचे पेव वस्तभाव नेलिया...कुलास तकवा निघेना. वस्ता गुरें गेलीं. याकरिता कुलें गेलीं.' माणसें कोकणांत पळून जाऊं लागलीं. राजांच्या लोकांनी खूप थांबवून धरलें. पण शेवटीं माणसें घाटाखाली ठेवून ठाणीं मोकळीं टाकण्यास परवानगी दिली. मोगलांनी मराठ्यांची पाठ घेतली. मोगल साम्राज्याचें जंगी सामर्थ्य एकट्या राजांवर रोखून धरल्यामुळे ते टेकीस आले. इ. १६६३ त कोकणांत व देशावर दोन्ही ठिकाणीं खानाने उठावणी केली. या पावसांत शिवाजीला गडबड करतां येऊं नये म्हणून १२,००० घोडदळ कोकणांत वरच्या चौलला व ७,००० घोडदळ देशावर रहिमतपूरला छावणीला ठेवून दिलें. मराठ्यांच्या गनिमी काव्याला तोडीस तोड म्हणून हें घोडदळ जय्यत ठेवलें. कारण पूर्वीच्या दसऱ्यानंतर केवळ मोगलांनी नवीन जिंकलेल्या पुणें प्रांतांतच नव्हे, तर खानदेश-वऱ्हाडपर्यंत मोगलांच्या मुलखांत देखील नेताजीने लूट केली. मोगलांनी त्याचा पिच्छा पुरवून ३०० घोडे जायबंदी केले. नेताजीलाहि जखमा झाल्या (इ. १६६३ मार्च-एप्रिल). ही पराजयाची बातमी ऐकून शिवाजीराजे विवंचनेंत पडले. मोगलांच्या या चलतीमुळे सिंहगडावरच्या त्यांच्या फितुरीच्या प्रयत्नाला यश येईल, अशी भीति वाटूं लागली. यामुळे नामदारखानावरील योजिलेली स्वारी थांबवून मागे सांगितल्याप्रमाणे त्या गडावर राजांना मातबर फौज पाठवावी लागली. कोकणांत, गडांवर, पुणें प्रांतांत, वऱ्हाडाकडे, कोठेच या दोनतीन वर्षांत मोगलांविरुद्ध शिवाजीराजांच्या हाताला म्हणण्यासारखें यश आलें नाही. वाढत्या निराशेमुळे हा तेहतिसावा वाढदिवस (इ. १६६३ फेब्रु. १४)

आणि शक १५८५ चा पाडवा (इ. १६६३ मार्च ३०) असे दोन्ही शिवाजीराजांना फार काळजीचे गेले.

शायिस्तेखानावर छापा

शिवाजीराजांवर अगदी बिकट प्रसंग बेतावा, पण त्यांतूनच त्यांनी आपली मोठ्या शहामतीने अचानक सुटका करून घ्यावी असे जे प्रसंग शिवाजीराजांच्या चरित्रांत आहेत, त्यांपैकीच या वेळची मोगलांची मगरमिठी हा एक प्रसंग आहे. अफजल-प्रसंगाच्या वेळीं किंवा पन्हाळगडामध्ये बिनतोड अडकून पडले असतांना, राजांनी अलौकिक प्रसंगावधान आणि असामान्य धाडस दाखविलें. पण त्यापेक्षाहि या वेळीं दिसून आलेली त्यांची योजकता, तडफ व साहस हीं मोठीं अपूर्व आणि अद्भुत म्हणावीं लागतील. इतर सर्व तऱ्हेचे उपाय हरल्यामुळे मोगलांच्या जबरदस्त पकडींतून सुटका होण्याचा एकच मार्ग त्या वेळीं होता. आणि तो म्हणजे ह्या सर्व कारवाईचा सूत्रचालक शायिस्तेखान, त्याला भयंकर दहशत बसेल असें कांही तरी करणें. 'सर्व बाजूंनी शिवाजीचा पराजय होत आहे; त्याचा मोठा आधार सिंहगड भेदाने आता आपल्या हातांत येणार आहे', अशीं आनंदाचीं स्वप्नें खानाला पडत होतीं. तोंच चैत्र शुद्ध अष्टमीस रविवारीं (इ. १६६३ एप्रिल ५) राजगडावरून येऊन राजांनी खुद्द लालमहालावर रात्रीं छापा घातला व शायिस्तेखानावर हत्यार चालविलें. त्या दिवशीं रमजानचा सहावा चंद्र होता. दिवसाचा उपास सोडून शायिस्तेखानाच्या परिवारांतील मंडळी विश्रांति घ्यायला आपआपल्या ठिकाणीं गेल्यावर राजांच्या मंडळींनी वाड्यांत प्रवेश करून घेतला. शायिस्तेखानाला शोधून काढून त्याच्यावर वार केला. 'शास्ताखानाचा हात तुटला. मग पळाला. त्याचा लेक अबदुल फत्ते ठार झाला.'

शिवाजीराजांना लालमहालाच्या सर्व खाणाखुणा माहीत होत्या. तेव्हा हा धाडसाचा बेत त्यांनी जातीने अंगावर घेऊन पार पाडला. महालाकडे जातांना प्रसंगीं उपयोगी पडाव्या, पण एकदम कोणाला दिसूं नयेत अशा

रीतीने सैन्याच्या टोळ्या जागोजाग ठेवून दिल्या. कांही माणसें नदी-पलीकडे दबा धरून बसवून ठेविलीं. फक्त निवडक चारशे लोक बरोबर घेऊन राजांनी शायिस्तेखानाचा तळ गांठला. कांही बहाणा करून लाल-महालाच्या ज्या चौकांत शायिस्तेखान होता त्या चौकांत प्रवेश मिळविला आणि प्रथम तेथील पहारा साफ मारून काढून आंतील खाशांची कत्तल सुरू केली. कत्तलीमध्ये शायिस्तेखानाचा वडील मुलगा, जावई, १२ बिब्या, ४० मोठे दरकदार, व १ मोगल सेनापति इतके गारद झाले, असा अंदाज सांगतात. शेवटीं राजांनी स्वतः खानाला गाठून आपल्या हाताने त्याच्यावर वार केला. अंधारांत तो ठार झाला अशीच समजूत झाली. परंतु त्याच्या प्राणावर बेतलें होतें तें केवळ हाताच्या बोटांवर निभावलें! त्याच वेळीं जनानखान्यांतील आणखी ६ स्त्रिया व २ मुलगे ठार झाले. या धावपळींत मराठ्यांचे फक्त ६ सैनिक मेले व ४० जखमी झाले. शेजारी ठेवलेल्या मोगलांच्या फौजेंत कोणालाच या कत्तलीची खबर लागली नाही. जसवंतसिंगाचें १० हजार सैन्य असून नसून सारखेंच झालें. आणि प्रसंग गुदरून गेल्यावर मग थोडीबहुत हाकाहाक झाली. पण सावध होऊन शोधाशोध चालू होण्याच्या आंतच शिवाजीराजे आले होते तितक्याच त्वरेने आणि गुप्तपणें, आपल्या फौजेच्या टोळ्या गोळा करीत करीत पश्चिमेकडे कर्यात मावळांत निघून गेले.

राजांची युक्ति सोळा आणे यशस्वी झाली. शायिस्तेखानाच्या शरीराला जरी अगदी लहानशीच जखम लागली, तथापि त्याच्या मनाला या अचानक छाप्यामुळे कल्पनातीत दहशत बसली. पुणें सोडून औरंगाबादला जाईपर्यंत त्याला निर्धास्त वाटेना. शिवाजीराजांशीं वैर केल्यामुळे तो आपल्या प्रियजनांना अंतरला. लौकिकांत त्याची अमर्याद बेअब्रू झाली. दूरवर आसामपर्यंत देखील त्याच्या नाचक्कीची वार्ता पसरली. त्याच्यावर औरंगजेबाची इतराजी झाली आणि त्यास मोठी मानहानि पत्करून १ डिसेंबरला बंगालच्या सुभ्यावर बदलून जावें लागलें. छाप्याच्या दुसऱ्याच

दिवसापासून राजांच्या भोवतीं सर्व बाजूंनी आवळत चाललेले मोगली सैन्याचे पाश ढिले झाले. महाराजांच्या राज्यवृक्षाला आलेली अवकळा दूर होऊन फिरून टवटवी आली. तत्कालीन परिस्थितीचा विचार करतां दक्षिणेंत नांदणाऱ्या तीनचार सत्तांपैकी महाराजांचें राज्य हें एकच एतद्देशीय होतें. इतर दोन्ही तिन्ही मोगल, विजापूरकर व गोवळकोंडेकर हीं तात्त्विक दृष्ट्या उपरी व अमर्याद प्रदेशविस्ताराच्या मागे लागलेलीं म्हणून असमर्थनीय समजावयास पाहिजेत. विशेषतः शेकडों मैलांवरून दख्खनवर येऊन सत्ता विस्तारूं पाहणाऱ्या पूर्वींच्या अकबर, शहाजहान वगैरेंच्या व आता औरंगजेबाच्या उपद्व्यापांना इकडे कोणाहि दाक्षिणात्याचें साह्य व्हायला नको होतें. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी, की त्या वेळच्या कोणालाहि राजकारणाचें व्यापक स्वरूप न समजल्यामुळे स्वदेश, स्वभाषा व स्वधर्म यांना सर्वांगांनी उपकारक असा सर्वस्वी स्वकीय सत्ता स्थापण्याचा शिवाजीराजांचा उद्योग त्यांना केवळ एकट्याच्या बळावर चालवावा लागला. त्यांना खरी आणि महत्त्वाची सहानुभूति किंवा मदत कोणाहि हिंदु राजाकडून मिळालेली दिसत नाही. चंद्रराव मोरे, सूर्यराव शृंगारपूरकर, लखम सावंत कुडाळकर यांना वेळोवेळीं जवळ करण्याचा प्रयत्न करूनहि शिवाजीराजांच्या उद्योगांतील श्रेष्ठ भूमिकेचें आकलन त्यांना झालें नाही. ते कोणत्याहि गोष्टीचा केवळ स्वार्थाच्या मापाने विचार करीत. आणि वैयक्तिक स्वार्थ साधणार असेल तर मदत करीत आणि तसा कोणताहि स्वार्थ साधणार नसेल तर बेलाशक विरोध करीत. यापेक्षा अधिक खोल किंवा दूरदृष्टीचा विचार त्यांच्यापुढे नव्हता. यांच्याशीं तुलना करतां परकी देशांतून आलेल्या गोऱ्या व्यापाऱ्यांना राजकारणाची अधिक व्यापक दृष्टि होती असें दिसतें. अँतोनियो दि मेलो कॅस्त्रो हा नवा पोर्तुगीज व्हाइसरॉय याच सुमारास गोव्यास नेमून आला. त्याने आपलें राजकारणाचें व्यापक ज्ञान हिंदुस्थानच्या परिस्थितीला लावून, शिवाजीराजांना मोगलांच्या विरुद्ध मिळालेल्या यशाबद्दल अभिनंदन करण्याइतपत निदान शाब्दिक सहानुभूति दाखविली. शिवाय शिवाजीराजांच्या सूचनेवरून मोगलांकडे अन्नसामग्री न पाठविण्याचें कबूल केलें. शिवाजीराजांना या परकी सत्तेच्या सहानुभूतीचाहि थोडासा आधार वाटला असला पाहिजे.

* * *

१० सुरतेवर छापा

कुडाळकडील स्वारी

केवळ लालमहालावर छापा घालून राजे व मोगल यांमधील रेंगाळत राहिलेल्या चेंगट कोंडमाऱ्याच्या लढाईचा निकाल लागण्यासारखा नव्हता. राजांच्या धक्कातंत्रामुळे मोगलांच्या वज्रमुष्टीची पकड थोडी सैल झाली तरी ती कायमची उठणें शक्य नव्हतें. यामुळे मोगलांना उठवून लावण्यासाठी आणखी तीव्र उपायाची गरज होती. कांही अद्‌भुत पराक्रमामुळे एखादा आकस्मिक लाभ पदरांत पडतो. तरी टिकाऊ लाभ पदरांत पडण्यासाठी राजकारण बहुधा नेहमीच्या कष्टाच्या व रुळलेल्या मार्गांनीच चालवावें लागतें. त्यांत खंड पडून चालत नाही. अफजल-प्रसंगाच्या वार्तेने लोक भयचकित झाले. पण पुढील पन्हाळ्याकडील मुसंडीची वार्ता ऐकल्यावर राजांच्या वाढत्या युद्धसामर्थ्याबद्दल त्यांची खात्री पटली. त्याप्रमाणे आताहि घडलें. शायिस्तेखानावरील अलौकिक छाप्याच्या वार्तेने लोक आश्चर्यचकित झाले. पण लगेच दक्षिण कोकणांत राजांनी यशस्वी स्वारी केली. तेव्हा त्यांच्या फौजा देखील जय्यत तयार आहेत अशाबद्दल लोकांना विश्वास पटला.

शायिस्तेखान भेदरून गेला होता, तो सावध होऊन पुन्हा चढाई करण्याच्या आंत दुसरा पराक्रम करून मराठा सैन्याची हिंमत चढविणें जरूर होतें. म्हणून खानावरील छाप्यानंतर आठच दिवसांत मोठ्या चपळाईने राजे कोकणच्या स्वारीवर निघाले. राजापुरावरून कुडाळ वेंगुर्ल्यापर्यंत ते महिना दीड महिन्यांत पोंचले (इ. १६६३ मे २३) आणि त्यांनी तो मुलूख जिंकून घेतला. वाटेंत सर्वांना त्यांनी नवे कौल किंवा आश्वासनपत्रें दिलीं. कोकणांतील व गोव्यांतील विजापूरकरांचे सुभेदार पळून गेल्यामुळे, बराच मुलूख मोकळा सापडला आणि राजांची स्वारी दक्षिणेस थेट बांदें या ठाण्यापर्यंत गेली. पुढे राजे कारवार, मिर्जान येथपर्यंतहि जाऊन लूट घेऊन

येणार होते. परंतु तितक्यांत मोगलांचें सैन्य पाठीवर महाडपर्यंत येऊन भिडल्याची वार्ता आली (जुलै २०). शिवाय तिकडे बंदोबस्ताकरिता ठेवलेला नेताजी गारद झाल्याची खोटी हूल उठली. म्हणून कारवारचा रोख सोडून त्यांना परतावें लागलें. राजे परत येतांच सर्व स्थिरस्थावर झालें. मोगलांना पावसाळा संपेपर्यंत पुढे कांहीच विशेष करतां आलें नाही.

या स्वारींत वाडकर सावंतांनी राजांना पुन्हा विनाकारण विरोध केला. त्यांच्याशीं इ. १६५९ मार्च ५ ला दोस्तीचा तह (पृ. ६५) झाला असतांहि, तो न जुमानतां विजापूरकरांच्या तर्फेचे त्या भागांतील सरदेसाई म्हणून वाडकर सावंत वागले. विजापुरी अमलदारांशीं त्यांनी संगनमत केल्यानेच राजांना ही मोहीम आखावी लागली. सावंताने या वेळीं वेंगुर्लेकर डचांकडे दारूगोळा मागितला. पण तो त्यांनी पुरविला नाही. राजांनीहि त्यामुळे डचांना त्रास दिला नाही. डच हे पोर्तुगीजांचे प्रतिस्पर्धी. त्यांना राजांनी उठवून लावावें असें पोर्तुगीजांना वाटे. त्यासाठी राजांना मोठा नजराणा देण्याचें पोर्तुगीजांनी आमिष दाखविलें असतांहि डचांना राजांनी कांही तोशीस लावली नाही. त्या अर्थी जे युरोपीय लोक राजकारणांत नाक खुपसणार नाहीत त्या युरोपिअनांचा व्यापार निर्वेध चालावा असेंच राजांना वाटत होतें, असें म्हणतां येतें. या वेळीं गोवेकरांशींहि त्यांनी मिळतें धोरण राखलें. ‘ कुडाळ प्रांत हा विजापूरच्या सुल्तानाने मेहेरबानीने आपल्याला दिला आहे. केवळ त्याचा ताबा आपण आता घेणार आहो, ’ असें त्यांनी जाहीर केलें. त्यावरून आपली स्वारी विनाविरोध पार पाडावी असाच त्यांचा बेत दिसतो. तो बेत पार पडून प्रांत स्वाधीन होतांच रावजी-सोमनाथ पंडित याची त्यांनी आपला कुडाळचा सुभेदार म्हणून नेमणूक केली (इ. १६६३ जून). पण राजांच्या पदरांत हें यश सुखासुखीं पडावें हें तिकडील अमलदारांना आवडलें नाही. आणि त्यांनी पावसाळा संपतांच तें उधळून लावण्याचा विचार केला. आतां यापुढील पाळी आपली म्हणून भयभीत झालेला फोंड्याचा आदिलशाही सुभेदार तुणबेग, कुडाळवरील आपला अधिकार गेल्यामुळे रुष्ट झालेला देसाई लखम सावंत, आणि त्याच्यासारखेच आसपासचे केशव नाईक, राम सेणवी व चंदाराणा वगैरे चारदोन देसाई व आदिलशाही अधिकारी मिळून गोवेकर पोर्तुगीजांच्या चिथावणीने शिवाजीला कुडाळमधून हाकविण्यास सिद्ध झाले (इ. १६६३

उत्तरार्ध). लखम सावंतापासून डचांचें संरक्षण करण्यासाठी त्यांच्या विनंती-वरून राजांचें सैन्यहि वेंगुर्ल्यास येऊन बसलें. आणि शिवाजीराजांकडून कोंकण सोडवून घेण्यापूर्वींच (किंवा तें त्यांच्याकडून सोडवून घेण्यासाठी म्हणून) अली आदिलशाहाने जरी आधीच तें (कोंकण) आपल्या सरदारांमध्ये वांटून दिलें, तरी तें करणें शेवटीं फोलच ठरलें. शिवाजीचा ताबा कुडाळवरून हालला नाही आणि लखम सावंताला वाडीचा ताबा मिळण्याची आशा सोडून, आपलें ६०० शिपायांचें सैन्य घेऊन घाटावर विजापूरकरांच्या आश्रयाने राहावें लागलें. अली आदिलशाहाची या वेळची ही धडपड केवळ मोगलांच्या आग्रहामुळे होती. पुणें सोडून औरंगाबादला जाऊन राहिल्यावर तेथून शायिस्तेखान आता आपल्यावरील झालेली औरंगजेब बादशाहाची इतराजी कमी करण्याच्या आशेने असा प्रतिकाराचा उद्योग करीत होता. वास्तविक शिवाजीराजे आणि विजापूरकर यांच्यांत तह झाला होता (पृ. १०१). तरी देखील विजापूरकर शायिस्तेखानाच्या भिडेखातर या वेळीं मोगली पक्षाला मिळाल्याप्रमाणे वागले; परंतु त्यांचें त्यांत खरें मन नव्हतें.

सिंहगडचा वेढा

शायिस्तेखानाने सिंहगडावर लावलेलें फितव्याचें राजकारण फसलें, त्यानंतर शायिस्तेखानाने फिरून आदिलशाहीला महाराजांविरुद्ध उठवून पाहिलें. परंतु त्यांतून उत्पन्न झालेली कुडाळवरील स्वारी व पुढीलहि राजांची मसलत यशस्वी झाली. मध्यंतरीं त्याच्यावरच महाराजांनी यशस्वी छापा घातला. तेव्हा त्यांना पुन्हा थेट शह देण्यासाठी पावसाळ्यानंतर इ. १६६३ नोव्हेंबर-डिसेंबरांत जसवंतसिंगाने सिंहगडास प्रत्यक्ष वेढा दिला. आता राजे सावध असल्यामुळे वेढा घालून पांचसहा महिने झाले तरी मोगलांची कांहीच प्रगति झाली नाही. मध्यंतरीं शहाजादा मुअज्जम शायिस्तेखानाच्या जागीं दख्खनचा सुभेदार झाला. त्याच्या राजवटींत इ. १६६४ एप्रिलांत जसवंतसिंगाने सिंहगडावर चढाईचा हल्ला करण्याचा धाडसी यत्न केला. पण गडकऱ्यांनी तो शौर्याने परतवून गडाच्या सर्व माच्या आपल्या ताब्यांत ठेवल्या. या हल्ल्यांत दारूगोळ्याच्या स्फोटामुळे मोगलांचें फार नुकसान झालें, आणि झालेल्या या पराजयाची जबाबदारी

कोणावर याच्याबद्दल आपसांतच भांडणें लागलीं ! शेवटीं नाइलाज होऊन पाऊस लागण्याच्या पूर्वीच जसवंतसिंग वेढा उठवून छावणीला अन्यत्र गेला (इ. १६६४ मे २८) आणि सिंहगड शिवाजी राजांच्या ताब्यांत राहिला. वेढा उठल्यावर दोनतीन दिवसांतच मग राजे व्यवस्था पाहण्यासाठी गडावर जाऊन आले.

सुरतेची पहिली लूट


आदिलशाही आणि मोगलशाही हे दोन्ही नव्या मराठी राज्याचे शत्रू. पण त्यांपैकी आदिलशाही जवळची. लांब उत्तरेकडून येऊन दक्षिणच्या राजकारणांत हात घालूं पाहणारे मोगल त्या मानाने शिवाजीराजांना अगदी अप्रिय वाटत. शिवाय आदिलशाहीने कधीच दिला नव्हता इतका त्रास त्यांना शायिस्तेखानाने खुद्द पुण्यांत मुक्काम करून दिला होता. यामुळे त्याच्यावर आपण धाडसाने छापा घालून जशी त्याला दहशत बसविली आणि औरंगाबादचा सुभा गदगदा हालविला, तसाच कांही अद्‌भुत प्रकार करून खुद्द दिल्लीचें तख्त आणि मोगलांचें साम्राज्य गदगदा हालवावें असें महाराजांनी मनांत आणलें. मोगलांच्या राज्याची हेरांकडून बातमी मिळवून पाहतां त्यांचें लक्ष तापीच्या मुखाजवळील सुरत या त्या वेळीं संपत्ती-साठी गाजलेल्या शहराकडे सहज वळलें. दक्षिण कोकणच्या स्वारींत त्यांना इंग्रज, डच वगैरे परकी व्यापाऱ्यांच्या संपत्तीची कल्पना आली होती. तेथील युरोपीयांच्या वखारीहूनहि फार मोठ्या वखारी सुरतेला आहेत; सुरत हें व्यापाराचें फार मोठें केंद्र आहे, व्यापाराची उतारपेठ आहे, मक्केस प्रतिवर्षी जाणाऱ्या यात्रेकरूंचें फार मोठें वाहतुकीचें बंदर आहे, म्हणून तें औरंग-जेबाच्या साम्राज्याचें नाकच आहे, हें राजांना माहीत होतें. तेथील अनेक व्यापारी नवकोट नारायण होते. सुरतेच्या नाणावटीमध्ये त्या वेळच्या सर्व भारताचे पेढीसंबंधी म्हणजे बँकेसंबंधीचे आर्थिक व्यवहार चालत. तेव्हा तेथे भक्कम लूट मिळेल याबद्दल शंकाच नव्हती. आणि सर्वांत मुख्य म्हणजे सुरतेवरचा छापा यशस्वी झाला तर मोगलांची त्यांत फार नामुष्की होणार होती. महाराजांना हा विचार फार आवडला आणि एकदा तो कायम झाल्यावर मग छाप्यासाठी योग्य वेळ शोधून काढण्यास त्यांना मुळीच अडचण पडली नाही.

अप्रतिष्ठा होऊन बदली झाल्यामुळे शायिस्तेखान विमनस्क झाला होता. त्याच्या जागीं नेमलेला सुभेदार मुअज्जम, याला कारभार सोपवून देण्याची त्याची गडबड चालू होती. आणि सेनापति जसवंतसिंग सिंहगडाला वेढा घालण्यांत गुंतला होता. अशा संधींत तडकाफडकी सुरतेचें सधन शहर गांठून चार दिवसपर्यंत शिवाजीराजांनी तें मनसोक्त लुटलें. इ. १६६४ जाने. ५, मंगळवारीं शिवाजीराजे नजीक आल्याची बातमी सुरतेंत पसरली. शहरांत पळापळ सुरू झाली. इंग्रज, डच, फ्रेंच वखारवाल्यांनी आपआपल्या वखारींच्या रक्षणाचा बंदोबस्त केला. पण मोगलांचा सुभेदार इनायतखान भेदरून गेला व लोकांचें रक्षण करण्याचें सोडून देऊन सर्व शहर निराधार टाकून भ्याडासारखा किल्ल्यांत जाऊन राहिला. राजांची ही झडप इतक्या बेमालूमपणें साधली, की त्यावरून वसईच्या पोर्तुगीजांनी त्यांना मदत केली असावी असा प्रवाद उठला. वाटेंत आपल्या बेताचा कोणाला संशय येऊं नये म्हणून राजांनी ‘आपण बादशाहाच्या पदरचे सरदार आहों व अहमदाबादेस सरकारी कामानिमित्त जात आहों’ असा बहाणा केला. या युक्तीने ते अगदी सुरतेजवळ येऊन ठेपेपर्यंत कोणीहि सावध झालें नाही. बुधवारीं (जानेवारी ६) रात्रीं ते शहरांत शिरले तेव्हा सुभेदार व किल्लेदार यांनी कांहीच प्रतिकार केला नाही आणि कित्येक संपत्तिमान व्यापारी व नागरिक ह्यांचीं घरें त्यांनी लुटलीं. सोनें, रुपें, मोतीं, हिरे यांचे ढीगच्या ढीग त्यांच्या तंबूसमोर पडले. इतर वस्तूंकडे त्यांच्या लोकांनी ढुंकूनहि पाहिलें नाही. तशा कोणी आणल्या, तर आणणारांनाच राजे त्या लगेच वांटून टाकीत. शिवाजीराजांना बसण्यासाठी बिनकनातीचें फक्त एक पाल होतें. त्यांची छावणी स्मशानभूमीपासून शहाबेगमच्या बागेपर्यंत पसरली होती. सर्व जवान अगदी उघड्यावरच पथारी थाटून उतरले होते. या वर्षी सुरतेचा व्यापार विशेष भरभराटींत असल्यामुळे शहरांत अपार संपत्ति गोळा झाली होती. ती सावकाश बुधवार ते रविवारपर्यंत (इ. १६६४ जाने. ६ ते १०) लुटून, जसे आले होते तसेच, एकदम व त्वरेने

शिवाजीराजे सैन्य घेऊन निघून गेले. त्यांनी नेलेल्या लुटीचा अंदाज कमींत कमी १५ लक्ष व जास्तींत जास्त १ कोटि असा करतात. एवढी अवजड लूट खुष्कीच्या मार्गानेच आपल्याबरोबर नेणें हें मराठ्यांना अडचणीचेंच वाटलें. म्हणून 'आधीच आणवून ठेवलेल्या गलबतांतून माल चढवून त्यांनी तो जलमार्गाने स्वराज्यांत नेला,' असें कांही लोक सांगतात.

इंग्रज व डच वगैरे परदेशस्थांनी स्वतःच्या वखारींचें आपल्या कुवती-प्रमाणे रक्षण केलें ही गोष्ट मोगली अधिकाऱ्यांच्या भ्याडपणाशीं तुलना करतां शौर्याची; म्हणून औरंगजेबाने त्यांचा गौरव केला. एक वर्षांची जकात त्यांना माफ केली आणि पुढे कांही वर्षे शेकडा अर्धा टक्का सूटहि दिली. ह्या वेळची हकीकत इंग्रज, डच वगैरे व्यापाऱ्यांच्याच पत्रांवरून आज उपलब्ध असल्यामुळे त्यांनी लिहिलेल्या फुशारकीच्या गोष्टीच तेवढ्या आपल्याला वाचावयास मिळतात. परकी व्यापारी राजकारणांत हात न घालतां केवळ व्यापार करतील तोंपर्यंत त्यांना सुखाने नांदूं देण्याचेंच राजांचें धोरण होतें (पृ. १०८). फक्त औरंगजेबाने जो राजांचा कोंडमारा चालविला होता, त्याचा सूड घेणें आणि मोगली चढाईला तोंड देण्यासाठी कराव्या लागणाऱ्या मोहिमेच्या वाढत्या खर्चाची भरपाई करून घेणें, एवढेंच राजांपुढे या वेळीं उद्दिष्ट होतें. म्हणून त्यांनी मोगलांच्या आश्रयाने सधन झालेल्या मोगलधार्जिण्या देशी व्यापाऱ्यांची लूट केली. शिवाजी जवळ आल्याची बातमी मिळाल्यावर इंग्रज प्रेसिडेंटाने आपल्या लोकांची धिटाईने मिरवणूक काढली हें खरें आहे. परंतु त्याबरोबरच राजे वेशीमध्ये आले न आले तोंच ती मिरवणूक वखारीच्या दाराच्या आंत जाऊन बसली, हेंहि खरें आहे. हें सारें त्यांच्याच पत्रांत आहे !

शिवाजीराजांनी धनार्जनाकरिता लोकांचा छळ केला असा त्या वेळच्या इंग्रजांच्या वृत्तान्तांत ध्वनि निघतो. परंतु ज्याच्या पुराव्यावरून हा आरोप करण्यांत येतो, त्या माणसाच्या दुष्टपणाबद्दल नंतर भरपूर पुरावा दाखल झाला असल्यामुळे, एकट्या त्याच्याच म्हणण्यावर विसंबून राहणें योग्य




प्रतापगड

भवानीचें मंदिर मध्यभागीं. या गडाच्या पायथ्याशीं
महाराजांनी अफजलखानाची भेट घेतली. डावीकडे अफजल बुरुज




रायगड : गंगासागर व मनोरे

मनोऱ्यांच्या मागच्या बाजूला राजवाडा व इतर मुख्य इमारतींच्या जागा



राजगडची राजसदर



राजधानी रायगड

" थोडीशी शिबंदी हा किल्ला साऱ्या जगाविरुद्ध लढवूं शकेल !"

होणार नाही. शिवाजीराजांच्या लोकांनी क्रूरपणा केला, तो समकालीन पद्धतीपेक्षा वेगळ्या प्रकारचा होता, असेंहि म्हणतां येणार नाही. शिवाय सुभेदार इनायतखान ह्याने राजांवर मारेकरी घालण्याचा नष्टपणा केल्यामुळे चिडलेल्या मनस्थितींत लोकांकडून तसें कांही झालें नसतें तरच नवल. गुरुवारीं सकाळीं सुभेदाराकडून कांही बोलणें करण्याच्या मिषाने आलेल्या एका तरुण माणसाने राजांवर वार केला व त्यांना रक्ताळलेल्या स्थितींत लोकांनी पाहिलें. एवढें कारण लोकांना चिडण्यास पुरें झालें.

शिवाय आणखीहि एक तपशील ध्यानांत घेतला पाहिजे. वेशीबाहेर येतांच रक्तपात व जाळपोळ नको म्हणून हाजी सैदबेग, वीरजी व्होरा व हाजी कासम या तीन प्रमुख व्यापाऱ्यांना खंडणीचा ठराव करून घेण्यासाठी शिवाजीराजांनी आपल्या भेटीला बोलाविलें; पण हे व्यापारी आले नाहीत. मग शहरांतून कोणीं खंडणी चुकवून बाहेर जाऊं नये म्हणून राजांनी नाकेबंदी केली, चुकवून जाणारांवर गोळी चालविली व नकार दिल्याचें प्रायश्चित्त म्हणून त्या वेळच्या शिरस्त्याप्रमाणे शहरांत थोडीबहुत जाळपोळहि केली.

शिवाजीराजांनी ‘ बादशाहाच्या सुरतेची आपण सुरत घेतली ’ अशी प्रौढी मिरविली, त्यांत अतिशयोक्ति मुळीच नाही. सुरतेसारखें सधन शहर, ठाणें व राजधानी, व्यापार व नौका-नयनाचें केंद्र, खुद्द औरंगजेबाच्या डोळ्यांदेखत व त्याचें अवाढव्य सैन्य मराठ्यांच्या जणू छातीवर बसलें असतां लुटणें, हा पराक्रम सामान्य नव्हे. सुरतेला यानंतर कित्येक वर्षें राजांची सारखी दहशत वाटे. त्यांच्या पवनगतीच्या हालचाली पाहून कित्येकांनी तर ‘ त्याचें शरीर हवामय आहे, त्याला पंखहि आहेत ’ असेंच ठरविलें. राजांचा छापा येण्यापूर्वी सुरतेचा तट कच्चा होता. तो यानंतरच मोगलांनी पक्का केला व राजांच्या भीतीमुळे पुढे तेथे कायमच्या चौक्या ठेवून नवे पहारे बसविले. सुरतेला उत्पन्न झालेल्या या दहशतीच्या वातावरणाचा एक मोठा गमतीचा परिणाम झाला. शिवाजी महाराजांच्या शत्रूच्या मुलखांत सुरतेला वसती करून त्यांच्या रागाला बळी पडण्यापेक्षा महाराजांच्या शेजाराला मुंबईतच येऊन राहणें हें इंग्रजांना अधिक सुरक्षित वाटलें. त्यांनी आपला सुरतेचा सर्व व्यवहार बदलून मुंबईला आणला.

मुंबईचें महत्त्व त्यामुळे वाढलें. तेथील पेढीचा व्यवहार (बँकिंग) वाढीला लागला, गलबत बांधण्याचे कारखाने उभे राहिले आणि एकंदर व्यापार देखील वाढला. इतिहासाच्या ओघामुळे सुरतेची वाढ खुंटली आणि मुंबईची फोफावली.

शहाजीराजांचा मृत्यु

सुरतेची लूट घेऊन परत फिरल्यावर शिवाजीराजे मार्गावर असतांनाच तिकडे कर्नाटकांत होदेगिरी येथे शहाजीराजे वारले (इ. १६६४ जाने. २३). शिकारीस गेले असतां घोड्यावरून पडल्यामुळे त्यांना अपघाती मरण आलें. त्या वेळीं त्यांचें वय जवळ जवळ ६५ वर्षांचें होतें. वाटेंतच ही खेदकारक बातमी राजांना मिळाली. त्यामुळे त्वरेनेच ते राजगडावर आले (फेब्रु. ५). कसेंहि कां असेना, पण राजांवर वडिलांचें छत्र होतें तें गेलें. राजांचा परिवार, खुद्द शिवाजीराजे, आणि विशेषतः मातुश्री जिजाबाई यांच्या दुःखाला साहजिकच पारावार राहिला नाही.

शहाजीराजे आणि शिवाजीराजे ही पितापुत्रांची जोडी अलौकिक होऊन गेली. स्वराज्यस्थापनेच्या आरंभकालांतील त्यांच्या सहकार्याचें स्वरूप त्या त्या स्थलीं पूर्वी उघड करून दाखविलें आहे. त्यानंतर आपला पुत्र आपल्यापेक्षाहि सवाई निघाला अशा मनोमन समाधानाने जरी इ. १६५८ च्या सुमारास शहाजीराजांनी शिवाजीराजांच्या बंडखोरीची जबाबदारी आपल्या अंगावरून झटकून टाकली (पृ. ४९), तरी त्या झटकण्यांतहि कांही राजकारण नसेल असें नाही.

इ. १६५६–५७ मधलें शहाजीराजांचें आदिलशाहास लिहिलेलें एक वैतागाचें पत्र प्रसिद्ध आहे. त्याचा सारांश असा : “ पेसजी वीस रोजांत रुस्तुमजमाबरोबरी माहोलीहून हुजूर आलों ते वख्ती चौ लाखाची जागीर दिली...फर्मानाच्या नकला पादशाही दप्तरीं असतील त्या पाहाव्या...[असें असतां] अकार्तुकाचे बोलें करून आपले जागिरीत नाहक गैर हिसाबी पातशाह खलेल (= बिघाड) करवितात. तरी आपण रजपूत लोक. अजी तलग पेसजीहि (= पूर्वीहि) दोनचार पादशाहीत खिदमत केली. असा गैरहिसाबी जाजती (= जुलूम) सोसून कमइजतीने

व गैर मेहेरबानीने पेसजीहि खिदमत केली नाही. व पुढेहि न करूं... आज दीड वर्षे जाजती सोसिली...पेस्तर हजरत साहेबास आपली दरकार असेल तरी हिसाबी आपला सरंजाम सदरहू केला पाहिजे. आणि दरकार नसेल तरी खुषनुदीने रजा दिधली पाहिजे." या पत्राची भाषा पडखाऊ नोकराची नाही. दोनचार पादशाहींत इज्जतीने सरदारी करणाऱ्या फौजबंद जहागीरदाराची आहे. निजामशाहावर छत्र धरणाऱ्या तोलदार वजिराची आहे. शहाजीराजे आदिलशाहींत केवळ निर्माल्य होऊन राहिले होते, असें या पत्रावरून म्हणतां यावयाचें नाही. तरी पण शिवाजीराजे इकडे अफजलखान व सिद्दी जौहर, या दोन आदिलशाही आणि शायिस्तेखान या मोगली सेनापतीशीं प्राणपणाने झगडत होते त्या त्या वेळीं शहाजीराजांनी त्यांना नक्की कोणत्या प्रकारें मदत केली किंवा मुळी केलीच नाही, हे आपणास आज काडीभरहि सांगतां येत नाही. या गोष्टीचें अर्थात् वाईट वाटतें.

पूरक ठरलेलीं दोन राज्यें

तें कसेंहि असलें तथापि असल्या बाणेदार बोलण्यावागण्यामुळे, विजापूरकरांच्या मनांतल्या शहाजीराजांबद्दलच्या संशयाचें निराकरण अगदी त्यांच्या मरणापूर्वी पांचसहा महिनेपर्यंत देखील सर्वस्वी झालेलें दिसत नाही. कारण इ. १६६३ जुलै २० च्या इंग्रजांच्या पत्रांत शहाजीराजांच्या हातांत, दोन दिवस कां होईना, पण आदिलशाहाने बंकापूर येथे बेड्या घातल्याची जी बातमी आलेली आहे, तीवरून शहाजीराजांच्या निष्ठेबद्दल विजापूरकर वारंवार संशय घेत, याबद्दल शंका राहात नाही. शहाजीराजे आणि शिवाजीराजे यांच्यांतील संबंधाचा तत्कालीन राजकारणावरचा परिणाम आज सर्व बाजूंनी समजणें कठीण आहे. एकाच कुटुंबांतील दोन कर्ते पुरुष दोन ठिकाणीं (एक महाराष्ट्रांत व दुसरे कर्नाटकांत) दोन राज्यें स्थापन करीत होते. हीं राज्यें एकमेकांस पूरक ठरलीं. राज्याभिषेकानंतर महाराजांच्या दक्षिण दिग्विजयाला शहाजीराजांचा या वेळचा उद्योग उदाहरणासारखा उपयोगी पडला. त्यांतून निर्माण झालेलें जिंजीकडील राज्य पुढे महाराजांचा दुसरा मुलगा राजाराम याच्या संकटाच्या वेळीं (१६९०–१६९८ इ.) आधार म्हणून उपयोगी पडलें. महाराजांचा सावत्र भाऊ म्हणजे शहाजीचा दुसरा एक मुलगा व्यंकोजी (१६७६–१६८३ इ.) याने संपादन केलेल्या

तंजावरच्या राज्यामुळे तर हा धागा अगदी आजपर्यंत येऊन भिडला आहे. तंजावरचे महाराजे दुसरे सर्फोजी (१७९८–१८३२ इ.) यांनी स्थापन केलेल्या 'सरस्वती महाल ग्रंथसंग्रहांत' परिश्रमाने गोळा केलेल्या मूल्यवान ग्रंथादि साधनांमुळे मराठी, तेलगू, तामीळ व संस्कृत भाषा आणि संस्कृति यांचें आजपर्यंत उत्कृष्ट संरक्षण झालें. शहाजीराजांच्या शौर्यामुळे व्यंकोजीला राज्य स्थापन करणें शक्य झालें. व्यंकोजीच्या वंशजांनी स्थापन केलेल्या सरस्वती महाल ग्रंथसंग्रहादींमुळे हिंदु संस्कृति टिकली, जगली, हा इतिहासाचा उपकारक परिणाम ध्यानांत घेण्यासारखा आहे.

इकडे राजांची धाडसी कामगिरी चालू असतांना शहाजीराजे विजापूर दरबारीं (१६३६–१६६४ इ.) बाणेदारीने सरदारकी करीत होते; म्हणजे शिवाजीराजांचा एक अत्यंत जिव्हाळ्याचा मनुष्य, मातुश्री जिजाबाईच्या हृदयाचा तुकडाच, प्रत्यक्ष शत्रूकडे ओलीस ठेवल्यासारखा होता. तो संबंध आता शहाजीराजांच्या मृत्यूने कायमचा तुटला. त्यामुळे विजापूरकरांशीं वागतांना यापुढे शिवाजीराजांच्या बाजूने कोणत्याहि प्रकारचा संकोच करण्याचें कारण राहिलें नाही.

* * *



छत्रपतींचा 'शिवराई'

११ आदिलशाहीशीं बिघाड

कुडाळच्या स्वारीचा प्रतिध्वनि

मागे सांगितल्याप्रमाणे (पृ. १०९) शायिस्तेखानाने भरीला घातल्यामुळे विजापूरकरांनी कुडाळ प्रांत शिवाजीराजांकडून जिंकून घेण्याचा उपक्रम केला. इ. १६६३ च्या ऑक्टोबरमध्ये निघून त्यांचीं सैन्यें इ. १६६४ च्या एप्रिल-मेपर्यंत सावकाशीने गोव्याजवळील कोडोलीस आलीं. ह्या सैन्यांचा सेनापति अजीजखान शिवाजीराजांना अनुकूल होता. यामुळे जरी लखम सावंताने नेटाने लढाई करून मराठ्यांना कुडाळ प्रांत सोडण्यास थोडा वेळ भाग पाडलें, तथापि शिवाजीराजांचें विशेष नुकसान झालें नाही. मध्यंतरीं अजीजखान मृत्यु पावला (इ. १६६४ जून १०). त्याच्या जागेवर शिवाजीराजांचा दोस्त रुस्तुमजमा याची नेमणूक झाली आणि थोड्याच दिवसांत पावसाळा सुरू झाल्यामुळे लढाई थांबली. हें युद्ध विजापूरकरांकडून केवळ मोगलांच्या समाधानाकरिता चालवलें जात असल्यामुळे शिवाजीराजे या संधींत दुसरीकडे सुरतेची लूट (इ. १६६४ जाने.) वगैरे निर्वेधपणें करीत राहिले आणि तिकडून परत फिरल्यावरहि या बाजूला मुळीच फिरकले नाहीत. सिंहगडाचा वेढा उठविण्याचें महत्त्वाचें काम यशस्वी झाल्यावर देखील जणूं जसवंतसिंगाचा पाठलाग करीत राजांचें सैन्य मोगलांच्या मुलखांत लूट करण्यासाठी गेलें. त्याने अहमदनगरपर्यंत मुलूख बिनधोक लुटला. दौलताबादेपर्यंतहि दौड करण्याचा त्याचा विचार होता. पण पावसामुळे म्हणा किंवा अन्य कारणामुळे म्हणा, तो रहित झाला.

शिवाजीराजांचें आरमार

सह्याद्रीच्या आधाराने स्वराज्य वाढलें. हळूहळू राजांना देशाबरोबरच कोकणचाहि ताबा घ्यावा लागला आणि राजांचा पोर्तुगीज, डच, फ्रेंच,

इंग्रज आणि दंडाराजपुरीकर सिद्दी, अशा आरमारी सत्तांशीं संघर्ष आला. त्यांच्याशीं टक्कर देण्यासाठी विशेषत: अफजल-प्रसंगाच्या जरा आधी राजांनी आपल्या आरमाराचा प्रारंभ केल्याचें दिसून येते. भिवंडी, कल्याण, पनवेल ह्या ठिकाणीं नवीं गलबतें राजांनी बांधलीं आहेत अशाबद्दल गोव्याच्या व्हाइसरॉयाने इ. १६५९ च्या ऑगस्टांत चिंता व्यक्त करून 'तीं गलबतें जागेवरच कोंडून ठेवा, त्यांना बाहेर फिरकूं देऊं नका,' असे लगेच हुकूम दिले. पोर्तुगीजांचें आरमार फार प्रबळ होतें. यामुळे समुद्रावर जरा कोठे बाहेर पडावयाचें तर शिवाजीराजांच्या गलबतांना पोर्तुगीजांचे परवाने घ्यावे लागत, ह्याचें राजांना मोठें वैषम्य वाटे. त्यांचीं गलबतें 'संगमिसि' या नांवाने ओळखिलीं जात. तें नांव 'संगमेश्वर' या शब्दाचा अपभ्रंश असावा! आपल्या आरमाराची वाढ करावी याबद्दल राजांनी काळजीपूर्वक योजना आखली होती. तें किनाऱ्यावरील सर्व राजसत्तांना वरचढ करण्यास राजांना जरी पुरेसा स्वस्थपणा व वेळ मिळाला नाही, तथापि त्यांनी त्याचा पाया घातला याबद्दल त्यांचें कौतुक केलें पाहिजे.

नुकतेंच सांगितल्याप्रमाणे इ. १६६४ च्या पावसाळ्यापर्यंत आदिलशाहीकडील विरोधाची परिस्थिति निवळल्यामुळे आपल्या आरमाराचें सामर्थ्य कसाला लावून पाहावयाचें राजांनी ठरविलें. याची कुणकुण लागल्यामुळे नारळी पौर्णिमेनंतर तें आता आपल्याला त्रास देणार की काय, अशी सुरतेच्या मोगलांना भीति वाटून त्यांनी मक्केच्या यात्रेकरूंचीं गलबतें सुरक्षित निभावून आणण्याची कामगिरी डचांना व इंग्रजांना सांगितली. राजे आपलें आरमार घेऊन कोणीकडे जाणार याबद्दल तर्कवितर्क सुरू झाले. समुद्रावर पोर्तुगीजांचें वर्चस्व असल्यामुळे त्यांचे परवाने मिळवून लोक आपले व्यवहार चालवीत. तो परवाने देण्याचा अधिकार आपण मिळविला पाहिजे, अशी महत्त्वाकांक्षा राजांनी धरली आणि युद्ध व व्यापार या दोन्ही गोष्टी करतां याव्या म्हणून आपणहि चाळीस-पन्नास गलबतें बाळगलीं. भाद्रपदांत त्या गलबतांचा मुहूर्ताचा प्रवास त्यांनी करण्याचें योजिलें.

खवासखानाची रवानगी

गेले कांही दिवस आदिलशाहाशीं अधूनमधून युद्ध चालू होतें. एकदा तह झालेला असतां केवळ मोगलांच्या चिथावणीने आदिलशाहाने असा

बिघाड करावा, हें महाराजांना आवडलें नाही. हें युद्ध सौम्य स्वरूपाचें झालें. पण पुढे विजापूर दरबारांत धोरणाचा फरक होऊन उभयतांचे संबंध तिरीमिरीचे झाले. इकडे राजांनी भटकल व मंगळूर यांच्यामधील बसनूरकडील आरमारी स्वारीची तयारी पुरी करीत आणली. इतक्यांत मातुश्री जिजाबाईंना आपल्या बातमीदारांकडून मिळालेली महत्त्वाची माहिती त्यांनी राजांना लिहून कळविली. ती अशी : 'सांप्रत पुन्हा दुर्बुद्धि धरून खवासखान विजापुराहून फौजेसुद्धा तुमच्यावर रवाना झाला. त्याच्या बरोबर बाजी घोरपडे, लखम सावंत व खेम सावंत हे आहेत. (तेव्हा) आमचे मनोदय सेवटास नेणार तुम्ही सुपुत्र आहां.' या पत्रांत 'आमचे मनोदय शेवटास न्या' अशी जी निक्षून आज्ञा जिजाबाईंनी केली आहे, तिचा संदर्भ उघड आहे. वरीलपैकी मुधोळकर बाजी घोरपड्यांनी मुस्ताफाखानाला अनुकूल होऊन शहाजीराजांना दग्याने कैद केलें होतें (इ. १६४८, पृ. ४१) त्या गोष्टीला उद्देशून ही सूचना आहे, हें सांगावयास नको. हें पत्र शिवाजीराजांना अगदी ऐन वेळीं मिळालें आणि शक्य तर बसनूरवर आरमारी स्वारी आणि बाजी घोरपड्यांचा बदला घेणें हीं दोन्ही कामें एकदम उरकून घेण्याचें राजांनी योजिलें. पावसाळ्यापूर्वी शिवाजीराजांचा सुभेदार रावजी सोमनाथ यास लखम सावंताच्या उद्योगामुळे कुडाळ प्रांतांतून निघावें लागलें होतें. त्याचा बदला घेण्यासाठी (इ. १६६४ ऑक्टोबर) शिवाजीराजे वेंगुर्ल्यास आले व तें जाळून त्यांनी जमीनदोस्त केलें. या वेळीं कुडाळ प्रांतांत त्यांनी आपलीं ठाणीं पुन्हा बसविलीं. म्हणजे विजापुरी सैन्यें समोर येण्यापूर्वीच कुडाळचा बंदोबस्त करून राजे घाट चढून देशावर गेले. यामुळे कोकणांतील बंदोबस्ताचा जम पूर्ववत् बसला. राजांच्या पारिपत्याकरिता म्हणून येणारें आदिलशाही सैन्य कुडाळकडे उतरूंच शकलें नाही. राजे त्याची आपल्या सोयीच्या वेळीं व सोयीच्या ठिकाणीं गांठ घेऊन त्याचा समाचार घेऊं शकले.

आदिलशाहाने खवासखानाच्या हाताखाली पाठविलेल्या सैन्याला येण्याला थोडा वेळ होता, तोंच आघाडीवर नियुक्त केलेल्या बाजी घोरपड्याला राजांनी खुद्द मुधोळास जाऊन गांठलें. तेथे शहामतीचें युद्ध देऊन त्याचा त्यांनी पराभव केला. युद्धांत बाजी घोरपडे मारले गेले व त्याच्या

बरोबर आणखीही कित्येक खासे मरण पावले. राजांनी मुधोळ लुटून फस्त केलें व सर्व मुलूख काबीज करून त्यावर आपल्या तर्फेचा म्हणून बाजी घोरपड्याचा मुलगा मालोजी घोरपडे याचीच स्थापना केली. इतकें होतें तों शत्रूचा दुसरा सेनापति खवासखान मागाहून आला. तेव्हा त्यावरहि चाल करून जाऊन राजांनी त्याचा पराभव केल्यामुळे तो विजापुराकडे पळून गेला. गेलीं कित्येक वर्षें सावंताची लुडबूड चालू असून त्याच्याच कैवारासाठी आताची खवासखानाची स्वारी निघाली होती. तेव्हा शत्रुपक्षाच्या त्या वारंवार लुडबूड करणाऱ्या तिसऱ्या सेनापतीलाहि एकदा गप्प बसवावा, म्हणून मागे उलटून त्याच्या मुलखांत शिरून राजे 'तळपट करीत चालले.' फोंड्याचा किल्ला घेऊन त्यालाहि त्यांनी निराधार केलें. त्यामुळे सावंत गोवेकरांच्या आश्रयास गेला; म्हणून पुढे जाऊन राजांनी त्यांनाहि शह लाविला. तेव्हा गोवेकरांनी तह करून नजर-नजराणा पाठविला. तेथेहि पुढे आश्रय मिळणें अशक्य झाल्यामुळे सावंत टेकीस आले आणि मग त्यांनी पितांबर शेणवी नांवाचा वकील पाठवून 'आपण सावंत भोसले कुळीचे. आपले पुत्र आहों,' असें लाचारीचें बोलणें लावलें आणि आपले देसगतीचें (देसाईपणाचें) वतन राखण्याबद्दल प्रार्थना केली. राजांनी सावंताकडे निम्मे प्रांत ठेवून फौजेची चाकरी घेण्याचा पुनः एकदा (पहिला करार, इ. १६५९ चा, पृ. ६५-६६) करार केला व सर्वत्र स्थिरस्थावर करण्यांत यश मिळविलें. आदिलशाहाच्या मूळच्या योजनेप्रमाणे या तिन्ही फौजा एकत्र होऊन आल्या असत्या तर फार जबरदस्त झाल्या असत्या, हें ओळखून तिघांना निरनिराळ्या तीन ठिकाणीं गांठून तिघांचाहि परिणामकारक रीतीने अशा प्रकारें राजांनी मोड केला आणि दक्षिणेकडे दीर्घकालीन शांतता प्रस्थापित केली.

या मोहिमेंत मुधोळपासून कुडाळपर्यंतच्या पूर्वपश्चिम शेदीडशे मैल प्रदेशांत चपळाईने संचार करतांना राजांच्या फौजांनी वाटेंत किंवा जरा आजूबाजूला जाऊन लूटमार केली असणें अगदी साहजिक आहे. त्या दृष्टीने पन्हाळा काबीज केल्यावर नेताजीने जेथे खंडणी वसूल केलेली होती, त्या विजापूर राजधानीच्या घेऱ्यांतील खुदावंदपूरचें नांव फिरून याहि वेळी शकावल्या देतात.

पहिली आरमारी स्वारी

खवासखानावरील स्वारी अशा तऱ्हेने निकालांत निघाल्यानंतर राजांचा बसनूर बंदराकडील सागरी सफरीचा मार्ग मोकळा झाला. परंतु आरमार वाढवावयाचें, तर आपल्या स्वतःचें असें इकडच्या बाजूला एखादें आरमारी ठाणें पाहिजे म्हणून मालवणनजीक कुरटें बेटावर इ. १६६४ नोव्हें. २५ रोजीं सिंधुदुर्गाच्या पायाचा चिरा राजांनी मुहूर्ताने बसविला. सुरू झालेलें काम सुमारें महिनाभर तेथे राहून त्यांनी स्वत: चालीस लावलें. आणि नंतर अवांतर बंदोबस्त करून इ. १६६५ फेब्रु. ८ रोजीं मालवण येथून 'नावारोहण' करून राजे बसनूरच्या स्वारीवर निघाले. राजांचे बेत परिस्थितीप्रमाणे बदलत होते. गेल्या नोव्हेंबरांत भटकलच्या बाजूला चार गलबतें समुद्रमार्गें पुढे रवाना करण्याचा त्यांचा विचार होता. नंतर जमिनीवरून घोडदळ घेऊन जावें व वाटेंत काय पदरांत पडेल तें घेऊन त्या गलबतांवर भरावें व आपण सडे होऊन आणखी पुढे मुलूख मारावा, असाहि एक त्यांचा बेत होता. या वेळीं हुबळी वगैरे आदिलशाही मुलखांत राजांचें दुसरें एक सैन्य जाळपोळ करीत होतें. एकंदर पाहतां राजांची कमान चढतीची होती. त्यांची उमेद आणि उद्योग दांडगा होता. याच सुमारास 'सुरत शहर आणि आसपासचा प्रांत यांच्या वसुलाची चौथाई द्या, नाहीतर पुनः गतसालाप्रमाणे सुरतेची लूट करतों,' अशी दशहत मोगलांना दाखविण्यासहि त्यांनी कमी केलें नाही.

मालवणांतून बाहेर पडतांना महाराजांबरोबर लहान ८५ व मोठीं ३ गलबतें होतीं. वाटेंत गोव्याला देखील त्यांना कोणीं विरोध केला नाही. आदिलशाहा व बेदनूरचा राजा यांच्या वादाचा गेल्या वर्षाचा गोंधळ आता मिटला असल्यामुळे फौजांचा राबता कोठेच नव्हता. भटकलच्या दक्षिणेस बेदनूर राज्याचें बंदर बसनूर येथपर्यंत मजल मारून राजांनी तेथील लूट सावकाश गोळा केली आणि पुढे न जातां त्यांची स्वारी गोकर्णाकडे परत फिरली. तेथे तीर्थयात्रा संपादून ४००० पायदळ घेऊन राजे अंकोल्यास गेले. तेथून सर्व आरमार जलमार्गाने स्वदेशीं रवाना करून राजे फौज बरोबर घेऊन किनाऱ्याकिनाऱ्याने चालले. नद्या उतरून जाण्यासाठी फक्त १२ तरांडीं (= गलबतें) त्यांनी आपल्याबरोबर ठेविलीं. राजांचा हा दौरा बिनविरोध झाला. फाल्गुन वद्य ३ (इ. १६६५

फेब्रु. २२) म्हणजे आपल्या पस्तीसाव्या वाढदिवशीं राजे कारवारला होते. तेथे चांगली लूट करून त्यांच्या मनांत 'होळीची शिकार' साधावयाची होती. परंतु विजापूरकरांचा सुभेदार शेरखान याने चतुराईने त्या भागांतील सर्व व्यापाऱ्यांना एकत्र जमविलें आणि त्यांच्याकडून राजांना नजराणा देवविला. यामुळे राजे तेथे दोन दिवस राहून तेथून निघून भीमगडाकडे गेले.

पावसाळा संपतांच राजे जे एकदा या बाजूला आले ते बरेच महिने इकडे राहिले. उत्तरेकडून मोगल आणि दक्षिणेकडून विजापूरकर अशा दोन्ही बाजूंनी जेरबंद लागले असतांनाहि त्या दोघांनाहि पुरून उरण्याचा पराक्रम त्यांनी दाखविला. सुरतेला चांगला तडाखा मिळाल्यामुळे मोगल कांहीसे हतबुद्ध झाले होते; ते ह्या मुदतींत थोडेसे स्तब्ध राहिले. राजे देखील दक्षिणेकडे सागरी पराक्रम गाजवण्याला उत्सुक असल्यामुळे त्यांनीहि मोगलांवर नवी चढाई तितक्यांत योजिली नाही. दक्षिणेकडील मोहीम यशस्वी करून आल्यावर आता ते फिरून मोगलांकडे वळणार होते. तोंच मिर्झा राजा जयसिंग ह्या शूर, पराक्रमी आणि चिकाटीच्या सरदाराची फार मोठी स्वारी मोगलांनी राजांवर पाठविली.

स्वराज्याकरिता दोन हात

शिवाजीराजांनी स्वातंत्र्य मिळविण्याची कामगिरी अंगावर घेतल्यापासून सर्व आयुष्यभर स्वास्थ्य कसें तें त्यांना क्षणभर लाभलें नाही. विशेषतः अफजल-प्रसंगामुळे राजांनी प्रस्थापित सत्तांना दिलेल्या अव्हानाचें खरें स्वरूप स्पष्ट झाल्यामुळे, शिवाजीराजांवर गेल्या पांचसहा वर्षांत त्यांनी अनेक संकटें आणलीं. या काळांत जिवावरचे प्रसंग त्यांच्यावर कोसळले. त्यांतून सुटून जाण्यासाठी त्यांनीहि अप्रतिम आणि अकल्पित युक्त्या योजिल्या व शेवटीं त्या सर्वांवर मात केली. पण त्यासाठी त्यांना एक-सारखा झगडा करावा लागला. स्वातंत्र्याची आकांक्षा धरल्याची ही किंमत द्यावी लागली.

या पांचसहा वर्षांच्या अविश्रांत झगड्याची फलश्रुति पाहिली तर प्रत्यक्ष मुलखाच्या निर्वेध लाभाच्या दृष्टीने ती फारशी समाधानकारक नाही. देशावरील बहुतेक (निजामशाही) मुलूख शायिस्तेखानाने व्यापून वैराण करून टाकल्यामुळे फक्त सिंहगड व पुरंधर हेच काय ते नांव घेण्यासारखे मोठे किल्ले राजांच्या ताब्यांत राहिले. ते टिकविण्यासाठीहि त्यांना सतत जागरूक राहावें लागलें. महाडच्या उत्तरेकडील कोकणांत मोगलांची सत्ता बसलेली होती. देशावरील व कोकणांतील पूर्वी जिंकून घेतलेला आदिलशाही मुलूख राजांच्या ताब्यांत राहिला; पण तो राखण्यासाठीहि त्यांना एकसारख्या स्वाऱ्या कराव्या लागल्या. या सर्व धामधुमींत शिवाजीराजांचें अंतःसामर्थ्य, त्यांची व फौजांची हिंमत, अनुभव आणि कार्यक्षमता अपार वाढली. आपण दोन शत्रूंशीं एका वेळीं लढूं शकलों हें त्यांना मोठें भूषण होतें. दीर्घ प्रयत्न करूनहि मोगलांना सिंहगड घेतां आला नाही. सुरत, हुबळी, राजापूर, वेंगुर्लें, अहमदनगर, दौलताबाद अशा लांबलांबच्या शहारांकडे चौफेर संचार करून शिवाजीराजे मन मानेल तशी लूट बिनधोक करूं शकले. त्यांनी नव्या आरमाराचा पाया घालून तीनचारशे मैल दूर बसनूरपर्यंत मजल मारली. कित्येक मोठ्या सरदारांस लोळविलें. शहाजी-राजांच्या कैदेचा सूड उगविला. राजकारणाचे डाव खेळविले. दक्षिणच्या सत्तांमध्ये स्वतःला निराळें असें एक स्थान प्राप्त करून घेतलें. औरंगजेबा-सारख्या बलवान बादशाहावर मनगटें चावण्याचा प्रसंग गुदरविला.

* * *

१२ मोगलाईचें काहूर

राजा जयसिंगाची रवानगी

शायिस्तेखानावरील यशस्वी छापा, सुरतेची निर्भय लूट, आणि जसवंत-सिंगाला सिंहगड घेण्यांत आलेलें अपयश या तीन गोष्टींनी आपली इज्जत गेली असें औरंगजेबाला वाटलें, आणि शिवाजीराजांवर त्याचा सूड उगविण्याचा त्याने निश्चय केला. तें काम आपण स्वतः अंगावर घ्यावें इतकें महत्त्वाचें आहे, असेंहि त्याला वाटलें. पण शिवाजीने धोका दिला तर ! त्यापेक्षा आपण सांभाळून मागें राहावें आणि आपला सर्वांत उत्कृष्ट सेनापति आणि नामांकित मुत्सद्दी शिवाजीवर पाठवावा असें त्याने ठरविलें. जयपूरचा मिर्झा राजा जयसिंग आपल्या लहानपणापासून मोगलांच्या सेवेंत वाढलेला होता. त्याने शहाजहानच्या कारकीर्दीपासून चाळीस वर्षांवर हिंदुस्थानांत व हिंदुस्थानाबाहेर युद्धाचा व राजकारणाचा अनुभव घेतलेला होता. या एवढ्या दीर्घ कालांत एकदाहि त्याला अपयश आलेलें नव्हतें. मोगलांच्या राज्यांत असा शिरस्ता होता की, हिंदु सेनापति कितीहि मोठा झाला तरी त्याला केव्हाहि एखाद्या स्वारीचा मुख्य अधिकार मिळत नसे. पण तो मान जयसिंगाला यापूर्वी मिळालेला होता. तो जसा शूर तसाच त्या वेळच्या कल्पनांप्रमाणे विद्वानहि गणला गेलेला होता. असा महान् अनुभवी व अखंड विजयी रजपूत सेनापति आणि मोगली रिवाजांत (कपटनीतींत) मुरलेला मुत्सद्दी राजा जयसिंग आणि कट्टर कडवा पठाण सरदार दिलेरखान अशी जोडगोळी शिवाजीच्या तोंडावर पाठवावी असा त्याने सावधगिरीचा बेत केला. सुप्रसिद्ध इटालिअन प्रवासी निकोलो मनुची याच्या हाताखाली युरोपीय तोफखान्याचाहि एक विभाग त्याने जयसिंगाबरोबर दिला. "आपण पातशाहांनी जावें असाच हा आणीबाणीचा प्रसंग आहे. परंतु तुम्हांलाच पाठवितों," असें जयसिंगाला त्याने गौरवून सांगितलें आणि त्याच्याबरोबर आणखीहि अनेक

शूर व कर्ते हिंदु व मुसल्मान सेनापति व कसलेलें सैन्य दिलें. असे प्रतिज्ञेचे सेनापति, प्रचंड फौजा आणि पोख्त तोफखाना वगैरे सर्व प्रकारचा सरंजाम औरंगजेबाने राजांविरुद्ध जमा केला व त्यांना नेस्तनाबूद करण्याचा आटोकाट प्रयत्न चालविला.

इ. १६६४ सप्टेंबर अखेर जयसिंगाची राजांच्या स्वारीवर नेमणूक झाली. उत्तर हिंदुस्थानांतून तो वर्षअखेर तातडीने निघाला व वाटेंत किंवा औरंगाबादेंत (१३ फेब्रु.) वेळ न गमावतां इ. १६६५ मार्च ३ ला पुण्यास येऊन पोंचला. पावसाळा सुरू होऊन मोहीम बंद करावी लागणार, त्याला आता तीनच महिने राहिले होते. लगेच जसवंतसिंगाकडून सेनापतित्वाचा अधिकार घेऊन जयसिंग विलक्षण तडफेने सगळीकडून शिवाजीराजांचा कोंडमारा करण्याच्या कामाला लागला.

मोगलांची स्वारी म्हणजे ती सर्व दक्षिणी सत्तांविरुद्ध एकदम चालायची. पण जयसिंगाने प्रथम शिवाजीराजे आणि नंतर आदिलशाही असा क्रम या वेळीं ठरविला. गडांशिवाय पुणें व सुपें परगण्यांचा ताबा शायिस्तेखानाने आधीच घेतला होता. परंतु कोकणांत शिवाजीराजांची बसलेली घडी त्याला मोडतां आली नव्हती. यामुळे प्रथम कोकणच्या मार्गानेच जाण्याचा बेत जयसिंगाने केला. परंतु तसें केल्यास विजापूरकर व शिवाजीराजे या दोघांस देशावर आपलीं सैन्यें एकत्र आणतां येतील; म्हणून नेहमीच्याच रस्त्याने येऊन त्याने आपलें सैन्य त्या उभय शत्रूंच्या दरम्यान सासवडलाच ठेवलें. आणि तो स्वतः ३ मार्चला पुण्यांत राहावयास आला. जयसिंग स्वतः जबरजस्त सैन्य घेऊन आलाच होता. पण त्याशिवाय त्याने चोहों बाजूंना आपले हस्तक पाठवून, राजांविरुद्ध लोक उठवून त्यांस आपल्या झेंड्याखाली जमा केलें. निरनिराळ्या लोकांच्या मार्फत गोवें-वसईचे पोर्तुगीज, वेंगुर्ल्याचे डच, सुरतेचे इंग्रज व जंजिऱ्याचे सिद्दी या आरमारी सत्तांकडे ‘ राजांच्या गलबतांविरुद्ध तुम्ही याच वेळीं मोहीम काढा ’ असें त्याने बोलणें लाविलें. जावळीकडील चंद्रराव मोऱ्यांचे नातेवाईक व अफजलखानाचा मुलगा फाजलखान अशा राजांच्या शत्रूंना उठविलें; एवढेंच नव्हे तर पैसा व मनसबदाऱ्या यांची लालूच दाखवून खुद्द शिवाजीराजांच्या अनुयायांत फंदफितूर माजविला. हें सारें निर्वेध करतां यावें म्हणून

सर्वाधिकार त्याने आपल्या हातांत मागून घेतले. तात्पर्य, या स्वारींत जयसिंगाने आपली कमाल केली. जयसिंगाची पात्रता, त्याचें नांव, त्याचें सैन्य, त्याची तयारी, त्याची तडफ व त्याच्यावरील औरंगजेबाचा विश्वास यांचा विचार करता, जयसिंगाची स्वारी हें औरंगजेबाचें निर्वाणीचें अस्त्र होतें, असें म्हणावें लागेल. जयसिंगाची ही मोहीम म्हणजे यापूर्वीच्या साऱ्या संकटांना बरें म्हणवील असें फार महान् गंडांतर होतें.

पुरंधरचा तह

जयसिंगाची पूर्वतयारी जशी सर्वांगीण होती, तशी त्याची युद्धयोजनाहि त्वरेची आणि काटेकोरपणें आखलेली होती. पांच वर्षांपूर्वी याच हंगामांत शायिस्तेखान आला होता, त्या वेळीं शिवाजीराजे पन्हाळयांत कोंडलेले होते. तरी ती मोहीम अजून संपली नव्हती. त्या मानाने जयसिंगाचें काम त्वरेने आटोपलें. त्याने मोगली फौजा दख्खनच्या संपर्काने, अनारोग्यकारक वातावरणाने व कामगिरीच्या त्रासाने निःसत्त्व बनूं दिल्या नाहीत. आवश्यक तेवढी नाकेबंदी करून झाल्यावर लगेच एकदम राजांच्या मुख्य गडांना वेढा घालण्याचें काम त्याने हातांत घेतलें. पुरंधराकडे जाण्यासाठी जयसिंगाने बाराच दिवसांत (१५ मार्चला) पुणें सोडलें. ३० मार्चला तो सासवडला आला. दिलेरखानाने लगेच पुढे जाऊन पुरंधर गडाला वेढा घातला. पुरंधरचा वेढा सुरू असतांनाच राजांच्या इतर मुलखांत मोगलांच्या लहानमोठ्या फौजा रोहिडा, राजगड, तुंग, तिकोना या किल्ल्यांकडे व आसपासच्या मुलखांत स्वाऱ्या, जाळपोळ व लुटालूट करूं लागल्या. बसनूरची स्वारी मारून (इ. १६६५ फेब्रु.) शिवाजीराजे जयसिंगाच्या मोहिमेची वार्ता कळल्यामुळे या वेळीं स्वदेशीं परत आले होते, आणि मोगली फौजांना प्रतिकार करण्याचे निरनिराळे उपाय योजून पाहात होते. परंतु मोगली साम्राज्याच्या प्रचंड सामर्थ्यासमोर त्यांची एवढीशी शक्ति पुरी पडली नाही किंवा जयसिंगाच्या जागत्या स्वामिनिष्ठेपुढे त्यांची कोणतीहि युक्ति चालली नाही.

दिलेरखान तर हिरिरीने लढत होता. आघाडीवर राहून त्याने मराठ्यांचा कोंडमारा चालविला. मोगलांबरोबर युरोपीय तोफखाना होता, त्याचा मारा चांगलाच लागू झाला. प्रथम रुद्रमाळ किंवा वज्रगड घेऊन (१३ एप्रिल)


तेथून पुरंधरावर मारा करण्यांत आला, तो फारच हानिकारक झाला. पुरंधरावर या वेळीं मुरारबाजी या शूर प्रभु सरदाराची नेमणूक शिवाजी-राजांनी केली होती. त्याने शौर्याची शर्थ केली. लढतां लढतां तो पडला; त्याला मोगलांचा वेढा मारून काढतां आला नाही. महिना दीड महिनाच कां होईना, परंतु एवढ्या जबर शत्रूपुढे मराठ्यांनी टिकाव धरला हेंच नवल. त्यांचें शौर्य मोगलांना प्रत्यक्ष दिसलें आणि जेव्हा अधिक प्राणहानि होऊं देण्यांत हाशील नाही असें पाहून राजांनी तहाचें बोलणें लावलें, तेव्हा राजांचा पराक्रम पाहून जयसिंग तहाला कबूल झाला. या वेळीं एकीकडे मोगलांच्या आक्रमणाला तोडीस तोड म्हणून नेताजी पालकर आदिकरून राजांच्या सेनापतींनी मोगली फौजांना सतावण्याचा उद्योग केला; तर दुसरीकडे शत्रूचें प्राबल्य लक्षांत घेऊन रघुनाथपंडिताच्या मार्फत शिवाजीराजांनी जयसिंग व दिलेरखान यांच्याकडे सलोख्याचें बोलणें केलें. परंतु त्या दोघांच्याहि मनांत राजांनी सर्वस्वी शरण यावें असें असल्यामुळे दोघांनीहि तिकडे दुर्लक्ष केलें. अखेरीस डोळ्यांदेखत चाललेला विध्वंस न पाहवून ‘ सर्वनाश होणार, तर बचावेल तेवढें बचावूं या ’ अशा विचाराने शिवाजीराजे इ. १६६५ जून ११ रोजीं जयसिंगाच्या भेटीस गेले. नंतर दिलेरखानाची भेट वगैरे सर्व सोपस्कार यथासांग होऊन दोनच दिवसांत, म्हणजे त्या काळांतल्या मानाने अगदी झटपट, तह झाला.

मोगली साम्राज्याचें सामर्थ्य जबर होतें व जयसिंगहि मोठ्या ईर्षेने आला होता. एवढा मोठा विजय केवळ दोनतीन महिन्यांत मिळविल्यावर जयसिंगाकडून राजांना तहाच्या सोप्या अटी मिळणें शक्यच नव्हतें. तह पाहिजे असेल तर राजांनी सर्वच्या सर्व किल्ले सोडावे आणि मोगलांची ताबेदारी पत्करून राहावें असेंच जयसिंग म्हणत होता; पण शेवटीं वाटाघाटींना कबूल झाला. वास्तविक औरंगजेबाला देखील कठीण वाटणाऱ्या या युद्धांत एवढा झटपट आणि इतका प्रचंड विजय मिळाला असतां, जयसिंगाने आपलाच हेका न चालवितां राजांशीं सामोपचाराच्या वाटाघाटींना कां तयार व्हावें, यालाहि कारणें होतीं. आणि तीं जयसिंगाने औरंगजेबाला आधीच कळवून त्याची संमति वाटाघाटीला आणविली होती. तीं कारणें अशीं : (१) मोगलांनी फारच ताणून धरलें असतें, तर मोगलांच्या विरुद्ध शिवाजीराजांना मदत करण्यास आदिलशाहीच्या फौजा सिद्ध होत्या. आणि

तसें झालें असतें तर युद्धाचा निकाल मोगलांना अनुकूल होण्याचा संभव अगदी नष्ट झाला नसता, तरी युद्ध विनाकारण रेंगाळून खर्च फार वाढला असता. (२) खुद्द शिवाजीराजे या स्वारीमुळे फार अडचणींत सापडले असते, तर नेहमीच्या त्यांच्या जिवावर उदार होण्याच्या रिवाजाप्रमाणे म्हणजे अफजल-प्रसंगाच्या वेळेप्रमाणे अगदी सर्व प्रकारची निरवानिरव करून वाटेल त्या प्रकारें निधड्या छातीने त्यांनी मोगलांना तोंड दिलें असतें! नव्हे तशी त्यांची तयारी झाली होती, अशी जयसिंगाला बातमी पक्की मिळाली होती. राजांच्या निदानीच्या प्रतिकाराला सर्व जण फार भीत होते. आणि (३) तिसरें कारण म्हणजे पावसाळा जवळ आला होता. एकदा पाऊस सुरू झाला असता, तर या उत्तर हिंदुस्थानी पोशाखी प्रचंड फौजांचे हाल कुतरा खाता ना.

कोणत्याहि कारणासाठी युद्ध लांबलें असतें, तर त्याचा निकाल इष्टच होईल अशी खात्री नव्हती, या गोष्टीचा परिणाम जयसिंगाच्या मनावर झाला. आणि मग पुष्कळच वाटाघाटी होऊन अखेरीस तह झाला (१३ जून). तहाच्या अटी अशा : (१) राजांनी पुरंधर, सिंहगड, लोहगड इत्यादि देशावरचे नऊ व कोकणांतले चौदा असे तेवीस किल्ले व त्यांच्या खालील चार लक्ष होनांचा मुलूख मोगलांना द्यावा. (२) राहिलेले राजगड, तोरणा, रायगड, तळेगड, घोसाळा आदिकरून बारा किल्ले व त्यांच्या खालचा फक्त एक लक्षाचा मुलूख राजांकडे राहावा. आणि (३) याच्या मोबदल्यांत राजांनी औरंगजेबाची एकनिष्ठेने सेवा करावी.

या अटी उघडपणें राजांना औरंगजेबाचा ताबेदार बनविणाऱ्या अशा होत्या, तरी बाका प्रसंग जाणून नाइलाज म्हणून त्यांनी त्या मान्य केल्या. तहाचीं कलमें कडक होतीं. तथापि त्यांतलें कोणतेंहि, विशेषतः तिसरें देखील, कलम शब्दशः अमलांत आणून राजांशीं तुटेपर्यंत बिघडविण्यांत अर्थ नाही, हें जयसिंग जाणत होता. आदिलशाहीशीं कराव्या लागणाऱ्या युद्धांत शिवाजीराजांचा पुढे उपयोग होणार होता. म्हणून त्यांच्या भावना त्याने दूरदर्शीपणाने सांभाळल्या. आणि जेव्हा शिवाजीराजांनी युक्तीने नोकरीच्या अटींतून आपली सुटका करून घेतली, व पांच हजारांची मनसब व नोकरीच्या खर्चाची जहागीर आपला मुलगा संभाजी याच्या नांवाने



पुरंधरच्या तहाने झालेली किल्ल्यांची वांटणी

महाराजांकडे ठेवलेल्या किल्ल्यांना नेहमीची व मोगलांनी घेतलेल्या किल्ल्यांना काळी खूण केली आहे. ‘किल्ले ह्या मुलखाच्या किल्ल्याच,’ हें ध्यानांत घेतलें म्हणजे ह्या तहाचें मर्म समजतें.

स्वीकारली, तेव्हा त्याने फारसा विरोध दाखविला नाही. असें करण्यांत आपला स्वाभिमान राखावा व राजकारणाचे डाव खेळण्यास आपण मोकळें राहावें, हेंच शिवाजीराजांचें धोरण होतें, हें मुद्दाम सांगितलें पाहिजे असें नाही.

पुरंधरच्या तहाने जुन्या 'निजामशाहीं'तील बहुतेक मुलूख औरंगजेबाला द्यावा लागला. त्यापैकी चारपंचमांश तर प्रत्यक्ष खालसाच झाला व एकपंचमांश त्याचा मनसबदार म्हणून राजांकडे आला. त्या मुलखावरील स्वामित्व संपूर्णपणें मोगलांकडे गेलें. याशिवाय राजांकडे आदिलशाहींतील आवांतर मुलूख होता. जयसिंगाने विजापूर जिंकल्यावर त्या मुलखाबद्दल पुढे मोगलांनी बांधा उत्पन्न करूं नये म्हणून राजांनी त्याचें फर्मान मागितलें. विजापुरी तळकोकण ४ लक्ष होनांचा व विजापुरी बालाघाट ५ लक्ष होनांचा असा मुलूख आपल्याला मिळावा, त्याबद्दल १३ हप्त्यांनी आपण ४० लाख होनांची खंडणी देण्यास तयार आहों, असें राजांनी बोलणें लाविलें. जयसिंगानेहि त्याबद्दल चांगली शिफारस केली. पण औरंगजेबाने याचें फर्मान देण्यास पुष्कळ आढेवेढे घेतले. आणि अखेरीस इ. १६६५ सप्टेंबर ५ ला पंजाचें जें फर्मान पाठवून दिलें, तें मुळीच समाधानकारक नव्हतें. चार लाखांचें तळकोकण तर बादशाहाने 'सरकारांतच घेतलें' आणि पांच लाखांचा बालाघाट जयसिंगाने जिंकून घेण्याच्या आधी जर शिवाजीने घेतला, जयसिंगाला आदिलशाहीच्या मोहिमेंत मनासारखी मदत केली, आणि ठरलेली खंडणी भरली, तर शिवाजीराजांकडे तो 'बहाल ठेवूं,' असा त्याबद्दल दीर्घसूत्री हवाला दिला. म्हणजे राजांनी खंडणी द्यायची कबूल केली ती कायम झाली; पण ती ज्यासाठी कबूल केली, त्या गोष्टी वाऱ्यावर उडाल्या.

सैन्याचा सरंजामी खर्च भागण्यासाठी शिवाजीराजांना जो एक लक्षाचा मुलूख मिळणार होता, तो पुरणार नाही म्हणून त्यांनी आणखी थोडा प्रदेश मागितला. त्याचा परिणाम असा झाला की, त्यांना जो खर्चासाठी एक लक्षाचा मुलूख द्यावयाचें ठरलें होतें, तोहि तावडतोब मिळाला नाही. कारण त्या मुलखाचें उत्पन्न खरोखर एक लाखच आहे का एक लाखाहून जास्त आहे, याची खात्री करून घेण्यासाठी सरकारकडून आधी त्याची वर्षभर वहिवाट करून पाहावी असा नवाच बूट निघाला! शिवाय ४० लाख

होन खंडणीचा पहिल्या वर्षाचा ३ लाखांचा हप्ता राजांकडून भरला जाण्याची खात्री पटल्याशिवाय संभाजीच्या मनसबीच्या फौजेच्या खर्चाची जहागीर त्याला देऊं नये असें औरंगजेबाने ठरविलें.

इ. १६६० पासून (शायिस्तेखानाच्या वेळेपासून) पांच वर्षें मुलखाची एकसारखी धूळधाण चाललेली, आणि पुरंधरच्या तहाने सर्वस्व गमावलेलें. अशांत मोगलांसाठी फौज तर ठेवायची आणि खर्चाला मात्र पै मिळावयाची नाही, असा हा पेंच होता. पण मोठ्या मिनतवारीने खंडणीच्या हप्त्यांतून मनसबीच्या फौजेचा खर्च वळता करून घेण्याची सवलत जयसिंगाने उदारपणें दिली आणि हें प्रकरण कसेंबसें थांबलें.

हीं तहाचीं कलमें राजांना अत्यंत नामोहरम करणारीं आणि शब्दशः नागवणारीं होतीं. असा हा जयसिंगाचा वरवंटा छातीवर फिरत असतां शिवाजीराजांना डोकें वर काढण्याची शक्यता नव्हती. पुरंधरच्या तहाने शिवाजीराजांच्या स्वराज्याचा डोलारा त्यांच्या डोळ्यांदेखत कोलमडून पडला आणि राजे मोगलांचे केवळ जहागीरदार बनले. दुर्दैवी महाराष्ट्राने तीस वर्षांपूर्वीचें आपलें प्रतिबिंब पुनः एकवार भवितव्यतेच्या आरशांत पाहिलें. संभाजीला पांच हजारांची मनसब, दोन लाख रुपये बक्षीस, निशाण व नौबत घेण्याची परवानगी मिळाली; पण जहागिरीचा वांधाच होता. मोगलांच्या छावणींत संभाजी १८ जूनला येऊन दाखल झाला. त्याच्याबरोबर नेताजी राहावयाचा होता. अगतिक होऊनच २७ सप्टेंबरला जयसिंगाच्या गोटांत जाऊन शिवाजीने हें फर्मान स्वीकारलें. तात्पर्य, 'शिवाजी मोगलांना शरण जाऊन त्यांचा सहकारी म्हणून मान्यता पावला' असा डचांचा वगैरे या वेळीं रास्त ग्रह झाला.

जयसिंगाची या स्वारींतील एकंदर वागणूक व व्यवहार अत्यंत निर्दय-पणाचा झाला. कदाचित् आपण हिंदु म्हणून शिवाजीराजांशीं संगनमत केलें असा संशय औरंजेबाला येऊं नये म्हणूनहि तो जपला असेल. जयसिंग आणि शायिस्तेखान या दोघांनीहि आपली पराकाष्ठा केली. परंतु या दोघांच्या युद्ध-योजनांची तुलना करून पाहिली तर कट्टर मुसलमान शायिस्तेखान पुरवला; पण मुसलमानांच्या मिठाला जागणारा हा कर्मठ हिंदु राजा नको, असें वाटूं लागतें. समोरासमोर शत्रु म्हणून उभें ठाकल्यावर त्या तऱ्हेने काय

पराक्रम गाजवावयाचा तो गाजवावा; परंतु शत्रुत्वाची इभ्रत आणि पातळी कांही राखावी, अशी मिर्झा राजा जयसिंगाकडून आपण अपेक्षा करतों. परंतु पुरंधरच्या तहानंतर राजे सावधगिरीने वागूं लागल्याचें पाहून मोगली मसलत करून त्यांच्यावर मारेकरी घालण्याचा विचार देखील जयसिंगाने केला होता, हें पाहून शरम वाटते. शिवाजीची मुलगी आपल्या मुलाला करून घेण्याचें लटकेंच बोलणें लावावें, त्या आमिषाने त्याला भेटायला बोलवावें, आणि मग 'येतां जातांना केव्हा तरी संधी साधून माझे हुशार लोक त्याचा नाश करतील,' हा विचार औरंगजेबाला खूष करण्यासाठी वजीर जाफरखानाकडे जयसिंगाने कळविला! त्या वेळच्या राजपूत म्हणविणाऱ्या या पराक्रमी पुरुषाची काय ही अवनती! मराठ्यांची स्थिति तशीच अवनत करावी ही औरंगजेबाची इच्छा, आणि तिच्या पूर्ततेसाठी असल्या कुऱ्हाडीच्या दांड्यांची ही धडपड. चोहों बाजूंनी असलें वातावरण फोफावलें. त्यांत मुरलेल्या अफजलखानादि कपटी लोकांशीं जशास तसें या न्यायाने शिवाजीराजांना वागावें लागलें. तसें ते वागले, म्हणूनच स्वतः शीरसलामत राहिले आणि मराठ्यांचें राज्य उभें करूं शकले.

विजापूरवर मोहीम

जयसिंग आला तो शिवाजीराजांप्रमाणेच गोवळकोंड्याच्या कुतुबशाहावर व विजापूरच्या आदिलशाहावरहि स्वारी करण्यासाठी आला. शिवाजीराजे व विजापूरकर यांचें सख्य आहे असेंच तो धरून चालला. प्रसंगीं वैयक्तिक बैरापायीं आदिलशाही सरदार राजांशीं लढत असले, तथापि मोगलांशीं लढतांना दोघांनी एक झालें पाहिजे असें धोरण कित्येक वेळा तेथे दिसलेंहि. या वेळींहि विजापूरकर सैन्य जमवूं लागले. परंतु ह्या हालचाली शिवाजीराजांना पोषक होत्या असें म्हणतां येत नाही. तळकोकणांत तर विजापूरकरांनी राजांवर स्वारीच काढली.

गेल्या दसऱ्यानंतरच्या स्वारींत शिवाजीराजांनी लखम सावंताकडून काढून घेतलेली देसाईगिरीची देसकत कृष्ण सावंताला दिली होती. त्याबद्दल लखम सावंताने विजापुरास तक्रार केली. आणि त्यांनी शिवाजीराजे मोगलांच्या पेंचांत सापडले होते असें पाहून महमद इखलासखान वजीर याच्याकडे सावंताची कामगिरी सोपविली (इ. १६६५ मे). त्याने राजांच्या

सैन्याला कुडाळ प्रांतांतून राजापूरपर्यंत मागे रेटल्यामुळे लखम सावंत कुडाळमध्ये पूर्ववत् स्थानापन्न झाला. विजापूरकरांनी हें आक्रमण केलें त्या वेळीं राजे जयसिंगाच्या स्वारींत गुंतले असल्यामुळे राजांच्या कुडाळकडील अधिकाऱ्यांना विजापूरकरांच्या मुलखांत लूटमार करण्यापलीकडे अधिक प्रतिकार करतां आला नाही. वास्तविक मोगल आपल्यावरहि चालून येणार हें उघड असतांना विजापूरकरांनी अधिक धोरणाने वागणें जरूर होतें; तथापि त्यांच्या दरबारांत पूर्ववत् भांडणें व मारामाऱ्या चालू होत्या. कारवारकडील अधिकारी रुस्तुमजमा हाच काय तो कांहीसा शिवाजीराजांना अनुकूल राहिला. परंतु विजापूर दरबारांत इतर कोणी दूरदर्शीपणाने वागत होता असें दिसलें नाही.

जयसिंगाने राजांवर जय मिळविला, हें पाहून, आता ही संक्रांत आपल्यावर येणार हें अल्ली आदिलशाहाने ओळखलें व ९ लक्ष होन देऊं करून राजा जयसिंगाशीं तहाचें बोलणें लावलें (इ. १६६५ ऑगस्ट). सप्टेंबरांत ही खंडणीची रक्कम घेऊन विजापुराहून आग्र्याकडे वकील रवाना झाला व इकडे इखलासखानाने शिवाजीराजांना राजापूरपलीकडे रेटीत नेलें. पण तितक्यांत जयसिंगाशीं तह झाल्याने भयमुक्त झालेल्या राजांच्या लोकांनी तळकोकणांत जोर करून त्याला घाटापलीकडे पिटाळून लावलें व विजापुरी मुलखांत घुसून लुटालूट आरंभिली. तेव्हा महमद इखलासखानाला नोव्हेंबरपर्यंत शिवाजीराजांचा सर्व मुलूख सोडून द्यावा लागला व ह्या झटापटींत त्याचे अनेक अंमलदार व बरेंच सैन्य खर्ची पडलें. अशा प्रकारें विजापूरकरांनी त्यांच्याशीं अवेळीं मांडलेल्या शत्रुत्वामुळे, आणि विजापुरी बालाघाटाचा स्वतःचाच मुलूख स्वतःकडे राखावयाचा तर त्यासाठी औरंगजेबाने घातलेल्या अटीप्रमाणे (पृ. १३०) वागणें भाग असल्यामुळे, या वेळीं शिवाजीराजांना विजापूरकरांविरुद्ध मोगलांना मदत करणें भागच होतें. खुद्द विजापूर दरबारांत एकी नव्हती. रुस्तुमजमासारखे कांही सरदार सोडून बरेच चांगल्या दर्जाचे सरदार मोगलांनी अनुकूल करून घेतले होते. अशा कारणांनी यशाची भरपूर आशा दिसत असल्यामुळे व दिलेरखानाच्या आग्रहामुळे जयसिंगाने विजापूरकरांचें तहाचें बोलणें धुडकावून लाविलें, आणि त्यांच्यावर फौजा पाठविल्या.

शिवाजीराजांचें सैन्य बरोबर घेऊन जयसिंग विजापूरच्या स्वारीवर इ. १६६५ नोव्हेंबर २० ला निघाला. खुद्द शिवाजीराजे व सेनापति नेताजी यांची फौज आघाडीवर असे. निघाल्यापासून आठ-पंधरा दिवसांत त्यांनी ताथवडा, फलटण हे विजापुरी किल्ले घेतले. शिवाजीराजांनी तळकोकणांतील विजापुरी फौजेला पळवून लाविलें व हे दोन किल्ले जयसिंगाच्या स्वारींत राहून घेतले, याबद्दल जयसिंगाच्या शिफारसीवरून औरंगजेबाने राजांना शाबासकीचें पत्र पाठविलें. त्याबरोबरच उत्तम पोशाख व जडावाची कट्यार पाठविली (इ. १६६५ डिसेंबर २५). लौकिकांत अशीं खुशालीचीं पत्रें येत असलीं तथापि राजांबद्दल मोगल दरबारांत अत्यंत विरुद्ध मत होतें. विशेषतः दिलेरखान तर या काफराचा नाश करण्यास उत्सुक होता. ही वस्तुस्थिति सर्वांना माहीत होती. यामुळे राजे जयसिंगाच्या स्वारींत जरी बरोबरीने लढण्यासाठीच गेले होते, तरी जयसिंगाने त्यांना आपल्याबरोबर पकडून नेलें, अशीहि बातमी या वेळीं पसरली होती.

मोगल सैन्य पुरंधराकडून निघून आपणावर चाल करून येत आहे, असें पाहून आदिलशाहाने आपलीं विखुरलेलीं सैन्यें एकत्र केलीं. युद्धाचा सोक्षमोक्ष आता काय तो मुख्य रणक्षेत्रांत व्हावयाचा असल्यामुळे, विजापूरच्या आसपासचा बराच मोठा मुलूख उद्ध्वस्त करून मार्गांतील जलसंचयांत विष टाकून, आदिलशाही फौजा मोगलांची मार्गप्रतीक्षा करीत बसल्या. ज्या एक दोन विजापुरी टेहळणीच्या तुकड्यांशीं गाठ पडली, त्यांचा मोगली फौजांनी सहज पराजय केला, व जयसिंग थेट विजापूर घेण्याच्या इराद्याने पुढे चालला. त्याला विजापुरापासून बारा मैलांवर विजापुरी सैन्याने एकजुटीने जोराचा प्रतिकार केल्यामुळे (डिसेंबर), मोगलांचे चौदा हजार लोक व पुष्कळ अंमलदार ठार झाले व मोगली सैन्याला मागे हटावें लागलें. मोगली चढाईचा असा अनपेक्षितपणें बोजवारा उडाल्याने त्या संबंधांत अनेक प्रवाद उठले. 'शिवाजीने विश्वासघात करून मोगली सैन्य आदिलशाहाचे तोंडीं दिलें आणि म्हणून असें झालें,' हा त्यांतलाच एक होता. त्याचाहि परिणाम होऊन राजांबद्दलचें मोगल दरबारांतलें आधीच प्रतिकूल असणारें मत अधिकच कलुषित झालें.

शिवाजीराजांची सवती मोहीम

हा पराजय कसा सावरावा, याची काळजी आता जयसिंगाला लागली. विजापूरला अशा परिस्थितींत वेढा घालून तो यशस्वी करणें त्याला अशक्य वाटलें. यामुळे शिवाजी-नेताजीसारख्या माहितगारांनी विजापूरच्या राज्यांत दंगल माजवून त्यांच्या सैन्याची फाटाफूट करावी, ही शिवाजीराजांची योजना त्याने आनंदाने मान्य केली. या योजनेप्रमाणे डिसेंबर-जानेवारींत पन्हाळयाचा किल्ला घेऊन देण्याचें व नंतर त्या बाजूला धुमाकूळ घालण्याचें काम राजांनी अंगावर घेतलें. जातांना वाटेंत त्यांनी पुष्कळ आदिलशाही नगरें जाळलीं. पन्हाळा किल्ला किल्लेकऱ्याला फसवून त्यांना घेतां आला नाही. तेव्हा दुसऱ्या दिवशीं त्यांनी समोरासमोर हल्ला करून पाहिलें; परंतु तोहि प्रयत्न फसला. मग ते आपल्या विशाळगड किल्ल्याच्या आश्रयाला गेले. विशाळगडाच्या मुक्कामांत कांही बोलाचाली होऊन नेताजी शिवाजीवर रुसून विजापूरकरांकडे गेला. त्यांची जहागिरी पत्करून तो मोगलांच्या मुलखाला त्रास देऊं लागला. हें एक आणखी नवीनच बंड उत्पन्न झालें. तेव्हा त्याला पकडून जयसिंगाने प्रथम आपल्या ताब्यांत घेतला व आपल्या बाजूला वळविण्याकरिता त्याला मनसब व चाकरी दिली. शिवाजीराजे आग्र्यांतून निसटून गेल्यावर, नेताजी शिवाजीच्या नात्यांतला आहे अशा समजुतीवर सूड उगविण्याच्या क्षुद्र बुद्धीने औरंगजेबाने त्याला आग्र्याला पकडून कैदेंत टाकलें. त्रास चुकविण्यासाठी तो मुसलमान झाला. त्याच्या बायकांनीहि तो धर्म स्वीकारला. या धर्मांतरामुळे महमद कुलीखान हें नांव व मान्यतेची नोकरी त्याला मिळाली. तिचा त्याने ८–९ वर्षें उपभोग घेतल्यावर पुढे त्याला 'प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून घेतलें (इ. १६७६ जून १९).' नेताजीसारख्या नामांकित अनुयायाचा या ऐन आणीबाणीच्या दहाअकरा वर्षांतला थारेपालट व विशेषतः धर्मांतर हें एक गूढच वाटतें. पण नेताजीच्या असल्या चमत्कारिक स्थित्यंतरानंतर त्याला राजांनी शुद्ध करून घेऊन फिरून जवळ केला, यांत त्यांचें नेताजीवरील प्रेम दिसून आलें.

कोणत्याहि सबबीवर कां होईना, शिवाजीराजे हातांतून पन्हाळगड-विशाळगडाकडे निसटले. नेताजी विजापूरकरांतर्फे मोगलांना त्रास देऊं लागला. विजापूरकर व जागृत झालेले गोवळकोंडेकर आता एक होऊं

लागले व विजापूरकरांनी तर जयसिंगाचा पराजय केला. तेव्हा जयसिंग गोंधळून गेला व आकाश फाटल्यासारखें त्याला झालें. एक वेळ अशी आली की, जयसिंग त्या वेळीं कपटाने शिवाजीला भेटीला बोलावून त्यावर मारेकरी घालावे असा विचार करूं लागला; पण त्याला त्याने सुरक्षितपणाचीं दिलेलीं वचनेंहि तो विसरला नाही. अशा वेळीं हरप्रयत्न करून निदान शिवाजीराजांना आपल्या बाजूला ठेवावें असें जयसिंगाला वाटणें अगदी साहजिक होतें. म्हणून राजांना बादशाहाच्या भेटीला पाठवावें आणि दक्षिण्यांच्या एकजुटींतून वेगळें ठेवावें असें योजून त्याने औरंगजेबाची परवानगी मागितली (इ. १६६६ फेब्रु.).

शिवाजीराजे पन्हाळ्याकडे आल्यावर अर्थात् त्यांच्या लोकांनी कुडाळ-कडील लढाई पुनः चालू केली. पन्हाळा घेतां आला नाही; तरी तितक्याच महत्त्वाचा फोंडा किल्ला घेण्यासाठी त्यांनी त्याला वेढा दिला. महिना दोन महिन्यांनी किल्ला स्वाधीन करण्याचा ठराव झाला. परंतु वेळींच सिद्दी मसउद, रुस्तुमजमा वगैरेंची कुमक आली. आणि राजांनी घातलेला वेढा मारून काढण्यांत आला. रुस्तुमजमा स्नेही खरा. परंतु तो पेंचांत धरला गेल्यामुळे या वेळीं राजांच्या विरुद्ध लढला आणि त्याने फोंडा, कुडाळ, बांदा, सांखळी व डिचोली वगैरे राजांचीं पांच महत्त्वाचीं ठाणीं घेतलीं (इ. १६६६ फेब्रु.-मार्च).

शायिस्तेखानाच्या दाबामुळे तीन वर्षांपूर्वीं जशी दैना झाली होती तशीच बिकट परिस्थिति आता राजांची झाली. पुण्याकडील मुलूख आधीच गेला होता. त्याच्या भरीला जयसिंग आल्यानंतर पुरंधरच्या तहाने किल्ले देखील गमावून बसावें लागलें. आदिलशाही तळकोकणांतील मुलूख सोडून द्यावा लागला· वरघाटांतील पन्हाळ्याची मोहीम फसली. नेताजीसारखा उजवा हात तुटला. रुस्तुमजमाचा स्नेह निकामी होऊन, जयसिंगावरहि विजयी झालेलें विजापूरचें सैन्य फिरून राजांवर चढाई करायला सरसावणार अशीं सर्व चिन्हें होतीं. सर्व बाजूंनी साडेसाती आली. महाराजांचा सर्वच डाव विस्कळित होऊन कोठेहि हात चालेनासा झाला. इकडे मोगलांचा विजयशाली व महत्त्वाकांक्षी सेनापति जयसिंगहि या वेळीं आपल्या सद्दीचा जोर संपल्याच्या अनुभवाने कमालीचा खट्टू झाला. नियतीने

एकत्र आणलेल्या ह्या दोन खट्ट झालेल्या महाकर्तबगार आणि जबरदस्त महत्त्वाकांक्षी पुरुषांनी आपसांत एक विचार मात्र कायम केला आणि तो म्हणजे शिवाजी महाराजांनी औरंगजेबाच्या भेटीला जावें, हा—अगदी निरनिराळया आणि कदाचित् परस्पर विरोधी कारणांकरिता. राजांनी दख्खनच्या पटावरील विस्कटलेला डाव थोडा वेळ नजरेआड करून आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्याकरिता नर्मदा ओलांडून उत्तर हिंदुस्थानांत पाऊल टाकायचें ठरविलें. औरंगजेबाच्या सत्तासामर्थ्याचें केंद्र स्वतः अजमावून पाहण्यासाठीहि असेल; पण शहानशाहा दिल्लीश्वराचें भेटीचें आमंत्रण स्वीकारून शिवाजीराजे आग्र्यास जाण्यास सिद्ध झाले.

* * *

जयसिंगाचें जाफरखानास पत्र

विजापूर, गोवळकोंडा आणि शिवाजी या तिघांविरुद्ध सर्व सामर्थ्य एकवटून मीं प्रयत्न केला आहे...शिवाजीने कसें तरी मला एकदा भेटावयास यावें...म्हणजे संधी साधून माझे हुशार लोक त्याचा नाश करतील. हा बादशाहाचा बंदा लोकांच्या निंदास्तुतीकडे न पाहतां बादशाही कार्य फत्ते करण्याकरिता कांहीहि करण्यास तयार आहे... माझ्या मुलाला त्याची मुलगी करण्याचें (खोटें) बोलणें लावण्यास देखील.

—सर जदुनाथ सरकार, भांडा. कॉमे. व्हॉ., पृ. ३०६–७.

१३ औरंगजेबाची भेट

आग्र्याला गमन

शिवाजीराजांनी औरंगजेबाच्या भेटीस जावें ही गोष्ट अगदी पुरंधरच्या तहापासून घाटत होती. परंतु शिवाजीराजे व औरंगजेब बादशाहा ह्या दोघांनाहि ती विशेष पटत नव्हती. शेवटीं औरंगजेबाची संमति मिळाली आणि इ. १६६६ मार्च ५ रोजीं शिवाजीराजे आणि संभाजीराजे असे दोघे आग्र्यास जाण्याकरिता निघाले. औरंगजेबाबद्दल विश्वास राजांच्या मनांत नव्हताच. पण जयसिंगासारख्या रजपुताने दिलेल्या जीवितरक्षणाच्या हमीच्या शब्दावर विश्वास ठेवून बादशाहाची गांठ घ्यावी आणि काय होतें हें पाहावें एवढेंच त्यांनी योजिलें. विजापूरची अंत:स्थ स्थिति माहीत असल्याने ज्या प्रकारचा फायदा होतो, तशाच फायद्यासाठी खुद्द बादशाहाचा दरबार समक्ष पाहून येण्याची ही संधी कदाचित् त्यांना घ्यावीशी वाटली असेल.

जयसिंगाच्या सूचनेवरूनच शिवाजीराजे जात असल्यामुळे त्यांच्या मुलखाला यापुढे मोगलांचा नवा त्रास होण्याचा संभव नव्हता. तथापि आपल्या हातांत राहिलेली थोडीशी राज्यसत्ता आपल्या गैरहजेरींत सुरळीत चालण्याची तजवीज त्यांनी करून ठेविली. मातुश्री जिजाबाईची कर्तबगारी कसाला लागलेली होती. आणि मागे राहिलेले राजांच्या तालमींत तयार झालेले लोकहि मोठे नेकीचे होते. राजे राजधानीपासून दूर असल्याच्या काळांत इकडील सर्व कामें सर्वांनी सुरळीत चालविलीं; आणि आपण दूरदर्शी नेत्याचे निष्ठावंत अनुयायी आहों, असें सिद्ध केलें.

शिवाजीराजांना रस्त्यांत सर्वत्र मानाने वागविण्यांत आलें व ते प्रवासांत असतांना औरंगजेबाचें ६ एप्रिलचें संतोषाचें पत्र त्यांना मिळालें. “ इकडील लोभ तुम्हांवर पूर्ण आहे. खातरजमेने यावें. म्हणजे भेटीअंतीं बहुत सत्कार पावून माघारे जाण्याविषयीचा निरोप दिल्हा जाईल, ” असें पत्र व त्याबरोबरच एक पोशाख पाठविण्यांत आला होता. राजांना यामुळे थोडा विश्वास आणि बरीच आशा वाटली. मध्यंतरीं कांही विशेष घडलें नाही.

सर्व व्यवस्था ठरल्याप्रमाणे झाली. कमीअधिक झालेंच तर पाहण्यासाठी जयसिंगाने आपल्या वतीचा सरदार तेजसिंग बरोबर दिला होता.

शिवाजीराजे औरंगजेबाला पाठविलेल्या पत्रांतली दरबारी भाषा मोगली मायन्यांच्या शिरस्त्याप्रमाणे नरमाईची वापरीत. तथापि औरंगजेबाच्या भेटीला जातेवेळचा शिवाजी व संभाजी राजांचा लवाजमा श्रीमंती थाटाचा आणि स्वतंत्र तोलदार राजाच्या इतमामाला साजेसा बाळगण्याची शिवाजी-राजांनी कसोशीने काळजी घेतली होती. आग्न्याच्या राजधानींत असतांना जरूर पडेल त्याचा मुखलेप करतां यावा, अशा हिशेबाने त्यांनी भरपूर खजिना बरोबर घेतला होता. राजांच्या या स्वारीमध्ये १०० पायदळ, २५० घोडेस्वार, अधिकाऱ्यांसाठी पालख्या, पालख्यांबरोबर गणवेषधारी माफक अनुचर व आवश्यक सामग्री पुरवण्यासाठी वणजारी बैलांच्या शंभर जोड्या, आणि ओझ्याचे कांही उंट अशा सोयी होत्या. त्याशिवाय आघाडीला ढालेचा (निशाणाचा) हत्ती, पुढे संरक्षक तुकडी, घोड्यांवर भरजरी सरंजाम, चांदीसोन्याने मढवलेलें सामान व रुप्याचे जरीचे गोंडे असलेलें भव्य मुखपाल किंवा घुमटीचा म्याना आणि मागे अंबारी असलेल्या दोन हत्तिणी चालत होत्या. लोक थोडे पण पुरेसे आणि एकंदर थाट डोळयांत भरण्यासारखा अशी ही योजना चतुराईची व परिणामकारक होती. राजांचें दर्शनहि तसेंच छाप पाडणारें. दिसायला सडपातळ, चण छोटी, कान्ति सतेज गौर. नावगाव कळण्यापूर्वीच एकदम नजरेंत भरे तो माणसांवर हुकमत चालविण्याठी जणूं जन्मल्यासारखा आविर्भाव. चेहऱ्यावर निर्भयता आणि बेफिकिरीचा रुबाब. सर्वत्र विश्रुत झालेल्या अद्भुत पराक्रमाचें सभोंवतीं गूढ वलय. या सर्वांमुळे बेतशीर दाढी धारण करणाऱ्या मराठ्यांच्या राजाचें हें आगमन राजधानींतील शिळया औपचारिकतेला कंटाळलेल्यांना अगदी नव्या प्रकारचें आणि खासच खळबळजनक वाटलें असेल.

तेढीची सलामी

औरंगजेबाच्या वाढदिवसाच्या एका दरबाराला (इ. १६६६ मे १३) शिवाजीराजांना भेटीला नेण्याचें ठरलेलें होतें. आदल्या दिवशीं राजे मलक चांदाच्या सराईत येऊन उतरले. दुसऱ्या दिवशीं जयसिंगाचा मुलगा रामसिंग व मुखलिसखान सामोरे जाऊन त्यांना रामसिंगाच्या डेऱ्याजवळ

राहण्यासाठी घेऊन आले. थोड्याच वेळांत बादशाहाच्या मुलाखतीला राजांना नेण्यांत आलें. पण इतक्यांत दिवाण-इ-आम मधील मोठा औपचारिक समारंभी दरबार आटोपून औरंगजेब निवडक लोकांच्या खास परामर्शासाठी योजिलेल्या बैठकीला मंत्रागारामध्ये म्हणजे घुसळखान्यामध्ये येऊन दाखल झाला होता. तेथेच त्या पितापुत्रांना नेण्यांत आलें. आसदखानाने राजांना बादशाहापुढे नेलें. परंतु त्यांनी अपेक्षा केली होती तसें त्यांचें स्वागत झालें नाही की मान राखण्यांत आला नाही. शिवाजीराजे व संभाजीराजे यांनी शिरस्त्याप्रमाणे नजरा दिल्या व कुर्निसात केले. पण बादशाहा एक शब्दहि बोलला नाही. राजांना कोठेतरी ताहीरखानासारख्या सामान्य सरदारांच्या रांगेंत दाटीवाटीने उभें करण्यांत आलें. वाढदिवसाचा पानविडा इतरांप्रमाणेच त्यांना मिळाला. पण मोगली राजपुत्र, जाफरखान व जसवंतसिंग यांना औरंगजेबाने मानाचे पोशाख दिले. राजांना तसा मानाचा पोशाख वास्तविक द्यायला पाहिजे होता. तो न देऊन बादशाहाने त्यांचा अपमान केला.

राजा जसवंतसिंगाला शिवाजीराजांपुढे अनेक वेळा हार खावी लागली होती. आणि तरी देखील, मुद्दाम भेटीला बोलावून, जसवंतसिंगापेक्षाहि बादशाहाने आपल्याला कमी लेखलें, हें पाहून शिवाजीराजांसारख्या मानधन वीर पुरुषाचें डोकें ठिकाणावर राहणें शक्य नव्हतें. राजांचें दुःख आणि राग अनावर झाला. ते संतापाने लाल झाले. आणि त्यांच्या डोळ्यांत विलक्षण पाणी चमकलें. चाणाक्ष बादशाहाच्या नजरेंतून तें सुटलें नाही आणि भयभीत होऊन कुमार रामसिंगाला त्याने इशारा केला. रामसिंग जवळ येऊन काय झालें तें विचारूं लागला. त्यावर बेभान होऊन शिवाजीराजे रामसिंगाला म्हणाले, "तूं पाहतो आहेस. तुझ्या बापाने पाहिलें आहे. तुमच्या बादशाहाला माहीत आहे.* बुद्ध्या उभा करून अपमान करावा असा माणूस मी आहें ? तुमची ती मनसब मी ठोकरून देतों ! मला शोभेसें स्थान मिळालें पाहिजे." इतकें बोलून सिंहासनाकडे पाठ करून ते तडक बाहेर पडले. रामसिंग त्यांचा हात धरून त्यांना

---

* "तुम देखो, तुम्हारा बाप देख्या, तुम्हारा पादशाहा देख्या..."
—राजस्थानी लेटर्स फ्रॉम् दि जयपूर अर्काईव्हज, पृ. २४.

आवरूं लागला. पण त्याचा हात झिडकारून राजे बाजूला जाऊन बसले. रामसिंग त्यांच्या पाठोपाठ जाऊन त्यांची समजूत घालूं लागला. तरी राजांनी ऐकलें नाही. या वेळीं त्यांचा नेहमीचा संयम सुटला. त्यांचा अपमान त्यांना असह्य झाला. बोलतां बोलतां त्यांचा आवाज चढला. ते निर्वाणीचे शब्द बोलून गेले, "हें माझें मरणच नाहीतर काय ! तू मला ठार कर, नाहीतर मीच माझ्यावर हत्यार चालवितों. माझें शीर तोडून वाटेल तर घेऊन जा; मी बादशाहाकडे येणार नाही."

रामसिंगाने बादशाहाला हें वृत्त सांगितलें. तें ऐकून बादशाहा शुद्धीवर आला. आणि मग मुल्तफतखां, आकिलखां व मुखलिसखां असे सरदार बरोबर सिरपाव (मानाचा पोशाख) देऊन त्याने राजांची समजूत काढण्याकरिता पाठविले. मानी राजांनी त्यांना बजावलें, "सिरपावाची आता बात सोडा ! माझी जागा जसवंतसिंगाच्या खाली काय ? बुढ्ढ्या खडा (= उभा) करावा अशा लायकीचा मी आहें ! मी बादशाहाची मनसबहि घेत नाही आणि कोणाचा चाकरहि राहात नाही. मला मारायचेंच असेल तर मारा. कैद करायचें असेल तर कैद करा—कांही झालें तरी सिरपाव तर नाहीच स्वीकारणार." या त्रिकूटाला अपयश आल्यामुळे बादशाहा फिरून रामसिंगाकडे वळला व राजांची समजूत घालण्याची कामगिरी पुन्हा त्याने त्याला सांगितली. रामसिंग राजांना आपल्या डेऱ्यावर घेऊन गेला व तेथे एकांतांत मन वळविण्याचा त्याने खूप प्रयत्न केला. पण राजे एक रेसभरहि ढळले नाहीत. दुसऱ्या दिवशीं सकाळीं बादशाहाने फिरून तपास केला. त्यावर 'शिवाजीला ताप आला आहे, आज तो येणार नाही,' असेंच रामसिंगाला सांगावें लागलें, आणि त्याचा अर्थ बादशाहाहि समजला. मराठा राजाचें पाणी आता त्याच्या प्रत्ययाला आलें. सूर्यास्ताच्या दरबारांत रामसिंग एकट्या संभाजीलाच घेऊन गेला. तेथे त्याला पोशाख, रत्नखचित कट्यार व मोत्यांचा कंठा या वस्तु बादशाहाकडून इनाम देण्यांत आल्या (१४ मे).

विश्वासघाताची कैद

पहिल्याच दिवसाची सलामी अशी तेढीची झाली व एका बाजूला संशयी व कपटी औरंगजेब आणि दुसऱ्या बाजूला मानधन व निधडे

शिवाजीराजे यांच्या झटापटींत, बापाने राजांच्या जीविताची दिलेली हमी पुरी करण्यासाठी रामसिंगाची बरीच ओढाताण झाली. दरबारांतील आणि जनानखान्यांतील* राजांचे वैरी औरंगजेबाचे कान फुंकीतच होते. गुप्त खलबतें होऊन, शिवाजीला ठार करावा नाहीतर एखाद्या किल्ल्यांत जन्मभर खितपत ठेवावा, असा बादशाहाच्या मनाचा निर्धार केव्हाच झाला होता. यामुळे रामसिंगामार्फत वगैरे तडजोडीचीं जीं कांही बोलणीं होत त्यांत राम राहिला नव्हता. आणि शेवटीं सुमारें बारा एक दिवसांनी (२५ मे) सामोपचाराचा सर्व देखावा नष्ट होऊन औरंगजेबाने शिवाजीराजांवर पक्क्या चौक्या बसविल्या.

यानंतर व यापूर्वीहि राजांच्या संबंधांत औरंगजेबाने संशयी स्वभावानुसार आपले बेत वारंवार बदलले. प्रथम एकदा हिंदु रामसिंगाचे ताब्यांत न ठेवतां शिवाजीला त्याने आग्र्याच्या मुसलमान किल्लेदाराच्या ताब्यांत देण्याचें ठरविलें. पण असें केलें तर रामसिंग नामानिराळा राहून त्याला पळून जाण्यास मदत करील असें वाटल्यामुळे पुनः त्याच्यावरच राजांची जबाबदारी त्याने टाकली व त्यांना घेऊन जाऊन त्यांचा काबूलकडे ‘बंदोबस्त’ करावा, असाहि दुष्टपणाने हुकूम दिला. पुढे अमीनखांच्या रदबदलीने तो बदलला. त्यानंतर आपण स्वतः दख्खनकडे जाऊन शिवाजी-राजांच्या गैरहजेरींत त्यांच्या मुलखावर स्वारी काढावी असें बादशाहाने ठरविलें; पण जयसिंगाने तसें करण्यांत धोका असल्याचें कळविलें. शिवाजी-राजांच्या जिवाला अपाय होईल अशी थोडीशी जरी शंका आली तरी त्यांचे मागे राहिलेले अधिकारी आदिलशाहीशीं संगनमत करून दख्खनमध्ये सर्वच पारडें फिरेल, असें तो अजीजीने उलट लिहूं लागला. पण कांही झालें तरी शिवाजीराजांना सोडून देण्यास औरंगजेबाचें मन तयार नव्हतें, आणि जयसिंगाचीहि संमति नव्हती.

तात्पर्य, शिवाजीराजे भेटीला जाण्यापूर्वी खुद्द राजे, औरंगजेब व जयसिंग या तिघांनी आपापल्या परीने निरनिराळे बेत योजिले होते. आणि ह्या तीन ग्रहांच्या कक्षा अत्यंत भिन्न असल्यामुळे, प्रत्यक्षांत संकल्पित भेट घडून आली तेव्हा तिघांच्याहि आकांक्षांना हरताळ फासला जावा, असा विलक्षण

* शायिस्तेखानाची बायको ही बादशाहाची मामी.

बनाव घडून आला. त्यांतून कोणताहि एक मार्ग स्पष्ट दिसूं लागेपर्यंत राजांचें आग्र्याला वास्तव्य म्हणजे एक अडचण होऊन बसली. औरंगजेबाला अर्थात् सोक्षमोक्ष एकदाचा करतां येईना. आपण सर्व दक्षिण जिंकून देतों वगैरे आपल्या वकिलामार्फत व दरबारांतील मुत्सद्दी जाफरखान यांच्या मार्फत राजे बोलणें करीत होते तेंहि तो ऐकेना. समक्ष दोघांची भेट होऊन कांही समाधानकारक तोड निघेल असें म्हणावें, तर राजांशीं समोरासमोर उभें राहून बोलणें करण्यास कोणीच धजेना. येऊन जाऊन जयसिंगाने कांही सुचवायाचें; पण त्याचें म्हणणें इतक्या लांबून कोण ऐकणार!


आग्र्याहून सुटका

शेवटीं सर्व बाजूंनी नाइलाज होऊन राजांनी आपल्या मनाशीं एका धाडसी युक्तीची योजना आखली. आणि ती सिद्धीस गेली तर आपला हितचिंतक रामसिंग याच्यावर तोहमत येऊं नये म्हणून 'रामसिंगाच्या ताब्यांत राहण्यापेक्षा मला एक स्वतंत्र घर द्या, म्हणजे मी तेथे जाऊन राहीन,' असें राजांनी मागणें केलें. पण बादशाहाने तें ऐकलें नाही. आणि राजांवर कोतवालाच्या पहाऱ्याच्या जोडीला रामसिंगाचाहि आणखी पहारा राहिला! नंतर रामसिंगाने आपणासाठी (शिवाजी) पत्करलेली जामीनकी काढून घ्यावी. आपलें काय होईल तें होवो. आपल्यासाठी त्याने आपली (रामसिंग) मान गुंतवूं नये, अशी राजांनी स्वतः रामसिंगाला गळ घातली. पण त्याचा उपयोग झाला नाही. तेव्हा द्रव्याचा प्रयोग करून मग राजांनी अनेक मोठे उमराव मध्ये घालून रदबदली चालविली. पण आपल्या पायाने येऊन एकदा कपटाच्या गुहेंत सापडलों खरे; यांतून धडपणें बाहेर पडणें कठीण आहे, असेंच त्यांच्या प्रत्ययाला आलें. आणि मग मात्र राजांना दुसरा कोणताच मार्ग राहिला नाही.


प्रथम महाराजांनी आपल्या सर्व अनुयायांना दक्षिणेंत जाऊं देण्याची परवानगी मागितली. औरंगजेबाने ती आनंदाने दिली. अनुयायी १५ ऑगस्टच्या सुमारास नरवरची घाटी उतरून पार पडले. मध्यंतरीं राजांनी वैराग्य स्वीकारून काशीला जाण्याचें बोलणें काढलें. ते राज्य सोडण्याच्या गोष्टी बोलूं लागले. पुढे मग ते लटकेच आजारी पडले, व धार्मिक

संप्रदायाप्रमाणे साधुसंत, देवस्थानें आणि बादशाहाचे वजीर यांच्याकडे मिठाईचे पेटारे भरभरून पाठवूं लागले. दर दिवशीं पेटारे अशा रीतीने मिठाई भरून रवाना होतात असें पाहून पहाऱ्याचे शिपाई बेसावध झाले आणि एके दिवशीं (शुक्रवार, इ. १६६६, ऑगस्ट १७) राजे व राजपुत्र संभाजी पेटाऱ्यांत बसले व कोणाच्याहि ध्यानांत न येतांना कैदेंतून पसार झाले. शिवाजीराजांचा सर्व साज घालून बराच वेळ हिरोजी फर्जंद राज्यांच्या बिछान्यावर निजून राहिला आणि राजे आजारी आहेत म्हणून पोरगा मदारी मेहतर त्याचे पाय रगडीत बसला. पुढे बऱ्याच वेळाने, जवळ जवळ चोवीस तासांनी, तेहि दोघे उठून कांही बहाणा करून चालते झाले. नंतर मागे सर्व सामसूम झाल्याचें पाहून पहारेकरी तपास करतात तों शिवाजीराजे निघून गेल्याची गोष्ट समजली. पहारेकऱ्यांपासून बादशाहा-पर्यंत सर्व लोक थक्क झाले. आश्चर्याचा पहिला भर ओसरतांच सर्व बाजूंनी सक्त तपास सुरू झाला.


इकडे शिवाजीराजे आग्र्याहून पूर्वनियोजित ठिकाणीं खास राखून ठेवलेल्या घोड्यांवर स्वार होऊन निसटले ते संकेताच्या ठिकाणीं पोंचल्या-वर तेथून वेष पालटून म्हणा किंवा तशीच कांही युक्ति करून, अत्यंत सावधगिरीने स्वराज्यांत जाऊन पोंचले. अल्पवयी संभाजीला ही प्रवासाची दगदग होणार नाही म्हणून त्याला रा. कृष्णाजी विश्वासराव याच्या स्वाधीन करून राजे एकटेच बरोबर कांही विश्वासाचीं माणसें व पुरेसें द्रव्य घेऊन निघाले. शिवाजीराजांचें हें औरंगजेबाच्या कचाट्यांतून शीर-सलामत बाहेर पडणें आणि इतका दीर्घ प्रवास सुरक्षित आणि गुप्तपणें होणें ही गोष्ट तत्कालीन प्रवास-साधनांच्या परिस्थितींत मोठी अजब आणि अपूर्व वाटते. पण यांतच राजांचें असामान्यत्व साठविलेलें आहे. औरंगजेबाने रामसिंगासकट सर्वांना तपासाच्या कामासाठी पिटाळलें. वास्तविक फुलादखानाचाच मुख्य पहारा असल्यामुळे त्याच्यावरच पुष्कळशी जबाबदारी येते. परंतु त्याने रामसिंगावरच सर्व दोष टाकल्यामुळे



तोरणा ऊर्फ प्रचंडगड
अभेद्य कातीव डोंगरी किल्ल्याचा नमुना




जंजिरा ऊर्फ दंडाराजपुरी
हा मोगलांचा जलदुर्ग जिंकण्याच्या ईर्षेने
महाराजांनी आपलें नवेंच आरमार उभें केलें.



पन्हाळगड : तीन दरवाजा

या किल्ल्यांतून महाराज धाडस करून निसटून गेले.



शिवनेरी किल्ला

पूर्वेकडून दुरून दिसणारा किल्ल्याचा देखावा

रामसिंगाची जहागीर काढून घेण्यांत आली व सर्वत्र हेरांचें जाळें पसरण्यांत आलें. परंतु सुदैवाने शिवाजीराजे स्वराज्यांत जाऊन पोंचण्याला त्याचा कोणताहि अडथळा आला नाही. राजांनी परतीसाठी अवलंबिलेल्या मार्गाबद्दल निश्चित अशी कांही माहिती नाही. नेहमीच्या सरळ मार्गाने येण्यापेक्षा त्यांनी पाठलाग चुकविण्यासाठी मुद्दाम आग्ऱ्याहून मथुरा, वाराणशी, प्रयाग, गोंडवण, भागानगर असा वेडावांकडा लांबीच्या प्रवासाचा द्राविडी प्राणायाम करून महाराष्ट्र गांठलें, असें सुचविण्यांत येतें; परंतु शिवाजीराजे बादशाही परवाने दाखवून तीनशे माणसांसह नरवरची घाटी सोमवार दि. २० ऑगस्टच्या सुमारास उतरून गेले अशी बातमी फिदाईखानाकडे दि. २३ लाच आली. नरवर नेहमीच्याच रस्त्यावर आग्ऱ्याच्या दक्षिणेस ११६ मैलांवर आहे. तेव्हा शिवाजीराजे नेहमीच्याच रस्त्याने परंतु विलक्षण त्वरेने स्वदेशाकडे अंतर कापीत गेले, हेंच स्वाभाविक वाटतें. अशा त्वरेने एकंदर सुमारें पंचवीस दिवसांत म्हणजे १२ सप्टेंबरपर्यंत राजे स्वगृहीं पोंचले असले पाहिजेत. या वेळीं संभाजीराजे बरोबर नव्हते. यामुळे ते वाटेंतच मरण पावले असा अभद्र तर्क हेरांनी दिल्लीला कळविला. तीन महिन्यांची कैद, सुटकेबद्दल विवंचना आणि संकटें एकसारखीं असा पंचवीस दिवसांचा भर पावसाळ्यांतला प्रवास—अशा प्रकारच्या कित्येक दिवसांत पडलेल्या मानसिक व शारीरिक ताणाचा परिणाम राजांच्या प्रकृतीवर झाला नसता तरच नवल. राजे राजगडावर येऊन आजारी पडले. संभाजीराजांच्या पुनरागमनापर्यंत त्यांचें स्वदेशांत आगमन जाहीर करणें अनेक कारणांमुळे धोक्याचें वाटलें. महिना दोन महिन्यांतच कृष्णाजी विश्वासराव संभाजीराजांना सावधगिरीने सांभाळून दक्षिणेंत घेऊन आला आणि मग मार्गशीर्ष शुद्ध पंचमीस (इ. १६६६ नोव्हें. २०) ‘संभाजी राजे सहवर्तमान राजश्री राजगडावर आले’ असें जगजाहीर करून प्रजेला आनंदविण्यांत आलें.

शिवाजीराजांच्या पलायनामुळे त्यांच्यापुरती कोंडी फुटली. पण विरुद्ध पक्षीयांचा मात्र अत्यंत घोटाळा उडाला. जयसिंग व औरंगजेब या दोघांचेहि सर्व बेत जागच्या जागीं बसले. या दोघांपैकी औरंगजेबाच्या सत्तेपुढे जयसिंगाचें शहाणपण न चालून औरंगजेबाचा राग व इतराजी जयसिंग व रामसिंग या दोघांनाहि सहन करावी लागली. आणि त्यांची दीनवाणी स्थिति झाली. राजे निसटून गेल्यानंतर रामसिंगाच्या हस्तकांना पकडण्यांत आलें. त्यांच्यापैकी कोणीं छळामुळे अगतिक होऊन घडल्या प्रकारांत रामसिंगाचें अंग असल्याचें खोटेंच सांगितलें. पण रामसिंगाच्या अंगीं पद्धतशीरपणें गुन्हा लागू झाला नाही. त्रिंबकपंत डबीर व वकील रघुनाथपंत कोरडे असे राजांचे दोन अधिकारी मागची हालहवाल पाहण्यासाठी व राहिलें साहिलें आवरण्यासाठी राहिले होते, त्यांना बादशाहाच्या हुकुमाने कैद करण्यांत आलें. पण त्यांतून कांही निष्पन्न होण्यासारखें नव्हतेंच. जयसिंगाच्या इतर जबाबदाऱ्यांतच 'पळपुट्या शिवाजी'ला शोधून काढणें ह्या आणखी एका त्रासदायक कामाची भर पडली. पण लौकरच शिवाजीराजे राजगडास दाखल झाल्याचें कळलें आणि सर्वांनाच हायसें वाटलें. कारण जो तो पुढील मार्ग चोखाळण्यास मोकळा झाला.

सुटून आलेले शिवाजीराजे मोगली मुलखांत लूट करतील, विजापुरी मुलखांत जाळपोळ करतील, वगैरे अपेक्षा सहजच असल्यामुळे आणि परदेशस्थ व्यापाऱ्यांनाहि त्यांची दहशत वाटत असल्यामुळे, सर्वत्र दख्खनमध्ये जो तो आता काय होतें इकडे लक्ष लावून बसला. विशेषतः मोगलांची यांत नाचक्की झाली असल्यामुळे, त्यांच्यावर विजापूरकर व शिवाजीराजे दोघेहि मिळून चढाई करतील असें दिसूं लागलें. अर्थात् जयसिंग फिरून पूर्वीप्रमाणेच कामाला लागला. त्याने सर्वांना मोगलांच्या बंडखोरांना मदत करूं नका असा इशारा दिला. पुणें, सुपें, इंदापूर या राजांच्या खास मुलखांत त्यांनी गडबड करूं नये म्हणून जयसिंगाने पक्का बंदोबस्त केला. परंतु महादजी निंबाळकर याने विजापुरी सैन्याच्या

मदतीने एक मोगलांचा सेनापति युद्धांत मारून तो बंदोबस्त उधळून लावला. विजापूरकर आणखी दुसरीकडे काय उचल खातात याची कल्पना कोणालाच करतां येईना. यामुळे जयसिंग पेंचांत पडला. राजांचे स्वतःचे बेत काय आहेत हें समजण्यास तर कांहीच मार्ग नव्हता. तथापि एकदा सुटून आल्यावर, औरंगजेब चवताळलेला असतांना त्याला आणखी न सतावतां, वातावरण थोडें निवळूं देण्याची राजांची इच्छा होती. आणि म्हणूनच ते 'मी बादशाहाला शरण आहें' असेंच उघडपणें बोलत राहिले.

* * *

सुरतेच्या वखारींतून ई. इं. कंपनीकडे पत्र

(इ. १६६६ सप्टेंबर २५)

"शिवाजीवर इतका कडक पहारा ठेवूनहि अखेरीला तो आणि त्याचा मुलगा असे दोघे दोन पेटाऱ्यांत (बास्केट्स) बसून निसटून गेले, अशी खात्रीलायक बातमी नुकतीच आली आहे. त्याचा कोठेच तपास लागत नाही. या बाजूच्या प्रांतांत सर्वत्र भीति आणि संशय यांचे साम्राज्य पसरलें आहे."

—'इंग्लिश फॅक्टरीज् इन् इंडिया', भाग १२, पृ. १६१.

१४ सुटकेनंतर

दक्षिण्यांची आघाडी

शिवाजीराजे आग्र्याला गेले आणि आले, त्या योगाने त्यांना व्यक्तिशः राजकारणांतील काय नवी दृष्टि आली असेल आणि त्यांच्या अद्‌भुत पलायनाबद्दल काय बोलबाला झाला असेल तेवढाच. तेथील भेटीचा प्रथमपासून बोजवारा उडाल्यामुळे तींतून प्रत्यक्ष असा स्वराज्याला दुसरा कोणता लाभ झाला नाही, आणि राजकारणाचा धागा जातांना राजांनी जेथे सोडला होता तेथेच तो फिरून त्यांना हातांत घ्यावा लागला. दक्षिणेकडे रुस्तुमजमाने त्यांच्याविरुद्ध फार मोठा आव आणला होता. परंतु कुडाळच्या हद्दीवरील रांगणा हा मजबूत किल्ला अंतःस्थपणें त्याने इ. १६६६ च्या सप्टेंबरांत रावजी पंडित या शिवाजीच्या सुभेदाराच्या हवालीं केला. त्यामुळे विजापूर दरबारांत खळबळ उडून रुस्तुमजमाच्या जागीं नवीन सेनापतीची नेमणूक झाली. परंतु त्याचे हातून कांही विशेष घडलें नाही. पुढे मोगलांच्या व आदिलशाहीच्या तडजोडीच्या भानगडींत इ. १६६७ एप्रिल-मेपर्यंत राजांकडे कोणीं पाहिलें नाही; पण या सुमारास त्यांना रांगणा किल्ला पचूं न देण्याच्या निश्चयाने बहलोलखान व राजांचा सावत्र भाऊ येकोजी (व्यंकोजी) यांनी रांगण्याला वेढा घातला. परंतु राजांनी स्वतः जाऊन तो मारून काढला. तेव्हा मग विजापूरकरांना आपल्या खऱ्या शक्तीचा आवांका समजला आणि पुढच्या ऑगस्ट-सप्टेंबरांत (इ. १६६७) त्यांनी राजांना दरसाल तीन लाख होन खंडणी देण्याचें कबूल करून त्यांच्याशीं सल्ला केला. तो कांही दिवस चांगला टिकला. शिवाजीराजांनी सहा लाखांची खंडणी देण्याचें औपचारिक कलम देखील त्या तहांत होतें. कुतुबशाहानेहि झाल्या प्रकरणावरून धडा घेतला. आणि राजांना दरसाल पांच लाखांची खंडणी कबूल करून गोडी राखण्याची खबरदारी घेतली. शिवाजीराजे आग्र्याहून सुटून आल्यानंतर सुमारें वर्ष दोन वर्षांत अशा प्रकारें दक्षिण्यांची एक आघाडी तयार झाली.

जें होऊं नये म्हणून जयसिंग झटत होता आणि बहुधा ज्यासाठी राजांना आग्र्यांत अटकावून ठेवावें असा त्याचा आग्रह चालला होता, तें राजकारण राजांनी मोकळें होतांच बोल बोल म्हणतां सिद्ध केलें; आणि मोगली सत्तेला एकजुटीने शह देण्याची तयारी करून ठेवली. राजांचें हें वर्ष अशा रीतीने चांगलें कामीं आलें.

अगतिक औरंगजेबाचें शिवाजीराजांशीं सख्य

पण राजांना विजापूरकरांची वगैरे खरी काळजी नव्हती. औरंगजेब आता काय डावपेंच लढवितो, इकडे त्यांचें सगळें लक्ष होतें. परंतु इराणचा शाहा अब्बास व सरहद्दीवरील युसुफशाही बंडखोर यांनी याच वेळीं उचल खाल्ली. यामुळे दक्षिणेंत बिघडलेली घडी जबरदस्तीने बसविण्यास त्याचें सामर्थ्य पुरें पडलें नाही. तेव्हा बराच विचार करून, त्याने शिवाजीराजांच्या धाडसी पलायनानंतर लगेच पकडलेले अधिकारी त्र्यंबकपंत डबीर व वकील रघुनाथपंत कोरडे इ. १६६७ एप्रिल ३ ला (साडेसात महिन्यांनंतर) सोडून दिले आणि राजांशीं सलोखा राखण्याची तयारी केली. वकील रघुनाथपंताला बोलावून औरंगजेबाने शिवाजीचा गुन्हा आपण माफ केला आहे असें त्याला सांगितलें आणि दोन महिन्यांत शिवाजीचें उत्तर आणण्याची त्याला आज्ञा केली. राजांनी तत्परतेने मान्यता दिली, मध्यंतरींच्या घडामोडींमुळे वांध्यांत पडलेला पुरंधरचा तह व संभाजीराजांची मनसब वगैरे गोष्टींचें सूत्र जोडून घेतलें, आणि वारा अनुकूल वाहात आहे असें पाहून एखाद दुसरी सवलतहि मिळविली. राजांकडे ठेवलेला निजामशाही मुलूख अगदीच थोडा होता. आदिलशाही मुलखांत वारंवार युद्धामुळे पायमल्ली झाल्यामुळे त्याचें उत्पन्न निर्वेध नव्हतें. तेव्हा बादशाहाकडे दिलेल्या मुलखांतून आणखी एक लाख होनाचें उत्पन्न आपणाला मिळावें, अशी राजांची मागणी जयसिंगाकडे होती. परंतु त्याने फांटा फोडून वर्षभर हिशेब पाहून मग मुलूख तोडून देण्याचें अव्यवहार्य शुष्ककाष्ठ लावून दिलें होतें. आता तें काढून त्या मुलखांतून एकदशांश (देशमुखी) वसूल करण्याची परवानगी औरंगजेबाने दिली व ती तक्रार नाहीशी केली. ही फार मोठी सवलत राजांना मिळाली. त्या निमित्ताने राजांचे अधिकारी त्या मुलखांत वसुलासाठी संचार करून राजांचा संबंध राखूं शकले. यापूर्वीच जयसिंगाच्या जागीं शहाजादा

मुअज्जम औरंगाबादचा सुभेदार व राजा जसवंतसिंग पूर्ववत् सेनापति होऊन आले होते (इ. १६६७ मार्च). २८ ऑगस्टला जयसिंगाचा मृत्यु झाल्यावर तर शिवाजीराजांशीं युद्ध चालविण्याची जबाबदारी अंगावर घेण्याची कोणाला धमक राहिलेली नव्हती. यामुळे सुभेदार व सेनापति दोघांनीहि सलोख्याबद्दल आस्था दाखविली. संभाजीराजांच्या वांध्यांत पडलेल्या मनसबीच्या जहागिरीबद्दल हुकूम व्हावा, अशी मुअज्जमने औरंगजेबाला शिफारस केली. तेव्हा तीहि जहागीर राजांनी मोगलांकडे जो मुलूख* दिला त्यांतूनच देण्यांत यावी याला सप्टेंबरअखेर औरंगजेबाने मान्यता दिली. म्हणजे राजांचा तो मुलूख आपल्या राज्याला जोडण्याचा जो विचार औरंगजेब करीत होता, तो त्याने आता सोडून दिला असें झालें व तडजोडीचा मार्ग मोकळा झाला. हें पाहून मनसब स्वीकारण्यासाठी इ. १६६७ ऑक्टोबर २७ ला संभाजीराजे शहाजाद्याच्या भेटीस औरंगाबादेस गेले. दि. २८ ला प्रथम जसवंतसिंगाची, व सात दिवसांनी नोव्हेंबर ४ ला शहाजाद्याची, अशा भेटी झाल्या. आणि औपचारिक मनसबदार बनून लगेच दुसऱ्या दिवशीं संभाजीराजे औरंगाबादेहून राजगडला परत आले. या बदललेल्या वातावरणावर इ. १६६८ मार्च ९ च्या बादशाहाच्या फर्मानाने शिक्कामोर्तब केलें. राजांकडून झालेली फजिती हसून साजरी करण्याच्या विचाराने 'आमचा बहुत लोभ तुम्हावर आहे' याजकरिता बादशाहाने शिवाजीला राजेपणाचा किताब औपचारिक दृष्ट्या बहाल केला व त्यांच्या मागण्या मान्य करण्याचें आश्वासन दिलें. अडलेला मार्ग आता या नव्या फर्मानाने मोकळा झाला. परंतु मनसबदार संभाजीराजे अल्पवयी असल्याने त्यांचे प्रतिनिधि म्हणून निराजी रावजी (मनसबीच्या जहागिरीचा कारभारी) व प्रतापराव गुजर (फौजेचा सेनापति)

---

* अर्थात् मूळ तहांत पुणें परगण्यांतील पुण्याकडील २० व तर्फ मावळचे ३६ मिळून ५६ गांव 'तश्रीफ (मानाचा पोशाख) राजश्री शिवाजीराजे' म्हणून वसुलांतून वगळले होते ते राजांच्या खास वैयक्तिक जहागिरीचे होत.

प्रत्यक्ष फौज घेऊन औरंगाबादेस सुभेदारापाशीं दाखल होण्यासाठी निघेपर्यंत ऑगस्ट महिना उजाडला.

प्रतापराव इ. १६६८ सप्टेंबर ९ ला सुभेदार शहाजादा शहाआलम याला भेटला. त्या वेळीं मनसबीच्या कराराची उजळणी झाली. तींत राजांकडून औरंगजेबाकडे जावयाच्या खंडणीच्या सहामाही हप्त्यांतून चौथाई, म्हणजे प्रतिवर्षी सुमारें ७५ हजार इतका चाकरीचा खर्च म्हणून काढून घ्यावा, असें मान्य करण्यांत आलें. शिवाजीराजांनी ही खंडणी पुढे प्रत्यक्ष युद्ध चालू झाल्यानंतर अर्थात् दिली नाही. तिची बाकी औरंगजेबाने एखाद्या खाष्ट सावकाराप्रमाणे त्यांच्यावर काढली होती ! पुढे शाहूला सोडून देतांना (इ. १७०८) 'ही कित्येक वर्षांची थकलेली खंडणी मी देईन' असें त्याच्याकडून कबूल करून घेतलें गेलें, ही गोष्ट ध्यानांत घेण्यासारखी वाटते.

लौकरच एकदोन महिन्यांत आदिलशाहीशींहि तह करून औरंगजेबाने आपल्या पाठीमागची भगभग मिटविली. केवळ आत्मसंरक्षणार्थहि त्याला हें धोरण अवश्य झालें. आणि आता कांही वेळ या तिन्ही सत्ता नांवापुरत्या कां होईना पण स्तब्ध बसल्या.

पोर्तुगीजांचें उपाख्यान

दख्खनमध्ये वरील भानगडी चालू असतां पोर्तुगीजांच्या राजकारणाचा थोडा धरबंध सुटला. हुमायूनच्या वेळेपासून दक्षिणेंतील सर्व सत्तांनी एकजुटीने राहावें आणि उत्तरेकडून उरावर येणाऱ्या मोगलांचा प्रतिकार करावा, असें ते मोठ्या दूरदर्शीपणाने म्हणत व तसेंच वागत. परंतु नुकत्याच माजलेल्या गोंधळांत आपली पोळी पिकण्याचा संभव त्यांना दिसून येतांच त्यांनी पगडी फिरविली. 'आपल्याला खर्च दिल्यास आपण शिवाजीचें आरमार बुडविण्यास मोगलांना मदत करूं' असें गोव्याच्या व्हाइसरॉयाने जयसिंगाला आशाळभूतपणें पत्र लिहिलें (इ. १६६७ एप्रिल १९). पण पत्र पोंचेपर्यंत जयसिंगाचा सुभा मुअज्जमकडे आला होता आणि मोगलांचा मोहराच फिरला होता. मोगलांकडून उत्तेजन मिळणें शक्य नव्हतें. दोन अडीच महिने वाट पाहून जेव्हा कांही होत नाही असें त्याने पाहिलें, तेव्हा 'आपण आग्र्याहून सुखरूपपणें सुटून आलां याचा आनंद वाटतो,' असें राजांकडेहि अभिनंदनाचें पत्र जुलै ५ ला पाठविलें. हा पत्रव्यवहार शिवाजीराजांनी आदरून वाढविला.

उत्तरेकडे मोगलांचा वरवंटा फिरल्याने जरी कांहीसें सामसूम झालें असलें, तथापि दक्षिणेंत शिवाजीराजे, विजापूरकर आणि गोवेकर यांच्या सरहद्दी एकमेकांशीं भिडलेल्या होत्या. आणि त्यामुळे मुख्य सत्तांचा सलोखा असला तरी सरहद्दीवर एकसारख्या कटकटी चालू असत. खुद्द शिवाजीराजे आग्ऱ्याला अडकून पडले असतांहि त्या थांबल्या नव्हत्या. राजे सुटून आल्यावर तर त्यांना जोर चढला. किरकोळ कारणांनी आक्रमण करणें, साधेल तेवढी लूट घेणें व प्रतिकार करतील त्यांना कैद करून नेणें, हा सामान्य खाक्या होता. शिवाजीराजे मोगलांच्या जबरदस्तीपुढे नेमलेले पाहून सर्वांनी त्यांच्या मुलखाचे लचके तोडले आणि हात चालेल तसा मराठ्यांनी त्याचा सूड घेतला. गोवेकरांनाहि लौकरच मराठ्यांच्या प्रतिकाराचा प्रसाद मिळाला.

कुडाळचा देसाई लखम सावंत (व केशव नाईक आणि आणखी एक दोघे) हा विजापूरकरांच्या बाजूचा, त्यामुळे त्याला विजापूरकरांची फूस असे. पण पोर्तुगीजांच्या मुलखांत राहून राजांच्या मुलखाला त्रास देणें त्याला सोईचें असल्यामुळे, तो गोव्याच्या आश्रयाने राहून त्यांच्या मुलखाला त्रास देई. राजांच्या सुभेदाराने ही गोष्ट पोर्तुगीज व्हाइसरॉयाच्या नजरेस आणूनहि त्याने दुर्लक्ष केल्यामुळे, राजांनी पोर्तुगीजांना हात दाखविण्याचें ठरविलें. लखम सावंताचा पुतण्या नारबा याने सप्टेंबरांत वेंगुर्ल्यास जाऊन पोर्तुगीजांच्या मदतीने तेथील डचांस त्रास दिल्यामुळे डचांनी राजांना दारूगोळा पुरवून स्वारीला साह्य दिले. राजांनी देसायाचा पाठलाग करीत गोवेकरांच्या बारदेशांत प्रवेश केला, तीन दिवसांत त्यांचीं सोळाच्या वर खेडीं बेचिराख केलीं (इ. १६६७ नोव्हेंबर ९), आणि पोर्तुगीज सैन्य व त्यांचें मोठें आरमार यांना न जुमानतां सुमारें १२०० कैदी धरून नेले. तेव्हा कोठे पोर्तुगीजांचे डोळे उघडले आणि मग धरून नेलेले कैदी वगैरे सोडविण्याकरिता पाद्री गोसांल्र मार्तीस व रामोजी शेणवी कोठारी, यांच्या मार्फत त्यांनी राजांशीं बोलणें केलें (इ. १६६७ नोव्हेंबर). राजांचे वकील पीतांबर शेणवी आणि सखोपंत यांनी तह ठरविला. त्यावर नोव्हेंबर २६ ला पोर्तुगीजांनी मान्यतेची सही केली. त्यानंतर शिवाजीराजांची मान्यता आणण्यासाठी सखोपंताबरोबर पाद्री गोसांल्र मार्तीस यास पाठविलें. राजांची मान्यता डिसेंबर २ ला मिळाली.

या तहानें : (१) १७ दिवसांपूर्वी बारदेशांतून धरून नेलेले कैदी व गुरेंढोरें एक रुकाहि दंडादाखल न घेतां शिवाजीराजांनी सोडून द्यावीं; (२) लखम सावंत व केशव नाईक देसाई हे कुडाळकर पुरातन शत्रु पोर्तुगीजांच्या गोव्याच्या मुलखांत राहून राजांच्या मुलखास उपद्रव देतील तर त्यांस पोर्तुगीजांनी गोव्यांतून हाकलून लावावें, व (३) बालेघाटांतून व्यापाराचे बैल वगैरे येतील त्यांस कोणत्याहि प्रकारची तसवीस न लावतां आदिलशाही दंडकापेक्षा राजांनी जास्त जकात घेऊं नये, असें उभयपक्षी मान्य करण्यांत आलें. हा तह नेहमीप्रमाणे राजकारणी व मामुली स्वरूपाचा दिसतो. परंतु नोव्हेंबर ९ ला बारदेशावर मराठ्यांनी स्वारी करून माणसें कैद करून नेलीं, त्याला धार्मिक पार्श्वभूमि नव्हती असे नाही. आणि या संबंधांतील आगळींक धर्मच्छलाचा पायंडा पाडून गोवेकरांनी केव्हापासूनच केलेली होती. त्यांतच गोव्याच्या व्हाइसरॉयाने रोमन कॅथोलिक धर्म वगळून इतर धर्मांच्या माणसांना गोव्यांतून हद्दपार करावें, असा कडक नियम नुकताच करून तिला तीव्रता आणली. हें ऐकून शिवाजीराजे क्रुद्ध झाले व सावंताच्या पाठलागाचेंहि काम साधून त्यांनी बारदेशाच्या सरहद्दीवर ही स्वारी केली. ह्या स्वारीमध्ये नेहमीचा शिरस्ता सोडून पोर्तुगीजांना दहशत बसविण्यासाठी, आडव्या आलेल्या पुष्कळ ख्रिस्ती लोकांस राजांच्या सैनिकांनी तरवारीने कापून काढलें आणि अनेक स्त्रीपुरुषांना कैद केले. आणि विशेष म्हणजे ह्या दंगलींत दोन पाद्री धर्मोपदेशक ठार झाले. त्यामुळे त्यांना हिंदुधर्माची जबरीने दीक्षा देण्याचा प्रयत्न झाल्याची बाजारगप्पा गोव्याच्या इंग्रजांनी उठविली! या वेळी आसपासच्या मुलखांत साहजिकच जाळपोळ व दीडशे लक्ष होनांची लूट केली गेली. धार्मिक छळाला रोखठोक उत्तर दिल्यावर मग त्यांनी मामुली सलोख्याचा वरील तह केला. मुसलमानांची सत्ता होती तेव्हा हिंदुधर्मीयांचा वाली कोणी नव्हता. परंतु यापुढे त्यांचा कोणी छळ करील तर त्याला त्याचा जाब द्यावा लागेल, हें राजांनी सप्रमाण दाखवून दिलें. पोर्तुगीज व्हाइसरॉयाने आपल्याकडून हा सलोखा टिकविण्याचा प्रयत्न केला. परंतु दरोडेखोरीला चटावलेले लखम सावंतादि देसाई त्याच्या मार्गांत अडचणी आणूं लागले. शिवाजीराजांचा अपराधी जमीनदार, लखम सावंत म्हणा किंवा नारबा सावंत वगैरे कोणीतरी म्हणा, शिवाजीराजांच्या राज्यांत जाऊन दांडगाई करी

पोर्तुगीज त्यांना मदत करतात असा सुभेदाराचा समज होऊन तो त्यांच्याकडे वारंवार तक्रार करी आणि मग पोर्तुगीजांना नाकदुऱ्या काढाव्या लागत. शेवटीं देसाई लखम सावंताला पोर्तुगीजांनी आपल्या प्रदेशांतून तह्नप्रमाणे घालवून दिलें व तसें सुभेदाराला पुनःपुन्हा कळविलें.

पाश्चात्य जलचरांचे उद्योग आणि उपद्व्याप

शिवाजीराजांच्या काळीं पोर्तुगीज, डच, इंग्रज व फ्रेंच या सर्वांचा राबता व्यापाराकरिता त्यांच्या मुलखांत किंवा आसपास होता आणि त्या वेळीं तरी ते सर्व जण केवळ व्यापारांत लक्ष घालणारे होते. पोर्तुगीजांनी मागच्या शतकांत प्रादेशिक वर्चस्वाचें वैभव भोगलें होतें. परंतु आता तें नष्ट झालें होतें. हे सर्व लोक आपल्या वखारींपुरते ग्रामपंचायतींप्रमाणे सर्व बाबतींत स्वयंशासित असत. त्यांच्या अंतर्गत किंवा आपसांतील स्पर्धेत राजांनी कधी लुडबूड केली नाही. परंतु व्यापारापलीकडे जाऊन राजापूरच्या इंग्रजांप्रमाणे कोणीं शत्रूला दारूगोळा पुरविला, तर त्याची गयहि केली नाही. त्यांच्यामुळे चालणाऱ्या आपल्या प्रदेशांतील व्यापाराचें महत्त्व ओळखून राजे त्यांना सवलती द्यायला तयार होते. डच, इंग्रज व फ्रेंच अशा सर्व व्यापाऱ्यांना त्यांनी समबुद्धीने उत्तेजन दिलें, यांत शंका नाही. परंतु पोर्तुगीज हे मुलखदार व आरमारी असल्यामुळे त्यांच्याबद्दल त्यांना जरा निराळा विचार करावा लागे. त्यांचें आरमार सर्वांपेक्षा अधिक समर्थ असल्यामुळे त्यांचे परवाने काढल्याशिवाय ते इतर देशी सत्ताधीशांचीं गलबतें समुद्रावर फिरकूं देत नसत. राजेहि तसे परवाने घेत. आपलें आरमार प्रबळ करून परवान्यांचा हा परस्वाधीनपणा काढून टाकण्यास ते उत्सुक होते. त्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न एकसारखे चालू होते. शिवाय पोर्तुगीजांचा गोव्याचा प्रदेश लखम सावंतादि शत्रूंना आश्रयस्थानासारखा उपयोगी पडतो, म्हणूनहि त्यांचा पोर्तुगीजांवर राग होता. आणि आता त्यांच्या धार्मिक असहिष्णुतेचीहि त्यांत भर पडली.

पोर्तुगीजांच्या व्यापारी स्पर्धेमुळे सर्वांत दीर्घकाळ आणि अधिक नुकसान झालें तें हिंदुस्थानच्या व्यापारांत पूर्वीपासून आघाडीवर असलेल्या अरब व्यापाऱ्यांचें. यामुळे आणि मुसलमानांनाहि जाचक झालेल्या त्यांच्या धर्मच्छळामुळे नाखूष असलेले कांही अरब व्यापारी त्यांच्याविरुद्ध शिवाजी-

राजांना मदत देण्यास तयार होते. आणि या सुमारास ४००० लोक असलेलें वीस पंचवीस गलबतांचें एक अरबी आरमार हिंदुस्थानच्या किनाऱ्याकडे निघून गेलें, अशी तिकडील इंग्रज व्यापाऱ्यांनी बातमी दिलेली आढळते. पण अरब व शिवाजीराजे या दोघांनी मिळून पोर्तुगीजां-विरुद्ध एखादी मोहीम योजिल्याचें दिसत नाही.

मात्र पोर्तुगीजांच्या विरुद्ध मराठे व इमाम या दोघांचा संरक्षक व आक्रमक दोस्तीचा तह असावा असें मस्कतच्या इमामाकडून आपणाकडे बोलणें आलें आहे, असें गोव्याच्या व्हाइसरॉयाला धमकावून लिहिण्यास राजांनी कमी केलें नाही. हिंदुस्थानांतल्या भांडणांत परक्यांची मदत घेण्याकडे पहिल्यापासूनच त्यांचा कल नव्हता. पण तें पथ्य मोगलांचें साम्राज्य वाढविण्यासाठी इ. १६६५ त आलेल्या जयसिंगाने पाळलें नाही. त्याने पोर्तुगीज, डच, इंग्रज या सर्वांना राजांविरुद्ध उठविलें याचा निर्देश मागे आलाच आहे. परकी लोकांना हिंदी राजकारणांत ओढून आणून त्यांचा भाव व त्यांच्या आकांक्षा वाढविण्याचें देशहितघातक धोरण प्रथम मोगलांकडूनच सुरू झालें !

एकंदरींत गोव्यांत पोर्तुगीजांची सत्ता असल्यामुळे आपल्या त्या बाजूच्या शत्रूंना आश्रय मिळतो व ख्रिस्ती धर्माचा फैलाव होतो, ह्याचें राजांना वैषम्य वाटे. वारंवार सांगून किंवा तक्रार करूनहि जेव्हा जमेना तेव्हा एक धाडसी प्रयत्न करण्याचें त्यांनी ठरविलें. सरळ स्वारी करून गोवें जिंकून घेणें कठीण होतें. म्हणून त्यांनी इ. १६६८ च्या नोव्हेंबरांत बरेचसें सैन्य गोव्यामध्ये गुप्तपणें जमा केलें. हेतु हा, की हजार एक सैन्य जमा झालें म्हणजे त्याने एकदम उठाव करून अचानक गोव्याचा ताबा घ्यावा व राजांनी तत्काल बाहेरून कुमक पाठवून त्याचा पाठपुरावा करावा. हा बेत कर्मधर्मसंयोगाने बाहेर फुटला आणि राजे सैन्य घेऊन आले होते ते तसेच वाटेंतील किल्ल्यांचा बंदोबस्त पाहात पाहात परत राजगडाला गेले. परतण्यापूर्वी नारवे (गोवा)

येथील श्रीसप्तकोटीश्वराच्या मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला.* या एकदोन वर्षांत सर्व मुलखांत त्यांनी सुव्यवस्थेचें काम हातीं घेतलें. त्या उपक्रमाला अनुसरून त्यांनी कित्येक किल्ल्यांवरील शिबंदीची चांचणी केली, तेथील नेमणुका बदलल्या, आणि दारूगोळा वगैरेची चांगली तरतूद केली.

गोवें घेण्याचा राजांचा प्रयत्न फसला याचें अनेकांना वाईट वाटलें. राजांप्रमाणे इतरांनाहि पोर्तुगीजांची समुद्रावरील जबरदस्ती जाचक वाटत होती. मोगलहि आता त्यांच्या विरुद्ध होते. तेव्हा राजांनी आपले प्रयत्न न थांबवितां, पोर्तुगीजांविरुद्ध त्यांचे पाश्चात्य भाईबंद इंग्रज यांचा शह देवविला. त्यांनी चौल येथे पोर्तुगीजांचीं कांही गलबतें अडकवून ठेविलीं. पण पोर्तुगीजांचें शक्तिस्थान जें समुद्र तें आवांक्याबाहेर राहिलें व परस्पर देवाणघेवाणीचा तह करून राजांना समाधान मानावें लागलें (इ. १६७० फेब्रुवारी). तहांत राजांनी अडकवून ठेवलेलीं गलबतें परत द्यावीं व दोघांच्या मुलखांमध्ये नदीची सरहद्द नसेल तेथे नजीक किल्ला बांधूं नये, ह्या अटी लक्षांत घेण्यासारख्या आहेत. या वेळी सिद्दीच्या बाबतींत मध्यस्थी करण्याचें पोर्तुगीजांनी कबूल केलें, व मोगल व राजे या दोघांशींहि सौमनस्य राखण्याचा प्रयत्न केला. तहामध्ये दोघांच्या प्रजेला गलबतांच्या वाहतुकीच्या बाबतींत समान प्रकारच्या सवलती देऊन पोर्तुगीजांनी एक प्रकारें मोगलांच्या बरोबरीने शिवाजीराजांच्या राजसत्तेलाहि समान महत्त्व अधिकृतपणें दिलें.

इंग्रजांच्या आकांक्षा

पाश्चात्य जलचरांपैकी पोर्तुगीज हेच शिवाजीराजांना विशेष लक्षांत घेण्यासारखे वाटले, म्हणून त्यांच्याबद्दल जरा तपशिलांत आपण शिरलों. ते आणि दंडाराजपुरीकर सिद्दी या दोन निकटच्या म्हणून विशेष त्रासदायक

---


* मंदिराच्या गर्भागाराच्या दारावरील शिलालेख—

> " श्रीसप्तकोटीश शके १५९०
> किलकाब्दे कार्तिक कृष्ण पंच
> म्यां सोमे श्रीशिवराज्ञा
> देवालयस्य प्रारंभः ॥ "

यांतील सोमवारऐवजी शुक्रवार हवा. (तारीख इ. १६६८ नोव्हेंबर १३)



श्री सप्तकोटीश्वर मंदिर, नार्वे (बिचोली–गोवा)
(छाया– गोवा पुराभिलेख, पणजी)



श्री शिवाजी महाराजांचा श्री सप्तकोटीश्वर
मंदिराच्या प्रवेशद्वारावरील लेख
(छाया – गोवा पुराभिलेख, पणजी)

आरमारी सत्तांशीं झगडण्यासाठी राजांना आपलें आरमार वादविण्याची निकड वाटत होती. त्या दोघांच्या बारीकसारीक कुरापती काढून, त्या तऱ्हेने मिळणारा अनुभव आपलें आरमार प्रबळ करण्याच्या कामीं उपयोगांत आणण्यासाठी ते धडपड करीत होते, हें उघड आहे. मोगलांशीं जो झगडा झाला त्यांतहि राजांची घाटावरील सत्ता संपुष्टांत येऊन ते कोकणांत रेटले गेले. त्यामुळे त्यांना स्थलचर व जलचर अशी दुहेरी सत्ता हातीं वागविण्याचें महत्त्व पटलें. जमिनीवरील सत्तांचा आवांका त्यांना आता समजला होता. पण हे दोन जलचर त्यांच्या हातास लागत ना. आणि त्यासाठी त्यांना समर्थ आरमार हवें होतें.

डच व फ्रेंच यांच्या महत्त्वाकांक्षा मर्यादित होत्या. तसेंच इंग्रजांचें होतें. इंग्रज शिवाजीराजांच्या तसे खिजगणतींत नव्हते. राजापुरास शिवाजीराजांनी त्यांची लूट केली (इ. १६६०) तेव्हा राजापूरकर इंग्रज व सुरतकर इंग्रज यांचे विजापूरकरांना दारूगोळा विकण्याच्या संबंधाने जे मतभेद होते ते आता मिटले होते. इंग्लंडच्या राजाला पोर्तुगीज राजकन्ये-बरोबर आंदण मिळालेले मुंबई बेट इ. १६६७–६८ पासून त्याने इंग्रज कंपनीला भाड्याने दिल्यामुळे, इंग्रज आता शिवाजीराजांचे जवळचे शेजारी झाले. तेव्हा राजांवर मोगलांची जरब बसली आहे आणि मुंबईच्या समोरचाच कल्याण वगैरे भाग मोगलांच्या ताब्यात गेला आहे, असें पाहून त्यांच्या तोंडाला पाणी सुटलें. पोर्तुगीजांप्रमाणेच आपणहि राजांना त्रास देऊन राजापूरच्या लुटीबद्दल कांही भरपाई करून घ्यावी असे विचार इंग्रजांच्या मनांत डोकावूं लागले. सिद्दी व शिवाजीराजे यांची झटापट नेहमीच चाले. सिद्दी मुंबईकर इंग्रजांकडे नेहमीच मदत मागे. मुंबई बेट राहण्याजोगें सुरक्षित करण्यासाठी मुंबई बेटाची तटबंदी वगैरेवर खर्च करण्याचा मुंबईकरांचा विचार चालू होता. तेव्हा मुंबईवर असा खर्च करीत बसण्यापेक्षा सिद्दीकडून त्याचें दंडाराजपुरीच विकत घेऊन तेथे ठाणें थाटावें असेहि आपल्या सामर्थ्याबाहेरचे अशक्य विचार इंग्रज या वेळीं (इ. १६६९ ऑक्टो.) करीत. पण जरी राजांबद्दल 'आमचा शत्रु' शिवाजी असें ते दिमाखाने आपल्याला महत्त्व घेऊन बोलत, तथापि राजांच्या हयातींत त्यांना स्वतंत्र असें महत्त्व कधींच आलें नाही.

मुलखाची 'बटाई'

शिवाजीराजांनी आरंभीं वडिलांच्या जहागिरींतून स्वराज्य निर्माण केलें, ही शून्यांतून विश्व निर्माण करण्याची किमया खरी; पण एकदा शिगेला पोंचलेली स्वराज्याची इमारत पुरंधरच्या तहाने धुळीला मिळाली, हें फार मोठें दुःख झालें. मूळच्या दारिद्र्यापेक्षा एकदा वैभव भोगल्यानंतर आलेलें दारिद्र्य अधिक जाणवतें. वीस वर्षांचे सर्व परिश्रम व्यर्थ झाले होते. अशा वेळीं धीर खचूं न देतां फिरून सर्व डोलारा उभा करणें, ही यापुढील राजांची कर्तबगारी अलौकिक समजली पाहिजे. अगदी प्रारंभीं शहाजीराजांच्या युद्धांत (इ. १६३६) पायमल्ली झालेला जहागिरीचा मुलूख दादाजी कोंडदेवाने लागवडीस आणून समृद्ध केला होता. पण या उद्योगांत देशमुख देशपांड्यांच्या पिढीजाद अधिकारांचा उपयोग आणि महत्त्व तसेंच राहिलें होतें. महाराष्ट्र राज्याच्या भावनेचें वारें फैलावण्यास त्यांचा उपयोग ठीक झाला होता; परंतु शायिस्तेखान-जयसिंग अशांचा वरवंटा फिरूं लागल्यावर देखील, आपल्या जमिनीला चिकटून राहून वेळ येईल तेव्हा तो वरवंटा लोटून टाकण्याइतकी मायभूमीची पोटतिडीक प्रत्येक सामान्य माणसाला वाटल्याशिवाय, स्वराज्य दृढ व चिरस्थाई होणें शक्य नव्हतें. हें ध्यानांत घेऊन त्या वेळचें मुख्य उत्पादनाचें क्षेत्र व मानाचें मुख्य अधिष्ठान जी जमीन, तिच्या महसुलाची कायमची व्यवस्था महाराजांनी लौकरच केली. मोगलांच्या दहशतीने वगैरे जे लोक मुलूख सोडून गेले होते, त्यांना कौल देऊन व वसाहती करवून, या वेळीं, मोरो त्रिमल पेशवे व नंतर अनाजी दत्तो सचिव यांच्याकडून जमिनीचा धारा राजांनी बांधून दिला (इ. १६६७–१६६८), आणि राज्यव्यवस्थेला पक्केपणा आणला. स्वराज्याची गडबड सुरू झाल्यापासून अशा तऱ्हेची सवड राजांना मिळाली नव्हती. ती त्यांनी या वेळीं घेतली आणि लाभलेल्या शांततेचा चांगला उपयोग केला.

शिवाजीराजांच्या काळीं जमीनमहसूल प्रत्यक्ष साळी-भात, तांदूळ असें धान्य व तूप, पेंड, मीठ अशा वस्तु यांच्या रूपाने वसूल केला जाई. त्याचें प्रमाण अंदाजी दोनपंचमांश राजभाग आणि तीनपंचमांश रयतभाग असें कांही ठरलेलें असे. तथापि जोंपर्यंत परकी सत्ता होती, तोंपर्यंत वसुलाच्या बाबतींत जसा व्यवस्थितपणा नव्हता, तसाच त्याला पक्केपणा

म्हणून नव्हता. मुख्य वसूल दिल्यानंतर पुन्हा हक्कदार व दरखदार यांचें देणें निराळें द्यावें लागे व अधिकाऱ्यांची लहर फिरेल त्याप्रमाणे आणखी कांही मिरासपट्टी वगैरे शेकडों नित्याच्या वा प्रासंगिक पट्ट्या रयतेवर बसवून वसूल केल्या जात. त्यांना मर्यादा नसे. अर्थात् हें सर्व भागवून रयतेला पोटापुरतें राहण्याची मारामार पडे. धर्मादाय म्हणून नाना प्रकारची आणखी जबाबदारी (चिंचवडकर देवांसारख्यांना स्वस्त किंमतींत धान्य देण्याची वगैरे) देशमुख व देशकुळकर्णी हे वतनदार अधिकारी रयतेसाठी पत्करीत; तीहि पुरी करावी लागे. बलुतेदारांचें देणेंहि अटळ असे. ही बजबजपुरी नष्ट करण्यासाठी शिवाजी महाराजांनी स्थानिक लोकांचें साह्य घेऊन जमिनीची प्रतवारी ठरविली. पिकांची पाहणी करून साऱ्याची ठराविक रक्कम कायम केली. ती न परवडेल तर तेथे निम्मेनिम उत्पन्न घेण्याची पद्धति चालू केली. हा वसूल एकदा दिला की मग हक्कदारांचे वगैरे देण्याची जबाबदारी रयतेवर नाही. ती सरकारी खजिन्यावर वा कोठारावर. या व्यवस्थेंत शेतकरी अनिश्चित व अवास्तव मागण्यांच्या भगभगींतून मोकळा तर झालाच; पण शिवाय सरकारच्या कोठारांतील माल विकण्यासाठी सरकारने ठरविलेल्या वाजवी दरांचा त्याला आपल्या खरेदीविक्रीच्या वेळीं आधार मिळू लागला. सर्व स्वराज्यभर अशा प्रकारें एकरूप, कायम व ज्याचें गणित उघड समजेल अशी महसूलपद्धति सुरू झाल्यामुळे, त्रस्त झालेल्या रयतेकडून महाराजांच्या राज्यव्यवस्थेला दुवा मिळाला. त्यांना आपल्या जमिनींबद्दल वाटणारी आपुलकी दुप्पट झाली आणि त्या जमिनी सांभाळणें ही खरी लाभाची व अभिमानाची गोष्ट ठरली. झगड्याच्या तयारीसाठी म्हणून केलेल्या इतर कोणत्याहि सिद्धतेपेक्षा रयतेची ही महामुरी किंवा सुबत्ता राजांना खात्रीने अधिक उपयुक्त ठरली.

औरंगजेबाकडून धर्मच्छळ

शिवाजीराजांवर औरंगजेबाच्या फौजांचा कांही वेळ मोठा दबाव पडला, तरी राजांनी या झगड्यांत औरंगजेबाचा फार मोठा नैतिक पराजय केला. त्याच्या दख्खनमधील साम्राज्यविषयक आकांक्षांमध्ये महाराजांनी भयंकर खो घातला. सुरतेसहि त्याला स्वास्थ्य लाभू दिलें नाही. त्याचा सरदार जयसिंग याची विजापूरवरील स्वारी अयशस्वी झाली. इराणच्या

बादशाहाने त्याला अपमानिलें. आणि त्याच्या राज्यांत सर्वत्र बंडाचा वणवा पेटून भावाच्या व बापाच्या वधासारखीं महत्पातकें करून मिळविलेलें आपलें राज्य सुखासमाधानाने आपल्याला पचत नाही, हें पाहून तो पिसाळला. त्याच्या मनाची शांति ढळली. आणि बहुधा हितशत्रूंच्या चिथावणीवरून त्याने शिवाजीराजांवरील आपल्या रागाने सर्व हिंदूंचेंच कांडात् काढावयाचें ठरविलें. त्याने हिंदूंवर जिझिया कर पुन्हा बसविला. त्याच्या जोडीला सुरतेंतील हिंदु व्यापाऱ्यांवर त्याने जादा जकाती बसविल्या. त्यांतून मुसलमानांना सबंध आणि खिस्ती व्यापाऱ्यांना अर्धी सवलत जाहीर केली. हिंदूंचीं देवळें भ्रष्ट केलीं. हिंदूविरुद्ध छळाची आणि बाटविण्याची जणूं मोहीम उघडली. चुगल्यांचा सुळसुळाट झाल्यामुळे कोणाहि मोठ्या हिंदूला छळ किंवा धर्मांतर चुकत नसे. म्हणून मुसलमानांनी चुगल्या करूं नयेत अशासाठी हिंदु लोक लाचारीने लांच देऊं लागले. तेव्हा मग कोणींहि उठावें आणि खोटी चुगली करण्याची धमकी देऊन द्रव्य उकळून आपल्या पोटाची खळगी भरावी, हा नवा धंदा चालू झाला! मुसलमानी मुलखांत छळ होतो म्हणून लोक निर्वासित होऊन उठून जाऊं लागले. आणि तसे कांही लोक इंग्रजांच्या वगैरे परकी लोकांच्या आश्रयाला गेले असतां, तेथे त्यांना खिस्ती करण्याचे मनसुबेहि रचले जाऊं लागले. धर्मच्छळामुळे हिंदु व्यापाऱ्यांनी हरताळ पाडले आणि सुरत शहर ओसाड पडलें. परंतु या अनन्वित प्रकारांना आळा घालण्याचा विचार औरंगजेबाला सुचला नाही.

शिवाजीराजांना या परिस्थितीचा धोका व अर्थ चांगला ध्यानांत आला. इतर प्रत्येक धर्माला आपली म्हणतां येईल अशी संरक्षक सत्ता होती. मुसलमान लोक राज्यें व साम्राज्य भोगीत होते. खिस्ती सत्ताधीश समुद्राच्या आश्रयाने निश्चिंत नांदत होते. पण गरीब बिचारे बहुसंख्य हिंदु व्यापारासारखे धनोत्पादक धंदे शांततेने करून, परधर्मी सत्तांचें उत्पन्न वाढवीत असून, त्यांना निर्वाणीच्या प्रसंगीं आपलें म्हणतां येईल असें हक्काचें सुरक्षित असें स्वधर्मांचें स्थान नव्हतें. त्यांचा कैवार हिंदु म्हणून घेऊन भांडेल असा एकहि प्रबळ राजा विजयनगरचें राज्य मोडल्यापासून राहिला नव्हता. हें शिवाजीराजांच्या ध्यानांत आलें. ही उणीव भरून काढली पाहिजे याची त्यांना जाणीव होती, ती या आव्हानाने अधिक तीव्र झाली. इ. १६६५-६६ च्या पराजयाचा शीण अजून राज्यांतून नष्ट झाला नव्हता.

त्यामुळे राजांना तयारीला थोडासा अवधि मिळता तर हवा होता. परंतु स्वधर्मरक्षणाचा हा जिव्हाळयाचा प्रश्न धसाला लावून स्वकीयांना आश्वासन देऊं शकलों नाही तर आपण हिंदु राजे कसले? अशा कांहीशा विचाराने धर्मासाठी म्हणून त्यांनी मोगलांच्या सत्तेचें हें नवें आव्हान स्वीकारण्याचा निर्धार केला. मुंबईचे इंग्रज या डोळयांसमोर घडणाऱ्या सर्व गोष्टी पाहात होते. त्यांनी शिवाजीराजांच्या नव्या चढाईची मीमांसा अशीच लाविली आहे. शक १५९१ च्या भाद्रपदांत (इ. १६६९ ऑगस्ट--सप्टें.) औरंगजेबाने अखिल भारतीयांचें पवित्र क्षेत्र काशी येथील भव्य देऊळ पाडून तेथे मशीद केली, तेव्हा लोकांच्या सहनशीलतेचे बंद तुटले. राजांनी त्याबद्दल औरंगजेबाकडे स्पष्ट शब्दांत कानउघाडणीचें पत्र पाठविलें. आणि तेवढ्यावरच न थांबतां धर्मच्छळाचें उत्तर लढाईच्या चढाईने दिलें.

* * *



सिंहगडचा दुहेरी दरवाजा

१५ मोगलांशीं बिघाड

चढाईची सुरुवात

आग्र्याच्या त्या दुर्दैवी भेटीच्या प्रसंगाने शिवाजीराजे व औरंगजेब यांचा जयसिंगामार्फत झालेला तह मोडला होता. आणि जरी तो धागा पुन्हा औरंगजेबाने नाइलाजाने जोडून घेतला होता (पृ. १४९–१५०) तरी दोघांनाहि तो तह कायमचा टिकविण्याची इच्छा नव्हती. विशेषतः औरंगजेब हा अधिक समर्थ असल्यामुळे तो केव्हा कुरापत काढून तह मोडील याचा नेम नव्हता. मागच्या प्रकरणांत वर्णिलेलें हिंदुविद्वेषी धोरण कसोशीने अमलांत आणणाऱ्या औरंगजेबाच्या वैरांतून शिवाजीराजे सुटणें शक्यच नव्हतें. शिवाय दक्षिणचा सुभेदार आपला पुत्र मुअज्जम हा शिवाजीशीं सलोख्याने वागतो, हें संशयी औरंगजेबाला अत्यंत भीतीचें वाटलें. तेव्हा त्या दोघांचा स्नेह बिघडावा आणि शिवाजीराजांना कांही अद्दल घडावी, अशी त्याने युक्ति काढली. संभाजीराजांच्या मनसबीच्या अटींप्रमाणे प्रतापराव गुजर आणि नीराजीपंत औरंगाबादेस शहाजाद्याजवळ असत. ते दोघे एखादे वेळीं भेद करतील, तेव्हा त्यांस कैद करावें असें त्याने मुअज्जमास लिहिलें. हीं पत्रें डाकेने येण्यापूर्वीच शहाजाद्याला त्याच्या वकिलाकडून ही बातमी कळली. ती गुप्तपणें त्याने या दोघांस कळविली आणि तातडीने निघून जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणे ते लगेच निघून राजगडास गेले आणि मागाहून तीं पत्रें आल्यावर, 'मराठे आधीच पळून गेले' असें त्याने औरंगजेबाला कळवून टाकलें (इ. १६६९ डिसें.–जाने.)! अशा प्रकारें औरंगजेबाने प्रत्यक्षच कुरापत काढली आणि शिवाजीराजांनीहि तें आव्हान उत्सुकतेने स्वीकारलें. "दोन वर्षें शांतता होती तेव्हा मनसबीवरच लष्कराचें पोट भरलें. आता लढाईच्या काळांत मोगलाई मुलूख मारून खावयास वाव झाला," अशा शब्दांत राजांचे विचार व्यक्त झाले आणि लगेच ते अमलांतहि आले.

सिंहगड वगैरे तेवीस किल्ले मोगलांकडे द्यावे लागले (पृ. १२८), याचें राजांना आणि जिजाबाईलाहि मोठें वैषम्य वाटत होतें. तेव्हा तानाजी मालुसऱ्याने प्रथम सिंहगड घेण्यास कमर कसून मुहूर्त केला. त्याच्या दोघां मर्दांनी रात्रीं कड्यावरून चढून जाण्यासाठी माळ (= दोराची शिडी) लावली. तिच्यावरून तानाजी आणि त्याचे तीनशे मावळे चढून गेले. उदेभान नांवाचा मोगलांचा शूर गडकरी होता. त्याने आपले लोक जमवून प्रहरभर कमालीचें युद्ध केलें. तानाजी व उदेभान दोघेहि लढतां लढतां पडले.* तानाजी पडल्यावर त्याचा भाऊ सूर्याजी याने मराठ्यांच्या सैन्याचें नेतृत्व करून तानाजीचें काम पुरें केलें; सिंहगड किल्ला सर केला (माघ वद्य ९ – इ. १६७० फेब्रु. ४).

शिवाजीराजांनी एकदा युद्ध सुरू केलें, म्हणजे त्याचा कार्यक्रम नेहमीच व्यापक आणि धडाडीचा असे. एकामागून एक किल्ले घेण्याचें काम त्यांनी वांटून देऊन निरनिराळ्या किल्ल्यांवर तयारीनिशीं सैन्यें पाठविलीं. एवढेंच नव्हे, तर मोगलांच्या मुलखांत दूरवर लुटालूट करण्याकरिताहि लहान लहान तुकड्या पाठवून, सर्व बाजूंनी वणवा पेटावा तसा मोगलांच्या मुलखांत भडका उडवून दिला. आरंभालाच त्यांची फौज सधन वऱ्हाड प्रांतांत गेली (इ. १६७० जाने.). तेथे २० लाखांची लूट मिळवून तिकडील २० हजार फौजेने दक्षिणेकडे वळून औशाच्या किल्लेदाराला पक्कें नागविलें. औरंगाबादेकडे नंतर त्यांची आणखी एक फौज गेली. अहमदनगर, जुन्नर, परिंडा या महालांतील गांवें लुटल्याची बातमी आणखी एका महिन्यांतच औरंगजेबाच्या कानीं गेली. पुरंधरच्या तहाने मोगलांकडे द्याव्या लागलेल्या किल्ल्यांवर मोर्चे लावून एकदोन महिन्यांत राजांच्या फौजांनी ते धडाधड

---

* महाराजांना तानाजीच्या मरणाचें अर्थात् फार दुःख झालें. परंतु त्यांनी "गड आला पण सिंह (तानाजी) गेला" वगैरे म्हटलें व म्हणून 'सिंहगड' नांव झालें हें खरें नाही. सिंहगड नांव आधीच इ. १६६३ त कागदोपत्रीं रूढ आहे (राजवाडे खंड ८, ले. १२).

घेतले. आताच सांगितल्याप्रमाणे तानाजीने सिंहगड फेब्रुवारी ४ ला सर केला. त्यानंतर मार्च ८ ला निळोपंत मुजुमदारांनी पुरंधर घेतला. आणि मार्च १५ ला कल्याण घेऊन दुसऱ्या फौजांनी कोकणांत माहुली व कर्नाळा या दोन्ही किल्ल्यांना वेढा दिला. कर्नाळ्यासमोर तर फळ्या आणि चिखल यांचे धमामे-आडोसे बांधून राजांच्या लोकांनी यशस्वी चाल केली. सुरतेकडेहि राजे पुनः येणार म्हणून हुली उठू लागल्या. निजामशाही कोकणचा मोगल सुभेदार लोधीखान याचा पराभव करून कल्याण भिवंडी-कडील मुलूख त्यांनी हां हां म्हणतां मटकाविला व त्याच सुमारास नाशिक-कडील चांदवड लुटलें. या शिवाजीराजांच्या तडफीच्या कार्यक्रमाने सर्व जग चकित झालें. त्यांच्या धिटाईचें सर्वांना कोडें पडलें. शहाजादा मुअज्जम बापाविरुद्ध असून त्याचीच राजांना मदत आहे, असा याचा कित्येकांनी अर्थ लावला. शिवाय सिद्दी हिलाल वगैरे कांही मोगलांकडील माणसें राजांना सामील होतीं हें कित्येकांना माहीत होतें. मोगलांचीं जंगी सैन्यें तयार होऊन आपल्यावर येत तोंपर्यंत आपण काय ती करामत केली पाहिजे ह्या विचाराने राजे मात्र आपल्या युद्धकौशल्याची कमाल करीत होते. मे ३ ला मराठ्यांनी माळा लावून लोहगड (जि. पुणें) घेतला. जून १५ ला हिंदोला (मढेघाट-महाड रस्ता) पुन्हा त्यांच्या ताब्यांत आला. आणि जून १६ ला अवघड माहुली किल्ला (डोंगरी, जि. ठाणें) देखील हातांत आला. जून २२ ला कर्नाळ्याचा (जि. कुलाबा) वेढा यशस्वी झाला. जून २४ ला रोहिडा (ता. भोर) हस्तगत झाला. आणि पावसाळ्याच्या पूर्वीची कोकण व देश अशा दोन्ही ठिकाणीं चाललेली ही धडाडीची मोहीम आता पावसाळा आल्यामुळे थोडी विसावली.

औरंगजेबानेच हा बिघाड उपस्थित केल्यामुळे तोहि आपली तयारी करीत होता. फिरंगी लोकांकडून आरमाराची मदत कशी मिळेल याचा त्याने तपास चालू केला (इ. १६७० फेब्रु.). हळूहळू मोगलांचें मोठें सैन्य जुन्नरजवळ गोळा झालें. एक विभाग कल्याणकडे प्रतिकारार्थ रवाना झाला. सुरतेच्या बंदोबस्ताकरिता अहमदाबादेहून बहादुरखान आला व तेथून तो माहुलीला कुमक करून पुढे शिवाजीराजांवर जाणार असें जाहीर झालें (इ. १६७० मे) व लौकरच कल्याण बाजूला शिवाजी व मोगल यांची रस्सीखेच सुरू झाली. मोगलांचें जगड्व्याळ सैन्य हालतां

हाल्तां पावसाळयाला आरंभ होईपर्यंतचा वेळ गेला. आणि पावसाळ्यांत तें छावणीच करून बसलें. मग राजांनी चपळाई करून मागे सांगितल्याप्रमाणे लोहगड, कोज, कुर्डूगड वगैरे किल्ले घेऊन माहुली-कर्नाळयांना जबर शह दिला व भर पावसाळयांत ते शत्रूच्या डोळयांदेखत हस्तगत केले; आणि यापुढे मोगलांच्या हालचाली काय होतात याकडे ते लक्ष देऊन बसले.

औरंगजेबाने इ. १६६५ च्या नोव्हेंबरांत ज्याप्रमाणे शिवाजीराजांकडून आदिलशाहावर स्वारी करविली होती (पृ. १३३-३४), तसें त्याने आता आदिलशाहीला राजांच्या विरुद्ध वेठीला धरलें. इ. १६७० च्या ऑगस्टांत त्यांच्याविरुद्ध स्वारी करण्यासाठी औरंगजेबाने आदिलशाहाकडे १२ हजार घोडदळाची मागणी केली. तसेंच कोकणांतील किल्ल्यांना इंग्रजांनी दारू-गोळयाची वगैरे मदत करावी असेंहि त्याचें फर्मान सुटलें (इ. १६७० ऑगस्ट). आणखीहि कित्येक तयारीच्या त्याच्या गोष्टी चालू झाल्या. आदिलशाहाचा वास्तविक राजांशीं तह झाला असतांहि (पृ. १४८) नाइलाजाने मोगलांच्या सूचनेप्रमाणे विजापुराहून नवाब बहलोलखान ४ हजार घोडदळ घेऊन निघाला (इ.-१६७० सप्टें.). पण तो राजांविरुद्ध लढला नाही.

शिवाजीराजांनी या वेळीं राज्याचा बंदोबस्त उत्तम करून किल्ल्यांवर दारूगोळा वगैरे भरून ठेवण्याची सावधगिरी घेतली. त्यांनी मोठ्या मुत्सद्देगिरीने व अनुभवाच्या धोरणाने आपलें जहाज हाकारलें. नवें मिळविणें ही गोष्ट जितक्या महत्त्वाची तितकीच मिळविलेलें राखणें ही गोष्ट महत्त्वाची, अशी त्यांची स्वतःची खात्री असल्यामुळे आपल्या हाताखालच्या माणसांच्या मनावर ती गोष्ट ते बिंबविण्याचा प्रयत्न करीत. अफजलखानाचा पराजय केल्यानंतर केवढ्या झपाट्याने त्यांनी पन्हाळ्यापर्यंतचा मुलूख जिंकला होता; परंतु दोन्हीकडून परचक्राची आंच लागतांच सर्व स्वराज्य पार वितळून गेलें ! म्हणून ‘ एकाने सिद्ध संरक्षण करावें, एकाने साध्य करावें. दोन्ही कामें साहेब बरोबरीने मानिताती ’ हें सूत्र त्यांनी सर्वांना पटवून दिलें.

राज्याची उभारणी भक्कम पायावर होण्यासाठी केवळ मुलूखगिरी साधणारीं नव्हे, तर पद्धतशीर कारभार करणारीं माणसें त्यांना हवी होतीं. तीं त्यांनी शिकवून ठिकठिकाणीं स्थापन केलीं आणि म्हणूनच या वेळच्या त्यांच्या हालचाली अधिक प्रभावी झाल्या.

सुरतेची दुसरी लूट

मोगलांच्या हालचालींवर राजांचें चांगलें लक्ष होतें. पावसाळा संपून मोगल एखादी मोठी स्वारी काढण्याच्या आधीच आपण त्यांना जबर धक्का द्यावा या विचाराने, शिवाजीराजे नारळी पौर्णिमा झाल्यानंतर (इ. १६७० जुलैअखेर) रायगड सोडून उद्योगाला लागले. घाटावर जुन्नरकडेहि त्यांनी मोगलांना स्वस्थता लाभूं दिली नाही. मोरोपंत पेशव्याच्या हाताखाली एक मोठी फौज त्या बाजूला संचाराला पाठविली. कल्याणवर सैन्य जमवून त्यांनी मुंबईच्या आसपास देखील युद्ध चालविलें व विशेषतः दंडाराजपुरीच्या सिद्दीवर त्यांनी शह ठेवला (ऑगस्ट-सप्टें.). मोरोपंत गुजराथवर स्वारी करणार अशीं स्पष्ट लक्षणें होतींच. म्हणून सुरतेचे इंग्रज वगैरे वखारवाले आपलें सामान हालवून सावधगिरीने राहिले. पण मोगलांचा बंदोबस्त कांहीच झालेला नव्हता. ही संधी साधून शिवाजीराजांनी दुसऱ्यांदा सुरतेवर झडप घातली (इ. १६७० ऑक्टो. ३-४). त्यांनी सुरतेच्या नव्या तटाला वेढा दिला. रक्षकांशीं लहानशी चकमक झाली. नंतर शहर ताब्यांत घेऊन त्यांनी लुटीस सुरुवात केली. हंगाम होऊन गेल्यामुळे माल गलबतावर चढवून देऊन कफल्लक बनलेल्या फ्रेंच, डच, व इंग्रज यांच्या वखारी त्यांनी वगळल्या. तीन दिवसपर्यंत लूट करून सुमारें ६६ लाख रुपये द्रव्य मिळाल्यावर राजे बिनबोभाट आले तसेच परत गेले. मोगलांशीं कराव्या लागणाऱ्या युद्धाच्या खर्चाची भरपाई म्हणून आपल्याला हा पैसा पाहिजे, असें या वेळीं त्यांनी उघड मागणें केलें, हें ध्यानांत घेण्यासारखें आहे.

सुरतेस जातांना राजे कोकणमार्गें किनाऱ्याकिनाऱ्याने गेले. पण येतांना ते बागलाणांतून पेठ, दिंडोरी या मार्गाने परतले. त्या बाजूला मोगलांचा सरदार व खानदेशचा सुभेदार दाउदखान होता. त्याच्याशीं झगडा होऊन राजांनी त्याचा वणी दिंडोरीनजीक पराभव केला (ऑक्टो. १७). या युद्धांत दाउदखानाकडील इतर लुटीबरोबर एक हत्ती पाडाव मिळाला.

सुरतेची लूट लादलेलीं घोडीं वगैरे अवजड सामान राजांच्या बरोबर होतें घोडीं व पायदळ पुढे पाठवून व आपण घोडेस्वारांनिशीं पाठीमागे राहून, राजांनी दोन प्रहर शर्तीचें युद्ध केलें आणि मोगलांच्या फौजेवर फत्ते मिळविली, हा या लढाईचा विशेष होय. या लढाईनंतर कांही वेळ कुंजरगडावर घालवून नोव्हेंबरांत राजे बऱ्हाणपुराकडे व वऱ्हाडांतील सधन शहर कारंजें या बाजूला गेले. त्यांनी तेथील पेठ लुटली व तेथून एक कोटीचा माल ४००० बैल व गाढवें यांवर लादून नेला. खंडणी ठरविण्या-साठी त्यांनी तेथील सर्व थोर लोक आपल्याबरोबर धरून नेले. खानदेशा-कडे नंदुरबार बाजूच्या लोकांकडून वसुलाच्या चौथाईची खंडणी देण्याबद्दलचे करारनामे लिहून घेण्याचा नवा पायंडा त्यांनी या वेळीं सुरू केला. बऱ्हाणपूरला जाण्यापूर्वी वाटेवरील अहिवंत, रवळाजावळा, मार्कंडा हे किल्लेहि त्यांना विशेष परिश्रम न करतां मिळाले (इ. १६७० नोव्हें.) मध्यंतरीं मोरोपंत पेशवे व प्रतापराव सरनौबत वगैरे कसलेल्या सेनापतींच्या हालचाली चालूच होत्या. त्यामुळे मोगली मुलूख व त्यांतील प्रजा जेरीस आली. मध्येच मोरोपंतांनी त्रिंबकगड जातां जातां घेऊन स्वकीय किल्ल्यांच्या माळेंत आणखी एका मण्याची भर घातली.

शिवाजीराजांचा दरारा आता इतका वाढला कीं, सुरतेवर ते चालून येणार अशा नाना तऱ्हेच्या हुली पुनः पुनः उठल्या. मोगलांच्या कच्च्या बंदोबस्तावर आपल्याला विसंबून चालावयाचें नाही हें लक्षांत येऊन, परदेशी वखारवाले सुरतेच्या बंदराचें रक्षण करण्याची कांही कायम योजना एकजुटीने करण्याचें बोलूं लागले. इतक्यांत अहमदाबादचा सुभेदार महाबतखान याचे लोक सुरतेच्या रक्षणासाठी आले व सुरतेंत थोडी स्थिरस्थावर झाली. पण मोगलांची सत्ता कांही निर्भय झाली नाही. मोगलांचें इतकें सैन्य सर्व दख्खनभर वावरत होतें, तरी राजांनी त्याला दाद दिली नाही. जसवंतसिंग, दिलेरखान, बहादुरखान, महाबतखान, दाउदखान हे मोठे व लोधीखान वगैरे कित्येक किरकोळ सरदार मोठ्या

तयारीनिशीं राजांना अडविण्याचा प्रयत्न करीत असतां, त्यांचा कांहीच प्रभाव पडला नाही. याचें मुख्य कारण त्यांच्यांत आपसांत एकविचार नव्हता. औरंगजेबाच्या गैरविश्वासाच्या धोरणामुळे कोणालाच शाश्वती वाटत नव्हती. उलट राजांचें सैन्य व त्यांचे सेनापति सर्व पोटतिडीकेने झडत असल्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाला विलक्षण तेज आलें. पुढेमागे आपल्यावर संकट आलें, तर त्या वेळीं उपयोग व्हावा म्हणून शहाजादा मुअज्जम राजांशीं संगनमत करीत आहे, असा सर्वांचा समज झाला. म्हणून औरंगजेबाने नोव्हेंबरमध्ये महाबतखानाला दख्खनच्या मोहिमेवर रवाना केलें. महाबतखान बऱ्हाणपुराहून औरंगाबाद या सुभ्याच्या ठाण्यास आला. पण इतक्यांत जसवंतसिंग व दाउदखान यांचें भांडण निघालें; व तेवढ्यांतच राजांनी भेद करून साल्हेरचा महत्त्वाचा किल्ला घेतला (इ. १६७० डिसेंबर), आणि त्याचा बंदोबस्त केला. दिलेरखान, महंमद अमीन हेहि मोगलांचे मोठेच सरदार. परंतु एकमेकांच्या विचाराने युद्धाचा आराखडा ठरवावा असा विचार त्यांना सुचण्यासारखा नव्हता. त्यामुळे जरी औरंगजेबाने आकाशपाताळ एक करून अगदी दूरच्या आसामपासून सगळीकडून सैन्य गोळा करून आणविलें, तरी त्याचा उपयोग झाला नाही. मोगलांचा खास पाठविलेला सरदार महाबतखान नाशिक-त्रिंबकपर्यंत आला व त्याने हातगड, अहिवंत, मार्कंडा, जवळा वगैरे चारपांच लहानमोठे किल्ले घेतले (इ. १६७१ मार्च-एप्रिल); नाही असें नाही. पण त्याला तोंड देऊन या किल्ल्यांच्या गटांतल्या कण्हेरागडाखाली मराठ्यांकडील हशमांचा (पायदळ) हजारी सरदार रामाजी पांगेरा याने एकट्याच्या हिमतीने मोगलांशीं एक प्रहर हातघाईचें युद्ध केलें आणि त्यांची खात्री पटविली. त्याचें असें बहारीचें वर्णन केलेलें आढळतें : "एक प्रहर टिपरी जैसी शिमग्याची दणाणते तैसे मावळे भांडिले. दिलेलखानाने बाराशे पठाण रणास आणिले...मग सातशे माणूस व रामाजी पांगेरा सर्वेहि उघडे बोडके होऊन एक एकास वीस वीस तीस तीस जखमा तिराच्या, बर्चीच्या लागल्या. लोक मेले. मोटें युद्ध जालें. मग दिलेलखान यांनी तोंडांत अंगोळी घालून एक घटका आश्चर्य केलें." (सभासदी बखर). वरवर पाहतां तात्पुरता पराजय झालासा दिसला, तरी मराठ्यांची हिंमत शाबूत होती, एवढेंच यावरून निश्चित ठरतें.

ब्ऱ्हाणपुराकडे अगदी स्वैर संचार करून राजांनी तिकडील जकाती सुद्धा आपल्या मताप्रमाणे ठरविल्या हें याचेंच गमक होय. बहादुरखान व दिलेरखान मेअखेर सुरतेला आले. तेथून निघून जूनमध्ये त्यांनी साल्हेरीस वेढा घातला. पावसाळयांत त्यांच्या वाटेला कोणी गेलें नाही. परंतु पावसाळा संपताच मराठ्यांच्या हल्ल्यांपुढे त्यांना टिकाव धरणें अशक्य झालें आणि ते नांवाला थोडीशी फौज ठेवून वेढा उठवून औरंगाबादेस निघून गेले. तात्पर्य, शिवाजीराजांनी सुरू केलेल्या चढाईला आता दोन वर्षे होत आलीं, तरी मोगल त्यांना मुळीच पायबंद घालूं शकले नाहीत.

यापुढे या मोहिमांचा वेग कमी झाला आणि इ. १६७१ च्या दिवाळी-साठी रायगडावर व शिवापट्टणास मातृगृहीं येण्याला शिवाजीराजांना थोडासा अवधि मिळाला. पण एवढ्यांतहि त्यांनी भोरकडील रोहिडा आणि साताऱ्याकडील पांडवगड, अशा छोट्या छोट्या गडांवर देखील चालविलेल्या इमारतकामाची पाहणी करण्याची काळजी घेतली, हें ध्यानांत घेण्यासारखें आहे. या वेळीं राजांचें लक्ष घाटाकडील मोहिमेवर विशेष असल्यामुळे कोकणभागाकडे त्यांची विशेष हालचाल मुंबईकर इंग्रजांना आढळली नाही हें साहजिक आहे. तरी पण शिवाजीराजांच्या दृष्टीने कोकणपट्टीला स्वराज्याच्या प्रपंचांत फार महत्त्वाचें स्थान होतें. आणि या मध्यंतरींच्या काळांतहि "राजपुरीचे सिद्दी, घरांत जैसा उंदीर तैसा शत्रु, यास कैसे जेर करावें," याचा विचार राजांनी सोडलेला नव्हता. राजे वरघाटी गुंतलेले पाहून दंडाराजपुरीच्या सिद्दीने त्यांच्या तळें आदिकरून किनाऱ्यासमोरील ठाण्यांत कांही जाळपोळ केली. पण या वेळीं त्याचा बदला घेत बसण्यांत जरी राजांनी वेळ घालविला नाही, तरी त्यांच्या आरमाराचा त्या बाजूचा पहारा ढिला झाला नव्हता. कारण दंडाराजपुरीचा सिद्दी व पोर्तुगीज या आरमारी सत्तांचा त्रास केवळ सलोख्याचीं बोलणीं कधी काळीं झालीं एवढ्यानेच कमी होण्यासारखा नव्हता. बरेच दिवस निर्वेध सत्ता भोगण्याची सवय झालेल्या या लोकांना शिवाजीराजांसारखा चतुरस्त्र प्रतिस्पर्धी जाचक वाटत होता. आजपर्यंत उंटावरून शेळ्या हांकणाऱ्या मुसलमानी अधिसत्ता यांच्या वाटेस फारशा जात नव्हत्या. परंतु ती स्थिति पालटली. शिवाजीराजांनी १००–१५० जहाजांचें नवें आरमार बांधलें, वाढवलें हें यांपैकी कोणालाच आवडण्यासारखें नव्हतें. राजांच्या या आरमाराच्या हालचाली दाभोळ,

नागांव, मुंबई, वसई या बाजूला चालू राहिल्या आणि नेहमीप्रमाणे पोर्तुगीज व सिद्दी यांना त्या जाचक वाटल्या.

पुण्यावर पुन्हा घाला

सरदारांतील भांडणें संपून औरंगजेबाने दिलेरखानाच्या हातांत युद्धाचीं सूत्रें दिल्यामुळे, मोगली चढाईचें स्वरूप तितक्यांतच थोडें अधिक तीव्र झालें. जयसिंगाबरोबर दिलेरखान अनुभवलेला असल्यामुळे, तो, बहादुरखान व महाबतखान असे सारेच त्याच्या सल्ल्यावरून साल्हेरचा वेढा सोडून राजांच्या खुद्द म्हणजे पुण्याच्या मुलखावर येऊन घसरले. अल्पकालांत त्यांनी पुणें व चाकण यांवर फौजा नेल्या (इ. १६७२ जाने.). राजांबद्दलचा दिलेरखानाचा द्वेष मागच्या स्वारींत दिसून आला होता. या वेळीं तो पुण्यास जाळपोळ करूनच थांबला नाही, तर त्याने ९ वर्षांवरील सर्व बायका-पुरुषांची निर्दयपणें कत्तल करविली, असें मुंबईकर इंग्रजांनी लिहून ठेविलें आहे. या गोष्टीचा प्रतिकार केल्याशिवाय राजे कसे राहणार ? त्यांनी कुडाळ वगैरे सर्व लांबलांबच्या ठिकाणांहून सैन्य काढून आणून तें महाडास एके ठिकाणीं जमविलें व त्याचा बराच मोठा भाग मोरोपंत पेशव्यांचे ताब्यांत देऊन, मोगलांनी रेंगाळत ठेवलेला साल्हेरचा वेढा उठविण्यासाठी त्याला रवाना केलें. साल्हेरच्या वेढ्याचें नेतृत्व मोगलांचा सेनापति इखलासखान करीत होता. त्याच्यावर प्रतापराव व आनंदराव लष्कर घेऊन वरघाटावरून चालून आले आणि मोरोपंत पेशवे पायदळ घेऊन कोकणांतून आले. दोघांनीहि दोहोंकडून हल्ला चढविला. विजापुरी बहलोलखानाचा एक भाऊ मोगलांकडे होता तो बहलोलखान, इखलासखान, मोहकमसिंग व दारकोजी भोसले असे सुमारे २२ मोगली सेनापति त्यांनी धरले आणि बरेच हत्ती व घोडीं पाडाव केलीं. अशा रीतीने साल्हेरच्या माचीचा वेढा मारल्यावर लगेच पलीकडचा मुल्हेरचा किल्ला त्यांनी मोगलांपासून घेतला (इ. १६७२ फेब्रु.). त्या किल्ल्यावर आणि साल्हेरच्या किल्ल्यावर ताज्या दमाचें सैन्य व सामग्री ठेवून आणि त्याच सपाट्यांत जातां जातां मोगलांच्या मुलखांत लूट मिळवून (इ. १६७२ मार्च-एप्रिल), मोरोपंत सावकाश कोकणांत उतरला. मराठ्यांच्या या महत्त्वाच्या जयांमुळे आणि राजांच्या प्रत्यक्ष हल्ल्यांमुळे मोगलांचा प्रतिकार निकामी झाला.

आणि बागलाणकडच्या बंदोबस्ताकडे लक्ष पुरविण्यासाठी दिलेरखानाला पुणें सोडून जाणें भाग पडलें. सर्व मोगली सरदार जसे आले तसेच हात हालवीत निघून गेले!

जितकें संकट मोठें तितका राजांचा पराक्रम उठून दिसावा, ही त्यांच्या चरित्रांतील लक्षांत घेण्यासारखी गोष्ट होय. या वेळीं मोगलांचीं सैन्यें एकवटून आलीं आणि जयसिंगाच्या वेळेप्रमाणेच त्यांच्या अगदी घरांत ठाण मांडून त्यांनी राजांना पेंचांत पकडलें. तें पाहून राजांच्या शत्रूंना आनंद झाला. परंतु राजांनी दीडशे मैलांवरच्या साल्हेर-मुल्हेरकडे मोगलांशीं गांठ घालून तेथे त्यांना शह दिला व पुण्याचें ग्रहण उठविलें, हेंहि लोकांना स्पष्ट दिसून आलें. या जयानंतर मात्र कोकणपट्टीकडे राजांनी अधिक लक्ष द्यावयाचें ठरविलें. लगेच त्यांनी सुरतेंतील परदेशी वखारवाले, मुसलमान व हिंदु व्यापारी व बादशाहाचे अंमलदार या सर्वांकडे जबर खंडणी मागण्यासाठी पत्रें लिहिलीं. मुंबईजवळ उंदेरी खांदेरी बेटांवर सिद्दीच्या वगैरे बंदोबस्ताकरिता जंजिरा किल्ला बांधण्याचें ठरविलें. राजापूरच्या नुकसानभरपाईबद्दल इंग्रजांशीं चालू असलेल्या बोलण्याचा रंग थोडासा अनुकूलतेकडे झुकवला. आणि आपल्या सुसज्ज सैन्याच्या हालचाली थोड्या अधिक धिटाईने चालू केल्या. इ. १६७२ मे आरंभाच्या सुमारास राजे रायगडावर होते; पण तेथून ते १० हजार सैन्य घेऊन थोड्याच दिवसांत बाहेर पडले, आणि सर्व मुलखांत त्यांनी सैन्य पेरून ठेवलें. त्याच सुमारास पेशवे मोरोपंतहि तितकेंच सैन्य घेऊन, महाडावरूनच पण दुसऱ्या बाजूला, उत्तरेकडे जव्हार-रामनगरच्या रोखाने निघून गेले.

आता शिवाजीराजांच्या वयाला त्रेचाळीस आणि राज्यस्थापनेच्या त्यांच्या उद्योगाला तीसएक वर्षें होत आल्यामुळे, त्यांचें स्वतःचें व्यक्तिमत्त्व आणि राज्यपद्धति दोन्ही परिपक्व झाल्या असल्यास नवल नाही. साहजिक त्यांनी आता पूर्वी एकदा सांगितल्याप्रमाणे (पृ. १६५) राज्याच्या वाढी-बरोबरच वाढलेलें राज्य स्थिरस्थावर करण्याकडे लक्ष दिलें आणि राज्याचीं निरनिराळीं अंगें सुव्यवस्थित व समृद्ध केलीं. 'गडकोट म्हणजे राज्याचें मूळ' (आज्ञापत्र). तेव्हा राज्यांतील प्रत्येक किल्ला मजबूत करण्यासाठी त्यांनी सर्वत्र बांधकाम सुरू केलें. प्रसंगीं कामगारांना त्यांनी इतकी जबर

मजुरी देऊं केली की, त्यामुळे 'आमच्याकडील कामगार शिवाजीकडे पळून जातात,' अशी मुंबईकर इंग्रजांनी तक्रार केलेली आढळते. पावणेदोन लाख होन अशा तऱ्हेने किल्ल्यांच्या मजबुतीवर त्यांनी खर्च केले व राज्य बळकट केलें. मागे दोन-तीन वर्षें युद्ध चाललें तसेंच आणखीहि चालवावें लागलें, तरी प्रसंगीं खजिन्याचा तुटवडा पडूं नये, म्हणून महालोमहालीहून रकमा आणवून सवालाख होन (दरसाल) गंगाजळींत टाकण्याचें त्यांनी ठरविलें. शिवाजीराजांनी सलोखा तुटल्यानंतर सतत दोन-तीन वर्षें मोगली सत्तेशीं झगडा चालविला आणि या वर्षी तर समोरासमोर उभे राहून ठाण मांडून खणाखणींतून यश मिळविलें आणि आलेला संकटाचा प्रसंग ओलांडला. जयसिंगाच्या वेळेपासून बसलेला मोगलांचा अंमल आणि त्यांची लोकांच्या मनावर बसलेली दहशत पार उडाली. आणि यापुढे पुढील उद्योगाचा एकूण नूर खास पालटला. 'अलीकडच्या त्यांच्या (शिवाजी-राजांच्या) भव्य यशाच्या योगाने जगाच्या व खुद्द त्यांच्या स्वतःच्याहि दृष्टीने' त्यांचा राजकारणांतील दर्जा वाढला आहे, अशी नाइलाजाने कां होईना पण इंग्रज हितशत्रूंनाहि कबुली द्यावी लागली. मग जिव्हाळ्याच्या हितचिंतकांच्या दृष्टीला यापुढील पायरी म्हणून महाराजांच्या श्रेष्ठ पदाला साजेशा राज्याभिषेकाचीं स्वप्नें दिसूं लागलीं असलीं तर नवल कोणतें!

भर पावसाळ्यांतील कामगिरी

शिवाजीराजांच्या सत्तेचा आणि त्यांच्या स्वाऱ्यांचा जम आता चांगला बसत चालला. मोरोपंत पेशव्यांचें मोकळें झालेलें सैन्य जें मे महिन्यांत (इ. १६७२) महाडजवळून निघालें तें किनाऱ्याने जाऊन चौल, कारंजें व मुंबईपासून दमण-बलसाडपर्यंत जी सात-आठ मैल रुंद व शेदीडशे मैल लांब अशी चिंचोळी किनाऱ्याची पट्टी पोर्तुगीजांच्या सत्तेखाली होती तिच्या राशीला लागलें. त्याने चौल, वसई वगैरे पोर्तुगीजांचीं ठाणीं लुटलीं व अलीकडे राजांना लागलेल्या छंदाला अनुसरून त्यांच्याकडून त्याने चौथाईची मागणी केली. वसई वगैरे लुटल्यानंतर मोरोपंत पुढे जव्हार राज्याकडे सटकले. तेथील कोळी राजा विक्रमशाह घाटापलीकडील मोगलांच्या मुलखांत आश्रयार्थ पळाला (इ. १६७२ जून ५), आणि मोरोपंतांनी जव्हार ताब्यांत घेऊन आणखी आठपंधरा दिवसांत (२१ जून)

त्यालाच लागून असलेलें रामनगर, हें दुसरें कोळी राज्यहि जिंकून घेतलें. रामनगरचा राजा सोमशाह आपलें कुटुंब घेऊन प्रथम चिखलीला पळाला आणि तेथून मग तो पोर्तुगीजांच्या आश्रयाला म्हणून दमणला गेला. जव्हार सुरतेपासून ४० कोस आहे. आणि रामनगर त्याहूनहि दोन मजला अलीकडे असल्यामुळे आता शिवाजीराजांच्या फौजा सुरतेवर येणार म्हणून सुरतेंत सर्व लोक भयभीत झाले. आणि त्याला कारणहि तसेंच होतें. मोरोपंतांनी एकापाठोपाठ एक अशीं तीन तातडीचीं पत्रें राजांच्या सहीने पाठवून त्यांना "सरकारी जमाबंदीची चौथाई सुमारें ४ लक्ष रुपये मला द्या; नाही तर मी स्वत: येऊन वसूल केल्याशिवाय राहणार नाही" अशी दहशत घातली. "तुमच्या बादशाहानेच माझा देश आणि माझी प्रजा यांच्यावर चढाई केली. त्याच्याशीं लढाई करण्यासाठी मला सैन्य ठेवावें लागलें. तरी त्या सैन्याचा पगार मला तुमच्याकडून वसूल करण्याशिवाय गत्यंतर नाही," असा मजकूर शिवाजीराजांच्या त्या पत्रांत होता. पण ती एक हूलच होती. शिवाजीराजांनी यापुढे सुरतेवर कधीच स्वारी केली नाही. परंतु जव्हार व रामनगर राजांच्या हातीं आलीं, एवढ्यानेच सुरतकरांना त्यांची भीति वाटे व तेथील सुभेदार राजांना खंडणी देण्याकरिता म्हणून गरीब बिचाऱ्या व्यापाऱ्यांकडून वाटेल तसा पैसा उकळून आपली तुंबडी भरी. या दहशतीच्या वातावरणामुळे सुरतेचा व्यापार कायमचा बसला आणि यानंतर त्या शहराला पूर्वीचें वैभव कधीच प्राप्त झालें नाही.

रामनगरची कामगिरी पार पडतांच मोरोपंत सुरतेकडे येतील अशी तेथील लोकांची अपेक्षा होती. परंतु कोणाच्याहि ध्यानींमनीं नसतांना भर पावसांतच मोरोपंत नासिक-त्रिंबककडे गेले व तेथील ठाणेदार कल्याणजी जाधवराव याचा त्यांनी पराभव केला व तो मुलूख ताब्यांत घेतला (जुलै २०). मोगल व शिवाजीराजे यांमधील युद्धांत मोगलांचा मोड होत असून शिवाजीराजांची चलती आहे याचें प्रत्यंतर सर्वांना मिळत होतें. तितक्यांत औरंगजेबाने महाबतखानास मेमध्ये परत बोलाविलें आणि मुअज्जमहि जूनमध्ये उत्तर हिंदुस्थानांत परत गेला. राहिलेले दिलेरखान किंवा बहादुरखान या मोगली सरदारांबद्दल कोणालाच तसा आदर वाटत नसल्यामुळे उगवत्या सूर्याची उपासना करणारे, शिवाजीराजांचा मामेभाऊ

जाधवराव व पूर्वपरिचित सिद्दी हिलाल वगैरे, शत्रूकडील लोक शिवाजीराजांना सैन्यासह येऊन मिळाले (सप्टें.-ऑक्टोबर). राजे देखील या अनुभवाने उत्तेजित होऊन आता सैन्यांत वाढ करून मोगलांना कायमचे काढून लावण्याच्या उद्योगाला लागले. पण मराठ्यांचें खजिन्याचें बळ तितकें पुरेसें नव्हतें. यामुळे राजांचीं हीं सैन्यें कोणत्याहि विशिष्ट कामगिरीवर न जातां शत्रूच्या मुलखांत लुटालूट करीत बहुधा फिरतीं राहिलीं.

या धामधुमींत जेव्हा शिवाजीराजांचें सैन्य मुंबईच्या आसपास घिरट्या घाली, तेव्हा इंग्रजांचें मन सुरतेप्रमाणेच मुंबईच्या सुरक्षिततेबद्दल साशंक होई. यामुळे मुंबईला तट बांधण्याची जलदी चालवून शिवाय सिद्दी व मोगल आरमार यांच्याशींहि त्यांनी सलोख्याचें धोरण ठेविलें. सुरतेकडून सिद्दीच्या कुमकेकरिता इ. १६७२ च्या ऑगस्टमध्ये मोगलांचें आरमार निघालें. तें शिवाजीराजांना भीत असल्यामुळे मुंबईच्या आश्रयाला राहूनच त्यांच्या मुलखाला उपद्रव करी. पण त्याला बंदी घालण्याचें धाडस इंग्रजांना करतां येत नव्हतें. इकडे राजांच्या मुलखांतून मिळणाऱ्या लाकूडफाट्याशिवाय इंग्रजांचें चालण्यासारखें नव्हतें. शिवाय, राजापूरच्या लुटीच्या (इ. १६६१ मार्च) नुकसानभरपाईचेंहि त्यांचें बोलणें राजांशीं चालू होतें. म्हणून राजांचेंहि मन त्यांना दुखवितां येईना. अशा दोन डगरींवर हात ठेवून त्यांचा कारभार चालू होता. परंतु मोगलांच्या आरमाराचा इंग्रजांना फार वाईट अनुभव आला. आणि ते त्याचा संपर्क टाळण्याची खटपट करूं लागले (इ. १६७३ एप्रिल). शिवाजीराजेहि त्यांना मोगलांना आश्रय दिल्याबद्दल धमकी देऊं लागले. परंतु या प्रकरणीं एकमार्गी धोरण इंग्रजांना पत्करावयास लावण्याचें शिवाजीराजांना जमलें नाही. सिद्दीच्या आरमाराशीं अर्थात् त्यांच्या चकमकी सुरूच राहिल्या. परंतु जमिनीवरील प्रश्नच अजून अनिर्णीत असल्यामुळे शिवाजीराजे आरमाराकडे वाटेल तितकें लक्ष देण्यास मोकळे झाले नाहीत.

शिवाजीराजांचें वाढतें सामर्थ्य पाहून इतरांप्रमाणेच डच व्यापाऱ्यांनी त्यांना नजराणा पाठविला तेव्हा त्यांच्याशीं राजांचा संबंध आला. त्या निमित्ताने पाश्चात्यांच्या आपसांतील चुरशीचा फायदा घेतां आल्यास घ्यावा असें शिवाजीराजांना वाटलें. मुंबईकर इंग्रज सिद्दीला मदत करतात.

तेव्हा डचांनी दंडाराजपुरी घेण्यास आपल्याला मदत केली, तर आपण त्यांना मुंबई जिंकून घेण्यास मदत करावी, असें एकदा राजांच्या मनांत आलें. परंतु डचांचें सामर्थ्य एवढ्या मोठ्या कामगिरीला पुरें पडलें नाही. या वेळीं शिवाजीराजांच्या हातून दंडाराजपुरीच्या सिद्दीचें किंवा पुढे पेशव्यांच्या हातून हैदराबादच्या निजामाचें उच्चाटन होऊं शकलें नाही, यांत त्यांच्या राजकारणी तत्त्वज्ञानाचा किंवा व्यावहारिक तंत्राचा कांही दोष होता असें नाही. अपेक्षित काम यशस्वी करण्यासाठी लागणारी स्वस्थता व परिस्थिति त्यांना अनुकूल नव्हती, हीच गोष्ट खरी आहे. परिस्थिति निर्माण करण्याचें काम राजांच्या काळांत राजांना सर्वस्वी एकट्याने करावें लागलें. या कामांत त्यांना हिंदुस्थानभर मोगलांच्या मागे ससेमिरा लावणारे त्यांच्यासारखे स्वराज्यभक्त बंडखोर हवे होते. आणि या सुमारास जेव्हा 'दिलकाश' या बखरींत वर्णन केल्याप्रमाणे चंपतराय बुंदेल्याचा मुलगा छत्रसाल, मोगलांची नोकरी सोडून, जाधवराव किंवा हिलाल यांच्याप्रमाणे आश्रयासाठी शिवाजीराजांकडे आला, तेव्हा त्यांनी त्याला गौरवून 'तूं आपल्या मुलखांत जा. तेथे बंड उभारून औरंगजेबाला सतावून सोड' असा उपदेश करून स्वदेशीं परत लावून दिलें. या गोष्टींत फार मोठें रहस्य साठविलेलें आहे. यापुढे आता त्यांना शत्रूच्या कोणाहि मोठ्या देखील सरदाराचें भय वाटेनासें झालें होतें. कडव्या दिलेरखानाचें ते पाणी जोखून बसले होते. आणि जहाल भाषणांनी औरंगजेबाला भुरळ घालून इ. १६७३ च्या जानेवारीच्या सुमारास दख्खनचा सुभेदार झालेल्या बहादुरखानाला तर ते 'पेंडीचें गुरूं' म्हणजे द्रव्याने वश होणारा लाचखाऊ म्हणूनच समजत होते. तात्पर्य, यापुढील वर्ष दीड वर्षाच्या (राज्याभिषेकाच्या पूर्वीच्या) मुदतींत त्यांना विजापूरकरांच्या आणि मोगलांच्या मुलखांतहि सर्व प्रकारच्या हालचाली निर्वेधपणें करण्यास मोगलांच्या फौजांचा कोठेच म्हणण्यासारखा विरोध झालेला दिसत नाही. हें पाहिलें म्हणजे या वेळीं बहादुरखानाला त्यांनी कोणती तरी युक्ति करून अगदी गप्प बसवून ठेविलें होतें, याबद्दल शंका राहात नाही.

साल्हेरच्या दणदणीत अपयशामुळे (पृ. १७०) चिडून जाऊन औरंगजेब आपल्या दक्षिणेंतील सेनापतींवर रागावला. "शिवाजीचे सर्व शत्रु आदिल, कुतुब, फिरंगी, हबशी व तुम्ही, एक होऊन शिवाजीचा मुलूख

काबीज करा. म्हणजे तो किल्ल्यांवर असा किती दिवस बसून राहील? आपोआप जेरीस येईल!" अशा अर्थाचा त्याने त्यांना निरोप पाठविला. त्याला बहादुरखान-दिलेरखान यांनी निराशेचें उत्तर पाठविलें. त्यांनी लिहिलें, "याचा कांही उपयोग व्हावयाचा नाही. कारण त्याच्या ताब्यांत एकाहून एक प्रबळ असे अनेक किल्ले आहेत; एवढेंच नव्हे, तर त्याच्या स्वतःच्या दुर्गम मुलखांतच शेकडों खंडी धान्य पिकतें. त्यामुळे आम्ही शंभर वर्षें अशी खटपट केली तरी देखील त्याला केवळ वेढा घालीत बसून जेरीस आणणें शक्य नाही. त्याच्याशीं तह करण्याशिवाय आम्हांला गत्यंतर दिसलें नाही. म्हणून तर आम्ही शिवाजीकडे एक ब्राह्मण वकील आधीच पाठविला आहे आणि त्याचा स्वीकार करून त्याने काजी हैदर नांवाचा मुसलमान वकील बोलणें करण्यासाठी आमच्याकडे पाठविला आहे. तरी तहाची आज्ञा व्हावी!" असा पत्रव्यवहार झाल्याचें इतिहासज्ञ जयराम कवीने नमूद केलें आहे. मात्र औरंगजेबाचा राग पाहून तहाचीं बोलणीं थांबवून मोगल सरदारांनी काजी हैदरला नांवापुरता बंदिवान करून परिंड्याच्या किल्ल्यावर ठेऊन दिला, असेंहि पुढे लिहिलें आहे. या वेळीं सर्व मोगली सेनापति मेटाकुटीला येऊन शिवाजीराजांशीं तह करण्यास अगदी उत्सुक झाले होते आणि केवळ औरंगजेबाच्या जरबेच्या दटावणीमुळे जरी राजरोस तह झाला नाही, तथापि तह करण्याशिवाय मोगलांना गत्यंतर वाटत नव्हतें. त्यामुळे अर्थात् उभयपक्षी, तह झाल्यासारखी वागणूक होण्याची मनःस्थिति होती असें बिनधोक म्हणतां येतें. दुर्दैवाने औरंगजेबाच्या हटवादामुळे प्रत्यक्ष तह असा कधीच झाला नाही आणि शिवाजीराजांच्या मागचा हा ससेमिरा तसा चुकला नाही. यामुळे युद्धातून लक्ष काढून सुव्यवस्था आणि सुराज्य स्थापण्याचा शांततेचा विजय संपादण्याची ही योग्य वेळ असूनहि तशी संधी राजांना अगदी थोडी मिळाली.

* * *

१६ दक्षिणेंतील वर्चस्व

दोन सुलतानांचा मृत्यु

एवढ्या मोठ्या मोगली सत्तेला शिवाजीराजांना चिरडून टाकण्याचीं आपलीं स्वप्नें विसरून त्यांच्याशीं तह केल्याशिवाय आपला निभाव लागणार नाही असें वाटूं लागावें, हेंच राजांच्या अद्वितीय पराक्रमाचें गमक होय. त्यावरून इतर सत्ताधीशांच्या बरोबरीने राजा म्हणून घेण्याची त्यांची पात्रता सिद्ध झाली आणि त्यांचें दख्खनमधील वर्चस्व निःसंशय मान्य करण्यासारखी परिस्थिति आली. अलीकडे बरेच दिवस दक्षिणेंत आदिलशाही व कुतुबशाही ह्या दोन्ही शाह्यांशीं राजांचे सलोख्याचे संबंध होते. आणि त्याच्याच विश्वासावर त्यांनी आक्रमणाचा हट्ट चालविणाऱ्या एकट्या मोगलांची कुरापत काढून त्यांना ठिकाणावर बसविण्याचा एवढा मोठा उद्योग तीन वर्षें चालविला व त्यांत नांव घेण्यासारखें यश मिळविलें. सर्व कांही सुरळीत चाललें असतें तर राजांना राज्याभिषेक यानंतर लगेच होण्यासारखी अनुकूल परिस्थिति आली होती असें म्हणतां येतें. परंतु शिवाजीराजांच्या नव्या स्वतंत्र राजसत्तेचा खुंटा राज्याभिषेकाच्या आधीं थोडा हालवून बळकट व्हावयाचा होता. दक्षिणेंतील जुन्या दोन्ही शाह्यांचे सुल्तान एकामागून एक मृत्यु पावले. आणि त्यामुळे ती घटना थोडीशी लांबली. कारण त्या वेळचें राजकारण हें बहुतांशीं व्यक्तिप्रधान असल्यामुळे बदललेल्या सत्ताधीशांकडून आपल्या वर्चस्वाला पूर्ववत् मान्यता मिळविण्याच्या कामीं फिरून राजांना लक्ष पुरवावें लागलें. पैकी कुतुबशाहीचा प्रश्न अगदी सोपा ठरला. परंतु कुतुबशाहीहून नजीकच्या आणि शहाजीराजांपासून जुने विरोधी संबंध असलेल्या आदिलशाहीच्या बाबतींत मात्र फिरून एकवार झगडाच करून शिवाजीराजांना आपलें वर्चस्व सिद्ध करून घ्यावें लागलें.

मोरोपंत पेशवे इ. १६७२ च्या फेब्रुवारींत साल्हेरच्या किल्ल्याजवळ मोगलांवर फार मोठा विजय मिळवून परत आले आणि जेव्हा रायगडावर सर्वांना जमवून शिवाजीराजांनी पुढील चारसहा महिन्यांतील मोहिमांचा आराखडा ठरविला, त्याच संधींत म्हणजे इ. १६७२ एप्रिल २१ रोजीं गोवळकोंड्याचा सुलतान अब्दुल्ला कुतुबशाह मृत्यु पावला आणि त्याचा जावई तानाशाह हा अबुल हसन असें नांव घेऊन गादीवर बसला. हा बदल होत असतां आपलें तेथील वर्चस्व कमी होऊं देणें राजांना इष्ट नव्हतें. म्हणून त्यांनी लगेच मे २१ ला 'राजश्रीचे हेजीब' (वकील) नीराजीपंत यांस भागानगरास पाठवून पूर्वींचा सलोख्याचा तह व दरसाल एक लक्ष होन घेण्याचा जुना करार होता, तो कायम करून घेतला. त्यापैकी सासष्ट हजार होन तानाशाहाने लगेच दिले. ते घेऊन नीराजी परत आला. चालू परिस्थितीमध्ये शिवाजीराजांना मिळेल तेवढा खजिना पाहिजेच होता.

आदिलशाहीवर झडप

राजांची मोगलांवर चढाई चालू होती तेव्हा अल्ली आदिलशाहा विजापुरांत आजारी पडला होता. त्याच्या हयातींत दबून राहिलेल्या पक्षोपपक्षांस ऊत येऊन आदिलशाहीचें सामर्थ्य बहुतेक निकामी झालें होतें. अल्ली आदिलशाहा असेतोंपर्यंत, खंडणी देऊन वगैरे शिवाजीराजांशीं एकंदरींत जो त्या दरबारचा सलोखा असे, त्यांत व्यत्यय आला नाही. अधूनमधून मोगलांकडून राजांविरुद्ध चाललेल्या युद्धांत सैन्याची कुमक मागण्यांत येई आणि प्रसंग पाहून अल्ली आदिलशाहा थोडीबहुत फौज नाइलाजाने त्यांच्याकडे पाठवीतहि असे. परंतु तें सारें वरवरचें होतें हे साऱ्या जगाला माहीत होतें. पण इ. १६७२ नोव्हेंबर २४ रोजीं अल्ली मेला. त्याने दूरदर्शीपणाने करून ठेविलेली सुव्यवस्थेची कांही तरतूद अमलांत आली नाही. त्याचा पांच वर्षांचा अल्पवयी मुलगा सिकंदर हा आदिलशाही तख्तावर बसला व नाकर्ता हबशी सरदार खवासखान याच्या हातीं राज्याचीं सूत्रें गेलीं.

यापूर्वी सुमारें १२ वर्षें धिमेपणाने कारभार करून ज्याने आदिलशाही टिकविली होती, तो मुख्य कारभारी अब्दुल महंमद विजापुरांतील लाथाळीमुळे दूर झाला होता. तेव्हा आता विजापुरांतील

दूरदर्शीपणाचा अंत होऊन यापुढे आदिलशाही कोणत्या क्षणाला औरंगजेबाच्या आहारीं जाईल याचा नेम नाही, हें राजांनी ओळखलें. आणि आता आपणच पुढे झालें पाहिजे असें मनाशीं ठरविलें. ह्या विजापूरच्या राज्याच्या संवर्धनासाठी आपले वडील शहाजीराजे यांनी फार कष्ट केलेले आहेत; तेव्हा तें राज्य शत्रूच्या भक्ष्यस्थानीं पडून आपल्या अडचणी वाढूं देण्यापेक्षा तें राज्य आपणच जिंकलेलें बरें, असा राजांनी विचार केला. आणि नेहमीप्रमाणे त्वरेने निर्णय ठरवून, आपला विजापूर दरबारांतील वकील बाबाजी नाईक पुंडे यास परत बोलाविलें (इ. १६७२ डिसें. २९); म्हणजेच विजापूरकरांवर युद्ध पुकारलें. आदिलशाहींतील बालनायकीचा फायदा घेऊन आपले युद्धाचे बेत त्यांनी ताबडतोब अमलांत आणले.

या वेळीं दसऱ्यापासून म्हणजे सप्टेंबरपासून बाहेर पडलेले राजांचे सेनापति प्रतापराव व आनंदराव हे वऱ्हाडांत (=मोगलाईंत) व तेलंगणांत (=कुतुबशाहींत) स्वारीवर गेलेले होते. त्यांनी तो उद्योग सोडून एकदम आदिलशाहीवर चालून यावें असा त्यांना राजांनी निरोप पाठविला आणि प्रथम पन्हाळ्याचा किल्ला घेण्याचा बेत केला. हा मोक्याचा किल्ला मागे एकदा हातांत येऊन पुनः आदिलशाहाला द्यावा लागला होता (इ. १६६०), आणि जयसिंगाबरोबरच्या स्वारींत तर तो घेतांच आला नव्हता (इ. १६६६, पृ. १३५). तो या वेळीं घेऊन आपल्या राज्याची दक्षिण सरहद्द भक्कम करण्याचें राजांनी योजिलें. पन्हाळा घेण्याची कामगिरी राजांनी अण्णाजी दत्तो व कोंडाजी फर्जंद प्रभृति दोनचार लोकांवर सोपविली. ती त्यांनी महिना दीड महिना तयारी करून रात्रीं अंधारांत माळेच्या साह्याने किल्ल्यावर चढून जाऊन पार पाडली. त्यांच्याबरोबर फक्त ६० लोक होते. आणि भेद यशस्वी होऊन जेव्हा ते वर जाऊन पोंचले आणि तेथील लोक सावध होऊन त्यांच्यावर चालून आले, तेव्हा किल्लेदारासह कांही लोक गारद करणें त्यांना मुळीच कठीण गेलें नाही. कांही अधिकारी पळून गेले आणि इतर कांही कैद झाले. अशा रीतीने बारातेरा वर्षांनी फिरून पन्हाळा किल्ला शिवाजीराजांच्या हातीं आला (इ. १६७३ मार्च ६). अण्णाजी पंडिताने ही आनंदाची बातमी रायगडावर राजांना कळविली. ती पोंचण्यास दोन दिवस लागले. ती कळतांच शिवाजीराजे निघाले आणि प्रतापगडावर एक दिवस घालवून चौथ्या पांचव्या दिवशीं पन्हाळ-

गडावर येऊन पोंचले. तेथे महिनाभर राहून त्यांनी किल्ल्याचा उत्तम बंदोबस्त करून विजापूरकरांवरील मोहिमेचें मार्गदर्शन केलें.

पन्हाळा हातचा गेल्याची बातमी ऐकून विजापूर दरबारांत खळबळ उडाली आणि सर्वांनी मिळून विचार करून आपला नामांकित सेनापति बहलोलखान याच्या नेतृत्वाखाली राजांवर सैन्य पाठविलें. बहलोल विजापुराहून निघून तिकोट्यावरून उंब्राणीवर येऊन पोंचला आणि त्याला रांगणा, अदवानी, कर्नोल वगैरेकडून आणखी सैन्य येऊन मिळावें म्हणून खवासखानाने हुकूम काढून शिवाय मोगली सरदार दिलेरखान याच्याकडेहि फौजेची मागणी केली. हें राजांना कळलें. तेव्हा बहलोलखानाला दुसरीं सैन्यें येऊन मिळण्यापूर्वी त्याच्यावर आपण हल्ला करावा, म्हणून त्यांनी प्रतापराव व आनंदराव यांची तातडीने रवानगी केली. ते रातोरात गुप्तपणें मजलीवर मजल मारून, बहलोलखान उंब्राणीनजीक तळयाच्या जवळ राहिला होता तेथे गेले, आणि त्यांनी त्याच्या ध्यानांत येण्यापूर्वीच सर्व बाजूंनी वेढा घालून आणि शर्थीचें युद्ध करून, त्याची पुरती दाणादाण उडविली (इ. १६७३ एप्रिल). तीन प्रहरांपेक्षा अधिक वेळ, जवळ जवळ सूर्य मावळेपर्यंत, युद्ध चाललें. शत्रूचे बरेच लोक मेले, एक हत्ती पाडाव झाला व अनेक कैदी मिळाले. अखेरीस बहलोलखानाने शरणागति पत्करून पुनः मराठ्यांच्या वाटेस न जाण्याचें कबूल केल्यामुळे प्रतापरावाने त्यास जाऊं दिलें.

नंतरचें बहलोलखानाचें वर्तन पाहिलें म्हणजे त्याने या वेळीं केवळ लबाडीने आपली सुटका करून घेतली, आणि वचन दिलें तें पाळण्याचा त्याचा विचार नव्हता, असें सिद्ध होतें. आणि यामुळे प्रतापरावाने त्यालाहि इतरांबरोबर कैद केलें नाही ही त्याची चूक झाली, असें म्हणावें लागतें. या चुकीचा परिणाम पुढे मराठ्यांना आणि खुद्द प्रतापरावालाहि भोगावा लागला; स्वतःच्या प्राणाला मुकावें लागलें. पण या वेळी मराठ्यांना खानाच्या समृद्ध सैन्यापासून बरीच लूट मिळाली.

आदिलशाहीवरील चढाईचा असा चांगला आरंभ झाला आणि मग तिच्या सर्व मुलखांत शिवाजीराजांचीं सैन्यें संचार करूं लागलीं. एका सैन्याने एप्रिल १ ला परळीचा किल्ला घेतला आणि थोड्याशा लढाईनंतर,

वेढा घालून जुलै २७ पर्यंत सातान्याचा किल्ला जिंकून घेतला आणि आदिलशाहींतील या मध्यवर्ती आणि महत्त्वाच्या किल्ल्यावरून अमर्याद लूट बैलांवर लादून रायगडास नेली. उंब्राणीच्या युद्धानंतर प्रतापरावाचें सैन्य पुढे धारवाड, हुबळी या बाजूला लूट करण्यासाठी गेलें. त्याने हुबळीची इंग्रजांची वखार लुटली (इ. १६७३ एप्रिल १६) आणि सात-आठ हजार होनांचा माल नेला. प्रतापराव गुजराने थेट वखारीवर प्रथम हल्ला केला व पुरुषभर खोल भुई खणून द्रव्याचा शोध केला. त्याच्या बरोबर बरेंच सैन्य होतें. परंतु इतक्यांत मुझफरखान पाटलाग करीत आल्यामुळे या वेळीं कारवारकडील स्वारीचा बेत सोडून देऊन प्रतापरावास तेथून निघून जाणें भाग पडलें. इकडे बहलोलखानहि उंब्राणीला झालेली आपली दशा आणि शरणागतीचें बोलणें विसरून, नवी कुमक मिळवून, पन्हाळयाच्या नजीक कोल्हापूरच्या आसपास छावणी करून राहिला. तेव्हा नुकताच ताब्यांत आलेला पन्हाळा पुनः आपल्या हातून जाऊं नये म्हणून, व पावसाळ्यानंतर बहलोलखानाला पुनः शक्य तर मराठ्यांचें पाणी दाखवितां यावें म्हणून, शिवाजीराजेहि आपल्याकडून तयारी करीत राहिले. मध्यंतरीं त्यांचें पांच-सहा हजार सैन्य कारवारकडे जाऊन त्याने मेच्या मध्यानंतर गोव्याजवळील एक किल्ला घेतला. परंतु कोल्हापूरला छावणी करून राहिलेल्या बहलोल-खानाच्या दाबामुळे राजांना या संधींत अधिक कांही करतां आलें नाही.

इंग्रजांची नुकसानभरपाई

इ. १६६१ मार्चमध्ये राजांच्या लोकांनी इंग्रजांची राजापूरची वखार लुटल्यापासूनचे परस्परांचे संबंध कसकसे राहिले हें वेळोवेळीं सांगितलें आहे. त्या वेळीं तेथील इंग्रजांना राजांनी कैद केलें व ती वखार उटली. हे इंग्रज कैदी दोन वर्षांनी सोडून दिल्यावर वखारीचा कांही विचार व्हावयाचा; परंतु ते वखारीबद्दल बोलणें न करतांच राजापुराहून जवळ जवळ पळूनच गेले आणि गोव्याला जाऊन तेथून धमक्या देऊं लागले!

अशा धमक्यांना कोण भीक घालणार? त्यानंतर अनेक घडामोडी झाल्या. नंतर शिवाजीराजे आग्र्याहून सुटून आले, आणि मध्यंतरीं इंग्रजहि मुंबईला शेजारीं येऊन स्थायिक झाले (इ. १६६६). आसपासच्या मोगली मुलखावर आता राजे सूड घेणार हें लोकांनी गृहीतच धरलें. तेव्हा त्यांच्या शेजारीं राहावयाचें असल्यामुळे आपण त्यांच्याशीं सलोख्याने राहणें बरें, असें इंग्लंडांतून कंपनीने आपल्या लोकांना लिहून पाठविलें. इकडील स्थायिक इंग्रज मात्र राजापूरच्या नुकसानीची भरपाई राजांनी करावी म्हणून त्यांच्यावर दबाव आणण्यासाठी त्यांच्या गलबतांना पास देतांना वगैरे बारीकसारीक कुरापती काढीत. त्यांचीं गलबतें अडकविण्याचा विचारहि बोलत. परंतु त्यांचें सामर्थ्य पुरें पडत नसे. इंग्रज आपणाला मोगलांविरुद्ध दारूगोळा वगैरे कांही पुरवितील तर तो राजांना हवा होता. परंतु तें इंग्रजांना परवडण्यासारखें नव्हतें. पुढे राजांचें मोगलांशीं युद्ध चालू झालें आणि मुंबईच्या आसपासचा मुलूख राजांच्या ताब्यांत असल्यामुळे इंग्रजांच्या दृष्टीने त्यांनी राजांशीं सलोखा राखण्याला महत्त्व आलें. कारण मुंबईकर इंग्रजांना त्या वेळींहि आताच्याप्रमाणे सर्पण व अन्नधान्यें वगैरेच्या पुरवठ्याकरिता आसपासच्या म्हणजे राजांच्या मुलखावरच अवलंबून राहावें लागे. या वेळीं सुरतेंतील त्रास वाटूं लागल्यामुळे सुरत सोडून मुंबईकडेच कायमचें यावें असा विचार इंग्रजांच्या मनांत बळावत होता. सुरतेच्या दुसऱ्या लुटीच्या वेळीं भेटलेल्या राजांच्या अधिकाऱ्याने इंग्रजांनी राजापुरास फिरून येण्यास हरकत नाही असेंहि आपल्याला सुचविल्याचें इंग्रजांनी नमूद केलें आहे. प्रसंगाप्रसंगाने अर्थात् या बोलण्याला तेजी आली. अनेक वेळा वकील आले व गेले. शेवटीं इ. १६७२ एप्रिल-मेमध्ये उस्टिक रायगडला गेला, तेव्हा राजांचें मोगलांशीं जोरांत युद्ध चालू असल्यामुळे, त्याच्याशीं फक्त अर्धा तास बोलणें झालें. नुकसानभरपाईबद्दल ५००० होन व राजापूरला वखार उघडली तर सर्व प्रकारची सहानुभूति देण्याचें वचन, एवढें त्यांतून निष्पन्न झालें. इंग्रजांनी यावर खूप भवति न भवति केली. एकमेकांच्या प्रतिनिधींमध्येहि वाटाघाटी झाल्या. एकंदर तानमान पाहण्यासाठी व शिवाजीराजांच्या मुलखाशीं युरोपचा व्यापार वाढवावयाचा तर माल व दळणवळणाचीं साधनें कोणतीं आहेत याची पाहणी करण्यासाठी, टॉमस निकल्स या निरीक्षकाची

योजना करण्यांत आली (इ. १६७३ एप्रिल १८). पण अखंड चालणाऱ्या युद्धाच्या धुमश्चक्रीमुळे फारसें सूत जमलें नाही. इतक्यांत राजांच्या सैन्याने इंग्रजांची हुबळीची वखार लुटली. राजापूरच्या जोडीला त्याबद्दलचीहि भरपाई मागण्याचा ठराव इंग्रजांनी ताबडतोब केला. आणि या वेळीं राजापूरप्रमाणे दिरंगाई व्हायला नको म्हणून पाहणी व नुकसान-भरपाईचा तह अशा दोन्ही गोष्टींकरिता निकल्सला मे महिन्यांत राजांकडे रवाना करण्यांत आलें. या वेळीं भरपाईच्या हिशेबांत उपयोगी पडावें म्हणून राजापूरचें एक मराठ्यांचें गलबत इंग्रजांनी मुंबईत अडकवून ठेविलें. त्यामुळे राजांवर दडपण पडेल अशी त्यांची अपेक्षा होती. पण राजांनी त्याची मुळीच फिकीर केली नाही. आणि निकल्सशीं बोलतांना त्यांनी कोणतीच गोष्ट आपल्या अंगीं लावून घेतली नाही. हुबळीच्या लुटीबद्दल बोलतांना राजे म्हणाले, "शत्रूच्या देशांत मीं न्याय्य युद्ध केलें आणि शत्रूचा मुलूख लुटला. त्यांत इंग्रजांचा माल लुटला गेला असेलहि. पण त्याबद्दल आपणच एकटे जबाबदार आहों असें मला वाटत नाही." "कदाचित् त्या गोंधळांत स्थानिक सैन्यें व स्थानिक लोक यांनीच ही लूट केली नसेल असें कशावरून?" असेंहि त्यांनी विचारलें. आणखी वर मित्रत्वाच्या नात्याने म्हणून त्यांनी निकल्सला असें सांगितलें की, "पावसाळा संपतांच मोगलांशीं मोठी निकराची लढाई देण्याचा माझा विचार आहे. याकरिता दख्खनमध्ये तुम्ही आता आपल्या व्यापाराचा पसारा ठेवूं नये." अशा रीतीने हें भरपाईचें बोलणें पुढेहि रेंगाळत सुरू राहिलें. राजकारणाच्या मुख्य प्रवाहावर त्याचा परिणाम होणें फारसें शक्य नव्हतें. पण पुढच्या काळांत प्रबल झालेल्या इंग्रजांच्या सत्तेशीं आरंभीं आरंभीं शिवाजीराजांच्या आलेल्या संबंधाचा एक नमुना म्हणून तें ध्यानांत घेण्यासारखें वाटतें. मागे एका ठिकाणीं पोर्तुगीजांचे संबंध वर्णिले आहेत त्याच्याशीं या वागणुकीची तुलना करून पाहावी. शिवाजीराजे इंग्रजांना पोर्तुगीजांच्या मानाने फारसें महत्त्व देत नव्हते असें दिसतें.

राज्याभिषेकापूर्वीचें एक वर्ष

इ. १६७० च्या आरंभीं सिंहगडापासून सुरुवात करून शिवाजीराजांनी मोगलांवर हत्यार उगारलें. तेव्हापासून त्यांची एकसारखी चलती

चाललेली पाहून धास्ती खाल्लेल्या सर्व सत्तांनी, त्यांच्या राज्याभिषेकाला जणू अपशकून करण्यासाठी, त्यांना संगनमताने विरोध करण्याची एक फार मोठी योजना आखली आहे, अशी इ. १६७३ च्या सप्टेंबरांत बातमी उठली. विजापूरच्या बहलोलखान पठाणाचा पक्ष मोगलांना अनुकूल असल्यामुळे मोगल आणि विजापूरकर या दोघांनी शिवाजीराजांवर एकदम दोन्हीकडून हल्ले करण्याचें ठरविलें. उत्तरेकडे बहादुरखान व दिलेरखान जमिनीच्या बाजूने शिवाजीला कोंडणार होते; तर किनाऱ्याच्या बंदरांवर छापे घालण्याचें काम सिद्दी संबूळचें आरमार करणार होतें; आणि बहलोलखान दक्षिणेकडची आघाडी सांभाळणार होता. या योजनेप्रमाणे मोगलांनी कांहीच केलें नाही. बहलोलखानाने मात्र आपला हट्ट पुढे चालविला. आणि त्याचें प्रायश्चित्त विजापूरकरांना भोगावें लागलें.

बहलोलखान कोल्हापूरजवळ छावणी करून होता. तो नुकत्याच (मे महिन्यांत) शिवाजीराजांनी गोव्याकडे केलेल्या स्वारीचें उट्टें काढण्याकरिता सप्टेंबरांत कोकणांत उतरला. त्याने राजांचें राजापूरनगर घेतलें व तेथे बंदोबस्त करून तो त्यांच्या पुढच्या हालचालीची वाट पाहात राहिला. परंतु राजांनी तिकडे लक्ष दिलें नाही आणि आपला उद्योग चालू ठेवला. साताऱ्याकडे सैन्य पाठवून दसऱ्यापूर्वी तीन दिवस त्यांनी वाईजवळील पांडवगड जिंकून घेतला. नंतर रायगडाहून दसऱ्याला स्वारी काढून वाटेंत साताऱ्याला एक दिवस राहून पुढे त्यांचें सैन्य जें सटकलें तें त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने एकदम दूर कर्नाटकांत बंकापूरला जाऊन दाखल झालें (इ. १६७२ ऑक्टो.) आणि त्याने तें शहर लुटलें. परंतु आसपास पाठविलेल्या विठोजी शिंदे याच्या तुकडीची चंद्रगडाजवळ सर्जाखानाशीं गांठ पडून झालेल्या चकमकींत ऑक्टोबरच्या अखेरीस विठोजी शिंदे पडला. पण एका महिन्यानंतर पन्हाळ्याच्या आसपास घिरट्या घालणाऱ्या त्याच सर्जाखानाशीं गांठ घालून राजांकडील महिमाजी शिंदे याने त्याला मारून विठोजी शिंद्याच्या मरणाचा बदला घेतला. बहलोलखान प्रथम कोकणाकडे गुंतून पडला आणि नंतर महिना दोन महिने आजारामुळे मिरजेंत राहिला. यामुळे त्याच्या मुख्य सैन्याकडून अपेक्षेप्रमाणे राजांच्या सैन्याला प्रतिकार झाला नाही व त्यांचा संचार विरोधाशिवाय चालू राहिला. राजांचें एक सैन्य महाडकडे मोगलांवर

आणि सिद्दीवर नजर ठेवीत होतें, दुसरें साताराकडे व तिसरें बंकापूरकडे होतें. हें तिसरें मुख्य सैन्य बहुधा राजांच्या स्वतःच्या नेतृत्वाखाली आणखी पुढे कर्नाटकांत बेदनूरच्या विधवा राणीला मदत करण्यासाठी आणि साधल्यास मागे फिरून फोंड्याचा किल्ला घेण्याच्या कामगिरीवर गेलें होतें. शिवाजीराजे डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यांत कारवारपासून दीड दिवसाच्या मुक्कामावर कुदरा येथे होते व त्यांचें बहुतेक सैन्य हुबळीकडे होतें. अशा प्रकारें जवळजवळ तीनचार महिने २५०० सैन्यासह विजापूरकरांच्या मुलखांत काढून व अर्थात् पुरेशी लूट मिळवून, शिवाजीराजे समाधानाने रायगडावर परतले.

मध्यंतरीं बहलोलखान बरा होऊन त्रासदायक हालचाली करूं लागला. उंब्राणीच्या लढाईत प्रतापरावाने बहलोलखानाला जीवदान दिलें होतें. ते उपकार तो विसरला आणि उलट पुन्हा पुन्हा राजांच्या मार्गांत आड येऊं लागला. तेव्हा 'त्याला एकदा साफ बुडवा, नाही तर मला तोंड दाखवूं नका' असा कडक हुकूम प्रतापरावाला राजांनी केला. आपल्या उंब्राणीच्या चुकीची दुरुस्ती करण्याच्या ईर्षेने प्रतापरावाने मग कोल्हापूरच्या दक्षिणेस चाळीस मैलांवर नेसरी येथे खिंडींत बहलोलखानाला गांठलें. पण तेथे उतावळीने फक्त सहा स्वार बरोबर घेऊन तो शूर सेनापति अविचाराने पुढे घुसल्यामुळे अडचणींत सापडला आणि चकमकींत पडला (इ. १६७४ फेब्रु. २४). मुख्य सेनापतीच्या मृत्यूची ही आपत्ति फार मोठी होती. म्हणून शिवाजीराजे स्वतःच कुडाळपर्यंत जाऊन सैन्याची व्यवस्था पाहणार होते. परंतु प्रतापरावाबरोबर हरएक युद्धांत भाग घेऊन त्याला साथ देणारा आनंदराव म्हणून दुय्यम सेनापति होता, तो लगेच पुढे झाला व त्याने बहलोलखानाचा जोराने पाठलाग करून आलेला प्रसंग सावरला. पुढे मोगलांचा सेनापति दिलेरखान बहलोलखानाच्या मदतीला येत आहे असें पाहून, आनंदराव रोज ४५ मैलांच्या मजला मारीत खाली कानड्याकडे निसटला. त्याचा थोडा वेळ पाठलाग करून मग ते शत्रूचे दोघेहि सेनापति परत फिरले. तेव्हा आनंदरावाने बंकापुराकडे जाऊन (इ. १६७४ मार्च २३) बहलोलखानाच्या स्वतःच्या जहागिरींतील संपगांवाची पेठ लुटली व ३००० बैलांवर लादण्याइतकी लूट मिळविली. प्रतिकारार्थ आलेल्या खिदरखानाचा तो सहज पराजय करूं शकला आणि पुढे अधिक लूट मिळ-

विण्याकरिता बालाघाटांत निघून गेला व तिकडून यशस्वी होऊन परत आला. आपली डाळ कोठेच शिजत नाही हें आतां राजांचा मोड करण्यासाठी उतावीळ झालेल्या बहलोल आदिकरून लोकांच्या ध्यानांत आलें आणि ते त्यांच्याशीं तह करण्याचा विचार करूं लागले. अनेकवार वकील आले व गेले, परंतु मोगल व विजापूरकर यांना एकमेकांची भीड तोडवेना आणि तहाचीं कलमें ठरत ना, असें झाल्यासारखें दिसतें. आता मोगल व विजापूरकर या दोघांहि शत्रूंच्या खुद्द रणांगणावरील सेनापतींनी हात टेकले होते; पण दूर राजधानींत बसून मनांत मांडे खाणाऱ्या सत्ताधाऱ्यांना मात्र ती गोष्ट मान्य करण्यास लाज वाटत होती. त्यांनी वस्तुस्थितीकडे लक्ष दिलें असतें तर सर्वांनाच हितकर असा तह यापूर्वीच झाला असता आणि प्रजेला आणि राज्यकर्त्यांनाहि शांतता लाभली असती. परंतु तशी रास्त भूमिका मात्र कोणींच घेतली नाही.

प्रतिकाराची धार मंदावली

अशा परिस्थितींत राजांना होणाऱ्या प्रतिकाराची धार यापुढे पूर्वीप्रमाणे तीव्र राहणें शक्य नव्हतें. अर्थात् अनपेक्षित जिवावरचीं संकटें आणि त्यांतून सुटकेचे लोकोत्तर प्रसंग आणि जबरदस्त सेनापतींच्या मगरमिठींतून बाहेर पडण्याचे कल्पनातीत युद्धनैपुण्याचे नमुने आरंभीं आरंभींच्या राजांच्या चरित्रांत फार आढळतात, तसे ते पुढच्या चरित्रांत आढळत नाहीत. ती उत्कट चमक या पुढच्या चरित्रांत नाही. तरी देखील राजांचा कोणताहि शत्रु परिस्थितीने दिलेला कौल समंजसपणें मान्य करावयास तयार नव्हता आणि राजांच्या पाठीमागचा ससेमिरा तसा कमी झाला नव्हता. दक्षिणेकडे विजापूरकरांचा सरदार बहलोलखान नेसरीकडे जोर करीत असतांनाच उत्तरेकडे मोगली सरदार दिलेरखानहि जोर करूं लागला. परंतु त्याची गय न करतां राजांनी त्याचा पक्का मोड केला, त्याचे हजार पठाण कापून काढले व त्याला गप्प बसविलें (इ. १६७४ फेब्रु.). सुमारें दोन महिन्यांनी मोगलांचा दुसरा सरदार बहादुरखान सैन्य घेऊन कोकणांत उरण्यासाठी आला. परंतु राजांनी ठिकठिकाणीं डोंगरांतील घाट बंद पाडून अवघड ठिकाणीं जबर पहारे ठेवून दिल्यामुळे, त्याला परत जाणें भाग पडलें. आणि मोगलांचा हाहि प्रयत्न निकामी झाला (इ. १६७४ मार्च-एप्रिल).

इतक्यांत खैबर घाटांतील अफगाणांचें बंड मोडण्याकरिता दिलेरखानाला उत्तरेंत बोलावून नेण्यांत आलें. आणि मग ‘पेंढीचें गुरूं’ प्रवृत्तीचा एकटा बहादुरखान तेवढा दक्षिणेंत राहिला.

कोकणामध्ये देखील सिद्दी व शिवाजीराजे यांचें भांडण रेंगाळत चालू होतें. मुंबई बेटांत इंग्रजांच्या आश्रयाला राहून, राजांचें सैन्य जेथे नसेल तेथे सिद्दी त्यांच्या मुलखाला त्रास देई आणि त्याच वेळीं आपले आश्रय-दाते मुंबईकर इंग्रज त्यांनाहि तसेंच सतावून सोडी ! शिवाजीराजे आणि सिद्दी या दोघांचा आपसांत तह व्हावा अशी इंग्रजांची फार इच्छा होती. राजापूरच्या भरपाईबद्दल वगैरे बोलणें करण्यासाठी जे वकील राजांकडे गेले, त्यांच्याकरवीं त्यांनी हा विषय काढविला असतां, राजांनी सिद्दीबरोबर तह करण्याला स्पष्ट नकार दिला व त्याचें पक्कें पारिपत्य करण्याची इच्छा दर्शविली. एकदा मार्च-एप्रिलांत राजांच्या आरमाराची सिद्दी संबूळच्या आरमाराशीं सावित्रीच्या (साटवली) खाडींत समोरासमोर लढाई झाली. तींत सिद्द्याचा पराजय झाला व त्याला हरेश्वरकडे पळून जावें लागलें. एकंदरींत थोडासा स्वस्थपणा मिळतांच सिद्दीचा पक्का बंदोबस्त करावा अशी उमेद राजे बाळगून होते. आणि त्या कामीं उपयोगी पडावे म्हणून, अधलेमधले घ्यावयाचे राहिलेले किंवा हातांतून गेलेले केळंजासारखे कांही किल्ले स्वाधीन करून घेण्याचा राजांच्या सैन्याचा उद्योग सतत चालू होता.

शिवाजीराजांशीं सलोखा होण्याची इंग्रजांची आशा या सर्व वर्षभर कायम होती. राजांच्या ताब्यांत सर्व कोकणपट्टी आल्यामुळे तिकडील बंदरांत व्यापार करावयास मिळेल म्हणून ते आनंदांत होते. त्यांतून राजे देखील मुंबईकरांच्या मुलखांत आपल्या देशांतील व्यापाऱ्यांच्या वखारी थाटण्यास अनुकूल होते. नारायण शेणव्याच्या मार्फत शेवटीं (इ. १६७४ एप्रिल) तहाचीं कच्चीं कलमें ठरलीं व ऑक्झेंडेनबरोबर मोठा नजराणा देऊन शेवटचा मसुदा ठरविण्यासाठी त्याला राजांकडे पाठवावें असें ठरलें. या वेळीं शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक होण्याचें घाटत असल्यामुळे नजराण्यांत उगाच घोडा वगैरे औपचारिक वस्तु नसाव्या, तर राज्यारोहणप्रसंगाला साजेशीं उपयुक्त अशीं मूल्यवान् रत्नें वगैरे असावीं, अशी नाजूक सूचना शिवाजीराजांचा हुशार वकील नीराजी रावजी याच्यामार्फत गेली. आणि

त्याच वेळीं तुम्ही सिद्द्याशीं स्नेह ठेवाल तर तहबिह आपण कांहीच करणार नाही, अशीहि धमकी राजांनी इंग्रजांना दिली. "सिद्द्यास तुम्ही मुंबई बंदरांत जागा दिली तर मी तुमच्याशींहि युद्ध करीन. बादशाही आरमार जाळण्याचा प्रयत्न करीन. आणि मुंबई बेट घेण्याकरिता डचांना दहा हजार सैन्याची कुमक करीन" असें त्यांनी इंग्रजांना खडसावून बजावलें. तात्पर्य, इंग्रज, डच, सिद्दी, मोगल, विजापूरकर व पोर्तुगीज अशा सर्वांना पुरून उरण्याइतकें सामर्थ्य आता शिवाजीराजांच्या अंगांत आलें. अशा आत्मविश्वासाने शिवाजीराजे मार्चमध्ये रायगडास येऊन दाखल झाले. आणि वरील कोणत्याहि सत्तेने त्यांच्याशीं सलोख्याचा स्पष्ट तह केला नसतांना, म्हणजे एक प्रकारें सर्वांशींच युद्धाची परिस्थिति असतांना देखील, ते निर्धास्तपणें आपला राज्याभिषेक-समारंभ आणि त्यांतले सर्व धार्मिक विधि यथासांग व स्वस्थपणें करायला लागले. म्हणजे त्यांच्या चार वर्षांच्या चढाईमुळे त्यांना आता दक्षिणेंतील निरपवाद वर्चस्व मिळालें.

पण शिवाजीराजांनी मार्चपासूनचा सर्व वेळ केवळ रायगडला बसून किंवा राज्याभिषेकाच्या धर्मकार्यांत घालविला नाही. एप्रिल ८ रोजीं राजे चिपळूण येथे जमा झालेल्या लष्कराची पाहणी करण्याकरिता मुद्दाम गेले. आणि तेथे मोठ्या समारंभाने त्यांनी हंबीरराव मोहिते याला प्रतापरावाच्या मृत्यूमुळे मोकळी पडलेली सरनौबती म्हणजे मुख्य सेनापतिपद सांगितलें. नेसरीच्या युद्धानंतर प्रतापरावाच्या मृत्यूमुळे झालेली हानि आपल्या प्रसंगावधानाने व पराक्रमाने भरून काढल्याबद्दल राजांनी आधीच आनंदराव मोहिते याला हंबीरराव हा गौरवाचा किताब दिला होता. आणि आता त्याच्या पराक्रमाला साजेशी ही मोठी जबाबदारी योग्य वेळीं त्यांनी त्याच्यावर सोपविली. चिपळूणहून पुढे ते कांही वेळ आपल्या राज्यांतील बंदोबस्त पाहात पाहात थेट दक्षिणेपर्यंत जाऊन आले. एप्रिल २२ ला ते कारवारपासून एक दिवसाच्या मजलीवर होते. कदाचित् विजापूर दरबारकडील कांही राजकारण स्थिरस्थावर करण्याकरिता किंवा त्या सरहद्दीवरील कांही किल्ल्यांचें बांधकाम जातीने पाहण्याकरिता त्यांनी ह्या गडबडींतहि हा वेळ काढला असावा. तिकडून काम आटोपून ते फिरून एकवार मेच्या दुसऱ्या आठवड्यांत रायगडाला जाण्यापूर्वी चिपळुणास आले. मोगलांवरील चढाई

सुरू झाल्यावेळेपासून रायगडाच्या मार्गावर म्हणून चिपळूणच्या जवळ छावणी करणें सोयिस्कर होतें. ज्या जागीं राजांच्या लष्कराचा तळ पडे त्या जागेचें 'दळवटणें' असें नांव विख्यात झालें. तेथील छावणीसंबंधाच्या कित्येक बारकाईच्या नामांकित सूचना राजांनी इ. १६७१ त दिलेल्या आढळतात. चिपळूण छावणींतील आपलें सर्व पराक्रमी सैन्य शिवाजीराजांनी नजरेखाली घातलें व अशा रीतीने त्याला पुनः भेट देऊन त्याचा गौरव केला. सैन्यालाहि आपल्या प्रभावशाली नेत्याचें हें पुन्हा मिळालेलें दर्शन स्फूर्तिदायक झालें. या सैन्याच्या आणि आपल्या प्रजेच्या निष्ठेच्या विश्वासावर 'मराठा राजा छत्रपति' होण्याच्या तयारीसाठी म्हणून मे १२-१३ ला चिपळुणाहून निघून शिवाजी महाराज रायगडावर येऊन हजर झाले.

* * *



छत्रपतींचा 'शिवराई' (निराळा नमुना)

१७ 'मराठा पातशाहा एवढा छत्रपति झाला'

क्षुद्र विरोधकांना एकच उत्तर

आपल्या पराक्रमाने विशेषतः गेल्या चार वर्षांत आदिलशाहीचें आणि मोगली सत्तेचें विरोधाचें सामर्थ्य शिवाजीराजांनी निर्माल्यवत् ठरविलें. आदिलशाही आणि कुतुबशाही यांनी खंडण्या द्याव्या एवढा राजांचा दरारा वाढला. पोर्तुगीज व इंग्रज आदिकरून पाश्चात्यांचे वकील त्यांच्या दरबारांत येरझारा घालूं लागले. तथापि केवळ विशिष्ट परंपरेने आणि संस्कारांनी प्राप्त होणारें राजपदाचें तेज सामान्य जनांना शिवाजीराजांमध्ये आढळेना. शिवाजीराजांच्या आज्ञापत्रांपेक्षा मोगली किंवा आदिलशाही फर्मानांचेंच स्थान लोकांच्या दृष्टीने वरचढ राहिलें. शिवाजीराजे पाहतां पाहतां लहानाचे मोठे झाल्यामुळे, उगाचच त्यांच्याशीं बरोबरी लावणारे क्षुद्र मनाचे लोक त्यांच्या पराक्रमाने त्यांच्या दर्जांत झालेला फरक मान्य करीनात. आणि त्यामुळे मराठ्यांचें स्वतःच्या स्वतंत्र अधिराज्याचें राजकरण चालीला लागेना. तेव्हा दक्षिणेंतील राजसत्ता पूर्वीप्रमाणे मोगल किंवा विजापूरकर या महाराष्ट्राबाहेरील आणि विधर्मी राजवंशाकडे राहिली नाही; तर ती आता खुद्द महाराष्ट्रांतील एका हिंदु व्यक्तीच्या हातांत आली आहे, हें जगाच्या निदर्शनास आणण्यासाठी शिवाजीराजांना राज्याभिषेक करून घेणें आणि नवा मराठा राजवंश स्थापन करणें हाच एक उपाय होता. या विचारांच्या साखळींतील एकेक दुवा खरोखर कोणीं आणि केव्हा घडविला हें सांगणें दुरापास्त आहे. मनुष्य कितीहि पराक्रमी झाला तथापि पारतंत्र्यदर्शक सरदारकी किंवा मांडलिकी त्याला निष्प्रभ करते, हें प्रत्यक्ष वडिलांच्या उदाहरणावरून राजांच्या मनावर पक्कें बिंबलें. मोगलांच्या आज्ञेवरून आपल्या राज्यावर चालून आलेल्या 'राजा' जयसिंगाच्या मनाची हीनावस्था त्यांनी अनुभविली. आग्र्याच्या अल्प रहिवासांत निर्माल्यवत् झालेल्या पराक्रमी राजपुतांच्या परावलंबी मांडलिकीचे हाल त्या सार्‍यांच्या असहायतेच्या

रूपाने त्यांच्या नजरेसमोर मूर्तिमंत उभे राहिले. त्याच कारावासांत स्वयंपूर्ण सार्वभौम राज्यसत्तेची व्यावहारिक आकांक्षा शिवाजीराजांच्या मनांत बहुधा उद्‌भवली. आणि काशीच्या केंद्रस्थानांतील अनुभवाने हिंदूंच्या परिस्थितीचें आकलन झाल्यामुळे गागाभट्टांनी शिवाजीराजांच्या त्या आकांक्षेला राज्याभिषेकाच्या संस्काराने आणि त्यासाठी स्वतः संकलन करून तयार केलेल्या राज्याभिषेकप्रयोगाच्या बळाने, परंपरेचें पावित्र्य आणून दिलें.

तक्ताची जागा रायगड

ह्या नव्या राज्याच्या तक्ताची जागा म्हणून अनेक वर्षांच्या अनुभवाने दुर्भेद्य ठरलेला रायगड शिवाजीराजांनी पसंत केला. ज्यांनी ज्यांनी आणि ज्या ज्या काळीं हा गड पाहिला, त्यांनी त्यांनी आणि त्या त्या काळांत त्याचें महत्त्व मुक्तकंठाने वर्णन केलें. या मूळच्या अभेद्य टेकडीला जरूर तेथे २० ते ४० फूट उंचीचे तट बांधून शिवाजीराजांनी आणखी दुर्गम बनविलें. आणि त्याच्या विस्तीर्ण पठारावर राजधानीला आवश्यक सर्व सोयी, दारूगोळयाचीं व धान्याचीं कोठारें, तलाव, सुमारें तीनशे इमारती, राजवंशाच्या वास्तव्याला सोयीचे राजवाडे व सिंहासनाधीशाला शोभेसा दरबारमहाल आणि जगदीश्वराचें भव्य देवालय बांधवून स्वतंत्र राज्याच्या राजधानीचें वैभव निर्माण केलें. सर्व तयारी मनासारखी झाल्यावर कोठे कोणाचे तुरळक विरोधाचे सूर निघत असतील तर त्यांचा अधिकृत रीतीने परिहार करण्याच्या दृष्टीने योग्य तो बंदोबस्त केला. राज्याभिषेकप्रयोगाची वगैरे माहिती आणवून भोसले घराण्याची पीठिका शोधिली. काशीकर पंडित गागाभट्ट या नामांकित आणि त्या कालांतील अग्रगण्य विद्वानाला पौरोहित्य देऊन रायगड येथे धार्मिक विधीची पूर्वतयारी चालविली.


राज्याभिषेक-समारंभाचें वातावरण रायगडावर सुमारें महिनाभर गजबजलें. प्रथम प्रतापगडास जाऊन शिवाजीराजांनी भवानी देवीचें समारंभाने दर्शन घेतलें व भवानीला सोन्याचें छत्र विधिपूर्वक अर्पण केलें (इ. १६७४ मे १९). २१ तारखेला तेथून राजे रायगडास आले. नंतर संस्काराच्या अभावीं लुप्त झालेलें क्षत्रियत्व संपादण्यासाठी २९ तारखेला राजांची मुंज करण्यांत आली. पूर्वीचे राजांचे विवाह रूढ पौराणिक पद्धतीने झाले होते. तेव्हा दुसऱ्याच दिवशीं त्याच राण्यांशीं पूर्वी झालेले विवाह समंत्रक वैदिक

पद्धतीने पुन्हा एकदा लावण्यांत आले. आणि शिवाजीराजे आणि सोयराबाई पट्टराणी यांनी अभिषेकासाठी लागणारें पवित्र्य सशास्त्र प्राप्त करून घेतलें. यापूर्वीच्या आयुष्यांत क्षत्रियाला योग्य असे धर्माचार हातून घडले नाहीत, त्यासाठी प्रायश्चित्तें वगैरे धर्मविधि त्यानंतर यथासांग पार पडले. या राज्याभिषेकाच्या अनेक विधींपैकी आणि दानधर्मापैकी महत्त्वाचा तुलादान-विधि मे २९ पासून सुरू झाला. त्या दिवशीं शिवाजीराजांची सुवर्णतुला करण्यांत आली आणि त्यानंतर सर्वक्लेशनिवारणार्थ चांदी, तांबें इत्यादि धातु व इतर नाना तऱ्हेचे व्यवहारोपयोगी आणि खाद्य पदार्थ यांनी देखील त्यांचें वजन करविण्यांत आलें. पुढे हे सारे जिन्नस आणि लक्षावधि होनांचें द्रव्य यांचें, राज्य मिळवितांना कराव्या लागलेल्या हत्या वगैरेचें पाप नष्ट व्हावें म्हणून, दान करण्यांत आलें.


नवें युग अवतरलें

महाराष्ट्रांत कित्येक पिढ्यांत राज्याभिषेक झालेला कोणीं पाहिलेला किंवा ऐकलेला नव्हता. तेव्हा हा प्रसंग अगदी न विसरण्यासारखा व नवें युग आणणरा वाटला. दहा अकरा हजार लोक सर्व दिशांकडून रायगडावर जमा झाले. सर्व खर्च दीड कोटि होन आला. राज्यारोहणाचा सुमुहूर्त शक १५९६ ज्येष्ठ शु. १३ (इ. १६७४ जून ६) रोजीं, शुक्रवारची तीन घटका रात्र उरली असतां, म्हणजे उजाडत्या शनिवारीं पहाटे सुमारें पांच वाजतांचा, धरला होता. या मंगल घटकेला राजाराणीला सोन्याच्या हिरेजडित सिंहा-सनावर बसवून दोघांवर मौल्यवान जडावाचें मोतीलग झालरीचें छत्र धरणें व अष्टदिशांहून आणविलेल्या गंगाजलांनी सिंहासनाच्या आठ खांबांजवळ उभे राहून अष्टप्रधानांनी* व थोर ब्राह्मणांनी सुवर्णपात्रांतून अभिषेक करणें, हा


* अष्टप्रधानांचीं नांवें व क्रम ध्यानांत ठेवण्यासाठी रूढ कविता :
(राजाची उजवी बाजू =) प्रधान, अमात्य, सचीव, मंत्री ।
(राजाची डावी बाजू =) सुमंत, न्यायाधिश, न्यायशास्त्री ।।



रायगड : शिवछत्रपतींच्या सिंहासनाची जागा
दर्शनीं राजसभांगण. सिंहासनसभागृहाच्या उंच चौथऱ्यावर
मध्यभागीं ‘ तख्ताची जागा ’.



प्रतापगडची भवानी देवी



रायगड : नगारखाना
राजसभांगणाचा मुख्य दरवाजा

सिंहासनारोहणाचा, छत्रधारणाचा व राज्याभिषेकाचा विधि झाला. सर्वांनी छत्रपति महाराजांच्या नांवाचा जयघोष केला. त्यांना अभिवादन केलें. राजपत्रांवर यापुढे 'क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिव छत्रपति' असा निर्देश करूं लागले आणि राज्यारोहणाच्या घटकेपासून नवा राज्याभिषेक शक सुरू केल्याने महाराज युगप्रवर्तक शककर्ते ठरले. स्वतंत्र कालगणना ही गोष्ट सार्वभौमत्व दाखविते. स्वतःचें नाणें पाडणें हीहि गोष्ट तशीच निर्णायक आहे. म्हणून या शुभप्रसंगाच्या निमित्ताने तांब्याचा पैसा किंवा शिवराई* आणि सोन्याचा शिवराई होन अशीं दोन खास शिवराई नाणीं पाडण्यांत आलीं (पाहा पृ. २००).

धार्मिक समारंभानंतर लोकांच्या सोयीसाठी प्रातःकालीं सुमारें सात वाजण्याच्या सुमारास दरबार-महालांत भव्य सिंहासनावर बसून छत्रपतींनी नजराणे आणि मुजरे घेतले. त्या वेळीं युवराज संभाजीराजे सिंहासनाच्या पायरीवर बसले होते व पेशवे मोरोपंत व राजपुरोहित गागाभट्ट जवळच उच्चासनावर बसले होते. आणि अष्टप्रधान मानाप्रमाणे उजव्या डाव्या बाजूस उभे होते. सर्वांच्या आधी प्रधान मोरोपंतांनी छत्रपतीच्या डोक्यावर होन ओतून सुवर्णस्नान घातलें व इतरांनी आपल्या दर्जाप्रमाणे नजराणे देऊन मुजरे केले. योग्यतेप्रमाणे प्रत्येकाला मानाचीं वस्त्रें देऊन बोळवण करण्यांत आली. या वेळीं इंग्रजांचा वकील ऑक्झेंडेन मराठ्यांच्या छत्रपतीला नजराणा देण्यास आला होता. त्या वेळीं सिंहासनाच्या उजव्या

(डाव्या बाजूला पहिला =) सेनापती त्यांतिल मुख्य जाणा ।
अष्टप्रधानीं मग मुख्य राणा ।।


मानाचा विडा व नारळ देण्याचा क्रम न्यायशास्त्री, नंतर प्रधान, अमात्य वगैरे राहिलेले उजवीकडून डावीकडे. सेनापति शेवटीं. सेनापति म्हणजे दंडशक्ति. ती इतर शक्तींच्या कह्यांत वागविण्यांत यावी असा संकेत.

— राजवाडे खं. ८, ले. ३९.

* छत्रपतित्वाची कोणतीहि खूण नसलेलें असेंहि नाणें (शिवराई) मिळतें (पृ. ६६ पाहा). तें राज्याभिषेकापूर्वीचें आहे असें मानलें पाहिजे. म्हणजे महाराजांच्या महत्त्वाकांक्षेचें व स्वातंत्र्याबद्दलच्या कल्पनेचें, हें आणखी एक प्रत्यंतर मिळतें.

हाताला दोन मत्स्यांचीं (माशांचीं) शिरें व डाव्या हाताला घोड्यांच्या पुच्छांचे झुबके सोन्याच्या भाल्यांच्या टोकांना बांधले होते. हीं चिन्हें समुद्रावरील सत्ता व सैन्यावरील वर्चस्व दाखविण्यासाठी होतीं. एका भाल्याच्या टोकापासून सोन्याचा तराजू न्यायचिन्ह म्हणून लटकत होता. हीं धर्मकृत्यें आणि हा राजसिंहासनाचा थाट यांचा लोकांच्या मनावर फार मोठा व इष्ट परिणाम झाला.

गडाचा मार्ग इतका बिकट असतांहि दोन लहानगे हत्ती आणि पुष्कळ घोडे देखील शोभेच्या मिरवणुकीकरिता मोठ्या प्रयासाने रायगडावर चढविले होते. तात्पर्य, पावसाळा असतांहि एकंदर समारंभांत कोणत्याहि प्रकारची उणीव म्हणून राहूं दिली नव्हती. एकंदर प्रजाजन समारंभांत दंग झाले. सत्तर वर्षांच्या वृद्ध मातुश्री जिजाबाई यांनी आपल्या कुसव्याची धन्यता, छत्रपतीचा हा राज्याभिषेक, भरल्या डोळयांनी पाहिला. ही अमोल घटका पाहण्यास ती माउली जगली हें तिचें केवढें भाग्य ! परंतु नंतर बाराच दिवसांत (१७ जून) मातुश्रींनी आपले डोळे मिटले आणि राजधानींतील उत्साहावर विरजण पडलें. बहुधा आणखी कित्येक दिवस चालले असते ते उत्सवप्रकार लगेच बंद करण्यांत आले. युवराज संभाजीराजे यांची मुंज शिवाजीराजांच्या मुंजीप्रमाणे याच समारंभांत व्हावयाची. पण आधी ती त्यांना लाभत नसेल म्हणून व नंतर लगेच करण्यांत यावयाची असेल तर आजीच्या अनपेक्षित मृत्यूमुळे म्हणून थोडी लांबली. ती मग पावसाळ्यानंतर माघांत म्हणजे इ. १६७५ फेब्रुवारी ४ ला करण्यांत आली.



मातुश्री जिजाबाईंची छत्री (पाचाड, रायगडाचा पायथा)

अष्टप्रधानांचीं नवीं नांवें

शिवाजीराजे बंगरुळाहून दादाजी कोंडदेवाबरोबर प्रथम पुण्याकडे आले तेव्हाच त्यांच्याबरोबर पेशवा, मुजुमदार असे अधिकारी शहाजीने नेमून

दिले होते. कारभाराचा आणि सत्तेचा व्याप वाढला तशी त्यांच्या संख्येंत आणि अधिकारांत भर पडली. शेवटीं इतरांच्या व स्वतःच्या अनुभवावरून शिवाजीराजांनी बहुतेक ठिकाणीं रूढ असलेली आठ प्रधानांची संख्या व त्यांचीं कामें ठरवून दिलीं. त्यासाठी त्यांनी गागाभट्टासारख्या त्रिखंड पंडिताच्या विद्वत्तेचा लाभ घेऊन आपल्या भारतरामायणांतील व शुक्र-नीतींतील परंपरेचा खोल शोध केला. आपल्या प्रधानांचीं सर्वत्र रूढ असलेलीं फारसी नांवें रद्द करून त्यांच्या जागीं पेशव्याबद्दल मुख्य प्रधान, मुजुमदार याबद्दल अमात्य, सुरनिस याबद्दल सचिव अशीं संस्कृत नांवें ठेविलीं, ही त्यांची स्वाभिमानी कृति आणि इष्ट वाटेल त्या फेरबदलाचा मोकळेपणाने स्वीकार करण्याची वृत्ति फार महत्त्वाची आहे. या वेळीं भारतीय राज्यव्यवहारांतील जुने संस्कृत भाषेंतील शब्द नाहीसे होऊन फारसी शब्दांचा सुळसुळाट झाला होता. तो मोडून देववाणीचा, स्वभाषेचा प्रचार व्हावा या हेतूने त्यांनी रघुनाथ पंडितांकडून 'राजव्यवहारकोश'* या नांवाचा कोश मुद्दाम करवून घेतला आणि स्वभाषेला स्वाभिमानी वळण लावलें. तसेंच पंचांगाच्या सुधारणेसाठी महाराजांच्या प्रोत्साहनाने कृष्ण ज्योतिषी याने 'करणकौस्तुभ' नांवाचा नवा करणग्रंथ तयार केला. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक अशा रीतीने अनेक दृष्टींनी क्रांति घडवून आणणारा प्रसंग म्हणून इतिहासांत नमूद केला जाईल. या योगाने आजपर्यंत दुर्लक्षिलेला व कधींहि स्वतःच्या राज्यशासनाचा मान अनुभवावयास न मिळालेला पश्चिमेकडील डोंगराळ मावळेमराठ्यांचा भूभाग स्वराज्य उपभोगूं लागला. दक्षिणेच्या शिथिल व निःसत्त्व होऊं घातलेल्या राजकारणांत ताज्या दमाचे, नव्या आकांक्षांचे व कर्तृत्वाचे नवे लोक सामील झाले. त्याचा परिणाम तत्काळ दिसून आला. इ. सनाच्या तेराव्या शतकापासून सुमारें ४०० वर्षें, उत्तरेकडील खिलजी सुलतानापासून पुढील मुसलमानी सत्ताधीशांनी विंध्याद्रि पर्वत ओलांडून दक्षिणेवर सतत आक्रमण चालविलें

---

* कल्पना येण्यासाठी या तीन ओळी पाहा : शाहजादा **राजपुत्रः प्रधानः** पेशवा तथा ॥ २॥ **अमात्यः** स्यान् मुजुमदारः **सेनाध्यक्षो** हुकूमतः । **युक्त्य-भिज्ञो** दबीरः स्यात् सूर्नीसः **सचिवस्तथा** ॥ ३ ॥ जाड ठसे संस्कृत नव्या शब्दांसाठी.

होतें. ती लाट फिरविण्याचें श्रेय शिवाजी महाराजांनी नवीन स्थापन केलेल्या स्वराज्याच्या या नव्या केंद्राने घेतलें. पुढच्या पेशवाईच्या काळांत आपण दक्षिणेकडून उत्तरेकडे स्वाऱ्या झालेल्या पाहतों.

राज्याभिषेकाचा बेत ठरल्यापासून राज्याभिषेकापूर्वी १९ मार्चच्या सुमारास राजांच्या एका राणीचा मृत्यु झाला व राज्याभिषेकानंतर जून १७ ला मातुश्री जिजाबाईचें निधन झालें. अशासारख्या अशुभ गोष्टी घडल्या त्यामुळे अनेकांना चुटपुट लागली. आणि साहजिक चर्चा सुरू झाली. गागाभट्टाने केलेल्या राज्याभिषेकसमारंभाच्या विधिविधानांत चुका राहिल्यामुळे ह्या अशुभ गोष्टी झाल्या असें निश्चलपुरी नांवाच्या एका विद्वान् पण लोकाचारप्रवीण योग्याचें मत पडलें. तेव्हा त्याच्या आणि पशुबलि वगैरेवर श्रद्धा असलेल्या सर्वसाधारण लोकांच्या समाधानाकरिता म्हणून पुराणोक्त पद्धतीने आश्विन शु. ५ रोजीं (इ. १६७४ सप्टेंबर २४) शिवाजी महाराजांनी दुसरा एक राज्याभिषेकसमारंभ करविला. सिंहासनाचे सिंह, तें सिंहासन, महाद्वार, इत्यादिकांस व अनेक देवतांस बलिदाने केलीं. आणि अशा रीतीने केवळ उच्च वर्णाच्याच नव्हे तर सर्वसाधारण लोकांच्या मताचें आपल्या राज्याभिषेकाला पाठबळ मिळवून एकंदर प्रजेला या क्रांतिकारक समारंभाबद्दल आपलेपणा वाटेल, अशी काळजी घेतली.

एवढ्या मोठ्या डामडौलाने पार पडलेल्या समारंभाला खर्च फार मोठा झाला हें सांगावयास नको. केवळ दक्षिणेचा खर्चच दीड लाख होन झाला. सुवर्णजडित सिंहासनाचा, छत्राचा वगैरे इतर खर्च आणखी कितीतरी झाला. तेव्हा तो भरून काढण्यासाठी शिवाजी छत्रपतींनी सर्व वृत्तिवंतांवर म्हणजे वतनदारांवर मिरासपट्टी बसविली. पुणें प्रांताने मोगलांच्या स्वारींत फारच त्रास भोगला असल्याने त्यावर ही पट्टी बसविली नाही. इतर ठिकाणीं जी बसविली ती सर्वसाधारण माणसांवर न बसवितां ज्यांना देण्याचें सामर्थ्य होतें अशा देशमुख, देशकुळकर्णी, पाटील व गांवकुळकर्णी वगैरे हक्कदक खाणारांवरच घातली, ही गोष्ट ध्यानांत घेण्यासारखी आहे.

राज्याभिषेकानंतर

मोगल किंवा विजापूरकर यांपैकी कोणाशींच अलीकडे तह झालेला नव्हता, ही गोष्ट मागे सांगितलीच आहे (पृ. १८८). यामुळे हे धार्मिक विधि करीत असतांनाच युद्धाचे विचार देखील शिवछत्रतींच्या डोक्यांत घोळत असल्यास नवल नाही. मोगल सरदार दिलेरखान दिल्लीकडे गेला होता. आणि मोगली फौजांचा सर्वाधिकारी बहादुरखान पेडगांवीं छावणी करून होता. आपण राज्याभिषेकांत दंग आहोंत असें पाहून शत्रूंनी आपल्या बेसावधपणाचा फायदा घेऊं नये म्हणून समारंभाच्या मागाहून फारशी उसंत न घेतां त्यांच्यावर अचानक छापा घालण्याचें ठरवून समारंभानंतर लगेच महाराजांनी सैन्याच्या हालचाली सुरू केल्या. आपल्या सैन्याचे त्यांनी दोन भाग केले. एका भागाने हूल दाखवून बहादुरखानाला छावणीपासून २० कोस दूर नेलें. मागे दुसऱ्या सैन्याने येऊन त्याचे तंबू वगैरे जाळून टाकले व बादशाहाकरिता त्याने जमविलेले दोनशे जातिवंत घोडे व एक कोटि खजिना लुटला (इ. १६७४ जुलै). शिवछत्रपतींना पुढच्या स्वाऱ्यांसाठी खजिना मिळेल तेवढा अपुराच होता. म्हणून याच वेळीं सुरतेच्या सुभेदाराकडे तीन वर्षांच्या चौथाईचे नऊ लाख रुपये महाराजांनी मागितले. शिवाय जेद्दा व मक्का इकडून यात्रा करून परत येणारीं मोगलांचीं गलबतें पकडण्याचाहि त्यांनी विचार केला.

ऑगस्टच्या सुमारास मोरोपंत पेशव्यांनी कल्याण-भिवंडीजवळ सैन्य जमविलें आणि वसईच्या पोर्तुगीजांकडे चौथाईची मागणी केली. दसऱ्यानंतर ऑक्टोबरमध्ये नेहमीप्रमाणे सैन्याच्या हालचाली सगळीकडे चालू झाल्या. मोरोपंताच्या हाताखालील फौजा कोकणांतून थेट रामनगरपर्यंत गेल्या. तेथून पळून गेलेल्या रामनगरकर राजाने या वेळीं कांही थोडा प्रतिकार केला. परंतु तिकडील किल्ल्यांवर शिबंदी व रसद पोंचविण्याचें काम फक्त पेशव्यांना करावयाचें होतें. यामुळे सुरतेकडे न वळतांना पेशव्यांचें सैन्य, रामनगरचे लोक आश्रयासाठी औरंगाबादेकडे गेले होते त्या बाजूकडे वळलें. महाराजांचें दुसरें सैन्य बहादुरखानाच्या पेडगांवच्या छावणीकडून निघून जुन्नरकडे गेलें. शिवछत्रपतींच्या या संचाराला पायबंद बसावा यासाठी लढाई देऊन त्यांना प्रतिकार करतां येत नाही तर निदान धान्य

वगैरे मिळूं देऊं नये, म्हणून बहादुरखानाने धान्यबंदीचे हुकूम काढले ! पण नुसत्या हुकुमांनी काय होणार ? औरंगाबादकडे गेलेल्या महाराजांच्या फौजांनी तेथे लूट मिळविली, सेनापति कुतुबखान याचा पराभव केला आणि तिकडून त्या थेट बऱ्हाणपूरपर्यंत गेल्या. वाटेंतील धरणगांव इत्यादि व्यापारी शहरें लुटून त्यांनी बरीच लूट मिळविली (इ. १६७५ जानेवारी). यानंतर महिन्याच्या आंत मोगलांच्या एका मोठ्या फौजेशीं लढाई करून मराठ्यांनी तिचा मोड केला. इकडे मोगलांच्या मुलखांत महाराजांच्या फौजांना असें यश मिळत होतें, तेवढ्यांत (इ. १६७५ फेब्रु. ४) महाराजांनी रायगडावर येऊन संभाजीराजांची मुंज उरकून घेतली. दुसरीकडे विजापूरकरांशींहि युद्ध चालू होतें. तेव्हा विजापूरकर व मोगल यांनी आपसांत संगनमत करूं नये म्हणून महाराजांनी आपणच मोगलांशीं तह करीत आहोंत अशी बहादुरखानाला हूल दाखविली, आणि दोघांच्याहि बेसावधपणाचा फायदा घेऊन दोन्ही बाजूंच्या आपल्या किल्ल्यांवरचा बंदोबस्त पक्का करून घेतला.

विजापूरकरांच्या मुलखांतहि छत्रपतींना यश मिळालें. तिकडेहि महाराजांनी सैन्यें घुसवून लूट केली. कारवार व कोल्हापूरजवळ लहानमोठीं सैन्यें विजापुरी मुलखाचें रक्षण करीत होतीं. फोंड्याच्या सुभेदाराने महाराजांच्या हद्दींतील एका व्यापाऱ्याला धरून नेल्यामुळे कुडाळचा सुभेदार अण्णाजी याने त्याचें इ. १६७४ ऑगस्टमध्ये पारिपत्य करण्याचा प्रयत्न केला. पण तें जमलें नाही. पण दसऱ्यानंतर सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये कोल्हापूर-बेळगांवच्या बाजूला मराठे फौजांनी खूप लूट मिळविली. या रेंगाळत चाललेल्या युद्धाला इ. १६७५ च्या फेब्रुवारी-मार्चमध्ये अधिक रंग भरला. मोगल थोडे गप्प बसविल्यावर आठ-दहा वर्षें भिजत पडलेलें फोंडा किल्ल्याचें काम पुरें करण्याचें योजून महाराजांनी अण्णाजीला फोंड्यावर चालून जाण्यास सांगितलें व कोल्हापूरकडून फोंड्याला मदत होऊं नये म्हणून दत्ताजी पंडिताबरोबर बरेंच सैन्य तिकडे पाठविलें. तिकडे त्याने कोल्हापूर, सोनगांव अशा शहरांतून खंडण्या घेतल्या व कोल्हापूर व रायबाग हीं ठाणीं घेतलीं. मध्यंतरीं कल्याण-भिवंडीवर मोगलांचें एक सैन्य आलें तें हाकलून काढून स्वतः छत्रपति मार्चअखेरीस फोंड्याकडे आले. तेथे ही विजापूरच्या व पलीकडच्या कुतुबशाही मुलखांतील लूट त्यांच्याकडे आणून देण्यांत आली. फोंड्याच्या स्वारींत भाग घेण्याकरिता बरेच मजूर व मोठें


सैन्य जलमार्गाने राजापुराहून वेंगुर्ल्याकडे महाराजांनी रवाना केलें. तें पोंचतांच फोंड्याच्या वेढ्याचें काम नेटाने चालू झालें. फोंड्याचा किल्लेदार मुहंमदखान याला गोवेकर पोर्तुगीजांची गुप्तपणें मदत मिळे. कारण महाराजांच्या भीतीमुळे ते उघडपणें मदत करण्यास धजत नसत. एकदा फोंड्याला रसद पोंचविणारीं गोवेकरांचीं गलबतें महाराजांनी ऐनजिनसी पकडलीं आणि जरबेसाठी त्यांचीं गांवें लुटून देखील पारिपत्य केलें. तेव्हा तो त्रास थांबला. आता शिवाजी महाराज फोंड्याच्या पिच्छेसच बसले. त्यांनी किल्ल्याला एकूण चार सुरुंग लावले. ते फुकट गेले. तेव्हा किल्ल्यांत शिरण्याकरिता त्यांनी ५०० शिड्या करविल्या व त्या चढून जाणाऱ्या प्रत्येकाला अर्धा शेर वजनाचा सोन्याचा तोडा देण्याचें बक्षीस लावलें. इकडे बहलोलखान फोंड्याचा वेढा उठविण्यासाठी मोठें सैन्य घेऊन येऊं लागला. पण महाराजांनी सर्व घाट अडविले आणि बहलोलला फार मोठी लांचहि दिली. यामुळे तो आला नाही. शेवटी बारा-तेरा दिवसांच्या शिकस्तीच्या प्रयत्नांनंतर इ. १६७५ एप्रिल १७ ला पांचव्यांदा सुरुंग लावले ते यशस्वी होऊन फोंडा किल्ला हस्तगत झाला. पुढे लौकरच कारवार, शिवेश्वर व अंकोलें हीं काबीज केलीं. म्हणजे जूनपर्यंत थेट अंकोल्यापर्यंतची किनारपट्टी शिवाजी महाराजांच्या ताब्यांत आली. मध्ये गोवेकरांचा मुलूख राहिला होता तो घेण्याचा विचार यानंतरच करणें शक्य होतें.

ह्या यशस्वी स्वारीनंतर महाराज जूनच्या मध्याला रायगडाला परत गेले आणि बहलोलखानहि छावणीला विजापूरला गेला. मध्यंतरीं मोगलांशीं तह करण्याच्या वावड्या महाराजांनी बऱ्याच उडविल्या. तहाचीं कलमें ठरविण्यासाठी वकील आले आणि गेले. तह करून अब्रू बचावण्याची मोगलांना आशा वाटली. परंतु विजापूरच्या मुलखांतील स्वारी आटोपेपर्यंत मोगलांनी गडबड करूं नये एवढाच महाराजांच्या या हुलीचा उद्देश होता. तिकडची स्वारी पुरी होतांच महाराजांनी आपलें बोलणें बदललें. आधीच जेरीस आलेला औरंगजेब या लपंडावाने चिडला व फिरून महाराजांच्या विरुद्ध आदिलशाहीशीं एकजूट करण्यास तयार झाला. आदिलशाहाकडून मोगलांना मिळत असे ती खंडणी त्यांना सोडून देण्यांत आली. आणि पावसाळ्यानंतर मोगलांनी उत्तरेकडे आणि बहलोलखानाने पन्हाळ्याकडे असे महाराजांवर दोन्ही बाजूंनी जोराचे हल्ले करावे असें दोघांमध्ये ठरलें.


इकडे सिद्दीच्या कुरापती चालूच होत्या. तो आपल्या धटिंगणपणाने इंग्रजांना व शिवाजी महाराजांनाहि सतावीत होता. त्याच्यावरच्या स्वाऱ्यांचा उद्योग आणि त्यापायीं एकसारखा खर्च महाराजांना करावा लागे. म्हणून या कुशींतल्या कुसळाचा निकाल करण्याच्या उमेदीने त्यांनी एक मोठें आरमार ह्या पावसाळ्यांत बांधविण्याचें काम सुरू केलें (इ. १६७५ ऑगस्ट).

राज्याभिषेकाच्या सुमारास रायगडास झालेल्या सलोख्याच्या तहामुळे (पृ. १८७) इंग्रज आता राजापुरास वखार घालण्यास उत्सुक होते. सर जॉन चाइल्ड याला त्यांनी तेथील वखारीचा मुख्य नेमलें व तेथील आपली जुनी इमारत आपणास मिळावी म्हणून त्याने महाराजांशीं बोलणें लावलें. पण महाराजांनी ती दिली नाही. इतक्यांत महाराजांच्या बऱ्हाणपुराकडील स्वारींत धरणगांवाची इंग्रजांची वखार लुटली गेल्यामुळे (पृ. १९८) तेंहि एक नव्या तक्रारीचें कारण झालें. धरणगांवाच्या वखारीचा मुख्य ऑस्टिन हा त्या बाबतींत महाराजांना ऑगस्टांत जाऊन भेटला व यापुढे मराठ्यांनी इंग्रजांच्या वखारीची लूट करूं नये असा कौल म्हणजे अभयपत्र इंग्रजांच्या सर्व वखारींना देण्याचें महाराजांनी कबूल केलें (सप्टें. १५).

* * *



छत्रपति शिवाजीमहाराजांचा 'होन'



छत्रपतींचा 'शिवराई' (तिराळा नमुना)

१८ छत्रपतींचा दिग्विजय

आदिलशाहींतील गोंधळ

राज्याभिषेकामुळे महाराजांच्या राज्याला मिळालेलें महत्त्व कमी होईल अशी कोणतीहि गोष्ट या एका वर्षांत महाराजांचे शत्रू करूं शकले नाहीत हें आपण पाहिलें. शेवटीं शेवटीं मोगलांचें व विजापूरकरांचें संगनमत झाल्यामुळे संकट येतें की काय असें थोडेंफार वाटलें. पण आदिलशाहींतील पक्षोपपक्षांच्या गोंधळामुळे महाराजांचे शत्रू त्यांचें नुकसान करूं शकले नाहीत. जुलै-ऑगस्टमध्ये महाराज पन्हाळ्यावर थोडे आजारी पडून जरा निष्क्रिय राहिले. पण त्याचाहि फायदा कोणत्याहि शत्रूला घेतां आला नाही. उलट या वेळांत महाराजांनी योजनापूर्वक दक्षिणदिग्विजयाची तयारी केली. त्यासाठी ते जुलैच्या मध्यापासून रायगड व पन्हाळा या दोन्ही किल्ल्यांवर येऊन जाऊन असत.

महाराजांचीं सैन्यें सर्वत्र विखरून ठेवलेलीं व जागृत असत. विशेषतः आपल्या सरहद्दीवर राहून तीं स्वराज्याचें संरक्षण करीत व हात चालेल तसा शत्रूच्या मुलखांत हल्लाहि करीत. कोल्हापूरच्या आदिलशाही सुभेदाराला पकडून अशा एका प्रसंगाने जुलै ३० ला खंडणीकरिता शिवाजी महाराजांच्या समोर पन्हाळा किल्ल्यावर उभे करण्यांत आलें. फोंड्याकडे बंदोबस्ताकरिता ठेवलेल्या सैन्याने दक्षिणेंत सोंद्याकडे स्वारी केली (इ. १६७५ ऑगस्ट), पण ती कांहीशी फसली. पण महाराजांचें खरें लक्ष मोगल व विजापूरकर यांच्या संगनमतामुळे या वेळीं आणखी काय भानगडी मोगल उपस्थित करतात, इकडे लागलें होतें. यामुळे मोगलांच्या बंदोबस्ताकरिता सप्टेंबर-पासूनच मोरोपंत पेशवे व अण्णाजी पंडित जुन्नरकडे रवाना झाले. बहादूर-खानाच्या मनाला राज्याभिषेकानंतरच्या जुलैतील पराभवाची (पृ. १९७) गोष्ट फार लागली होती. म्हणून आदिलशाही वजीर खवासखान याच्याशीं संगनमत करून तो महाराजांना जोराचा प्रतिकार करण्याचें योजीत

होता. त्याने पावसाळा संपतांच मराठ्यांची पाठ घेऊन कल्याण-भिवंडीकडे सैन्य पाठविलें. परंतु त्याचें कांही चाललें नाही. तिकडे नोव्हेंबर-डिसेंबरांत विजापुरांत क्रान्ति झाली. बहादुरखानाशीं संगनमत करणारा खवासखान बहलोलाच्या तावडींत सापडला. बहलोलाने त्याला ठार मारविलें (इ. १६७६ जाने.) आणि स्वतः बहलोल पठाणच मुख्य दिवाण झाला व खवासखानाच्या मदतीने शिवाजी महाराजांना पेंचांत आणण्याचे बहादुरखानाचे बेत जागच्या जागीं बसले. आणि उलट बहादुरखानच विजापुरी पक्षभेदांच्या राजकारणांत गुंतून पडला.

मोरोपंत पेशव्यांकडे उत्तरेकडील स्वारीची जबाबदारी सोपवून महाराजांनी पन्हाळ्यावर स्वतः येऊनजाऊन राहून दक्षिणची आघाडी सांभाळली. येथून विजापूरच्या मुलखांतील हालचालींवर, व कोकणांत जैतापूरच्या बाजूला मोठें आरमार बांधण्याची तयारी चालली होती तीवर, महाराजांना चांगली नजर ठेवतां आली. घाटावरील सातारा येथें महाराजांचा जम बहुधा तेथील पुन्हा पुन्हा उचल खाणाऱ्या फितुरीमुळे नीटसा बसत नव्हता. तो किल्ला इ. १६७५ नोव्हेंबर ११ रोजीं फिरून ताब्यांत आला. तेव्हा वेळ काढून तेथील बंदोबस्ताकरिता म्हणून ते साताऱ्याला गेले असतां, तेथे डिसेंबर-जानेवारींत पुनः बरेच आजारी पडले. अलीकडे झालेल्या दगदगीचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर झाला असला पाहिजे. नुकतेच पन्हाळयाला असतांनाहि ते आजारी पडले होते. साताऱ्याचा हा आजार दोनतीन महिने राहिला. या आजारांत त्यांना भयंकर कपाळशूळ उठे. आजार जिवावरचा गेला. त्यामुळे विषप्रयोगाच्या व त्यांना विषाने मृत्यु आल्याच्याहि अफवा उठल्या! आणि पुढे इ. १६७७ मेच्या सुमारास ते दक्षिणेकडे गेलेले असतां महाराजांनी मद्रासकर इंग्रजांकडून विषावरच्या उताऱ्याचीं औषधें शोधपूर्वक मागविलीं, असें इंग्रजांनी लिहून ठेवले. यावरून महाराजांनाहि स्वतःला विषप्रयोग झाल्याची किंवा होण्याची कमी अधिक प्रमाणांत शंका असावी, असें विनाकारणच म्हटलें जातें.

महाराजांच्या आजारांमुळे कांही दिवस मंदावलेल्या त्यांच्या सैन्याच्या हालचाली आजारांतून उठल्यावर फिरून सुरू झाल्या (इ. १६७६ मार्च). त्यांच्या सैन्याने मार्चमध्ये अथणी ह्या व्यापारी शहरांत ४-५ लाखांची लूट

मिळविली. मे महिन्यांत त्या बाजूला बेळगांवचा किल्ला घेण्यासाठी त्यांनी लावलेलें संधान किल्लेदाराने आयत्या वेळीं दगा दिल्याने बिघडलें. पण उत्तरेकडे रामनगरच्या बाजूला पारनेर, पिंडवोल अशा टेकड्यांवर जुने नवे किल्ले बांधून मोरोपंतांनी सुरतेला कायमचा शह बसविला व वकील पाठवून सुरतेच्या सुभेदाराकडून खंडणीची मागणी केली. आणि आता पोर्तुगीजांच्या साष्टी, वसई, दमण या मुलखांतून मराठ्यांच्या फौजा बिनविरोध जाऊं देण्याइतके पोर्तुगीज नरम आल्यामुळे, मराठ्यांच्या फौजा सुरतेवर केव्हा येतील याचा नियम राहिला नव्हता. व त्याची खात्री पटल्यामुळे सुरतेचीहि खंडणी बिनबोभाट वसूल झाली. कारण मोगलांचा दख्खनचा सुभेदार बहादुरखान याचें लक्ष या वेळीं दुसरीकडे होतें.

विजापूरमध्ये नवा वजीर बहलोलखान याचा पठाणपक्ष आणि जुना वजीर खवासखान याचा दक्षिणीपक्ष यांमध्ये त्या वेळीं लाथाळी सुरू झाली. आणि बहादुरखानाशीं असलेला खवासखानाचा सलोखा रद्द झाल्यामुळे ह्या लाथाळीचा फायदा घेऊन प्रथम विजापूर जिंकून घेऊन औरंगजेबाला खूष करावें, अशा विचाराने मे-जून महिन्यांत घाईने बहादुरखानाने विजापुरावर स्वारी केली. तिकडे बहलोलखानहि खवासखान पक्षाच्या दक्षिण्यांकडून झालेल्या पराभवामुळे असहाय झाला आणि घरच्या दुहीने पोखरलेलें विजापूर आपल्या हातीं राखण्याच्या कामीं शिवाजी महाराजांकडे मदत मागूं लागला. महाराजांनीहि ती आनंदाने दिली आणि त्यामुळे हलगी येथे बहलोलखानाने बहादुरखानाचा पराभव केला (इ. १६७६ जून १). युद्धाचा रंग असा विलक्षण तऱ्हेने पालटलेला पाहून महाराजांना समाधान वाटलें आणि निश्चित होऊन ते भावी कार्यक्रम ठरविण्यासाठी नित्यक्रमाप्रमाणे पावसाळ्याच्या आरंभीं रायगडाकडे आले.

रायगडावर आल्यावर गोवळकोंडेकरांच्या मध्यस्थीने महाराजांचा आदिलशाहीशीं म्हणजे त्या वेळीं विजापुरांत वर्चस्वा असलेल्या बहलोलखानाशीं तह झाला (इ. १६७६ जुलै). कृष्णा नदी ही शिवाजी महाराज आणि विजापूरकर यांच्या राज्यांमधील सरहद्द ठरविण्यांत आली. या विभागणीमुळे जुन्या आदिलशाहींतील जो कृष्णेच्या उत्तरेकडील बालाघाटी मुलूख महाराजांना मिळाला त्याच्या मोबदल्यांत महाराजांनी तीन लक्षांचा

नजराणा व दरसाल एक लक्ष होनांची खंडणी आदिलशाहाला द्यावी असें ठरलें. हा तह पुढे टिकला नाही हें निराळें; परंतु ह्या मुलखावरील महाराजांच्या चालत असलेल्या प्रत्यक्ष अमलाला आदिलशाहीने या तहाने अखेरीस मान्यता दिली, हें उघड आहे.

या सुमारास आणखीहि एक नजरेंत भरणारी गोष्ट घडली. ती म्हणजे बरोबर १० वर्षांपूर्वी महाराजांकडून मोगलांकडे जाऊन मिळालेल्या व मुसलमान झालेल्या नेताजी पालकरांचें शुद्धीकरण (इ. १६७६ जून १९). नेताजीला 'दुसरा शिवाजी' म्हणत. महत्त्वाच्या देशकार्यापुढे धर्माच्या तांत्रिक बंधनांचा महाराजांना बाऊ वाटत नसे. यामुळे महाराजांनी त्याला प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून घेतलें. ही गोष्ट त्या काळांत अगदी अपरिचित होती; आणि म्हणूनच फार गाजली. इतकी की, हें शुद्धीकरण करण्यांत (आणि त्यामुळेच कदाचित् नेताजीच्या पूर्वीच्या धर्मांतरांत) महाराजांचा कांही मोठा हेतु असला पाहिजे असें अनेकांना वाटलें.

राज्याभिषेकानंतरचे इंग्रज व सिद्दी यांचे संबंध पहिल्यासारखेच राहिले होते. महाराजांशीं गोडीने वागण्यांत इंग्रजांचा स्वार्थ होता. धरणगांवच्या किंवा अथणींतील त्यांच्या कापडाच्या लुटीबद्दल त्यांना भरपाई मिळाली नाही; परंतु पुढे तरी राजापूरच्या करारामुळे कांही फायदा होईल या आशेवर ते होते. कराराबद्दल बोलणें चालू ठेवण्यासाठी महाराजांच्या दरबारांत एक इंग्रज कायमचा ठेवण्याचाहि त्यांनी विचार चालविला.

सिद्दी मात्र महाराजांविरुद्ध मोगलांची लढाई सारखी चालवीत होता. सिद्दी संबूळ कामावरून दूर झाला (इ. १६७६ मे-जून). त्याच्या जागीं सिद्दी कासम आता दंडाराजपुरीचा सुभेदार व मोगलांच्या शिवाजीविरुद्ध लढणाऱ्या आरमाराचा अधिकारी म्हणून नेमण्यांत आला. इ. १६७५ मध्ये महाराज आजारी असतांना सिद्दी संबूळने त्यांच्या राज्याच्या किनाऱ्याला फार त्रास दिला. त्याने वेंगुर्ल्यासारखीं बंदरें जाळलीं. तेव्हा सिद्दीची गय करायची नाही असें ठरवून या वर्षी इतर स्वाऱ्या संपल्यावर जून-जुलैमध्ये मोरोपंत पेशवे दंडाराजपूर जिंकण्याचा निदानीचा प्रयत्न करण्याच्या निश्चयाने त्या किल्ल्यासमोर आले. त्यांनी सभोंवारची झाडी

तोडून किल्ल्याशेजारीं ठाण मांडलें. आणि होड्यांत सैन्य घालून समुद्रांतूनहि किल्ल्याच्या सर्व बाजूंनी हल्ला चढविला आणि आपल्या करोल प्रतिकाराची चुणूक सिद्दीला दाखविली.

गोवळकोंडेकरांशीं एकविचार

गतसालीं महाराजांच्या आजारामुळे स्वराज्याची फारशी प्रगति झाली नाही किंवा अपेक्षेप्रमाणे आसपासच्या युद्धाची परिस्थितीहि निवळली नाही. तेव्हा ही युद्धाची तंगी नाहीशी करण्यासाठी तिला दुरून शह देतां आल्यास पाहावें असें त्यांच्या मनांत कित्येक दिवस घोळत होतें. त्याप्रमाणे लांबचें कर्नाटकचें राजकारण त्यांनी हातांत घेण्याचें ठरविलें. मात्र त्याबद्दल कोणालाच सुगावा लागूं दिला नाही. दसऱ्याच्या मुहूर्ताने (इ. १६७६ ऑक्टो. ६) बाहेर पडतांना आपण होनावर गोकर्णाच्या बंदरांकडे जात आहोंत अशी त्यांनी हूल उठविली. पण तिकडे न जातां ते अकस्मात् बालाघाटांत बंकापूरच्या बाजूला जाऊन दाखल झाले आणि तेथून विजापूर-करांच्या हद्दीवरील म्हणजे त्यांचें अर्धवट किंवा नाममात्र वर्चस्व असलेल्या मुलखांत स्वाऱ्या करूं लागले. पण त्याबरोबरच त्यांनी विजापूर दरबार आणि गोवळकोंड्याचा कुतुबशाही दरबार यांची चाहूल घेण्याचें काम चालू ठेवलें. राजकारणांत जवळचा शेजारी स्पर्धेमुळे शत्रु होतो आणि त्याच्या पलीकडचा (मधल्याशीं समान शत्रुत्वामुळे) मित्र बनतो. तेव्हा मधला विजापुरी व मोगली राज्यांचा मुलूख सोडून पलीकडच्या कुतुबशाहीशीं संबंध दृढ करावे आणि या गराडा घालून बसलेल्या शत्रूंना पायबंद घालावा, हा एक महाराजांच्या मनांतला हेतु होता. पण त्याशिवाय आपला भाऊ व्यंकोजी तिकडे तंजावरांत नुसतेंच स्वार्थसाधन करून होता, त्याला आपल्या राजकारणांत भागीदार करावा, हाहि आणखी एक उद्देश होता. आपल्या उद्योगांत सामील झाला तर एकास दोन होऊं. सरळ नच वागला तर पारिपत्याचें पाहूं. असें, प्रसंग पाहून वागण्याचें महाराजांचें धोरण होतें.

सरहद्दीवरील स्वारीच्या या चारसहा महिन्यांत महाराजांना अनेक जय मिळाले; परंतु या सर्वांत इ. १६७६ च्या डिसेंबरच्या सुमारास त्यांचा सेनापति हंबीरराव याने हुसेनखान माइणा याच्यावर गदग प्रांतांत येलबुर्गा येथे मिळविलेला विजय मोठा होता. या युद्धांत दोन हजार घोडे आणि

अनेक हत्ती मराठ्यांना मिळाले आणि साहजिक महाराजांचें वजन वाढलें. गोवळकोंड्याच्या दरबारांतील राजांचा वकील प्रल्हाद निराजी तेथील सुल्तानाने महाराजांची भेट बरोबरीच्या इतमानाने घेऊन मराठ्यांच्या नव्या सार्वभौम राज्याला मान्यता द्यावी, म्हणून खटपट करीत होता. या कामीं गोवळकोंड्याचा प्रधान मादण्णा आणि त्याचा वजनदार भाऊ आकण्णा यांचें साह्य मिळालें, आणि सुल्तानाची खात्री पटून तो शेवटीं तयार झाला. हें सूत्र जमल्याचें कानीं येतांच महाराजांनी विजापूरच्या मुलखांत मांडलेला पसारा आटोपून गोवळकोंड्याकडे कूच केलें. गोवळकोंडें दरबारची मदत घेऊन पुढे ते तंजावरपर्यंत स्वारी करणार होते. ही योजिलेली स्वारी दूरवरची, स्वराज्यापासून दोन महिन्यांच्या मजलीवरची, दोन राज्यांच्या पलीकडची असल्यामुळे आपल्या पाठीमागे त्यांनी आग्र्याला जातेवेळीं केला होता तसा बंदोबस्त केला. आपल्या गैरहजेरींत मोरोपंत प्रधान, अण्णाजी दत्तो सचिव आणि दत्ताजी त्रिंबक मंत्री यांना त्यांनी राज्याच्या रक्षणास ठेवलें. संभाजीराजे युवराज वयांत येत होते. त्यांसहि कामगिरी सांगावी असा आदेश त्यांना दिला आणि मोगलांनी मागे फारसा त्रास देऊ नये म्हणून दख्खनचा सुभेदार बहादुरखान याच्याशींहि त्यांनी सलोख्याचा तह केला (इ. १६७६ डिसेंबर).

इ. १६७७ च्या मार्चमध्ये महाराज भागानगरास (गोवळकोंडें) गेले. गोवळकोंड्याच्या राज्यांतील या वेळचें महाराजांचें व त्यांच्या फौजांचें वर्तन आदर्श होतें. त्यांनी लूट किंवा दंगल कांही केली नाही. महाराजांच्या पराक्रमाच्या दहशतीने, चतुर वकिलांच्या राजकारणाने आणि खुद्द महाराजांच्या मुत्सद्देगिरीने महाराजांची छाप चांगली पडली. महाराज आता सार्वभौम छत्रपति झाले आहेत या गोष्टीला शोभेशा मान्यतेने कुतुबशाहाची भेट दरबारांत बरोबरीच्या नात्याने झाली. 'हजरत कुतुबशाहा पातशाहा' च्या पुढे महाराज वांकले नाहीत, किंवा त्यांनी त्याला अग्रमान दिला नाही. दोघेहि दरबाराला बरोबर आले व गळ्याला गळा लावून भेटले. 'आपली पातशाही वाढवावी,

पठाणाची नेस्तनाबूद करावी. दक्षिणची पातशाही आम्हां दक्षणियांच्या हातांत राहील तें करावें (उत्तरेंतील मोगलांचा हात इकडे शिरकूं देऊं नये)' असें दूरदर्शीपणाचें धोरण दोघांच्या भेटींत एकविचाराने ठरलें.

'दक्षिणी' धोरणाचा पुरस्कार

आधीपासून वकिलांमार्फत बोलणें लावल्याप्रमाणे हें धोरण गोवळकोंड्यांत मान्य झाल्याचें पाहून तें अमलांत आणण्याच्या मार्गाला महाराज लागले. त्यांनी आदिलशाहींतील एकएक फौजबंद सरदार फोडून गोवळकोंड्याच्या नव्या (म्हणजे 'दक्षिणच्या पातशाही'च्या) केंद्रामध्ये जमा करण्याचें ठरविलें. इ. १६४८ मध्ये शहाजी महाराजांना कैद करून मुस्तफाखानाच्या स्वाधीन करणाऱ्या (पृ. ४०–४१) बाजी घोरपड्याचा मुलगा मालोजी घोरपडे हा आता विजापूरचा सरदार होता. त्याचा आपला जुना दावा विसरून त्याला या सुमारास (इ. १६७७ मार्च) महाराजांनी लिहिलेलें सुमारें ९०० शब्दांचें एक विस्तृत पत्र मिळालें आहे. इतरांनाहि तशीं पत्रें गेलीं.

या पत्रांत 'आपली पातशाही वाढवावी. पठाणाची नेस्तनाबूद करावी' या सूत्राचा व त्या वेळच्या एकंदर राजकारणाचा खुलासा केलेला आहे. महाराज म्हणतात, "दक्षिणचे पातशाहा तीन. निजामशाहा, आदिलशाहा, कुत्बशाहा. त्यांमध्ये निजामशाही पादशाही बुडाली ते समई निजामशाही उमदे वजीर होते त्यांनी आदिलशाहीसी रुजुवाती (= स्नेहसंबंध) करून आपणास रोजगारास जागा केली. हल्ली आदिलशाही बहलोलखान पठाणी घेतली. पातशाहा* लहान लेकरूं नांव मात्र. ते आपले कैदेंत ठेवले आहेत. आणि तख्त व छत्र (आणि) विजापूरचा कोट पठाणाने काबीज केला आहे. ऐशियास दक्षिणचे पातशाहीस पठाण जाला हे गोष्टी बरी नव्हे. पठाण बळावला म्हणजे एका उपरी एक कुली (= सर्व) दक्षिणियांचीं घरें बुडवील. कोणास तगों देणार नाही. ऐसें आम्ही समजोन हजरत कुतुबशाहा पादशाहा यांसी रुजुवात राखिली होती."

---

*सिकंदर आदिलशाहा, वय वर्षें ९. याचा बाप अल्ली आदिलशाहा वारला (इ. १६७२ नोव्हेंबर २४) तेव्हा हा फक्त ४ वर्षांचा होता.

'विजापूर पठाणाचे हातीं गेलें. आता पूर्वीची आदिलशाही राहिलेली नाही'...'तुम्ही मराठे लोक आपले आहां; तुमचें गोमटें व्हावें,' असाच शहाजी महाराजांचा उद्योग होता. आणि तोच मला करावयाचा आहे. म्हणून हें मी तुम्हाला लिहीत आहे. हल्ली 'जें काय (जहागीर वगैरे) पठाण तुम्हांस देतो, त्याच्या दुप्पट तुम्हांस कुतुबशाहाकडून देववितो' असें आश्वासन त्या पत्रांत आहे. शिवाजी महाराजांचे या वेळचे एकंदर उभारीचे विचार आणि उद्योग या वानगीच्या वाक्यांवरून ध्यानांत येतील.

इकडे विजापूर दरबारांतील सरदारांचा आपल्या धोरणाला पाठिंबा मिळविण्याचा हा उद्योग चालू ठेवून तिकडे आदिलशाही कर्नाटकावर प्रत्यक्ष स्वारी करण्याचे बेत महाराजांनी आखले. महाराजांनी स्वारीसाठी निवडलेला हा मुलूख महाराजांच्या मुलखाचें दक्षिण टोक अंकोलें, आदिलशाहाची राजधानी विजापूर आणि कुतुबशाहीची राजधानी गोवळकोंडें या प्रत्येकापासून तीनचारशे मैलांच्या अंतरावर, दक्षिणेकडे दूर, पूर्वीच्या विजयनगरच्या साम्राज्यापैकी होता. त्या साम्राज्याचे अवशेष म्हणून आता लहान लहान संस्थानिक तेथे नांदत होते. आणि त्यांच्यांतील दुहीचा फायदा घेऊन विजापूरकर आणि गोवळकोंडेकर या दोन्ही सत्तांनी एक शतकभर त्यांच्या मुलखावर मन मावेल तसा हात चालविला. विजापूरकरांचा सरदार म्हणून खुद्द शहाजीराजांनी सुमारें इ. १६३६-३७ ते इ. १६६४ च्या दरम्यान त्यांतील जिंजीचा वगैरे मुलूख जिंकून विजापूरच्या राज्याला जोडला व हल्लीच्या म्हैसूर संस्थानच्या पूर्व भागांत शहाजीराजांना आदिलशाहीने आपली जहागीर दिली. आणि नुकतेंच शहाजीराजांचा मुलगा व राजांचा सावत्र भाऊ व्यंकोजी याने आणखी दक्षिणेकडे सरकून त्या जहागिरीएवढें मोठें तंजावरचें राज्य स्वतःसाठी मिळविलें. या वेळीं म्हणजे इ. १६७६-७७ मध्येहि तिकडे हेंच तीस-चाळीस वर्षांपूर्वीचें दुहीचें वातावरण चालू होतें. साधारणपणें (अलीकडच्या) म्हैसूर संस्थानचा पश्चिम भाग व त्याच्या दक्षिणेकडील बहुतेक प्रदेश स्वतंत्र नायक राजांच्या ताब्यांत होता. त्याच्या पूर्वेकडील मध्य कर्नाटक म्हणजे बंगरूळ, जिंजी, तंजावर व आसपासचा मुलूख आताच सांगितल्या-प्रमाणे शहाजीराजांसारख्या आदिलशाही सेनापतींनी आदिलशाहीसाठी

जिंकला होता. पण त्यांत कुतुबशाहीच्या कक्षेंतील मुलूख देखील घेतला होता. त्याच्या वरची साधारणपणें मद्रासपासून उत्तरेकडे मच्छलीपट्टण बंदरापर्यंतची पूर्वपट्टी गोवळकोंडेकरांनी आपल्या राज्याला जोडून घेतली. विजापूर व गोवळकोंडें हीं दोन राज्यें त्यांतल्या त्यांत अधिक संघटित होतीं व आपसांत वांटणी करून घेऊन हा बेवारशी मुलूख कुरतडून खात होतीं. पण तींहि आता खिळखिळीं झालीं होतीं. आणि ह्या दोन्ही शाह्यांचा घांस घेण्यासाठी उत्तरेकडील मोगल अगदी टपून बसलेले होते. तेव्हा या पुरातन हिंदु साम्राज्याचा कांही भाग मोगलांच्या आधी आपण तेथें पोंचून आपल्या ताब्यांत घ्यावा, अशी महाराजांची या वेळची कल्पना होती. विजापुरांत बहलोलखानाचा पठाणी पक्ष प्रबळ होतो असें पाहून, तेथील अंतःस्थ दुहीची व अंदाधुंदीची ही संधी बरी आहे असें महाराजांनी हेरलें आणि आदिलशाही व कुतुबशाही या दोन्ही दक्षिणेंतील शाह्यांच्या आपसांतील वैमनस्याचाहि फायदा घेतला. कर्नाटकांतील आदिलशाही मुलूख जिंकून गोवळकोंड्याच्या राज्याला जोडण्याचें आमिष त्यांनी कुतुबशाहाला दाखविलें व गोवळकोंड्याच्या माहितगार फौजा आपल्या मदतीला येतील अशी व्यवस्था केली.

शिवाजी महाराजांबरोबर गोवळकोंड्याचा तोफखाना व सैन्य कर्नाटकाच्या स्वारीवर यावें व महाराजांना स्वारीच्या खर्चाला दररोज ३००० होन कुतुबशाहाने द्यावे. कुतुबशाही कर्नाटकांतील बेबंदशाही मोडून तेथे महाराजांनी बंदोबस्त करावा. शहाजीराजांच्या जहागिरीबाहेरील पण आदिलशाहीने कुतुबशाहीच्या वांटणीपैकी जिंकलेला मुलूख महाराजांनी जिंकून घेऊन कुतुबशाहीच्या राज्याला जोडावा; व गोवळकोंडेकर व शिवाजी महाराज या उभयतांनी मिळून उत्तरेकडील मोगलांचें आणि पठाणांच्या आहारीं गेलेल्या आदिलशाहीचें असें दोघांचेंहि पारिपत्य करावें, असें या व्यवस्थेमध्ये ठरलें. त्याप्रमाणे शिवाजी महाराज व गोवळकोंड्याचा सेनापति मिर्झा महमद अमीन असे मिळून कर्नाटकाच्या स्वारीवर निघाले आणि दिवाण मादण्णा व सरलष्कर इब्राहिमखान हे विजापुरावर चाल करून गेले (इ. १६७७ मार्च-एप्रिल).

दक्षिणेवर स्वारी

गोवळकोंड्याच्या राजधानींत महाराजांचा मुक्काम कांही दिवस होता. तेवढ्यांत सवड काढून त्यांनी कृष्णेपलीकडील श्रीशैल येथील मल्लिकार्जुन या प्रसिद्ध ज्योतिर्लिंगाचें दर्शन घेतलें. तें महास्थळ पाहून आपलें शिरकमल शिवाला वाहून सार्थक करावें, असें क्षणभर महाराजांच्या मनांत चमकून गेलें, असें बखरकार सभासद याने वर्णिलें आहे; पण एकदा तहाच्या वगैरे गोष्टी मनासारख्या पार पाडल्यावर अधिक वेळ न घालवितां महाराजांनी जिंजीकडे रोख धरला आणि मधला कुतुबशाहीचा मुलूख ओलांडून त्यांचे आघाडीचे घोडेस्वार मे ८–९ ला मद्रासच्या नजीक तिरुपति, कांजीवरम् या ठिकाणीं जाऊन पोंचले. पालर नदीच्या दक्षिणेकडे वेलोर, जिंजी वगैरे प्रमुख किल्ले व मुलूख यांवर महाराजांची शिस्त आहे असें पाहून या दोन्ही मुलखांतील ठाणेदारांनी प्रतिकाराची तयारी केली. परंतु जिंजीचा किल्लेदार नासीर महमद याचा टिकाव लागला नाही आणि त्याने थोडयाच दिवसांत किल्ला महाराजांच्या हवालीं केला. महाराजांनी लगोलग तेथे आपला अधिकारी नेमला व तेथून दुसरा जरा अभेद्य किल्ला जो वेलोर त्याच्याकडे मोर्चा वळविला. मे २३–२४ ला शिवाजी महाराज वेलोरच्या वेढ्यांत देखरेख करीत होते. हा वेढा १४ महिने चालला. आणि शेवटीं महाराष्ट्रांतून जुलैमध्ये आलेले रघुनाथपंत व आनंदराव यांनी पुढे इ. १६७८ जुलै २२ रोजीं तो जिंकून घेतला. वेलोरच्या किल्ल्याचें काम असें रेंगाळत पडल्यामुळे शिवाजी महाराज तें वरील अधिकाऱ्यांवर सोपवून त्या प्रांताचा सरसुभेदार शेरखान लोदी याच्या पाठीवर दक्षिणेकडे निघाले. तिकडे विजापूरच्या राज्यांत बहलोलखान लोदी हा एका बाजूने मोगल आणि दुसऱ्या बाजूने शिवाजी महाराज व गोवळकोंडेकर अशा दोघांच्या फौजांच्या पेंचांत सापडल्यामुळे त्याची मदत या बाजूला येऊं शकली नाही. शेवटीं शेरखानाचा पराजय झाला आणि इ. १६७७ जुलै १५ रोजीं नाइलाजाने मुलूख महाराजांच्या हवालीं करून तो मोकळा झाला. महाराजांनी त्याला सन्मानाने वागविलें; परंतु २० हजार होनांची खंडणी बसवून तिच्यासाठी त्याच्या मुलाला ओलीस ठेवून घेतलें. ती खंडणी भरून इ. १६७८ च्या फेब्रुवारींत त्याने आपल्या मुलाला सोडविलें. परंतु तो महाराजानी सुचविल्या-प्रमाणे त्यांच्या नोकरींत न येतां मदुरा नायकाच्या नोकरींत गेला.

शेरखानाचा बंदोबस्त झाल्यावर महाराज आणखी पुढे गेले. आणि तिरुमलवाडयास कावेरी नदीवर आपला तळ ठेवून मदुरेच्या नायकाकडून त्यांनी खंडणीचा तह करून घेतला.

अर्ध्या वांटणीची मागणी

जरा पलीकडेच तंजावर येथे महाराजांचा भाऊ व्यंकोजी होता. त्याला महाराजांनी भेटीला बोलाविलें. आणि तो आला तेव्हा शहाजीचे नक्द पैके, जडजवाहीर, हत्ती, घोडे व मुलूख जो त्याला मिळाला होता त्या सर्वांचा आपला अर्धा वांटा त्याच्याजवळ मागितला. 'शहाजीच्या मृत्यूनंतर (इ. १६६४) तुम्ही तेरा वर्षें सर्वच खाल्लें. आता आम्हांस आमचा वांटा द्यावा' अशी महाराजांची मागणी होती. पण ती व्यंकोजीला आवडली नाही. आणि लोकांनी परस्पर भीति घातल्यामुळे व्यंकोजीराजे महाराजांच्या मागणीला कांहीच उत्तर न देतां आणि जातों असें देखील न सांगतां पळून गेले (इ. १६७७ जुलै २५). त्यानंतर आपसांत गृहकलह वाढवूं नये म्हणून भले लोक मध्ये घालून त्याची समजूत घालण्याची महाराजांनी पुष्कळ खटपट केली. पण ती न मानतां दुर्योधनासारखी दुष्ट बुद्धि धरून व्यंकोजीने महाराजांशीं युद्ध करूनच आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्याचें टरविलें. आणि रायगडाकडे कांही कामगिरी निघाल्यामुळे ऑगस्ट-सप्टेंबरांत वर तोरगलाकडे महाराज परत गेल्याची संधी साधून त्याने त्या प्रांतांत बंदोबस्तासाठी ठेवलेल्या संताजीराजे याच्याशीं झगडा चालविला. संताजीवर नोव्हेंबर १५–१६ ला व्यंकोजीने अचानक मोठा हल्ला केला. सतत बारा तास युद्ध होऊन त्यांत संताजीचा पराभव झाला व संताजीला मागे हटावें लागलें. पण त्यामुळे नामोहरम न होतां संताजीने त्याच मध्यरात्रीं आपलें सैन्य गोळा केलें व छापा घालून व्यंकोजीला जेरीस आणलें. या वलीगंडपूरच्या लढाईत व्यंकोजीची दाणादाण उडाली. आणि तरी देखील जेव्हा व्यंकोजी सामोपचाराला तयार होत नाही असें स्पष्ट झालें, तेव्हा महाराजांना सर्वच गोष्टी अनुकूल असल्यामुळे, शहाजीराजांचीं बंगरूळ, होसकोट. सिरे वगैरे ठाणीं व शेजारचीं राज्यें त्यांनी मध्यंतरीं अल्पावकाशांत 'सोडवून' म्हणजे जिंकून घेतलीं. महाराजांनी मनांत आणलें असतें तर व्यंकोजीला त्यांनी निराधार करून सोडलें असतें.

महाराजांचा हा पराक्रम पाहून मग त्याला सुबुद्धि सुचली. शिवाजी महाराजांचे कर्नाटकांतील मुख्य कारभारी रघुनाथ नारायण हणमंते यांच्या-मार्फत त्याने बोलणें लावलें आणि मग भावाभावांमध्ये समजुतीचा तह झाला. त्यांत महाराजांनी व्यंकोजीला त्याचा पूर्वीचा बहुतेक मुलूख व थोडा अधिकच त्याच्याकडे लावून दिला.

शिवाजी महाराजांच्या अर्ध्या वांटणीच्या मागणीकडे व्यंकोजीने एवढ्या शत्रुबुद्धीने पाहण्याचें वास्तविक कारण नव्हतें. कारण तुम्ही निर्मळ मनाने संधि केला तर तुमचें नुकसान न करितां तुंगभद्रेअलीकडे आमच्या पन्हाळाप्रांतीं तुम्हांस तीन लक्षांची जहागीर देतों, किंवा आमची जहागीर नको असेल किंवा तुम्हांला त्यांत कमीपणा वाटत असेल तर, तेवढीच जहागीर कुतुबशाहाकडून देववितों, असें स्वतः पत्र लिहून महाराजांनी व्यंकोजीला सुचविलें होतें. मालोजी घोरपड्याला लिहिलेलें पत्र मागे दिलें आहे (पृ. २०७); त्याच नमुन्याचें हें पत्र आहे. आपला भाऊ शत्रुसत्तेचा ताबेदार राहू नये एवढाच त्यांचा यांत स्वाभिमानी हेतु होता, हें व्यंकोजीच्या जवळच्या व शिवाजी महाराजांच्या मुत्सद्द्यांनी व्यंकोजीला सांगितलें असलें पाहिजे. पुढे इ. १६७९ मध्ये विजापूरच्या राज्यावर मोगलांचा सेनापति दिलेरखान याच्या जबरस्तीमुळे महान् संकट आलें असतां, विजापूरचा वजीर सिद्दी मसऊद याने महाराजांशीं जो तह केला, त्यांत त्यांनी मुद्दाम नमूद केलेल्या एका कलमांत तर विजापूरच्य दास्यांतून व्यंकोजीला वांचविण्याचा उद्देश स्पष्ट दिसतो. याविषयीं व्यंकोजीला लिहिलेल्या पत्रांत महाराज लिहितात, 'होसकोट, बंगरूळ, अरणी, तंजावर हा तुमच्याकडचा मुलूख मीं आता विजापूरकरांकडून आपणाकडेच लावून घेतला. यामुळे त्याबद्दल द्यावी लागणारी खंडणी व नजराणा आता तुम्हीं देण्याचें कारण नाही.' 'आवघे आम्हीच मान्य केलें.' तुमच्या वतीने देखील सर्व द्यावयाचें तें आमचें आम्ही देऊं (किंवा न देऊं!). हीच स्नेहबुद्धि रघुनाथपंत हणमंत्यांमार्फत व्यंकोजीसाठी

पाठविलेलीं 'वर्तायाचीं कलमें' 'शिवदिग्विजयां'त दिलेलीं आहेत, त्यांत दिसून येते. त्या कलमांत कर्नाटकांतील शहाजीच्या जहागिरीपैकी आज (म्हणजे त्या वेळीं) दोन लाखांचा पण पुढे पांच लाख उत्पन्नाचा होणारा मुलूख भावजईला चोळीबांगडीसाठी, आणि जिंजीप्रांतापैकी सात लाख होनांचे महाल व्यंकोजीला दूधभातासाठी, म्हणून लावून दिलेले आहेत. बलीगंडपूरच्या पराभवामुळे विषण्ण झालेल्या व्यंकोजीला वडीलकीने समाधान करण्यासाठी म्हणून जें पत्र महाराजांनी पाठविलें आहे, त्यावरून हे घरगुती संबंध अखेरपर्यंत सांभाळण्याची त्यांची उत्कट इच्छा दिसून येते. या पत्राचें शब्दशः इंग्रजींत भाषांतर ग्रँट डफने आपल्या इतिहासांत दिलें आहे. इतकें तें त्याला महत्त्वाचें वाटलें. शहाजीचें उदाहरण देऊन महाराज त्यांत धीर देण्यासाठी व्यंकोजीला लिहितात, "त्यांच्याजवळ (वडील शहाजीराजे यांच्याजवळ) राहून तुम्ही शहाणे झाले आहां. असे उदासीन होऊं नये." 'आम्ही तुम्हांस वडील मस्तकीं असतां चिंता कोणे गोष्टीची आहे? पुरुषार्थ व कीर्ति करून दाखविण्याचे तुमचे दिवस आहेत.' हे उद्गार भांडखोर दायादाचे आहेत का वत्सल वडील भावाचे आहेत?

नवें राज्य कमाविण्याचें धोरण

शिवाजी महाराज तोरगलकडे गेले ते लौकरच परत येतो म्हणून सांगून गेले, आणि आपल्यामागे त्यांनी संताजीराजे, रघुनाथपंत हणमंते व हंबीरराव यांच्यावर दक्षिणेंतील बंदोबस्ताचें काम सोपविलें. स्वारीच्या मुदतींत मोहीम आपल्या हाताखालच्या लोकांवर सोपवून ते असेच अधूनमधून गोवळकोंड्याला खेप टाकून तेथील सुल्तानाला मार्गदर्शन करीत. आणि त्यांच्या फौजा तिकडे उत्तर कर्नाटकांत देखील बंकापूर, अथणी आणि इतर ठिकाणीं मनमुराद संचार करीत. पण या वेळीं केवळ लूट करण्याकडे त्यांचें लक्ष नव्हतें. तर नवें राज्य कमविण्याचें त्यांचें धोरण स्पष्ट दिसतें. त्या बाजूच्या जेस्विट् मिशनऱ्यांच्या हें चांगलें लक्षांत आलें. 'हिंदुस्थानांतील मुसलमान सगळे एकवटून चालून आले, तरी त्यांना प्रतिकार करतां यावा म्हणून शिवाजीने बंदोबस्त करण्यास सुरवात केली,' असें ते म्हणतात. त्यासाठी जिंकलेल्या किल्ल्यांची दुरुस्ती करण्याचें व नवे किल्ले बांधण्याचें ठरवून महाराजांनी इंग्रजांकडे तोफांचे गाडे करणारीं व सुरुंग

लावणारीं तरबेज माणसेंहि मागितलीं. बांधकाम करणाऱ्या इंजिनिअरांची मागणी केली. महाराजांनी मागितलेलीं पुष्टिकारक रत्नें व विषावरील उतारे हीं इंग्रजांनी अगत्याने दिलीं; परंतु इंजिनिअर वगैरे लढाऊ लोक दिले नाहीत. ते दिले तर महाराज प्रबळ होतील; शिवाय गोवळकोंडेकर व मोगल यांना ती गोष्ट आवडणार नाही; या विचाराने त्यांनी इंजिनिअर पुरविले नाहीत. पण म्हणून महाराजांचें काम अडून राहिलें असें नाही. त्यांनी उत्कृष्ट युरोपीय नमुन्यावर जिंजीच्या तटाचें व बुरुजांचें बांधकाम केलें. या कामीं लक्ष घालणारे व महाराजांचा उजवा हात म्हणून शोभणारे रघुनाथ नारायण हणमंते या वेळीं महाराजांच्या सेवेंत होते. त्यांस दसऱ्याच्या सुमारास (इ. १६७७ सप्टें. २६) दक्षिणची मजमू व जिंजी प्रांताचा सरसुभा असे महत्त्वाचे अधिकार महाराजांनी सांगितले आणि त्यांच्यावर तिकडला सर्व व्यवहार सोपवून महाराज परत स्वदेशीं फिरले. या वेळीं मराठ्यांनी म्हैसूरमधील सधन शहर श्रीरंगपट्टण लुटलें. तिकडून कोलार, कोपळ, लक्ष्मेश्वर, संपगांव येथील बंदोबस्त करीत महाराज परत येत असतां, वाटेंत बेलवाडीकोटाच्या देसायणीने थोडासा अतिप्रसंग केला. महाराजांच्या लष्करचे बैल पळवून नेले ! अर्थात् तिचें पारिपत्य करावें लागलें. तें करून व नंतर गदग प्रांत काबीज करून, महाराज इ. १६७८ च्या मे-जूनमध्ये रायगडास परत आले. एकंदर सुमारें १८-१९ महिने बाहेर राहून व मोठा दिग्विजय संपादून महाराजांनी स्वगृहीं आगमन केलें. स्वराज्याची उभारणी करतांना महाराज नेहमी जातीने संकटाच्या आघाडीवर झेप घेत. परंतु आता हाताखाली लायक लोक तयार करून त्यांच्यावर कामगिरी सोपविण्याची खबरदारी घेतांना ते दिसतात. उत्कृष्ट नेत्याची कसोटी हीच आहे. या दक्षिणच्या जंगी मोहिमेंत अनेक ठिकाणीं त्यांचे विश्वासाचे अधिकारी त्यांच्या प्रत्यक्ष देखरेखीशिवाय पराक्रम गाजवितांना दिसतात. वेलूरचा कोट महाराजांच्या गैरहजेरींतच यानंतर जुलैमध्ये रघुनाथराव व आनंदराव यांनी घेतला. व्यंकोजीवरील मोहीम एकट्या संताजीनेच आधीच्या नोव्हेंबरांत यशस्वी केली.

मुसलमानी सत्तांतील चौरंगी सामना

आपलें सामर्थ्य पद्धतशीरपणें वाढवून शिवाजी महाराज आता बलिष्ठ

बनले होते. यामुळे त्यांच्या या नवेंच राज्य संपादन करण्याच्या दक्षिणेंतील उद्योगांत कोणी व्यत्यय आणायला धजलें नाही, हें खरेंच आहे. शिवाय त्यांनी या स्वारीवर निघतांना मोगल व विजापूरकर यांच्याशीं गोवळकोंडेकरांचें भांडण लावून त्या सान्यांना गुंतवून ठेवण्याची खबरदारी घेतली हेंहि खरें आहे (पृ. २०९). इ. १६७६ जूनच्या पुढच्या कालांतील राजकारणाचें एक वैशिष्ट्य ध्यानांत घेण्यासारखें आहे. आतापर्यंत मोगल व विजापूरकर या दोघांनाहि महाराजांनी स्वपराक्रमाने दमविलें. तेव्हा या दोघांशींहि आता साधेल त्या मार्गाने त्यांनी आपल्यापुरता सलोखा संपादिला आणि स्वतःला दक्षिणच्या स्वारीसाठी मोकळें करून घेतलें. पण विजापूरकर व मोगल यांची आपसांतील स्पर्धा तशीच कायम राहिली. त्यामुळे विजापूरच्या राज्यांतील पठाणी व दक्षिणी पक्षांच्या लाथाळीचा फायदा घेण्यासाठी मोगल फौजा विजापुरावर चालून गेल्या. त्याचप्रमाणे गोवळकोंडेकरांनाहि दक्षिणी पक्षाचा कैवार घेऊन खुद्द विजापुरांत व प्रसंग पडेल त्याप्रमाणे मोगलांशींहि भांडायला कारण मिळालें. मुसलमानांच्या ह्या तिरंगी-चौरंगी सामन्यांत आपसांतील झगड्यांमुळे मुसलमानी सत्तांचें सामर्थ्य कमी झालें आणि शिवाजी महाराजांची मदत घेतल्याशिवाय कोणत्याहि एका पक्षाची समाधानकारक तड लागू नये असें वातावरण आपोआप तयार झालें.

या झगड्यांतील लढतीचे रंग वारंवार बदलत राहिले. कारण प्रत्येक सत्तेचें धोरण केवळ तात्पुरत्या वैयक्तिक स्वार्थाने आंखलें जाई आणि त्याच्यामागे कायमचें सूत्र नसे. इ. १६७६ जून १ ला मोगलांचा सुभेदार बहादुरखान याचा विजापूरच्या बहलोलखानाने पराभव केला (पृ. २०३) व शिवाजी महाराजांविरुद्ध सर्व पठाणांची एकजूट करण्याच्या अटीवर मोगलांशीं तह करण्याची तयारी दाखविली. तें त्या वेळीं बहादुरखानाने मानलें नाही. पण नंतर सरदार दिलेरखान जादा फौज बरोबर घेऊन त्याच्या मदतीला आल्यावर मात्र त्याने बेत बदलला. गोवळकोंडेकर शिवाजीराजाला मदत देतात म्हणून त्याचें पारिपत्य करावें, आणि त्या स्वारींत बहलोलखानाने मोगलांना मिळावें, अशी प्रथम गोवळकोंड्याविरुद्ध नवी मोगल-विजापूरकर फळी बनविण्याला त्याने आता संमति दिली. त्याप्रमाणे गुलबर्गा हा आदिलशाही किल्ला कुतुबशाहाने घेतला होता तो परत मिळविण्यासाठी, विजापूर व गोवळकोंडें यांच्या राज्यांच्या हद्दीवर, ह्या दोन दोस्तांची गोवळकोंड्याविरुद्ध

मोठी लढाई जुंपली. बहादुरखान व दिलेरखान हे मोगलांचे आणि बहलोलखान हा विजापूरचा असे तीन सेनापति एका बाजूला होऊन त्यांनी प्रथम जून-जुलैमध्ये (इ. १६७६) गोवळकोंडेकरांचा पराजय केला आणि गुलबर्गा किल्ला घेतला. पण कुतुबशाहाचें याहून अधिक नुकसान झालें नाही. बहादुरखानाच्या अनेक पराभवांमुळे आणि लाचखाऊ घरसोडीमुळे बहादुरखानावर औरंगजेबाची आधीच इतराजी झाली होती. तेव्हा ऑगस्टांत त्याला परत बोलावून त्याने दिलेरखानासच दक्षिणची सुभेदारी दिली. परंतु तो देखील फारसें कांही करूं शकला नाही. कारण खुद्द विजापुरांतच दक्षिणी पक्षाची उठावणी झाली. तेथे माजलेल्या झगड्यांत व गोवळकोंडेकरांच्या लढाईंत दिलेरखानाचा पक्षपाती बहलोलखान अपयशी ठरला. आणि विजापुरांतील दक्षिणी पक्षाचे सेनापति सर्जाखान व मसउदखान आणि गोवळकोंड्याचे सरलष्कर इब्राहिमखान असे एकत्र मिळून त्यांनी दिलेरखानाशीं झुंज दिली. पहिल्याने त्यांचा एकदा पराजय झाला; पण नंतर मालखेडजवळ दिलेरखानाचा त्यांनी पुरा पराजय केल्यामुळे (सप्टेंबर १५) त्याला उत्तरेकडे नळदुर्गापर्यंत हटावें लागलें. पराभूत झालेला बहलोलखान त्यानंतर लौकरच वारला (इ. १६७७ डिसें.) आणि पठाणी पक्षाचें दक्षिणेंतील राजकारण पुढाऱ्याच्या अभावीं मागे पडून, विजापुरांत महाराजांना सर्वस्वी अनुकूल असलेल्या दक्षिणी पक्षाचा पुढारी मसउदखान कारभारी झाला.

स्वराज्याची खंबिरी

खुद्द स्वराज्यांतहि महाराजांची चलती होती. स्वराज्यांत बंदोबस्तासाठी ठेवलेले मोरोपंत पेशवे, अण्णाजी दत्तो अशा महाराजांच्याच तालमींत तयार झालेल्या सेनापतींनी वेळोवेळी भराऱ्या मारून उत्तरेकडे मोगलांच्या व दक्षिणेकडे विजापूर राज्याच्या हद्दीवर स्वाऱ्या केल्या. सुरतेकडे तर वारंवार हूल उठे. मागे गोव्यांत घडलें त्याप्रमाणे सुरतेंत आपले लोक गुप्तपणें भरती करून तें शहर घेण्याचा मराठ्यांनी बेत आखला आहे, असेंहि कित्येकांनी उठविलें. कारण त्यांनी सुरतेच्या सुभेदाराकडे खंडणी मागण्याचा सपाटा चालू ठेवला. राज्यांतील रायगड, साल्हेर अशा

मोक्याच्या किल्ल्यांत या काळजीवाहू सरकारने शिबंदीचा बंदोबस्त उत्तम राखला. आणि इतरांच्या मुलखांत मोका मिळेल त्याप्रमाणे लूट चालविली. मोरोपंत पेशव्यांनी नाशिक, त्रिंबक अशीं मोगलाईतील शहरें लुटलीं आणि दत्ताजी पंडित हुबळीच्या आसपास लुटालूट करीत फिरत होता. विजापुराहून पराजित होऊन आलेला मोगलांचा सेनापति दिलेरखान किंवा खुद्द विजापूरचा सेनापति सर्जाखान महाराजांवर चालून आले, इतक्यांत येणार, अशा किती तरी बातम्या उठत व त्यांच्या हितशत्रूंना आनंददायक वाटत. परंतु एकंदरींत महाराजांची पात्रता आणि त्यांनी स्वपराक्रमाने मिळविलेलें दख्खनच्या राजकारणांतील स्थान, यांबद्दल आता दुमत नव्हतें. सेनापति म्हणून महाराजांची तुलना युरोपीय लोकांनी सेर्टोरिअस किंवा हॅनिबाल यांच्याशीं केली. आणि गोवळकोंडेकर, विजापुरांतील दक्षिणी पक्ष आणि शिवाजी महाराज असे त्रिवर्ग एकजूट करून मोगलांना दख्खनमधून हाकून लावणार आणि या एकजुटीचा आधारस्तंभ शिवाजी महाराजच आहेत ही सत्यस्थिति त्यांनी अगदी अचूक निवेदन केली. पोर्तुगीज लोकांच्या धर्मच्छळामुळे कंटाळलेलीं ब्राह्मण कुटुंबें पोर्तुगीजांचा मुलूख सोडून सुरक्षिततेसाठी मुंबईकडे जात. त्याबद्दलहि महाराजांचा वारस संभाजी याने विचार चालविला. सिद्दीचा बंदोबस्त प्रथम करण्याचें ठरलें होतें; तथापि इतर मोटी कामगिरी हातांत असल्यामुळे तें थोडें मागे पडलें. इंग्रज राजापूरच्या कराराबद्दल असमाधानांत होते; परंतु त्यांचेंहि मनावर घेण्याइतकें त्यांना महाराजांच्या गणतींत महत्त्व नव्हतें. तात्पर्य, या वर्ष दीड वर्षांतील राजकारण बारीक गोष्टींसभोंवतीं न घोटाळतां सुरतेपासून कन्याकुमारीपर्यंत एकट्या शिवाजी महाराजांच्या नांवाने घुमत होतें. मोगल हात धुऊन महाराजांच्या पाठीस लागले. पण प्रत्येक क्षणीं ते फजीत झाले. विजापूरकर तसे जळफळतच होते. गोवळकोंडेकर नाखूष असले, तरी एक शब्द बोलण्याची त्यांची प्राज्ञा नव्हती. मग सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज यांची कथा काय? शिवाजी महाराजांचा हा पराक्रम सामान्य नव्हता. हा सर्व डोलारा एकट्या माणसाने उभारलेला होता. तथापि त्याची जबाबदारी अंगावर घेऊन ती पार पाडण्यास समर्थ असे निदान दहावीस तरी वीर व मुत्सद्दी शिवाजी महाराजांनी आपल्या नजरेखाली वाढविले किंवा निवडून हातीं धरले. त्यामुळे स्वराज्याची भावी कालांतील खंबिरी निश्चित झाली.

महाराजांचे हे विश्वासू मदतनीस आणि त्यांच्या फौजा ज्याप्रमाणे सर्वत्र संचार करीत, त्याप्रमाणे महाराजांचें मनहि उत्तरेस दिल्लीपासून दक्षिणेकडे तंजावरपर्यंत संचार करी. पंचवीस वर्षांचा इतिहास घडवून दाखविणाऱ्या महाराजांना पुढच्या दुर्दिनांची कल्पना आली असली पाहिजे. त्यांच्या दूरदर्शी राजकारणाबद्दल त्यांच्या हालचाली समक्ष पाहणाऱ्या समकालीन परदेशस्थांनी त्यांना उघड उघड धन्यवाद दिले आहेत. इंग्रज म्हणतात, ‘ शिवाजीचे बेत वर वर दिसतात त्यापेक्षा दूरवर पोंचणारे आहेत. ’ दक्षिण दिग्विजयाचा उद्देश केवळ तात्पुरता नाही. “ हिंदुस्थानांतील मुसलमानांचें बळ लक्षांत घेऊन, भविष्यत्कालीं त्यांच्या सर्व एकवटलेल्या सामर्थ्याचाहि प्रतिकार करतां यावा म्हणून त्याने योजना करून निसर्गतःच दुर्गम असलेल्या जिंजी किल्ल्याची पुनः डागडुजी केली. पहिले तट पाडून नवे तट व बुरुज बांधले. जुने निरुपयोगी किल्ले पाडून नवे भुईकोट व डोंगरी किल्ले बांधले. मोठे खडक फोडले. तलाव बांधले. युद्धोपयोगी इमारती बनविल्या. ” असें वर्णन तिकडील जेस्विट् मिशनऱ्यांनी तपशीलवार लिहून ठेविलें आहे, त्याचा उल्लेख वर एकदा आलाच आहे. शिवाजी महाराजांनी तिकडे जिंजीकडे जाऊन जणूं नवें राज्यच निर्माण करून ठेविलें. या राज्याचा पाठपुरावा करून सर्व कर्नाटक मराठी अमलाखाली आणण्यास यापुढे महाराज फार काळ जगले नाहीत. तरीदेखील तंजावर राज्यांत मराठीची छाप राहून तेथे विद्याकलांना उत्तेजन मिळण्यास जागा राहिली, याचें कांही श्रेय महाराजांच्या या दिग्विजयाला द्यावें लागेल. मुसलमानी अमलाखालून काढून महाराजांनी आपल्या स्वराज्याला या वेळीं जोडलेला हा मुलूख नाही तर आदिलशाही व कुतुबशाही यांच्या विनाशाबरोबर मोगलांच्या साम्राज्यांत सामील झाला असता. समकालीन आणि भावी राजकारणाचें हृदय पारखून दक्षिणेंत घेतलेली ही खबरदारी पुढे मराठ्यांना प्रत्यक्ष उपकारक झाली. तसा संभव लक्षांत घेऊनच शिवाजी महाराजांनी ही हालचाल केली असेल काय ?

* * *

१९ दक्षिणेचा कैवार

आदिलशाहीचा पाठपुरावा

विजापुरांत पठाणपक्षाच्या बहलोलखानानंतर दक्षिणी पक्षाचा सिद्दी मसउद हा वजीर झाला. पण विजापुरांत त्याच्या पक्षाचें निर्विवाद वर्चस्व झालें असा याचा अर्थ नव्हता. आणि कुतुबशाही, मोगल आणि शिवाजी महाराज यांपैकी कोणावरहि त्याचा पक्का विश्वास नसल्यामुळे, तिघांशींहि संबंध सांभाळून आपलें स्थान स्थिर राखण्याचा अशक्य उद्योग त्याने आरंभला. एकीकडे बहलोलखान पक्षाच्या पठाणांचें बंड मोडण्यासाठी त्याने कुतुबशाहाकडे कर्ज मागून अंतर्व्यवस्थेंत त्याच्या सल्ल्याने वागण्याचें ठरविलें. आणि दुसरीकडे दिलेरखानामार्फत स्वतःच्या वजिरीला मोगलांचें पाठबळ मिळालें, तर मोगलांचें शिवाजीविरुद्ध राजकारण अंगावर घेऊन चालविण्याचेंहि त्यांना कबूल केलें. आणि जेव्हा अशा प्रकारें परस्परांच्या शत्रूंशीं स्नेह ठेवल्याने त्या दोघांची नाखुषीच पदरांत पडते हें त्याला पटलें, तेव्हा मसउदने मग त्या दोघांविरुद्ध शिवाजी महाराजांचीहि मदत मागितली ! ही धरसोड पाहून दिलेरखानाने विजापूरवरील स्वारी पूर्ववत् सुरू ठेविली. आणि शिवाजी महाराजांकडे मसउद निकडीने मदत मागूं लागला. इ. १६७८ च्या पावसाळ्यांत या भानगडींमुळेच शिवाजी महाराजांवर विजापूरकरांचीं व मोगलांचीं सैन्यें चालून येत असल्याबद्दलच्या परस्पर विसंगत बातम्या सारख्या उठत होत्या. त्यांत तथ्य नव्हतें असें नाही, आणि म्हणून प्रसंग पडेल त्याप्रमाणे तिकडील राजकारणाचें अनुसंधान राखण्याकरिता शिवाजी महाराजहि पन्हाळ्यास येऊन कानोसा घेत राहिले.

त्या वेळच्या असल्या अस्थिर वातावरणांत विजापूरकर व शिवाजी महाराज यांच्या सैन्यांची परस्परांवर चढाई तशी थांबलेली नव्हती. सर्जाखानाने मे-जूनमध्ये अथणी व रायबाग येथील महाराजांचीं ठाणीं उठविलीं;

तर महाराजांच्या सैन्याने मुलगुंद, लक्ष्मेश्वर, गदग अशा विजापूरकरांच्या महत्त्वाच्या पेठा लुटल्या. ऑगस्टांत जमशीरखान, सलीमखां, सर्जाखान व सिद्दी मसउदचा मुलगा असे मिळून महाराजांवर चालून येण्याची तयारी करूं लागले. महाराजांचें सैन्यहि पन्हाळयाखाली गोळा झालें व पावसाळा संपतांच लढाई सुरू झाली. ऑक्टोबर २८ ला जमशीरखानाच्या आघाडीच्या फौजांशीं जरा एकाकी गांठ पडल्यामुळे महाराजांच्या एका तुकडीचें थोडें नुकसान झालें. परंतु जमशीरखानाचें मुख्य सैन्य बंकापूरच्या किल्ल्याच्या आश्रयाला येऊन जरी तयार राहिलें होतें, तरी त्याला महाराजांवर समोरासमोर स्वारी करण्याचें धाडस करवेना. विजापुराहून सर्जाखानाच्या आणखी फौजा येण्याची तो वाट पाहात राहिला.

दक्षिणेंतील सर्वांचा शत्रु जो मोगल त्याच्याशीं महाराजांचा चाल्लेला अखंड सामना तसाच चालू होता. मोगलांच्या मुलखांत महाराजांचीं सैन्यें सदैव फिरत राहिलीं. औरंगाबादेकडे जून-जुलैंत गेलेल्या सैन्याने मोगलांच्या मुलखांतून बेलाशक चौथाई वसूल केली. आणि दिलेरखान विजापूरच्या स्वारींत गुंतला असल्यामुळे आणखीहि मोगलांचा मुलूख त्यांनी उद्‌ध्वस्त केला. शिवाय गेल्या सप्टेंबरांत बहादुरखानानंतर दिलेरखानाला मिळालेला सुभेदारीचा अधिकार काढून घेऊन आता शहाजादा मुअज्जम यालाच औरंगजेबाने सुभेदार नेमलें आणि तो इ. १६७९ फेब्रुवारी २५ ला औरंगाबादेस आला. त्याचें व दिलेरखानाचें मूळचें वितुष्ट होतें. तें आता महाराजांच्या पथ्यावर पडलें.

संभाजीराजे मोगलांकडे जातात

परंतु मध्यंतरीं एक दुर्दैवी घटना घडली आणि शिवाजी महाराजांची विवंचना शतपट वाढली. मुअज्जम दक्षिणेंत येण्यापूर्वी महिना दीड महिना म्हणजे इ. १६७८ डिसेंबर १३ ला युवराज संभाजीराजे महाराजांना पारखे झाले. ते परळीच्या सज्जनगडावर होते. तेथून जुजबी कबिल्यासह मोगलाईत दिलेरखानाला जाऊन मिळाले. त्याने त्यांना सप्तहजारी मनसब देऊन सत्कार केला आणि महाराजांविरुद्ध हा हुकमाचा एक्का, प्रत्यक्ष महाराजांचा वारस, मराठ्यांचा भावी छत्रपति, आपल्या हातांत घेऊन त्याच्या जोरावर महाराजांना नमविण्याचा त्याने डाव रचला.

संभाजीराजांचें वय या वेळीं साडेएकवीस वर्षांचें होतें. म्हणजे ते चांगले समजदार होते. स्वतःचें बालपण स्मरून महाराजांनी चौदाव्या वर्षांपासून त्यांना कारभार सांगितला. महाराज कर्नाटकाच्या मोहिमेवर गेले असतांना राजापूरच्या इंग्रज वखारवाल्यांची समजूत घालण्याचें जबाबदारीचें काम संभाजीराजांनी केलें (इ. १६७७ जानेवारी). आठ एक महिन्यांनी ऑक्टोबर २१ ला त्या भागांतील अधिकारी म्हणूनच ते शृंगारपूरला सहकुटुंब (युवराज्ञी येसूबाईसह) राहायला गेले. तेथे त्यांना इ. १६७८ सप्टेंबर ४ ला मुलगी झाली व पितृत्वाबरोबर जबाबदारीची जाणीवहि आली. त्या वेळीं महाराज कर्नाटकांतून परत आल्याला (इ. १६७८ जून) दोनतीन महिने झाले होते. त्यानंतर महाराजांचें व संभाजीचें कांही बिनसलें. तें राज्याधिकाराची महाराजांच्या नंतर काय व्यवस्था व्हावी या संबंधांत बहुधा बिनसलें असें दिसतें. दिल्ली, विजापूर, गोवळकोंडें इत्यादि राज्यांतील गादीसंबंधीच्या तंट्यांची माहिती महाराजांना होती. तशी परवड आपल्या राज्याची होऊं नये अशी त्यांची इच्छा होती. यामुळे कर्नाटकांत मोहीम काढतांना तशी त्यांची मूळची कल्पना असली किंवा नसली तरी, तिकडे नवें राज्य प्राप्त झाल्यावर मात्र, जाणत्या संभाजीला कर्नाटकाचें जिंजीकडील राज्य द्यावें व धाकट्या राजारामाला रायगडचा राजा करावा, अशी वांटणी महाराजांनी सुचविली असावी. संभाजीने शृंगारपुरास एका बाजूला असतांना कांही तरुणपणींचा वाह्यातपणा केला, त्यामुळेहि महाराजांच्या सोज्ज्वल चारित्र्याचे चहाते अष्टप्रधान ही वांटणी उचलून धरूं लागले. तें तरुण संभाजीला पटलें नाही. तेव्हा त्याला समर्थ रामदासांनी कांही समजुतीच्या गोष्टी सांगाव्या म्हणून महाराजांनी बहुधा त्याला परळीगडावर (सज्जनगडाला) दर्शनाला पाठविलें.

श्रीसमर्थ रामदासस्वामी (१६०८-१६८१ इ.) यांचें वाङ्मय आणि त्यांत प्रतिबिंबित झालेली कार्यप्रेरक आणि विजयिष्णु प्रवृत्ति, यांमुळे त्यांच्याबद्दल मराठी भाषा बोलणारांना नेहमीच आदर वाटत आला आहे. शिवाजी महाराजांचे गुरु म्हणून त्यांना महाराष्ट्राचे राष्ट्रगुरु मानण्यांत येतें. इ. १६५४ साली रामदास आपला प्रसिद्ध ग्रंथ 'दासबोध' निवांतपणें लिहितां यावा म्हणून वरंधा घाटानजीक शिवथरच्या घळींत (जिल्हा कुलाबा) येऊन राहिले. चारपांच वर्षांतच त्यांनी चाफळास चालविलेल्या

श्रीरामचंद्राच्या उत्सवाला महाराजांनी २०० होनांचें वर्षासन सुरू केलें. राज्याभिषेकापूर्वी एकदा इ. १६७२ च्या सुमारास त्यांची व शिवाजीराजांची प्रत्यक्ष भेट झाली. पुढे त्यांचें संघटन वाढलें व इ. १६७६ च्या ऑगस्टमध्ये म्हणजे महाराज कर्नाटकाच्या स्वारीवर निघण्यापूर्वी दोनच महिने, महाराजांच्या संमतीने रामदास शिवथर सोडून परळीगडावर येऊन राहिले. रामदासांना अशा रीतीने महाराज बराच मान देत असल्यामुळे साहजिकच संभाजीच्या या रागवारागवीच्या प्रसंगीं महाराजांना समर्थांची आठवण होणें साहजिक होतें. पण समर्थांच्या उपदेशाचा इष्ट परिणाम होण्यापूर्वीच त्यांच्याकडे गेलेला संभाजी उलट दिलेरखानाच्या हस्तकांच्या तावडींत सापडला व मोगलांकडे गेला (इ. १६७८ डिसें. १३). त्यामुळे दिलेरखानाचें पारडें जड झालें आणि स्वराज्यापुढे फार मोठें संकट उभें राहिलें. परंतु एवढ्या आपत्तींतहि तिळमात्र न डगमगतां, महाराजांनी आपलीं सैन्यें मोगलांच्या व विजापूरकरांच्या अशा दोन्ही मुलखांत स्वैर संचाराकरिता रवाना करण्याचा क्रम मुळीच सोडला नाही. कारण वाढत्या राज्यकारभाराचा, व वाढत्या संरक्षणाच्या जबाबदारीमुळे पडणारा खर्च भागविण्याचा तोच एक त्या वेळचा मार्ग होता.

इतर दरबारांशीं तुलना करून पाहतां मराठ्यांच्या राज्याची प्रगति आणि त्याचें कांही स्थिरतेचें धोरण उघड दिसत होतें. तेव्हा विजापूर दरबारांतील चलबिचलीमुळे तिकडील नाखूष आणि नाराजींत सापडलेले सेनापति शिवाजी महाराजांना मिळाले. इ. १६७६ त गदग प्रांतांत हंबीररावाशीं जो हुसेनखान माइणा लढला होता त्याचा लेक आता मोरोपंत पेशव्यांच्या फौजांत सामील झाला होता. त्याला पाठवून मोरोपंतांनी कोपळचा मजबूत किल्ला घेतला व त्यांत कैदेंत असलेल्या हुसेनखानाची सुटका केली (इ. १६७९ मार्च ३). कृतज्ञतेने तोहि महाराजांच्या नोकरींत आता सामील झाला. सातव्या दिवशीं मार्च १० ला आनंदरावाने बाळापूर घेतलें, व हीं सैन्यें पुढे थेट विजापूरपर्यंत भिडून त्यांनी जवळील शहापूर लुटलें. विजापूर

मोगलांच्या हातीं जाऊं नये, म्हणून मराठ्यांनी तेथे ही आपली हजेरी लावली. तिकडे त्यांचें दुसरें एक सैन्य गुजराथेंत बलसाडच्या बाजूला व दमणकडे जाळपोळ करीत होतेंच.

पितापुत्रांची दिलजमाई

संभाजी दिलेरखानाला मिळाला, पण त्यामुळे मोगलांचा मोठा फायदा झाला असें दिसत नाही. नाही म्हणावयास एप्रिल १७ रोजीं स्वराज्याच्या सरहद्दीवरील भूपालगड हा टेहेळणीचा किल्ला दिलेरखानाने घेतला, तो संभाजीच्या माहितगारीने मिळाला. आणि दख्खनच्या मोगली व विजापुरी फौजांबरोबर येऊन महाराजांच्या पन्हाळा किल्ल्याला वेढा घालण्यामध्येहि त्याने मदत केली. विजापूर दरबारांत दिलेरखानाचा भेद यशस्वी होऊन एक मोगलांना अनुकूल तर दुसरा शिवाजी महाराजांना अनुकूल असे दोन पक्ष पुन्हा उभे होऊन, त्यांच्या लाथाळीमुळे विजापूरच्या राज्यांत जिकडे तिकडे खून, दरोडे, लूट व खंडण्या यांचा सुळसुळाट माजला. मोगलांकडील आंतल्या दुहीमुळे मोगलांचाहि दाब पडेनासा झाला, आणि जरी पावसाळा ओसरतांच पन्हाळ्याकडे मोठी लढाई देण्याची दिलेरखानाची तयारी चालू झाली, तथापि गोवळकोंडें दरबारांतल्याप्रमाणेच विजापूर दरबारांत देखील महाराजांना अनुकूल आणि मोगलांच्या विरुद्ध असलेला पक्ष हळूहळू वाढीला लागला. ऑगस्ट २६ ला महाराजांचा वकील शामजी नाईक हा तह ठरविण्याकरिता विजापुरास गेला. तेव्हा उचल खाऊन मोगलांनी सप्टेंबरांत मंगळवेढें घेतलें आणि ऑक्टोबरांत दिलेरखानाने खुद्द विजापुरास जाऊन वेढा घातला. वेढ्यांत असतांनाच गोवळकोंडेकरांकडे त्याने जबर खंडणीची मागणी केली आणि ती न दिल्यास तिकडे स्वारी करण्याची धमकी दिली. दिलेरखानाच्या या चढाईचा परिणाम उलटाच झाला. मोगलांचें हें संकट समोर आलेलें पाहून आदिलशाहीच्या मनाचा निश्चय कायम झाला आणि तेथील कारभाऱ्यांनी अखेरीस शिवाजी महाराजांशीं पक्का तह करण्याचा निर्णय घेतला (इ. १६७९ ऑक्टो.-नोव्हें.). हा तह झाल्यानंतर आदिलशाही मुलखांत पसरलेलीं आपलीं सर्व सैन्यें काढून घेऊन आणि एकवटून तीं महाराजांनी आता आदिलशाहीचा व आपला दोघांचाहि शत्रू जो मोगल त्याच्यावर रवाना केलीं. मोगलांच्या वतीने दिलेरखान,

सर्जाखान व संभाजी यांनी या वेळीं विजापूरकरांचें अथणी शहर लुटलें व इतरत्र किरकोळ त्रास दिला. तथापि महाराजांनी दुसरीकडे मोगलांच्या मुलखांत जबरदस्त उठावणी केल्यामुळे मोगलांना ' दे माय धरणी ठाय ' होऊन गेलें. आता अपयशामुळे त्यांच्यांतील बारीकसारीक अंतर्गत भांडणांना ऊत आला. संभाजीचें मनहि मोगलांना विटलें. मोगलांकडून आपल्याला कांही लाभ होण्याचा संभव नाही, कारण त्यांनाच यशाची शाश्वति नाही, हें त्याच्या ध्यानांत आलें आणि तो फिरून महाराजांच्या हस्तकांच्या हितोपदेशाने वळणावर येऊन वडिलांकडे पन्हाळ्यास डिसेंबरांत परत आला व तेथे महाराजांची व त्याची इ. १६८० जाने. १३ ला भेट झाली. महाराजांची एक मोठी काळजी दूर झाली. शिवाजीराजांच्या मोगलांविरुद्धच्या अकल्पित व विलक्षण हुल्लडीमुळे विजापूरकरांवरीलच काय पण गोवळकोंडेकरांवरीलहि मोगलांचा दाब कमी पडला. त्यांनी दिलेरखानाने मागितलेली (६४ सोन्याच्या पेट्यांची ! वगैरे) जबर खंडणी एकदम नाकारली आणि जरी त्यांच्या मदतीला प्रत्यक्ष सैन्य पाठविणें महाराजांना जमलें नाही, तथापि देखील तो द्रव्याचा ओघ त्यांनी महाराजांना साह्य देण्याकडे वळविला.

मोगलांनी हात टेकले

इ. १६७९ च्या ऑगस्टपासून रंगलेल्या या विजापूरच्या वेढ्याचें प्रकरण महाराजांच्या राजकीय धोरणाच्या दृष्टीने फार महत्त्वाचें आहे. यापुढील शत्रूच्या हल्ल्यांचें आणि स्वतःच्या हालचालींचेंहि केंद्र किल्ले पन्हाळा होणार हें ओळखून, महाराजांनी विजापूरला वेढा लावून बसलेल्या मोगलांना शह लावण्यापूर्वी पन्हाळ्याची विशेष मजबुती केली. कोकणांतील किल्ल्यांवरच्या तोफा काढून त्या पन्हाळ्यावर आणून ठेवल्या. एवढेंच नव्हे, तर फ्रेंचांकडून नव्या तोफा घेऊन त्याहि पन्हाळगडावर ठेवल्या. आणि असा बंदोबस्त केल्यावर स्वतः फौजांचें नेतृत्व करून, दक्षिणेंत मोगलांनी घातलेल्या ह्या धुमाकुळाचा एकदा काय तो सोक्षमोक्ष करण्याचें त्यांनी ठरविलें. मोरोपंत पेशव्यानेहि नेहमीप्रमाणे बहुत शर्थ केली. आणि मोगलांना विजापूरचा वेढा काढून घ्यावा लागला. या बहारदार मोहिमेचें वर्णन खुद्द महाराजांनी व्यंकोजीला पत्रांत लिहून कळविलें आहे. त्याचा सारांश असा :

विजापूर जिंकून घेण्याच्या निश्चयाने दिलेरखान विजापूरला वेढा आवळूं लागला हें पाहून सिद्दी मसउद घाबरून गेला व त्याने महाराजांकडे तातडीने मदत मागितली. त्यावरून ' तेच क्षणीं स्वार होऊन ' महाराज स्वतः पन्हाळ्यास आले व सैन्याची जमवाजमव करून खासा विजापुरासन्निध गेले (ऑक्टो. ३१). परंतु दिलेरखान विजापूरच्या तटासमोर निश्चयाने बसला असतां तेथेच अटीतटीचा सामना देण्यापेक्षा, तेथील रागरंग पाहून महाराजांनी दुसरी युक्ति काढली. दिलेरखानाच्या पाठीमागे मोगलांच्या मुलखांत उतरून सर्वत्र फौजा पसरून त्याला तिकडून ओढा लावावा, असें महाराजांनी ठरविलें. आणि पांचच दिवसांत ते विजापुराहून बाहेर पडले. औरंगाबादेस शहाजादा मुअज्जम होता. परंतु त्याचा मुलाहिजा न करतां, तेथून फक्त चार गावें अंतरावरील जालनापूरपर्यंतचा मोगलांचा मुलूख बेचिराख करून, ती मोठी पेठ त्यांनी लुटली. ती लूट घेऊन पट्टागडाचे रोखें महाराज जात असतां वाटेंत रणमस्तखान, आसफखान, जाबीतखान व आणखी पांचसात सेनापतींनी आठ-दहा हजार स्वारांनिशीं त्यांना अडविलें. त्या सर्वांना हुलकावणी देऊन महाराज सर्व सामानासह नोव्हेंबरच्या अखेरीस पट्ट्याला पोंचले. मग त्या बाजूच्या मोहिमेचें काम मोरोपंतांवर सोपवून आपण पट्ट्यावर राहून तेथून त्यांनी मार्गदर्शन केलें. बागलाण व खानदेश प्रांतांत मोगलांचे २७ किल्ले होते ते व खालील मुलूख काबीज करण्याची कामगिरी या वेळीं मोरोपंताला दिली होती. मोरोपंताने धरणगांव, चोपडा वगैरे लुटलीं व सुरतेकडेहि झेंप टाकली. तेथून तें सैन्य बऱ्हाणपूरच्या रोखाने मलकापूरच्या बाजूला गेलें. त्या वेळीं शहाजादा मुअज्जम महाराजांच्या मदतीने बापाविरुद्ध बंड करणार असेंहि लोक बोलूं लागले. कारण खुद्द औरंगाबादेंत जाऊन शिवाजीचें सैन्य लुटालूट करीत होतें. ठिकठिकाणीं मोगलांच्या मुलखांत राजांच्या सैन्यांनी ओढा लाविल्यामुळे मोगलांचें सामर्थ्य विभागून गेलें आणि विजापुरावर निदानीचा हल्ला चढविणें त्यांना अशक्य झालें. परंतु इतकें होऊनहि दिलेरखानाचा वेढा उठवून लावण्याचें सामर्थ्य विजापूर दरबारांत राहिलें नसल्यामुळे महाराजांना त्यांनी पुन्हा आळविलें. मग शिवाजी महाराज पुन्हा पन्हाळ्याला आले. आणि तेथून प्रथम खजिना आणि तयार होतें तेवढें सैन्य त्यांनी तातडीने विजापूरच्या मदतीला रवाना केलें. व नंतर

मुलखांत पसरलेल्या आपल्या फौजा बोलावून आणून त्या पुन्हा दिलेरखानावर रवाना केल्या व आणखी खजिना पाठवून विजापूरकरांचा उत्तम पाठपुरावा केला. महाराजांच्या फौजांनी दिलेरखानाला आता बाहेरून रसद मिळण्याचें अगदी बंद केलें. त्याच्या मदतीस औरंगाबादेहून रणमस्तखान फौज घेऊन येत होता. पण महाराजांच्या फौजांनी त्याला वाटेंत गांठून मारीत पिटीत औरंगाबादपर्यंत रेटीत नेलें व तेथून परत येतांना शहरें लुटलीं व देश खराब केला. नंतर या फौजा पुन्हा विजापुरास आल्या व शत्रूला घेरून बसल्या. इकडे मोरोपंताने अहिवंत, नाहावा असे बागलाणांतील किल्ले घेतले. वाटेंत सर्वत्र चौथाईचे करार करून घेतले. मुल्हेरवर हल्ले चढविले व हणमंतगड काबीज केला. ह्या कधी न संपणाऱ्या पराजयाच्या बातम्या ऐकून व शहाजाद्याच्या तक्रारीमुळे नाराज होऊन, बादशाहाने दिलेरखानाकडे जासुदावर जासूद पाठवून जाब विचारला. पण महाराजांच्या विजापूरकरांना दिलेल्या चतुर साहाय्यामुळे त्याचें कांहीच चाललें नाही व त्याला विजापूरचा वेढा उठवून निघून जाणें भाग पडलें. जातां जातां आदवानी व महाराजांकडे नुकत्याच आलेल्या कोपळ वगैरे मुलखाच्या बाजूला दिलेरखानाने एकदा प्रयत्न करून पाहिला. परंतु जनार्दनपंतांनी त्याची तिकडेहि डाळ शिजूं दिली नाही व शेवटीं मराठ्यांनी जागोजाग पाठलाग केल्यामुळे नाइलाज होऊन दिलेरखान भीमेपार पेडगांवीं जाऊन राहिला.

विजापूर राज्यावर या वेळीं आलेलें संकट मोठें कठीण होतें. आणि केवळ विजापूर आणि गोवळकोंडें एवढ्या दोघांच्या बळावरच मोगलांपासून बचाव करण्याचें काम येऊन पडलें असतें, तर त्यांच्याने तें खास पार पडलें नसतें. ही दिलेरखानाची मोहीम अयशस्वी झाली याचें श्रेय या कारणामुळे शिवाजी महाराजांच्या फौजांना आणि महाराजांच्या अप्रतिम सेनापतित्वाला द्यावयास पाहिजे. विजापूरची सत्ता हातांत बागविणारांनी तिरस्करणीय धरसोड चालविली होती. पण तिच्याकडे लक्ष न देतां

या वेळीं मोगलांविरुद्ध सर्व दक्षिण्यांनी एक झालें पाहिजे, असा दूरदर्शी विचार करून महाराजांनी आपलें सर्व सामर्थ्य एकवटून मोगलांविरुद्ध जिवापाड मेहनत घेतली व त्यांचा वरवंटा थोपवून धरला. विजापूरकरांचा व मोगलांचा या वेळीं (इ. १६८० जाने.-फेब्रु.) औपचारिक तह झाला आणि विजापूरचा वेढा उठला. युवराज संभाजीला फितवून वगैरे महाराजांच्या स्वराज्याला इंगळ्या लावण्याचा दिलेरखानाचा प्रयत्न सपशेल फसला आणि मोगलांना एक मोठा धडा मिळाला. महाराजांनी आपल्या मताप्रमाणे 'गनीमाला ऐसें केलें जे मागती विजापूरची वाट न धरावी.' यापुढचे मराठ्यांच्या छत्रपतीचे विचार काय होते, याची कल्पना यावरून करतां येणें फारसें कठीण नाही.


खांदेरीची तटबंदी

मोगलांविरुद्ध दक्षिणेंत एकजूट करण्याइतका दुसरा कोणता शिवाजी महाराजांच्या जिव्हाळ्याचा विषय असेल तर तो कोणाहि पाश्चात्य किंवा (सिद्दीसारख्या) देशी आरमारी सत्तेला भारी वाटेल असें आरमारी सामर्थ्य पैदा करण्याचा. पण त्या बाबतींत त्यांना इंग्रजांचा एकसारखा चमत्कारिक प्रकारें अडथळा झाला. मुंबईसारख्या मोक्याच्या जागीं असल्या स्वार्थी व्यापारी संघाची स्थापना झाली, ही घटना मोठी दुर्दैवाची ठरली. या बनावाचे दुष्परिणाम पुढे सर्व हिंदुस्थानला भोगावे लागले. इंग्रजांनी राजापूरच्या नुकसानभरपाईची वारंवार केलेली मागणी वरवर न्यायाची वाटते; तथापि त्यांचें स्वराज्याबाहेरच्या मुलखांतील वागण्याचें धोरण शिवाजी महाराजांशीं मुळीच सहानुभूतीचें नसल्यामुळे महाराजांना ती मागणी पुरी करण्याची इच्छा कधीच तीव्रतेने झाली नाही. सुरतकर इंग्रज साहजिक आसपासच्या मोगल राज्यावर अवलंबून असल्यामुळे महाराजांना ते मोगलांच्या विरुद्ध उपयोगी पडले नाहीत. एवढेंच नव्हे, तर ते सिद्दीला महाराजांच्या विरुद्ध नाइलाजाने कां होईना मदत करून त्यांना अडचणच उत्पन्न करीत. ही गोष्ट व त्यांचें क्षुद्र सामर्थ्य पाहून महाराज त्यांच्या मागण्यांविषयीं टंगळमंगळ करीत. महाराजांच्या मृत्यू-

पर्यंत हें भरपाईचें घोंगडें तसेंच भिजत राहिलें. आणि पुढे संभाजी महाराजांच्या कारकीर्दीतहि त्याचा निकाल लागला नाही.

शिवाजी महाराजांना जिव्हाळ्याच्या वाटणाऱ्या खांदेरीच्या प्रकरणांत हें इंग्रजांचें धरसोडीचें आणि केवळ व्यापारी नफ्यातोट्याच्या गणितामुळे नागमोडी वळणावर चालणारें राजकारण स्पष्ट दिसलें. त्याची हकीकत अशी : सिद्दी कासम सुरतेच्या सुभेदाराच्या शिफारशीच्या बळाने जबरदस्त होऊन इंग्रजांच्या मुंबई बेटांत आश्रयार्थ राही आणि तेथून महाराजांच्या मुलखाला त्रास देई. याबद्दल महाराजांनी अनेक वेळा निषेध करूनहि मुंबईकर इंग्रज मोगलांच्या भीतीने त्याला काढून लावण्यास धजत नसत. बरें, मुंबई बेटाच्या आश्रयाला राहिलेलीं सिद्दीचीं गलबतें छापा घालून जाळण्याचा प्रयत्न करावा, तर महाराजांचा तो प्रयत्न इंग्रज व त्यांना लागूनच किनाऱ्यावर ठाण मांडून बसलेले पोर्तुगीज चालूं देत ना. कोणत्याहि प्रकारें महाराजांचें सामर्थ्य वाढूं द्यावयाचें नाही हें त्यांचें धोरण होतें. कोणीकडून तरी सिद्दीला आश्रय देणाऱ्या मुंबईकरांचें पारिपत्य करण्यासाठी शिवाजी महाराजांनी अनेक प्रयत्न करून पाहिले. मुंबईवर तोफा लावल्या. इंग्रजांना दिलेलें सर्पण सिद्दीला मिळतें या कारणासाठी सर्पण नेण्यासाठी नागोठण्याला आलेलीं मुसलमानांचीं गलबतें धरून ठेवलीं. निषेधार्थ पत्रें पाठविलीं. पोर्तुगीज सिद्दीला प्रत्यक्ष मदत करीत नाहीत याचा दाखला इंग्रजांना सांगितला. पण इंग्रज आपल्या आरमारी व हत्यारी सामर्थ्यामुळे मुंबईत सुरक्षित असल्याने या युक्तिवादाला वा शक्तिवादाला बधले नाहीत. आणि उलट आपण खरेदी केलेल्या मालाची रास्त किंमत देण्याबद्दल देखील भलत्याच बयादा लावून चौलच्या सुभेदाराला सतावूं लागले. तेव्हा इंग्रजाला तूर्त सोडून देऊन सिद्दीचें परस्पर पारिपत्य करण्याचा एक प्रयत्न मराठ्यांनी करून पाहिला. त्याच्या दंडाराजपुरीवर साधेल त्याप्रमाणे चौलच्या सुभेदाराने हल्ले चालू ठेवले. परंतु मुंबईचा त्याला आश्रय असल्यामुळे तेथेहि तो हारीस येईना. तेव्हा सिद्दीस वठणीस आणावयाचा तर प्रथम इंग्रजांचा बंदोबस्त केला पाहिजे असें ठरवून शिवाजी महाराज त्या मार्गाला लागले. महाराजांनी यासाठी मुंबई बंदराच्या तोंडावरील खांदेरी व उंदेरी या दोन बेटांपैकी खांदेरी या बेटावर तट बांधून मुंबई बंदराची नाकेबंदी करण्याची योजना आखली. आरमाराबद्दल जेव्हा महाराजांनी अगदी

आरंभीं विचार केला तेव्हापासून म्हणजे इ. १६७२ पासून ही त्यांची कल्पना होती. आता इ. १६७९ च्या ऑगस्टांत तिला मूर्तस्वरूप आलें. नजीकच्या थळ वगैरे बंदरांतून आता खांदेरीकडे सामान व मालमसाला जाऊं लागला. महाराजांनी खांदेरीला पुष्कळ लोक उतरवून त्या बेटाचा ताबा घेतला व तटबंदीचें काम चालू केलें. त्याला प्रतिकार करण्यासाठी ह्यूजेस याची सप्टेंबर ३ला इंग्रजांकडून नेमणूक झाली. हें बेट आपलें आहे असा आपला दावा सामोपचाराने महाराजांच्या लोकांपुढे मांडावा अशा सर्वांना इंग्रजांनी सूचना दिल्या. बेटावरील महाराजांचा अधिकारी मायनाक भंडारी सांगूनहि काम बंद ठेवीत नाही असें पाहून किनाऱ्यावरून त्याला मिळणारें पाणी व रसद तोडण्याचेंहि त्यांनी ठरविलें (सप्टेंबर ६). ह्यूजेस खांदेरीच्या तटबंदीच्या कामाला अडथळा करण्यासाठी म्हणून येऊन दाखल झाला.



खांदेरी-उंदेरी व पद्मदुर्ग

मोगल, पोर्तुगीज व इंग्रज यांनी घेरून टाकलें असतां खांदेरीला तटबंदी करण्याचें महाराजांचें धाडस अपूर्व होय. तसेंच पद्मदुर्गाचें महत्त्व— मोगलांच्या 'राजपुरीच्या (जंजिरा) उरावरी दुसरी राजपुरी' असें महाराज त्याचें वर्णन करतात.

हें पाहून आपलें दळणवळण शाबूत राखण्याच्या कामगिरीवर महाराजांनी आपला आरमाराचा सेनापति दौलतखान यास पाठविलें आणि इंग्रजांनीहि हिय्या करून प्रसंग पडल्यास त्याच्याशीं युद्ध करण्याचें ठरविलें. सप्टेंबर १९ ला इंग्रजांनी बेटावर मारा केला; पण त्यांचें शिबाड (= गलबत) मायनाकाच्या हातीं लागलें, कांही इंग्रज मेले व कांही कैद झाले. यावरून धडा घेऊन कॅ. मिंचिन ह्या 'रिव्हेंज' नांवाच्या इंग्रजांच्या गलबताच्या मुख्याने "खांदेरी बेटावरच्या लोकांना आमच्या हातून इजा होण्याचा संभव नाही आणि यत्न केला तर आमचेंच नुकसान जास्त होणार", असें सप्टेंबर २२ ला आपलें निदान वर कळविलें. यामुळे इंग्रज सरळ हल्ला करण्यास धजेनात व मराठ्यांच्या चपळ होड्या त्यांच्या तावडींत न सापडल्यामुळे खांदेरीचें दळणवळण व काम कांही थांबेना. मात्र आसपास स्वाऱ्या शिकाऱ्या करून महाराजांच्या आरमाराची इंग्रजांनी थोडीबहुत नुकसानी केली. ती अपेक्षितच होती; पण तेवढ्यामुळे मुंबई बेटावर चढाई करून जाण्याची मराठ्यांची हिंमत मुळीच कमी झाली नाही व मुंबईसमोर त्यांचें सैन्य गोळा होण्याचें थांबलें नाही. अपेक्षेप्रमाणे खांदेरीच्या तटबंदीचें काम थांबवितां येत नाही हें स्पष्ट होऊं लागल्यापासून सुरतेचें मुख्य कौन्सिल व्यापारी हिशेब काढून या कामीं होणाऱ्या खर्चाबद्दल कुरकूर करूं लागलें. आणि हळूहळू या भानगडींतून आपण आपलें अंग काढून घ्यावें असें सुचवूं लागलें.


मुंबईकर इंग्रजांची इच्छा जोराचा प्रतिकार करण्याची होती. तरी देखील महाराजांशीं टक्कर देण्याला आपण पुरे पडत नाही असें नजरेस येतांच खांदेरी बेट खरोखर आपल्या मालकीचें आहे की नाही, असाहि संशय सुरतकर इंग्रजांना सुचला ! मग मुंबईकर व सुरतकर या दोघांनाहि आपली असमर्थता पटून शेवटीं त्यांनी महाराजांशीं सलोखा करण्याचेंच ठरविलें (नोव्हेंबर ३). पण इतक्यांत सिद्दी जागा झाला. आणि या प्रकरणीं इंग्रजांना मदत करावी म्हणून गलबतें घेऊन आला व इंग्रजांचीं व आपलीं गलबतें एकत्र करून दोघांनी मिळून खांदेरीवर हल्ला करण्याचे बेत सांगूं लागला. पण इंग्रजांचा सिद्दीवर विश्वास नसल्यामुळे हें सहकार्य अस्तित्वांत आलें नाही. शिवाय राजापूर वगैरे प्रकरणीं महाराजांशीं सलोखा राखणें इंग्रजांना अवश्य होतें. त्यामुळे शिवाजीच्या मुलखाची नासाडी करण्यास आपण सिद्दीला मदत देतों असें दिसणें इंग्रजांना इष्ट वाटत नव्हतें. इकडे

खांदेरीला इंग्रज विरोध करतात असें पाहून महाराजांनी राजापुरांतील इंग्रजांना नजरकैद करून त्यांच्या मालाची जप्ती केली (इ. १६८० जाने.). इंग्रजांना व्यापाराच्या वगैरे दिलेल्या सवलती काढून घेतल्या व पुढे भरपाई करून देण्याचेंहि नाकारलें. तेव्हा बेसुमार खर्चाचे वगैरे बहाणे करून, व सिद्दीला मराठ्यांशीं सिद्दीच्या दानतीप्रमाणे भांडण करण्यास सोडून देऊन, इंग्रजांनी महाराजांशीं सलोखा करण्याचें धोरण अमलांत आणलें व स्वतःचा बचाव करण्यासाठी वाटाघाटी चालू केल्या (इ. १६८० जाने. ८ ते १८). सिद्दीला यापुढे कोणत्याहि प्रकारें मदत न देण्याचें त्यांनी तहांत कबूल केलें.

अशा रीतीने इंग्रज गप्प बसले. आता सिद्दी कासमचा स्वतंत्र उपद्व्याप चालू झाला. त्याचा खांदेरीचा बेत हुकला. तेव्हा आता खांदेरीच्या जवळचें उंदेरी बेट ताब्यांत घेऊन तेथून थळ या ठाण्यावर किनाऱ्याच्या बाजूने त्याने तोफा लावल्या. मराठ्यांचा आरमारी अधिकारी दौलतखान याने तेथून त्याला हुसकून लावण्याचा दोनदा प्रयत्न केला. पण दोनदाहि त्याला मनासारखें यश आलें नाही. इंग्रजांचा व शिवाजी महाराजांचा तह पुरा झाल्यानंतर इंग्रजांनी आपलीं गलबतें काढून घेतलीं (जाने. २८). पुढे सिद्दी बेताल होऊन महाराजांच्या मुलखाला त्रास देऊं लागला व इंग्रजांनाहि डोईजड झाला. इंग्रज व्यापाऱ्यांनाहि तो महाराजांच्या मुलखांत सुखाने व्यापार करूं देईना. सुरतेच्या सुभेदाराकडून त्याला तंबी पोंचवावी तर त्याच्याकडेहि इंग्रजांचें सौमनस्य राहिलें नव्हतें. तेव्हा 'तुम्ही त्रास देण्याचें सोडलें नाही तर तुम्हांला अधिक पैसा तर नाहीच, पण नित्याची सामग्री देखील देण्याचें बंद करूं' अशी सिद्दीलाच प्रत्यक्ष तंबी देऊन इंग्रजांना स्वस्थ बसावें लागलें (इ. १६८० मार्च २५). दोन दगडींवर हात ठेवणारे इंग्रज अशा प्रकारें महाराजांना कोणत्याहि प्रकारचें साह्य करण्यास मूलतःच असमर्थ होते. इंग्रजांच्या आधी स्थिरपद झालेले पोर्तुगीज वेळ पडेल तेव्हा इंग्रजांनाच मदत करीत. विशेषतः खांदेरीसंबंधी इंग्रजांचा व महाराजांचा झगडा चालू असतां महाराजांच्या विरुद्ध रसदपाणी, पैसा वगैरे देऊन त्यांनी इंग्रजांनाच मदत केली. पोर्तुगीजांचीं ठाणींहि आसपास असल्यामुळे इंग्रजांना उघडपणें किंवा गुप्तपणें मदत करणें हा त्यांच्या हातचा मळ होता. ही गोष्ट सिद्दीच्या प्रत्यक्ष प्रतिकाराइतकी किंबहुना अधिकच मराठ्यांच्या आरमाराला जाचक होत होती, याची कल्पना

शिवाजी महाराजांना होती. त्या दृष्टीने खांदेरीची तटबंदी पुरी झाली हें शिवाजी महाराजांनी विचारपूर्वक योजना करून पार पाडलेलें मोठें उद्दिष्ट होय. त्याच्या जोरावर पुढे त्यांनी मोठे बेत आखले असले पाहिजेत.

* * *



छत्रपतींची शिक्केकट्यार

कट्यारीचें म्यान, कट्यार, शिक्के ठेवण्याचा मूल्यवान करंडा, छोटें मोर्तब, मोठा शिक्का, आणि मोर्तब व शिक्का यांना दोरीने जोडलेल्या त्यांच्या खोळी (वेष्टणें).

२० शिवशाहीची अखेर

शिवाजी महाराजांचा मृत्यु

उत्तर हिंदुस्थान आणि दक्षिण हिंदुस्थान या हिंदुस्थानच्या दोन विभागांतील इतिहासाच्या विकासाचा क्रम निराळा आहे. एवढेंच नव्हे, तर त्याचें स्वरूप देखील सामान्यतः भिन्न समजलें जातें. एकाच देशाच्या या दोन विभागांमध्ये परस्परांत राजकीय सहकार्य फार थोड्या वेळा दिसतें. शिवाजी महाराजांच्या वेळीं तर उत्तरेकडून औरंगजेबाचें म्हणजे मोगल साम्राज्याचें दक्षिणेंतील राज्यसत्तांवर अतिक्रमण चालू होतें. महाराजांनी परिस्थितीचें हें आव्हान स्वीकारलें, दक्षिण्यांच्या कैवाराने त्याला तोंड दिलें, आणि जमिनीवर व समुद्रावर अशा दोन्ही ठिकाणीं नांव घेण्यासारखें यश मिळविलें. हा इतिहास मागील कांही प्रकरणांत सांगितला. महाराजांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे नंतरच्या इ. १६८० च्या पावसाळ्याच्या काळांत किंवा त्यानंतर अचानक कोणत्या तऱ्हेने त्यांनी जगाला थक्क करून सोडलें असतें, आणि त्याच्या पुढील वर्षांत भारताच्या राजकारणांत व स्वतःच्या परिस्थितींत काय काय क्रांति घडवून आणली असती, याची कल्पना करणें आता व्यर्थ आहे. विजापूरचा वेढा दिलेरखानाला उठवावा लागला. खांदेरी बेटावर महाराजांनी केलेली तटबंदी उखडून टाकण्यांत इंग्रजांना सपशेल अपयश आलें. तेव्हा महाराजांशीं त्या संबधांत स्वतःच उपस्थित केलेला वाद इंग्रजांना तह करून मिटवावा लागला. ह्या दोन्ही गोष्टी इ. १६८० च्या पहिल्या दुसऱ्या महिन्यांत झाल्या. त्यामुळे महाराजांना स्वास्थ्य मिळालें. त्याचा लाभ घेऊन महाराज रायगडावर परत आले आणि तेथे त्यांनी आपला दुसरा पुत्र राजाराम यास ११ वें वर्ष सुरू झाल्यानंतर प्रथम मार्च ७ रोजीं त्याची मुंज आणि मार्च १५ ला प्रतापरावाच्या मुलीशीं त्याचा विवाह उरकून घेतला. हेंच त्यांच्या हातून पार पडलेलें शेवटचें कौटुंबिक कार्य होय. यानंतर ते फक्त सातआठ दिवस या जगांत आरोग्याने राहिले.

मार्चच्या २३ तारखेला त्यांचें रक्तातिसाराचें शेवटचें दुखणें सुरू झालें आणि चैत्र शु. १५ ला (इ. १६८० एप्रिल ३) शनिवारीं दोन प्रहर दिवसा रायगडावर त्यांनी देह ठेवला. महाराजांना विषप्रयोग झाला हा प्रवाद अर्थात् खरा नाही.

एका अर्थाने पाहिलें तर महाराजांनी हातांत घेतलेलीं कार्यें मरणापूर्वी एकदोन महिने समाप्त झालीं. दुसऱ्या अर्थाने पाहिलें तर त्यांपैकी कायमचा निकाल असा कोणत्याच बाबीचा झाला नव्हता! औरंगजेब जोंपर्यंत हयात होता तोंपर्यंत मोगलांशीं युद्धाला केव्हा तरी पुन्हा तोंड लागणें अगदी अपरिहार्य होतें. सिद्दीचें किंवा इंग्रजांचें प्रकरण पक्कें मिटलेंच नव्हतें. पोर्तुगीजांवर कायमचा शह बसला नव्हता. आणि संभाजी रुसून प्रत्यक्ष हाडवैऱ्याला जाऊन मिळण्याइतका बिथरला होता तो नुकताच जरी परत आला होता, तरी स्वतःच्या कुटुंबांत पुरेशी दिलजमाई व राज्यांत सुव्यवस्थेची वा वांटणीची समाधानकारक निश्चित अशी कांही योजना करण्याला अवसर त्यांना मिळालेला नव्हता. मराठ्यांच्या आणि भोसले छत्रपतींच्या राजकारणाचा डाव अशा प्रकारें पटावर तसाच मांडलेला असतांना हा मोहरा निर्दय काळाने अवेळीं उचलून नेला. अवघड परिस्थितींत केवळ एका माणसाने केलेला पराक्रम आणि घडवून आणलेली क्रांति अशा दृष्टीने महाराजांच्या चरित्राचें माप घेतलें म्हणजे त्यांचें आगळें कर्तृत्व मनावर बिंबतें. परंतु त्यांच्या कौटुंबिक जीवनाबद्दल दुर्दैवाने तसें म्हणतां येत नाही.

महाराजांचा कुटुंबपरिवार

महाराजांचें ‘ कौटुंबिक जीवन ’ वर्णितां येईल, अशा प्रकारची तपशीलवार माहिती आपल्याजवळ नाही. त्यांच्या विवाहांची संख्या, विवाहांचा क्रम, फार काय त्यांच्या राण्यांचीं नांवें किंवा माहेरघरें सुद्धा सर्वच्या सर्व ठामपणें सांगतां येणार नाहीत. अव्वल, दुय्यम, तिय्यम सर्व दर्जांचा पुरावा एकत्र केला तर जेवढें कांही कळतें त्याचें सार असें की, महाराजांचे जास्तींत जास्त आठ विवाह झाले असावे. आणि त्यांतले शेवटचे तीन गायकवाड, जाधव व इंगळे घराण्यांतील मुलींशीं इ. १६५७ च्या जानेवारी ते एप्रिलच्या दरम्यान झाले. महाराजांच्या या आठ राण्यांचीं नांवें व माहेरचीं

घराणीं अशीं सांगतात : १ **सगुणाबाई** (शिर्के), २ **सईबाई** (पवार = निंबाळकर), ३ **सोयराबाई** (मोहिते), ४ **पुतळाबाई** (मोहिते), ५ **लक्ष्मीबाई** (विचारे), ६ **सकवारबाई** (गायकवाड), ७ **काशीबाई** (जाधव), आणि ८ **गुणवंताबाई** (इंगळे).

महाराजांचा शेवटचा विवाह झाला तेव्हा त्यांचें वय केवळ सत्तावीस होतें. आणि त्यानंतर त्यांनी एकहि नवा विवाह केला नाही. राज्याभिषेकाच्या वेळीं त्यांच्या आठ पत्न्यांपैकी चार हयात होत्या. संभाजीची आई सईबाई संभाजीला अडीच वर्षांचा पोरका टाकून इ. १६५९ तच वारली. त्यामुळे राजारामाची आई सोयराबाई हीच पट्टराणी मानली गेली. महाराजांच्या निधनानंतर दोन अडीच महिन्यांनी पुतळाबाई सती गेली असें दिसतें.

महाराजांच्या आठांपैकी चार राण्यांपासून महाराजांना दोन पुत्र व सहा कन्या मिळून आठ अपत्यांचा लाभ झाला. पैकी सईबाईला संभाजी हा एक पुत्र आणि सकवारबाई ऊर्फ सखूबाई (जांवई : फलटणचे महादाजी नाईक निंबाळकर), राणूबाई (जाधव) आणि अंबिकाबाई (हरजी राजे महाडीक तारळेकर) अशा तीन कन्या मिळून चार अपत्यें झालीं. सोयराबाईला राजाराम हा एक पुत्र आणि बाळीबाई ऊर्फ दीपाबाई (विसाजीराव) ही एक कन्या अशीं दोन मुलें झालीं. सकवारबाईची कन्या कमलाबाई जानोजी पालकर यास दिली होती. आणि सगुणाबाईची कन्या राजकुंवरबाई हिचें लग्न गणोजी राजे शिर्के मळेकर यांच्याशीं लावलें होतें.

महाराजांचे विवाह सारे पूर्ववयांत आणि विशेष म्हणजे अफजलप्रकरणाच्या पूर्वींचे असल्याने, त्यांच्या या सोयरिकी राजकारणासाठी करण्यांत आल्या असें म्हणतां यावयाचें नाही. राज्याभिषिक्त छत्रपति महाराष्ट्राला देणारें भोसल्यांचें घराणें थोरले छत्रपति शिवाजी महाराज यांच्या पराक्रमामुळे पुढे केवढेहि प्रसिद्धीस आले तरी तत्कालीन खानदानीच्या कल्पनेप्रमाणे आरंभीं तें थोडें बेताचें लेखण्यांत येत असे, अशी शंका घेण्यास जागा आहे. यामुळे महाराजांच्या या सोयऱ्यांतील सारींच नांवें तशीं फार मोठ्यांचीं नाहीत आणि महाराजांची भिस्त अशा जोडलेल्या नात्यांपेक्षा स्वतःच्या पराक्रमावरच अधिक होती याबद्दल शंका नाही.

या लोकोत्तर पुरुषाच्या एकंदर धामधुमीच्या चरित्राचा विचार पाहतां त्याला कर्तव्यपूर्तीपुढे सुखासीन जीवनाचा किंवा नाटकशाळादि रंगेल वातावरणाचा हव्यास असेल असें संभवत नाही. तसा काडीचा पुरावा नाही. यामुळे हे अनेक विवाह म्हणजे त्या वेळच्या अनेकपत्नीत्वाच्या रूढीचीच साधीसीधी साक्ष होय. तरी त्यांतूनच पुढील संभाजी व राजाराम यांच्या वारशाच्या संबंधांतील सापत्न भावाचा उगम झाला असें कोणी म्हणणार नाही, असें नाही. परंतु असल्या आपत्ति हमखास टाळतां येत नाहीत. एका पत्नीच्या पोटच्या मुलांत देखील कठोर पक्षभेद अन्य कारणानेहि उत्पन्न होतात. एकंदर विचार करतां राज्याच्या बाहेरचे मोठमोठे प्रश्न सोडविण्याच्या भानगडींत सापडल्यामुळे महाराजांना घरांतला संभाजीराजांच्या वर्तनाचा व राज्याच्या वारसाचा प्रश्न समाधानकारक रीतीने सोडविण्यास अवसर मिळाला नाही, असें दिसतें. रायगडावर महाराजांचा मृत्यु झाला त्या वेळीं संभाजी पन्हाळ्यावर होता. त्याला महाराजांच्या मृत्यूबद्दल बातमी लागूं न देतां शिवाजी महाराजांची उत्तरक्रिया दहा वर्षे वयाच्या राजारामाचा मुखत्यार म्हणून सावाजी भोसले शिंगणापूरकर या भोसले वंशीयाकडून करण्यांत आली. पुढच्या पंधरवड्यांत एप्रिल २१ ला (सिंहासनारोहणाची पूर्वतयारी म्हणून) राजारामाचें मंचकारोहण झालें. नंतर अण्णाजीपंत सुरनीस (सचिव) हे संभाजी राजे यांस कैद करावें असा निश्चय करून मोरोपंत पेशवे यांसह पन्हाळ्यावर चालून गेले. पण संभाजीच्या तडफेमुळे हें राजकारण सिद्ध झालें नाही. संभाजी राजे रायगडावर आले व जुलै २० ला सिंहासनावर बसून छत्रपति झाले. प्रल्हाद नीराजी व रामचंद्र नीळकंठ अमात्य असे प्रमुख मुत्सद्दी व स्वामिनिष्ठेकरिता विख्यात असलेले बाळाजी आवजी चिटणीस हेहि आरंभीं संभाजीविरोधी बनावांत सामील झाले होते. ते केवळ राजारामाच्या आईच्या कारस्थानाला बळी पडले होते असें म्हणणें शोभत नाही. यामुळे त्यांच्यासारख्या निःस्वार्थी आणि निरपेक्ष सेवकांचीहि कांही काळ द्विधा मनःस्थिति व्हावी, असा कांहीतरी डळमळीतपणा महाराजांच्या या संबंधांतील अंतकाळच्या विचारव्यवहारांत त्या सर्वांना आढळून आला असावा, असें मानण्याकडे प्रवृत्ति होते.

* * *

२१ महाराजांची कामगिरी

शिवरायाचा आठवावा प्रताप

येथपर्यंत छत्रपति श्री शिवाजी महाराजांनी स्वराज्यसाधनेच्या कार्मी मिळविलेले युद्धक्षेत्रांतील विजय आणि तत्संबंधीची परिस्थिति यांचें प्रामुख्याने वर्णन केलें. आणि अनुषंगाने त्यांच्या कुटुंब-परिवाराचा परिचय करून घेतला. याच कालांत त्यांना प्राप्त झालेले शांततेचे विजय कांही कमी नाहीत. आजची उपलब्ध माहिती पाहतां संख्येने ते कमी भासतील. त्यांचें स्वरूप नजरेंत भरण्यासारखें नसेल. तथापि समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने त्यांचें महत्त्व मुळीच कमी नाही. मात्र दुर्दैवाची गोष्ट अशी की, महाराजांना पुरेशी फुरसत न मिळाल्यामुळे त्यांना त्या गोष्टींकडे अवश्य तितकें लक्ष देतां आलें नाही. सतराव्या शतकांतील समाज आजच्यासारखा जागृत नव्हता. उदासीन होता. तरी देखील आपल्या डोळयांदेखत चाललेल्या स्वराज्याच्या झगडयापासून मिळणाऱ्या स्फूर्तीला तसा तो पारखा नव्हता. स्वराज्य निर्माण करणारे शिवाजीराजे आणि त्या स्वराज्याच्या छत्राखाली वावरणारा हिंदुसमाज यांच्या परस्परांवरील क्रिया आणि प्रतिक्रिया चालू होत्या. त्यांचा संकलित परिणाम म्हणजे आतापर्यंत वर्णिलेलें महाराजांचें चरित्र होय. त्या चरित्राचे धागेदोरे एकत्र आणून आता या वीरपुरुषाच्या सर्व प्रकारच्या विजयांचें थोडक्यांत समालोचन करावयाचें आहे. प्रथम राज्यविषयक आणि क्रमाने राष्ट्रविषयक.

"राज्य म्यां शिवाजीने चाळीस हजार होनांचा पुणें महाल होता. त्यावरी एक क्रोड होनाचें राज्य पैदा केलें." हे उद्गार महाराजांचा मरणकाळ जवळ आला तेव्हा आढावा घेतल्यावेळचे म्हणून सभासदाने त्यांच्या तोंडीं घातले आहेत. त्यांत रतिभर खोटें नाही. वडिलांच्या जहागिरींत पोटमोकासेदार म्हणून सुरुवात करावयाची आणि स्वतःच्या

हयातींत राज्याभिषेक करून घेऊन एका सार्वभौम राज्याचा 'मऱ्हाटा पातशाहा छत्रपति' व्हावयाचें. स्वतःच्या घराण्यांतच काय पण स्वतःच्या भूभागांत देखील नसलेली, एकंदर दक्षिणेंतच दोन-तीनशे वर्षें नष्ट झालेली, राज्याभिषेकाची परंपरा पुन्हा चालू करावयाची. पारतंत्र्याच्या पाताळांतून स्वजनांना बाहेर काढून त्यांच्यासाठी स्वातंत्र्याचा स्वर्ग उत्पन्न करावयाचा. आणि असें स्वातंत्र्यच धोक्यांत आलें तर तें परत मिळविण्यासाठी प्राणपणाने झगडा करणारा अद्‌भुत जिद्दीचा अजिंक्य समुदाय (ग्रामराज्य संस्कृतींतील फुटीर प्रवृत्ति जिंकून) निर्माण करावयाचा. पराभवांची सनातन परंपरा परतून पाठवावयाची. असा पराक्रम करणारीं माणसें जगाच्या इतिहासांत हाताच्या बोटांवरच मोजायला मिळावयाचीं.

महाराजांनी पराक्रमाने पैदा केलेल्या एक कोटि होनांच्या राज्याच्या कायम सरहद्दी नकाशावर दाखविण्याइतपत त्या वेळचा भूगोल आपणास माहीत नाही. एकतर आसपासच्या अनेक शत्रूंच्या रेटारेटांत त्या सरहद्दी दीर्घकाळ टिकत नसत. एकदा केलेले तह अक्षरशः पाळले जात असें नाही. शिवाय त्या वेळची राजसत्ता आताच्याप्रमाणे एकमेव प्रभावी अशी सर्वव्यापी नव्हती. देशमुख देशपांडे हे स्थानिक छोटे छोटे राजेच होते. रयतेचे जवळचे पुढारी म्हणून ते निरनिराळ्या राजकीय सत्तांशीं संबंध ठेवीत व अशा रीतीने आपापलें वतन व वजन राखण्याचा प्रयत्न करीत. यामुळे आज महाराजांचे तर उद्या मोगलांचे म्हणून ते वागत व वसूल देखील आज एकाला तर उद्या दुसऱ्याला देण्याची त्यांची तयारी असे. कधी कधी तर मुख्य ठाण्याचा किल्ला जिंकण्यांत वेळ घालविण्यांत अर्थ नाही, उगाच रक्तपात नको, म्हणून देखील तो परराज्यांत राहूं दिला जाई. परंतु सभोंवतालची रयत अनुकूल असल्यामुळे आसपासचा मुलूख मात्र महाराजांचा असे. अशा आदिलशाहींतील व मोगलाईतील मुलखांचे सुभे केलेले असत. त्यांवर स्वराज्याप्रमाणेच सुभेदार नेमलेले असत. ते सुभेदार पेशव्यांच्या हाताखाली वागत. महाराजांनी पुढे पुढे मोगलांच्या मुलखांत निर्धास्तपणें चौथाई वसूल करण्याची प्रथा पाडली आणि त्याचेहि सुभे बनविले. ज्याचा किल्ला त्याचा मुलूख (म्हणजे त्याचें राज्य) हा त्या वेळचा राजसत्ता मोजण्याचा सामान्य व्यावहारिक नियम होता. दक्षिणेकडे स्वारी करून महाराजांनी जिंजी (चंदी), वेलूर, अर्णी वगैरे किल्ले जिंकले,


याचा अर्थ त्यांना किल्लेच तेवढे मिळाले असें पाश्चात्य व हिंदी इतिहासकार नकाशांत दाखवितात तें चूक आहे. वास्तविक त्या किल्ल्यांखालील सर्व मुलूख महाराजांनी मिळविला. महाराजांच्या कारकीर्दीच्या अखेरीस महाराजांच्या राज्याचे दोन प्रांत किंवा दोन मोठे विभाग होते, यांत शंका नाही. 'सालेरी किल्ल्यापासून गोदावरी नदी अलीकडे कुल देश वरघाट, तळघाट, तुंगभद्रापावेतों हा एक प्रांत, व तुंगभद्रेपलीकडे कोल्हापूर, बाळापूर, चंदी, येलूर हे सारे धरून कावेरीच्या सरहद्दीपर्यंतचा दुसरा प्रांत.' असे दोन प्रांत मिळून महाराजांचें राज्य झालेलें होतें (मलपृष्ठाला चिकटविलेला नकाशा पाहा).

चवेचाळीस वर्षांचा आढावा


सहाव्या वर्षी (इ. १६३६) पोटमोकासा शिवाजीच्या नांवें करण्यांत आला. बाराव्या वर्षी (इ. १६४२) बंगरुळाहून स्वतंत्रपणें पुण्याकडे रवानगी झाली. आणि एकोणिसाव्या वर्षी (इ. १६४९) आदिलशाही अधिसत्तेशीं बंडखोर म्हणून शिरवळ व पुरंधर येथें प्रथम झगडा सुरू झाला. हीं सुमारें बारा वर्षें शिक्षणाचीं, वडिलांच्या व दादाजी कोंडदेवाच्या छत्राखालचीं. दादाजी इ. १६४७ च्या मार्चमध्ये मृत्यु पावला. तेथपासून खरें म्हटलें म्हणजे पुढचीं बत्तीस तेहतीस वर्षें हीं शिवाजी महाराजांच्या एकट्याच्या कर्तृत्वाचीं गणलीं पाहिजेत. इ. १६४७ पासूनचीं अफजलखानाच्या वधापर्यंतचीं (इ. १६५९) साधारणपणें बारा वर्षें हीं एकट्या आदिलशाहीशीं झुंज करण्यांत गेलीं. पण त्या वेळच्या पराक्रमामुळे सगळीकडून मोहोळ उठून एकट्या जागृत झालेल्या आदिलशाहीशींच नव्हे, तर अजूनपर्यंत तटस्थपणें पाहात बसलेल्या मोगली सत्तेशींहि—कधी एकटीशीं तर कधी दोघींशींहि—जिवाचा धडा करून इ. १६५९ नंतर महाराजांना निदानीचें युद्ध करावें लागलें. हीं पुढचीं सुमारें बारा तेरा वर्षें कडोविकडीच्या आपत्तींवर विलक्षण बुद्धिमत्तेने मात करण्याचीं. यांत आरंभीं इ. १६६० मध्ये घेतलेला पन्हाळा किल्ला जबरदस्त वेढ्याच्या पेंचामुळे सलाबतखानाला देऊन टाकावा लागला होता. पण शेवटीं इ. १६७३ मध्ये तो पुन्हा मिळवून

त्यावर स्वराज्याचा झेंडा फडकला. दक्षिण भागाचा भक्कम राज्यरक्षक पुन्हा खडा झाला. सह्याद्रीच्या राज्याचा रायगड ते पन्हाळा हा कणा पक्का झाला. इ. १६६० ते इ. १६७३ या तेरा वर्षांच्या मुदतीच्या आदि व अंत या दोन टोकांमध्ये पन्हाळ्यांत अडकून पडणें, शायिस्तेखानाची मगरमिठी, जयसिंगाचा लोंढा, आग्र्यांतील जिवावरचा प्रसंग, मोगलांची नोकरी करण्याचा प्रसंग, असे एकाहून एक जिवावरचे व मानहानीचे प्रसंग आले; पण त्यांतून तितक्याच खिताफीने सुटण्याची शहामत शिवाजी महाराजांनी दाखविली. यानंतर सर्व ग्रहणें सुटून शिवाजीराजांचा प्रतापसूर्य सहासात वर्षे सारखा तळपत राहिला. सततच्या पंचवीस वर्षांच्या उद्योगांवर कळस चढला. राज्याभिषेक, दक्षिण दिग्विजय, विजापूरचा कैवार, असे एकाहून एक सरस यशवंत प्रसंग अनुभवांत आले.

चवेचाळीस वर्षांचा हा आढावा अगदी सरळ आहे. यांत सतत सवादोन पिढ्यांचा झगडा आहे. कोणतेंहि फळ कष्टाशिवाय पदरांत पडलेलें नाही. प्रत्येक वेळीं स्वतः संकटांत उडी घेण्याचें निधडें धाडस आहे. रात्रंदिवस युद्धाचा प्रसंग आहे. केवळ सुखासाठी किंवा ऐषआरामासाठी एवढ्या चिकाटीने कोणी झगडत नही. कठोर ध्येयवादाशिवाय कोणी असे श्रम करीत नाही. महाराजांना कधीहि पुरे चार महिने विश्रांति मिळाली असेल असें वाटत नाही. अशा अलौकिक कर्तृत्वाचें प्रतीक म्हणून पारतंत्र्याच्या कालांतील विफलता आणि विषण्णता यांवर उतारा या दृष्टीने अलीकडे राष्ट्रीय चळवळींत, स्वातंत्र्य संपादन करणारा हिंदु, भारतीय, महाराष्ट्रीय म्हणून शिवारायाचें नांव अभिमानाने पुढे करण्यांत आलें. आणि त्यांत तशी चूक कोणतीच नाही. परंतु तसें करतांना आजच्या रूढ राष्ट्रीयत्वाच्या भावना शिवाजीराजांना चिकटविणें रास्त होणार नाही. कारण त्यांच्या वेळीं आजच्या अर्थाने ‘ लोक ’ किंवा ‘ राष्ट्र ’ या कल्पनाच पुढे आल्या नव्हत्या. परंतु बहुसंख्य हिंदुधर्मीयांनी व्यापिलेल्या भूभागावर परधर्मीय मुसलमानांची सत्ता पसरलेली असतांना तेथे हिंदू छत्रपतीचें स्वतंत्र राज्य शिवाजी महाराजांनी स्थापिलें. हिंदी मनाला आपलें वाटेल असें आश्रयस्थान निर्माण केलें. ही महाराजांची कामगिरी हिंदुसमाजाच्या संघटनेला पोषक झाली. अर्थात् ती आजच्या महाराष्ट्रीयांच्या स्वाभिमानाचा, आत्मप्रत्ययाचा व अस्मितेचा पाया समजण्यास हरकत नाही.



रायगड : छत्रपति शिवाजी महाराजांची मूळ छत्री
अष्टकोनी बैठी छत्री मध्यभागीं. जगदीश्वराचें मंदिर उजवीकडे.



रायगड : महाराजांच्या छत्रीवरील नवें स्मारक
खुलें झाल्याचा दिनांक ३ एप्रिल १९२६ इ.

पारतंत्र्याच्या कोंडींत सापडलेल्या भारतीयांनी त्यामुळेच शिवाजी महाराजांना स्वराज्यसंस्थापक, उत्तम सेनापति, मुत्सद्दी आणि राष्ट्राचा निर्माता अशा सर्वोत्कृष्ट पदव्या बहाल केल्या. आणि साहजिकच या कोटींतील शिकंदर, हॅनिबाल, शार्लेमेन, अकबर, नेपोलिअन, वेलिंग्टन, हिटलर, चर्चिल अशा पृथ्वीवरील मोठ्या माणसांशीं त्यांची तुलना केली. त्यांच्या मानाने त्यांना लहान किंवा मोठे ठरविण्याचा प्रयत्न केला. अशी तुलना करावयाची तर समकालीन परिस्थिति आणि तिजवर मात करण्याचीं उपलब्ध साधनें यांची योग्य दखल घ्यावयास पाहिजे. तशी काळजी घेतली तर शिवाजी महाराज कमी पडणार नाहीत. परंतु पाश्चात्यांबद्दल आपल्याला जितकी तपशीलवार माहिती मिळते तितकी आपल्या शिवाजी महाराजांबद्दल मुळीच मिळत नाही, ही मोठी अडचण आहे.

मोगलांचा लोंढा थोपवून धरला

समाज आजचा काय किंवा पूर्वीचा काय, इथून तिथून सारखाच. स्वार्थी, क्षुद्र वतनांसाठी भाईबंदांचे प्राण घेण्यास कमी न करणारा, परधार्जिणा व ऐदी. अशा मठ्ठ समाजाला हालवून जागा करून स्वतंत्र राज्याच्या उद्योगाला जुंपणें ही कामगिरी सामान्य नाही. या राज्याच्या फौजा सुरतेपासून तंजावरपर्यंत शेकडो मैलांच्या क्षेत्रांत शिवाजी महाराजांनी खेळविल्या. तेव्हा सेनापति म्हणून त्यांचा हुरूप आणि हिंमत केवढी असेल याची कल्पना करावी. एकामागून एक शेकडो लढायांचें बनलेलें असें दीर्घकालीन स्वातंत्र्ययुद्ध इ. १६५९ पासून इ. १६७९ पर्यंत सतत वीस वर्षें त्यांनी चालविलें. त्यांत सिंहगड, फोंडा, कर्नाळा, माहुली अशांसारखे किल्ले वेढा घालून शर्थीनें जिंकणें आणि साल्हेरसारख्या मोगली मुलखांनी घेरलेल्या किल्ल्याचा वेढा उठवून लावणें असले जिद्दीचे पराक्रम आहेत. पन्हाळा, संगमेश्वर, वणीदिंडोरी, कण्हेरगड, उंब्राणी, नेसरी, तंजावर अशा खणाखणीच्या लढाया आहेत. विजापूरचा गळा दाबून दिलेरखानाने घातलेला वेढा उठविण्यासाठी थेट औरंगाबाद-जालना येथपर्यंत फेकलेल्या गनिमी घोडदौडीच्या रोमांचकारी भराऱ्या आहेत. मुरलेले 'राजकरण'-पटु आणि पुढारलेल्या आरमाराचे धनी पोर्तुगीज आणि इंग्रज यांच्या

डावपेंचांवर कुरघोडी केल्याची शहामत आहे. मांडलीक देसाई सावंत यांना आपल्या मुलखांत आश्रय देऊन मराठ्यांच्या स्वराज्याला भगदाड पाडण्याला उत्तेजन देणाऱ्या गोवेकर पोर्तुगीजांना विद्युद्वेगाने स्वारी करून जेरीस आणण्याचें अवर्णनीय साहस आहे. तर इंग्रजांच्या प्रतिकाराला न जुमानतां मुंबई बंदराच्या अगदी तोंडावरच्या खांदेरी बेटाला त्यांच्या डोळ्यांदेखत तटबंदी करून घेतल्याचा असामान्य विक्रमहि आहे. या सर्व घटनांची आज आपल्याला परिचित आहेत, तीं बहुधा नांवें. कांही तपशील मिळतो तो फक्त शत्रुपक्षीय वृत्तान्तांचा. आपल्या बाजूचीं अस्सल साधनें किंवा सविस्तर वृत्तान्त मिळत नाहीत. ते मिळतील तर अत्यल्प साधनांवर अति भव्य यश संपादणाऱ्या शिवाजी महाराजांची राजनीति व युद्धकौशल्य श्रेष्ठ दर्जाचीं होतीं असें सिद्ध झाल्याशिवाय राहणार नाही. महाराजांच्या मुत्सद्दीगिरीची गोष्ट अशीच आहे. दृढमूल झालेल्या प्रबल शाह्यांपैकी एकीच्या परसांत कोठेतरी एक लहानसें रोपटें रुजवून त्याचा पाहतां पाहतां फोफावणारा स्वतंत्र राज्यवृक्ष बनविणें ही अद्भुत कामगिरी खरोखर असामान्य मुत्सद्दीगिरीशिवाय साध्य होण्यासारखी नाही. साम, दाम, दंड, भेद अशा चारहि प्रकारांचा जरुरीप्रमाणे वापर करून सर्वांना झुलवून राजकारणाचा खेळ खेळणारा गारुडी म्हणून शिवाजी महाराजांची चतुराई वर्णन करावी तितकी थोडीच. दक्षिणेकडील दोन्ही शाह्यांत पक्षोपपक्षांचे हेवेदावे, खून, मारामाऱ्या आणि जाळपोळ अशा थरापर्यंत पोंचलें असतांना, सर्वांची एकजूट कशीबशी सांभाळून उत्तरेकडील उपरी मोगल सत्तेचा औरंगजेबी लोंढा शिवाजी महाराजांनी कांही काळ थोपवून धरला. इ. १६३६ मध्ये आदिलशाहीशीं ठरविलेल्या सरहद्दीपलीकडे मोगलांना कायमचें असें एक पाऊल त्यांनी पुढे टाकूं दिलें नाही! उत्तर विरुद्ध दक्षिण या वादांत दक्षिणेचा यशस्वी पुरस्कार करणारा कर्ता पुढारी म्हणून महाराजांचें नांव अजरामर राहील. इ. १६७६-७७ सालीं कर्नाटकांत नवें राज्य जिंकून त्यांनी या वादांत अखेरी मारण्याची तयारी करून ठेविली, तो त्यांच्या प्रतिभेचा फार मोठा आविष्कार होय. औरंगजेबाने जेव्हा जातीनिशीं येऊन सर्व दक्षिण पालथी घालण्याचा चंग बांधला, तेव्हा ह्या उत्तर पादशाहीने चिरकाल जागविलेल्या शत्रुत्वाचा प्रतिकार मराठ्यांनी जिवाच्या करारावर केला. महाराजांनी जिंकून घेतलेल्या जिंजीच्या

आश्रयानेच तो जिवंत राहिला आणि औरंगजेबाच्या मरणानंतर बादशाहीचे दडपण नाहीसें झाल्यावर फिरून बोल बोल म्हणतां प्रभावी झाला.

शिवरायाचा आठवावा साक्षेप

शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या या जोड राज्याला एखादें समर्पक नांव रूढ करणें अवश्य आहे. ‘ हिंदवी स्वराज्य ’ हें प्रारंभींच्या शपथेच्या उत्कृष्ट संदर्भात आणलेलें नांव पुन्हा कधी वापरलेलें आढळत नाही. आणि राज्याभिषेकानंतरच्या मायन्याच्या आधाराने जरी त्याला ‘ छत्रपतीचें राज्य ’ म्हणतां येईल, तरी पण त्यांत नेमकेपणा नाही. ‘ शिवशाही ’ हें फार संकुचित व ‘ मराठशाही ’ हें फार व्यापक वाटतें. राजधानीवरून त्याला ‘ रायगडचें राज्य ’ म्हणतां येईल. त्याचा एकांगी विस्तार पाहतां त्याला ‘ महाराष्ट्राचें राज्य ’ हें नांव पेलणार नाही. आणि तशाच कारणांसाठी नेपोलियन स्वतःला फ्रेंचांचा सम्राट् म्हणवी तसें शिवाजीला ‘ मराठ्यांचा राजा ’ असें कोणीं म्हटल्याचें दिसत नाही. तेव्हा मूळ आरंभाचा व राज्याच्या प्रमुख आधाराचा विचार करतां महाराजांच्या राज्याला ‘ सह्याद्रीचें राज्य ’ म्हणणें यथार्थ ठरेल असें वाटतें. कारण त्याचा आरंभींचा पसारा सह्याद्रीच्या आसपासच आहे. सह्याद्रीच्या कण्यामुळे त्याला चिवटपणा आला. सह्याद्रीच्या गिरिदुर्गांमुळे अभेद्यपणा लाभला. सह्याद्रीमुळे पाऊस आणि पावसामुळे पुरेशी सुबत्ता मिळाली. राज्यासाठी या मुलखाची निवड करणाऱ्या शिवाजीराजांचें कौतुक करावें तितकें थोडें. एकदा हा भूप्रदेश निवडल्यावर चारपांचशे मैल समुद्रकिनाऱ्याच्या बंदोबस्ताकरिता आरमाराचाहि पायंडा त्यांनी घातला आणि दहापंधरा वर्षांत दीडदोनशे लढाऊ गलबतांचें जबरदस्त आरमार स्वदेशांतल्या कारागिरांकडूनच बांधवून तयार केलें. पुढारलेल्या युरोपीय लोकांकडून माहिती व शिल्पज्ञ मिळवून आपल्या किल्ल्यांचें बांधकाम उत्कृष्ट होण्याची फार काळजी घेतली. आणि या भागांत पक्केपणा आल्यावर त्याच्या आधारावर आणखी तेवढेंच नवें चंदीचें राज्य कर्नाटकांत संपादन केलें.

शिवाजी महाराजांचीं विश्वसनीय चित्रें पाहून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा जसा मनावर उमटतो, तशीच त्यांच्या निरपवाद प्रगतिपरतेचीहि खात्री पटते. त्यांच्या रुंद कपाळावरून बुद्धिमत्तेचा प्रत्यय येतो. गरुडा-

सारखें नाक निग्रह व निश्चय दर्शवितें. स्वच्छ पण भेदक डोळे निर्मळ मन, खोल विचार आणि तडफ यांची साक्ष पटवितात. तर दाढी, झगा व डौलदार पागोटें हा त्या काळीं रुबाबदार समजला जाणारा त्यांनी स्वीकारलेला पोशाख हा त्यांची आघाडीची मनोवृत्ति दाखवितो. त्या काळच्या दंडकाप्रमाणे पाहतां शिवाजी महाराज लोकांवर छाप बसावी म्हणून शानदार टापटिपीचे कपडे घालणारे, बारीकसारीक तपशिलांत लक्ष देणारे, जीवनांतील श्रेष्ठ आनंद अनुभवणारे व अनुभवणें शक्य करणारे पुरोगामी नेते वाटतात. नवें राष्ट्र उभें करण्याला पोषक अशा सर्व विधायक गोष्टींचा विचार धावपळीच्या जीवनांत देखील त्यांनी केला. राज्याभिषेकाच्या प्रसंगाने अष्टप्रधानांचीं मूळ फारसी नांवें बदलून त्यांनी संस्कृत नांवें रूढ केलीं. त्यासाठी संस्कृत भाषेंत राजव्यवहारकोश करवून घेतला. आजच्या प्रमाणेच त्या कालांत ग्रहलाघवी गणिताने पंचांगाचा दृक्प्रत्यय येईनासा झाला. म्हणून महाराजांनीं मुद्दाम कृष्णज्योतिष्याकडून 'करणकौस्तुभ' नांवाचा ग्रंथ रचून घेतला. यांतहि तीच शास्त्रप्रियता आहे. नेताजी पालकर निमित्ताने बाटून मुसलमान झाला होता. त्याला त्यांनी फिरून हिंदुधर्मात शुद्ध करून घेतलें (मागे पृ. २०४ पाहा). ही त्यांची मूलग्राही प्रगतिप्रियता त्या काळच्या समाजाच्या कल्पनांच्या मानाने फार धाडसाची समजली पाहिजे.

या सगळया गोष्टी खऱ्या असल्या तरी शिवाजी महाराज सतराव्या शतकांत राहात होते. त्या वेळच्या समाजाच्या नव्वद टक्के कल्पना मानणारे होते. नेपोलिअनप्रमाणे एखाद्या परिस्थितींत अत्यावश्यक काय आहे, याची त्यांना तत्काळ कल्पना येई आणि ती गोष्ट ते निश्चयाने करून टाकीत. अफजलखानाच्या प्रसंगीं परिस्थितीने दिलेलें आव्हान त्यांनी स्वीकारलें आणि काटेकोर नीतिनियमांचें बुजगावणें जाणूनबुजून दूर सारलें. पण सामान्यपणें वागतांना देवतापूजन, देवीच्या दृष्टांताचें पालन, भेटीसाठी वगैरे मुहूर्त पाहणें, साधुपुरुषांचा अनुग्रह स्वीकारून त्यांचा योगक्षेम चालविणें, अशा किती तरी गोष्टी साहजिकच ते एखाद्या निष्ठावंत हिंदूप्रमाणे करीत. बहुसंख्य हिंदूंना अर्थातच ते आपल्यापैकी एक वाटत. महाराजांचें ते मना-पासून ऐकत. शिवाजी महाराज जातिद्वेष नष्ट करण्याकरिता आजच्या सारखे टोकाला जात नसत. पण सर्व जातींना राष्ट्रकार्याला जुंपून त्यांनी जाति-भेदांतील द्वेषाचें विष मारून टाकलें. त्यांनी राज्याच्या व किल्ल्यांच्या

कारभारांत मराठे, ब्राह्मण, प्रभु, सारस्वत या पुढारलेल्या जातींचा केवळ नव्हे, तर मावळे, हेटकरी, महार, देशी मुसलमान अशा मागासलेल्या आणि विधर्मी जातींचा देखील उपयोग करून घेतला. सर्वांवर ज्याच्या त्याच्या कुवतीचा अंदाज घेऊन सारखी जबाबदारी टाकली. त्यामुळे सर्वच जाती-जमाती स्वराज्यासाठी सहकार्याने वागूं लागल्या.

महाराजांनी वतनांवर निर्बंध घातले हें खरें आहे. परंतु त्यांचें तारतम्य सुटलें नाही. वतनें देण्यांतला प्रधान हेतु वतनदारांनी मुलखाची आबादानी करणें हा. तो साधावयाचा असे तेव्हा बेइमान माणसालाहि त्यांनी वतनावर परत बोलाविल्याचें उदाहरण आहे. पण ऐदी वतनदार प्रजेवर सुखासुखी चरून राज्यांत बखेडे माजवायला रिकामा ठेवूं नये, म्हणून त्यांनी वतनें अमानत ठेवल्याचीं उदाहरणें आहेत. उलट स्वतःच्या राज्याला ‘ वतन ’ शब्द वापरण्याचा मोह त्यांना टाळतां आला नाही. किंवा पाटिलकीचे व्यवहारहि स्वतःचा जावई महादजी निंबाळकर व भाऊ बकाजी फर्जंद यांसारख्या नातेवाईकांच्या बाबतींत करण्याचें त्यांनी सोडलें नाही. यावरून एवढेंच घ्यावयाचें की, शिवाजी महाराज विवेकी व दूरदर्शी होते. त्यांनी छांदिष्ट क्रान्तिकारकाची एककल्ली भूमिका कधीहि घेतली नाही.

राज्यकारभार आणि शिस्त

शिवाजीमहाराजांच्या एकंदर राज्यकारभाराबद्दल तसेंच म्हणतां येईल. त्यांनी नवें राज्य उभारावयाचें म्हणून अनुभवाने उपयोगी ठरलेल्या जुन्या पद्धति व जुने अधिकारी टाकून दिले नाहीत. त्यांच्यांत नवी उमेद आणि नवी शिस्त उत्पन्न केली. अधिकारावर घरोब्याचीं, स्नेहांतलीं आणि प्रामाणिक माणसें नेमलीं. आपल्या मुलखाचा कारभार आदर्श व्हावा म्हणून स्वतः जागरूकतेने नजर ठेवली. माणसांची पारख करून कामें दिलीं. लष्करी पराक्रम गाजविणारीं तेवढीं माणसें मोठीं असें मानलें नाही. युद्ध करून मिळविणें जेवढें महत्त्वाचें तितकेंच मिळविलेल्याचें रक्षण करणें महत्त्वाचें असें मानून दोन्ही ठिकाणीं कर्तबगार माणसें संभाळलीं आणि राज्यकारभार समतोल राखला. महाराजांच्या राज्यांत हिशेबतपासणीबद्दल आदर्श काटेकोरपणा दिसतो. पुढील पेशवाईच्या काळांत ज्याप्रमाणे कर्जबाजारीपणामुळे मोठमोठ्या सेनापतींचा व राज्यकर्त्यांचा पराक्रम

मातीमोल झाला, तशी परिस्थिति महाराजांच्या राज्याची झाली नाही. शांततेने राज्य चालवावयाला खर्च कमी लागत नाही. पण त्यापेक्षा युद्धाला खर्च कितीतरी पट लागतो. शिवछत्रपतींनी तर सतत अनेक शत्रूंशीं झगडा चालविला. आणि असें असतांहि त्यांना कोणत्याहि प्रकारें द्रव्याचा तोटा पडला नाही आणि त्यांची मोहीम फसली असें झालें नाही. त्यांचीं इमारत-कामें, किल्ल्यांवरचीं बांधकामें, त्यांच्या फौजांच्या हालचाली व त्यांच्या मोहिमा सर्व सुरळीत चालण्यासाठी त्यांनी पुरेसा खजिना जमविला आणि उत्तम तऱ्हेने वापरला. त्यांच्या अमलाखालील लष्कर, आरमार, किल्ले, खजिना, व्यापार, वगैरेच्या आदर्श कारभाराचें प्रतिबिंब 'अमात्यांची राजनीति' (आज्ञापत्र) या प्रकरणांत परिपूर्ण पडलेलें आढळतें.

शिवाजी महाराजांनी गुणी माणसांचा संग्रह केला म्हणून त्यांचा कारभार यशस्वी झाला. पण त्याबरोबरच ते माणसांना शिस्तींत राखण्यासाठी जरूर तेथे जरब दाखविण्यासहि कमी करीत नसत. अशा संबंधाचीं कांही उदाहरणें सांगण्यासारखीं आहेत. महाराजांचा हा कडकपणा त्यांना असलेल्या बारीक सारीक सर्व प्रकारच्या उत्तम माहितीमुळे त्यांना अगदी शोभून दिसे. एकदा मावळच्या देशाधिकाऱ्याने शितोळे देशमुखांची पाटिलकी दुसऱ्याला दिली. त्याला महाराज लिहितात, "स्वामी (= शिवाजी) धाकुटपणापासून या देशांत आहेत. मिरासदार कोण, गैरमिरासदार कोण हे जाणताती. व माणसाचे माणूस (= प्रत्येक माणूस) वळखतात." असें असल्यामुळे केदारजी खोपड्यासारख्या अफजलखानाला मिळालेल्या माणसाला तूं आमच्या गावास त्रास देतोस त्यांत "तुम्ही आपला काये फायदा समजले आहां—हे अक्कल तुम्हांस कोणे दिधली!" असें महाराज फटकारून विचारीत. पण पुन्हा वेळ आली तर वतनावर घेऊन प्रेमाने जवळ देखील करीत. एकदा आदिलशाहींतून घेतलेल्या एका मुलखाचा देशकुळकर्णी हवी होती ती माहिती पुरविना. त्याला महाराज लिहितात, 'देशकुळकर्णी म्हणवितोस आणि वसूल लिहीत नाहीस?" अर्थात् त्याला ताकीद करून लगेच त्याच्याकडून खंड गुन्हेगारी घेतलीच! याहूनहि अधिक कडक आणि फार रागाचें असें पत्र आपल्यासमोर आहे. हबशाशीं लढणाऱ्या आरमाराला मोहिमेसाठी पैसा हवा होता. तो देण्याबद्दल मोरोपंत पेशव्याने प्रभावळी मामल्याच्या सुभ्यावर वराता म्हणजे

सरकारी हुंड्या दिल्या. पण त्या त्याने भरल्या नाहीत. हें पाहून महाराज संतापून लिहितात, "ऐसे नादान थोडे असतील...तुम्ही ऐवज न पाववून आरमार खोळंबून पाडाल. एवढी हरामखोरी तुम्ही कराल...हबशियांनी कांही (लांच) देऊन आपले चाकर तुम्हांला केले असतील...तरी ऐशा चाकरांस ठीकेठीक केले पाहिजेत. ब्राह्मण (आहां) म्हणून कोण मुलाहिजा करूं पाहतो ?...गनीमाचे (= शत्रूचे) चाकर, गनीम झालेस (= शत्रू-कडील फितूर म्हणजे तूं शत्रूच झालास)." एकट्या व्यक्तीचा एवढा दरारा हाच महाराजांच्या सुव्यवस्थेचा मुख्य पाया होता. शिवकालीन राजा हा संपूर्णपणें अनियंत्रित होता. कारभाराच्या निरनिराळ्या विभागांकडे त्याच्या वतीने लक्ष पुरविणारे अष्टप्रधान नेमलेले असत. त्या सर्वांकडून उत्तम काम करून घेण्यासाठी छत्रपतीच्या अंगीं विशेष गुण असणें अवश्य होतें. शिवाजी महाराजांच्या अंगीं ते भरपूर प्रमाणांत होते, याबद्दल शंका नाही.

उत्तम गुणांसि नाही सीमा

अशा तऱ्हेने पाहतां राज्यसंस्थापक, सेनापति, मुत्सद्दी आणि राष्ट्रसंवर्धक समाजधुरीण अशा चारी क्षेत्रांतील महाराजांच्या अंगच्या प्रवृत्ति इतक्या शुद्ध, समतोल, नैसर्गिक, व्यापक, विधायक आणि श्रेष्ठ दर्जाच्या आढळतात, की त्या त्यांना कोणीं तरी पंतोजीसारख्या पढविल्या असें समजून त्याबद्दलचें श्रेय अन्य कोणाला दिलें पाहिजे अशी वस्तुस्थिति नाही. शिवाजी महाराज निःसंशय कृतिवीर म्हणजे कृतींत पुरुषार्थ मानणारे वीर पुरुष वाटतात. त्यांचे बेत ते स्वतः अमलांत आणतात, अशी अनेकांनी त्यांच्या आश्चर्य-कारक आणि अनपेक्षित हालचालींबद्दल मीमांसा केलेली आहे. आग्र्याहून सुटका हा निदान असा प्रसंग आहे की, ज्या वेळीं त्यांना अन्य कोणाच्याहि सल्लामसलतीचा लाभ झालेला नाही. आणि असें असतांहि तो त्यांच्या जीवनांतील अत्यंत उत्कट, अजोड आणि तितकाच अद्भुत असा प्रसंग आहे. शिवाजी महाराजांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे असे अनेक पैलू आहेत. त्यांच्या असामान्य पराक्रमाच्या प्रवाहामध्ये अनेकांचे वात्सल्याचे, सदिच्छांचे, सहकार्यांचे, आशीर्वादांचे आणि सहविचाराचेहि निर्मळ पाझर आदरपूर्वक येऊन मिळाले असले पाहिजेत. खुद्द राजमाता जिजाबाई, वडील शहाजी, सुभेदार दादाजी कोंडदेव, सोंगडी दादाजी

नरसप्रभू आणि इतर देशमुख देशपांडे, अनेक साधुसंत, आणि राजगुरु श्रीसमर्थ रामदास स्वामी यांचीं नांवें सहज सुचतात. महाराजांच्या अंगांतील तेजाची ठिणगी फुलत ठेवण्यासाठी यांनी मनापासून कष्ट केले असतील. पण ह्या गोष्टींबद्दल प्रत्यक्ष पुराव्याची मागणी कोणीं केली तर ती नेमकी पुरवितां येईल असें मात्र नाही. उलट कृष्णाजी बांदल, चंद्रराव मोरे, संभाजी मोहिते, दळवी, सूर्याजीराव अशा शेकडों स्वकीयांनीं आणि सर्वत्र पसरलेल्या परसत्तांच्या सेनापतींनी तितक्याच हिरिरीने महाराजांना विरोध केला असला पाहिजे. या साहायकांचा आणि विरोधकांचा परस्पर संक्षेप उडाला आणि त्यांतून महाराज आपल्या उत्तम गुणांनी अखेरीस विमल यश घेऊन बाहेर पडले यांत तिळमात्र शंका नाही.

तात्पर्य, महाराजांच्या सभोंवतालीं जसे अनुकूल तसे प्रतिकूलहि अनेक धागे होते. त्यांतून त्यांनी स्वतःकरिता आणि स्वजनांकरिता सह्याद्रीच्या स्वराज्याचा गोफ विणून दाखविला. महाराजांनी स्वतःच आपल्या यशापयशाचा आढावा घेतला असता, तर त्यांना त्यांत अनेक गुण व दोषहि दाखवितां आले असते. पण त्यांना सर्व गोष्टींचें प्रत्यक्ष ज्ञान असल्यामुळे त्यांनी कित्येक गोष्टींचें समर्थन करणें व इतर कित्येक गोष्टींबद्दल असमाधान व्यक्त करणें शक्य व रास्तहि झालें असतें. तशा आवश्यक असणाऱ्या विश्वसनीय माहितीपैकी एकशतांशहि आपल्या समोर नाही. असें असलें तरी, आपल्या एकंदर इतिहासांतील एक अत्यंत अभिमानास्पद कालखंड म्हणून शिवकालाचें स्थान निरपवाद आहे. त्यांतील घटना आपल्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेला पोषक आहेत. आपल्या स्वाभिमानाला उत्तेजक आहेत. आपण इतिहास घडवूं शकतों असा आत्मविश्वास त्यांच्यामुळे आपणाला वाटतो. आणि स्वराज्य आणि सुराज्यहि अनुभविण्याचें भाग्य आपल्या आवांक्याबाहेर नाही असें आपल्या पराक्रमाला आव्हान त्यामध्ये आहे.

* * *

परिशिष्ट १

शिवाजी महाराजांचीं निवडक पत्रें

१. हें राज्य व्हावें हें श्रीचे मनांत आहे

२. आमच्या इमानावरी मान ठेउनु येणें

३. हे अक्कल तुम्हांस कोणे दिधली !

४. त्याचें पाप तुमचे माथा !

५. आपल्या भूमीचें रक्षण करणें माझें कर्तव्य

६. आज्ञेप्रमाणे घडोन आलें

७. लोकांस बेकैद होऊं न देणें

८. लष्कराच्या शिस्तीचा बारकावा

९. गनीमाचे चाकर गनीम जालेस

१०. येक भाजीच्या देठासहि मन नको

११. साहेबकाम उदंड कराल !

१२. दक्षिणची पातशाही दक्षिणियांच्या हातीं हवी

१३. मुख्य धर्म राज्यसाधन : तीच श्रीची सेवा

१४. उद्योग करून तमासे दाखविणें

१५. माणसाचे माणूस ओळखतात

१६. विजापूरचें अरिष्ट दूर करून विजापूर रक्षिलें

१७.
१८. } महाराजांचीं दोन अस्सल इनाम-पत्रें (ठशांसह)

महाराजांचीं निवडक पत्रें

महाराजांनी लिहिलेलीं म्हणजे महाराजांकडून पाठविण्यांत आलेलीं सरकारी व बिनसरकारी अशीं जवळ जवळ दोनशे पत्रें आजपर्यंत आढळलीं आहेत. त्यांतून निवडून फक्त १८ येथे दिलीं आहेत. या सर्वांचीं अस्सल मूळ पत्रें संशोधकांना मिळालेलीं नाहीत. बऱ्याच पत्रांच्या नकलाच सांपडल्या. या नकला करणारांच्या हातून मूळचें शुद्धलेखन आणि क्वचित् भाषा यांत बदल झालेला आहे. अर्थात् तत्कालीन भाषेच्या अभ्यासासाठी या छापलेल्या पत्रांवर कोणीं सर्वस्वी विसंबूं नये. महाराजांचें व्यक्तिमत्त्व आणि मनोगत समजून घेण्यास उपयोगी पडावीं एवढ्यासाठी हीं निवडक पत्रें उतरून दिलीं आहेत. महाराजांनी स्वमुखाने घडविलेलें आपल्या उद्योगाचें व चारित्र्याचें हें दर्शन इतरांच्या शतपट विस्ताराच्या विवेचनापेक्षा किती तरी अधिक सजीव आणि समर्पक ठरेल. उतारे करतांना नक्कलकारांनी कांही फेरफार केले असतील. शिवाय मुळांत नसलेलीं विरामचिन्हें देखील वाचकांच्या सोयीसाठी आम्हीं वापरलीं आहेत व भावार्थ समजण्यापुरते शब्दार्थ पत्राच्या खाली दिले आहेत. साधारणपणें तितकीं सर्वस्वी विश्वसनीय वाटलीं नाहीत अशीं — म्हणजे जयसिंगाला लिहिलेलें पत्र वगैरे — वगळलीं आहेत; पण तीं अन्य दृष्टींनी लोकप्रसिद्ध व उपलब्ध आहेतच.

* * *

१ हें राज्य व्हावें हें श्रीचे मनांत आहे

[स्वराज्यस्थापनेसाठी बालशिवाजीचे प्रयत्न कसे चालले होते त्याचें कांही स्वरूप या लेखावरून समजतें. स्वराज्य स्थापण्याच्या कल्पनेस परमेश्वराची अनुकूलता आहे असें महाराज स्वतः मानीत व इतरांच्या मनावर तसें बिंबवीत. आणि तसें वाटत असलेल्या लोकांकडून देवासमक्ष एक-

मेकांशीं इमानाने वागण्याच्या शपथा घेववीत असें दिसतें. या आणाभाकांची गुणगुण सरकारदरबारांत जाई आणि तेथून पारिपत्याची भाषा सुरू झाली म्हणजे निदान वडील माणसांची त्रेधा उडे. त्यांचें सांत्वन शिवाजी महाराज कसें करीत हें या पत्रावरून कळून येतें.]

राजवाडे खंड १५ ले. २६८ } { शक १५६७ वैशाख शु. १ इ. १६४५ एप्रिल १७

श्री

राजश्री दादाजी नरसप्रभु देशपांडे व कुलकर्णी ता। रोहिर खोरे व वेलवंड खोरे यासी प्रती सिवाजी राजे. सु॥ खमस अर्बैन अलफ. तुम्हांस मेहेरबान वजिराचा विजापुराहून हुकूम आला, तो ठाणे सिरवलाहून अमिनानी तुम्हांकडे पाठविला. त्याजवरून तुमचे बाप नरसीबाबा हवालदिल जाले वगैरे कितेक बहुत लिहिले. त्यास, **शाहासी बेमानगिरी तुम्ही व आम्ही करीत नाही.** श्रीरोहिरेश्वर तुमचे खोरियातील आदि कुलदेव तुमचा डोंगरमाथा पठारावर शेंद्रिलगत स्वयंभू आहे. त्याणी **आम्हास यश दिल्हे व पुढे तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे.** त्यास, बाबास हवाल होऊ नये खामखा सांगावा आणि तुम्ही तो कागद घेऊन सिताब हुजूर येणें. राजश्री दादापंताचे विद्यमाने **बाबाचे व तुमचे व आमचे श्रीपासी इमान जाले** ते कायम वज्रप्राय आहे. त्यांत अंतर आम्ही व आमचे वंशज लेकराचेलेकरी वतन वगैरे चालविण्याविसी कमतर करणार नाही. **हें राज्य व्हावें हें श्रीचे मनांत फार आहे.** याप्रमाणे बाबाचे मनाची खात्री करून तुम्ही येणें. रा छ २९ सफर बहुत काय लिहिणें (मोहोर)

अमीन (अमील) – अधिकारी. सिताब (शिताब) – चपळाईने. हुजूर– महाराजांकडे. शेंद्रिलगत – सह्याद्रीलगत (?). दादापंत – दादाजी कोंडदेव. खामखा – जरूर, खात्रीने. श्रीपाशी – देवापाशीं. अंतर – कसूर. लेकराचेलेकरी – वंशपरंपरेने.

* * *

२ आमच्या इमानावरी मान ठेउनु येणें

[एवढ्या मोठ्या राज्यव्यवहारांत नानाप्रकारचे गैरसमज होतच. इतर अनेक हितशत्रु त्यांत भरहि घालीत. ते दूर करण्याची महाराजांची घरोब्याची आणि जिव्हाळ्याची भाषा या छोट्याशा पत्रांत आढळून येते.]

मराठी दप्तर रुमाल ३ ले. २१	श. १५७७ इ. १६५५

श्री

ई कौलनामा अज रख्तखाने राजश्री शिवाजी राजे दामदौलतहु ताा हैबतराउ देसमुख ताा गुंजणमावळ. सुाा सीत खमसैन अलफ. दादे कौलनामा ऐसाजे. तुमचे बाबे हुजूर खबर मालूम जाली जे, कित्येक वढिया लोकांनी तुमचे पाठी शक घातला आहे की, तुमची देसमुखी आम्ही घेऊं. तुम्हास वाईट करूं, ऐसा शक घातला आहे. व दळवी याचे कर्ज आहे, त्यास तुम्ही जमान आहां, जमानती झाडे लाउन आ (?तु) म्हास कष्टी करूं ऐसा शक तुमचे पोटीं बैसविला आहे. व कितेक तुमचिया घरोबियामधे एक प्रकार वर्तणूक जाली आहे, असे कितेक लोक बोलताती. तरी येही गोष्टीच्या निमित्या येऊन कष्टी करितील ऐसा शक बसविला आहे. या तिही गोष्टीकरिता व कितेक गोष्टीकरिता तुम्ही शकजादे आहां. डावाडौल होतां. तरी **तुम्हास साहेब घरिच्या लेकरासारिखे जाणिती** आणि तुमचे फार हेहि गोष्टीचे वाईट करावे ऐसे मनावर कधी धरणार नाहीत, हे तुम्हास बित्तिम कळले असावे. कोणेहि गोष्टीचा शक न धरणे. **तुमचे हजार गुन्हे माफ आहेती.** तुम्हासी आम्ही काहीही वाईट वर्तणूक करू तरी **आम्हास महादेवाची आण असे; व आईसाहेबाची आण असे.** कोणेहि गोष्टीची चिंता न करणे. अवांतरही लोक भेडसाविले असेल

ते भेटविणे. आमच्या इमानावरी आपली मान ठेउनु आम्हापासी येणे. कोणे गोष्टी चिंता न करणे. मोर्तब

ई कौलनामा – हें अभयपत्र. अज रख्तखाने शिवाजी राजे – शिवाजी राजे यांच्या कचेरी (– रख्तखाना) पासून (–अज). दामदौलतहु –त्याचें राज्य चिरायु होवो. ता़ा (तहां) – कडे, त्यांस. तहां हैबतराउ–हैबतरावांस. ता़ा (तर्फ)–ग्रामसमूह. शकजादे – भयभीत. दादे – दिला. हुजूर – दरबारांत. वढिया (वढाय, वढाळ) – उनाड, बदमाष. शक – भीति. एक प्रकार –उलट प्रकारची. डावाडौल – मनाने डळमळीत. बित्तिम – खात्री-लायक. आईसाहेब – मातुश्री जिजाबाई.

* * *

३ हे अक्कल तुम्हास कोणे दिधली ?

[हेंहि पत्र मागच्याच पत्राच्या नमुन्याचें आहे. येथे तर प्रत्यक्ष शत्रूला मिळून बेमान झालेल्या देशमुखाचा प्रश्न होता. तरी देखील त्याला जवळ केला आहे, हें ध्यानांत घेण्यासारखें आहे.]

शि. च. सा. खंड ५ ले. ७६२ | श. १५८३ भाद्र. व. ७ इ. १६६१ सप्टें. ५

ई कौलनामा अज रख्तखाने राजश्री शिवाजीराजे साहेब दामदौलतहु ता़ा केदारजी नाईक खोपडे देशमुख ता़ा उतरवली ता़ा रोहडखोरे. बिदानद सुा़ा इसने सितैन आल(फ). दादे कौलनामा यैसाजे. जे वख्ती अफजल साहेबांचे तरफेस आला होता ते वख्ती तुम्ही येक वजा समजोन गनिमास मिळाले. तयावरी गनिमाचा अमल बरतरफ जाला. याकरिता तुम्ही शक अंदेशा धरून ता़ा मजकुरास न येऊन आपल्या हक्काबद्दल गांवगनास अजार देत आहा. तरी यामधे तुम्ही आपला काये फायदा समजले आहा ? साहेबासी गैर रुजू असावे आणि आपल्या हकास खलल करून घ्यावे हे

अकल तुम्हास कोणे दिधली आहे ? या उपरि कोणे बाबे शक अंदेशा न करून आपल्या वतनास येणे आणि आपले देशमुखीचा इनाम व हक खाऊन खुशहालीने राहणे. साहेबांची मेहरबानी तुम्हावरी बहुत आहे. हर बाबा आपली खातिरजमा असो देणे. काही शक न धरणे. मोर्तब सुद.

ताा[1]–तहा केदारजी नाईक –केदारजी नाईक यांस. ताा[2]–तर्फ उतरवली–उतरवली या ग्रामसमूहांतील. ताा[3]–तपे रोहडखोरे––रोहिडखोरें तप्यांतील. बिदानद (फा. बिदानंद)–जाणावें की. कौलनामा–अभय पत्र. साहेबाचे तरफेस –साहेबांच्या (शिवाजीराजांच्या) बाजूला, त्यांच्यावर. येक वजा–वेगळ्या प्रकारची, गैर प्रकारची. गनिम –शत्रु. बरतरफ–बडतर्फ, पदच्युत, रद्द. शक अंदेशा–भय, भीति. अजार–त्रास. गैररुजू–प्रतिकूल, विरुद्ध. खलेल–वांधा. खुशहालीने–आनंदांत. खातिरजमा–खात्री.

* * *

४ त्याचें पाप तुमचे माथा !

[प्रजेच्या हितासाठी कनवाळूपणें आपल्या हाताखालच्या लोकांना नीट समजावून दिलेला पुढील हुकूम आणखी एक वेगळयाच प्रकारचा महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचा पैलू दाखवितो. सावधगिरीने न वागलें तर आपल्या प्रजेला मोगल कैद करून नेतील. आणि मग त्यांच्या यातनांचें पाप आपल्या अधिकाऱ्यांच्या माथ्यावर बसेल. म्हणून रात्रीचा दिवस करून गावोगाव हिंडून लोकांना सावध करण्याची यांतील आज्ञा शायिस्तेखानाची स्वारी आल्यावेळची आहे.]

राजवाडे खं. १५ ले. २७६	श. १५८४ कार्तिक व. ७ इ. १६६२ ऑक्टो. २३

मश्हुरल अनाम सर्जाराऊ जेधे देसमुख ताा रोहिडखोरे प्रती राजश्री सिवाजी राजे. सुा सलास सितैन अलफ. मोगल प्रस्तुत तुमच्या तपियात धावणीस

येताती म्हणौन जासुदानी समाचार आणिला आहे. तरी तुम्हास रोखा अहडताच तुम्ही तमाम आपले तपियात गावाचा गाव ताकिदी करून माणसे लेकरेबाळें समेत तमाम रयेती लोकास घाटाखाले बांका जागा असेल तेथे पाठवणे. जेथे गनिमाचा आजार पहुचेना ऐशा जागीयासी त्यासि पाठवणें. ये कामास हैगै न करणे. रोखा अहडताच सदरहू लिहिलेप्रमाणे अमल करणे. ऐसियासि तुम्हापासून अंतर पडलियावरी मोगल जे **बांद धरून नेतील त्याचे पाप तुमचा माथा बैसेल** ऐसे समजोन **गावाचा गाव हिंडोनु रातीचा दिवस करून** लोकाची माणसे घाटाखाले जागा असेल तेथे पाठवणे. या कामास एक घडीचा दिरंग न करणे. तुम्ही आपले जागा हुशार असणे. गावगनाही सडेकडील सेत पोत जतन करावया जे असतील त्यासही तुम्ही सांगणे की, डोगरावर असिरा कुबल जागा आसरे ऐसे त्यासी सांगणे. व गनीम दुरून नजरेस पडताच त्याचे धावणीची वाट चुकवून पलोन जाणे. तुम्ही आपले जागा हुशार असणे. मोर्तब सूद.

मश्हुरल अनाम–(मश्हूर–प्रसिद्ध; अनाम–लोक) लोकमान्य. तपियात (तप्यांत), तपा–ग्रामसमूह. धावणीस येतात–स्वारी करितात. रोखा–पत्र. अहडताच–पोंचतांच. समत (समेत)–सह, सुद्धां. तमाम–सर्व. बांका–मजबूत, सुरक्षित. हैगै–हयगय. बांद–कैदी. हिंडोनु–हिंडून. दिरंग–उशीर. सडेकडील–सड्यावरील. सेतपोत–शेतें वगैरे उत्पन्नाचीं ठिकाणें, शेतीवाडी. असिरा–आसरा. कुबल–मजबूत.

* * *

५ आपल्या भूमीचें रक्षण करणें माझें कर्तव्य

[शायिस्तेखानाचा पराभव करण्यांत यश मिळविल्यानंतर शिवाजी महाराजांनी दक्षिणेंतील मोगलांच्या एका अधिकाऱ्याला आपलें मनोगत स्पष्ट भाषेंत कळविलें आहे. हें पत्र सर यदुनाथ सरकार यांनी ‘ मॉडर्न रिव्ह्यू ’ मध्ये इंग्रजींत भाषांतर करून छापलें होतें. त्याचें हे भाषांतर रियासतकारांनी केलेलें आहे.]

मराठी रियासत भा. १ पृ. २९४ व मॉ. रि. | श. १५८५ इ. १६६३

आज तीन वर्षे बादशाहाचे मोठमोठे सल्लागार व योद्धे आमचा प्रदेश काबीज करण्यासाठी चालून येत आहेत, हें तुम्हां सर्वांस माहीत आहे. बादशाहा हुकूम फर्मावितात, 'शिवाजीचे किल्ले व मुलूख काबीज करा.' तुम्ही जबाब पाठवितां, 'आम्ही लौकरच काबीज करितों !' (पण) आमच्या या दुर्गम प्रदेशांत **नुसता कल्पनेचा घोडा सुद्धा नाचविणें कठीण आहे.** मग तो प्रदेश काबीज करण्याची गोष्ट कशाला ! भलत्याच खोट्या बातम्या बादशाहाकडे लिहून पाठविण्यास तुम्हांला लाज कशी वाटत नाही ? कल्याणी व बेदरचे किल्ले उघड्या मैदानांत होते, ते तुम्ही काबीज केले. **आमचा प्रदेश अवघड व डोंगराळ आहे.** नदीनाले उतरून जाण्यास वाट नाही. अत्यंत मजबूत असे साठ किल्ले आज माझे तयार आहेत. पैकी कांही समुद्रकिनाऱ्यावर आहेत. बिचारा अफजलखान जावळीवर फौज घेऊन आला आणि नाहक मृत्युमुखीं पडला. हा सर्व प्रकार तुम्ही आपल्या बादशाहास कां कळवीत नाही ? अमीर उल उमराव शाइस्तेखान आमच्या या गगनचुंबित डोंगरांत व पाताळास पोंचणाऱ्या खोऱ्यांत तीन वर्षे सारखा खपत होता. 'शिवाजीचा पाडाव करून लौकरच त्याचा प्रदेश काबीज करतों' असें बादशाहाकडे लिहून लिहून थकला. ह्या खोडसाळ वर्तनाचा परिणाम त्याला भोवला. तो परिणाम सूर्यासारखा स्वच्छ सर्वांच्या समोर आहे. **आपल्या भूमीचें संरक्षण करणें हें माझें कर्तव्य** आहे. आणि तुम्ही बादशाहाकडे कितीहि खोट्या बातम्या लिहून पाठविल्या तरी मी आपलें कर्तव्य बजावण्यास कधी चुकणार नाही.

* * *

६ आज्ञेप्रमाणें घडोन आलें

[इ. १६४८ त मुस्तफाखानाने शहाजीला कैद केलें. तेव्हा मुधोळच्या बाजी घोरपड्याने त्यांत पुढाकार घेतला. त्यामुळे घोरपडे व भोसले यांचें वांकडें आलें होतें व ते एकमेकांच्या नाशाच्या संधीची वाटच पाहात असत. विशेषतः या वेळीं

विजापुराहून खवासखान चालून आला व त्याच्या मदतीला बाजी घोरपडे व सावंतवाडीचे सावंत येत आहेत ही बातमी शिवाजी महाराजांना मातुश्री जिजाबाईंनी वेळीच लिहून इशारा दिला होता. या विजापूरकरांच्या स्वारीचा आपण कसा बोजवारा उडविला हें महाराज स्वमुखाने या पत्रांत सांगत आहेत.]

सावंतवाडी संस्थानचा इतिहास ले. ६ — श. १५८६ इ. १६६४-६५

वडिलांचे शेवेसी शिवाजी राजे यांणी चरणावरी मस्तक ठेवून विज्ञापना ऐसीजे. "बाजी घोरपडे मुधोळकर याणी स्वधर्मसाधणता सोडून यवन दुष्ट तुरुक ह्याचे कृत्यास अनुकूल होऊन दगाबाजीचे हुनरे करून विज्यापुरास येणें घडलें. तेथे गुजरला प्रकार निर्वाणीचा तो तुम्ही समजलाच आहां. तोहि प्रसंग श्री तुमचा मनोरथ सिद्धीस नेणें व स्वधर्म राज्यवृद्धि करणे म्हणोन पार पडला. सांप्रत पुन्हा दुर्बुद्धि धरून खवासखान विजापुराहून फौजेमुद्धा रवाना जाहले. त्याची हरोळी बाजी याणी व लखम सावंत व खेम सावंत याणी प्रतिज्ञापूर्वक जत(न) करून सेना समवेत निघाले. ते तिकडे येत आहेत. तुम्हास श्री सांब व अंबा यश देणार पूर्ण आहे. ये समयीं त्यांचे वेढे घ्यावे. आणि आमचे मनोदय सेवटास नेणार तुम्ही सुपुत्र निर्माण आहां," म्हणोन आज्ञा केली. त्यास, बाजी घोरपडे पुढें मुधोळास घरीं कांही जमेतीनसी आले; हें कळतांच फौजेनसी आम्ही तेच क्षणी स्वारी केली. त्यांचा प्रांत लुटून तळपट जान करून ठाणियास जेरदस्तींत आणिलें. हें जाणोन त्यांणीं सर्व जमेतीनसी लढाईस निघाले. युद्ध तारफेचें जाहाले. बाजी मारिले व कितेक खासे लोक पडले. या प्रकारे तो प्रसंग करून लुटून फस्त केले. मत्ता बहूत (हातास) लागली. पुन्हा आपलेसे करून मुधोळ पंचमहाल आपलासा करून स्थापिले. यानंतर खवासखान पुढे आला पाहून त्याजवर चाल केली. ते मारीत लुटीत गर्दी केली. खटा होऊन पळूं लागले; ते विजापुरास पावविले. यानंतर सावंताचा निशाच करावा म्हणोन त्या प्रांतांत शिरलों.

तेही येऊन पावले. मुलूख तळपट करीत चाललें. ठाणी किले तमाम घेतले. सावंत दमोन गेले. गोमंतकराचा आश्रय निघोन फोंड्याचा किल्ला भांडूं लागला. त्यास सुरुंग लावून बुरूज उडवून बळाने घेतला. याप्रमाणे एकंदर तें संवस्थान घेतलें. यानंतर फिरंगी याजवर शह देऊन त्याचा प्रांत मारीत चाललें. त्याणी तह करून तोफा नजराणा पाठविला. सावंत यास तेथे दम न निघे. **टोपीकार यास धीर न पडे. त्याजवरून पितांबर शेणवी कारभारी वकील पाठविले.** "आपण सावंत भोसले कुळीचे, आपले पुत्र आहों, सर्फराज करून देसगतीच्या वतनाची सेवा घेऊन प्रांताचा ठराव निमे ऐवज फौजेनशी चाकरी करितों." त्यास निमे ऐवज व निमे ऐवज सरकारांत वसूल घ्यावा ऐसे करून घेतलें. त्याप्रमाणें स्वामीचे पुण्यप्रतापें करून आज्ञेप्रमाणें घडून आलें. तें कळावें म्हणोन लिा हे विज्ञापना. मोर्तब.

तुरुक – तुर्क. हुनर – युक्ति, कसब. विज्यापुरास येणें घडलें – कैद झाल्याने शहाजीराजांचें येणें घडलें. हरोळी – सैन्याची आघाडी, पुढची बाजू. त्यांचे वेढे घ्यावे – त्यांस पादाक्रांत करावें, सूड घ्यावा. जमेती – सैन्य. तळपट जान – सर्व कांही उद्‌ध्वस्त. ठाणियांस जेरदस्तींत आणिलें – ठाणीं बेचिराख केलीं. तारफेचें – तारीफ करण्यासारखें. खासे – मोठे सरदार. आपलासा करून स्थापिले – सर्व मुलूख, मुधोळचे पांचहि महाल, ताब्यांत घेऊन त्यावर बाजीचा मुलगा मालोजी घोरपडे यास पुन्हा अधिकारावर स्थापन केलें. गर्दी केली – जोरदार हल्ला करून पराजय केला. खट्टा – खट्टू. निशा – खात्री, नाश. गोमंतकर – गोवेकर. संवस्थान – वाडी. फिरंगी – पोर्तुगीज. मारीत – लुटीत, लुबाडीत, जिंकीत. तोफा (अरबी तुहफा) – भेट, नजराणा. टोपीकर – फिरंगी. सर्फराज – उर्जित, उन्नत. देसगत – देसाईपण. सरकारांत – शिवाजीराजांकडे. स्वामी – येथे मातुश्री ?

* * *

७ लोकांस बेकैद होऊं न देणें

[राज्यांतील सर्व ठिकाणीं शिवाजी महाराजांचें एकसारखें लक्ष असे. सुभेदार व कारकून यांनी झालेल्या सर्व गोष्टी महाराजांकडे वेळींच कळविल्या पाहिजेत अशी शिस्त घालून दिलेली होती. सर्व जातींनी गुण्यागोविंदाने नांदावें यासाठी महाराज फार जपत.]

राजवाडे खं. ८ ले. २४ } { श. १५९३ भाद्र. शु. १५ इ. १६७१ सप्टें. ८

मशहुरल हजरत राजश्री तुकोराम सुबेदार व कारकून सुभे मामले प्रभावळी प्रती राजश्री शिवाजी राजे दंडवत. शहूर सन इसन्ने सबैन व अलफ. उपरि सबनीस सुबे मजकूर यावरी ... ... तगारा नाईकवाडी ... ... याणें कल्हावती करून तरवारेचा हात टाकिला आणि अखेर आपलेच पोटांत सुरी मारून घेऊन जीव दिल्हा. हें वर्तमान होउनु गेलें. तुम्ही काही हुजूर लिहिलें नाही. **मराठा होउनु ब्राह्मणावरी तरवार केली, याचा नतीजा तोच पावला.** हाली बापूजी नलवडा व कोंडाजी चांदरा व संताजी जामदार हरबकसा करून सबनिसास दटावितात ... ... हें वर्तमान कळों आलें. तरी ... ... त्याची खबर घेणे जरूर आहे. ... ... इतकियाउपरि त्यास ताकीद करून हालखुद ठेवणें कीं सबनिसाचे वाटे न च जात. जरी काही सबनिसासी कथळा करावयावरी ... ... हालखुद माकुलपणें असतील तरी हुजूर लिहिणें. म्हणजे तहकीक आहे कीं सबनीस मारायावरी आले होते. याबद्दल साहेब त्यांस दस्त करून हुजूर आणवितील आणि खबर घेतील. **तुम्ही ऐसे बेकैद लोकांस होऊं न देणें.** हालखुद ठेउनु रवेशवार चाकरी घेत जाणें कीं कोण्ही बेढंग न वर्ते. मुलाहिजा न धरणें. छ १४ जमादिलावल. मोर्तब सुद.

मशहुरल हजरत–राजप्रसिद्ध, राजमान्य. कल्हावती–कलह, भांडण, कलागत. नतीजा–परिणाम, शिक्षा. हरबकसा करून (हर्कसा करून)–कोणत्याहि रीतीने. तहकीक–सत्य, खरें. हालखुद–आहे त्या स्थितींत.

कथळा–भांडण, तंटा. माकुलपणें–जाणतेपणें, शहाणपणें. दस्त करणें–जिवंत धरणें, कैद करणें. खबर घेतील–शिक्षा करतील. बेकैद–बेशिस्त. बेकैद लोकांस होऊं न देणें–लोकांस बेकैद होऊं न देणें. रवेशवार–चालीप्रमाणे योग्य. बेढंग–बेशिस्त. न वर्ते–वागणार नाही. मुलाहिजा–मुरवत, पर्वा.

* * *

८ लष्करच्या शिस्तीचा बारकावा

[महाराजांचें हें फार नामांकित पत्र आहे. यांतील बारकावा मनांत उतरला म्हणजे वाचक आश्चर्यचकित होतो. इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात, ‘ या पत्रांतील सर्व शब्द शिवाजीच्या तोंडचे आहेत. हें पत्र शिवाजीने सांगितलें व बाळाजी आवजी चिटणीस यांनी लिहिलें. भाषा कारकुनी नसून साहेबी आहे. शिपाई लोकांनी अमुक रीतीने कां वागावें व अमुक रीतीने कां वागू नये ह्याची फोड करून दाखविली आहे. पत्रांत जरब अतोनात असली तरी ती आपल्या हिताची आहे असेंच सैनिकांना व अधिकाऱ्यांना वाटावें अशी पत्राची रचना व रोख आहे. ’]

राजवाडे खं. ८
ले. २८

श. १५९६ वैशाख शु. १५
इ. १६७४ मे ९

श्री भवानीशंकर

मशरुल अनाम जुमलेदारानी व हवाल्दारानी व कारकुनानि दिमत पायगो मुक्काम मौजे दलबटणे ता। चिपळूण मामले दाभोळ प्रति राजश्री शिवाजी राजे. सुा अर्बा सबैन व अलफ. कसबे चिपळुणीं साहेबी लष्कराची विले केली आणि याउपरी घाटावरी कटक जावें ऐसा मान नाही. म्हणून एव्हां छवणीस रवाना केलें. ऐसियास चिपळुणी कटकाचा मुक्काम होता याकरिता दाभोळच्या सुबेयांत पावसाळयाकारणें पागेस सामा व दाणा व वरकड केला होता तो कितेक खर्च होऊन गेला. व चिपळुणा आसपास विलातीत लष्कराची तसवीस व गवताची व वरकड हरएक बाब लागली.

त्याकरिता हाल काही उरला नाही. ऐसें असतां वैशाखाचे वीस दिवस, उनाळा, हेही पागेस अधिक. बैठी पडली. परंतु जरूर जालें. त्याकरिता कारकुनाकडून व गडोगडीं गल्ला असेल तो देववून जैसी तैसी पागेची बेगमी केली आहे. त्यास, तुम्ही मनास (माने) ऐसा दाणा, रातीब, गवत मागाल, असेल तोंवरी धुंदी करून चाराल, नाहीसें जालें म्हणजे मग कांही पडत्या पावसांत मिळणार नाही, उपास पडतील, घोडी मरायास लागतील. म्हणजे **घोडीं तुम्हीच मारिली ऐसें होईल,** व विलातीस तसवीस देऊं लागाल. ऐशास, लोक जातील, कोणी कुणब्याचेथील दाणे आणील, कोण्ही भाकर, कोण्ही गवत, कोण्ही फाटें, कोण्ही भाजी, कोण्ही पाले. ऐसें करूं लागलेत म्हणजे **जीं कुणबीं घर धरून जीव मात्र घेऊन राहिले आहेत तेहि जाऊं लागतील.** कितेक उपाशी मराया लागतील. म्हणजे त्याला ऐसें होईल की **मोगल मुलकांत आले त्याहूनही अधिक तुम्ही ! ऐसा तळतळाट होईल !** तेव्हा रयतीची व घोडियांची सारी बदनामी तुम्हावरी येईल. हें तुम्ही बरें जाणून, सिपाही हो अगर पावखलक हो, बहुत यादी धरून वर्तणूक करणें. कोण्ही पागेस अगर मुलकांत गांवोगांव राहिले असाल त्याणीं रयतेस काडीचा अजार द्यावया गरज नाही. आपल्या **राहिला जागाहून बाहीर पाय घालाया गरज नाही.** साहेबीं खजानांतून वाटणिया पदरीं घातलिया आहेती. ज्याला जें पाहिजे, दाणा हो अगर गुरेंढोरें वागवीत असाल त्यांस गवत हो, अगर फाटें, भाजीपाले व वरकड **विकावया येईल तें रास घ्यावें, बाजारास जावें, रास विकत आणावें.** कोण्हावरी जुलूम अगर ज्याजती अगर कोण्हासी कलागती करावयाची गरज नाही. व पागेस सामा केला आहे तो पावसाळा पुरला पाहिजे. ऐसे तजविजीने दाणा रातीब कारकून देत जातील तेणेंप्रमाणेंच घेत जाणे, कीं उपास न पडतां रोजबरोज खायाला सांपडे आणि होत होत घोडीं तवाना होत ऐसें करणे. नसतीच कारकुनासी धसफस कराया, अगर अमकेंच द्या तमकेंच द्या ऐसें म्हणाया, धुंदी करून खासदारकोठींत, कोठारांत शिरून लुटाया गरज नाही. व हाली उन्हाळ्याला आहे तइसें खलक पागेचे आहेत, खण धरून राहिले असतील व राहातील, कोण्ही आगट्या करितील, कोण्ही भलतेच जागा चुली, रंधनाळा करितील, कोण्ही तंबाकूला आगी घेतील, गवत पडिलें आहे ऐसें अगर वारें लागलें आहे ऐसें मनास न आणिता म्हणजे अविस्ताच

एखादा दगा होईल. एका खणास आगी लागली म्हणजे सारे खण जळोन जातील. गवताच्या व्हळयांस कोणीकडून तरी विस्तो जाऊन पडला म्हणजे सारें गवत व व्हळया आहेत तितक्या एकेएक जाळों जातील. तेव्हां मग कांही कुणबियांच्या गर्दना मारल्या अगर कारकुनांस ताकीद करावी तैसी केली तऱ्ही कांही खण कराया एक लाकूड मिळणार नाही, एक खण होणार नाहीं. हें तो अवघियाला कळतें. या कारणें, बरी ताकीद करून, **खासे खासे असाल ते हमेषा फिरत जाऊन,** रंधनें करिता, आगट्या जाळिता, अगर रात्रीस दिवा घरांत असेल, अविस्ताच उंदीर वात नेईल, ते गोष्टी न हो. आगीचा दगा न हो. खण, गवत वांचेल तें करणें. म्हणजे पावसाळा घोडीं वाचलीं. नाही तर मग, घोडीं बांधावीं न लगेत, खायास घालावें न लगे, पागाच बुडाली ! तुम्हीं निसूर जालेत ! ऐसें होईल. या कारणें तपशिलें तुम्हांस लिहिलें असे. **जितके खासे खासे जुमलेदार, हवालदार, कारकून आहा तितके हा रोखा तपशिलें ऐकणें. आण हुशार राहाणें.** वरचेवरी, रोजाचा रोज खबर घेऊन, ताकीद करून, येणेंप्रमाणें वर्तणूक करितां ज्यापासून अंतर पडेल, ज्याचा गुन्हा होईल, बदनामी ज्यावर येईल, त्यास, **मराठियाची तो इज्जत वाचणार नाही, मग रोजगार कैसा ?**—खळक समजों. **जास्ती केल्यावेगळ सोडणार नाही.** हें बरें म्हणून (= जाणून) वर्तणूक करणें. छ १२ सफर.

जुमला—सवाशे घोडेस्वार किंवा दीडशे पायदळ. जुमलेदार—जुमल्यावरचा अधिकारी. दिमत—च्या तैनातींतला, च्या स्वाधीन. पायगो (फारसी पाएगाह) —फौज, सैन्य. दलवटणें—सैन्याचें स्थान, सैन्याची छावणी (दल—सैन्य). विले केली—व्यवस्था नेमून दिली. सामा—सामग्री, साहित्य. विलात (विलायत)— मुलूख, प्रदेश, स्वदेश. तसवीस—तोशीस, त्रास. हाल—सुस्थिति, त्राण. बैठी पडली—पागा जाग्यावर राहिली. जैसी तैसी—झाली तशी. रातीब—रोजचा खुराक. फाटें—लाकूडफाटें. जीवमात्र घेऊन—केवळ कष्टाने जगून. जाऊं लागतील—त्रासामुळे घरें सोडून जातील. सिपाही—घोडेस्वार (?) पावखलक— पायदळांतील खलक (= लोक). यादी (याद)—आठवण, सावधगिरी. रोज- बरोज—दिवसाचे दिवस. खजानांतून—खजिन्यांतून. रास—रास्त. ज्याजती—

जुलूम. तवाना–सशक्त, हुशार. खासदार (खासदाराने)–मोतद्दाराने, नोकराने. खलक–लोक. खण–जागा. रंधनाळा–रांधण्यासाठी (शिजविण्यासाठी) चर. अविस्त्रा–एकाएकी, न कळत. लहळचांस–लहान ढीग, गवताची रास (?). एकेएक–एकूण एक. गर्दना मारल्या–माना तोडल्या. खासा–खुद्द, स्वतः, अधिकारी. रंधनें करिता–अन्न शिजवतांना. हवालदार–२५ स्वार किंवा ५० पायदळ यांवरील अधिकारी. निसूर–निष्काळजी. रोखा–आज्ञापत्र, ताकीदपत्र. आण–आणि. खळक–दुर्जन, नष्ट. जास्ती–शिक्षा.

* * *

९ गनिमाचे चाकर गनीम जालेस

[विश्वासाने नेमून दिलेल्या कामगिरींत कसूर केल्याबद्दलचा अधिकाऱ्यावरील जळजळित राग अगदी कठोर शब्दांत येथे प्रगट झालेला दिसेल. सुभेदारावर केवढी महत्त्वाची जबाबदारी सोपविली होती हें जाणवितांना पद्मदुर्गाचें जें वर्णन केलें आहे तें वाचकाच्या मनावर कोरून पक्कें व्हावें अशीच शब्दरचना केलेली आहे.]

राजवाडे खं. ८ ले. ३१ — श. १५९६ माघ शु. ३, इ. १६७५ जाने. १८

श्री शंकर प्रसन्न

मशहुरुल हजरत राजश्री जिवाजी विनायक सुबेदार व कारकून सुबे मामले प्रभावळी प्रती राजश्री शिवाजीराजे दंडवत. सुहुरसन खमस सबैन व अलफ. दौलतखान व दरिया सारंग यांसी ऐवज व गल्ला राजश्री मोरोपंत पेशवे यांणीं वराता सुबे मजकुरावरी दिधल्या. त्यांस तुम्ही कांही पावविले नाहीं, म्हणोन कळों आलें. त्यावरून अजब वाटलें कीं **ऐसे नादान थोडे असतील!** तुम्हांस समजलें असेल कीं याला ऐवज कोठें तरी (देवविला पाहिजे. तो न पाठवितां) ऐवज खजाना रसद पाठविलिया मजरा होईल म्हणत असाल. तरी **पद्मदुर्ग वसवून राजपुरीच्या**

उरावरी दुसरी राजपुरी केली आहे. त्याची मदत व्हावी, पाणी फाटीं आदिकरून सामान पावावें, या कामास आरमार बेगीने पावावें. तें (होत) नाहीं. पद्मदुर्ग हबशी फौजा चौफेर जेर करीत असतील. आणि तुम्ही ऐवज न पाववून, आरमार खोळंबून पाडाल! एवढी हरामखोरी तुम्हीं कराल. आणि रसद पाठवून मजरा करूं म्हणाल, त्यावरी साहेब रिझतील की काय ? हे गोष्ट घडायाची तऱ्ही होय. न कळे कीं हबशियांनी कांही देऊन आपले चाकर तुम्हांला केले असतील! त्याकरिता ऐसी बुद्धी केली असेल! तरी ऐशा चाकरांस ठीकेठीक केले पाहिजेत! ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करूं पाहतो ? या उपरि तऱ्ही त्याला ऐवज व गल्ला राजश्री मोरोपंतीं देविला असे तो देवितील. तो खजाना रसद पावलियाहून अधिक जाणून तेणेंप्रमाणें आदा करणें, कीं ते तुमची फिर्याद न करीत व त्यांचे पोटास पावोन आरमार घेऊन पद्मदुर्गाचे मदतीस राहात तें करणें. या उपरि बोभाट आलिया उपरि तुमचा मुलाहिजा करणार नाही. गनीमाचे चाकर, गनीम जालेस, ऐसें जाणून बरा नतीजा तुम्हांस पावेल. ताकीद असे. रवाना छ २ जिल्काद.

दौलतखान, दरिया सारंग–आरमाराचे अधिकारी. गल्ला–धान्य. वराता–सरकारांतून मागणीचें पत्र. याला – आरमाराला. सुभा मजकूर–आधी उल्लेखिलेला सुभा, येथे प्रभावळी किंवा प्रभानवल्ली. पावलें नाही–पाठविलें नाही, दिलें नाही. रसद–भरणा. खजाना रसद पाठविलिया–खजिन्यांत भरणा केल्यास. मजरा–कमी, माफ. बेगीने–लौकर, तातडीनें. हबशी–सिद्दी. जेर करणें–हैराण करणें, पराजय करणें. रिझतील–खूष होतील. ठीकेठीक–ठाकठीक. ठीकेठीक केलें पाहिजे – ताळ्यावर आणलें पाहिजे, शिक्षा केली पाहिजे. मुलाहिजा–पर्वा. आदा करणें-देणें. फिर्याद–तक्रार. गनीमाचे चाकर गनीम जालेस–शत्रूचे नोकर (लांच खाऊन) झालास म्हणजे शत्रूच झालास. नतीजा–शिक्षा.

* * *

१० येक भाजीच्या देठासही मन नको

[मामले प्रभानवल्लीच्या सुभेदारास पत्र — या पत्रावरून शिवाजी महाराजांच्या राज्यांतील जमीनमहसुलाची पद्धत, ऐन जिनसांच्या रूपाने जमा झालेल्या वसुलाची विक्री करण्याची वगैरे तऱ्हा आणि असमर्थ शेतकऱ्याला संभाळून घेऊन त्याजकडून लागवड करून घेण्यासाठी त्याला करण्यांत येणारें द्रव्यसाह्य यांची कल्पना येते.]

शि. च. सा. खंड ९ लेखांक ५५	श. १५९८ भाद्र. शु. ८ इ. १६७६ सप्टें. ५

श्रीशंकर

मशहुरल हजरत राजश्री रामाजी अनंत सुभेदार मामले प्रभावेली प्रती राजश्री शिवाजी राजे दंडवत. सुहुर सन सबा सबैन वलफ. साहेब मेहरबान होऊन सुभात फर्माविला आहे. यैसियास चोरी न करावी, इमाने इतबारे साहेब काम करावे, येसी तू क्रियाच केलीच आहेस. त्येणेप्रमाणे येक **भाजीच्या देठास तेही मन न दाखविता** रास व दुरुस वर्तणे. या उपरि कमाविस कारभारास लावणी संचणी उगवणी जेसी जेसी जे जे वेलेस जे करू ये ते ते करीत जाणे. हर भातेने साहेबाचा वतु [अधिक]...होये ते करीत जाणे. मुलकात बटाईचा तह चालत आहे परंतु रयेतीवर जाल ['न पडतां' शब्द सुटले] रयेतीचा वाटा रयेतीस पावे आणि राजभाग आपणास येई ते करणे. रयेतीवर काडीचे जाल व गैर केलिया साहेब तुजवर राजी नाहीत येसे बरे समजणे. दुसरी गोष्टी की, रयेतीपासून यैन जिनसाचे नक्ष घ्यावे येसा येकंदर हुकूम नाही. सर्वथा येन जिनसाचे नख्त घेत नव जाणे. येन जिनसाचे येन जिनसच उसूल घेऊन जमा करीत जाणे, आणि, मग वेलचे वेलेस विकीत जाणे; की ज्या ज्या हुनरेन माहाग विकेल आणि फायेदा होये ते करीत जाणे. उसूल हंगामसीर घ्यावा आणि साठवण करून आणि विकरा येसा करावा की, कोण्हे वेलेस कोण जिनसच बिकावा ते हंगामी तो जिनस विकावा. जिनस तरी पडोन जाया नव्हे आणि

विकरा तरी महाग येसे हुनरेने नारल खोबरे सुपारी मिरे विकीत जाणे. महाग धारणे जरी दाहा बाजार यैन जिनस विकेल तर तो फायेदा जाहालियाचा मजरा तुझाच आहे. यैसे समजणे. त्या उपरि रयेतीस तवाना करावे आणि कीर्द करवावी हे गोष्टीस इलाज साहेबी तुज येसा फर्माविला आहे की, **कष्ट करून गावाचा गाव फिरावे.** ज्या गावात जावे तेथील कुलबी किती आहेती ते गोला करावे. त्यात ज्याला जे सेत करावया कुवत माणुसबल आसेली त्या माफीक त्यापासी बैल दाणे संच आसीला तर बरेच जाले. त्याचा तो कीर्द करील. ज्याला सेत करावयास कुवत आहे आणि त्याला जोतास बैल नागर, पोटास दाणे नाही, त्यावीण तो आडोन निकामी जाला असेल, तरी त्याला रोख पैके हाती घेऊन दोचो बैलाचे पैके द्यावे, बैल घेवावे व पोटास खांडे दोन खांडे दाणे द्यावे. जे सेत त्याच्याने करवेल तितके करवावे पेस्तर त्यापासून बैलाचे व गल्याचे पैके वाढी दिडी न करता मुदलच उसनेच हळूहळू याचे तवानगी माफीक घेत घेत उसूल घ्यावा. जोवरी त्याला तवानगी येई तोवरी वागवावे. या कल्मास जरी दोन लाख लारी पावेतो खर्च करिसील, आणि **कुणबिया कुनब्याची खबर घेऊन त्याला तवानगी येती करून** कीर्द करिसील, आणि पडजमीन लाऊन दस्त जाजती करून देसील, तरी साहेबा कबूल असतील. तैसेच कुलबी तरी आहे. पुढे कष्ट करावया उमेद धरतो, आणि मागील बाकीचे जलित त्यावरी केले आहे ते त्यापासून घ्यावया मवसर तरी काही नाही. ते बाकीचे खडवे तो कुलबी मोडोन निकाम जाला या उपरी जाऊन पाहातो. येसी जे बाकी रयेतीवरी आसेल ते कुलाचे कुल माफ करावया खडवे तोकुब करून पेस्तर साहेबास समजावणे की, ये रवेसीने कीर्द करऊन साहेबाचा फायेदा केला आहे आणि आमकी येक बाकी गैर उसली मफलिस कुलास माफ केली आहे, येसे समजावणे. साहेब ते माफीची सनद देतील. जे बाकी नफर निसबत आसली ते हिसेबीच उसूल घेत जाणे. **बाकीदार माहाल न करणे.** ये रवेसीने तुजला पदनसीयेत तपसिले करून हा रोखा लिहून दिधला आसे.

आकलेने व तजविजीने समजोन याप्रमाणे कारबार करीत जाणे की, तुझा कामगारपणाचा मजरा होये आणि साहेब तुजवरी मेहेरबान होत ते करणे. जाणिजे रा छ ६ माहे रजब

साहेबकाम–स्वामिसेवा. क्रिया करणें–शपथ घेणें. रास–रास्त. दुरुस–दुरुस्त. लावणी–लागवड. संचणी–साऱ्याचा ठराव. वतु-वंतु–उत्पन्न (वंत–वांटा, हिस्सा). भातेने–तऱ्हेने. बटाईचा तह–अर्धेलीचा करार. जाल–जुलूम. नक्ष (–नक्त) –रोकड. यैन-ऐन–मूळ स्वरूपांत, धान्याच्या रूपाने. उसूल–वसूल. हुनर–कौशल्य, युक्ति. जाया–खराब. धारणे-धारणेने–दराने. मजरा–मोबदला, फायदा (कमी केलेला भरणा). तवाना–सशक्त, ताज्या दमाचा. कीर्द–लावणी. कुलबी–शेतकरी. त्या माफीक–त्या प्रमाणांत. खांडे–एक धान्याचें माप (?) बहुधा खंडी. उसनेच–उसनवारीप्रमाणेच, केवळ परत बोलीचें. तवानगी–सामर्थ्य. तवानगी माफीक–सामर्थ्याप्रमाणे. लारी–एक नाणें, सुमारे आठ आणे. दस्त–सरकारी महसूल. जाजती–जास्ती. जलित–जाल-जुलूम. मवसर–सामर्थ्य, ऐपत. खडवा–खंडाचा भाग, हप्ता. जाऊन पाहतो–जाऊं पाहतो, सोडून जाऊं पाहतो. कुल–सर्व. कुलाचे कुल–सर्वच्या सर्व. रोखा–कागद. तोकूब–तहकूब. पेस्तर–पुढच्या वर्षी. रवेसी–रीत, मार्ग. गैर उसली–न झालेला वसूल. हिसेबीच–सरळपणें त्याचेकडूनच. मफलिस–गरीब. नफर–माणूस. नफर निसबत–माणसाच्या अंगची. आसली–असेल. बाकीदार महाल न करणे–माहालावर बाकी ओढूं नये. नसीयत–उपदेश. पदनसीयत–पदाला योग्य उपदेश.

★ ★ ★

११ साहेबकाम उदंड कराल !

[आणि हा एका समर्थ देसायाची बावनकशी स्वामिनिष्ठा प्रत्ययाला आल्यावर त्याला आपलासा करण्यासाठी मायेचा दिलासा आणि उभारीचा संदेश. ‘क्षुल्लक अपघाताने खट्टू कशाला होतां ? तुमच्या हातून उदंड स्वामिकार्य होणार आहे. स्वामी तुमच्या पाठीशीं आहेत. श्रमसायास करा. की यश ठेवलेलें आहे.’]

शि. च. सा. खंड १२ ले. ८६ } { श. १५९८ मार्ग. व. १ इ. १६७६ डिसें. ११

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक ३ नलसवत्सर मार्गसीर्ष वदी प्रतिपदा इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति याणी रुद्रपा नाईक देसाई पा। मुरगुड यांसी आज्ञा केली यैसीजे. तुमचा मुतालीक चेनपा हुजूर आहे; त्याणी सांगितले कीं, रुद्रपास्वामीचे कामावारी येक्षियार होऊन भुजबलगडीचे कामाबद्दल वडउपर व मोपबराबरी नागणगौडा पाठविले होते. त्यास वाटेस तोरगलकरानी जीवे मारिले. त्याकरिता दिलगिरी धरिली कीं, साहेबकामास अंतर पडिले म्हणून. तरी तुम्ही काही फिकीर न करणे. स्वामीचे सेवेस येक्षियार जाले आहा, **साहेबकाम उदंड कराल यैसे स्वामी समजले असेती.** बहुत काही काम तुमच्या हाते घेऊन तुम्हास सर्फराज करून, यैसा **दिलासा असों देणे.** सालमजकूर सन सबासबैनाकारणे स्वामी तुमचे परगणियाचा काही खंडणी अगर पैका घेत नाही. तुम्हास माफ केले असे. तुम्ही साहेबांचे तर्फेने कुलीरुजुवातीने वर्तणूक करून गनीमाचे लोकांस गोशमाल देत जाणे. का। कडकोली गनीमाचे ठाणे आहे, तेही उठऊनु तेथे आपले ठाणे बैसे ते करणे. व वरकडही जागाजागांची ठाणी गनीमाची उठऊनु देणे. **स्वामीही तुमची हरबाब मदत करवितील.** तुम्ही साहेबकाम चालवीत जाणे. भुजबलगडीचीं बहुत काही मदत हरयेक बाबेने करून आपले चाकरीचा व रुजुवातीचा व येक्षीयारीचा मजुरा करून दाखविणे कीं, स्वामी तुम्हावरी पुढेंही मेहेरवानी करीत ते करणें. लेखनसीमा.

मुरगुड–बैलहोंगल (जि. बेळगांव) च्या ईशान्येस सात मैल. मुतालीक–प्रतिनिधि. हुजूर–राजदरबारात. येक्षियार–तयार. भुजबलगड (ऊर्फ रामदुर्ग)–विजापूर जिल्ह्यांत. तोरगल–मुरगुड ते रामदुर्ग या मार्गावर. साहेबकाम–स्वामिकार्य. सर्फराज–ऊर्जित. करून–करूं. दिलासा–धीर. कुली रुजुवातीने–सर्व प्रकारें सरळपणाने, निष्ठेने. गोशमाल–शिक्षा. कडकोल–तोरगल (जि. बेळगांव) च्या वायव्येस आठ मैल. गनीम–शत्रु. मजुरा–कष्ट, श्रमसायास. मेहेरवानी–मेहेरबानी.

* * *

१२ दक्षिणची पातशाही दक्षिणियांच्या हातीं हवी

[मुधोळचे मालोजी घोरपडे म्हणजे शहाजीला कैद करणाऱ्या बाजी घोरपड्यांचे पुत्र. विजापूरच्या नोकरींत होते. दक्षिण दिग्विजयाचे वेळीं गोवळकोंड्यास जें राजकारण शिवाजी महाराज व कुतुबशाहा यांच्यामध्ये शिजलें, त्याप्रमाणे दक्षिणेंत पठाण सत्ता होतां कामा नये असें ठरलें. आणि त्याप्रमाणे एक एक नवा दुवा जुळविण्याचें काम महाराजांनी तिकडे असतांनाच कसें चालू केलें त्याचा प्रत्यंतर पुरावा या पत्रावरून मिळतो.]

सरस्वती मंदिर मासिक इतिहासमंजरी पृ. ९७ — श. १५९८ फाल्गुन ? इ. १६७७ मार्च

श्री महादेव

राजश्री मालोजीराजे घोरपडे अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रति राजश्री शिवाजी राजे जोहार उपरी. पूर्वी निजामशाहीतून आमचे बाप कैलासवासी महाराज इभराईम आदिलशाहा पादशहाचे कारकीर्दीस इकडे आले. त्यास, ईभराईम आदिलशाने पादशाही कारभाराचा मदार महाराजाचे सिरीं टाकिला. तेव्हां महाराजाने हा विचार केला कीं, पादशाही मदार आपले हातास आला असतां आधी तों आपले जातीचे लोक मराठे याला हातीं धरून **सरदारकी करून पोटें भरितात ते पादशाही वजीर करावे.** पादशाही कामें यांजकडून करऊन नामोश होय, इज्जती थोर पावेत तें करावें. म्हणून तुमचे बाप बाजी घोरपडे सरदारकी करून होते ते आणून पादशाहास भेटऊन पादशाही वजीर केले. त्या दिवसापासून तुमच्या बापाच्या हातें व तुमच्या हातें पादशाहीचीं कामें होत आलीं. पादशाहांनीं तुमचें चालविलें. ऐशा तीन पिढ्या पादशाहाच्या, दोनी पिढ्या तुमच्या जाल्या. ऐशियास, महाराजानें तुमच्या बापास इतकें बरें केलें हें स्मरण न धरून, जेव्हा काही मुस्ताफाखानाने महाराजास दस्त करविलें तेव्हां तुमचे बाप बाजी घोरपडे हमी होऊन महाराजास दस्त करून मुस्तफाखाचे हाती दिल्हे. त्या दिवसापासून तुमच्या घराणियाचा व आमच्या

घराणियाचा दावा वाढत चालिला. तो कित्येक झगडियांत तुम्ही आमचे लोक मारिले. व आम्ही तुमचे लोक मारिले. आदिकरून तुमचे बाप बाजी घोरपडे यांला आमचे लोकीं झगडियांत मारिलें. ऐसा परस्पर दावा चालविला होता. ऐशियास, सांप्रति राजकारण वर्तमान तरी दक्षिणेचे पादशाहा तीन, निजामशहा, आदिलशाह, कुतुबशाह. त्यामध्ये निजामशाही पादशाही बुडाली. ते समयी निजामशाही उमदे वजीर होते त्याणी आदिलशाही दरगाहाशी रुजुवाती करून आपणास रोजगारास जागा केला. **हाली आदिलशाही बहलोलखान पठाणीं घेतली.** पादशाहा लहान लेकरू. नाव मात्र. ते आपले कैदेंत ठेविले आहेत. आणि तख्त व छत्र विजापूरचा कोट पठाणाने कबज केला आहे. कांही गु (=उ?) वारून मिळाला नाही. ऐशियास, दक्षणचे पादशाहीस पठाण जाला, हे गोष्टी बरी नव्हे! **पठाण बळावला म्हणजे एका उपरी एक कुली दक्षिणियांचीं घरें बुडवील,** कोण्हास तगों देणार नाही, ऐसें आम्ही समजोन हजरत कुतुबशाहा पादशाहा यांसी पहिलेपासून रुजुवात राखिली होती. त्यावरून सांप्रत हजरत कुतुबशाहांनी मेहरबानी करून 'हुजूर भेटीस येणें' म्हणून दस्तखत मुबारक व दस्तपंजियानसी फर्मान सादर केला. त्यावरून आम्ही येऊन हजरत कुतुबशाहाची भेटी घेतली. भेटीचे समई पादशाही आदब आहे की, शिरभोई धरावी, तसलीम करावी. परंतु **आम्ही आपणावरी छत्र धरिलें असे ही गोष्ट कुतुबशाहास मान्य होऊन** शिरभोई धरणें व तसलीम करणें हें माफ केलें. पादशाहा तिकडून आले; आम्ही इकडून गेलों. पादशाहांनी बहुतच इज्जती होऊन, गळयास गळा लाऊन भेटले. आम्हांस हातीं धरून नेऊन जवळी बैसविलें. किती एक मेहेरबानी जाहीर केली. आम्हीहि जैसी रुजुवात करून ये तैसी केली. आणि कुतुबशाहाचा व आपला घटी बरेपणा करून घेतला. या उपरी राजकारण विषई हजरत कुतुबशाहांनी महादण्णापंतांस व आम्हांस एकचित करून ऐसा तह केला कीं, जो काय उभयवर्गीं तह ठरावा तो आपण कबूल करावाच. ऐसा कुलमनसबा व मदार आम्हावरी टाकिला आहे की, "**आपली पादशाही जितकी वाढवूं ये तितकी वाढवणे, पठाणाची नस्तनाबूद करणें; दक्षणची पादशाही आम्हा दक्षणियांच्या हातीं राहे तें करावें**" म्हणून. त्यास, हा मनसुबा ये प्रसंगीं आमचे हातास आलिया उपरि आम्हीं हाच विचार केला की, जे कांही आपले

जातीचे मराठे लोक आहेती ते आपले कटांत घेऊन कुतुबशाहासी त्यांची रुजुवात करावी, दौलत देवावी, त्यांचे हातें पादशाही काम घेऊन पादशाहाची पादशाही दराज करावी, आणि तुम्हा लोकांच्या दौलताहि चालेत, घरें राहेत, तें करावें. **आपल्या जातीच्या मराठिया लोकांचें बरें करावें हें आपणास उचित आहे.** ऐसें मनावरी आणून तुमचा आमचा वडिलापासून दावा वाढत आला तो आम्ही मनांतून टाकून, निःकपट होऊन, तुम्ही मराठे लोक, कामाचे, तुमचें बरें करावें ऐसें मनीं धरून, हजरत कुतुबशाहासी बहुत रीती बोलोन, तुम्हांस हजरत कुतुबशाहाचा कौलाचा फर्मान घेऊन पाठविला आहे. तरी तुम्ही कुलीन, आमचा भरोसा मानून, देखत पत्र हरएक उपाये, पठाणापासून निघोन मजल दर मजल भागानगरास आम्हांपाशीं येणें. त्यास, तुम्ही तरी स्वार होऊन व मजल दर मजल यालच. परंतु आपला कुली खुलासा, नेमस्त मुदा व इतबारी हेजीब बहुत सत्वर पुढे पाठवून देणें. म्हणजे हजरत कुतुबशाहास अर्ज करून दौलतेचे नेमस्त करून, कौलाचा फर्मान दस्त पंजे मुबारक घेऊन फर्मान व लुगडीं मोहताप तुम्हांस पाठऊन देऊन ते घेऊन, येऊन, आमचे हातें हजरत कुतुबशाहास भेटणें. ए प्रसंगीं ऐसें तुमचे दौल्तीचें काम मजबूत करून देतों कीं, पुढें बहुत बरें केलें ऐसें तुम्ही आठवावें; तुमचे पुत्र पौत्र आठवीत व दौलत थोर होए व हजरत कुतुबशाहाचे काम तुमचे हातें होऊन ये ऐसा समय आहे. ऐशियास तुम्ही कदाचित ऐसा विचार कराल की आदिलशाहाचे आपण दो पिढीचे वजीर आणि आता विजापुराकडून कुतुबशाहींत राजे यांचे बोलें कैसें जावें ? तरी, जे समई खवासखान धरिला, विजापूरचा कोट पठाणें घेतला, विजापूरचा पादशाहा धाकटा आहे त्याला कैदेंत ठेविलें तेच समई पादशाही बुडाली ! **विजापूर पठाणाचे हातास गेलें ! आता आदिलशाही कैंची ?** आणि उगीच तुम्ही तेथे ‘आपली आदिलशाही आहे’ म्हणून गुंतून राहिले आहां ! जरी पठाणाचीच चाकरी करोन राहों म्हणाल, तरी पठाण कांही तुम्हास थोर दौलत देणार नाही. **आणि पठाणास तरी हजरती कुतुबशाहा व आम्ही व तमाम दखणी मिळोन चालोन घेऊन बुडवीतच आहों.** तुम्ही मराठे लोक आपले आहां. **तुमचें गोमटें व्हावें** म्हणून पष्टच तुम्हांस लिहिलें असे. जें काय

तुम्हांस पठाण देतो त्याची दुगुणी आम्ही कुतुबशाहापासून तुम्हास देवीतच असों. किंवा ह्याहून अधिकहि होऊन येईल तरी करून देऊंच. सर्व प्रकारें तुमचें गोमटें करून. एविसीं आम्हापासून अंतर पडे तरी व मागील दावियाचा किंतु मनांतून टाकिला एविसीं आम्हांस श्रीदेवाची आण असे. तुम्ही नि:संदेह होऊन येणें. हेजीब आपला पुढे पाठविणें; त्या हातीं, आम्हांसी घरोबियाने बरें वर्तावें, मागील दावियाचा किंतु मनांतून टाकिला, ऐसें आपला आराध्य व कुळस्वामी असेल त्याची शपथ लिहून पत्र हेजिबा हाती पुढे पाठवून देणें. आम्ही सर्व प्रकारें तुमचें गोमटें करावयासी अंतर पडों न देऊन. बहुत काय लिहिणें.

इकडे–दक्षिणेंत, विजापुरांत. मदार–भार. सरदारकी–मन्सबदारी. वजीर–प्रधान. नामोश–ख्याति, लौकिक. इज्जती–महत्त्व, प्रतिष्ठा. दस्त करणें–कैद करणें. हमी होणें–जबाबदारी घेणें, काम अंगावर घेणें. दरगाह (फा० दर्गाह्)–दरबार. रुजुवाती–निष्ठा. गुबारून–बहुधा उबारून (–उभारून)–कांही नवें उभारून मिळविलें नाही. कुली-कुल–सर्व. दस्तखत (फा० दस्खत)–स्वहस्तें पत्र. मुबारक–शुभ, मंगलदायी. दस्तपंजियानसी फर्मान–स्वतःच्या हाताचा पंजा उठविलेलें फर्मान. आदब–वंदनाचा शिरस्ता. शिरभोई धरावी–धूळ माथा लावावी. तसलीम करावी–वंदन, कुर्निसात करावा. इज्जती होणें–आदबशीर वागणें. घटी–घट्ट, पक्का. उभयवर्गी–मादण्णापंत व शिवाजीराजे. तह–ठराव. मनसुबा–विचार, युक्ति. दराज–दीर्घायु. कुली–सर्व. नेमस्त–निश्चित. मुदा–विचार, मागण्या. इतबारी–विश्वासाचा. हेजीब–वकील. लुगडीं मोहताप–मानाचा पोशाख. गोमटें–बरें, कल्याण. पष्ट–स्पष्ट, खुलें.

* * *

१३ मुख्य धर्म राज्यसाधन : तीच श्रीची सेवा

[शिवाजी महाराजांचें समर्थ रामदासस्वामींना लिहिलेलें हें एकुलतें एक उपलब्ध पत्र श्रीसमर्थांची व महाराजांची भेट केव्हा झाली, व त्या उभयतांचे संबंध कोणत्या प्रकारचे

होते, या वादग्रस्त प्रश्नामध्ये फार महत्त्वाचें मानलें पाहिजे, असें कै. श्री. शंकर श्रीकृष्ण देव यांचें आग्रहाचें म्हणणें आहे. एरवीं तत्कालीन राज्यकर्त्यांची देवस्थानें व साधुसंत यांवरील निष्ठा आणि त्यांचा व त्यांच्या आश्रितांचा (शिष्य, सेवेकरी व गाई) योगक्षेम चालविण्यासाठी जमीन, कुरणें व धान्य देण्याच्या पद्धतीचा, आणि पत्रांत दैवतनामांबद्दलची पूज्यबुद्धि व्यक्त करण्यासाठी अवलंबिलेल्या मोकळी जागा सोडण्याच्या मार्गांचा, नमुना म्हणून हें पत्र अवलोकन करण्यासारखें आहे. मोकळ्या जागीं कोणतें दैवतनाम वाचावयाचें तें गोलकंसांत आंकडा घालून सुचविलें आहे. हा आंकडा मूळ पत्रांत अर्थात् नसतो.]

‘ समर्थांचीं दोन जुनीं चरित्रें ’ प्रस्तावना पृ. ४०–४१

श. १६०० आश्विन शु. १०
इ. १६७८ सप्टें. १५

श्री

(१) श्रीरघुपति

(२) श्रीमारुती

श्रीसद्गुरुवर्य श्रीसकलतीर्थरूप श्रीकैवल्यधाम श्रीमहाराज श्रीस्वामी

स्वामीचे सेवेसी—

चरणरज शिवाजीराजे यानी चरणावरी मस्तक ठेऊन विज्ञापना जे मजवर कृपा करुनु सनाथ केले. आज्ञा केली की “ **तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन** करुनु **धर्मस्थापना, देवाब्राह्मणाची सेवा, प्रजेची पीडा दूर करून पाळणरक्षण करावे.** हें व्रत संपादून त्यांत परमार्थ करावा. तुम्ही जें मनीं धराल तें श्री (१) सिद्धीस पाववील. ” त्याजवरून जो जो उद्योग केला, व ‘ दुष्ट दुराढे लोकाचा नाश करावा, **विपुल द्रव्य करुनु राज्यपरंपरा अक्षई चालेल ऐशीं स्थळें दुर्घट करावीं** ’ ऐसे जे जे मनीं धरिले, ते ते स्वामीनी आशीर्वादप्रतापे मनोरथ पूर्ण केले.

याउपरी राज्य सर्व संपादिलें ते चरणीं अर्पण करुनु, सर्व काळ सेवा घडावी ऐसा विचार मनीं आणिला. तेव्हा आज्ञा जाहाली की, "तुम्हास पूर्वी धर्म सांगितले तेच करावेस. तीच सेवा होय." ऐसें आज्ञापिलें. यावरून, "निकटवास घडुनु वारंवार दर्शन घडावें, श्री (१) ची स्थापना कोठें तरी होउनु सांप्रदाय, शिष्य व भक्ति दिगंत विस्तीर्ण घडावी," ऐसी प्रार्थना केली. तेही आसमंतात गिरिगव्हरी वास करुनु चापळीं श्री (१) ची स्थापना करुनु सांप्रदाय शिष्य दिगंत विस्तीर्णता घडली. त्यास, चाफळीं श्री (१) ची पूजा मोहोछाव ब्राह्मणभोजन अतिथि इमारत सर्व यथासांग घडावे, जेथे जेथे श्री (१) च्या मूर्ति स्थापना जाहाली तेथे उछाव पूजा घडावी, यास राज्य संपादिलें त्यांतील ग्रामभूमि कोठे काय नेमावी ते आज्ञा व्हावीं, (ऐसें विनविलें.) तेव्हा आज्ञा जाहाली की, "विशेष उपाधीचें कारण काय! तथापि तुमचे मनीं श्री (१) ची सेवा घडावी, हा निश्चय जाहाला. त्यास येथा अवकाश जेथे जे नेमावेसे वाटेल तें नेमावें. व पुढे जसा सांप्रदायाचा व राज्याचा व वंशाचा विस्तार होईल तैसें करीत जावें." या प्रकारें आज्ञा जाहाली.

यावरुनु देशांतरीं सांप्रदाय श्री (१) च्या स्थापना जाहाल्या, त्यास ग्रामभूमीचीं पत्रें करून पाठविलीं. श्री (१) संनिध चाफळीं एकशे एकवीस गाव सर्वमान्य व एकशे एकवीस गावी अकरा बिघेप्रमाणे भूमि अकरा स्थळीं श्री (२) ची स्थापना जाहाली तेथे नैवेद्य-पूजेस भूमि अकरा बिघेप्रमाणे नेमिले आहेती. ऐसा संकल्प केला आहे. तो सिद्धीस नेहण्याविषयीं विनंती केली. तेव्हा 'संकल्प केला तो परंपरेने सेवटास न्याहावा,' ऐसी आज्ञा जाहाली. त्याजवरून सांप्रत गाऊ व भूमी नेमिले......तपशील (येथे तेहतीस गांवें, ४१९ बिघे जमीन, एक कुरण, १२१ खंडी धान्य यांचा सविस्तर तपशील आहे).

येकूण दरोबस्त सर्वमान्य गाऊ तेहेतीस व जमीन बिघे गाउगना चारशे येकोणीस व कुर्ण येक व गला खंडी एकशे एकवीस श्री (१) चे पूजा उछाहाबदल संकल्पांतील सांप्रत नेमिले, व उछाहाचे दिवसास व इमारतीस नक्ती ऐवज व धान्य समयाचे समयास प्रविष्ट करीत; येणें करोन अक्षई उछाहादि चालविण्याविषयी आज्ञा असावी. राज्याभिषेक (शक)

५ कालयुक्ताक्षी नाम संवत्सरे आश्विन शुद्ध १० दशमी बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

दुराढे-दुराराध्य, हटवादी, स्वराज्यविरोधी. दुर्घट–बेलाग, मजबूत. स्थळें-ठाणीं, किल्ले. दिगंत–सर्व दिशांकडे. गिरिगव्हरीं–डोंगराच्या गुहेंत (शिवथर घळींत). मोहोछाव–महोत्सव. उपाधि–व्याप, काळजी. दरोबस्त–सर्व उत्पन्नासह. कुर्ण–कुरण. गला–धान्य. नक्ती ऐवज–रोख द्रव्य. समयाचे समयास–योग्य किंवा ज्या त्या वेळीं.

* * *

१४ उद्योग करून तमासे दाखविणें

[महाराजांचे कनिष्ठ बंधु तंजावरचे येकोजी राजे यांस पत्र. येकोजी राजे उदासीन वागूं लागले असें कळल्यावर महाराजांनी त्यांना कळकळीने उपदेश केला तो यांत आहे. कै. शहाजी महाराजांच्या जीवनाबद्दल आदर व्यक्त करून त्यांचें व आपलें स्वतःचें उदाहरण महाराजांनी येकोजीपुढे ठेविलें आहे. महाराजांचें बंधुप्रेम या पत्रावरून दिसून येतें. पत्रावर नक्कलकाराचे संस्कार बरेच झाले असल्याने शुद्धलेखन व क्वचित् भाषा यांत थोडासा बदल झालेला दिसतो. पण हें बाळाजी आवजी चिटणिसाच्या हातचें अस्सल पत्र ग्रँट डफने पाहिलें होतें व त्याचें शब्दशः भाषांतर त्याने आपल्या इतिहासांत दिलेलें आहे.]

इतिहाससंग्रह 'तंजावरचें राजघराणें' पृ. ४२–४३	इ. १६७८-७९

श्री

, श्रियासह चिरंजीव अखंडित लक्ष्मी अलंकृत राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री महाराज व्यंकोजी राजे प्रती राजश्री शिवाजी राजे आशीर्वाद. येथील क्षेम जाणोन स्वकीय कुशल लेखन करणें विशेष. कितेक दिवस जाले

तुमचें पत्र येत नाही याकरितां समाधान वाटत नाही. सांप्रत राजश्री रघुनाथपंतीं लिहिलें की "तुम्ही आपले ठायी उदासवृत्ति धरून पहिले-सारखे आपले शरीर संरक्षण करीत नाही. सणवार उत्सवादिक हेही काही करीत नाही. सेना बहुत आहे परंतु उद्योग करून कार्यप्रयोजन करवावें हेंही कांही करीत नाही. वैराग्य धरिलें आहे. एखादे तीर्थीचे बसून कालक्रमणा करू ऐशा गोष्टी सांगता." म्हणोन विस्तारें लिहिलें होतें तरी या गोष्टी आम्हास बहुत अपूर्व वाटल्या की **कैलासवासी स्वामींनी कसे प्रसंग पडले ते निर्वाह् करून** यवनांच्या सेवा करून **आपल्या पुरुषार्थे बाजी संवारून उत्कर्ष करून घेतला.** शेवट बरा निर्वाह केला. तें सर्व तुम्ही जाणतां. त्यांच्या साह्यतेस त्यांच्या बुद्धि युक्ति सर्वेही तुम्हांस उपतिष्ठोन त्यापासून शहाणे जाले आहां. त्या उपरि **आम्हीही जे जे प्रसंग पडले ते निर्वाह् करून कोणे तऱ्हेने राज्य मिळविलें हें जाणतां** व देखत आहां. असें असोन तुम्हाला ऐसा कोणता प्रसंग पडला जे इतक्याचमध्ये आपल्या संसाराची कृतकृत्यता मानून नसतें वैराग्य मनावरी आणून कार्य प्रयोजनाचा उद्योग सोडोन लोकांहातीं रिकामेपणीं द्रव्य खाऊन नाश करवणें, व आपल्या शरीराची उपेक्षा करणे, हें कोण शहाणपण व कोणती नीति! **व आम्ही तुम्हास वडील मस्तकी असता चिंता कोणे गोष्टीची आहे ?** या उपरि सहसा वैराग्य न धरिता मनांतून विषण्णता (काढून) कालक्रमणा करीत जाणे. सणवार उत्साह पूर्ववत करीत जाऊन तुम्ही आपलें शरीर संरक्षण बरें करीत जाणें. जमेती सेवक लोकांना रिकामे न ठेवून कार्यप्रयोजनाचा उद्योग करून त्यांपासून सेवा करून **पुरुषार्थ व कीर्ति** अर्जणे. तुम्ही त्या प्रांते पुरुषार्थ करून संतोषरूप असलिया आम्हांस समाधान व श्लाघ्य आहे की कनिष्ठ बंधु असे पुरुषार्थी आहेती. पुरुषार्थ व कीर्ति अर्जणे रिकामे बैसोन लोकाहाती नाचीज खाववून काल व्यर्थ न गमावणे. कार्य प्रयोजनाचे दिवस हे आहेती. **वैराग्य उत्तरवयी कराल तें थोडें. आज उद्योग करून** आम्हांसही **तमासे दाखविणे.** बहुत काय लिहिणे. तुम्ही सुज्ञ असा. मोर्तब सुद. मर्यादेयं विराजते

रघुनाथ–रघुनाथपंत हणमंते, कैलासवासी स्वामी–शहाजी राजे, वडील. बाजी–बाणा. निर्वाह केला–पार पडला. सवारणें–शोभिवंत करणें. बाजी

संवारून–बाणा संभाळून. साह्यतेस–साह्यतेला असलेल्या, त्यांना साह्य झालेल्या. उपतिष्ठोन–मनावर बिंबून, संस्कार होऊन. खाववून–खाऊन. मस्तकी–डोक्यावर, आधारासाठी. सहसा–कदापि, किमपि. जमेती–सैन्याचा जमाव. अर्जणें–मिळविणें. श्लाघ्य–गौरव, मोठेपण, भूषण. निपुण–कुशलपण, चांगलें. नाचीज–व्यर्थ, निष्फळ. तमासा–चमत्कार, पराक्रम.

* * *

१५ माणसाचे माणूस ओळखतात

[राज्याभिषेक झाल्यावर पांच वर्षांनी लिहिलेलें हें पत्र आहे. या पत्रांत राज्याभिषेक शकाची नवी मिति वापरलेली आहे. या पत्राची इतर पत्रांशीं तुलना करतां नवा सुधारलेला संस्कृत मायना पाहावयास मिळतो. आणि त्याबरोबरच छत्रपति शिवाजी महाराजांना आपल्या मुलखांतील प्रत्येक माणसाची कशी माहिती होती आणि त्याचा त्यांना कसा अभिमान वाटत होता, याची स्पष्ट कल्पना येते.]

पेशवे दप्तर खंड ३१ ले. ४१	श. १६०१ आषाढ शु. ७ इ. १६७९ जुलै ५

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक ६ सिधार्थी सवछरे आषाढ शुध सप्तमी मंदवासरे क्षत्रिये कुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति याणीं राजश्री कोनेर रुद्र देशाधिकारी ताा मावले यांसी आज्ञा केली यैशीजे. पासीर्णे ताा कर्यात मावल येथील पाटिलगी गोविंदराव सितोले देशमुख प्राा पुर्णे यांची आहे. त्यास रणपिसा वाडी करंदी येथील कुणबी आपणास मजरा निराला करून दिधला आहे, म्हणोन कथला करितो. तुम्ही त्याच्या बोलें यांसीं कथला करितां म्हणौन हुजुरू येऊनु विदित केले. तरी नसते पाटिलगियांचे कथले नवे करावयास तुज गरज काये! **स्वामी धाकुटपणापासून या देशांत आहेत. मिरासदार कोण व गैरमिरासदार कोण हें जाणताती व माणसाचें माणूस वलखतात.** तूं नवा वाईदेशा नवा सुबा करावयास

आला आहेस. तुजला हें कांही ठावकें नाही, आणि उगाच येकाच्या बोलें येकासी कथला करितोस. हें तुजला कोणें सांगितलें आहे ! या उपरी मिरासदारांचे कथले नसते नवे करिसील म्हणिजे आपलें केलें पावशील ! हें जाणौन सितोलियासीं कथला न करणें. पूर्वी मातुश्री आऊसाहेबीं मजरा करावया विषईं सांगितलें होतें. ते प्रसंगीं स्वामीनी मान्य केलें नाही. त्याउपरी गोमाजी नाईक पानसबल याणी त्यांसीं कुसूर केला. ते वर्तमान स्वामीस विदित जालियावर त्यास ताकीद केली. आजीताा सुरलित चालत आहे. हालीं त्याप्रमाणें सितोलियाची पाटिल्की सुरलित चालवणें. वाडी करंदीचा मजरा केला नाही. मातुश्री आऊसाहेबीं अगर आणिक कोण्हाचा कागद पत्र कुसुरामुळें नेला असेल त्यावर नव जाणें. सितोलियांसीं कांही कथला केला म्हणिजे स्वामीस बोल नाही. ताकीद होईल. जाणिजे.

लेखनालंकार.

स्वस्तिश्री...आज्ञा केली यैशीजे–राज्याभिषेकानंतर रूढ झालेला पत्राचा मायना. पासीणें–पाषाण, पुण्याजवळचें. मजरा–छोटी वसाहत; मौजा-पेक्षा मजरा लहान. निराला (निराळा)–पाटिलाच्या हक्कापासून मोकळा. कथला–भांडण, तंटा, हरकत. हुजूरू (हुजूर)–दर्बारांत, समक्ष, राजाकडे. माणसाचें माणूस वलखतात–प्रत्येक माणूस अन् माणूस ओळखतात. धाकुट-पणापासून–लहानपणापासून. वाईदेशा–वाईकडे राहणारा, कर्यात मावळाला परकी. सुबा (सुभा)–अधिकार. येकाच्या बोलें–एकाच्या सांगण्यावरून. आपलें केलें पावशील–केल्याचें फळ भोगशील. आजीताा–आजतागायत, आजपर्यंत. कागदपत्र नेला असेल–चूकभुलीने कागद मिळवून नेला असेल. नव जाणें–जाऊं नये. म्हणजे स्वामीस बोल नाही–भांडणाचा कांही विपरीत परिणाम झाला तर राजांना दोष देऊं नको म्हणजे झालें. ताकीद होईल–तंबी मिळेल; शिक्षा होईल.

* * *

१६ विजापूरचें अरिष्ट दूर करून विजापूर रक्षिलें

[दक्षिणची पातशाही दक्षिण्यांच्या हातांत राहावी, मोगल किंवा पठाण तेथे येऊं नये, या व्यापक धोरणाप्रमाणे महाराजांनी विजापूरला पडलेला मोगलांचा वेढा उठविण्यासाठी खजिना व फौजा पुरवून आदिलशाही वांचविली. त्याचें हें रोमांचकारी वर्णन आपला भाऊ व्यंकोजी याला लिहून कळविलें आहे. जाल्नापूरपर्यंत मोगलांच्या मुलखांत दंगल माजवून त्यांना विजापूरचा वेढा उठविण्यास कसें भाग पाडलें, हें बऱ्याच तपशिलाने या पत्रांत आलें आहे. सर्व प्रसंग नजरेसमोर उभा राहावा अशा प्रकारच्यें युद्धवार्ताहराचें लेखन-कौशल्य या ओघपूर्ण लिखाणांत प्रगट झालेलें दिसतें.]

इतिहाससंग्रह } { श. १६०१ माघ (?) इ. १६८० जाने.-फेब्रु.

श्रियासह चिरंजीव अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री महाराज व्यंकोजी राजे यासी प्रती सिवाजी राजे आशीर्वाद. येथील कुशल जाणून स्वकुशल लेखन करणे. उपरी तुम्ही पत्र पाठविले ते पावले. तुमचे कुशल कळोन संतोष वाटला. असेच क्षणक्षण आपले कुशल लेखन करून पाठवीत जाणे. विशेष ए प्रांतीचे वर्तमान. दिलेरखान विजापूरची पातशाही कमकुवत देखोन जोरावरी धरून विजापूर घ्यावें या मतलबें विजापुरावरी चाल केली. भीमा नदी उतरून शहरानजीक एऊन भिडला. हे वर्तमान खान अलीशान मसऊदखान यानी आम्हास लिहिले की, "गनीमे जोरावरी बहुत धरली आहे. एऊन मदत केली पाहिजे." त्यावरून आम्ही तेच क्षणी स्वार होऊन मजली दर मजली पनाळियास आलो. सारी कुल जमेती जमा करून खासा लष्करानिशी विजापुरासन्निध गेलो. विचारे पाहतां गनीम कट्टा; त्याहीमध्ये पठाणजाती हट्टी, याशीं हुन्नरेच

करून खजील होऊन नामोहरम होय तो हुन्नर करावा म्हणून ऐशी तजवीज केली की, त्याचे मुलकात फौजाचा पैसावा करून ओढा लावावा. त्यावरून दिलेलखानास ती गावाचे अंतरें सोडून भीमा नदी उतरून तहत जालनापूर-पावेतों मुलूख ताख्तताराज करीत चाललो. जालनापुरास जाऊन चार दिवस मुकाम करून पेठ मारिली, बहुत मालमत्ता (हातीं) लागली. जाल्नापुरास म्हणजे औरंगाबादेहून चार गांवें. **ते जागा शहाजादा असतां त्याचा हिसाब न धरिता पेठ लुटली.** सोने रुपे हती घोडे याखेरीज मता बहुत सांपडली. तो घेऊन पठागड तरफीस स्वार होऊन कूच करून एता, मध्ये रणमस्तखान व आसफखान व जाबीतखान असेच आणीक पांचसात उमराऊ आठदहा हजार स्वारानशी आले. त्यास शाहाबाजीच्या हुन्नरें जैशी तंबी करून ये तैशी तंबी करून घोडे व हत्ती पाडाव करून पटियास आलो. मागती लष्कर मुलकांत धुंदी करावयास पाठविलें; व राजश्री मोरोपंत प्रधान यास बागलाण व खानदेश प्रांती सत्तावीस किल्ले मोगलांचे आहेत ते व मुलूख कबज करावयास पाठविले. आणि आम्ही पटियास मुक्काम केला. तों खान अलीशानाची किताबती आली की, "तुम्ही कितेक गनिमाचे मुलकांत स्वारी करून खराब केला, ओढा लाविला. परंतु या बागाहून गनीम उखळत नाही. बहुतच बळ धरून कोटानजीक भिडला आहे. **ए समयीं एऊन मदत करून पातशाही राखली पाहिजे.**" त्यावरून मागती स्वार होऊन मजली दर मजली पनाळियास आलों. कितेक द्रव्याने व सेनेने पहिले साहाय केले व मागतीहि द्रव्य मबलक पाठविले. व सेना गनिमाचे मुलकांत पैसली होती ते बोलावून आणून दिलेलखानावरी पाठविली. त्यानी जाऊन कहीकवाड मारून कुल सामान बाब धरून आरोखून धरिला. त्याचे मदतीस औरंगाबादे-हून रणमस्तखान व बाजे उमराऊ अलीखान घेऊन सात आठ हजार स्वारानिसी येत होते **त्यासहि मारीत गर्देस मेळवीत पिटीत औरंगाबाद पावेतों नेले.** कितेक शहरें लुटीत देश खराब करीत परतोन येऊन गनिमास घेरोन बैसले हें वर्तमान, व राजश्री मोरोपंत त्या प्रांती पाठविले होते त्याणि अहिवंत


किल्ला घेतला. अहिवंत म्हणजे जैसा काही पनाळा; त्याचे बरोबरी समतुल्य आहे. दुसरा नाहवा गड, बागलाणच्या दरम्यान मुल्कांत आहे; तो कठीण. तोहि घेतला. हे दोनी किले नामोशाचे पुरातन जागे. कबज केले. त्या किल्यावरहि बहुत मालमत्ता सापडली. व त्याजबरोबर जमेत होती ते मुल्कात पाठवून धामधूम केली. कितेक मुलूक कबज केला हें वर्तमान, व पहिले आम्ही स्वारी केली, जाल्नापूर मारिले, रणमस्तखान नामोहरम केला, हे वर्तमान वरचेवर पादशाहास बाकीबाहाल जाला. **पातशाहाहि बहुत खजिल होऊन** आहादीवर आहादी दिलेलखानास आले. ये जातीने मुलूक खराब करून गडकोट व देश कबज करून वोढा लाविला; आणि लवाजमा धरून वरच्यावरी कहीकबाड मारून गनीम जेर केला. दिलेल-खानासहि ऐसे कळोन आले की, **येथे राहिल्याने आपली शाही कुल बुडवितील.** हें पुर्ते जाणून विजापूर सोडून दिवसास कोस दोन कोस मजली करून चालिला. ऐसा गनीम जेर जेर करून खट्टा करून उखळिला व खान अलीशानेहि बहुतच शर्त केली. जैसा कोट राखावयास शर्त करून ये तैसी करून कोट राखिला. आम्ही या प्रकारे विजापुरीचे साहाय द्रव्याने व सेनेने करून ज्या उपाये गनीम उखळू ये त्या उपाये उखळून **विजापुरीचे आरिष्ट दूर करून विजापूर रक्षिले.** ते प्रसंगी खान अलीशानाचा सलुख जाला. त्या करारबाबेमधे होसकट व बंगळूर व अरणी व चंदाऊर आदीकरून तुमीचे निसबती आम्ही आपणासीच लाऊन घेतली. पेशकसी तोफा तुम्ही निराळा द्यावा, सतत निसबती तुम्हासी लागावी, ऐसे केले नाही. आवघे आम्हीच मान्य केले. तोफा आम्हीच तुम्हा देखील द्यावा ऐसा तह ते प्रसंगीं करून करारबाब करून सला केला. या उपरी दिलेलखान आदवानी कोरहाल (कोन्हाळ-कोल्हार-कोलार) प्रांताकडे गेला होता. आमचीहि सेना पाठीवरी गेली व आम्ही विजापुरास जातों. कोरहाल प्रांताकडे राजश्री जनार्दनपंत ठेविले. त्याणी तिकडे कितेक पुंड पाळेगारानी फिसाहती केली होती त्यास मारून काढिले व हुसेनखानाचा भाऊ कासीमखान दोन तीन हजार

स्वारानिसी आला होता त्यास व त्याचे कबिला व हुसेनखानाचे दोघे लेक असे दस्त केले व हती पाच व घोडे पाचसे पाडाव केले. याखेरीज पुंड पाळेगारांचा मुलूक व गड व कोट कबज करून ठाणी बैसविली, फत्ते केली. याउपर दिलेलखान, सर्जाखान व हुसेनखान येतो हें कळोन हेहि पाच सहा हजार स्वारानिसी गनिमावर गेले. गनीम घालून जिकडे गनीम जाय तिकडे जाऊन जागा जागा गनिमास गोषमाल देऊन तिकडूनहि मारून काढिला. सांप्रत भीमानदी उतरून पेडगावास आपले मुलकात गेला. गनिमास ऐसे केले जे मागती विजापूरची वाट न धरावी, ऐसा खट्टा केला. व चिरंजीव राजश्री संभाजी राजे मोगलाईत गेले होते त्यास आणावयाचा उपाय बहुत प्रकारे केला. त्यासही कळों आलें की, ये पातशाहीत अगर विजापूरचे अगर भागानगरचे पातशाहीत आपले मनोगतानुरूप चालणार नाही. ऐसे जाणोन त्याणि आमचे लिहिण्यावरून स्वार होऊन आले. त्याची आमची भेट जाली. घरोब्याचे रीतीने जैसे समाधान करून ये तैसे केले. हे सविस्तर वर्तमान तुम्हास कळावें म्हणोन लिहिले असे. कळले असावें. मोर्तब सुद.

ए प्रांतीचें–या प्रांताचें. जोरावरी भरून–बळजबरी करून. आलिशान–उच्च मानाचा. कट्टा–हट्टी, आग्रही, निग्रही. हुन्नरेच–युक्तीनें. खजील–ओशाळा. नामोहरम–निराश, अपेशी. पैसावा करणें–पसरून टाकणें. ओढा लावणें–चाप लावणें, ताण पोंचवणें. ती गावाचें अंतर–तीन गावांचें अंतर. तहद–थेट. तास्ततराज–उद्ध्वस्त, ओसाड, मारलूट. शहाजादा–औरंगजेबाचा मुलगा. शहाबाजीच्या हुन्नरें–कडक शह लावण्याचें कसब दाखवून, सर्व बाजूंनी अडवणूक करून. तंबी–दटावणी, शिक्षा. पाडाव करणें–कैद करणें, काबीज करणें. धुंदी–दंगल करणें. पटियास–पट्टा किल्ल्यावर. किताबती–पत्र. मबलग–पुष्कळ. पैसली होती–पसरली होती. कही–दाणावैरण वगैरे शोधून मिळवणारी सैन्याची तुकडी, त्यावरून दाणावैरण. कबाड–वैरण, कडबा. कहीकबाड–सामग्री, दाणावैरण वगैरे. आरोखून–अडवून. बाजे–इतर. गर्देस मेळवीत–नाश करीत. नामोशाचे–नामांकित.

कबज केले–जिंकून घेतले, धामधूम केली, दंगल माजविली, सतावून सोडलें. बांका–कर्णा. बांकी बाहाल झाला–कर्ण्याच्या आवाजाप्रमाणे भेटला, पुकारा करून कळविण्यांत आला. अहादी–स्वार. लवाजमा–परिवार, सैन्य वगैरे. शाही–राज्य, सत्ता. कुल–सारी. उखळिला–काढून लावला, उखडून टाकला. शर्थ केली–कमाल केली. करून ये–करूं ये, करतां येईल. कोट राखिला–विजापूरचा किल्ला हातांत राखला. सलुखा–सलोखा, तह. तुमीचे निसबती–तुमच्या सत्तेंतील (मुलूख). पेशकसी–खंडणी. तोफा–नजराणा. फिसाहती–फितुरी, बंडखोरी. कबिला–बायकामाणसांचा परिवार. ठाणीं बैसविलीं–बंदोबस्तासाठी चौक्या, ठिकाणें, अधिकाऱ्याचीं ठिकाणें बसविलीं. फत्ते केली–जय मिळविला. मधे गनीम घालून–शत्रू मध्ये घेऊन. गोषमाल–जरब, पारिपत्य, कानपिळी. खट्टा–शरमिंधा. मनोगत–इच्छा.

* * *



छत्रपतींचा 'शिवराई' (वेगळा नमुना)



छत्रपतींचा 'शिवराई' (आणखी एक नमुना)



छत्रपतींचा 'रुका' व 'दाम'

अस्सल साधनांचे परभाषांतील नमुने (भाषांतर)

'ऐतिहासिक फार्सी साहित्य', सहावा खंड, यांत औरंगजेबाच्या दरबाराचे अखबार छापलेले आहेत. औरंगजेबाच्या खास दरबारांतील घडलेल्या गोष्टी आणि बादशाहाच्या तोंडचे उद्‌गार अखबारांत त्या त्या दिवशीं नोंदलेले असतात. अर्थात् त्यांची अधिकृतता संशयातीत. अखबारांतून व जयपूरच्या हिंदी पत्रांतून वानगीदाखल तीन अवतरणें.

१. पलंगावर काय काय ठेवून गेले

[औरंगजेबाच्या आज्ञेने समक्ष बातमी काढण्यास] "फौलादखान सीवाच्या डेऱ्यापाशीं गेला तेव्हा त्याने ऐकलें (पाहिलें) की, एक बांधलेली पगडी व एक आरसा पलंगावर आहेत व त्याचे जोडे खाली पडले आहेत. तीन घोडे, दोन पालख्या व एक नोकर पाठीमागे सोडून तो गेला. इतर कांहीहि सामान नाही." (ऐ. फा. सा. खं. ६, ले. ६, दि. १८ ऑ. १६६६)

२. पेटाऱ्यांत बसून निसटून गेले

(**डिंगल भाषेतील पत्र**) च्यारी घडी दीन चढ्या भागाकी षबरी हुई...सगला हजार आदम्याकी चौकीमहा भागौ सु वौ दीन तौ कहुभी न जाणौ कौण वकत भागौ कीसी तरह भागौ कौणकी चौकीमौ भागौ तौठा पाछौ मनसुबौ करी अर या ठहराई छौ भागीबाकी जु वौकौ पट्याराकी आमदरफ्त थी सु पट्यारामौ बौठी नीकलौ

[चार घटका दिवस आल्यावर निसटल्याची खबर आली...चौकी-पहाऱ्यावर हजार लोक असतांना निसटला. कोणत्या वेळीं, कोणत्या तऱ्हेने, कोणाच्या पहाऱ्यांतून निसटला हें त्या दिवशीं कोणालाच समजेना. तेव्हा मग शहानिशा करतां असें ठरलें की पलायनाच्या ठिकाणीं पेटाऱ्यांची ये-जा होत होती, (त्यांतील) पेटाऱ्यांमधून बसून निघून गेला...] (शि. च. सा. खं. १२, लेखांक ८४, दिनांक ३ सप्टेंबर १६६६)

३. सोऱ्यासाठी शोध आणि सांठा

[खानजहान बहादुराने 'पक्क्या दारूसाठी सहा हजार मण सोरा' मागविला.] हुकूम झाला कीं (= औरंगजेबाने पृच्छा केली की), 'खान मजकूर यानें इकडून सोरा मागविला; मग सीवा कुठून मिळवितो (= मिळवीत असे) ? दख्खनच्या सुभ्यांत इतकाहि सोरा नाही ?' अर्ज केला (= अधिकाऱ्यांनी सांगितलें), 'सीवा कर्नाटकाच्या आसपासचीं व इतर ठिकाणें येथून सोरा मागवितो. दक्षिणच्या सुभ्यांत फक्त बाळापूर येथेच थोडासा सोरा मिळतो'. (ऐ. फा. सा. खं. ६, ले. १७६, दि. ५ फेब्रु. १६८१)

१७–१८ महाराजांचीं दोन अस्सल इनाम-पत्रें

महाराजांचीं अस्सल पत्रें अत्यंत दुर्मिळ आहेत. येथें दोन इनामपत्रें ठसे करून दिलीं आहेत आणि त्यांचें ओळी ओळी प्रमाणे वाचन समोरच्या पृष्ठावर पाहावयास मिळावें अशा प्रकारें छापलें आहे. पत्राची लिपि अर्थात् मोडी आहे. पहिलें पत्र फाटलें आहे, परंतु अक्षरें तर्कानें लावतां येतात, तीं गोल कंसांत छापलीं आहेत. समजत नाहीत तेथे × छापली आहे. पत्रांपैकी इ. १६७८ मधील पत्र आता प्रथमच प्रसिद्ध होत असून तें श्री. शंकर नारायण जोशी यांच्या संग्रहांतील आहे. इ. १६४८ मधील पत्र प्रकाशित असून तें भारत इतिहास संशोधक मंडळ संग्रहांतील आहे.

श्री. शं ना. जोशी संग्रह } { श. १६०० आश्विन वद्य २ / इ. १६७८ सप्टें. २२


श्री महादेव

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक ५ कालयुक्त संवत्सरे आ (स्वीन बहु)
ल द्वितीया रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजाशिवछत्रप (ति)
लंबवर्तुळी शिक्का † यांणी मोकदमानी पेंठ सिंगणापूर पेंठ मलेवाडी (या)
सी आज्ञा केली यैसीजे श्री देवाचा (फुलांचा बाग)
××××बा पुलारी कैलासवासी मातुश्री साहेबीं दस्तीं बाद (करुनु)
(दरोब)स्त इनाम करून दिल्हा आहे तेणेप्रमाणें चालतच आहे हालीं
(न) वी सनद पाहिजे म्हणून उजूर केला त्याकरिता पुलारी येउ (नु)
(वि) दित केलें तरी इस्कील कराया गरज काये आहे या उपरी इस्कील [ये] (क)
(दर) न करणे यांचा (बाग) खेरीज दस्त करून इनाम दिल्हा आहे आणि (चाल)
त आहे तेणेंच प्रमाणे पेस्तरहि चालवणें तालीक घेउनु असल पु
लारियापासीं देणें लेखनालंकार (मर्यादा)

---


† **शिक्का लंबवर्तुळी :** पेशवे मोरो त्र्यंबक पिंगळे यांचा चार ओळींचा. त्या चार ओळींचें वाचन :—श्रीशिवराजें । द्र हर्षनिदान ।। त्र्यं । बकसुत मोरेश्वर । मुख्यप्रधान ।।

शब्द : इस्कील – हरकत, तंटा. पेस्तर – पुढील वर्षी. तालीक – नक्कल.



श्री महादेव

शिवछत्रपतींचें राज्याभिषेकानंतरचें
राज्याभिषेकशक वापरलेलें पत्र
(यांतील श्रीकाराजवळील महादेव हें दैवतनाम खाशांच्या हातचें !)



महाराजांचें राज्याभिषेकापूर्वीचें अरबी सन वापरलेलें पत्र

शि. च. सा. खं. १ ले. ३१ | श. १५७० भाद्र. व. २ इ. १६४८ ऑगस्ट २५

†अष्टकोनी शिक्का

अजरख्तखाने राजश्री सिवाजि राजे दामदौलतहु बजानीबु कारकुनानि हाल व इस्तकबाल व देशमुखानि पा पुणे बिदानद सुा तिसा अबैन अलफ दरींविळे श्री विनायेक भट बिन रामकृष्ण भट ठकार सेकीन कसबे पुणे पा मा यासि इनाम अजरामऱ्हामती मौजे सूंस कर्याती मावल पा मजकूर दिधले असे देखील नख्त व महसूल व पायेपोसी व खर्च पटी व पाडेवारी व सेवबेल व मोईन सादिलवार व बाजे व बाबा व पटिया हाल व पेस्तर ज्या होतील त्या व तूप व बकरे व कडबा यैन जिनस व वेठी बेगारी कुलबाब कुलकानु खेरीज ठाणे दिधले असे दुमाले करणे दर हर साल खुर्दखताचा उजूर न करणे तालीक घेउनु असेली खुा फिराउनु देणे औलाद व अफलाद चालवणे मोर्तब सुद (मर्यादा)

---

†**शिक्का महाराजांचा अष्टकोनी.** पांच ओळींचा. दर्शन व वाचन यांसाठी पृ. ३५ पाहा.

शब्द : बजानीबु–कडे, प्रती. हाल–आजचे, वर्तमान. इस्तकबाल–भावी. बिदानद–जाणावें की. दरींविळे (फा. दरीन्‌विला)–या वेळीं. सेकिन–राहणार. अजरामऱ्हामती–कृपेने. तालीक–नक्कल. औलाद–मुलाची प्रजा. अफलाद–मुलीची प्रजा.

परिशिष्ट २

शिवाजी महाराजांचीं चित्रें

जुनीं म्हणतां येतील अशीं शिवाजी महाराजांचीं सुमारें अकरा चित्रें आणि दोन-तीन शिल्पें विद्यमान आहेत. त्यांतील पुढील चार चित्रें ऐतिहासिक समजलीं जातात—एक भारतांतील आणि तीन युरोपांतील. या पुस्तकांत त्यांतून फक्त दोन छापलीं आहेत. (१) या पुस्तकांतील दर्शनी रंगीत चित्र हें मुंबईच्या प्रिन्स ऑफ् वेल्स म्युझियममधील चित्राची प्रतिकृति आहे. हें चित्र जाणते शिवभक्त आणि ऐतिहासिक वस्तूंचे खर्चिक भोक्ते कै. मावजी शेट यांच्या मूल्यवान संग्रहांतील म्हणून आपल्याकडे मान्यता पावलेलें आहे. मात्र या उत्कृष्ट चित्राचा निर्माता, निर्मितीचें स्थल, काल वा परिस्थिति अज्ञात आहे. (२) पुस्तकाच्या मलपृष्ठावर छापलेलें चित्र हें ब्रिटिश म्युझियम-मध्ये आहे. रंगीत आहे (छापलें आहे त्याहून रंग मात्र निराळे). इ. १७०७ पूर्वी कोणा डच माणसाने मिळविलेलें आहे. डच लिपीमध्ये 'शिवाजी दिवंगत मराठा राजा' असें वर्णन त्यावर आहे. (३) जयसिंगाच्या स्वारीबरोबर तोफखाना घेऊन आलेला इटालिअन नागरिक मनुची (पाहा पृ. १२४) याने इ. १७०६ मध्ये एक संग्रह आपल्या मायभूमींत व्हेनिसला नेला. मीर महंमद नांवाच्या चित्रकाराने काढलेलीं हिंदुस्थानांतील ५६ चित्रें त्यांत आहेत. त्यांपैकी एक शिवाजी महाराजांचें घोड्यावर बसलेलें आहे. चित्रांतील ३०-३१ चेहऱ्यांपैकी कांही हिंदूंचे तर कांही मुसलमानांचे दिसतात. कदाचित् हें चित्र महाराजांच्या आग्रा-भेटीच्या वेळचेंहि असेल. (४) चौथें ऐतिहासिक चित्र हेग येथील व्हॅलेंटाईन संग्रहांतील. दुसऱ्या चित्राप्रमाणेच फक्त वरच्या भागाचें. सुरतेच्या स्वारीच्या वेळीं कोणी डच कलाकाराने काढलेलें असावें. पुढे डच ईस्ट इंडिया कंपनीच्या मार्फत हेगला पोंचलें. हें चित्र साधेंच आहे. बाकीचीं तीन मूळ रंगीत आहेत.

* * *

शिवाजी महाराजांची जन्मतिथि

छत्रपति शिवाजी महाराजांच्या दोन जन्मतारखा जनतेपुढे आहेत — एक 'जुनी' किंवा इ. १६२७ एप्रिल ७ (शक १५४९ वैशाख शुद्ध द्वितीया) आणि दुसरी 'नवी' म्हणजे इ. १६३० फेब्रुवारी १९ (शक १५५१ फाल्गुन वद्य तृतीया). महाराष्ट्रांतील शिवाजी महाराजांचें अनन्यसाधारण स्थान पाहतां या संबंधांतील सत्य काय आहे, तें जिज्ञासूंना कळविलें पाहिजे आणि अशा प्रश्नांतील सत्यसंशोधनाची पद्धति कशी असते हें त्यांना माहीत करून दिलें पाहिजे.

इतिहासांतील तारखांचे वाद संशोधनक्षेत्राच्या बाहेरच्या लोकांपर्यंत क्वचितच पोंचतात. परंतु छत्रपति शिवाजी महाराजांच्या जन्मतिथीला प्रथम राष्ट्रीय महोत्सवाचें (इ. १८९६) आणि अलीकडे महाराष्ट्र-राज्य-निर्माण-दिनाचें (इ. १९६०) मुहूर्त-सदृश महत्त्व प्राप्त झालें. आणि वास्तविक केवळ संशोधनाचा असा हा प्रश्न नकळत अभिनिवेशाचा बनला. अभ्यासकांनी कोणताहि पूर्वग्रह न मानतां सत्याचाच शोध घेतला पाहिजे.

इतिहासांतील सत्यशोधन हें देखील न्यायालयांतील सत्यान्वेषणाप्रमाणे पुराव्याच्या विश्वसनीयतेवर अवलंबून असतें. आणि समकालीन किंवा कालाने जवळ असलेल्या आणि जाणकार म्हणजे माहिती मिळण्याची पात्रता असलेल्या व्यक्ति आणि विधानें विश्वसनीय समजलीं जातात. सतत चालणाऱ्या संशोधनाने नवीं नवीं साधनें हाताशीं येतात आणि सत्याचें त्यांना अनुरूप असें नवें नवें दर्शन घडतें.

आणखी एक गोष्ट — एखाद्या घटनेचा काल म्हणजे नक्की काय याची आपली कल्पना स्पष्ट पाहिजे. काल म्हणजे कालविषयक सांगोपांग नोंद. तींत वर्ष, महिना, तिथि, वार, घटका, इत्यादींच्या समेळाने संपूर्ण निर्देश

हवा. यांतील मिळतील तेवढे तपशील स्वीकारावे, हें खरें; पण एकाच निर्देशांतील तपशील आपसांत सुसंगत असले तरच ते स्वीकारार्ह होत. एकांतला सन, दुसऱ्यांतला महिना, तिसऱ्यांतली तिथि आणि चौथ्यांतला वार — असें कडबोळें करून सिद्ध होणारी तिथिं अविश्वासार्हच काय, पण हास्यास्पद समजली पाहिजे.

या पार्श्वभूमीवर शिवजन्मतिथीचा निर्णय कसा करावा हे आता पाहूं.

शिवाजीराजांच्या जन्मतिथीसंबंधाने संशोधनाचे महत्त्वाचे दोन टप्पे आहेत; आणि ते दोन्ही लो. टिळकांच्या संशोधनाशींच संबद्ध आहेत, हा योगायोग म्हटला पाहिजे.

(१) पहिला टप्पा — इ. १९०० तील रायगडावरील शिवजयन्त्युत्सवाचा कार्यक्रम ठरविण्याच्या निमित्ताने लो. टिळकांनी शिवजन्माची तिथि निश्चित करण्याचा प्रयत्न प्रथम केला (केसरी, २४ एप्रिल १९००). तोंपर्यंत बखरींशिवाय अन्य कोणतेंहि साधन उपलब्ध नव्हतें. आणि ह्या साऱ्या बखरी शिवाजीच्या निधनानंतर किमान शंभर वर्षांनंतर रचलेल्या आहेत हें आता सर्वमान्य झालेलें आहे. तरीपण १ कुंडली, १ वंशावळ, २ काव्यें, आणि १० बखरी असे एकूण १४ आधार एकवट करून त्यांनी मंथन केलें. त्यावरून त्यांना आढळलेली वस्तुस्थिति त्यांनी अशी वर्णिली आहे — “ जुन्या कागदपत्रांतून शिवाजी महाराजांचा जन्मकाल पांच-सहा प्रकारें दिलेला आहे. व हे काल इतके भिन्न आहेत की, शक, संवत्सर आणि तिथि या संबंधाने एकाचा मेळ दुसऱ्याशीं पडत नाही. महिना मात्र सर्वत्र वैशाख आहे.” त्यांनी घेतलेल्या एकूण १४ आधारांत शक तीन (१५४५, १५४८, १५४९), तिथि दोन (पंचमी, द्वितीया), आणि अर्थात् वारहि दोन (शनिवार, गुरुवार) निष्पन्न झाले, असा हा ब्रह्मघोटाळा होता.

अशाहि परिस्थितींत त्यांनी (१) शक १५४९ वैशाख शुद्ध २, (२) शक १५४९ वैशाख शुद्ध ५, (३) शक १५४८ वैशाख शुद्ध २ आणि (४) शक १५४८ वैशाख शुद्ध ५ अशा चार तिथि परीक्षणासाठी

निवडल्या. पण त्या चारी गणिताच्या कसोटीस उतरत नाहीत म्हणून अग्राह्य ठरवून शक १५४९ वैशाख शुद्ध प्रतिपदा, गुरुवार, उत्तररात्र, आश्विनी नक्षत्र, ता. ६ एप्रिल १६२७ ही शिवजन्माची तिथि मुक्रर केली! म्हणजे लोकमान्यांनी अनुमानाचा आश्रय करूनच एक तिथि ठरविण्याचा यत्न केला आणि त्यांनी निश्चित केलेली तिथि प्रतिपदा होती, द्वितीया नव्हती. तरी देखील शिवाजी महाराजांच्या नंतर १३० वर्षांनी (इ. १८१०) लिहिलेल्या चिटणिसांच्या बखरींतील द्वितीया हीच तिथि, ह्या तिथीला दिलेला वार गुरुवार चूक असूनहि (शनिवार पाहिजे), लोकांच्या मनांतून गेली नाही! लोकांचें मन असेच पूर्वपरिचिताचें पक्षपाती असतें.

(२) दुसरा टप्पा — पुढे लोकमान्य टिळकांनीच सोळा वर्षांनी (इ. १९१६) 'जेधे यांची शकावली' भारत इतिहास संशोधक मंडळांत दाखल केली. शकावली म्हणजे कौटुंबिक वा ऐतिहासिक घटनांची कालोल्लेखांसह जंत्री. ही जेधे शकावली भोरजवळच्या रोहिडखोऱ्यांतील कारी गावच्या शहाजी व शिवाजीशी स्नेहबद्ध असलेल्या जेधे-देशमुख घराण्याच्या कागदपत्रांत मिळालेली होती.

जेधे शकावलींतील शिवजन्माची नोंद अशी आहे — "शके १५५१ शुक्लसंवत्सरे फाल्गुण वद्य त्रितीया शुक्रवार नक्षत्र हास्त घटी १८ पळे ३१ गड ५ पळे ७ ये दिवसी राजश्री सिवाजी राजे सिवनेरीस उपजले."

शकावलीच्या सोबतच्या टिपणांत 'शिव छत्रपतीचा जन्मकाल या शकावलींत शके १५५१ फाल्गुन वद्य ३, शुक्रवार असा दिला आहे' ही गोष्ट टिळकांनी मंडळाच्या नजरेस आणून दिली. आणि 'ही बाब खरोखर चमत्कारिक आहे' अशी त्या वेळची आपली प्रतिक्रिया आपल्या निबंधांत नोंदून 'या बाबीचा जितका जास्त खल होईल तितका पाहिजेच आहे' असेच शुद्ध संशोधकी अलिप्तपणाने म्हटलें आहे.

अर्थात् या नव्या तिथीने संशोधकांचें लक्ष वेधून घेतलें असल्यास नवल नाही. शक, मास, तिथि, वार, नक्षत्र, गड अशा सुसंगत तपशिलाने सज्जड असलेली ही तिथि विचारांत घेतल्याशिवाय गत्यंतर नव्हतें.

ह्या शकावलीचा अस्सलपणा व विश्वसनीयता म्हणजे समकालीनता व जाणकारी पुढे अनेक प्रकारांनी तपासण्यांत आली व तीबद्दल खात्री झाली. पण त्यामुळे आता १६२७ का १६३० ही समस्या इतिहासज्ञांपुढे उभी राहिली.

पण सुदैवाने एकामागून एक पाठपुरावा करणारी साधनें भिन्नभिन्न ठिकाणांहून उपलब्ध होऊन दहा-बारा वर्षांत नवी तिथि संशयातीत ठरली. ह्या साधनमालिकेंतील दुसऱ्या क्रमांकाचा (पहिला क्रमांक जेधे शकावलीचा) पुरावा म्हणजे इ. १९२४-१९२५ च्या सुमारास हातीं आलेल्या कवीन्द्र परमानंद विरचित 'शिवभारता'चा. हा ग्रंथ उचित सोपस्कारासह इ. १९२७ सालीं प्रकाशित झाला. त्यांत (अध्याय ६, श्लोक २६-२८) 'शक १५५१, शुक्ल संवत्सर, फाल्गुन वद्य तृतीया, रात्रीं' इतका शिवजन्माचा पुरेसा आणि जेधे शकावलीशी जुळता तपशील दिलेला आढळला. हें 'शिवभारत' इ. १६६५–७० च्या दरम्यान रचलेलें आहे. हें एक शिवचरित्रपर संस्कृत काव्य असून तें खुद्द शिवाजीच्या सूचनेवरून लिहिलेलें आहे. त्यांतील घटनांचे व कालाचे उल्लेख अन्य प्रमाणांनी सिद्ध समजलेल्या उल्लेखांशी जमतात हें सर्वमान्य आहे. आणि कवींद्र परमानंद ही व्यक्ति शिवाजीशी समकालीन आणि त्याच्या विश्वासांतील असल्याबद्दल जयपूर अखबारांतील निर्देशावरून आणि परमानंद कुटुंबांत मिळालेल्या इनामपत्रांवरून निर्विवाद सिद्ध झालेले आहे. तेव्हा शिवभारताचेहि प्रामाण्य वादातीत आहे!

शिवभारताच्या आगमनामुळे आता भोर संस्थानांतून आलेली जेधे शकावली आणि तंजावर व कोल्हापूर (प्रत्येकी एक प्रत) इकडून मिळालेलें शिवभारत अशी नव्या जन्मतिथीची दोन भक्कम प्रमाणें सिद्ध झालीं. पुढे त्यांना दुजोरा देणारी आणखी कांही प्रमाणें उपलब्ध झालीं त्यांत राजस्थानांतून मिळालेल्या कुंडलीला अग्रमान दिला पाहिजे. ही कुंडली व तिच्या सोबतचें शिवजन्मतिथीच्या नोंदीचें टिपण हें जयपूरचे राज-ज्योतिषी, जयसिंह-शिवाजीचे समकालीन, शिवराम ज्योतिषी यांच्या हातचें आहे. आणि ते सुटें नसून एका वहींत एकापुढे एक सलग उतरून घेतलेल्या अनेक टिपणांच्या मालिकेंत मधलेंच एक आहे. ह्या

टिपणावरून शक १५५१, फाल्गुन वद्य तृतीया, शुक्रवार आणि उदयात् घटि ३०।९, रवि १०।३३, लग्न ४।२९ म्हणजे उक्त दिवशीं सूर्यास्तानंतर लौकरच शिवजन्म झाला असा वरील दोहोंशी जुळता पण थोडा अधिक तपशील मिळाला. आता अगदी स्वतंत्र, विश्वसनीय आणि प्रतिष्ठित अशीं एकूण तीन प्रमाणें झालीं.

याच तिथीला निरपवाद पाठबळ देणारीं छोटीं-मोठीं अशाच स्वरूपाचीं आणखीहि कांही प्रमाणें पुढे आलीं आहेत. आणि त्यांचा विशेष हा आहे की, " शिवजन्मकाल म्हणून शक १५५१ या सालाचा जेथे जेथे उल्लेख आला आहे, तेथे तेथे शिवजन्माचा वार, तिथि, पक्ष, इत्यादि दिलेला तपशील एकच आहे." त्यांत संगति आहे. कोणताहि घोटाळा नाही.

तेव्हा तो इतर तपशील आपण न पाहिला तरी वर दिलेलीं तीनच प्रमाणें निर्णयासाठी पुरेशीं आहेत. " तिघांचीं ठिकाणें दूरदूरचीं, स्वतंत्र (भोर, तंजावर, कोल्हापूर, राजपुताना) — एकाची एक नक्कल म्हणण्यास जागा नाही." कोणतीहि घाईगर्दी न होता पंधरा-सोळा वर्षें प्रमाणें कसोटीवर घासून पारखून घेतलीं आहेत. त्यामुळे आणि जुन्या टप्प्यांतील उपलब्ध प्रमाणांच्या परस्पर विलक्षण विसंगतीशीं तुलना करून पाहतां, आज उपलब्ध असलेल्या एकंदर पुराव्याचा निष्कर्ष म्हणून दुसऱ्या टप्प्यांतील किंवा नवा शक १५५१ (इ. १६३०) हाच शिवाजी महाराजांचा जन्मशक म्हणून स्वीकारणें अपरिहार्य आहे. जुना शक १५४९ (इ. १६२७) त्याज्यच ठरवावा लागतो.†

पण मग ही चुकीची तिथि रूढ कशी झाली ! आपल्याकडे जन्मकुंडली करून ठेवण्याची पद्धत पूर्वापार आहे. शेदीडशे वर्षांनंतर लिहावयास बसलेल्या बखरकाराने अज्ञानाने वा फाजील विश्वासाने दुसऱ्याच कोणाची निनावी कुंडली हस्तगत करून तींतील तिथि वापरली असावी. शिवाजी-

† संदर्भ—'शिवचरित्रप्रदीप'–आपटे, दिवेकर, श. १८४७; 'छत्रपति शिवाजी महाराज जन्मतिथिनिर्णय समिति–अहवाल व निवेदनें'–महाराष्ट्र-शासन इ. १९६८.

सारख्याच्या कुंडलींत उच्चीचे ग्रह असले पाहिजेत म्हणून कांही जाणकारांनी ठाकठीक करण्यासाठी कांही फिरवाफिरव केली असावी — आणि तेहि पर्याय ठाण धरून बसले असावे. शिवाजीच्या नांवासह निर्देश व टिपणें पुढे प्रत्यक्ष उपलब्ध झालीं; तसें अस्सल टिपण पूर्वीच कोणाला मिळालें असतें तर अर्थात् ही चूक तिथि वा तिचे इतके पर्याय निर्माण झालेच नसते. सभासदासारख्या समकालीन बखरकाराने जन्मतिथि दिलीच नाही. पुराण-प्राय प्रशस्तींत त्याला ती अनाठायी वाटली असेल, किंवा त्या वेळी ती सर्वज्ञात असल्यामुळे देणें अनावश्यक वाटलें असेल. पण त्याने ती दिली असती तर खरीच तिथि त्याने दिली असती यांत शंका नाही.

* * *

शिवचरित्राचीं साधनें

शिवजन्मतिथि ठरविण्यासाठी अंगीकारलेली अभ्यासपद्धतिच शिवचरित्रांतील इतर एकूण एक घटनांचें सत्य पारखून घेण्यासाठी वापरावी लागते. एकट्या जन्मतिथीसाठी दहा पांच पुरावे पाहिले तर दुसऱ्या अनेकानेक घटनांसाठी शेकडों पुराव्यांची म्हणजे पुढे येणाऱ्या अस्तिनास्तिपक्षीं विधानांची छाननी केल्याशिवाय पाऊल टाकतां येत नाही. पुराव्यांमध्यें समकालीन पुरावे सर्वांत अधिक महत्त्वाचे म्हणजे विश्वसनीय समजले जातात. त्यांतहि अपसमजाचा, पक्षाभिनिवेशाचा संशय असेल तर कांही बाद धरावें हा व्यवहारी दंडक न्यायालयांतील विचिकित्सेप्रमाणें ऐतिहासिक चिकित्सेंतहि प्रमाण मानतात. इंग्रजांचा पुरावा इंग्रजांना साधक तर मराठ्यांचा मराठ्यांना पोषक, हें मानसशास्त्रीय गृहीतकृत्यच समजावें. मनुष्याचें एकंदर कर्तृत्व हा सर्वांगीण इतिहासाचा उचित विषय असल्यामुळे त्या कर्तृत्वाची साक्ष मनुष्यनिर्मित वस्तु आणि वास्तु यांच्या बरोबरीने मनुष्यलिखित वृत्तें आणि मतें (सर्व प्रकारचीं व्यावहारिक पत्रें, याद्या वगैरे) यांच्याहि साह्याने पटवून घ्यावी लागणार. साहजिकच या पुराव्याचे अलिखित आणि लिखित असे दोन ढोबळ वर्ग पडतात. प्रस्तुत 'छत्रपति शिवाजी महाराज' या चरित्रांत उपयोजिलेला मुद्रा, नाणीं, इमारती, किल्ले, वस्तु यांचा पुरावा अलिखित वर्गांतला आहे. तर 'निवडक आधार' म्हणून आरंभीं जोडलेली यादी आणि परिशिष्टांत छापलेलीं पत्रें लिखितवर्गांत पडणारीं आहेत. शिवाजी महाराजांच्या काळचा उत्खननलब्ध पुरावा रायगडावर दरबार परिसरांत मिळालेल्या अगदी किरकोळ वस्तूंशिवाय तिळमात्र नाही. आणि अर्वाचीन युगांतील शिवकालाबद्दल लिपिलेखबद्ध भरपूर सामग्री उपलब्ध असल्यामुळे त्याची अभ्यासकाला तशी अपेक्षाहि नाही.

इतकें ध्यानांत घेतल्यावर शिवचरित्राच्या साधनांचा व्याप आणि विस्तार जरासा तपशिलाने पाहतां येईल. छत्रपतींचा बोलबाला अफजलप्रकरणानंतर फार झाला. भारतांतील देशी सत्ता आणि परदेशीय युरोपीय व्यापारी या सर्वांचें लक्ष आपल्या या यशाने महाराजांनी वेधून घेतलें. तेथपासून (इ. १६५९) अनेक परकीयांच्या लेखांत व पत्रव्यवहारांत त्यांचा उल्लेख येऊं लागला. पण तत्पूर्वीच्या त्यांच्या हालचाली मर्यादित मावळभागांतच झाल्यामुळे तत्संबंधीची चक्षुर्वैसत्यं माहिती त्याच प्रदेशांतील व समकालीनांच्या मराठी कागदपत्रांतूनच पुरविली पाहिजे. संशोधकांनी हा देशी-परदेशी पुरावा शोधून, संग्रहून, नकलून, भाषांतर करून, सार काढून छापून प्रसिद्ध केलेला आहे; तर कित्येक कागदपत्रें अजून बहुभाषामिश्र अशा केवळ हाताच्या बोटांवर मोजतां येण्याइतक्या अगदी थोड्या तज्ज्ञांनाच गम्य असून कांही खाजगी व्यक्तींच्या अगर सरकारच्या संग्रहांतच कष्टाने उपलब्ध होण्यासारखीं आहेत. मराठशाहीच्या उत्तरकालापेक्षा शिवकालाबद्दल कागद फार कमी आहेत. तरी देखील मराठीशिवाय फारसी, उर्दू, बंगाली, आसामी इत्यादि भारतांतील आणि पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रजी इत्यादि परदेशी भाषांतून अनेक प्रसंगांबद्दल शब्दशः शेकडों कागदपत्रें व कितीतरी साधकबाधक उल्लेख अभ्यासकांच्या छाननीसाठी उपलब्ध आहेत. मात्र ज्यांबर पुरेसा प्रकाश अजून पडलेला नाही अशाहि कित्येक घटना निर्णायक पुराव्याची वाट पाहात आहेत. अशा कांहींचा निर्देश प्रस्तुत चरित्रांत आढळेल. जागरूकतेने लक्ष ठेवलें तर अजूनहि महत्त्वाचे धागेदोरे कागदोपत्रींच केवळ नव्हे तर वृद्धांच्या तोंडून किंवा परंपरेने चालत आलेल्या लोककथा-दंतकथांतून देखील मिळण्याचा संभव असतो. कित्येक महत्त्वाचे समकालीन पुरावे अगदी अलीकडेच उजेडांत आलेले आहेत. इतिहाससंशोधन हें तसें पाहिलें तर अखंड धगधगणारें अग्निहोत्र आहे. उपयुक्त कागदपत्रांचे नानाविध प्रकार आणि त्यांची क्षमता हा तांत्रिक आणि तज्ज्ञतेचा विषय आहे. तथापि नवागतांनी प्राथमिक दर्शन म्हणून कै. द. वि. आपटे ह्यांची 'महाराष्ट्र इतिहास मंजरी' पाहावी. श्रीशिवचरित्रकार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या (इ. १९३०) 'शिवकालीन पत्रसारसंग्रहां'त तावत्कालपर्यंतच्या ज्या साधनांतून त्या संग्रहांत सारांश किंवा अवतरणें घेतलीं आहेत

त्या सुमारें ७५ साधनग्रंथांची यादी आहे. ती भाषा आणि प्रकार यांच्या विविधतेची कल्पना आणून देईल.

कागदपत्रांचे भाषावारीशिवाय आणखी एका प्रकारें वर्ग पाडणें अवश्य आहे. कांही लिखाण आवश्यक असतें तर कांही ऐच्छिक असतें. सरकारी कामकाजाच्या म्हणजे कारभारविषयक, इनामी इत्यादि दप्तरनोंदी, परवाने, आज्ञापत्रें हीं आवश्यक, अधिकृत आणि सर्वस्वीं समकालीन असतात. राजकारणी बातमीपत्रें, राजपत्रें, फर्मानें हीं याच वर्गांत पडतात. इतर म्हणजे बखरी, वृत्तान्त, ऐकीव हकीकतींचे पत्रव्यवहार हे ऐच्छिक आणि लेखकाच्या वैयक्तिक पूर्वग्रहांनी धूसर होण्याचा संभव असतो. असें ऐच्छिक वाङ्मय शिवकालाशीं जवळून दुरून संबंध सांगणारें अमाप आढळेल. अशा 'आधारभूत (?) ग्रंथांची यादी' कै. त्र्यं. शं. शेजवलकर यांच्या 'श्री शिवछत्रपति' या संकलनग्रंथांत साक्षेपाने गोळा केलेली आढळेल. तिचीं रॉयल आकाराचीं पंचवीस पृष्ठें झालीं आहेत व तींत मराठी (३४५), संस्कृत (३२), हिंदी-उर्दू (१७), इंग्रजी (३७५), पोर्तुगीज (१६), डच (१) व फ्रेंच (७) मिळून एकूण ९९३ लहानमोठ्या पुस्तकांची नोंद झाली आहे.

'व्यक्ति तितक्या प्रकृति' या न्यायाने, प्रत्येक भाषेच्या म्हणजे ती ती भाषा वापरणारांच्या स्वभावाप्रमाणें व लेखनाच्या प्रयोजनाला अनुसरून प्रत्येकाच्या लेखनपद्धतींत फरक आढळतो. आपल्याकडील खाजगी पत्रव्यवहारांत तारखांचा पत्ता नसतो. तर परदेशी व्यापाऱ्यांच्या कागदपत्रांत तसे निर्देश संदिग्ध असणें हा अपवादच म्हणावा लागेल. परदेशांतून दूरदेशी आलेले व्यापारी मायदेशाला कार्यवृत्त कळवितात तेव्हा ते कार्यालयीन टापटीप, नेमकेपणा व नकला करून ठेवण्याचा नेटकेपणा वापरतात. त्यामुळे त्यांचा समकालीन घटनानिश्चितीला पुष्कळ उपयोग होतो. तात्पर्य, साधनासाधनांत तरतमभाव ओळखून वापर करावा लागतो. अशा तऱ्हेची चिकित्सा प्रत्येक इतिहासलेखकाला प्रत्यक्ष ग्रंथांत नसली तरी कागदावर एखादें विधान उतरविण्याच्या आधीं आपल्या मनांत करावी लागतेच. कै. सर यदुनाथ सरकार यांची फार्सी व परदेशी साधनांवरील

जादा निष्ठा, तीं साधनें त्यांना अधिक परिचित असल्यामुळे उद्भवली असली तर त्यांत नवल नाही. त्यांच्या ‘ शिवाजी ’ या विद्वन्मान्य इंग्रजी पुस्तकांत त्यासंबंधांतील त्यांचीं तपशीलवार मतें सुमारें ८ पृष्ठांत विस्ताराने मांडलेलीं आढळतील. तथापि मराठी साधनांचा आवांका व स्वभाव ओळखून म्हणजे कांही पथ्यें व तंत्रें सांभाळून त्यांचाहि उपयोग, सर सरकारांना मिळविणें शक्य नव्हतें अशा विशिष्ट माहितीच्या बळावर, चांगल्या तऱ्हेने महाराष्ट्रीय इतिहासकारांनी आवर्जून केलेला आहे, हें महाराष्ट्रीय अभ्यासकांना तरी सांगावयास नको.

प्रस्तुत चरित्राची साधनांच्या संबंधांतील भूमिका, प्रस्तावनेवरून सहज ध्यानांत यावी. ‘ निवडक आधार ’ म्हणून दिलेल्या यादीपलीकडे फारसें जाणें लेखकाला धोक्याचें वाटतें. मात्र सर्व नाही तरी बहुतेक महत्त्वाच्या उल्लेखांचा विचार मनाशीं करून मनाला निःसंदिग्ध पटलें तें चरित्रसार वाचकांना आदरपूर्वक निवेदन केलें आहे.

वर वर्णन केलेल्या पद्धतीने उपलब्ध असलेल्या प्रचंड सामग्रीचें परिगणन वा साधकबाधक प्रमाणें दाखवून निर्णायक निरीक्षण एवढ्याशा छोट्या टिपणाच्या आवांक्यांत बसणारें नाही. ऐतिहासिक चरित्रलेखनाचा आराखडा घालतांना दृष्टीचा पल्ला कोठेकोठे पोंचवावा लागतो, हें एका अभ्यासकाने संभाव्य समानशील अभ्यासकांच्या नजरेस अंशतः आणून देण्याचा हा प्रयत्न.

* * *

सूचि

अनुक्रमणिका परिच्छेदवार असल्यामुळे तीवरून बराच
तपशील सहज सापडेल.

* * *

पुणे विद्यापीठ बहिःशाल शिक्षण मंडळाची

बहिःशाल शिक्षण ग्रंथमाला

प्रकाशित ग्रंथ

*१. **जगाचें राजकारण** (प्रथमावृत्ती १९५४)
लेखक—**प्रा. व. मं. सिरसीकर**

*२. **वनश्री-दर्शन** (प्रथमावृत्ती १९५५)
लेखक—**डॉ. म. वि. आपटे**

*३. **व्यक्ति-स्वातंत्र्याचा विकास** (प्रथमावृत्ती १९५५)
लेखक—**श्री. मा. प. मंगुडकर**

४. **भारतीय पशू** (प्रथमावृत्ती १९५५; द्वितीयावृत्ती १९६८)
लेखिका—**सौ. शकुंतलाबाई पोंक्षे**

५. **घाटावरील श्रमिकांची लोकगीते**, (प्रथमावृत्ती १९५५; द्वितीयावृत्ती १९७०)
लेखिका—**सौ. अनसूया लिमये**

६. **पक्षिदर्शन** (प्रथमावृत्ती १९५७)
लेखक—**डॉ. म. वि. आपटे**

७. **मराठी लोककथा** (प्रथमावृत्ती १९५७; द्वितीयावृत्ती १९७०)
लेखिका—**डॉ. सरोजिनी बाबर**

८. **पंचांगांतील ज्योतिःशास्त्र** (प्रथमावृत्ती १९५८)
लेखक—**श्री. त्र्यं. गो. ढवळे**

९. **मोजमापाची उत्क्रांति व दशमानपद्धति** (प्रथमावृत्ती १९५८)
लेखक—**प्रा. ना. वा. कोगेकर**

१०. **सूर्य आणि सूर्यशक्तीचे उपयोग** (प्रथमावृत्ती १९५८)
लेखक—**प्रा. ना. वा. कोगेकर**

---

* या ग्रंथांच्या **प्रती शिल्लक नसल्याने** द्वितीयावृत्ती छापून घेऊन प्रकाशित करण्याचा विचार होत आहे.

११. **महाराष्ट्रांतील पाणीपुरवठा** (प्रथमावृत्ती १९६०)
लेखक—**श्री. न. गं. आपटे**

१२. **भारतांतील आर्थिक नियोजन** (प्रथमावृत्ती १९५९)
लेखक—**प्रा. दे. अ. दाभोळकर**

१३. **छत्रपति शिवाजी महाराज** (प्रथमावृत्ती १९६०; द्वितीयावृत्ती १९६१; तृतीयावृत्ती १९७१)
लेखक—**श्री. दि. वि. काळे**

१४. **राहु-केतु आणि ग्रहणें** (प्रथमावृत्ती १९६०)
लेखक—**श्री. त्र्यं. गो. ढवळे**

१५. **शेती व ग्रामीण जीवनविषयक कायदे** (प्रथमावृत्ती १९६१)
लेखक—**श्री. रा. स. ढवळे**

१६. **बुद्ध : संप्रदाय आणि शिकवण** (प्रथमावृत्ती १९६३)
लेखक—**प्रा. चिं. वि. जोशी**

१७. **आपले डोळे : त्यांची रचना, कार्य आणि आरोग्य**
(प्रथमावृत्ती १९६४; द्वितीयावृत्ती १९६६; द्वितीयावृत्ती पुनर्मुद्रण १९६९)
लेखक—**डॉ. द. गो. पटवर्धन**

हमारी आँखें : रचना, कार्य तथा स्वास्थ्य (प्रथमावृत्ती १९६८)
"आपले डोळे" या ग्रंथाचा हिंदी अनुवाद
अनुवादक—**डॉ. ह. रा. दिवेकर**

१८. **हिंदी साहित्याचा सुरस व संक्षिप्त इतिहास**
(प्रथमावृत्ती १९६८)
लेखक—**डॉ. ह. रा. दिवेकर**

१९. **भारताची रिझर्व्ह बँक** (प्रथमावृत्ती १९६९)
लेखक—**श्री. व. वि. लोणकर**

२०. **अवतारांचा कळस : संत तुकाराम** (प्रथमावृत्ती १९७०)
लेखक—**श्री. गो. शं. राहिरकर**

पुणे विद्यापीठ बहि:शाल शिक्षण मंडळाची

बहि:शाल व्याख्यान-सार-माला

प्रकाशित पुष्पे

(मूल्य प्रत्येकी पंधरा पैसे)

१. संस्कृत भाषेचे शैक्षणिक महत्त्व ...प्रा. य. र. आगाशे
२. अभ्यास कसा करावा ? ...प्रा. ल. ब. हरोलीकर
३. भारतीय ग्रामोद्योग ...प्रा. वा. सी. काळे
४. अशन व अनशन ...श्री. शं. का. गोखले
५. भारतातील निवडणुकीचा कायदा ...श्री. म. रा. दळवी
६. खते—नैसर्गिक व कृत्रिम ...डॉ. वा. शं. कुलकर्णी
७. संयुक्त राष्ट्रसंघटना आणि भारत ...श्री. श्री. शं. पतके
८. कल्याणकारी राज्य ...प्रा. गं. ना. क्षीरसागर
९. भारतांतील नैसर्गिक संपत्ति ...प्रा. वा. सी. काळे
१०. लोकसाहित्याचें शैक्षणिक महत्त्व ...प्रा. दा. गो. बोरसे
११. महाराष्ट्रांतील तीन प्रमुख उद्योगधंदे (कापड, साखर व प्लॅस्टिक) ...डॉ. वा. शं. कुलकर्णी
१२. कौटुंबिक स्वास्थ्याचें मानसशास्त्र ...प्रा. ल. ब. हरोलीकर
१३. मुलांचा मनोविकास ...प्रा. ल. ब. हरोलीकर
१४. आरोग्याचे शत्रु व मित्र ...श्री. शं. का. गोखले
१५. पृथ्वीची कथा ...प्रा. प्र. वि. सोवनी
१६. कागद (शोध, इतिहास आणि उत्पादनाचा व्यवसाय) ...डॉ. बा. मो. कानिटकर
१७. आमच्या ग्रामपंचायती ...श्री. भा. वि. गुळवणी
१८. आंतरराष्ट्रीय लष्करी करार व भारत ...श्री. द. ना. नरवणे
१९. आपला आहार व त्याचें नियोजन ...श्री. शं. का. गोखले
२०. तेजी-मंदी ...प्रा. गं. ना. क्षीरसागर
२१. बँका व त्यांचें कार्य ...प्रा. गं. ना. क्षीरसागर
२२. हास्य आणि विनोद ...प्रा. चिं. वि. जोशी
२३. सूर्य आणि सूर्यशक्तीचे उपयोग व सूर्यावरील घडामोडी ...प्रा. ना. वा. कोगेकर

वर्तुळांचा खुलासा

मोठीं वर्तुळें
सरकारकून
[पाहा पृ. १ व २१४]

१ पेशवे (प्रधान)

२ सुरनीस (सचिव)

३ वाकनीस (मंत्री)

४ हणमंते

छोटीं वर्तुळें

त्या त्या भागाचे
परराज्यांतील
चौथाईचे सुभे.

